# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०९/२०२०** **दिनांक १३.०७.२०२०**

**स्थळ- साई सभागृह, शिर्डी** **वेळ- दुपारी ०१.०० वाजता**

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दिनांक ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सोमवार दिनांक १३/०७/२०२० रोजी दुपारी ०१.०० वाजता साई सभागृह,शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/५५७/२०२०, दि.०४.०७.२०२० अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

त्यानुसार सदरहु सोमवार दिनांक १३/०७/२०२० रोजी दुपारी ०१.०० वाजता साई सभागृह,शिर्डी येथे सुरु करण्यात आली. या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.न्या.श्रीकांत आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.
२. मा.श्री.अरुण डोंगरे (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
३. मा.श्री.दिलीप स्वामी, अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
४. मा.श्रीमती गीता प्रविण बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर.

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दि.०९.०६.२०२० रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३५५** **दिनांक ०९.०६.२०२० रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

१. निर्णय क्र.३४१- यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला माहे ऑक्टोबर २०१९ ते सप्टेंबर २०२० या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासणी अहवालांचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-भांडार विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**निर्णय क्र.३४१- यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला माहे ऑक्टोबर-२०१९ ते जानेवारी-२०२० या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासणी अहवालांचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-भांडार विभाग)**

---

२. निर्णय क्र.३४९- यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे रकमेनिहाय साईभक्तांना सेवा सुविधा पुरविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. तथापी रक्कम रु.५०,००१ ते २,००,०००/-पर्यंत देणगी देणाऱ्या साईभक्तांना श्रींचे फोटो ऐवजी श्रींची छोटी मुर्ती देण्यात यावी. नवीन शालची खरेदी कदापीही करु नये, तसेच खर्चात बचत करणेकामी साईभक्तांकडून देणगी स्वरुपात मिळणाऱ्या शाल यांचा वापर करण्यात यावा, असे ठरले. प्रस्तुत प्रकरणी व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८७३ व दि.२२.०८.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१५ निरस्त करण्यास मान्यता देण्यात आली. सदर बाब मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन करुन निदर्शनास आणून द्यावी,असे ठरले.

(कार्यवाही-लेखाशाखा विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**निर्णय क्र.३४९- यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे रकमेनिहाय साईभक्तांना सेवा सुविधा पुरविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. तथापी रक्कम रु.५०,००१ ते २,००,०००/-पर्यंत देणगी देणाऱ्या साईभक्तांना श्रींचे फोटो ऐवजी श्रींची छोटी मुर्ती देण्यात यावी. नवीन शालची खरेदी कदापीही करु नये, तसेच खर्चात बचत करणेकामी साईभक्तांकडून देणगी स्वरुपात मिळणाऱ्या शाल यांचा वापर करण्यात यावा, असे ठरले. प्रस्तुत प्रकरणी व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८७२ व दि.२२.०८.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१५ निरस्त करण्यास मान्यता देण्यात आली. सदर बाब मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन करुन निदर्शनास आणून द्यावी,असे ठरले. (कार्यवाही-लेखाशाखा विभाग)**

---

**विषय नं.०२** **कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना... संस्थान आस्थापनेवरील कायम, कंत्राटी व कंत्राटी कर्मचारी यांना माहे जून-२०२० चे वेतन आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) **विषयाची पूर्वपीठीका –**

**(अ-१)** आपणांस विदितच आहे की, **कोव्हीड १९** (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी करावयाचे प्रतिबंधात्मक उपायोजनेनुसार मा. भारत सरकार व मा. महाराष्ट्र शासन यांचेकडून संपूर्ण भारत देशात तसेच महाराष्ट्र राज्यात दिनांक २३ मार्च, २०२० पासून संपूर्ण LOCKDOWN घोषित करणेत आलेला होता. मा. केंद्र व राज्य शासनाने या LOCKDOWN चा कालावधी आजपावेतो ०४ वेळा वाढविलेला आहे.

मा. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नःवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील **दिनांक ३१ मे, २०२०** रोजीचे आदेशान्वये, या LOCKDOWN ची मुदत (कालावधी) **दिनांक ३० जून, २०२० अखेर** आणि आता **दिनांक २९ जून, २०२०** रोजीचे आदेशान्वये,**दिनांक ३१ जुलै, २०२० अखेर** काही अटी-शर्तीवर तसेच काही अत्यावश्यक बाबींसाठी सवलत देऊन वाढविणेत आलेली असून, आज अखेर LOCKDOWN ची कठोर अंमलबजावणी स्थानिक महसूल व पोलिस प्रशासनामार्फत सुरु आहे.

**(अ-२)** सामान्य प्रशासन विभागाकडील वेळोवेळी पारित करणेत आलेल्या आदेशांनुसार, कोव्हीड १९ या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी मा. शासनाने निर्देशित केलेल्या उपाययोजनेनुसार, दिनांक २३ मार्च, २०२० पासून संस्थान आस्थापनेवरील अत्यावश्यक सेवेचे विभाग वगळतां, सर्व विभागातील कर्मचा-यांच्या कार्यालयातील/कार्यस्थळावरील उपस्थितीवर टप्प्या-टप्प्याने निर्बंध आणणेत येऊन, कर्मचा-यांना आळीपाळीने / चक्रीय पध्दतीने कामावर बोलविणेत येत असून, माहे मार्च, २०२० पासून आजपावेतो म्हणजेच माहे जून, २०२० मध्येही सलग व कायम ठेवणेत आलेली आहे आणि माहे जुलै, २०२० मध्येही सलग ठेवणेत येत आहे.

**(अ-३)** तसेच, माहे मे, २०२० चे वेतन आदा करणेबाबत, मा. तदर्थ समितीचे **दिनांक ०९ जून, २०२०** रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावर मा. तदर्थ समितीने **निर्णय क्रमांक ३०८** अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला होता –

***“.. ..*** *यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आस्थापनेवरील कायम, कंत्राटी व कंत्राटी कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी यांना माहे मे, २०२० चे वेतन आदा करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आले –*

*१. मा. शासनाकडून प्रतिनियुक्तीने कार्यरत असणा-या अधिका-यांना माहे मे, २०२० पूर्ण मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करणेत यावे.*

*२. संस्थान आस्थापनेवरील कायम (स्थायी) कर्मचा-यांना माहे मे, २०२० चे पूर्ण मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करणेत यावे.*

*३. संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे ५९८ कंत्राटी कर्मचारी त्यांचेबाबत निर्णय प्रलंबित आहे, या कर्मचा-यांना तसेच कंत्राटदारामार्फत असणारे कंत्राटी कर्मचारी, बाह्यस्त्रोत कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी आणि उक्त्या दराने दिलेल्या ठेक्याचे कंत्राटदाराकडे कार्यरत असणारे कर्मचारी यांना माहे मे, २०२० मध्ये प्रत्यक्ष कामावर हजर असलेल्या दिवसाचे वेतन हे किमान / विहित वेतनदरानुसार १०० टक्के आणि कोव्हीड १९ लॉकडाऊन कालावधीतील उर्वरीत दिवस कामावर हजर नसल्याने त्या दिवसांचे वेतन हे किमान / विहित वेतनदरानुसार ५० टक्के आदा करणेत यावे.*

*४. रुग्णालय विभागाकडील ५९८ कंत्राटी कर्मचारी त्यांचेबाबत निर्णय प्रलंबित आहे, या कर्मचा-यांना तसेच कंत्राटदारामार्फत असणारे कंत्राटी कर्मचारी, बाह्यस्त्रोत कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी आणि उक्त्या दराने दिलेल्या ठेक्याचे कंत्राटदाराकडे कार्यरत असणारे कर्मचारी यांना माहे मे, २०२० चे वेतन आदा करतांनाज्या कर्मचा-यांची उपस्थिती ५० टक्के व त्यापेक्षा जास्त असेल अशा कर्मचा-यांना किमान / विहित वेतन दरानुसार १०० टक्के वेतन आदा करणेत यावे तसेच ज्या कर्मचा-यांची उपस्थिती ५० टक्क्यापेक्षा कमी असेल अशा कर्मचा-यांना अ. नं. ३ प्रमाणे वेतन आदा करणेत यावे.*

*५. मा. राज्य शासनाने दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना लॉकडाऊन कालावधीत कार्यालयात हजर राहण्यापासून सूट / सवलत दिलेली असल्याने अशा दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना माहे मे, २०२० चे १०० टक्के वेतन किमान / विहित वेतनदरानुसार आदा करणेत यावेत.”*

उपरोक्त मा. तदर्थ समितीचे निर्णयानुसार, संस्थान व्यवस्थापनाकडे / आस्थापनेवर विविध विभागाकडे, विविध पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनामाहे मे, २०२० चे वेतन/ पगार/मानधन आदि आदा करणेकामी सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक २४ जून, २०२० आणि दिनांक २६ जून, २०२० रोजीचे आदेशान्वये संबंधित विभागांमार्फत कार्यवाही करणेत आलेली आहे / सुरु आहे.

**(ब) माहे जून,२०२० चे (म्हणजेच माहे जुलै, २०२० मध्ये आदा करावयाचे)वेतनाबाबत करावयाचे कार्यवाहीचा प्रस्ताव –**

**(ब-१) प्रतिनियुक्तीवरील अधिकारी यांचे वेतन-** मा.राज्य शासनाने कोव्हीड-१९ या विषाणूचे प्रादुर्भावात वाढ झाल्याने, दिनांक ३१ मे, २०२० आणि दिनांक २९ जून, २०२० रोजीचे आदेशानुसार, LOCKDOWN चा कालावधी/मुदत अनुक्रमे **दिनांक ३०जून, २०२० आणि दिनांक ३१ जुलै, २०२०** अखेर वाढविल्याने,संस्थान आस्थापनेवर दैनंदिन कामकाजाचे नियोजन व नियंत्रण करणेसाठी मा. शासनाकडून प्रतिनियुक्तीने कार्यरत असणारे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी असे एकुण ०४ अधिकारी यांचे माहे जून, २०२० (माहे जुलै, २०२० मध्ये आदा करावयाचे) चे पूर्ण मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करता येईल, असे मत आहे.

**(ब-२) कायम (स्थायी) कर्मचारी यांचे वेतन-** श्री साईंचे समाधी दर्शनासाठी शिर्डी येथे येणारे भक्तांना मुलभूत सेवा-सुविधा जसे, दर्शन, प्रसाद भोजन, निवास, सुरक्षा, वैद्यकीय व्यवस्था विनासायास व विनाविलंब प्राप्त व्हाव्यात म्हणून तसेच इतर अनुंषगिक कामकाजासाठी एकूण ४० विभाग कार्यरत असून, माहे जून, २०२० अखेर संस्थान आस्थापनेवर एकूण १८८७ कायम (स्थायी) कर्मचारी कार्यरत आहेत.

संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे कायम (स्थायी) कर्मचा-यांना मा. तदर्थ समिती व प्रशासकीय स्तरावरील मान्यतेने LOCKDOWN च्या कालावधीतील माहे एप्रिल, २०२० व माहे मे, २०२० पूर्ण मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करणेत आलेले आहे.

LOCKDOWN च्या कालावधीत मा. शासनाचे नियमांचे पालन करुन, संस्थान आस्थापनेवरील प्रामुख्याने रुग्णालये, आरोग्य (स्वच्छता), संरक्षण, प्रसादालय, बगीचा, बांधकाम, विद्युत आदि अत्यावश्यक सेवेतील विभागांसह इतर अन्य विभागांकडे कार्यरत असणारे सर्व कायम (स्थायी) कर्मचा-यांना आवश्यकतेनुसार व गरजेनुसार काही विभागात पूर्ण उपस्थितीसह इतर विभागात आवश्यकतेनुसार चक्रीय पध्दतीने/आळीपाळीने कामावर बोलविणेत आलेले होते / येत आहे. याबाबीचा विचार करुन, संस्थान आस्थापनेवरील कायम (स्थायी) कर्मचा-यांना माहे जून, २०२० (माहे जुलै, २०२० मध्ये आदा करावयाचे) चे पूर्ण मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करता येईल, असे मत आहे.

**(ब-३) कायम कंत्राटी कर्मचारी (५९८ कर्मचारी) यांचे वेतन-**मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ आणि त्या अनुषंगाने प्रशासकीय स्तरावरील मान्यतेनुसार, सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत असणारे कुशल / अकुशल ६३५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी ५९८ कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना, किमान वेतन कायद्यानुसार व किमान वेतन दरानुसार माहे जानेवारी, २०२० मध्ये कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून संस्थानांचे विविध विभागांकडे नियुक्त्या देणेत आलेल्या आहेत.

या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना LOCKDOWN चे कालावधीत मा. शासनाचे नियमांचे पालन करुन, आवश्यकतेनुसार व गरजेनुसार काही विभागात पूर्ण उपस्थितीसह इतर विभागात आवश्यकतेनुसार चक्रीय पध्दतीने / आळीपाळीने कामावर बोलविणेत आलेले होते. या बाबीचा विचार करुन, या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे जून, २०२० (माहे जुलै, २०२० मध्ये आदा करावयाचे) चे पूर्ण मासिक वेतन **किमान वेतन दरानुसार** विहित पध्दतीने आदा करता येईल, असे मत आहे.

**(ब-४) कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनाबाबत –**

संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत सध्या खालीलप्रमाणे कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत –

१. कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी (साधारणतः सर्व विभागात कार्यरत)

२. कुशल/अकुशल सुरक्षा निरीक्षक/सुरक्षारक्षक / बंदूकधारी सुरक्षारक्षक / माजी सैनिक (संरक्षण विभाग)

३. निश्चित मानधन/वेतनावर आणि निश्चित कालावधीसाठी नियुक्त करणेत आलेले कर्मचारी

(उदा. भूसंपादन सल्लागार, मोजणीदार, वैद्यकीय अधिकारी, पॅरा मेडिकल स्टाफ, शिक्षक इत्यादी–विशेषतः रुग्णालये/मालमत्ता/प्रकाशने/आयटीआय विभाग ई. )

४. बाह्यस्त्रोत स्त्री/पुरुष पारिचारिका व इतर (किमान वेतनावर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत–रुग्णालये विभाग)

वर नमुद केलेप्रमाणे संस्थान आस्थापनेवरील सर्वसाधारणपणे सर्वच विभागात कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत आहेत. या सर्व कर्मचा-यांना मा. तदर्थ समितीचे निर्णयानुसार, प्रशासकीय स्तरावर विहित कार्यपध्दती निश्चित करुन माहे मार्च, एप्रिल व मे, २०२० या महिन्याचे मासिक वेतन आदा करणेत आलेले आहे.

या कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांना मा. शासनाचे नियमांचे पालन करुन, आवश्यकतेनुसार व गरजेनुसार चक्रीय पध्दतीने / आळीपाळीने कामावर बोलविणेत आलेले होते. त्यामुळे या

कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांना **किमान वेतन दरानुसार** / विहित वेतन दरानुसार माहे जून, २०२० चे पूर्ण मासिक वेतन आदा करता येईल, असे मत आहे.

**(ब-५)** या व्यतिरिक्त संस्थान आस्थापनेवरील खालील विभागांकडे उक्ते / ठोक पध्दतीने काम दिलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटदारामार्फत बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत –

०१. (अ) श्री साईनाथ रुग्णालय (हाऊसकिपींग) (ब) श्री साईनाथ रुग्णालय (पारिचारिका ) (क) श्री साईनाथ रुग्णालय (इतर कर्मचारी)

०२. (अ) श्री साईबाबा हॉस्पीटल (हाऊसकिपींग) (ब) श्री साईबाबा हॉस्पीटल (पारिचारिका) (क) श्री साईबाबा हॉस्पीटल (इतर कर्मचारी)

०३. श्री साई प्रसादालय (चपाती / पुरी / नाष्टा पाकिटे / हाऊसकिपींग / वाढपी आदि)

०४. लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग ( बुंदी प्रसाद / बुंदी लाडू प्रसाद )

०५. व्दारावती / श्री साई आश्रम / श्री साई धर्मशाळा निवासस्थान विभाग (हाऊसकिपींग)

उपरोक्त नियुक्त करणेत आलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटदारांना ज्या-त्या संबंधित विभागांमार्फत स्वतंत्ररित्या अटी-शर्तीसह कार्यादेश देणेत आलेले आहेत. त्यामुळे अशा बाह्यस्त्रोत कंत्राटदारांकडे कार्यरत असणा-या कंत्राटी कर्मचा-यांना वेतन मिळणेबाबत कशी व कोणती कार्यपध्दती अवलंबवावी याबाबत त्या-त्या विभागांनी स्वतंत्ररित्या प्रशासकीय स्तरावर प्रस्ताव सादर करुन त्याबाबतची मान्यता घ्यावी, असे मत आहे.

**(ड)** सध्या विषयांकित कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव वाढता असून, मा. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नःवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील **दिनांक ३१ मे, २०२०** रोजीचे आदेशान्वये, या LOCKDOWNची मुदत (कालावधी) **दिनांक ३० जून, २०२० अखेर** आणि आता **दिनांक २९ जून, २०२०** रोजीचे आदेशान्वये, **दिनांक ३१ जुलै, २०२० अखेर** काही अटी-शर्तीवर तसेच काही अत्यावश्यक बाबींसाठी सवलत देऊन वाढविणेत आलेली असून, आज अखेर या आदेशांची कठोर अंमलबजावणी स्थानिक महसूल व पोलिस प्रशासनामार्फत सुरु आहे.

त्यामुळे उपरोक्त **परिच्छेद (अ)** मधील पूर्वपीठीकेस अनुसरुन, **परिच्छेद ब मधील उपपरिच्छेद (ब-१ ते ब-५)** मध्ये नमूद केलेप्रमाणे, संस्थान व्यवस्थापनाकडे / आस्थापनेवर विविध विभागाकडे, विविध पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनामाहे जून, २०२० चे (माहे जुलै,२०२० मध्ये आदा करावयाचे) वेतन/पगार/ मानधन आदी आदा करणेस मान्यता मिळणेकामी उपरोक्त प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आस्थापनेवरील कायम, कंत्राटी व कंत्राटी कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी यांना माहे जुन-२०२० चे वेतन आदा करणेबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

१. **महाराष्ट्र शासनाकडून प्रतिनियुक्तीने संस्थानमध्ये कार्यरत असणारे अधिकारी व संस्थान आस्थापनेवरील कायम (स्थायी) कर्मचारी यांचे वेतनाबाबत पुढील निर्णय मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावेत व त्याबाबत शासनाकडून वेळोवेळी जे निर्णय प्राप्त झाले व होतील त्या सर्व निर्णयांचे त्यांनी पालन करुन विहित पध्दतीने त्यांचे वेतन अदा करावे. यापुढे प्रतिनियुक्तीने संस्थानमध्ये कार्यरत असणारे अधिकारी व संस्थान आस्थापनेवरील कायम (स्थायी) कर्मचारी यांचे वेतनाबाबतचा प्रस्ताव तदर्थ समितीसमोर आणू नये.**

२. **संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे ५९८ कंत्राटी कर्मचारी त्यांचेबाबत निर्णय प्रलंबीत आहे, या कर्मचाऱ्यांना तसेच कंत्राटदारामार्फत असणारे कंत्राटी कर्मचारी, बाहयस्त्रोत कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी आणि उक्त्या दराने दिलेल्या ठेक्याचे कंत्राटदाराकडे कार्यरत असणारे कर्मचारी, मानधनावरील कर्मचारी यांना माहे जुन-२०२० मध्ये प्रत्यक्ष कामावर हजर असलेल्या दिवसाचे वेतन हे किमान/विहीत वेतनदरानुसार १०० टक्के आणि कोव्हीड १९ लॉकडाऊन कालावधीतील उर्वरीत दिवस कामावर हजर नसल्याने, त्या दिवसांचे वेतन हे किमान/विहीत वेतनदरानुसार ५० टक्के आदा करण्यात यावे.**

३. **रुग्णालय विभागाकडील ५९८ कंत्राटी कर्मचारी त्यांचेबाबत निर्णय प्रलंबीत आहे, या कर्मचाऱ्यांना तसेच कंत्राटदारामार्फत असणारे कंत्राटी कर्मचारी, बाहयस्त्रोत कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी आणि उक्त्या दराने दिलेल्या ठेक्याचे कंत्राटदाराकडे कार्यरत असणारे कर्मचारी यांना माहे जुन-२०२०चे वेतन आदा करतांना ज्या कर्मचाऱ्यांची उपस्थिती ५० टक्के व त्यापेक्षा जास्त असेल अशा कर्मचाऱ्यांना किमान/विहीत वेतनदरानुसार १०० टक्के वेतन आदा करण्यात यावे, तसेच ज्या कर्मचाऱ्यांची उपस्थिती ५० टक्क्यापेक्षा कमी असेल अशा कर्मचाऱ्यांना अ.नं.२ प्रमाणे वेतन आदा करण्यात यावे.**

४. **मा. राज्य शासनाने दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना लॉकडाऊन कालावधीत कार्यालयात हजर राहण्यापासून सुट/सवलत दिलेली असल्याने अशा दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना माहे जुन-२०२० चे १०० टक्के वेतन किमान/विहीत वेतनदरानुसार आदा करण्यात यावे.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन )**

---

**विषय नं.०३** **कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना... संस्थान आस्थापनेवरील कायम, कंत्राटी व कंत्राटी कर्मचारी यांना माहे जुलै-२०२० चे वेतन आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-(अ) विषयाची पूर्वपीठीका–**

**(अ-१)** आपणांस विदितच आहे की,**कोव्हीड-१९** (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी करावयाचे प्रतिबंधात्मक उपाययोजनेनुसार मा. भारत सरकार व मा. महाराष्ट्र शासन यांचेकडून संपूर्ण भारत देशात तसेच महाराष्ट्र राज्यात दिनांक २३ मार्च, २०२० पासून संपूर्ण LOCKDOWN घोषित करणेत आलेला होता. मा. केंद्र व राज्य शासनाने या LOCKDOWNचा कालावधी आजपावेतो ०४ वेळावाढविलेला आहे.

मा. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नःवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील **दिनांक ३१ मे, २०२०** रोजीचे आदेशान्वये, या LOCKDOWN ची मुदत (कालावधी) **दिनांक ३० जून, २०२० अखेर** आणि आता **दिनांक २९ जून, २०२०** रोजीचे आदेशान्वये, **दिनांक ३१ जुलै, २०२० अखेर** काही अटी-शर्तीवर तसेच काही अत्यावश्यक बाबींसाठी सवलत देऊन वाढविणेत आलेली असून, आज अखेर LOCKDOWN ची कठोर अंमलबजावणी स्थानिक महसूल व पोलिस प्रशासनामार्फत सुरु आहे.

**(अ-२)** सामान्य प्रशासन विभागाकडील वेळोवेळी पारित करणेत आलेल्या आदेशांनुसार, कोव्हीड १९ या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी मा. शासनाने निर्देशित केलेल्या उपाययोजनेनुसार, दिनांक २३ मार्च, २०२० पासून संस्थान आस्थापनेवरील अत्यावश्यक सेवेचे विभाग वगळतां, सर्व विभागातील कर्मचा-यांच्या कार्यालयातील/कार्यस्थळावरील उपस्थितीवर टप्प्या-टप्प्याने निर्बंध आणणेत येऊन, कर्मचा-यांना आळीपाळीने / चक्रीय पध्दतीने कामावर बोलविणेत येत असून, माहे मार्च, २०२० पासून आजपावेतो म्हणजेच माहे जुलै, २०२० मध्येही सलग व कायम ठेवणेत आलेली आहे.

**(अ-३)** तसेच, माहे मे, २०२० चे वेतन आदा करणेबाबत, मा. तदर्थ समितीचे दिनांक ०९ जून, २०२० रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावर मा. तदर्थ समितीने निर्णय क्रमांक ३०८ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला होता –

*“.. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आस्थापनेवरील कायम, कंत्राटी व कंत्राटी कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी यांना माहे मे, २०२० चे वेतन आदा करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आले –*

*१. मा. शासनाकडून प्रतिनियुक्तीने कार्यरत असणा-या अधिका-यांना माहे मे, २०२० पूर्ण मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करणेत यावे.*

*२. संस्थान आस्थापनेवरील कायम (स्थायी) कर्मचा-यांना माहे मे, २०२० चे पूर्ण मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करणेत यावे.*

*३. संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे ५९८ कंत्राटी कर्मचारी त्यांचेबाबत निर्णय प्रलंबित आहे, या कर्मचा-यांना तसेच कंत्राटदारामार्फत असणारे कंत्राटी कर्मचारी, बाह्यस्त्रोत कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी आणि उक्त्या दराने दिलेल्या ठेक्याचे कंत्राटदाराकडे कार्यरत असणारे कर्मचारी यांना माहे मे, २०२० मध्ये प्रत्यक्ष कामावर हजर असलेल्या दिवसाचे वेतन हे किमान / विहित वेतनदरानुसार १०० टक्के आणि कोव्हीड १९ लॉकडाऊन कालावधीतील उर्वरित दिवस कामावर हजर नसल्याने त्या दिवसांचे वेतन हे किमान / विहित वेतनदरानुसार ५० टक्के आदा करणेत यावे.*

*४. रुग्णालय विभागाकडील ५९८ कंत्राटी कर्मचारी त्यांचेबाबत निर्णय प्रलंबित आहे, या कर्मचा-यांना तसेच कंत्राटदारामार्फत असणारे कंत्राटी कर्मचारी, बाह्यस्त्रोत कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी आणि उक्त्या दराने दिलेल्या ठेक्याचे कंत्राटदाराकडे कार्यरत असणारे कर्मचारी यांना माहे मे, २०२० चे वेतन आदा करतांनाज्या कर्मचा-यांची उपस्थिती ५० टक्के व त्यापेक्षा जास्त असेल अशा कर्मचा-यांना किमान / विहित वेतन दरानुसार १०० टक्के वेतन आदा करणेत यावे तसेच ज्या कर्मचा-यांची उपस्थिती ५० टक्क्यापेक्षा कमी असेल अशा कर्मचा-यांना अ. नं. ३ प्रमाणे वेतन आदा करणेत यावे.*

५. *मा. राज्य शासनाने दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना लॉकडाऊन कालावधीत कार्यालयात हजर राहण्यापासून सूट / सवलत दिलेली असल्याने अशा दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना माहे मे, २०२० चे १०० टक्के वेतन किमान / विहित वेतनदरानुसार आदा करणेत यावेत."*

उपरोक्त मा. तदर्थ समितीचे निर्णयानुसार, संस्थान व्यवस्थापनाकडे / आस्थापनेवर विविध विभागाकडे, विविध पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनामाहे मे, २०२० चे वेतन / पगार / मानधन आदि आदा करणेकामी सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक २४ जून, २०२० आणि दिनांक २६ जून, २०२० रोजीचे आदेशान्वये संबंधित विभागांमार्फत कार्यवाही करणेत आलेली आहे / सुरु आहे. तसेच माहे जून, २०२० चे वेतन आदा करणेबाबत मा. तदर्थ समितीचे समोर अलाहिदा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

**(ब) माहे जुलै, २०२० चे (म्हणजेच माहे ऑगष्ट,२०२० मध्ये आदा करावयाचे) वेतनाबाबत करावयाचे कार्यवाहीचा प्रस्ताव –**

**(ब-१) प्रतिनियुक्तीवरील अधिकारी यांचे वेतन-** मा.राज्य शासनाने कोव्हीड-१९ या विषाणूचे प्रादुर्भावात वाढ झाल्याने, दिनांक ३१ मे, २०२० आणि दिनांक २९ जून, २०२० रोजीचे आदेशानुसार, LOCKDOWN चा कालावधी/मुदत अनुक्रमे **दिनांक ३० जून, २०२० आणि दिनांक ३१ जुलै, २०२०** अखेर वाढविल्याने, संस्थान आस्थापनेवर दैनंदिन कामकाजाचे नियोजन व नियंत्रण करणेसाठी मा. शासनाकडून प्रतिनियुक्तीने कार्यरत असणारे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी असे एकुण ०४ अधिकारी यांचे माहे जुलै, २०२० (माहे ऑगष्ट,२०२० मध्ये आदा करावयाचे) चे पूर्ण मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करता येईल, असे मत आहे.

**(ब-२) कायम (स्थायी) कर्मचारी यांचे वेतन-** श्री साईंचे समाधी दर्शनासाठी शिर्डी येथे येणारे भक्तांना मुलभूत सेवा-सुविधा जसे, दर्शन, प्रसाद भोजन, निवास, सुरक्षा, वैद्यकीय व्यवस्था विनासायास व विनाविलंब प्राप्त व्हाव्यात म्हणून तसेच इतर अनुंषगिक कामकाजासाठी एकूण ४० विभाग कार्यरत असून, माहे जून, २०२० अखेर संस्थान आस्थापनेवर एकूण १८८७ कायम (स्थायी) कर्मचारी कार्यरत आहेत.

संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे कायम (स्थायी) कर्मचा-यांना मा. तदर्थ समिती व प्रशासकीय स्तरावरील मान्यतेने LOCKDOWN च्या कालावधीतील माहे एप्रिल, २०२० आणि माहे मे, २०२०पूर्ण मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करणेत आलेले आहे. तसेच माहे जून, २०२० चे वेतन आदा करणेबाबत मा. तदर्थ समितीचे निर्णयानुसार अलाहिदा कार्यवाही करणेत येत आहे.

LOCKDOWNच्या कालावधीत मा. शासनाचे नियमांचे पालन करुन, संस्थान आस्थापनेवरील प्रामुख्याने रुग्णालये, आरोग्य (स्वच्छता), संरक्षण, प्रसादालय, बगीचा, बांधकाम, विद्युत आदि अत्यावश्यक सेवेतील विभागांसह इतर अन्य विभागांकडे कार्यरत असणारे सर्व कायम (स्थायी) कर्मचा-यांना आवश्यकतेनुसार व गरजेनुसार काही विभागात पूर्ण उपस्थितीसह इतर विभागात आवश्यकतेनुसार चक्रीय पध्दतीने / आळीपाळीने कामावर बोलविणेत आलेले होते / येत आहे. याबाबीचा विचार करुन, संस्थान आस्थापनेवरील कायम (स्थायी) कर्मचा-यांना माहे जुलै, २०२० (माहे ऑगष्ट, २०२० मध्ये आदा करावयाचे) चे पूर्ण मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करता येईल, असे मत आहे.

**(ब-३) कायम कंत्राटी कर्मचारी (५९८ कर्मचारी) यांचे वेतन -** मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ आणि त्या अनुषंगाने प्रशासकीय स्तरावरील मान्यतेनुसार, सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत असणारे कुशल / अकुशल ६३५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी ५९८ कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना, किमान वेतन कायद्यानुसार व किमान वेतन दरानुसार माहे जानेवारी, २०२० मध्ये कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून संस्थानांचे विविध विभागांकडे नियुक्त्या देणेत आलेल्या आहेत.

या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना LOCKDOWN चे कालावधीत मा. शासनाचे नियमांचे पालन करुन, आवश्यकतेनुसार व गरजेनुसार काही विभागात पूर्ण उपस्थितीसह इतर विभागात आवश्यकतेनुसार चक्रीय पध्दतीने / आळीपाळीने कामावर बोलविणेत आलेले होते. या बाबीचा विचार करुन, या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना माहे जुलै, २०२० (माहे ऑगष्ट, २०२० मध्ये आदा करावयाचे) चे पूर्ण मासिक वेतन **किमान वेतन दरानुसार** विहित पध्दतीने आदा करता येईल, असे मत आहे.

**(ब-४) कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनाबाबत –**

संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत सध्या खालीलप्रमाणे कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत -

१. कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी (साधारणतः सर्व विभागात कार्यरत)

२. कुशल/अकुशल सुरक्षा निरीक्षक/सुरक्षारक्षक/बंदूकधारी सुरक्षारक्षक/माजी सैनिक (संरक्षण विभाग)

३. निश्चित मानधन / वेतनावर आणि निश्चित कालावधीसाठी नियुक्त करणेत आलेले कर्मचारी (उदा. भूसंपादन सल्लागार, मोजणीदार, वैद्यकीय अधिकारी, पॅरा मेडिकल स्टाफ, शिक्षक इत्यादी – विशेषतः रुग्णालये / मालमत्ता / प्रकाशने / आयटीआय विभाग ई. )

४. बाह्यस्त्रोत स्त्री/पुरुष पारिचारिका व इतर (किमान वेतनावर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत - रुग्णालये विभाग)

वर नमुद केलेप्रमाणे संस्थान आस्थापनेवरील सर्वसाधारणपणे सर्वच विभागात कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत आहेत. या सर्व कर्मचा-यांना मा. तदर्थ समितीचे निर्णयानुसार, प्रशासकीय स्तरावर विहित कार्यपध्दती निश्चित करुन माहे मार्च, एप्रिलआणि मे, २०२० यामहिन्याचे मासिक वेतन आदा करणेत आलेले आहे. तसेच माहे जून, २०२० चे वेतन आदा करणेबाबत मा. तदर्थ समितीचे निर्णयानुसार अलाहिदा कार्यवाही करणेत येत आहे.

या कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांना मा. शासनाचे नियमांचे पालन करुन, आवश्यकतेनुसार व गरजेनुसार चक्रीय पध्दतीने / आळीपाळीने कामावर बोलविणेत आलेले होते. त्यामुळे या कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांना **किमान वेतन दरानुसार**/विहित वेतन दरानुसार माहे जुलै, २०२० चे पूर्ण मासिक वेतन आदा करता येईल, असे मत आहे.

**(ब-५)** या व्यतिरिक्त संस्थान आस्थापनेवरील खालील विभागांकडे उक्ते/ठोक पध्दतीने काम दिलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटदारामार्फत बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत –

०१. (अ) श्री साईनाथ रुग्णालय (हाऊसकिपींग)
(ब) श्री साईनाथ रुग्णालय (पारिचारिका )
(क) श्री साईनाथ रुग्णालय (इतर कर्मचारी)

०२. (अ) श्री साईबाबा हॉस्पीटल (हाऊसकिपींग)
(ब) श्री साईबाबा हॉस्पीटल (पारिचारिका)
(क) श्री साईबाबा हॉस्पीटल (इतर कर्मचारी)

०३. श्री साई प्रसादालय (चपाती/पुरी/नाष्टा पाकिटे/हाऊसकिपींग/वाढपी आदि)

०४. लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग (बुंदी प्रसाद/बुंदी लाडू प्रसाद)

०५. व्दारावती/श्री साई आश्रम/श्री साई धर्मशाळा निवासस्थान विभाग (हाऊसकिपींग)

उपरोक्त नियुक्त करणेत आलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटदारांना ज्या-त्या संबंधित विभागांमार्फत स्वतंत्ररित्या अटी-शर्तीसह कार्यादेश देणेत आलेले आहेत. त्यामुळे अशा बाह्यस्त्रोत कंत्राटदारांकडे कार्यरत असणा-या कंत्राटी कर्मचा-यांना वेतन मिळणेबाबत कशी व कोणती कार्यपध्दती अवलंबवावी याबाबत त्या-त्या विभागांनी स्वतंत्ररित्या प्रशासकीय स्तरावर प्रस्ताव सादर करुन त्याबाबतची मान्यता घ्यावी, असे मत आहे.

**(ड)** सध्या विषयांकित कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव वाढता असून, मा. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नःवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील **दिनांक ३१ मे, २०२०** रोजीचे आदेशान्वये, या LOCKDOWNची मुदत (कालावधी) **दिनांक ३० जून, २०२० अखेर** आणि आता **दिनांक २९ जून, २०२०** रोजीचे आदेशान्वये, **दिनांक ३१ जुलै, २०२० अखेर** काही अटी-शर्तीवर तसेच काही अत्यावश्यक बाबींसाठी सवलत देऊन वाढविणेत आलेली असून, आज अखेर या आदेशांची कठोर अंमलबजावणी स्थानिक महसूल व पोलिस प्रशासनामार्फत सुरु आहे.

त्यामुळे उपरोक्त **परिच्छेद (अ)** मधील पूर्वपीठीकेस अनुसरुन, **परिच्छेद ब मधील उपपरिच्छेद (ब-१ ते ब-५)** मध्ये नमूद केलेप्रमाणे, संस्थान व्यवस्थापनाकडे / आस्थापनेवर विविध विभागाकडे, विविध पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनामाहे जुलै,२०२० (माहे ऑगष्ट,२०२० मध्ये आदा करावयाचे) वेतन/पगार/ मानधन आदि आदा करणेस मान्यता मिळणेकामी उपरोक्त प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आस्थापनेवरील कायम, कंत्राटी व कंत्राटी कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी यांना माहे जुलै-२०२० चे वेतन आदा करणेबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

१. **महाराष्ट्र शासनाकडून प्रतिनियुक्तीने संस्थानमध्ये कार्यरत असणारे अधिकारी व संस्थान आस्थापनेवरील कायम (स्थायी) कर्मचारी यांचे वेतनाबाबत पुढील निर्णय मा.मुख्य कार्यकारी**

**अधिकारी यांनी घ्यावेत व त्याबाबत शासनाकडून वेळोवेळी जे निर्णय प्राप्त झाले व होतील त्या सर्व निर्णयांचे त्यांनी पालन करुन विहित पध्दतीने त्यांचे वेतन अदा करावे.**

२. **संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे ५९८ कंत्राटी कर्मचारी त्यांचेबाबत निर्णय प्रलंबीत आहे, या कर्मचाऱ्यांना तसेच कंत्राटदारामार्फत असणारे कंत्राटी कर्मचारी, बाहयस्त्रोत कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी आणि उक्त्या दराने दिलेल्या ठेक्याचे कंत्राटदाराकडे कार्यरत असणारे कर्मचारी,मानधनावरील कर्मचारी यांना माहे जुलै-२०२० मध्ये प्रत्यक्ष कामावर हजर असलेल्या दिवसाचे वेतन हे किमान/विहीत वेतनदरानुसार १०० टक्के आणि कोव्हीड १९ लॉकडाऊन कालावधीतील उर्वरीत दिवस कामावर हजर नसल्याने, त्या दिवसांचे वेतन हे किमान/विहीत वेतनदरानुसार ५० टक्के आदा करण्यात यावे.**

३. **रुग्णालय विभागाकडील ५९८ कंत्राटी कर्मचारी त्यांचेबाबत निर्णय प्रलंबीत आहे, या कर्मचाऱ्यांना तसेच कंत्राटदारामार्फत असणारे कंत्राटी कर्मचारी, बाहयस्त्रोत कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी आणि उक्त्या दराने दिलेल्या ठेक्याचे कंत्राटदाराकडे कार्यरत असणारे कर्मचारी यांना माहे जुलै-२०२०चे वेतन आदा करतांना ज्या कर्मचाऱ्यांची उपस्थिती ५० टक्के व त्यापेक्षा जास्त असेल अशा कर्मचाऱ्यांना किमान/विहीत वेतनदरानुसार १०० टक्के वेतन आदा करण्यात यावे, तसेच ज्या कर्मचाऱ्यांची उपस्थिती ५० टक्क्यापेक्षा कमी असेल अशा कर्मचाऱ्यांना अ.नं.२ प्रमाणे वेतन आदा करण्यात यावे.**

४. **मा. राज्य शासनाने दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना लॉकडाऊन कालावधीत कार्यालयात हजर राहण्यापासून सुट/सवलत दिलेली असल्याने अशा दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना माहे जुलै-२०२० चे १०० टक्के वेतन किमान/विहीत वेतनदरानुसार आदा करण्यात यावे.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन )**

---

**विषय नं.०४** **कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेतंर्गत चावडी मंदिर दर्शनासाठी बंद केले असतांना महिला साईभक्ताने चावडी मंदिरामध्ये दर्शनास जाऊन केकसह सेल्फी घेतलेबाबत दि.२५ जून,२०२० रोजीचे व्हिडीओ क्लीप सोशल मिडीयावर व्हायरल झालेबाबत.**

**प्रस्ताव-** **विषयाची पूर्वपिठीका-**

(अ-१) उपरोक्त विषयांस अनुसरुन सरंक्षण विभागाने सादर केलेला दिनांक २६ जून, २०२० रोजीचा अहवाल -
“.. .. कोरोना विषाणू (कोव्हीड १९ ) चा प्रादुर्भाव रोखणेकामी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन संस्थान व्यवस्थापन संचलित, श्री साईबाबा समाधी मंदिरासह सर्व मंदिरे (व्दारकामाई, गुरूस्थान, चावडी, प्रधान लेंडीबाग,नंदादीप,श्री दत्त मंदिर,श्री गणेश,श्री शनि व श्री महादेव मंदिर ,श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिर आदि ) दि.१७ मार्च,२०२० रोजी दुपारी ०३.०० वाजेपासून भक्तांसाठी पुढील आदेश होईपावेतो दर्शनाकरीता बंद करणेत आलेले आहे. मंदिर बंद कालावधीत श्री साई समाधी मंदिरातील व इतर मंदिरातील नित्यनेमाच्या पुजा-अर्चा व इतर दैनंदिन विधी सुरू ठेवण्यात आलेले आहेत.

दि.२५.०६.२०२० रोजी सुमारे ०३.०० वाजेच्या सुमारास शिवप्रिया कौशिक नावाची महिला हिने चावडी मंदिर येथे नेमणुकीस असलेला सुरक्षा रक्षक व मंदिर विभागाचा चोपदार हे बाजुला गेल्याचे पाहुन चावडी मंदिरामध्ये जावून दर्शन घेतले व त्यानंतर पुन्हा केक आणुन चावडी मंदिरामध्ये बाबांचे फोटोसमोर फोटो काढलेले आहेत. त्यांनतर पुन्हा व्दारकामाई मंदिरासमोर काही लोक जमा करुन तेथे केक कापुन वाढदिवस साजरा केलेला आहे. सदरचा द्वारकामाई मंदिरासमोर केक कापल्याचा व लॉकडाऊनचे काळात मी साईबाबांचे मंदिरे दर्शनाकरिता बंद असतांना चावडी मंदिरामध्ये जाऊन दर्शन घेतले बाबतचा स्वतःचा व्हीडीओ तयार करुन स्वतःचे Shivpriya kaushik या नावाचे फेसबुक अकाऊंटवर अपलोड केलेला आहे.

दिनांक २५.०६.२०२० रोजी शिवप्रिया कौशिक यांनी द्वारकामाई मंदिरासमोर केक कापलेबाबत माहिती प्राप्त झालेने सदरचे प्रकारामुळे साईभक्तामध्ये संताप निर्माण झालेला असुन शिवप्रिया कौशिक यांनी लॉकडाऊनचे काळात सार्वजनिक ठिकाणी वाढदिवस साजरा करणे, मंदिर दर्शनाकरीता बंद असल्याचे माहित असुन सुध्दा चावडी मंदिरामध्ये बळजबरीने घुसून लॉकडाऊनचे उल्लंघन केले आहे. तसेच चावडी मंदिरामध्ये जावून दर्शन घेतल्याचे व्हीडीओ फेसबुकवर अपलोड करून भारतीय दड संहिता १८६०(४५) यांच्या कलम १८८ चे उल्लंघन केलेले असलेने संरक्षण विभाग जा.नं.१६७/२०२० दि.२५/०६/२०२० अन्वये कोरोनो विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करणेकामी चावडीमंदिर दर्शनासाठी बंद

केलेले असतांना चावडी मंदिरामध्ये दर्शनास जाऊन, त्याबाबतची व्हिडीओ क्लीप सोशल मिडीयावर व्हायरल करणारे महिलेवर कारवाई करणेबाबत पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांना संरक्षण विभाग जा.नं.१६७/२०२० दि.२५/०६/२०२० अन्वये पत्र दिले आहे.

तदनंतर सदर दिवशी कर्तव्यावर असलेले कर्मचारी डयुटी तक्ता व सी.सी.टी.व्ही फुटेजची पाहणी करता अहवाल खालीलप्रमाणे सादर करत आहोत.

**कर्तव्यावरील कायम कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी –**

१. श्री. सुदाम निवृत्ती कालेकर,( कायम पहारेकरी/ सुपरवाझर ,शिफ्ट १२ ते ०८)

२. श्री.हौशिराम एकनाथ मेहेत्रे (कंत्राटी सुरक्षा कर्मचारी / तात्पुरते शिफ्ट सुरक्षा निरिक्षक)

३. श्री.सुदाम कारभारी भालेराव, (मॉर्डन सिक्युरिटी ,कंत्राटी सुरक्षा कर्मचारी)

४. श्री.भिमा दिनकर पाईक (कायम कर्मचारी,आरोग्य विभाग)

घटनेबाबतचे दिनांक २५/०६/२०२० रोजीचे दुपारी०३.०० वाजेच्या दरम्यानचे घटनेबाबत,

**१) श्री.सुदाम निवृत्ती कालेकर (कायम सुरक्षारक्षक/शिफ्ट सुपरवायझर, शिफ्ट दुपारी १२ ते रात्रौ ८ यांचे लेखी जबाब–दिनांक २५/०६/२०२० रोजी १२ ते २० डयुटीमध्ये मी शिफ्ट सुपरवायझर म्हणून काम पाहात होतो**, तरी ०३.०० वाजेच्या सुमारास महिला नामे शिवप्रिया कौशिक हिने चावडी मंदिर येथे नेमणूकीस असलेला सुरक्षारक्षक व मंदिर विभागाकडील कर्तव्यावरील चोपदार हे बाजुला गेल्याचे पाहून चावडी मंदिरात जाऊन दर्शन घेतले व दर्शन घेतांना सदर महिलेने मोबाईलमध्ये व्हिडीओ क्लिप तयार करुन ती सोशल मिडीया (फेसबुक) वर सदरचा व्हिडीओ व्हायरल केला, तरी सदरचे घटनेबाबत माहिती मिळताच संरक्षण ऑफीसला कळविले.

**२) श्री. हौशिराम एकनाथ मेहेत्रे (कंत्राटी सुरक्षा कर्मचारी/तात्पुरते शिफ्ट सुरक्षा निरिक्षक) यांचे लेखी जबाब**–मी हौशिराम एकनाथ मेहेत्रे (कंत्राटी सुरक्षा मॉडर्न सिक्युरिटी) या पदावर तात्पुरते सुरक्षा निरिक्षक म्हणुन नेमणुकीस होतो. सायंकाळी साधारणः०७.१५ वा सदर घटनेबाबत कळताच मी तात्काळ चावडी परिसरात डयुटीसाठी असलेले सुरक्षा रक्षक श्री.सुदाम कारभारी भालेराव यांना संरक्षण कार्यालयात बोलावुन सदर घटनेबाबत लेखी खुलासा घेतला.

**३) श्री.सुदाम कारभारी भालेराव, (मॉर्डन सिक्युरिटी ,कंत्राटी सुरक्षा कर्मचारी) यांचे लेखी जबाब**– मी सुदाम कारभारी भालेराव (कंत्राटी सुरक्षा मॉर्डन सिक्युरिटी) या पदावर कार्यरत आहे. दिनांक २५/०६/२०२० रोजी १२ ते ०८ या शिफ्टमध्ये चावडी परिसर या पॉईंटवर डयुटीस असतांना साधारण ०२.३० वाजता चावडी मंदिर येथे हजर असलेले चोपदार श्री.दादा कोते यांना सांगुन मी मारुती मंदिरामागे जेवणासाठी गेलो. त्यानंतर साधारण दुपारी मी जेवण करुन डयुटीस हजर झालो असता श्री.दादा कोते व डयुटीस हजर असलेले स्वच्छता कर्मचारी श्री.भिका पाईक यांनी सांगितले की दुपारी साधारण ०२.४० वाजता एक महिला भक्त चावडी परिसरात केक घेऊन आली व तिने केक कापून चावडीमध्ये दर्शन घेतले. मी सदर घटनेचे गांर्भीय घेतले नाही व सदर घटनेबाबत डयुटी सुपरवायझर, सुरक्षा अधिकारी, तसेच संरक्षण कार्यालय व इतर कुणालाही सदर घटनेची कल्पना न देता गप्प बसुन घेतले.

तरी सदर घडलेल्या घटनेची कल्पना मी कुणालाही दिलेली नाही, ही माझी चुक मान्य करुन दिलगीरी व्यक्त करतो व पुन्हा माझ्याकडुन अशी चुक होणार नाही अशी ग्वाही देतो.

**४) श्री.भिमा दिनकर पाईक (कायम कर्मचारी,आरोग्य विभाग)यांचे लेखी जबाब**– मी श्री.भिमा दिनकर पाईक, स्वच्छता कर्मचारी लेखी खुलासा देत आहे की, दिनांक २५/०६/२०२० रोजी १२ ते २० या वेळेमध्ये स्वच्छता कामासाठी माझी नेमणुक द्वारकामाई व चावडी परिसर या ठिकाणी करण्यात आलेली होती. दुपारी साधारण ०२.३० वाजेच्या दरम्यान द्वारकामाई/चावडी डयुटीसाठी नेमण्यात आलेले चोपदार श्री.दादा कोते हे मला सांगुन गेले की, मी बाथरुम साठी जाऊन येतो तोपर्यंत द्वारकामाई व चावडी परिसरात लक्ष ठेवणे. त्यानंतर साधारण दुपारी ०२.४० वाजता एक महिला साईभक्त हातात केक घेऊन आली व त्यांनी तो केक चावडी समोरील परिसरात कापला. केक कापल्यानंतर सदर महिला चावडी मंदिरामध्ये दर्शनासाठी जाण्याच्या प्रयत्नांत असतांना मी त्यांना आडवुन चावडीमध्ये जाण्यास मनाई केली. परंतु सदर महिला म्हणाली की संस्थानचे सर्व पुजारी मला चांगले ओळखतात व मला कुणीही आडवत नाही आणि मला झुगारुन सदर महिला चावडी महिला कक्षामध्ये दर्शनास गेली.”

**सदरचा अहवाल संरक्षण विभागाने दि.२६.०६.२०२० रोजी वरिष्ठांकडे सादर केलेला होता. त्यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी,“....Est.सदर घटनेसबंधी सर्व अधिकारी कर्मचारी यांना**

**त्वरीत Notice काढुन २४ तासाच्या आत खुलासा मागवा. संपुर्ण नस्ती एकत्रीत आस्थापना विभागास दयावी. नंतर सरंक्षण विभागास हस्तांतर करावे." असे निर्देश दिलेले आहेत.**

**(अ-२) उपरोक्त विषयांस अनुसरुन मंदिर विभागाने सादर केलेला दिनांक २८ जून, २०२० रोजीचा अहवाल-** प्र.अधिक्षक, मंदिर विभागाने विषयांकित घटनेबाबत दिनांक २८ जून, २०२० रोजीचे पत्र, सामान्य प्रशासन विभागाचे आवक कक्षाकडे दिनांक २९ जून, २०२० रोजी दिलेले असून, त्यात खालीलप्रमाणे नमूद आहे –

" .. .. उपरोक्त विषयांकित संदर्भीय अर्जान्वये काल गुरुवार दिनांक २५/०६/२०२० रोजी चावडी मंदिर कर्मचारी श्री. दादासाहेब भाऊसाहेब कोते, मदतनीस यांनी चावडी मंदिरातील झालेल्या घटनेबाबत लेखी खुलासा केला आहे की, " दिनांक २५/०६/२०२० मी डयुटी दुपारी ०१ ते रात्री ९ अशी होती. दुपारी साधारण ३.०० चे दरम्यान लघवी लागल्याने तेथील डयुटीवरील संरक्षण विभागाचे कर्मचारी जेवणासाठी बसले असल्याने त्यांना कल्पना देऊन आरोग्य विभागाचे कर्मचारी श्री. पाईक यांना सदरहू ठिकाणी थांबणेबाबत कल्पना दिली. तदनंतर मी साधारण ४ ते ५ मिनिटांत बाथरुमला जाऊन डयुटीचे ठिकाणी आलो. त्याच दरम्यान सदरहू घटना झाल्याचे त्यांनी कळविले आहे."

मंदिर विभागाचा अभिप्राय–कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सर्व मंदिरे दिनांक १७/०३/२०२० पासून साईभक्तांसाठी दर्शनार्थ बंद करण्यात आली आहेत. परिसरातील सर्व मंदिरे बंद ठेवण्यात आली असून फक्त दैनंदिन पूजेसाठी मंदिर पुजारी करीता उघडणेत येते. सदरहू चावडी मंदिर परिसराचे एका बाजूला असल्याने त्याठिकाणी साईभक्त तसेच गांवक-यांची वर्दळ सुरु असते. चावडी मंदिराचे आत कोणी येऊ नये म्हणून ग्रील लावून बॅरिकेट सही लावणेत आलेले आहेत.

परंतु दि. २५/०६/२०२० रोजी दुपारी ३.०५ वाजेच्या दरम्यान काही साईभक्त सदरहू चावडीचे ठिकाणी बॅरिकेटसच्या बाहेरुन दर्शन घेणेसाठी आला असता, तेथील डयुटीवरील स्वच्छता कर्मचारी श्री. पाईक यांनी त्या साईभक्तांना स्वतः बोलावून आत दर्शनासाठी प्रवेश दिला असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये आढळून आलेले आहे. सदरहू सीसीटीव्ही फुटेज डयुटीवरील मंदिर सुपरवायझर श्री. शिवाजी भागवत गोंदकर यांनी संरक्षण विभागाचे श्री. पाटणी व मंदिर प्रमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार समक्ष तपासणी केलेली आहे.

सदर घडलेल्या घटनेची माहिती दुपारी ५.०० वाजता संरक्षण विभागाचे पर्यवेक्षक श्री. पाटणी यांनी दूरध्वनीव्दारे दिली. त्यानंतर मंदिर विभागाचे पर्यवेक्षक श्री. शिवाजी गोंदकर यांनी तात्काळ सीसीटीव्हीची पाहणी केलेली आहे. तसेच त्यांनी सदरचे घटनेबाबत दिलेला लेखी अहवाल सोबत जोडलेला आहे.

सीसीसीव्ही फुटेजमधील स्त्री साईभक्त शिवप्रिया हया नेहमी संस्थान प्रशासनाने नियमांचे उल्लंघन करुन दर्शन घेत असल्याबाबत तसेच मंदिरातील व्हीडिओ काढून व्हायरल करत असल्याबाबत यापुर्वीच ब-याच वेळेस सरंक्षण विभागाकडे तक्रारीही झाल्याचे कळते.

प्र. अधिक्षक, मंदिर विभाग यांनी त्यांचे दिनांक २८ जून, २०२० रोजीचे अहवालासोबत श्री.शिवाजी भागवत गोंदकर, लिपीक टंकलेखक आणि श्री. दादासाहेब भाऊसाहेब कोते, मदतनीस यांचे खुलासे जोडलेले आहेत.

**(ब)** उपरोक्त **परिच्छेद अ-१** मधील संरक्षण विभागाचे अहवालावरील मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार सामान्य प्रशासन विभागामार्फत (कामगार-शिस्त) खाली नमूद केलेल्या कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीसा बजाविणेत आलेल्या आहेत, त्याचा तपशील -

०१. श्री.शिवाजी भागवत गोंदकर, लिपीक टंकलेखक, मंदिर विभाग
(नोटीस जा. क्र. ३६०/२०२०, दि.२९/६/२०२०)

०२. श्री. दादासाहेब भाऊसाहेब कोते, मदतनीस, मंदिर विभाग
(नोटीस जा. क्र. ३५९/२०२०, दि.२९/६/२०२०)

०३. श्री. सुदाम निवृत्ती कालेकर, सुरक्षा रक्षक, संरक्षण विभाग
(नोटीस जा. क्र. ३६३/२०२०, दि.२९/६/२०२०)

०४. श्री. भिमा दिनकर पाईक, स्वच्छता कर्मचारी, आरोग्य विभाग
(नोटीस जा. क्र. ३६४/२०२०, दि.२९/६/२०२०)

०५. श्री. हौशिराम एकनाथ मेहेत्रे, कंत्राटी सुरक्षा रक्षक, मॉडर्न विर रेज सिक्युरिटी, कॅम्प शिर्डी
(नोटीस जा. क्र. ३६१/२०२०, दि.२९/६/२०२०)

०६. श्री. सुदाम कारभारी भालेराव, कंत्राटी सुरक्षा रक्षक, मॉडर्न विर रेज सिक्युरिटी, कॅम्प शिर्डी

(नोटीस जा. क्र. ३६२/२०२०, दि.२९/६/२०२०)

उपरोक्त नोटीसा बजाविणेत आलेल्या कर्मचा-यांनी आप-आपले लेखी म्हणणे सादर केलेले असून, त्याचा थोडक्यात गोषवारा खालील परिच्छेदात नमुद केला आहे.

तसेच दिनांक २५ जून, २०२० रोजी घडलेल्या विषयांकित घटनेचे सीसीटीव्ही फुटेज जतन करुन ठेवणेबाबत तसेच त्याच्या प्रती सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणेबाबत, प्र. सीसीटीव्ही विभागप्रमुख यांना दिनांक २६ जून, २०२० रोजी कळविणेत आलेले आहे.

**(क-१) श्री. शिवाजी भा. गोंदकर, लिपीक टंकलेखक, मंदिर विभाग यांचा दि.२९/०६/२०२० रोजीचा खुलासा -**

१. दि.२५.०६.२०२० रोजी शिवप्रिया कौशिक या महिलेने चावडी मंदिरासमोर दुपारी २.३० ते ३.३० वाजेच्या दरम्यान चावडीमध्ये दर्शन घेवुन केक कापल्याचा व्हिडीओ त्यांच्या फेसबुक अकौंटवर व्हायरल झालेला आहे. याबाबत सदरचे दिवशी माझे डयटी दुपारी ३.१५ ते ११.१५ याप्रमाणे मंदिर विभागात होती. सदर केक कापल्याची घटना ही माझी डयुटी सुरु होणेचे १५ मिनिटे अगोदर घडलेली आहे. त्यामुळे या घटनेशी माझा कुठल्याही प्रकारचा सबंध येत नाही.

२. सदरचे दिवशी मी डयुटीवर हजर झालेनंतर दुपारी ५.०० वा .प्र.सरंक्षण अधिकारी, सरंक्षण विभाग व प्र.अधिक्षक, मंदिर विभाग यांचे दुरध्वनीवरुन मला निरोप मिळाला कि, दुपारी ३.०० वाजेच्या दरम्यान एका महिलेने चावडीमध्ये दर्शन घेवुन केक कापलेला आहे असे समजते.तरी तुम्ही तत्काळ गुरुस्थान मंदिरासमोर सीसीटीव्ही कंट्रोल रुम येथे जावुन सदरच्या घटनेचे फुटेज तपासुन मला त्याबाबत कळवावे असे सांगीतले.

३. वरिष्ठांचे सुचनानुसार मी तत्काळ ५.१० वा.सीसीटीव्ही कंट्रोल रुम येथे जावुन सदर घटनेचे फुटेज बघीतले असता त्यात असे आढळुन आले की, मंदिर विभागाचे श्री.दादासाहेब कोते, मदतनीस हे त्यांना नेमुन दिलेल्या कामाचे ठिकाणी हजर असलेबाबत आढळुन आले नाही व दुपारी ३.०३ ते ३.०७ चे दरम्यान एक महिला व तीन साईभक्त दर्शन घेतांना आढळुन आले. सदरचे महिलेने दर्शन घेतले व सदर केकसोबत मोबाईलमध्ये सेल्फी घेतला हे सदरचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसुन आले.

४. तसेच श्री.दादासाहेब कोते यांचे जागी एक स्वच्छता कर्मचारी उभा दिसुन आला. सदरचे बघीतलेले फुटेजबाबत श्री.रमेश चौधरी, प्र.अधिक्षक, मंदिर विभाग व श्री.संजय पाटणी, प्र.सरंक्षण अधिकारी, सरंक्षण विभाग यांना सदरचे घटनेची माहिती संस्थानचे दुरध्वनीवरुन तात्काळ दिली. तसेच श्री.चौधरी साहेब प्र.अधिक्षक, मंदिर विभाग यांचे सुचनेनुसार मदतनीस श्री.दादा कोते यांचा सदर घटनेबाबतचा लेखी खुलासा घेतलेला आहे.

५. तसेच मी कार्यालयात हजर झालेनंतर पुजारी यांचेमार्फत श्री साईचे समाधी स्थानावरील साईस्तवन मंजिरी व साई सतचरित्राचे नियमित पठण चालु आहे. याबाबबत खात्री करुन व कार्यालयातील कामाचे नियोजन करुन सर्व कर्मचारी डयुटी तक्त्याप्रमाणे कामावर हजर आहे की, नाही याची खात्री करुन सर्व कामाचे व्यवस्थित नियोजन करुन मी सायंकाळी ५.०० वाजेच्या दरम्यान मंदिर परिसरामध्ये राऊंड घेत असतो.

६. सदरची घटना माझी डयुटी सुरु होणे अगोदर घडलेली असल्याने सदर घटनेशी माझा काहीही सबंध नाही. तरी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांना विनंती करतो की, माझ्या खुलाशाचे व मंदिर विभागातील डयुटी तक्तयाचे अवलोकन होवुन मला देण्यात आलेली नोटीसीचे प्रकरण बंद करुन, सदरची नोटीस दप्तरी दाखल करावी हि विनंती.

श्री. गोंदकर यांनी लेखा खुलासासोबत दिनांक २५/०६/२०२० रोजीचा डयुटी चार्ट जोडला असून, त्यात त्यांची डयुटी दुपारी ३.१५ ते रात्रौ ११.१५ अशी दर्शविणेत आलेली आहे.

सदरचा लेखी खुलासा श्री.गोंदकर यांनी प्र.अधिक्षक, मंदिर विभाग यांचेमार्फत सादर केलेला असुन, त्यावर प्र. अधिक्षक,मंदिर विभाग यांनी "पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर" असा अभिप्राय नोंदविलेला आहे.

श्री.शिवाजी भागवत गोंदकर,यांची संस्थान सेवेत दि.२८.०६.१९९३ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांना गैरशिस्तवर्तनाबाबत आजपावेतो झालेल्या शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | आज अखेरपर्यंत दिलेल्या शिक्षा | किती वेळा |
|---|---|---|
| ०१ | एक दिवसाचे मुळ वेतनाइतका दंड | ०२ |
| | एकुण झालेल्या शिक्षेची संख्या | ०२ |

श्री.शिवाजी भागवत गोंदकर, यांना गैरशिस्त वर्तनाबाबत एकुण ०२ वेळा शिक्षा झालेली आहे.

**(क-२) श्री. दादासाहेब भाऊसाहेब कोते, मंदिर विभाग यांचा दि. २९/०६/२०२० रोजीचा खुलासा –**

उपरोक्त संदर्भीय नोटीसबाबत खुलासा करतो की, माझी गुरुवार, दि.२५.०६.२०२० रोजी दुपारी १.०० वा.ते रात्री ९.०० वा.पर्यंत चावडी मंदिर येथे डयुटी होती. दुपारी साधारणत: ३.०० वाजता मी बाथरुमसाठी बाहेर गेलो होतो.बाथरुमला जातेवेळी तेथील डयुटीवरील सुरक्षा रक्षक हे जेवण करीत असल्यामुळे त्यांना कल्पना देवुन, तेथील स्वच्छता कर्मचारी श्री.पाईक यांना चावडी मंदिराकडे लक्ष ठेवण्यास सांगीतले होते. मी बाथरुमला जाऊन ३.१० मिनिटांनी परत माझे डयुटीचे ठिकाणी आलो.दरम्यानच्या काळात सदरहू घटना घडलेली आहे.
तरी येथुनपुढे अशा प्रकारची चुक होणार नाही, याबाबत मी दक्षता घेईल.तरी मे साहेबांनी माझे लेखी खुलाशाचा सहानूभुतीपुर्वक विचार करुन मला माफ करावे, ही नम्र विनंती.

सदरचा लेखी खुलासा श्री. दादासाहेब कोते यांनी यांनी प्र.अधिक्षक, मंदिर विभाग यांचेमार्फत सादर केलेला असुन, त्यावर प्र. अधिक्षक,मंदिर विभाग यांनी "पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर" असा अभिप्राय नोंदविलेला आहे.

श्री.दादासाहेब भाऊसाहेब कोते,मदतनीस यांची संस्थान सेवेत दि.०४.१२.२००६ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांना गैरशिस्तवर्तनाबाबत यापुर्वी शिक्षा झालेली नाही.

**(क-३) श्री. सुदाम निवृत्ती कालेकर, सुरक्षा रक्षक, संरक्षण विभाग (सेक्शन सुपरवायझर) यांचा दि. २९/०६/२०२० रोजीचा खुलासा –**

दि.२५.०६.२०२० रोजी माझी डयुटी १२/२० अशी मंदिर सेक्शन सुपरवायझर अशी होती.सदर डयुटी रजिस्टरप्रमाणे सर्व सुरक्षा कर्मचारी आप-आपल्या डयुटीवर हजर झाले.त्यानंतर मी मंदिर परिसरामध्ये वेळोवेळी राऊंड घेतला. मी चावडी परिसरामध्ये राऊंडला गेलो त्या वेळी तेथील पॉइंन्टवर एक सुरक्षा कर्मचारी व एक पुजारी हजर होते. त्यानंतर दुपारी २.४० वा सुप्रिया नावाची लेडीज चावडी मंदिरात दर्शनासाठी आतमध्ये गेली ही घटना घडल्यानंतर घटनेची माहिती तेथील सुरक्षा रक्षक व पुजारी यांनी मला किंवा सरंक्षण कार्यालयात दिली नाही.तथापी मी दुपारी मंदिर परिसरात राऊंड घेतला. चावडी परिसरात गेल्यानंतर तरी सुध्दा तेथील कर्मचारी यांनी मला घटनेची माहिती दिली नाही.

सायंकाळी ७ वा.मी राऊंड घेत सरंक्षण ऑफीसला गेलो असता तेथील डयुटीवरील कर्मचारी श्री.भाऊसाहेब घेगडमल यांनी चावडी मंदिरातील घटनेची माहिती दिली. मी लगेच चावडी मंदिरात जाऊन तेथील कर्मचारी यांना विचारपूस करुन मी लगेच माझ्या वरील अधिकारी यांना घटनेची माहिती कळविली.
सदरचा लेखी खुलासा श्री. सुदाम निवृत्ती कालेकर यांनी यांनी प्र. संरक्षण विभागप्रमुख, संरक्षण विभाग यांचेमार्फत सादर केलेला आहे.

श्री.सुदाम निवृत्ती कालेकर,मदतनीस / सुरक्षारक्षक यांची संस्थान सेवेत दि.२८/०६/१९९३ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांना गैरशिस्तवर्तनाबाबत झालेल्या शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | आज अखेरपर्यंत दिलेल्या शिक्षा | किती वेळा |
|---|---|---|
| ०१ | ताकीद | ०१ |
| ०२ | सक्त ताकीद | ०१ |
| ०३ | लेखी समज | ०१ |
| | एकुण झालेल्या शिक्षेची संख्या | ०३ |

श्री.सुदाम निवृत्ती कालेकर, यांना गैरशिस्त वर्तनाबाबत एकुण ०३ वेळा शिक्षा झालेली आहे.

**(क-४) श्री.भिमा दिनकर पाईक, स्वच्छता कर्मचारी, आरोग्य विभाग यांचा दि. २९/०६/२०२० रोजीचा खुलासा –**

संदर्भिय कारणे दाखवा नोटीस मला दि.२९/०६/२०२० रोजी दुपारी १२.३० वा.प्राप्त झाली आहे. सदर नोटीसचे २४ तासाचे आत माझ्या लेखी खुलाशाची मागणी केलेली आहे. सबब, माझा खुलासा खालीलप्रमाणे सविनय सादर.

सदरचे नोटीस मधील कथन असे की, तुमची डयुटी दि.२५/०६/२०२० रोजी व्दारकामाई व चावडी परिसर येथे साफ सफाई करणेकरीता दुपारी १२.०० वा. ते रात्रौ २०.०० वा.अशी डयुटी नेमण्यात आली होती. तुमची डयुटी साफ सफाई करणेकरीता नेमलेली होती. परंतु तुम्ही श्री.दादा कोते यांना बाथरुमकरीता सोडलेले आहे. तुम्ही तुमची डयुटी सोडून इतरांना बाथरुम करीता सोडणे हे चुकीचे काम आपण केले आहे. तुम्ही मंदिर विभागाचे कर्मचा-यांना बाथरुमकरीता सोडल्याने.. ..

... दि.२५/०६/२०२० रोजी तुम्ही डयुटीवर असताना दुपारी २.३० वा. ते ३.३० वा.दरम्यान शिवप्रिया कौशिक या नावाचे महिलेने श्रींचे सर्व मंदिर दर्शनासाठी बंद असताना चावडी व व्दारकामाई मंदिरात दर्शन घेऊन चावडी मंदिराचे समोर केक कापल्याची क्लीप त्यांचे स्वत:चे फेसबुक अकौंटवर अपलोड केलेली आहे. या घटनेबाबत साईभक्तांनी नाराजी व्यक्त केली. त्यामुळे संस्थानचे नावलौकीकास बाध निर्माण झाली. संस्थान प्रशासन व व्यवस्थापन यांचेबाबत गैरसमजाचे वातावरण निर्माण झाले.

महोदय, मी दि.२५/०६/२०२० रोजी दुपारी दुपारी १२.०० वा. ते रात्रौ २०.०० वा. डयुटीत नेमलेल्या व्दारकामाई व चावडी परिसरात साफसफाई करणेकरीता कामावर हजर होतो. माझी डयुटी मी प्रामाणिकपणे केलेली आहे. मी श्री.दादा कोते यांना बाथरुमकरीता सोडलेले नाही. त्यामुळे दि.२५/०६/२०२० रोजी दुपारी दुपारी २.३० वा. ते ३.३० वा. शिवप्रिया कौशिक यांचेबाबत काय घटना घडली हे मला काहीच माहिती नाही. त्या घटनेस मी जबाबदार नाही. व्दारकामाई व चावडी परिसरात सुरक्षा गार्ड देखील होते. सुरक्षेची जबाबदारी त्यांची असते. माझी डयुटी परिसर साफ सफाईसाठी होती. ते काम मी प्रामाणिकपणे केलेले आहे. दुसरे असे की, मी निरक्षर आहे मला लिहिता वाचता येत नाही. सही येत नाही, मी सही ऐवजी अंगठा देत असतो. दि.२६/०६/२०२० रोजी मला संरक्षण विभागात बोलावून एका कागदावर माझा अंगठा घेतला. त्यात काय लिहिले होते ते मला वाचून दाखवले नाही. सदर घटनेशी माझा संबंध नाही. त्यामुळे मी जबाबदार नाही. मला शासन करण्यात येऊ नये, ही नम्र विनंती.

सदरचा लेखी खुलासा श्री.पाईक यांनी प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग यांचेमार्फत सादर केलेला असुन,प्र. अधिक्षक, आरोग्य विभाग यांनी पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर असाअभिप्राय नोंदविलेला आहे.

श्री.भिमा दिनकर पाईक,यांची संस्थान सेवेत दि.०६.०३.१९८९ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांना गैरशिस्तवर्तनाबाबत झालेल्या शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | आज अखेरपर्यंत दिलेल्या शिक्षा | किती वेळा |
|---|---|---|
| ०१ | तात्पुरते सेवा निलंबीत | ०१ |
| ०२ | चार दिवस संस्थान सेवेतुन निलंबीत | ०१ |
| ०३ | सक्तताकीद | ०५ |
| ०४ | लेखी समज | ०१ |
| ०५ | ठपका | ०२ |
| | एकुण झालेल्या शिक्षेची संख्या | १० |

श्री.भिमा दिनकर पाईक, यांना गैरशिस्त वर्तनाबाबत एकुण १० वेळा शिक्षा झालेली आहे.

**(क-५) श्री. हौशिराम एकनाथ मेहेत्रे, कंत्राटी सुरक्षा रक्षक, मॉडर्न विर रेज सिक्युरिटी, कॅम्प शिर्डी यांचा दि. २९/०६/२०२० रोजीचा खुलासा –**

मी श्री.हौशिराम एकनाथ मेहेत्रे, वर नमुद केलेल्या सुरक्षा एजन्सीमार्फत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमध्ये कंत्राटी सुरक्षा रक्षक या पदावर कार्यरत आहे. दि.२५ जुन २०२० रोजी १२.०० ते २०.०० या वेळेत माझी डयुटी "अतिथी इमारत " या पॉईन्टवर करण्यात आलेली होती. तसेच सदर शिफ्टमध्ये सुरक्षा निरिक्षक नसल्यामुळे मी तात्पुरत्यास्वरुपात सुरक्षा निरिक्षकाचे काम करत होतो.

दि.२५ जुन २०२० रोजी सायंकाळी साधारण ७.१५ वा. मला श्री साईबाबा संस्थान संरक्षण विभाग कार्यालयातुन वायरलेसवर मॅसेज देवून सरंक्षण कार्यालयात बोलाविण्यात आले होते, आणि दुपारी २.३० ते २.४० या दरम्यान एक महिला साईभक्ताने चावडी समोर परिसरामध्ये केक कापुन चावडीमध्ये जावुन दर्शन घेतले या संदर्भात माहिती दिली

त्यानंतर मी तात्काळ चावडी मंदिर परिसरात डयुटीवर असलेले सुरक्षा रक्षक श्री.सुदाम कारभारी भालेराव यांना संरक्षण कार्यालयात पाचारण करुन घडलेल्या प्रकरणाबाबतची माहिती घेवुन सदर सुरक्षा रक्षकाची लेखी अहवाल सरंक्षण कार्यालयात सायं.७.३० वा सादर केला." असे म्हटलेले आहे.

उपरोक्त श्री. मेहेत्रे यांचा खुलासा मॅनेजर, मे.मॉडर्नवीर रेज सिक्युरिटी, कॅम्प शिर्डी यांनीदि.३०.०६.२०२० रोजीचे पत्राव्दारे सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केलेला आहे.

**(क-६) श्री. सुदाम कारभारी भालेराव, कंत्राटी सुरक्षा रक्षक, मॉडर्न विर रेज सिक्युरिटी, कॅम्प शिर्डी यांचा दि. २९/०६/२०२० रोजीचा खुलासा** –

मी श्री सुदाम कारभारी भालेराव, उपरोक्त सिक्युरीटी एजन्सीमार्फत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमध्ये कंत्राटी सुरक्षा रक्षक या पदावर कार्यरत आहे. दि.२५/०६/२०२० रोजी १२.०० ते २०.०० या शिफ्टमध्ये माझी डयुटी मारुती /चावडी मंदिर परिसर या पाईटवर नेमण्यात आलेली होती. दुपारी साधारण २.३० वा.द्वारकामाई मध्ये डयुटीवर असलेले चोपदार श्री.दादा कोते यांना सांगून मी जेवणासाठी मारुती मंदिरा मागे गेलो होतो.

त्यानंतर साधारण दुपारी ३.०० वा. मी जेवण करुन पॉइंटवर डयुटीसाठी हजर झालो असता चोपदार श्री. दादा कोते व स्वच्छता कर्मचारी श्री.भिमा पाईक यांनी मला सांगितले की, दुपारी साधारण २.४० वा. एक महिला भक्त चावडी परिसरामध्ये केक घेवून आली व तिने चावडी मंदिरासमोर केक कापून चावडी मंदिरात जावून दर्शन घेतले.

.. .. तरी मी सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेतले नाही व डयुटी सुपरवायझर मंदिर सुपरवायझर तसेच संरक्षण कार्यालय व इतर कोणत्याही वरिष्ठ अधिका-यांना सदर घटनेची माहिती न देता गप्प बसून घेतले.

तरी सदर घडलेल्या घटनेची माहिती वरिष्ठ अधिका-यांना न देणे ही माझी चुक मला मान्य असून, त्याबददल मी दिलगिरी व्यक्त करीत आहे. व या नंतर माझ्याकडून अशी चुक पुन्हा होणार नाही याची मी ग्वाही देतो.

उपरोक्त श्री. सुदाम भालेराव यांचा खुलासा मॅनेजर, मे.मॉडर्नवीर रेज सिक्युरिटी, कॅम्प शिर्डी यांनीदि.३०.०६.२०२० रोजीचे पत्राव्दारे सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केलेला आहे.

**(ड)** दिनांक ०१ जानेवारी, २०१५ पासून लागू करणेत आलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये गैरशिस्त वर्तन करणारे कर्मचा-यांवर करावयाचे कारवाई बाबत खालीलप्रमाणे तरतूदी आहेत -

**किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत-**

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

**मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

**(इ) करावयाचे कार्यवाहीचा प्रस्ताव -**

दिनांक २५ जून, २०२० रोजी दुपारी २.३० वा. ते ३.३० वा. दरम्यान शिवप्रिया कौशिक या नावाचे महिलेने श्रींचे सर्व मंदिरे दर्शनासाठी बंद असतांना, चावडी व द्वारकामाई मंदिरात दर्शन घेवुन चावडी मंदिराचे

समोर केक कापल्याची क्लिप त्यांचे स्वतःचे फेसबुस अकौंटवर अपलोड केलेली आहे. या घटनेबाबत साईभक्तांनी नाराजी व्यक्त केलेली आहे.

उपरोक्त परिच्छेद क-१ ते परिच्छेद क-२ मध्ये नमूद केलेल्या एकूण ०६ कर्मचा-यांनी दिलेल्या लेखी खुलाशांचा विचार करतां,

**०१.** श्री. शिवाजी भागवत गोंदकर, लिपीक टंकलेखक, मंदिर विभाग ( सध्या पर्यवेक्षकीय कामकाज पहाणारे ) यांनी त्यांचे खुलाश्यात सदर घटना ते कामावर येणेच्या आधी घडलेली असल्याने आणि त्याघटनेशी त्यांचा थेट संबंध येत नसल्याने, श्री. गोंदकर यांना समज देऊन त्यांचे नोटीशीचे प्रकरण बंद करता येईल.

**०२.** श्री. दादासाहेब भाऊसाहेब कोते, मदतनीस (वर्ग ४ कर्मचारी), मंदिर विभाग यांना दिनांक २५ जून, २०२० रोजी प्रत्यक्ष चावडी मंदिर या कार्यस्थळावर काम नेमूण देणेत आलेले होते, त्यांची त्यांचे कामात निष्काळजी व हलगर्जीपणा केला असे सकृतदर्शनी दिसून येत आहे, त्यामुळे श्री. दादासाहेब भाऊसाहेब कोते, मदतनीस, मंदिर विभाग यांना तात्पुरते सेवेतून निलंबित करुन, त्यांचेविरुध्द खातेचौकशी सुरु करता येईल आणि खातेचौकशीच्या निष्कर्षानुसार त्यांचेवर अलाहिदा कारवाई करता येईल.

**०३.** श्री. सुदाम निवृत्ती कालेकर, सुरक्षा रक्षक, संरक्षण विभाग यांना दिनांक २५ जून, २०२० रोजी सेक्शन सुपरवायझर म्हणून काम नेमून देणेत आलेले होते. त्यांनी चावडी व व्दारकामाई मंदिरात स्थळपहाणी करता राऊंड घेतला तेव्हा त्यांना या घटनेची संबंधित कर्मचा-यांनी माहिती दिली नाही आणि त्यांचा सदर घटनेशी थेट संबंध येत नसल्याने, श्री. कालेकर यांना यांना समज देऊन त्यांचे नोटीशीचे प्रकरण बंद करता येईल.

**०४.** श्री. भिमा दिनकर पाईक, स्वच्छता कर्मचारी (वर्ग ४ कर्मचारी), आरोग्य विभाग यांची दिनांक २५ जून, २०२० चावडी व व्दारकामाई मंदिर परिसरात साफ-सफाई करणेसाठी प्रत्यक्ष कार्यस्थळावर नेमणूक करणेत आलेली होती. त्यांनीत्यांचेवर सोपविलेले साफ-सफाईचे काम सोडून, इतर कर्मचा-यांचे कामकाजात लक्ष घातलेले आहे. विषयांकित घटनेबाबत उपलब्ध झालेल्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये त्यांचा या घटनेशी सकृतदर्शनी थेट संबंध दिसून येत असल्याने, श्री. भिमा दिनकर पाईक, स्वच्छता कर्मचारी (वर्ग ४ कर्मचारी) यांना तात्पुरते सेवेतून निलंबित करुन, त्यांचेविरुध्द खातेचौकशी सुरु करता येईल आणि खातेचौकशीच्या निष्कर्षानुसार त्यांचेवर अलाहिदा कारवाई करता येईल.

**०५.** श्री. हौशिराम एकनाथ मेहेत्रे, कंत्राटी सुरक्षा रक्षक, मॉडर्न विर रेज सिक्युरिटी, कॅम्प शिर्डी यांना कंत्राटी सुरक्षा कर्मचारी कंत्राटदारामार्फत तात्पुरते स्वरुपात दिनांक २५ जून, २०२० रोजी सुरक्षा निरीक्षक म्हणून काम देणेत आलेले होते. विषयांकित घटनेची माहिती तेथे सुरक्षारक्षक म्हणून नियुक्त असलेल्या श्री. सुदाम कारभारीभालेराव यांनी वेळीच दिली नाही. त्यामुळे सदर घटनेचा त्यांचा थेट संबंध येत नसल्याने श्री. मेहेत्रे यांना कंत्राटी सुरक्षार कर्मचारी कंत्राटदारामार्फत समज देऊन त्यांचे नोटीशीचे प्रकरण बंद करता येईल.

**०६.** श्री. सुदाम कारभारी भालेराव, कंत्राटी सुरक्षा रक्षक, मॉडर्न विर रेज सिक्युरिटी, कॅम्प शिर्डी यांना दिनांक २५ जून,२०२० रोजी कंत्राटी सुरक्षा कर्मचारी कंत्राटदारामार्फत चावडी व परिसरात सुरक्षारक्षक म्हणून प्रत्यक्ष कार्यस्थळावर काम नेमून देणेत आलेले होते. परंतु विषयांकित घटनेचे गांभिर्य लक्षात न घेता, सदर घटनेची माहिती संरक्षण विभागास किंवा कंत्राटी सुरक्षा कर्मचारी कंत्राटदार कार्यालयातील वरिष्ठांना न कळविता कामात निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केलेला आहे, हे सकृतदर्शनी दिसून येत आहे. श्री. भालेराव हे कंत्राटी सुरक्षा कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असल्याने, त्यांचेवर संस्थान व्यवस्थापनामार्फत थेट कारवाई करता येणे शक्य नसल्याने, त्यांचे संबंधित कंत्राटी सुरक्षा कर्मचारी कंत्राटदारामार्फत कारवाई करुन, त्यांना कंत्राटी सेवेतून कायमचे कमी करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५८** **या विषयावर चर्चा झाली, याविषयाबाबत टिपणीचे अवलोकन करता तदर्थ समितीच्या असे लक्षात आले की, ज्या कर्मचाऱ्यांच्या, अधिकाऱ्यांच्या गलथानपणामुळे सदरचा प्रकार घडला त्यांचे विरुध्द कुठलीही कार्यवाही प्रस्तावीत केलेली नाही. तसेच अशा किंवा यापेक्षा गंभीर घटना घडू नये यासाठी भविष्यात कुठली खबरदारी घ्यावी, याबाबत उपाययोजना सुचविलेली नाही. करीता दि.२४ जुलै,२०२० च्या तदर्थ समितीच्या बैठकीमध्ये सविस्तरपणे हा विषय ठेऊन संबधीत विभागाने या घटनेशी संबधीत सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दिलेल्या नोटीसा, त्या नोटीसांना त्यांनी दिलेला खुलासा समितीच्या अवलोकनार्थ ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन)**

---

**विषय नं.०५** **रिट पिटीशन क्र.४०१८/२०१९ चे निकालाबाबत मा.तदर्थ समितीपुढे प्रस्ताव सादर करणेस झालेल्या विलंबाबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्र.४०१८/२०१९, श्री विजय गणपतराव रोहमारे, उप कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांनी प्रशासकीय अधिकारी पदी पदोन्नती मिळणेकामी याचिका दाखल केलेली होती. सदर याचिकेची मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे सुनावणी होऊन, याबाबत दि.११ मार्च, २०२० व दि.१८ मार्च, २०२० रोजी निकाल देण्यात आलेला होता.

मा.उच्च न्यायालयाच्या निकालावर निर्णय घेणेकामी दि.०२ एप्रिल, २०२० रोजी कार्यालयीन टिपणी सादर करणेत आलेली होती. त्यानुसार ॲड.नितीन भवर यांना सदर निकालपत्राचे विश्लेषणात्मक (सविस्तर) लेखी अभिप्राय मिळणेकामी जा.क्र.एसएसएस/साप्रशा/४०/२०२०, दि.१३ एप्रिल,२०२० रोजी पत्र देण्यात आलेले होते. तथापी, कोव्हीड-१९ चे लॉकडाऊनचे कालावधीत उदभवलेल्या परिस्थितीमुळे सदरचा अभिप्राय अद्याप प्राप्त झालेला नाही.

मा.उच्च न्यायालयाचे निकालात श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता यांचा प्रशासकीय अधिकारी पदी नेमणुक होणेकामीचा दि.०५.११.२०१५ रोजीच्या अर्जावर तात्काळ तीन महिन्याच्या आत गुणवत्तेनुसार व नियमानुसार निर्णय घ्यावा, असे नमुद आहे. दरम्यानच्या कालावधीत मा.उच्च न्यायालयाच्या निकालावर निर्णय घेणेकामी सामान्य प्रशासन विभागाने दि.१२ मे, २०२० रोजी टिपणी ठेवण्यात आलेली होती. सदर टिपणीवरील निर्देशान्वये, पुनश्चः सामान्य प्रशासन विभागामार्फत दि.२३ मे, २०२० रोजी टिपणी व प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. सदरच्या प्रस्तावावर मा.तदर्थ समितीचे दि.०९ जून, २०२०, निर्णय क्र.३१३ पुढीलप्रमाणे पारित केलेला आहे. " श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, येथील कोर्टात प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी रिट पिटीशन नं.४०१८/२०१९ दाखल केलेले होते. त्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाचे दि.११ मार्च, २०२० व दि.१८ मार्च, २०२० रोजी निकालपत्र / आदेश प्राप्त झालेले असुन सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर विलंबाने का सादर केला? याबाबत संबधीत श्री गमे यांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात यावा व तोपर्यंत त्यांचे सेवा निवृत्तीची देयके थांबवून ठेवावे, असे ठरले. तसेच प्रस्तुत प्रकरणी निर्णय घेणेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करून तीन महिन्याची मुदत वाढवुन मागणेबाबत कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले."

(ब) उपरोक्त मा.तदर्थ समितीचे दि.०९ जून, २०२० रोजीच्या निर्णयास अनुसरून,सामान्य प्रशासन विभागामार्फत खालील कार्यवाही करणेत आलेली आहे -

1) मा.उच्च न्यायालयाच्या निकालास मुदतवाढ घेणेकामी सादर करावयाचे सिव्हील ॲप्लीकेशनचा मसुदा तयार करणेकामी ॲड. श्री नितीन भवर यांना जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/आस्था/४४६/२०२०, दि.२५ जून, २०२० अन्वये पत्र देण्यात आलेले होते. त्यास अनुसरून, दि.०२ जुलै, २०२० रोजी ॲड.श्री नितीन भवर यांनी विधी विभागास सिव्हील ॲप्लीकेशनचा मसुदा सादर केलेला आहे. सदरचा मसुदा अंतीम करून विधी विभागामार्फत पुढील कार्यवाही करणेत येत आहे.

2) श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यांना मा.उच्च न्यायालयाचे दि.११ मार्च, २०२० व दि.१८ मार्च, २०२० रोजी निकालपत्र/आदेश प्राप्त झालेले असुन सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर विलंबाने का सादर केला? याबाबत लेखी खुलासा मागविणेकामी जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/आस्था/५००/२०२०, दि.१ जुलै, २०२० अन्वये पत्र देण्यात आलेले होते.

**(क) त्यास अनुसरून,** श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यानी दिनांक ०२ जुलै,२०२० रोजीचा लेखी खुलासा सादर केला असून त्यात त्यांनी असे नमुद केले आहे की,

१) " सामान्य प्रशासन विभाग जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/१८९६/२०१८, दि.२७.०९.२०१८ रोजीचे कार्यालयीन आदेशान्वये माझेकडे अनुक्रमे सामान्य प्रशासन विभाग, मागासवर्ग विभाग, कामगार विभाग, सभाकामकाज विभाग, मंदिर विभाग, जनसंपर्क विभाग, विधी विभाग, अभिलेख कक्ष, कॅन्टीन विभाग व मुंबई कार्यालय इ. १० विभाग पर्यवेक्षेणासाठी नेमुन देण्यात आलेले होते.

सदर विभागांच्या कार्यालयीन टिपण्या, मा.तदर्थ समिती सभेचे प्रस्ताव तयार करून सादर करण्याची जबाबदारी संबंधीत विभागाचे प्र.अधिक्षक / प्र. विभागप्रमुख यांचेवर निश्चित करण्यात आलेली आहे. प्रशासकीय

अधिकारी हे पर्यवेक्षणासाठी नेमून दिलेल्या विभागांच्या टिपण्या/ मा.तदर्थ समिती सभेचे प्रस्ताव स्वतः तयार करीत नसतात. विभागाच्या टिपण्या/मा.तदर्थ समिती सभेचे प्रस्ताव हे संबंधीत विभागाचे प्र.अधिक्षक/ प्र.विभाग प्रमुख हे तयार करून प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत मा.उप मुख्यकार्यकारी अधिकारी व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करीत असतात.

२) सामान्य प्रशासन शाखा जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३८१३/२०१९, दि.३१.०३.२०१९ रोजीचे आदेशान्वये, सर्व विभागांच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजाच्या संचिका/कागदपत्रे, मा.व्यवस्थापन समिती प्रस्ताव/मा.तदर्थ समिती प्रस्ताव संबंधीत विभागाचे अधिक्षक/विभागप्रमुख यांनी प्रशासकीय अधिकारी, उप मुख्यकार्यकारी अधिकारी साहेब यांचेमार्फत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडेस सादर करणेत याव्यात, अशी प्रशासकीय कामकाजाची पध्दत निश्चित करणेत आलेली आहे व त्या पदसोपान (Proper Channel) पध्दतीने विभागप्रमुख/प्र.अधिक्षक/प्र.विभागप्रमुख यांचेमार्फत विभागांच्या संचिका/कार्यालयीन टिपण्या/ मा.तदर्थ समितीचे प्रस्ताव तयार करुन सादर करणेत येतात. संबंधित विभागाकडील विषयांच्या संचिका/फाईल्स /कागदपत्रे ही संबंधित विभागाचे प्र.अधिक्षक / प्र.विभागप्रमुख यांचे ताब्यात (कस्टडीत) असतात. ती संचिका समितीसमोर प्र.अधिक्षक / प्र.विभागप्रमुख यांनी विलंबाने/उशीराने तयार करुन सादर केलेल्या प्रस्तावाचे विलंबास मला (प्रशासकीय अधिकारी यांना) जबाबदार धरणे नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वानुसार उचित व योग्य होणार नाही. ते माझेवर अन्याय केलेसारखे होईल.

३) श्री. विजय गणपतराव रोहमारे, उप कार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी रिट पिटीशन क्रमांक ४०१८/२०१९ दाखल केलेले होते. त्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालपत्र / आदेश प्राप्त झालेले असून सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर प्र.अधिक्षक/प्र.विभागप्रमुख सामान्य प्रशासन विभाग यांचेमार्फत विलंबाने तयार करुन सादर करणेत आलेला आहे. याबाबत माझा लेखी खुलासा खालीलप्रमाणे आहे.

४) सामान्य प्रशासन विभाग जावक क्रमांक एसएसएस/साप्रशा/आस्था/२८३२/२०२०, दिनांक १७/०३/२०२० रोजीचे आदेशान्वये कोरोना विषाणु (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून दिनांक १७ मार्च, २०२० रोजी दुपारी ३ वाजेपासून श्री साईबाबा समाधी मंदिरासह सर्व मंदिरे, निवासस्थाने, प्रसादालय, कॅन्टीन इ.सर्व सेवा बंद करणेत आलेल्या आहेत. त्यामुळे सर्व विभागांच्या कामकाजात व्यत्यय येऊन अडथळा निर्माण झालेला आहे. परिणामी सामान्य प्रशासन / आस्थापना विभागाकडून मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालपत्र / आदेशासंदर्भात प्रस्ताव तयार करुन मा.तदर्थ समिती सभेपुढे सादर करणेस विलंब झालेला आहे. सदर विलंब जाणूनबुजून झालेला नाही.

५) सामान्य प्रशासन विभाग जावक क्रमांक एसएसएस/साप्रशा/आस्था/२९१६/२०२०, दिनांक २४/०३/२०२० रोजीचे आदेशान्वये कोरोना विषाणु (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत मा.राज्य शासनाचे निर्देशानुसार ५ टक्के किंवा कमीत कमी कर्मचारी कामावर हजर/ उपस्थित ठेवणेत आल्यामुळे देखील सामान्य प्रशासन/आस्थापना विभागाचे दैनंदिन कामकाजात विस्कळीतपणा येऊन अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे देखील मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचेच आदेशासंदर्भात आस्थापना विभागाकडून मा.तदर्थ समिती सभेपुढे प्रस्ताव तयार करुन सादर करणेस विलंब झालेला आहे.

मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालपत्र / आदेशासंदर्भातील प्रकरण ०३ महिने कालमर्यादेचे असल्याची जाणीव मी वेळोवेळी प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग/आस्थापना विभाग यांना करुन दिलेली होती व त्याबाबत तात्काळ प्रस्ताव तयार करुन विनाविलंब मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग / आस्थापना विभाग यांना अनेकवेळा कार्यालयात समक्ष बोलावून, वेळोवेळी दुरध्वनी / मोबाईलवरुन सुचना दिलेल्या आहेत. तथापि, ५ टक्केच्या मर्यादेमुळे आस्थापना विभागात अपुर्ण / अत्यल्प कर्मचारी संख्या उपस्थित असल्यामुळे त्यांचेकडून प्रस्ताव तयार करुन मा.तदर्थ समिती सभेपुढे सादर करणेस विलंब झालेला आहे.

६) मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथील याचिका क्रमांक ४०१८/२०१९ संदर्भातील दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालावर/आदेशावर विश्लेषणात्मक (सविस्तर) लेखी अभिप्राय घेणेसंदर्भात सामान्य प्रशासन विभाग/आस्थापना विभागाकडून दिनांक ०२/०४/२०२० रोजीची

कार्यालयीन टिपणी तयार करुन प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेकडे सादर करणेत आलेली होती.

सदर ०२/०४/२०२० रोजीचे कार्यालयीन टिपणीस अनुसरुन मा.उच्च न्यायलयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालपत्र / आदेशासंदर्भात विश्लेषणात्मक (सविस्तर) लेखी अभिप्राय घेणेसाठी सामान्य प्रशासन विभागाकडून श्री.नितीन आर.भवर, हायकोर्ट ॲडव्होकेट, औरंगाबाद यांना जावक नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/४०/२०२०, दिनांक १३/०४/२०२० रोजीचे पत्रान्वये लेखी कळविणेत आलेले होते. तथापि कोरोना विषाणु (कोव्हीड १९) साथरोगाचे प्रादुर्भावामुळे संपुर्ण भारत देशात व महाराष्ट्रात दिनांक २३/०३/२०२० पासून लॉकडाऊन (Lockdown) करणेत आलेले असल्यामुळे श्री.नितीन आर.भवर, हायकोर्ट ॲडव्होकेट, औरंगाबाद यांचेकडून अद्याप पर्यंत मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालपत्र / आदेशाबाबत विश्लेषणात्मक (सविस्तर) लेखी अभिप्राय अद्यापपर्यंत प्रशासनास प्राप्त झालेला नाही. त्यामुळे देखील सामान्य प्रशासन / आस्थापना विभागाकडून मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालपत्र / आदेशाबाबत करावयाच्या कार्यवाहीचा प्रस्ताव तयार करुन मा.तदर्थ समिती सभेसमोर सादर करणेस विलंब झालेला आहे. सदरचा प्रस्ताव कोणीही जाणूनबुजून मा.तदर्थ समिती सभेसमोर विलंबाने सादर केलेला नाही. सदरचा प्रस्ताव प्रशासकीय कामकाजाचे पध्दतीनुसार तयार करुन विहित वेळेत/मुदतीत मा.तदर्थ समिती सभेसमोर सादर करणेची जबाबदारी ही संबंधित विभागाचे प्र.अधिक्षक/विभागप्रमुख यांची आहे. त्याबाबत प्रशासकीय अधिकारी यांना जबाबदार धरणेत येऊ नये.

७) मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ११/०३/२०२० व दिनांक १८/०३/२०२० रोजीचे निकालपत्र / आदेशाचे कार्यवाही संदर्भात सामान्य प्रशासन/आस्थापना विभागाकडून प्रस्ताव तयार करुन मा.तदर्थ समिती सभेसमोर सादर करणेस वरील कारणामुळे विलंब झालेला आहे. त्याबाबत मी दिलगीरी व्यक्त करीत असून मला एकवेळ माफ करावे अशी नम्र विनंती आहे.

उपरोक्तप्रमाणे मी दिलेल्या माझ्या खुलाशातील वस्तुस्थितीचा व कारणांचा सहानुभुतिपुर्वक व मानवतेच्या दृष्टीकोनातून विचार होऊन मला मा.प्रशासनाकडुन जावक नं.एसएसएस/साप्रशा/ आस्था/ ५००/ २०२०, दिनांक ०१/०७/२०२० अन्वये देणेत आलेली नोटीस पत्र रद्द होणेस व माझे सेवानिवृत्तीची देयके मला आदा होणेस विनंती आहे. " असे म्हंटले आहे.

उपरोक्त विषयांकित रिट पिटीशन क्र.४०१८/२०१९ चे निकालाचे अनुषंगाने, विहीत मुदतीत प्रस्ताव सादर करणेस विलंब झाल्याने मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यांनी दि.०२ जुलै,२०२० रोजी सादर केलेला लेखी खुलासा मा.तदर्थ समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३५९** **या विषयावर सविस्तर चर्चा झाली, प्रस्तुत प्रकरणी श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यांनी दि.०२ जुलै,२०२० रोजी सादर केलेल्या लेखी खुलाशाचे अवलोकन केले असता त्यांनी मा.तदर्थ समिती सभेचे प्रस्ताव तयार करून सादर करण्याची जबाबदारी संबंधीत विभागाचे प्रभारी अधिक्षक/प्रभारी विभाग प्रमुख यांचेवर निश्चित करण्यात आलेली असल्याचे म्हटले आहे. त्यानुसार सबंधीत विभागाचे विभागप्रमुख व प्रभारी अधिक्षक यांना कारणे दाखवा नोटीस देऊन, त्यांचा खुलासा घेण्यात यावा, व सदर विलंबास कोण जबाबदार आहे, याबाबत विभागाने अभिप्रायासह सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करावा.**

**तसेच संस्थानच्या बऱ्याच प्रकरणात ॲड नितीन भवर हे मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद या न्यायालयात हजर झालेले नाहीत असे बऱ्याच विषयात नमुद केलेले दिसते. असे असतांना संस्थानच्या विधी विभागाने सदरची बाब मा.तदर्थ समितीचे निदर्शनास का आणली नाही, पॅनलवर नसलेल्या वकिलांमार्फत सिव्हील ॲप्लीकेशन कसे दाखल केले व त्या वकिलांनी सदरहु सिव्हील ॲप्लीकेशनमध्ये संस्थानचे पॅनलवर नसतांना कसे काम पाहिले याचा खुलासा संबधीत विभाग प्रमुख व संबधीत कर्मचारी यांचेकडून घेण्यात यावा व तो खुलासा मा.तदर्थ समितीचे पुढील सभेसमोर ठेवण्यात यावा.**

**मा.उच्च न्यायालयामध्ये संस्थानच्या वतीने कामकाज पाहण्यासाठी ॲडव्होकेट पॅनल तयार करण्याची आजच्या सभेतील विषय नं.१० निर्णय क्र.३६४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**श्री.एस.व्ही.गमे यांना पाठविलेल्या नोटीसीचा मुळ मुद्दा हा श्री.व्ही.जी.रोहमारे यांच्या पदोन्नतीबाबत आहे. यापुर्वी या विषयावर चर्चा होऊन सर्वसमावेषक विचार करुन प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्याबाबत पदोन्नतीची साखळी व पदोन्नतीकरीताचे निम्न पद (Feeder cadre) सेवा जेष्ठता यादी यासह वरील सर्व विषयांचा एकत्रित प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेपुढे आणावा, असे ठरले होते. तसा संपुर्ण प्रस्ताव द्यावा.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन)**

---

**विषय नं.०६** **अ) ६३५ कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी ५९८ कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन निर्णयाप्रमाणे संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून करण्यात आलेल्या नेमणूकांना मान्यता मिळणेबाबत.**

**ब) कंत्राटी कर्मचारी यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता मिळाल्यानंतर सदर कर्मचारी संख्या कंत्राटदाराच्या मंजूर कर्मचारी संख्येतून कमी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) ६३५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना शासन निर्णयाप्रमाणे संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून करण्यात आलेल्या नेमणूकांना मान्यता मिळणेबाबत.

विषयाची पूर्वपीठीका -

**(अ-१)** मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील पदांचा आकृतीबंध मंजूर करणेबाबतचे दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ शासन निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास, म्हणजेच एकूण ४८२६ पदांना (स्थायी २९०८ पदे+अस्थायी १९१८ पदे) काही अटी-शर्तीस अधिन राहुन मान्यता दिलेली आहे.

**(अ-२)** त्यानंतर, मा. शासनाने दिनांक २५ सप्टेंबर, २०१४ रोजीचे शासन निर्णयानुसार, संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल या शाळेच्या प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापक (एक पद) व श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता परफ्यूजनिस्ट (०१ पद) नव्याने समाविष्ट करणेस मान्यता दिली.

**(अ-३)** याच कालावधीत, श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल, शिर्डी कडील विद्यार्थी संख्येत झालेली वाढ व त्यामुळे तुकडयांच्या संख्येत झालेली वाढ लक्षात घेऊन १० वाढीव सहाय्यक शिक्षक पदांना मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेत आलेला होता. त्यास अनुसरुन, मा. शासनाने दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजीचे शासन निर्णयानुसार, सहायक शिक्षक संवर्गातील १० पदे निर्माण करणेस मान्यता दिलेलीआहे.

**(अ-४)** दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयानुसार मंजूर आकृतीबंधात, उपरोक्त परिच्छेद अ-२ व अ-५ मध्ये नमूद केलेल्या वाढीव पदांची मान्यता विचारात घेतां, सध्या एकूण ४८३८ (४८२६+०२+१०) पदांचा आकृतीबंध मंजूर असून, यामध्ये स्थायी पदे २९२० (२९०८+१२) + कंत्राटी पदे १९१८ यांचा समावेश आहे.

**(अ-५)** दरम्यानचे कालावधीत तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७६५(२३) अन्वये,संस्थान प्रशासनाकडील दिनांक ०८ डिसेंबर,२०११ रोजीचे पत्राव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल-८११ व कुशल-१०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेत आला. सदरहू मूळ प्रस्तावावर मा. शासनाकडून विचारणा करणेत आलेल्या बाबींवर वेळोवेळी अलाहिदा पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.

**(अ-६)** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने, संस्थान प्रशासनामार्फत दिनांक ०८ डिसेंबर,२०११ रोजी सादर करणेत आलेल्या (परिच्छेद अ-५ मध्ये नमूद केलेप्रमाणे) कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेच्या प्रस्तावाबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजी मा.मुख्यमंत्री यांचे शासकीय निवासस्थानात झालेल्या संस्थान कामकाजासंबंधित आढावा बैठकीचे इतिवृत्त मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र दिनांक ०१ मार्च, २०१८ (प्रत्यक्ष प्राप्त दिनांक ०९ मार्च, २०१८ ) इकडील कार्यालयास प्राप्त झालेले होते.

उपरोक्त दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे आढावा बैठकीचे इतिवृत्तातील विषय क्रमांक ०४ श्री साईबाबा संस्थानच्या कुशल व अकुशल ९१३ कर्मचा-यांना नियमित करणेबाबत यावर खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे -

*(०१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आकृतीबंधातील कंत्राटी पदांना स्थायी पदे म्हणून मान्यता देणेत यावी.*

*(०२) सदर पदांवरील पदभरती प्रक्रिया राबविण्यात यावी.*

*(०३) पदभरती प्रक्रीयेमध्ये श्री साईबाबा संस्थानमधील कामाचा अनुभव, त्यांचे कौशल्य आणि मागील सेवा कालावधीस प्राधान्य देण्यात यावे व त्यासाठी २५ गुण ग्रेस स्वरुपात देण्यात यावेत.*

**(अ-७)** याच अनुषंगाने मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून दिनांक १२ सप्टेंबर,२०१८ रोजीचे पत्राने असे कळविणेत आले होते की,

".. .. (दिनांक ०१ फेब्रुवारी,२०१८ रोजीचे मा. मुख्यमंत्री यांच्या आढावा बैठकीतील निर्णय क्र.०४) सदर निर्णयानुसार संस्थानच्या आकृतीबंधात सुधारणा करणे आवश्यक आहे. यास्तव या अनुषंगाने संस्थानमार्फत व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. "

**(अ-८)** उपरोक्त तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निवासस्थानी दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे बैठकीतील निर्णयानुसार, कंत्राटी पदे स्थायी पदांमध्ये रुपांतरीत झालेनंतर त्यावरील नेमणुकांसाठी पदभरती प्रक्रीया कशी राबवावी याबाबत स्पष्ट निर्देश देणेत आलेले नाहीत. तसेच पदभरती प्रक्रियेमध्ये कंत्राटी कर्मचा-यांना कामाचा अनुभव, त्यांचे कौशल्य आणि मागिल सेवा कालावधीसाठी २५ गुण ग्रेस देणेत यावेत असे कळविले आहे, याबाबतही स्पष्टता नाही.तसेच सेवेतील आरक्षणाबाबत ही स्पष्टता नाही. सध्या संस्थानमध्ये कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांपैकी बहुतांशी कर्मचारी हे ४३ वर्षापेक्षा जास्त वयाचे आहेत, त्यामुळे पदभरती करतांना वयोमर्यादेचे निकषात त्यांचा समावेश होणे शक्य नाही, त्यामुळे त्यांना वयोमर्यादेत सूट द्यावी किंवा कसे तसेच सेवेतील आरक्षण याबाबत मा. शासन स्तरावरुन मार्गदर्शन मिळणेकामी संस्थान प्रशासनामार्फत दिनांक ०१ डिसेंबर,२०१८ अन्वये विनंती पत्र देणेत आलेले होते.

**(अ-९)** त्यानंतर मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ (प्राप्त दिनांक १५ जानेवारी, २०१९) अन्वये खालीलप्रमाणे कळविले होते -

१. शासनाच्या दिनांक १२ सप्टेंबरच्या (या टिपणीतील संदर्भ क्रमांक ०८) पत्रान्वये कळविल्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या सन २००९ मधील मंजूर आकृतीबंधात १९१८ पदे जी कायम स्वरुपी कंत्राटी दाखविण्यात आली आहेत त्या पदांपैकी किती पदांना स्थायी पदे म्हणून रुपांतरीत करणे आवश्यक आहे.

२. यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना किती वित्तीय भार येणार आहे,

३. उपरोक्त मुद्यांच्यासह व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने आकृतीबंधाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

(अ-१०) संस्थानमध्ये कर्मचारी कंत्राटारामार्फत कंत्राटी पध्दतीने काम करत असलेले माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे व सन २००१ ते २००५ अखेर पर्यन्त ढोबळमानाने ९१६ अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत नियमित नेमणुका देणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. या ९१६ कंत्राटी कर्मचा-यांची माहिती खालील प्रमाणे आहे -

<u>**तक्ता अ**</u>

| **अ. नं.** | **तपशील** | **माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे परंतु दि. २२ ऑगष्ट, २००४ अखेर संख्या** | **दि.२३ ऑगष्ट, २००४ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर संख्या** | **दि.३१ डिसेंबर, २००५ अखेर एकूणसंख्या (३+४=५)** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१ | **तांत्रिक कुशल कर्मचारी** | ०५२ | ०१६ | ०६८ |
| ०२ | **कुशल कर्मचारी** | ०३९ | ०१७ | ०५६ |
| ०३ | **अकुशल कर्मचारी** | ३५६ | ११२ | ४६८ |
| ०४ | **कुशल सुरक्षा कर्मचारी** | ००४ | ००१ | ००५ |
| ०५ | **अकुशल सुरक्षा कर्मचारी** | १८४ | ०६१ | २४५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **एकुण (१)** | **६३५** | **२०७** | **८४२** |

उपरोक्त **तक्ता अ** व मूळ दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजी सादर केलेल्या प्रस्तावातील कर्मचा-यांच्या संख्येत खाली नमूद केलेल्या कारणांमुळे काही कंत्राटी कर्मचारी कमी झालेने फरक पडलेला आहे-

**तक्ता ब**

| **अ. नं.** | **तपशील** | **माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे परंतु दि. २२ ऑगष्ट, २००४ अखेर कमी झालेली संख्या** | **दि.२३ ऑगष्ट, २००४ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर कमी झालेली संख्या** | **दि.३१ डिसेंबर, २००५ अखेर एकूण कमी झालेली संख्या (३+४=५)** |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| **०१** | **काम सोडून गेलेले** | **४२** | **१२** | **५४** |
| **०२** | **मयत झालेले** | **१०** | **०१** | **११** |
| **०३** | **वयोमर्यादा ओलांडल्याने** | **०७** | **०१** | **०८** |
| **०४** | **अभिलेख सापडत नसलेले** | **०४** | **०१** | **०५** |
| **०५** | **कमी केलेले** | **०३** | **०४** | **०७** |
| | **एकुण (२)** | **६६** | **१९** | **८५** |
| | **एकुण (तक्ता क्र.०१+०२)** | **७०१** | **२२६** | **९२७** |

**थोडक्यात,** मूळ प्रस्तावात नमूद केलेले ९१६ कर्मचारी अधिक नजरचुकीने राहून गेलेले माहे डिसेंबर, २००५ पूर्वीचे ११ कर्मचारी असे मिळून एकूण ९२७ कंत्राटी कर्मचारी आहेत / होते.

उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेल्या विवेचनास आणि विषयांकित प्रस्तावाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पत्रव्यवहारास अनुसरुन, या प्रस्तावाबाबत करणेत आलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे सविस्तर नमूद केली आहे.

**सद्यःस्थिती -**

**(ब-१)** दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे प्रस्तावाव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल - ८११ व कुशल - १०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

या प्रस्तावाचे अनुषंगाने, उपरोक्त परिच्छेद अ मध्ये नमुद केलेल्या सविस्तर विवेचनास तसेच संदर्भाकिंत पत्रव्यवहारास अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ / २२ / प्र.क्र.७० / का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये शासन निर्णय पारित केलेला आहे.

**(ब-२)** मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी **"श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत"** या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे-

" .. ..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे सन २००१ ते २००४या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या ६३५ कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु.५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन शासनाच्या दि.०७.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम,

२००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्तप्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status) हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. ”

**(ब-३)** उपरोक्त विवेचनानुसार व सामान्य प्रशासन विभागाकडील वेळोवेळी सादर करणेत आलेल्या कार्यालयीन टिपणीवरील आदेशानुसार, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन खाली नमूद केलेप्रमाणे नियुक्ती आदेश दिनांक ०२ जानेवारी, २०२० अखेर पारित करणेत आलेले आहेत-

**तक्ता क्रमांक ०१**

| अ.नं. | तपशील | संख्या | शेरा / कारण |
|---|---|---|---|
| (अ) | **दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील कंत्राटी कर्मचा-यांची संख्या** | ६३५ | -- |
| ०१ | यादीत एक नांव दोन वेळेस आलेले कंत्राटी कर्मचारी | ००१ | श्री. रविंद्र भडांगे यांचे नांव यादीतील अ.नं.५० आणि अ.नं. ५४ वर ही आलेले आहे, त्यापैकी यादीतील अ. नं. ५० नुसार नियुक्ती आदेश पारित करणेत आलेला आहे. |
| ०२ | यादीतील ६० वर्षे वयोमान पूर्ण केलेले कंत्राटी कर्मचारी | ००१ | श्रीमती पंचफुला राठोड (यादीतील अ.नं.०२) वयोमान ६० वर्षे पूर्ण झाल्याने नियुक्ती आदेश पारित करणेत आलेला नाही. |
| ०३ | यादीतील मयत झालेले कंत्राटी कर्मचारी | ००२ | श्री. दिवेकर (यादीतील अ.नं.६०) व श्री. कसबे (यादीतील अ.नं.५६४) हे मयत असल्या कारणाने नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले नाहीत. |
| ०४ | यादीतील दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतरचे कंत्राटी कर्मचारी | ००८ | सदरचे कंत्राटी कर्मचारी हे दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कामावर हजर झालेले आहेत, त्यामुळे त्यांना नियुक्ती आदेश देणेत आलेले नाहीत. (यादीतील अ.नं. ५७२, ५७४, ५७६, ५७७, ६३२, ६३३, ६३४ व ६३५ ) |
| ०५ | यादीतील सतत गैरहजर असणारे कर्मचारी | ००७ | कामगार विभागामार्फत ०१ वर्षापेक्षा जास्त तसेच ०१ वर्षाचे आतिल कालावधीत सतत गैरहजर असणारे एकूण २५ कंत्राटी कर्मचा-यांचे बाबतीत अलाहिदा कार्यवाही सुरु आहे. या २५ कंत्राटी कर्मचा-यांपैकीतसेच ज्या कंत्राटी कर्मचा-यांची नांवे ६३५ कंत्राटी कर्मचा-यांचे यादीत आहेत, परंतु सध्या कामावर हजर नाहीत अशा कंत्राटी कर्मचा-यांना नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले नाहीत (यादीतील अ.नं. ८९, १७२, २४०, ४९१, ५०४, ६०० व ६११) |
| ०६ | यादीतील सन २००१ ते सन २००४ (दि.२२/०८/२००४)या कालावधीत कामावर नसणारे कर्मचारी | ०१५ | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील सन २००१ ते सन २००४ या कालावधीत हजर नसणारे / कामावर नसणारे परंतु माहे डिसेंबर, २००० पुर्वी कामावर हजर असणारे कर्मचारी. (यादीतील अ.नं.३, ४, ९, २७, ४८, ८२, ८४, १०५, ११४, ११६, १२२, १२९, १४९व १६९) |
| (ब) | **एकूण (अ.नं.०१ ते ०६)** | ०३४ | -- |
| (क) | **पारित करणेत आलेले आदेश ((अ) –(ब))** | ६०१ | **दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील ६०१ पात्र कर्मचा-यांना आदेश पारित करणेत आले.** |

| | | | |
|---|---|---|---|
| **(ड)** | यादीत समाविष्ट आहेत परंतु नियुक्ती आदेश स्वीकारले नाही असे कर्मचारी | **००३** | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्यायादीनुसार हजर दिवस व कागदपत्रांची पडताळणी करुन नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले होते परंतु काही कारणास्तव नियुक्ती आदेश स्वीकारले नाहीत असे कर्मचारी (यादीतील अ.नं.७६, ९० व ५३३ ) |
| **(इ)** | नियुक्ती आदेश स्वीकारुन सेवेत रुजू झालेले एकूण कंत्राटी कर्मचारी **एकूण (क-ड)** | **५९८** | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर कामावर असलेले) या कालावधीतील हजर दिवस आणि कागदपत्रांची पडताळणी करुन नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले असून, सदर कर्मचारी सेवेत रुजू झाले आहेत. |

**(ब-४)** उपरोक्त **परिच्छेद ब-३** मधील, **तक्ता क्रमांक ०१(इ)** मध्ये नमुद केलेप्रमाणे, कंत्राटी कर्मचा-यांना पारित करणेत आलेल्या नियुक्ती आदेशातील कर्मचा-यांचा विभागाप्रमाणे व प्रकारानुसार (कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी) यानुसार थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे -

**तक्ता क्रमांक ०२**

| **अ. नं.** | **नियुक्ती आदेश स्वीकारुन सेवेत रुजू झालेले कंत्राटी कर्मचारी** | **कंत्राटी कर्मचारी** | | | **कंत्राटी कर्मचारी** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **कुशल** | **अकुशल** | **एकुण** | **पुरुष** | **स्त्री** | **एकुण** |
| ०१ | ५९८ | ०८७ | ५११ | ५९८ | ५६३ | ०३५ | ५९८ |

**तक्ता क्रमांक ०३**

| **अ.नं.** | **विभागाचे नांव** | **कंत्राटी कर्मचारी** | | | **कंत्राटी कर्मचारी** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **कुशल** | **अकुशल** | **एकुण** | **पुरुष** | **स्त्री** | **एकुण** |
| **1** | **2** | **3** | **4** | **(3+4)=5** | **6** | **7** | **(6+7)=8** |
| ०१ | सामान्य प्रशासन विभाग | ०१ | ०६ | ०७ | ०७ | ०० | ०७ |
| ०२ | जनसंपर्क विभाग | ०१ | ०४ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| ०३ | लेखाशाखा | १० | ०२ | १२ | १२ | ०० | १२ |
| ०४ | माहिती तंत्रज्ञान विभाग | ०२ | ०२ | ०४ | ०३ | ०१ | ०४ |
| ०५ | मंदिर विभाग | ०१ | २५ | २६ | २६ | ०० | २६ |
| ०६ | प्रकाशने विभाग | ०१ | ०२ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| ०७ | आरोग्य विभाग | ०२ | ९० | ९२ | ८५ | ०७ | ९२ |
| ०८ | संरक्षण विभाग | ०२ | १४३ | १४५ | १३५ | १० | १४५ |
| ०९ | फायर ॲण्ड सेफ्टी विभाग | ०० | ०४ | ०४ | ०४ | ०० | ०४ |
| १० | बांधकाम विभाग | ०४ | ०० | ०४ | ०४ | ०० | ०४ |
| ११ | पाणीपुरवठा विभाग | ०५ | ०२ | ०७ | ०७ | ०० | ०७ |
| १२ | बगीचा विभाग | ०० | ०३ | ०३ | ०२ | ०१ | ०३ |
| १३ | विद्युत विभाग | १४ | ०२ | १६ | १६ | ०० | १६ |
| १४ | मेकॅनिकल विभाग | ०३ | ०२ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| १५ | ध्वनिक्षेपण विभाग | ०३ | ०० | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| १६ | सीसीटीव्ही कंट्रोल सेल | ०१ | ०४ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| १७ | साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग | ०० | १४ | १४ | १४ | ०० | १४ |
| १८ | साईप्रसाद निवासस्थान विभाग | ०१ | १० | ११ | ११ | ०० | ११ |
| १९ | व्दारावती भक्तनिवासस्थान विभाग | ०२ | ०१ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| २० | श्री साई आश्रम विभाग | ०० | ०४ | ०४ | ०४ | ०० | ०४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | श्री साई धर्मशाळा | ०१ | ०१ | ०२ | ०२ | ०० | ०२ |
| २२ | श्री साई प्रसादालय | ०२ | ७७ | ७९ | ७६ | ०३ | ७९ |
| २३ | कॅन्टिन विभाग | ०२ | ३६ | ३८ | ३८ | ०० | ३८ |
| २४ | लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग | ०१ | ०७ | ०८ | ०८ | ०० | ०८ |
| २५ | भांडार विभाग | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ |
| २७ | वाहन विभाग | १३ | ०३ | १६ | १६ | ०० | १६ |
| २८ | मुंबई कार्यालय | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ |
| २९ | श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल | ०४ | ०३ | ०७ | ०२ | ०५ | ०७ |
| ३० | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय | ०१ | ०२ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| ३१ | श्री साईनाथ रुग्णालय | ०६ | २३ | २९ | २४ | ०५ | २९ |
| ३२ | श्री साईबाबा हॉस्पीटल | ०४ | ३७ | ४१ | ३८ | ०३ | ४१ |
| | **एकूण** | **८७** | **५११** | **५९८** | **५६३** | **३५** | **५९८** |

**(ब-५)** उपरोक्त **परिच्छेद ब-३** मधील **तक्ता क्रमांक ०१**मध्ये नमूद यादीतील ज्या कर्मचा-यांचे नियुक्ती आदेश प्रलंबित ठेवणेत आलेले आहेत, अशा कर्मचा-यांबाबत कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झालेनंतर किंवा त्यांचे नियुक्तीबाबत येणा-या अडचणींचे यथायोग्य निराकरण झालेनंतर, त्यांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही यथावकाश मा. व्यवस्थापन समिती / मा. तदर्थ समितीचे मान्यतेसाठी यथावकाश प्रस्तावित करणेत येईल.

**(क)** विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम–१३ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी या शीर्षाखाली उपकलम ०४ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे –

*“ .. .. ४. समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (मुख्य कार्यकारी अधिका-याव्यतिरिक्त)व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.*

*परंतु,ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यन्त, केली जाणार नाही. ”*

तसेच, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम - २००४ मधील कलम–१६ मधील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्त व्यवस्थेकडे नेमून देणे या शीर्षाखाली खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे –

*“ .. .. नियत दिवसाच्या लगतपूर्वी, जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तिला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर, नियत दिवसापासून समितीच्या नियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या कामकाजाशी संबंधित अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल, आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही.*

*परंतु, या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदींनुसार अशा कोणत्याही व्यक्तीची सेवा समाप्त करण्याच्या समितीच्या अधिकारावर या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही. ”*

उपरोक्त **कलम १३** व **कलम १६** मधील तरतुदीचा विचार करतां, विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने, तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७६५(२३) अन्वये, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजी, कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत माहे डिसेंबर, २००० पूर्वी व त्यानंतर माहे जानेवारी,२००१ ते माहे डिसेंबर,२००५ पर्यन्त कार्यरत असणारे एकूण ९१६ कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत सामावून घेणेबाबतचा

प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावास मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे शासन निर्णयान्वये, सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या ६३५ कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय होणारे वेतनावर तसेच दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर नियुक्ती देणेस मान्यता दिली.

मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार, उपरोक्त **परिच्छेद ब** मध्ये सविस्तर विवेचन केलेनुसार, सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४) अखेर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कुशल / अकुशल म्हणून कार्यरत असलेल्या एकूण ६३५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी ६०१ कंत्राटी कर्मचा-यांना नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले आहेत, त्यापैकी सेवेत रुजू होणेस इच्छुक असलेल्या ५९८ कर्मचा-यांना कंत्राटी कर्मचारी म्हणून ११ महिन्याचे कालावधीसाठी विहित अटी-शर्तीनुसार संस्थान सेवेत सामावून घेणेत आलेले आहे.

**प्रस्ताव -**

**(ड-१)** उपरोक्त **परिच्छेद अ** ते **परिच्छेद क मध्ये** नमूद केलेला वस्तुस्थितीदर्शक सविस्तर अहवाल मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेपुढे विचारार्थ / निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता.

मा. तदर्थ समितीने दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेतील विषय क्रमांक ०१, ०२, ४३ व ६३ चे अनुषंगाने **एकत्रित निर्णय क्रमांक २३५** पारित केलेला आहे.

या एकत्रित निर्णयातील बाब क्रमांक ०१ ते ३३ मध्ये विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने मा. तदर्थ समितीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत. तसेच या एकत्रित निर्णयातील बाब क्रमांक ३४ ते ३९ मध्ये संस्थान आस्थापनेवरील विविध प्रकारे कार्यरत असणारे कर्मचा-यांचे माहे एप्रिल, २०२० चे वेतनाबाबत निष्कर्ष-वजा-निर्णय नमूद करणेत आलेले आहेत.

या एकत्रित **निर्णय क्रमांक २३५** मधील **बाब क्रमांक ३८ आणि** ४० मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे -

*“ .. .. **38.** So far as 598 employees to whom appointment order was issued by the then Chief Executive Officer is concerned, the concerned department of the Trust has not come up with a clear picture before this Committee. The fate of the Agreement, which the Trust had with the Contractors, is in limbo. The concerned department now want that this Committee to take up decision on Subject No. 43 listed on the Agenda of today's meeting. Unless comprehensive decision is taken as to regularization / appointment of 598 employees on contract basis directly by the Trust or otherwise, as well as decision on the agreement, which Trust had with the Contractors, such request in subject No. 43 cannot be considered. **The Trust is at liberty to submit detailed proposal in this regard before this Committee along with entire correspondence with the State Government and decisions taken by erstwhile committee.** (This be taken as Decision C for Clarity)*

***39.*** *.. ..*

***40.*** *The decision taken herein shall be subject to the decision / directions by the Hon'ble High Court on Civil Application that will be filed by the Trust in this regard in PIL No. 120 of 2019.”*

**(ड-२)** उपरोक्त **परिच्छेद ड-१** मध्ये नमूद केलेल्या मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेतील एकत्रित निर्णय क्रमांक २३५ (३८) मधील बाबींस अनुसरुनविवेचन असे की,

**परिच्छेद अ** ते **परिच्छेद क** मध्ये नमुद विषयाची पूर्वपीठीका व करणेत आलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती विचार घेतां, संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत / ठेकेदारामार्फत कार्यरत असणारे ६३५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार आणि मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून ११ महिन्याचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती आदेश देणेत आलेले आहेत. या नियुक्ती आदेशात, सदर कर्मचा-यांचा संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status)हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहिलआणि त्यांना किमान वेतन कायद्यानुसार प्रति दिन / प्रति दिवस गणना करुन येणारे किमान वेतन आदा करणेत येईल, असे स्पष्ट नमूद करणेत आलेले आहे.

उपरोक्त परिच्छेदांत नमूद केलेल्या बाबींचे अहवालावर यापूर्वी मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन, विषय क्रमांक ०१, ०२, ४३ व ६३ चे अनुषंगाने घेणेत आलेल्या एकत्रित निर्णय क्रमांक २३५ पारित करणेत आलेला आहे. या निर्णयातील बाब क्रमांक ३८ नुसार, उपरोक्त प्रस्ताव पुन्हा सविस्तररित्या मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेचे निर्देश असल्यामुळे, मा. तदर्थ समितीचे दिनांक ०९ जून, २०२० रोजीचे सभेपुढे पुनःश्च सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. यावर निर्णय क्रमांक ३०९ नुसार, याबाबत संस्थान सविस्तर प्रस्ताव सादर करील असे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले करीता सदरचा विषय तहकुब ठेवण्यात आला, असा निर्णय घेणेत आलेला आहे.

**(ड-३)** आता उपरोक्त विषयांकित (अ) चे प्रस्तावाचे अनुषंगाने प्रस्तावित करणेत येत आहे की,

वरील परिच्छेद (अ) ते (ड) मध्ये सविस्तररित्या नमूद केलेप्रमाणे, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार, सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे ६३५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेले असून, त्यांना मा. शासन निर्णयातील तरतुदीनुसार नेमणूका देणेत आलेल्या आहेत, त्यास मान्यता असावी.

---

(ब) कंत्राटी कर्मचारी यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता मिळाल्यानंतर सदर कर्मचारी संख्या कंत्राटदाराच्या मंजूर कर्मचारी संख्येतून कमी करणेबाबत.

विषयाची पूर्वपीठीका –

**अ-१)** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७६५ (२३) अन्वये, संस्थान प्रशासनाकडील दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे पत्राव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल-८११ व कुशल-१०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेतआलेला होता.

या प्रस्तावाचे अनुषंगानेकेलेल्या पत्रव्यवहारास अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ / २२ / प्र.क्र.७० / का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये“ **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत ”** या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

“ .. ..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे सन २००१ ते २००४या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या ६३५कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन शासनाच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्तप्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status) हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. ”

**अ-२)** उपरोक्त विवेचनानुसार व सामान्य प्रशासन विभागाकडील वेळोवेळी सादर करणेत आलेल्या कार्यालयीन टिपणीवरील आदेशानुसार, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कंत्राटी कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन खाली नमूद केलेप्रमाणे नियुक्ती आदेश दिनांक ०२ जानेवारी, २०२० अखेर पारित करणेत आलेले आहेत. त्याचा तपशील याच प्रस्तावातील उपविषय अ मधील तक्ता क्रमांक ०१ मध्ये सविस्तररित्या सादर केलेला आहे.

ब-१) कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी यांचेबाबत -

विषयांकित प्रस्तावास अनुसरुन विवेचन असे की, सन २०१९-२० मध्ये कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेबाबत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांना खालीलप्रमाणे कार्यादेश पारित करणेत आलेले आहेत –

**तक्ता क्रमांक ०२ (अ)**

| अ. नं. | कर्मचारी कंत्राटदाराचे नाव | आदेश क्रमांक व दिनांक | कालावधी | कार्यादेशात नमूद केलेली कंत्राटी कर्मचारी मंजूरी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अकुशल | कुशल | एकूण |
| ०१ | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे | जा.नं.एसएसएस/वशी -७ए/२३०४/२०१९, दि.१३.०९.२०१९ | दि.०१.१०.२०१९ते दि.३०.०९.२०२० | ६६९ | २२३ | ८९२ |
| ०२ | मे.मॉडर्न फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे | जा.नं.एसएसएस/वशी -७ए/२३०५/२०१९, दि.१३.०९.२०१९ | दि.०१.१०.२०१९ते दि.३०.०९.२०२० | ४०४ | ४८८ | ८९२ |
| | | | **एकूण -** | **१०७३** | **७११** | **१७८४** |

**तक्ता क्रमांक ०२ (ब)**

| अ. नं. | कर्मचारी कंत्राटदाराचे नाव | आदेश क्रमांक व दिनांक | कालावधी (मुदतवाढीसह) | कार्यादेशात नमुद केलेली मंजूर कंत्राटी सुरक्षाक्षक संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अकुशल | कुशल | एकूण |
| **०१** | मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिस्टीम अ‍ॅण्ड सर्व्हिसेस, मुंबई | जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६५०/ २०१८, दि.०८.०६.२०१८ | दि.१०.०६.२०१८ ते दि.२९.०२.२०२० | ७४८ | ६७ | **८१५** |

**तक्ता क्रमांक ०२ (क) गोषवारा**

| अ.नं. | तपशील | अकुशल | कुशल | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०१ | तक्ता क्रमांक ०२(अ) | १०७३ | ७११ | १७८४ |
| ०२ | तक्ता क्रमांक ०२ (ब) | ०७४८ | ०६७ | ०८१५ |
| **तक्ता क्र.०२ (अ + ब) एकूण -** | | **१८२१** | **७७८** | **२५९९** |

उपरोक्त तक्ता क्र.०२ (अ व ब) मध्ये दर्शविलेलेप्रमाणे दिनांक ०२ जानेवारी, २०२० अखेर संबंधित कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांनी त्यांचेकडेस विभागून देणेत आलेल्या विभागांना कार्यादेशानुसार कंत्राटी कर्मचारी पुरविलेले आहेत.

मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे व मे. मॉडर्न फॅसिलिटी मॅनेजमेंट लि., पुणे यांना दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी देणेत आलेल्या कार्यादेशातील नमूद मंजूर कंत्राटी कर्मचारी संख्येनुसार करारनामा करणेत आलेला आहे.

तसेच उपरोक्त तक्ता क्र.०२ (ब) मध्ये दर्शविलेलेप्रमाणेमे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिस्टीम अ‍ॅण्ड सर्व्हिसेस, मुंबई यांनी दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० अखेर कंत्राटी सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी संरक्षण विभागास पुरविलेले आहेत.

**ब-२)** उपरोक्त **परिच्छेद अ** मध्ये सविस्तर विवेचन केलेनुसार, कंत्राटी कर्मचारी कंत्राटदाराकडे कार्यरत असणा-या कंत्राटी कर्मचा-यांपैकीच ५९८ कुशल / अकुशल कर्मचा-यांना संस्थानचे आस्थापनेवरील रिक्त असणारे कंत्राटी कर्मचारी पदांवरविभागनिहाय नेमणूका देणेत आलेल्या आहेत. त्यामुळे कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारांना पारित करणेत आलेल्या कार्यादेशातील कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी यांचे मंजूर संख्येमध्ये कपात करावी लागणार आहे.

त्यास अनुसरुन, संबंधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांचे मूळ कार्यादेशातील नमूद केलेल्या मंजूर कंत्राटी कर्मचारी संख्येतून कमी करावयाची कंत्राटी कर्मचारी संख्या दर्शविणारा सुधारित मंजुरीबाबतचा सविस्तर तक्ता “**परिशिष्ट – अ**” म्हणून सादर केला आहे.

**परिशिष्ट – अ**

| अ.नं. | कंत्राटदाराचे नाव | पुर्वी देण्यात आलेली मंजूरी | | | द्यावयाची सुधारित मंजूरी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अकुशल | कुशल | एकुण | अकुशल | कुशल | एकूण |
| ०१ | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे **(लेबर कॉन्ट्रॅक्टर)** | ६६९ | २२३ | ८९२ | ४१५ | १६९ | ५८४ |
| ०२ | मे.मॉडर्न फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे **(लेबर कॉन्ट्रॅक्टर)** | ४०४ | ४८८ | ८९२ | २०९ | ४५७ | ७४७ |
| | **एकूण -** | **१०७३** | **७११** | **१७८४** | **६२४** | **६२६** | **१३३१** |

परिशिष्ट–अनुसार, सुधारित कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी मंजुरीबाबत उपरोक्त मधील संबंधित कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांना लेखी पत्राव्दारे कळविता येईल, असे मत आहे.

**क) सद्यस्थिती -**

**(१)** सदरचा विषय मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आला होता, त्यावर **निर्णय क्र.२७७**मध्ये, " .. .. आजचे सभेच्या अजेंडयावरील विषय न.०१,०२,४३ व ६३ या विषयांवरील एकत्रित निर्णय क्र.२३५ सदर इतिवृत्ताचे शेवटी परिशिष्ट 'अ' म्हणून जोडलेला आहे ." असे नमूद करणेत आलेले आहे.

**निर्णय क्रमांक २३५ मधील अ.नं. ३८ मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे -**

*" .. .. So far as 598 employees to whom appointment order was issued by the then Chief Executive Officer is concerned, the concerned department of the Trust has not come up with a clear picture before this Committee. The fate of the Agreement, which the Trust had with the Contractors, is in limbo. The concerned department now want that this Committee to take up decision on Subject No. 43 listed on the Agenda of today's meeting. Unless comprehensive decision is taken as to regularisation/appointment of 598 employees on contract basis directly by the Trust or otherwise, as well as decision on the agreement, which Trust had with the Contractors, such request in subject No. 43 cannot be considered. The Trust is at liberty to submit detailed proposal in this regard before this Committee along with entire correspondence with the State Government and decisions taken by erstwhile committee. "*

**तक्ता क्र. ०३**

<table>
<tr><th>अ.नं.</th><th>कंत्राटदाराचे नाव</th><th>दि. ०१ जानेवारी, २०२० अखेर कर्मचारी मंजूरी</th><th>कायम कंत्राटीकडे वर्ग</th><th>प्रत्यक्ष कामावर / द्यावयाची सुधारीत मंजूरी</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>०१</td><td>मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे</td><td>८९२</td><td>३०८</td><td>५८४</td><td>--</td></tr>
<tr><td>०२</td><td>मे.मॉडर्न फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे</td><td>८९२</td><td>१४५</td><td>७४७</td><td>--</td></tr>
<tr><td>०३</td><td>मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी, पुणे(मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हि. मुंबई)</td><td rowspan="2">८१५</td><td rowspan="2">१४५</td><td>३५३</td><td rowspan="2">संरक्षण विभागा कडील कायम कंत्राटीकडे १४५ कर्मचारी वर्ग केल्यामुळे ६७० कर्मचारी मंजूरी ऐवजी ६९४ (३५३+३४१) म्हणजे २४ जादा कर्मचारी कार्यादेश दिलेला आहे.</td></tr>
<tr><td>०४</td><td>मे.ईगल हंटर सोल्युशन लि. दिल्ली (मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हि. मुंबई)</td><td>३४१</td></tr>
<tr><td colspan="2">एकूण -</td><td>२५९९</td><td>५९८</td><td>२०२५</td><td></td></tr>
</table>

उपरोक्त नमूद (तक्ता क्र.०३) मध्ये शेरा या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी मे.मॉडर्न विर रेज सिक्युरिटी, पुणे आणि मे. ईगल हंटर सोल्युशन लि., दिल्ली यांना अनुक्रमे ३५३ आणि ३४१ असे एकूण ६९४ कंत्राटी सुरक्षारक्षक व इतर कर्मचारी पुरविणेबाबत कार्यादेश देणेत आलेले आहेत. या कार्यादेशानुसार, संबंधित कंत्राटदार दिनांक ०१ मार्च, २०२० पासून कंत्राटी सुरक्षा रक्षक संरक्षण विभागास पुरवित आहेत. तसेच या मंजूर संख्येनुसारच त्यांचेशी करारनामा करणेत आलेला आहे.

**(२)** सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक ०२ जानेवारी, २०२० अन्वये, संस्थानकडील कर्मचारी कंत्राटदारामार्फत कामावर असलेल्या ५९८ कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी पध्दतीने नेमणूका देण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये संरक्षण विभागाकडील १४५ कर्मचा-यांचा समावेश आहे.

**संरक्षण विभागाकडील प्रत्यक्षात १४५ कंत्राटी कर्मचारी यांना संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूका देणेत आलेल्या आहेत. तथापि, संरक्षण विभागाने दिनांक १७ फेब्रुवारी, २०२० रोजीचे पत्रानुसार, प्रस्तावित दर्शन रांग व इतर कामाचे पॉईट वाढणार असल्याने १४५ पॉईट कमी करणेऐवजी १२१ कर्मचा-यांचे पॉईट कमी करणेबाबत पत्र दिलेले आहे. त्यामुळे दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी देणेत आलेल्या नवीन कार्यादेशात २४ पॉईटची मंजूर जादा दिसून येत आहे. तसेच कंत्राटी कर्मचारी मंजूरी देतांना, त्यामध्ये कामाचे पॉईट, आठवडा सुट्टी सोडविणेकामी द्यावयाचे कर्मचारी, शिफ्ट या सर्व बाबींचा विचार करुन मंजूरी देणेत येत असते. सध्या नविन दर्शन रांग प्रकल्प व नविन शैक्षणिक संकुल प्रकल्प इत्यादी ठिकाणी सुरक्षेकामी बरेच पॉईट वाढणार असल्याने सध्या २४ अतिरिक्त पॉईटची मान्यता घेण्यात आलेली आहे, प्रत्यक्षात कुठल्याही प्रकारचे नविन कर्मचारी लावणेत आलेले नाहीतआणि प्रत्यक्षात प्रतिदिनी कामावर हजर असलेल्या सुरक्षा रक्षकांची पटसंख्या मंजूरीपेक्षा कमी आहे.**

संस्थान आस्थापनेमार्फत दिनांक ०२ जानेवारी, २०२० रोजी, शासन निर्णयानुसार आजमितीस कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना कंत्राटी पध्दतीने नेमणूका देणेत आलेल्या आहेत. सदर कर्मचारी हेसंस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणारे कंत्राटदार यांचेकडील असल्याने, प्रत्यक्षात मंजूरीचे संख्येतून सदर कंत्राटी कर्मचारी संख्या कमी होवून,ज्याविभागातील कंत्राटी कर्मचारी यांना संस्थान कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूक आदेश दिलेले आहेत,तेवढी कर्मचारी संख्या, कामाचे पॉईट कमी झालेले आहेत.

**(ड) प्रस्ताव -**

**१)** कंत्राटी कर्मचारी पुरविणेचा ठेका मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे यांना कामगार विभागाकडील जावक क्रमांक एसएसएस/वशी-७ए/२३०४/२०१९, दि.१३ सप्टेंबर, २०१९ नुसार कार्यादेश दिलेला आहे. सदर ठेक्याचा कालावधी दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२०अखेर पर्यंत आहे. मात्र सदर ठेकेदाराकडील ३०८ कंत्राटी कामगार दि.०२.०१.२०२० च्या आदेशान्वये कायम कंत्राटी म्हणून संस्थान आस्थापनेकडे वर्ग झालेले आहेत. त्यामुळे त्यांचेकडे फक्त ५८४ कर्मचारी मंजूरी आवश्यक आहे व त्यानुसार सध्या त्यानुसार ते कर्मचारी पुरवित आहेत. मात्र ठेकेदाराच्या करारनाम्यात व पुरवठा आदेशात कर्मचारी मंजूरी ८९२ ऐवजी ५८४ करणेसाठी त्यामध्ये दुरुस्ती करावी लागेल.

**२)** कंत्राटी कर्मचारी पुरविणेचा ठेका मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांना कामगार विभागाकडील जावक क्रमांक एसएसएस/वशी-७ए/२३०५ /२०१९, दि.१३ सप्टेंबर, २०१९ नुसार कार्यादेश दिलेला आहे. सदर ठेक्याचा कालावधी दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२०अखेर पर्यंत आहे. मात्र सदर ठेकेदाराकडील १४५ कंत्राटी कामगार दि.०२.०१.२०२० च्या आदेशान्वये कायम कंत्राटी म्हणून संस्थान आस्थापनेकडे वर्ग झालेले आहेत. त्यामुळे त्यांचेकडे फक्त ७४७ कर्मचारी मंजूरी आवश्यक आहे व त्यानुसार सध्या त्यानुसार ते कर्मचारी पुरवित आहेत. मात्र ठेकेदाराच्या करारनाम्यात व पुरवठा आदेशात कर्मचारी मंजूरी ८९२ ऐवजी ७४७ करणेसाठी त्यामध्ये दुरुस्ती करावी लागेल.

**३)** कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरविणेसाठी मे.सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हिसेस, मुंबई कामगार विभागाकडील जावक क्रमांक एसएसएस/वशी-७ए/६५०/२०१८, दि.०८.०६.२०१८ नुसार ८१५ सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेबाबत दिलेले आहेत. सदर ठेक्याचा कालावधी दि.१०.०६.२०१८ ते दि.२९.०२.२०२० अखेर पर्यंत होता. तदनंतर मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी, पुणे व मे. ईगल हंटर सोल्युशन लि.दिल्ली यांना दि.०१.०३.२०२० पासून नव्याने कार्यादेश विभागून देणेत आलेला आहेत. यामध्ये संरक्षण विभागाकडे १४५ कंत्राटी कामगार दि.०२.०१.२०२० च्या आदेशान्वये कायम कंत्राटी म्हणून संस्थान आस्थापनेकडे वर्ग झालेले आहेत. तथापि, संरक्षण विभागाकडे १४५ कामगार संख्या कमी करणेऐवजी वर नमुद केलेप्रमाणे २४ पॉईंट

वाढल्याने १२१ कामगारांची संख्या कमी करुन त्यांना ६९४ कामगार पुरविणेबाबतचा आदेश मे.मॉडर्न विर रेस सिक्युरिटी, पुणे यांना ३५३ व मे. ईगल हंटर सोल्युशन लि.दिल्ली यांना ३४१ या प्रमाणे देण्यात आलेला आहे. त्यानुसारच करारनामा केलेला आहेआणि त्या प्रमाणे कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरवित आहेत.

४) उपरोक्त मुद्दा क्र.१ मध्ये नमूद एजन्सी/ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांनी दि.०३.०७.२०२० च्या पत्रानुसार त्यांचेकडील कर्मचारी मंजूरी ८९२ मधून ३०८ कर्मचारी मंजुरी कमी करुन ५८४ करणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच उपरोक्त मुद्दा क्र.०२ मध्ये नमूद मे.मॉडर्न फॅसेलिटी मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांनी दि.०३.०७.२०२० च्या पत्रान्वये त्यांचेकडील कामगार मंजूरी ८९२ मधून १४५ कामगार मंजूरी कमी करुन ७४७ करणेबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे मुद्दा क्र.१,२ व ४ प्रमाणे कार्यवाही करण्यास आणि अ.नं.३ प्रमाणे केलेल्या कार्यवाहीस मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६०** **समितीचे सदस्य १) मा.श्री.श्रीकांत ल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर, २) मा.श्री.दिलीप स्वामी, अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक ३) मा.श्रीमती गीता बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी चर्चेअंती खालील निर्णय घेतला.**

**This subject was discussed in detail and each member has expressed views.**

**This Committee, while deciding Subject Nos. 1, 2, 43 and 63 on the agenda of the Ad-hoc Committee Meeting dt. 11.05.2020, has thoroughly examined the entire record of the Trust, the scheme of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004 and the powers of the Chief Executive Officer to appoint employees.**

**This Committee has already found that the then Chief Executive Officer could not have appointed employees directly on the Sansthan on contract basis because such power is vested with the Committee constituted under section13(4) of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004. Since such appointment on contract basis is a policy decision, it ought to have been presented before the Ad-hoc Committee, constituted by Hon'ble High Court.**

**This Committee has also found that the Sansthan has failed to follow the Government Resolution dt. 07.08.2009, more particularly the terms and conditions under which the said staffing pattern (आकृतीबंध) was approved. The Committee has also found that while issuing Government Resolution dt. 17.09.2019, the Government has called upon the Sansthan to follow Government Resolution dt. 07.08.2009 of which the reference is found at serial no.2 under the caption "वाचा".**

**It is not the case of Sansthan before this Committee that Committee has followed Government Resolution dt. 07.08.2009 by preparing service rules, qualification of entry, promotion etc. In fact Committee has been constituted for preparation of such rules and even this Ad-hoc Committee has given extention to the said Committee to complete the remaining work. In the above background, therefore, the appointment orders issued by the then Chief Executive Officer (Shri. Deepak Muglikar) is a piece of paper and cannot be termed as an order under the authority of the Committee as invisaged under section13(4) of the Act.**

**Some of the members of this Committee tried to suggest that ex-post facto approval could be granted to the said order. However, on thorough examination of this proposal, the Committee is unanimous in refusing to grant such ex-post facto approval, more particularly when Government Resolution dt. 07.08.2009 has not been followed by the Trust. In addition to it, giving such ex-post facto sanction for such acts would be protecting the illegality and therefore, should not be approved at the hands of Ad-hoc Committee.**

**Consequently, the Ad-hoc Committee has unanimously resolved to cancel and setaside all the appointment orders issued to 598 employees with effect from 31st July, 2020. This is in the light of the fact that due to Covid-19 situation the Committee has resolved to pay exgratia amount i.e. 50% of the salary to those 598 employees who were earlier working through the contractor. Therefore, the said employees are not likely to be financially affected.**

**The Committee has also resolved to extend liberty to the Sansthan to submit proposal in this regard as per their choice after due study of various Government Resolutions issued by the Government.**

**समिती सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.अरुण डोंगरे, (भा.प्र.से.) यांनी त्यांचे वस्तुस्थितीवर आधारीत खालील मत मांडले.**

**राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय दि.१७.०९.२०१९ अन्वये ठेकेदाराचे आस्थापनेवरील एकुण ६३५ कर्मचाऱ्यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूकीस मान्यता दिलेली आहे.**

**उपरोक्त शासन निर्णयान्वये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सद्यस्थितीत पात्र ५९८ कर्मचाऱ्यांना संस्थान आस्थापनेवर कंत्राटी स्वरुपात दि.०२.०१.२०२० रोजी नेमणूक दिलेली आहे. सदर नेमणूक ही शासन निर्णयाचे निर्देशानुसार करण्यात आली आहे. तरी सदर आदेशांना कार्योत्तर मान्यता देणे योग्य राहील.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन/कामगार विभाग)**

---

**विषय नं.०७** **श्री.विलास पंढरीनाथ वैद्य, नायब तहसिलदार, उप विभागीय अधिकारी कार्यालय,शिर्डी भाग,शिर्डी यांचा निवासासाठी संस्थान निवासस्थानामधील एक सदनिका/फ्लॅट मिळणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री.विलास पंढरीनाथ वैद्य, यांनी दि.०५/०६/२०२० रोजीचे अर्जाने मी,नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, शिर्डी उपविभाग शिर्डी येथे मार्च, २०२० पासून कार्यरत आहे. माझी निवासाची व्यवस्था अद्याप झालेली नाही. तरी साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या सदनिकेमधून मला कुटूंबासाठी एक सदनिका/ फ्लॅट मंजूर होणेस विनंती आहे. सदर सदनिका/फ्लॅटचे मासिक भाडे भरण्यास मी तयार आहे, अशी विनंती केली आहे.

तसेच, सदर अर्जाचे अनुषंगाने, उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांनी क्र.कावि/आस्था/ २४०/२०२० दि.०५/०६/२०२० रोजीचे पत्राने श्री. विलास पंढरीनाथ वैद्य, नायब तहसिलदार हे आपल्या कार्यालयाकडून येणारे मासिक भाडे भरण्यास तयार आहे. तरी संस्थानमधील एक सदनिका / फ्लॅट मंजूर व्हावा, असे कळविले आहे.

**अ)** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील **निर्णय क्र.५९८** व दि.०७/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६६७ अन्वये, खालील पदनामाच्या शासकीय अधिकाऱ्यांना शासनाकडून मिळत असलेले प्रतिमहा घरभाडे भत्ता व नियमाप्रमाणे होणारा विद्युत आकार संस्थानकडे जमा करेणेचे अटीवर उपलब्धतेनुसार निवासासाठी संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच या पदनामाच्या अधिका-यांची इतरत्र बदली झाल्यास त्यांचेकडून त्वरीत निवासस्थान खाली करुन घेण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे.

१. पोलीस इन्स्पेक्टर, शिर्डी. २. मुख्याधिकारी, नगरपंचायत शिर्डी.
३. तहसिलदार, राहाता. ४. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी.
५. उपविभागीय पोलीस अधिकारी,शिर्डी. ६. पोलीस निरिक्षक, वाहतूक शाखा, शिर्डी पोलीस स्टेशन.
७. पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा. ८. राज्य गुप्तवार्ता अधिकारी

उपरोक्त निर्णयास अनुसरुन वर नमूद शासकीय अधिका-यांना वेळोवेळी शासनाच्या मान्यतेने संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देणेत आलेली असून, सध्या खालील पदनामाचे शासकीय अधिकारी संस्थान निवासस्थानात राहत आहे.

| **अ.नं.** | **अधिकारी / कर्मचारी** | **देण्यात आलेले निवासस्थान** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| ०१ | श्री. सतिष दिघे, मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | साईसहवास - ०२/०२ |
| ०२ | श्री. गोविंद पंढरीनाथ शिंदे, उप विभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी | साईसहवास ०३/०२ |
| ०३ | श्री. एन.एन. गोकावे, पोलीस निरिक्षक, शहर वाहतुक नियंत्रण शाखा, शिर्डी | साईसहवास - ०३/०३ |
| ०४ | श्री. सोमनाथ फकिरा वाघचौरे, उप विभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी विभाग, शिर्डी, | साईसहवास - ०४/०१ |
| ०५ | श्री. जी.आर. औताडे, पोलीस निरिक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी | साईसहवास ०४/०४ |
| ०६ | श्री.निलेश जगन्नाथ लहामगे, सहा. गुप्तवार्ता अधिकारी, राज्य गुप्तवार्ता विभाग | साईध्यान - २/३७ |

**नायब तहसिलदार या पदनामाचे** शासकीय अधिकारी यांना यापुर्वी निवासासाठी संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. तसेच सदर पदनामाचा वर नमूद शासकीय अधिका-यांमध्ये समावेश नाही.

**ब)** तसेच, मा. शासनाचे दि.१४ जुलै, २०१६ रोजीचे पत्रातील निर्देशानुसार संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७ (३) नुसार भविष्यात संस्थानच्या मालकीची निवासस्थाने संस्थान अधिकारी / कर्मचारी यांच्याखेरीज अन्य कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांना भाडेतत्वावर अथवा ११ महिन्यांच्या कराराने अथवा Leave & License तत्वावर अशा कोणत्याही स्वरुपात शासन मान्यतेशिवाय देण्यात येऊ नयेत, संस्थानची निवासस्थाने भाडेतत्वावर द्यावयाची झाल्यास त्याकरीता प्रथम शासनाची मान्यता घ्यावी, असे निर्देश दिलेले आहेत.

मा. शासनाचे उक्त निर्देशानुसार परिच्छेद 'अ' मध्ये नमूद शासकीय अधिकारी यांना शासनाचे पुर्व मान्यतेने त्यांना शासनाकडून मिळत असलेले प्रतिमहा घरभाडे भत्ता व नियमाप्रमाणे होणारा विद्युत आकार संस्थानकडे वेळेच्या - वेळी जमा करेणेचे अटीवर संस्थान निवासस्थाने उपलब्धतेनुसार निवासाकरीता उपलब्ध करुन देणेत येत आहे.

**क)** संस्थानकडे उपलब्ध असलेले अधिकारी निवासस्थानची संख्या ही मर्यादीत असून संस्थान रुग्णालयाकडील बरेच वैद्यकीय अधिकारी निवासस्थान उपलब्धते अभावी अद्याप प्रतिक्षायादीवर आहेत. उपरोक्त परिच्छेद 'अ' व 'ब' मध्ये नमूद बाबींचा विचार करता, श्री. विलास पंढरीनाथ वैद्य, नायब तहसिलदार, उप विभागीय कार्यालय, शिर्डी भाग शिर्डी यांना संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन देता येत नाही.

तथापी, श्री. विलास पंढरीनाथ वैद्य, नायब तहसिलदार, उप विभागीय कार्यालय, शिर्डी भाग शिर्डी यांना त्यांचे दि.०५/०६/२०२० रोजीचे विनंती अर्जानुसार निवासासाठी भाडेतत्वावर संस्थान निवासस्थान उपलब्ध करुन द्यावयाचे झाल्यास त्यासाठी सदर प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे मान्यतेने मा. शासनाचे दि.१४ जुलै, २०१६ रोजीचे पत्रातील निर्देशानुसार शासनाची पुर्व मान्यता घेणेसाठी मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करावा लागेल, असे मत आहे.

तरी, सदरच्या प्रस्तावावर योग्य तो उचित निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३६१** **सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन)**

---

**विषय नं.०८** **श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत**.

**प्रस्ताव-** A) विषयाची पुर्वपिठका:-

श्री.संगमनेरे हे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सहा.शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. ते दि.१५.०२.२०२० रोजी कर्तव्यावर होते. दि.१८.०२.२०२० पासुन इ.१२ वी.च्या बोर्ड परिक्षा सुरु होणार असल्याने व सदर परिक्षेचे केंद्र आपल्या महाविद्यालयात असल्याने त्या संदर्भात नियोजन करण्यासाठी दि.१५.०२.२०२० रोजी सकाळी ११.०० वा.कनिष्ठ महाविद्यालयाकडील सर्व सहा.शिक्षकांची सभा आयोजीत करण्यात आलेली होती. त्याबाबत सर्व शिक्षकांना अगोदर कळविणेत आलेले होते. मात्र श्री.संगमनेरे हे सभेच्या नियोजीत वेळेत सभेस हजर न राहता सभा सुरु झालेनंतर १५ मि. ते २० मि.उशिराने सभेस आलेत. श्री.संगमनेरे हे सभेमध्ये आलेत त्यावेळी परिक्षा नियोजनाबाबत चर्चा चालु होती. मात्र ते सभेस उशिराने येवुन मध्येच बोललेत

कि,"१२ वी.ची परिक्षा कधीपासुन सुरु होत आहे, मला माहित नाही." मुळात सर्व शिक्षकांना व विद्यार्थ्यांना वेळापत्रकाचे वाटप करण्यात आलेले होते.तसेच सर्व शिक्षकांना परिक्षकाचे कामकाजाचे वेळापत्रक देखील देण्यात आलेले होते. त्यामुळे त्यांचे सारखे जबाबदार शिक्षकाने सदरचे विधान करणे योग्य नव्हते.तसेच त्यांना सभेस उशिरा का आले असे विचारणा केली असता,"मला कुणी सभेचे सांगीतले नाही"असे म्हणाले व सर्व शिक्षक वेळेवर सभेस उपस्थित होते.

सदरची सभा ही इ.१२ वी.च्या परिक्षा संदर्भात असतांना त्यांनी मध्येच गोपनीय अहवालाचा मुद्दा उपस्थित केला कि," गोपनीय अहवाल दोन किंवा तीन व्यक्तीच्या हस्ताक्षरात कसे असतात, गोपनीय अहवाल कोण लिहीतात ती माहिती सर्वासमोर सांगा." अशी अवास्तव मागणी केली. गोपनीय अहवाल लिहितांना त्यावर विभाग प्रमुख व प्रशासकिय अधिकारी असे दोन हस्ताक्षर असतात.मात्र गोपनीय अहवालाबाबत सर्वासमोर बोलणे उचित नसते. तसेच त्यांनी सभेमध्ये मुळ विषय बोलण्यापेक्षा इतर नको ते मुद्दे उपस्थित करुन सभेच्या पर्यायाने प्रशासकिय कामकाजात अडथळा आणला.तसेच पुर्ण सभेच्या कालावधीत ते अत्यंत चिथावणीखोरवर्तन करत होते. तसेच इतर शिक्षकांना प्रशासनाच्या विरुध्द भडकविण्याचा प्रयत्न करत असल्याचे निदर्शनास आले आहे.

श्री.संगमनेरे हे नेहमीच प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाचे विरोधात वर्तन करत असतात, श्री.संगमनेरे हे इतर शिक्षकांना भडकविणे, चिथावणीखोर वक्तव्य करुन प्रशासन व विभागाकडील वातावरण कलुषित करणे, बेजबाबदारपणाने वागणे असे कृत्य करत असतात. त्यांचे अशा वागण्यामुळे दैनंदिन शालेय व प्रशासकिय कामकाजात मोठया प्रमाणात अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

त्यांनी उपरोक्त गैरशिस्तवर्तनामुळे दि.१५.०२.२०२० चे सभेत मुळ विषयास बगल देऊन, इतर आवंतर विषयांवर चर्चा होऊ लागलेली होती.त्यामुळे इ.१२ वी.च्या अत्यंत महत्वाच्या बोर्ड परिक्षेच्या नियोजनाकरीता जादा वेळ खर्ची पडला. त्यामुळे इतर शिक्षकांना त्यांचेमुळे प्रशासनाचे विरोधात विथावणी मिळाली.

असे त्यांचे विरुद्ध प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडून कर्मचारी गैरवर्तनाबाबत रिपोर्ट आलेला आहे. त्यांचे सदरचे कृत्य गंभिर गैरशिस्त वर्तनात मोडते.

श्री.संगमनेरे व श्री.अनाप यांना द्यावयाचे कारणे दाखवा नोटीसीबाबत इकडील दि.२६.०२.२०२० रोजीचे टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती. सदरचे टिपणीवर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी,"Call the Personally" असे निर्देश दिलेले होते.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशास अनुसरुन श्री.वरघुडे,प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना दि.०४.०३.२०२०, दि.१०.०३.२०२०, दि.११.०३.२०२० रोजी श्री.वरघुडे,प्राचार्य, श्री.संगमनेरे व श्री.अनाप यांना मुख्य कार्यकारी अधिकारी कक्ष येथे सकाळी १०.०० वा. हजर राहणेबाबत दुरध्वनीद्वारे कळविणेत आलेले होते

त्यास अनुसरुन दि.११.०३.२०२० रोजी सकाळी १०.०० वा.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षेत श्री.वरघुडे,प्राचार्य व श्री.अनाप हजर होते व श्री.संगमनेरे हे गैरहजर होते.

दि.२६.०२.२०२० रोजीचे टिपणीवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी," १) अनाप हजर त्यांचे म्हणणे परत घेणे.अनाप यांना किरकोळ शिक्षा का करण्यात येऊ नये अशा आशयाची Show cause Notice काढा.२) संगमनेरे गैरहजर, पुर्वकल्पना न देता गैरहजर.श्री.संगमनेरे यांना निलंबीत का करण्यात येऊ नये अशी नोटीस काढा."असे निर्देश दिलेले आहेत.

**B) श्री.संगमनेरे यांना देणेत आलेली नोटीस व त्यांनी केलेले खुलासे:-**

उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत श्री.संगमनेरे यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२८२५/२०२०, दि.१७-०३-२०२० अन्वये लेखी खुलासा मागविणेत आला होता. **अ)** त्यास अनुसरुन श्री.संगमनेरे यांनी दि.१९-०३-२०२० रोजीचा लेखी खुलासा सादर केला आहे. त्यात त्यांनी," उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार मला कारणे दाखवा नोटीस दि.१९.०३.२०२० रोजी प्राप्त झालेली आहे.सदर नोटीस काढण्यासाठी मुख्याध्यापक, श्री साईबाबा कन्या विदया मंदिर व कनिष्ठ महा विद्यालय यांनी जो रिपोर्ट केला आहे त्याची साक्षांकित प्रत मिळावी म्हणजे मला त्या नोटीसीचा खुलासा करता येईल." असे म्हटलेले आहे.

सदर लेखी खुलाशा प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, यांचेमार्फत पाठविलेला नसुन श्री.संगमनेरे यांनी दि.१९.०३.२०२० रोजीचा अर्ज इकडील आवक विभागास दिलेला आहे.

श्री.संगमनेरे यांनी दि.१९.०३.२०२० रोजीचे विनंती अर्जाबाबत इकडील दि.२१.०३.२०२० रोजीची टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती.सदरचे टिपणीवर,"प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व

कनिष्ठ महाविद्यालय यांनी सादर केलेल्या कर्मचारी गैरवर्तन रिपोर्टमधील सर्व मुद्दे कारणे दाखवा नोटीसीत नमुद आहे.त्यामुळे पुन्हा रिपोर्ट देण्याची आवश्यकता वाटत नाही." असे निर्देश दिलेले आहे.

**ब)** **तदनंतर** श्री.संगमनेरे यांनी दि.२३-०३-२०२० रोजीचा लेखी खुलासा सादर केला आहे. त्यात त्यांनी," उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार मी लेखी मुद्देनिहाय खुलासा खालीलप्रमाणे सादर करतो की,

**१)** मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात दि.११.०३.२०२० रोजी सकाळी १०.०० वा.हजर राहणेबाबतचा कोणताही निरोप मला मा.मुख्याध्यापक श्री.व्ही.जी.वरघुडे सर यांचेकडुन न मिळाल्यामुळे मी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात उपस्थित राहू शकलो नाही.म्हणून मी प्रथमत: मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांची क्षमा मागतो.

**२)** दि.११.०३.२०२० रोजी माझ्या नातलगाचे धार्मिक कार्य (लग्न समारंभ) (सोबत लग्नपत्रीका) असल्याने मी दि.०९.०३.२०२० रोजी कर्तव्यावर हजर असतांना दि.११.०३.२०२० रोजीचा रजा अर्ज कनिष्ठ महाविद्यालयात कार्यालयातील मा.वरिष्ठ लिपीक यांचेकडे रितसर सादरही केलेला आहे. दि.११.०३.२०२० रोजीच्या माझ्या रजेची मस्टरला नोंदही झालेली आहे. (सोबत रजा अर्जाची झेरॉक्स प्रत).

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर करण्यात आलेल्या दि.२६.०२.२०२० रोजीच्या टिपणीनुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी Call the Personally असे निर्देश दि.०४.०३.२०२०, दि.१०.०३.२०२० नुसार मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात मला दि.११.०३.२०२० रोजी सकाळी १०.०० वा. हजर राहणेबाबत कळविणेस सांगीतले होते. परंतु मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी मला याबाबत कळविले नाही किंवा निरोपही दिला नाही. मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी मला सदरचा अति महत्वाचा निरोप दिला नाही.मला सदरचा निरोप मिळाला असता तर मी कोणत्याही परिस्थितीत माझ्या धार्मीक कार्यासाठी न जाता वेळेत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात उपस्थित असतो.

**३)** **शिक्षक सभेस मी उशिरा आलेबाबत :-**

दि.१५.०२.२०२० रोजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात सकाळी ११.०० वा.शिक्षक सभा आयोजीत करण्यात आली होती.सदरची सभा ही सकाळी ११.१० वा. सुरु झाली.मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी सभेमध्ये इ.१२ वी च्या परिक्षांचे नियमांचे वाचन करुन सभेला सुरुवात केली. त्यामुळे मी सभेस उशिराही आलेलो नाही व मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी मला कोणतीही उशिरा आल्याची विचारणाही केली नाही. त्यांनी परिक्षेचे वेळापत्रक व तक्ता हा सभा संपत आलेनंतर सर्व सहाय्य शिक्षकांना वाटण्यात आला. मी सन मार्च २०१७ मध्ये इ.१२ वीच्या परिक्षेसाठी उपकेंद्र संचालक म्हणून कामही केलेले आहे.परीक्षे संदर्भातील जबाबदारी व कर्तव्याची मला जाणीव आहे.

**४)** **गोपनीय अहवालाचा मुद्दा उपस्थित केलेबाबत :-**

इ.१२ वीचे परीक्षेचे कामकाज अंतर्गत मूल्यमापनाचा भाग असल्याने त्या परीक्षेच्या कामाची नोंद गोपनीय अहवाल श्रेणी देताना विचारात घ्यावी लागते. मागील गोपनीय अहवालातील श्रेणी देताना मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांचेकडुन भेदभाव झालेला होता, अशी सभेमध्ये चर्चा झाली.मी स्वंत: गोपनीय अहवालाचा मुद्दा या सभेत उपस्थित केलेला नाही व गोपनीय अहवाल कोण लिहितात, हे सर्वासमोर सांगा असेही मी कदापिही म्हणालो नाही.

**५)** **इतर सहाय्यक शिक्षकांना प्रशासनाविरुध्द भडकाविल्याबाबत :-**

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असणारे सर्व सहाय्यक शिक्षक हे माझ्यापेक्षा ज्येष्ठ व अनुभवी आहे.त्यांचेजवळ उत्तम शैक्षणिक अर्हता आहे.प्रशासनाचे नियम, सेवा शर्ती इ. ची त्यांना चांगली माहिती आहे. तसेच त्यांना चांगले आणि वाईट याचीही जाण असून स्वंत:चे त्यांना मत आहे. त्यामुळे मी सभेतील वातावरण कलुषीत केले, त्यांना भडकाविले, चिथावले असे जे मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी वरिष्ठांना कळविले आहे ते अयोग्य आहे.

**६)** **बेजबाबदारपणाच्या कृत्याबाबत :-**

मी वेळोवेळी प्रशासनाने दिलेल्या आदेशाचे जबाबदारीने व काटेकोरपणे पालन करीत आलेलो आहे.गेली २ वर्षापासुन मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी नेमून दिलेली सर्व कामे मी वेळेत व जबाबदारीने पुर्णही केलेली आहेत. त्यामुळे मी कुठेही बेजबाबदारपणे वर्तन केलेले नाही. माझे मागील वर्षाचे सर्व गोपनीय अहवालही चांगले आहेत. माझे मागील वर्षाचे इ.१२ वी या वर्गाचे Book Keeping & Accountancy या

विषयाचे निकालही उत्तम लागलेले आहेत. माझे अनेक विद्यार्थी सी.ए., सी.पी.टी. परीक्षेसाठी पात्रही ठरलेले आहेत.

**७) गैरवर्तनाबाबत :-**

दि.०३.०३.२०२० रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे यांचे सभेनुसार मी इ.१२ वीच्या Book Keeping & Accountancy या विषयाच्या परीक्षेकरीता नियामक (Moderator) म्हणून कामही करत आहे. माझ्याकडे १८०० ते २००० इतके पेपर मॉडरेट करणेसाठी आलेले आहेत. ते मला पुणे बोर्डात वेळेत सादर करावयाचे आहेत. परीक्षेसंदर्भात असलेले नियम व कर्तव्याची मला पुर्ण जाणीव आहे. सोबत शिक्षक सभेत उपस्थित असलेल्या सहाय्यक शिक्षक/शिक्षिका/शिक्षकेतर यांचा अभिप्राय/मत जोडले आहे.

**८) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३(१) बाबत:-**

मी संस्थान सेवेत संपूर्ण प्रामाणिकपणानेच काम केलेले आहे. तसेच संस्थानच्या सेवेशी एकनिष्ठही राहिलेलो आहे व मी संस्थान कर्मचा-याला न शोभणारे कृत्यही केलेले नाही व यापुढेही करणार नाही. त्यामुळे मी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३(१) चे कोणतेही उल्लंघन या सभेत केलेले नाही.

प्रशासनाचा माझ्यामुळे वेळ विनाकारण खर्ची पडला, याबद्दल मी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांची माफी मागतो.मी श्री साईबाबांच्या तत्वांचे पालनही करतो व नेहमी आचरणातही आणतो.

तरी मे.साहेबांनी मी वरिलप्रमाणे केलेल्या खुलाशाचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन मला या नोटीसीतून मुक्त करावे ही नम्र विनंती आहे." असे म्हटलेले आहे.

श्री.संगमनेरे यांनी दि.२३.०३.२०२० रोजीचा उपरोक्त खुलासा प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, यांचेमार्फत पाठविलेला नसुन, त्यांनी दि.२४.०३.२०२० रोजीचा अर्ज इकडील सामान्य प्रशासन शाखा, आवक विभागास दिलेला आहे.

**क)** आता, पुन्हा श्री.संगमनेरे यांनी दि.०७-०४-२०२० रोजीचा लेखी खुलासा सादर केला आहे. त्यात त्यांनी,"उपरोक्त संदर्भीय पत्रानुसा मला मिळालेल्या नोटीसीचा लेखी मुद्देनिहाय खुलासा दि.२३.०३.२०२० रोजी सादरही केलेला आहे. परंतु काही कागदपत्रे तांत्रिक अडचणीमुळे खुलाशा सोबत वेळेत सादर करता आली नाही. ती माहिती सदरच्या पत्राने आपणाकडे सविनय सादर करीत आहे.

**मुद्दा क्रं.१:-** माझ्या भ्रमणध्वनीवर दि.०४.०३.२०२०, दि.१०.०३.२०२० व दि.११.०३.२०२० रोजीचे जे इनकमिंग कॉल आलेले आहेत, परंतु त्यात मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी कोणताही निरोप मला दिलेला नाही, त्याची झेरॉक्स प्रत.

**मुद्दा क्रं.२:-** माझा रिपोर्ट करण्याचे मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांचे कारण म्हणजे मी दि.२२.०७.२०१९ रोजी माहितीच्या अधिकारान्वये श्री.विकास महादेव शिवगजे, सहाय्यक शिक्षक, यांचे विषयी दि.१५.१२.२०१६ व दि.३०.०६.२०१७ रोजी मी व काही सहाय्यक शिक्षकांनी तक्रार केलेली होती. त्या तक्रारीवर सुनावणीही झालेली होती. परंतु मला दि.९ ऑगष्ट २०१९ रोजीचे मिळालेल्या माहिती अधिकाराच्या अहवालात श्री.विकास महादेव शिवगजे, सहाय्यक शिक्षक यांच्यावर प्रशासनाकडून पुढील कार्यवाही केल्याचे आढळुन येत नाही, ही माहिती मिळाली. सदर माहिती मागविल्याचा राग मनात धरुन श्री.विकास महादेव शिवगजे,सहाय्यक शिक्षक व मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर या दोघांनी मिळून कट कारस्थान रचुन माझी नियोजनबध्दरित्या वरिष्ठांसमोर रिपोर्ट करुन बदनामी करुन माझेवर अन्याय केलेला आहे.

मे.साहेबांनी माझी वरील माहिती सामान्य प्रशासन शाखा, वशी-शिस्त जा.नं.एसएसएस/वशी-लेखा/२८२५/२०२० दि.१७.०३.२०२० रोजीचे नोटीसीसाठी सदरचे पुरावे लेखी खुलाशासाठी ग्राहय धरून माझेवर झालेला अन्याय दुर करावा, ही विनंती." असे म्हटलेले आहे.

सदर लेखी खुलाशा प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, यांचेमार्फत पाठविलेला नसुन श्री.संगमनेरे यांनी दि.०७.०४.२०२० रोजीचा अर्ज इकडील आवक विभागास दिलेला आहे.

प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये यांना जा.नं.एसएसएस/ साप्रशा / वशी-शिस्त/५०/२०२०, दि.१५-०४-२०२० व जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/९१/२०२०, दि.२८-०४-२०२० रोजीचे पत्रासोबत श्री.संगमनेरे यांनी दिलेले दि.२३.०३.२०२० व दि.०७.०४.२०२० रोजीचे खुलासे स्वंयस्पष्ट अभिप्रायासाठी पाठविणेत आलेले होते.

**C) प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी त्यांचा स्वंयस्पष्ट अभिप्राय:-**

त्यास अनुसरुन प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी त्यांचा स्वंयस्पष्ट अभिप्राय दि.०४.०५.२०२० रोजी इकडील कार्यालयास पाठविलेला असुन, त्यात त्यांनी," **(अ)** श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, यांनी दि.१५.०२.२०२० रोजी इ.१२ वी बोर्ड परिक्षा नियोजन सभेमध्ये केलेल्या गैरवर्तनाबाबत संदर्भ क्र.०१ अन्वये त्यांचा गैरवर्तन रिपोर्ट केलेला होता. तसेच दि.११.०३.२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे समक्ष हजर राहणेबाबत कळविण्यात आलेले असतांनाही ते हजर झालेले नाही. त्याबाबत त्यांना वशी-शिस्त, सामान्य प्रशासन शाखेमार्फत जा.क्र.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२८२५/२०२० दि.१७.०३.२०२० अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावून, सदर नोटीसचा खुलासा मुख्यध्यापकांमार्फत वरिष्ठांकडे सादर करणे अपेक्षित असतांनाही त्यांनी मुख्यध्यापकांमार्फत खुलासा सादर न करता, अ.क्र.०३ अन्वये परस्पर वरिष्ठांकडे खुलासा सादर केलेला आहे. त्याबाबत अ.क्र.०४ चे पत्रान्वये श्री.संगमनेरे यांनी दि.२३.०३.२०२० रोजी सादर केलेल्या खुलाशातील कथनाबाबत मुद्देनिहाय स्वंयस्पष्ट लेखी अभिप्राय प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत सादर करणेबाबत कळविलेले आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | श्री.संगमनेरे यांनी खुलाशात नमुद केलेला मुद्दा | खुलाशाबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय |
|---|---|---|
| ०१. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात दि.११/०३/२०२० रोजी सकाळी १०.०० वाजता हजर राहणेबाबतचा कोणताही निरोप मला मा.मुख्यध्यापक श्री जी.व्ही.वरघुडे सर यांचेकडून न मिळाल्यामुळे मी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात उपस्थित राहू शकलो नाही, म्हणून मी प्रथमतः मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांची क्षमा मागतो. | सामान्य प्रशासन विभागाकडील वशी-शिस्त कक्षाकडून मला दि.०४.०३.२०२० रोजी दुरध्वनीद्वारे कळविण्यात आलेले होते की, मुख्याध्यापक, श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी समक्ष चर्चेसाठी बोलविलेले आहे. मात्र त्याबाबतची दिनांक व वेळ नंतर कळविण्यात येईल. याबाबत सबंधीत शिक्षकांना मी तसेच कनिष्ठ महाविद्यालयाकडील लिपीक यांनी समक्ष सांगितलेले होते.<br>त्यानंतर दि.१०.०३.२०२० रोजी मला पुन्हा कळविण्यात आले की, उद्या दि.११.०३.२०२० रोजी सकाळी १०.०० वा. तुम्ही, श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांच्या कक्षेत हजर राहावे.<br>याबाबत मी लागलीच कनिष्ठ महाविद्यालयाकडील कंत्राटी लिपीक श्री.सचिन कोपरे यांना श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना कळविण्याबाबत सांगितले होते. त्यानुसार कनिष्ठ महाविद्यालयाकडील कंत्राटी लिपीक श्री.सचिन कोपरे यांनी दि.१०.०३.२०२० रोजी त्यांच्या भ्रमणध्वनीद्वारे श्री.संगमनेरे यांना कळविण्याचा प्रयत्न केला असता, त्यांचा फोन लागला नाही. त्यामुळे श्री.कोपरे हे दि.१०.०३.२०२० रोजी रात्रौ.८.३० वा. सुमारास श्री.संगमनेरे यांचे घरी निरोप देण्यासाठी चालले असता, श्री.संगमनेरे सर त्यांच्या मुलीसह कोपरगांव येथील एका बेकरीवर भेटले असता, त्यांना समक्ष भेटून उद्या दि.११.०३.२०२० रोजी सकाळी ०९.३० वा. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात उपस्थित राहणेबाबत कळविलेले होते. मात्र त्यावेळी श्री.संगमनेरे यांनी माझी उद्या सुट्टी आहे, असे सांगितले. याबाबत श्री.कोपरे यांचा लेखी खुलासा घेतलेला |

| | | |
|---|---|---|
| | | आहे.<br>त्यामुळे श्री.संगमनेरे यांचे निरोप न मिळालेबाबतचे म्हणणे हे अत्यंत चुकीचे, खोटे व बिनबुडाचे आहे. ते नेहमीच असे खोटे बोलून, चुकीचे अर्ज करुन, प्रशासनाची दिशाभूल करत असतात. |
| ०२. | दि.११/०३/२०२० रोजी माझ्या नातलगाचे धार्मिक कार्य (लग्न समारंभ) (सोबत लग्नपत्रिका) असल्याने मी दिनांक ०९/०३/२०२० रोजी कर्तव्यावर हजर असतांना दि.११/०३/२०२० रोजीचा रजा अर्ज कनिष्ठ महाविद्यालयात कार्यालयातील मा.वरिष्ठ लिपीक यांचेकडे रितसर सादरही केलेला आहे. दि.११/०३/२०२० रोजीच्या माझ्या रजेची मस्टरला नोंदही झालेली आहे. (सोबत रजा अर्जाची झेरॉक्स प्रत) | सामान्य प्रशासन विभागाकडील वशी-शिस्त कक्षाकडून मला दि.०४.०३.२०२० रोजी दुरध्वनीद्वारे कळविण्यात आलेले होते की, मुख्यध्यापक, श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी समक्ष चर्चेसाठी बोलविलेले आहे. मात्र त्याबाबतची दिनांक व वेळ नंतर कळविण्यात येईल. याबाबत सबंधीत शिक्षकांना मी तसेच कनिष्ठ महाविद्यालयाकडील लिपीक यांनी समक्ष सांगितलेले होते.<br>तरीही श्री.संगमनेरे यांनी दि.०९.०३.२०२० रोजी मला किंवा महाविद्यालयाकडील लिपीक यांना न कळवता परस्पर रजा अर्ज भरुन हजेरी मस्टरमध्ये ठेऊन दिलेला होता. सदर अर्ज मंजुर झाला किंवा नाही, याचा कोणताही विचार न करता, नेहमीप्रमाणे वरिष्ठांचा अपमान करण्याची पंरपरा कायम ठेवत त्यांनी दि.११.०३.२०२० रोजी रजा अर्ज मंजूर नसतानांही परस्पर रजा घेतली.<br>त्यामुळे श्री.संगमनेरे यांनी अर्ज मंजुर नसतांनाही रजा घेतली हेच मुळात गैरवर्तन आहे. तसेच ते नेहमीच अशाप्रकारे वरिष्ठांचा अपमान करत असतात. |
| ०३. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर करण्यात आलेल्या दि.२६/०२/२०२० रोजीच्या टिपनीनुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी Call the Personally असे निर्देश दि.०४/०३/२०२०, दि.१०/०३/२०२० नुसार मा.मुख्यध्यापक श्री. वरघुडे सर यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात मला दि.११/०३/२०२० रोजी सकाळी १०.०० वा. हजर राहणेबाबत कळविणेस सांगितले होते. परंतु मा.मुख्यध्यापक श्री. वरघुडे सर यांनी मला याबाबत कळविले नाही किंवा निरोपही दिला नाही. मा.मुख्यध्यापक श्री. वरघुडे सर यांनी मला सदरचा अति महत्वाचा निरोप दिला नाही. मला सदरचा निरोप मिळाला असता तर मी कोणत्याही परिस्थितीत माझ्या धार्मिक कार्यासाठी न जाता वेळेत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात उपस्थित असतो. | याबाबत उपरोक्त अ.क्र.०१ व ०२ मध्ये नमुद केलेले आहे. तसेच त्यांनी या मुद्यामध्ये सर्व चुकीची माहिती नमुद केलेली आहे. कारण त्यांना महाविद्यालयाकडील कंत्राटी लिपीक श्री.कोपरे यांनी आदल्या दिवशीच समक्ष भेटून दि.११.०३.२०२० रोजी सकाळी ०९.३० वा. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात उपस्थित राहणेबाबत कळविलेले होते. त्यामुळे श्री.संगमनेरे हे अत्यंत खोटे व चुकीचे विधान करुन, प्रशासनाची दिशाभूल करत आहेत. |
| ०४. | **शिक्षक सभेस मी उशिरा आलेबाबत –**<br>दि.१५/०२/२०२० रोजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात सकाळी ११.०० वाजता शिक्षक सभा आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा ही सकाळी ११.१० वा.सुरू झाली. मा.मुख्यध्यापक श्री.वरघुडे सर यांनी सभेमध्ये इ.१२ वी | श्री.संगमनेरे हे सकाळी ११.०० वा. चे सभेस ११.२० वा. उपस्थित राहिले. तसेच सभा चालू असतांना विषय चालु असतांना श्री.संगमनेरे यांना उशीरा येण्याचे कारण विचारले असता, त्यांनी “मला कोणीच सभेचे सांगितले नाही” असे उत्तर दिले.<br>तसेच त्यांनी उशीरा येऊन, “१२ वी.ची परिक्षा कधी |

| | | |
|---|---|---|
| | च्या परीक्षेच्या नियमांचे वाचन करून सभेला सुरूवात केली. त्यामुळे मी सभेस उशिराही आलेलो नाही व मुख्यध्यापक श्री. वरघुडे सर यांनी मला कोणतीही उशिरा आल्याची विचारणाही केली नाही. त्यांनी परीक्षेचे वेळापत्रक व तक्ता हा सभा संपत आलेनंतर सर्व सहाय्यक शिक्षकांना वाटण्यात आला. मी सन मार्च २०१७ मध्ये इ.१२ वी च्या परीक्षेसाठी उपकेंद्र संचालक म्हणून कामही केलेले आहे. परीक्षेसंदर्भातील जबाबदारी व कर्तव्याची मला जाणीव आहे. | पासून सुरु होत आहे, मला काही माहिती नाही" मुळात सर्व शिक्षकांना व विद्यार्थ्यांना वेळापत्रकाचे वाटप करण्यात आलेले होते. तसेच सर्व शिक्षकांना त्यांचे परिक्षकाचे कामकाजाचे वेळापत्रकदेखील देण्यात आलेले होते. त्यामुळे श्री.संगमनेरे यांच्या सारख्या जबाबदार शिक्षकाने सदरचे विधान करणे योग्य नव्हते. याबाबत त्यांच्या गैरवर्तन अहवालामध्ये नमुद केलेले आहे. |
| ०५. | **गोपनीय अहवालाचा मुद्दा उपस्थित केलेबाबत** – इ.१२ वी चे परीक्षेचे कामकाज हे अंतर्गत मूल्यमापनाचा भाग असल्याने त्या परीक्षेच्या कामाची नोंद गोपनीय अहवाल श्रेणी देताना विचारात घ्यावी लागते. मागील गोपनीय अहवालातील श्रेणी देताना मा.मुख्यध्यापक श्री. वरघुडे सर यांचेकडून भेदभाव झालेला होता, अशी सभेमध्ये चर्चा झाली, मी स्वंतः गोपनीय अहवालाचा मुद्दा या सभेत उपस्थित केलेला नाही व गोपनीय अहवाल कोण लिहितात, हे सर्वांसमोर सांगा असेही मी कदापिही म्हणालो नाही. | श्री.संगमनेरे यांनी सदरचा मुद्दा अत्यंत चुकीच्या पद्धतीने लिखित स्वरुपात कळविलेला आहे. सभेमध्ये इ.१२ वी चे परिक्षेचे नियोजनाचे कामकाज सुरु असतांना इतर शिक्षक त्याबाबत बोलत असतांना श्री.अनाप सर व श्री.संगमनेरे सर यांनी मध्येच उठून, गोपनीय अहवाल व्यवस्थित तुमच्याच हातांनी लिहित जा, तुम्ही इतर व्यक्तींकडून गोपनीय अहवाल लिहून घेतात, श्रेणी देतांना भेदभाव करतात, प्रथम या गोष्टींकडे लक्ष द्या मग मिटींगा घ्या, असे बोलून, माझ्यावर आरोप केले. मात्र खुलासा सादर करतांना चर्चा झाली असे लिहिले आहे. वास्तविक पाहता गोपनीय अहवालात सर्व शिक्षकांना "अ" श्रेणी देण्यात आलेली आहे. यात कुठेही भेदभाव नाही. |
| ०६. | **इतर सहाय्यक शिक्षकांना प्रशासनाविरूध्द भडकाविल्याबाबत** – श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असणारे सर्व सहाय्यक शिक्षक हे माझ्यापेक्षा ज्येष्ठ व अनुभवी आहेत. त्यांचेजवळ उत्तम शैक्षणिक अर्हताही आहे. प्रशासनाचे नियम, सेवा, शर्ती इ.ची त्यांना चांगली माहिती आहे. तसेच चांगले आणि वाईट याचीही जाण असून स्वंतःचे त्यांना मत आहे. त्यामुळे मी सभेतील वातावरण कलुषीत केले, त्यांना भडकाविले, चिथावले असे जे मा.मुख्यध्यापक श्री. वरघुडे सर यांनी वरिष्ठांना कळविले आहे ते अयोग्य आहे. | श्री. संगमनेरे यांनी सर्व शिक्षकांसमोर अरेरावीने वागून गैरवर्तन केले आणि इतर शिक्षकांना चिथावणी देण्याचे काम केले. |
| ०७. | **बेजबाबदारपणा कृत्याबाबत** – मी वेळोवळी प्रशासनाने दिलेल्या आदेशाचे जबाबदारीने व काटेकोरपणे पालन करीत आलेलो आहे. गेली २ वर्षापासून मा.मुख्यध्यापक श्री.वरघुडे सर यांनी नेमून दिलेली सर्व कामे मी वेळेत व जबाबदारीने पुर्णही केलेले आहेत. त्यामुळे मी कुठेही बेजबाबदारपणे वर्तन केलेले नाही. माझे मागील वर्षाचे सर्व गोपनीय अहवालही चांगले आहेत. माझे मागील वर्षाचे इ.१२ वी या वर्गाचे Book Keeping & Accountancy या विषयाचे निकालही उत्तम लागलेले आहेत. माझे अनेक विद्यार्थी सी.ए., सी.पी.टी. परीक्षेसाठी पात्रही ठरलेले आहेत. | त्यांचे अध्यापनाबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार केलेली नसून, त्यांचे वर्तनाबाबत तक्रार करण्यात आलेली आहे. तसेच सदर मुद्यामध्ये श्री.संगमनेरे यांनी सर्व गोपनीय अहवाल चांगले असल्याचे नमुद केलेले आहे, तर अ.क्र.५ चे मुद्यांमध्ये गोपनीय अहवालात भेदभाव होत असल्याची चर्चा झाली असा आरोप करतात, त्यामुळे श्री.संगमनेरे हे स्वंतःच्या खुलाशाबाबत साशंक आहेत, असे दिसून येते तसेच त्यांनी अत्यंत खोटा व चुकीचा खुलासा सादर केलेला आहे. |
| ०८. | **गैरवर्तनाबाबत-** | त्यांचे अध्यापनाबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार |

| | | |
|---|---|---|
| | दि.०३/०३/२०२० रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे यांचे सभेनुसार मी इ.१२ वीच्या Book Keeping & Accountancy या विषयाच्या परीक्षेकरीता नियामक (Moderator) म्हणून कामही करत आहे. माझ्याकडे १८०० ते २००० इतके पेपर मॉडरेट करणेसाठी आलेले आहेत. ते मला पुणे बोर्डात वेळेत सादर करावयाचे आहेत, परीक्षेसंदर्भात असलेले नियम व कर्तव्याची मला पुर्ण जाणीव आहे. त्यामुळे मी या सभेत कोणतेही गैरवर्तन व वातावरण कलुषित केलेले नाही. सोबत शिक्षक सभेत उपस्थित असलेल्या सहाय्यक शिक्षक/शिक्षिका/शिक्षकेतर यांचा अभिप्राय/मत जोडले आहे. | केलेली नसून, त्यांचे वर्तनाबाबत तक्रार करण्यात आलेली आहे.<br>तसेच श्री.संगमनेरे यांनी खुलासा तयार केल्यानंतर सभेमध्ये उपस्थित असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना अभिप्राय देण्याबाबत विनंती केलेली होती. मात्र श्री.संगमनेरे यांचे खुलाशामधील सर्व मुद्दे चुकीचे व बिनबुडाचे असल्याने सह्या करणारे ०८ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वगळता इतर २५ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिप्रायावर सह्या केलेल्या नाहीत व हेच ०७ ते ०८ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सभेमध्ये वाद घालत होते मात्र त्यांनी सदर वादास चर्चा झाली असे म्हणले आहे.<br>यावरुन श्री.संगमनेरे यांनी सर्व खुलासा चुकीचा व खोटा सादर केल्याचे सिद्ध होते. |
| ०९. | **श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी सेवा वर्तणूक विनिमय २०१३ चे कलम ३(१) बाबत**<br>मी संस्थान सेवेत संपूर्ण प्रामाणिकपणानेच काम केलेले आहे. तसेच संस्थानच्या सेवेशी एकनिष्ठही राहिलेलो आहे व मी संस्थान कर्मचा-याला न शोभणारे कृत्यही केलेले नाही व यापुढेही करणार नाही. त्यामुळे मी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी सेवा वर्तणूक विनिमय २०१३ चे कलम ३(१) चे कोणतेही उल्लंघन या सभेत केलेले नाही.<br>प्रशासनाचा माझ्यामुळे वेळ विनाकारण खर्ची पडला, याबद्दल मी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांची माफी मागतो. मी श्रीसाईबाबांच्या तत्वांचे पालनही करतो व नेहमी आचरणातही आणतो. | गैरवर्तन अहवालामध्ये श्री.संगमनेरे यांनी केलेल्या गैरवर्तनाबाबत नमुद केलेले आहे. तसेच त्यांनी सादर केलेला खुलासा अत्यंत खोटा, चुकीचा व दिशाभूल करणारा असल्याचे दिसून येते.<br>तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात हजर राहणेबाबत समक्ष निरोप मिळालेला असतांनाही वरिष्ठांना काहीही न कळविता गैरहजर राहणे सदरची बाब अत्यंत गंभीर स्वरुपाचे गैरवर्तन आहे.<br>सदरचे वर्तन श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी सेवा वर्तणूक विनिमय २०१३ चे कलम ३(१) चे उल्लंघन केलेले आहे, असे ठाम मत आहे. |

**(ब)** श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे यांनी सदर प्रकरणी दि.०७.४.२०२० रोजी पुन्हा खुलासा सादर केलेला असून, जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/वशी-शिस्त/९१/२०२० दि.२८ एप्रिल, २०२० अन्वये सदर लेखी खुलाशाबाबत मुद्देनिहाय स्वंयस्पष्ट लेखी अभिप्राय प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत सादर करणेबाबत कळविलेले आहे, त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | श्री.संगमनेरे यांनी खुलाशात नमुद केलेला मुद्दा | खुलाशाबाबत स्वंयस्पष्ट अभिप्राय |
|---|---|---|
| ०१. | माझ्या भ्रमणध्वनीवर दि.०४.०३.२०२०, दि.१०.०३.२०२० व दि.११.०३.२०२० रोजीचे जे इनकमिंग कॉले आलेले आहेत, त्यात मा.मुख्यध्यापक श्री.वरघुडे सर यांनी कोणताही निरोप मला दिलेला नाही. त्याची झेरॉक्स प्रत सोबत सादर केलेली आहे. | सामान्य प्रशासन विभागाकडील वशी-शिस्त कक्षाकडून मला दि.०४.०३.२०२० रोजी दुरध्वनीद्वारे कळविण्यात आलेले होते की, मुख्यध्यापक, श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी समक्ष चर्चेसाठी बोलविलेले आहे. मात्र त्याबाबतची दिनांक व वेळ नंतर कळविण्यात येईल. याबाबत सबंधीत शिक्षकांना मी तसेच कनिष्ठ महाविद्यालयाकडील लिपीक यांनी समक्ष सांगितलेले होते.<br>त्यानंतर दि.१०.०३.२०२० रोजी मला पुन्हा कळविण्यात आले की, उद्या दि.११.०३.२०२० रोजी सकाळी १०.०० वा. तुम्ही, श्री.अनाप व श्री.संगमनेरे |

| | | |
|---|---|---|
| | | यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांच्या कक्षेत हजर राहावे.<br>याबाबत मी लागलीच कनिष्ठ महाविद्यालयाकडील कंत्राटी लिपीक श्री.सचिन कोपरे यांना श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना कळविण्याबाबत सांगितले होते. त्यानुसार कनिष्ठ महाविद्यालयाकडील कंत्राटी लिपीक श्री.सचिन कोपरे यांनी दि.१०.०३.२०२० रोजी त्यांच्या भ्रमणध्वनीद्वारे श्री.संगमनेरे यांना कळविण्याचा प्रयत्न केला असता, त्यांचा फोन लागला नाही. त्यामुळे श्री.कोपरे हे दि.१०.०३.२०२० रोजी रात्रौ.८.३० वा. सुमारास श्री.संगमनेरे यांचे घरी निरोप देण्यासाठी चालले असता, श्री.संगमनेरे सर त्यांचा मुलीसह कोपरगांव येथील एका बेकरीवर भेटले असता, त्यांना समक्ष भेटून उद्या दि.११.०३.२०२० रोजी सकाळी ०९.३० वा. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात उपस्थित राहणेबाबत कळविलेले होते. मात्र त्यावेळी श्री.संगमनेरे यांनी माझी उद्या सुट्टी आहे, असे सांगितले. याबाबत श्री.कोपरे यांचा लेखी खुलासा घेतलेला आहे.<br>त्यामुळे श्री.संगमनेरे यांचे निरोप न मिळालेबाबतचे म्हणणे हे अत्यंत चुकीचे, खोटे व बिनबुडाचे आहे. ते नेहमीच असे खोटे बोलून, चुकीचे अर्ज करुन, प्रशासनाची दिशाभूल करत असतात. |
| ०२. | माझा रिपोर्ट करण्याचे मा.मुख्यध्यापक श्री.वरघुडे सर यांचे कारण म्हणजे मी दि.२२.०७.२०१९ रोजी माहितीच्या अधिकारान्वये श्री.विकास महादेव शिवगजे, सहा.शिक्षक यांचे विषयी दि.१५.१२.२०१६ व दि.३०.०६.२०१७ रोजी मी व काही सहाय्यक शिक्षकांनी तक्रार केलेली होती. त्या तक्रारीवर सुनावणीही झालेली होती. परंतू मला दि.०९ ऑगस्ट, २०१९ रोजीचे मिळालेल्या माहिती अधिकाराच्या अहवालात श्री.विकास महादेव शिवगजे, सहाय्यक शिक्षक यांच्यावर प्रशासनाकडून पुढील कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही, ही माहिती मिळाली. सदर माहिती मागविल्याचा राग मनात धरुन श्री.विकास महादेव शिवगजे सहा.शिक्षक व मुख्यध्यापक श्री.वरघुडे सर या दोघांनी मिळून कट कारस्थान रचुन माझी नियोजनबद्धरित्या वरिष्ठांसमोर रिपोर्ट करुन बदनामी करुन माझेवर अन्याय केलेला आहे. | सदरचा मुद्दा दि.१५.०२.२०२० रोजीचे सभेतील गैरवर्तनाबाबत नसुन, श्री.शिवगजे सर यांच्याबाबत आहे. त्या प्रकरणाची संस्थानचे प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत चौकशी होऊन, सदरचे प्रकरण सन २०१७ मध्येच संपलेले आहे. मात्र श्री.संगमनेरे हे केवळ दिशाभूल करायची म्हणून जुने प्रकरणातील कागदपत्रे देऊन, मुळ विषयाला व त्यांनी केलेल्या गैरवर्तनाच्या मुद्यास बगल देण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. |

उपरोक्त परिच्छेद अ मधील तक्त्यातील अ.क्र.१ ते ९ व परिच्छेद ब मधील तक्त्यातील अ.क्र.१ व २ चे अवलोकन करता,

१. श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे, सहा.शिक्षक श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी त्यांचे खुलाशामध्ये नमुद केलेली माहिती अत्यंत चुकीची, खोटी व बिनबुडाची आहे. तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात उपस्थित राहणेबाबत आदल्या दिवशी महाविद्यालयाकडील कंत्राटी

लिपीकांमार्फत समक्ष निरोप देऊनही त्यांनी सदरचा निरोप गंभीरतेने न घेता, नेहमीप्रमाणे वरिष्ठांचा अपमान करुन, प्रशासनाच्या निरोपास केराची टोपली दाखविली, सदरची बाब अत्यंत गंभीर गैरवर्तनामध्ये येते.

२. तसेच मुख्यध्यापक अथवा लिपीक यांना न विचारता रजा अर्ज भरुन, परस्पर हजेरी मस्टरमध्ये ठेऊन दिला तसेच मुख्यध्यापक अथवा लिपीक यांना न कळविता रजा अर्ज मंजुर नसतांनाही परस्पर रजा घेतली, सदरची बाब गैरवर्तनामध्ये येते.

श्री.संगमनेरे यांनी जुने अर्ज, कागदपत्रे सादर करुन मुळ विषयास बगल देण्याचा प्रयत्न केला आहे. श्री.संगमनेरे यांचे विरुदध गैरवर्तन रिपोर्ट केला असता, त्यांनी दोन वेळेस परस्पर खुलासा सामान्य प्रशासन शाखा, आवक विभागास सादर केले, तसेच आता माहितीचे अधिकार कायदांतर्गत सदर प्रकरणाची माहिती मागविलेली असून, सदर माहिती न्यायालयीन कामासाठी आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे. म्हणजेच श्री.संगमनेरे यांच्या विरोधात काही बोलले अथवा वरिष्ठांना कळविल्यास ते विविध प्रकारे वरिष्ठांवर, प्रशासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न करतात, ही बाब अतिशय गंभीर असून, त्यांचे वर्तन अत्यंत हीन व क्लेषदायक आहे.

३. श्री.संगमनेरे यांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसचा खुलासा मुख्यध्यापकांमार्फत सादर करणेबाबत आदेशीत करण्यात आलेले असतांनाही त्यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांच्या आदेशाचा अवमान करुन, सदर नोटीसचा खुलासा दोनवेळेस परस्पर सामान्य प्रशासन शाखा, आवक विभागाकडे सादर केलेला आहे.

४. तसेच जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३११९/२०१४ दि.०२ ऑक्टो, २०१४ चे परिपत्रकाचा देखील अवमान केलेला आहे. यावरुन श्री.संगमनेरे हे नेहमीच अशा पद्धतीने वरिष्ठांच्या अथवा प्रशासनाच्या आदेशांचा अवमान करत असल्याचे निर्देशनास येत आहे.'' असे म्हटलेले आहे.

श्री.संगमनेरे यांचे दोन्ही खुलाशाबाबत प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी सादर केलेला स्वंयस्पष्ट अभिप्राय सबंधीत प्रशासकिय अधिकारी यांचे मार्फत सादर केलेला असुन त्यांनी त्यावर स्वाक्षरी केलेली आहे.

श्री.दिलीप संगमनेरे, यांची संस्थान सेवेत दि.१७.०९.२००८ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांना यापुर्वी गैरशिस्तवर्तनाबाबत एकही शिक्षा करणेत आलेली नाही.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि आपिल) विनियम,२०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये **किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध अ सा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

**मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

**D) श्री.संगमनेरे यांचेबाबत वेळोवळी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेल्या टिपण्या.**

**१)** श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे,सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना वरील संदर्भ क्रं.०२ अन्वये वरिष्ठांचे स्वाक्षरीने कारणे दाखवा नोटीस काढण्यात आलेली असुन त्यांनी लेखी खुलासा सादर करावयास पाहिजे होता. परंतु त्यांनी प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी त्यांचेबाबत केलेल्या कर्मचारी गैरवर्तन रिपोर्ट मागणी दि.१९.०३.२०२० रोजीचे अर्जान्वये केलेली आहे.तरी श्री.संगमनेरे यांचेबद्दल प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी केलेल्या कर्मचारी गैरवर्तन रिपोर्टची छायांकित प्रत श्री.संगमनेरे यांना द्यावी किंवा कसे याबाबत आदेश होणेस विनंती आहे. याबाबतची टिपणी दि.२१.०३.२०२० रोजी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती.

श्री.संगमनेरे यांनी दि.१९.०३.२०२० रोजीचे विनंती अर्जाबाबत इकडील दि.२१.०३.२०२० रोजीची टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती.सदरचे टिपणीवर वरिष्ठांनी,"प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी सादर केलेल्या कर्मचारी गैरवर्तन रिपोर्टमधील सर्व मुद्दे कारणे दाखवा नोटीसीत नमुद आहे.त्यामुळे पुन्हा रिपोर्ट देण्याची आवश्यकता वाटत नाही." असे निर्देश दिलेले आहे.

**२)** तदनंतर श्री.संगमनेरे यांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसीचा खुलासा प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेमार्फत सादर करावयाचे नोटीसीत स्पष्ट निर्देश असतांनी त्यांनी दि.२३.०३.२०२० रोजीचा लेखी खुलासा सामान्य प्रशासन शाखा, आवक विभागास दिलेला आहे.

जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/५०/२०२०,दि.१५-०४-२०२० रोजीचे पत्रान्वये श्री.संगमनेरे यांनी दिलेला दि.०७.०४.२०२० रोजीचा लेखी खुलासा स्पष्ट अभिप्रायाकरीता पाठविणेत आलेला आहे.

**३)** आता पुन्हा, श्री.संगमनेरे यांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसीचा खुलासा प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेमार्फत सादर करावयाचे नोटीसीत स्पष्ट निर्देश असतांनी देखील त्यांनी दि.०७.०४.२०२० रोजीचा लेखी खुलासा सामान्य प्रशासन शाखा, आवक विभागास दिलेला आहे.श्री.संगमनेरे हे वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचा वारंवार अवमान करत आहेत. उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत श्री.संगमनेरे यांना फक्त एकच कारणे दाखवा नोटीस काढण्यात आलेली आहे, परंतु त्यांनी आतापर्यंत नोटीसीचे खुलासे प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेमार्फत सादर न करता, उपरोक्त अ.नं.१ ते ३ प्रमाणे अर्ज/खुलासे सामान्य प्रशासन शाखा,आवक विभागास सादर केलेले आहेत. हे त्यांनी वरील आवक विभागा दिलेल्या अ.नं.१ ते ३ चे अर्ज/खुलासे यावरुन निदर्शनास येत आहे.

**४)** श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे,सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी दि.२३.०३.२०२० व दि.०७.०४.२०२० रोजी इकडील आवक विभागास दिलेला लेखी खुलासा उपरोक्त संदर्भ क्रं.६,८ रोजीचे पत्रासोबत प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे स्वयंस्पष्ट अभिप्रायाकरीता पाठविणेत आलेले होते.

त्यास अनुसरुन प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी दि.०४.०५.२०२० रोजीचा स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर केलेला आहे.त्यात त्यांनी, श्री.संगमनेरे यांनी सादर केलेला खुलासा सर्व चुकिचा व खोटा सादर केल्याचे सिध्द केलेले आहे.श्री.संगमनेरे यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात हजर राहणेबाबत श्री.सचिन एस.कोपरे, कंत्राटी कुशल कर्मचारी यांनी त्यांना दि.११.०३.२०२० रोजी हजर राहणेबाबत समक्ष भेट घेवुन निरोप दिलेला होता परंतु श्री.संगमनेरे हे मला सांगीतले नाही हे म्हणणे खोटे व प्रशासनाची दिशाभुल करणारे आहे.त्याबाबत श्री.संगमनेरे यांना कळविणेत आलेले होते. तसे श्री.कोपरे यांनी दि.२८.०४.२०२० रोजीचे लेखी पत्र दिलेले आहे. प्रशासनाची दिशाभुल करावयाची म्हणून जुने प्रकरणातील कागदपत्रे देऊन, मुळ विषयाला व त्यांनी केलेल्या गैरवर्तनाच्या मुद्यास बगल देण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसुन येत आहे.असे प्राचार्य यांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायात नमुद आहे.

श्री.संगमनेरे हे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात समक्ष भेटण्याचा निरोप मिळुनही उपस्थित न राहता खुलाशात खोटे विधान करुन प्रशासनाची दिशाभुल करत आहेत.

श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे,सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ नुसार श्री.संगमनेरे, यांना गैरशिस्त वर्तनाबाबत करावयाचे शिक्षेबाबत इकडील दि.०७.०५.२०२० रोजीची टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती. सदरचे टिपणीवर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी," 'अ'प्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल)

विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (१) अन्वये कार्यवाहीस हरकत नाही.” असे निर्देश दिलेले होते. त्यास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता मिळालेली होती.

श्री.संगमनेरे यांना करावयाचे शिक्षेबाबत दि.१८.०५.२०२० रोजी सादर करणेत आलेल्या आदेशाचे मसुदा मान्यतेचे वेळेस मा. वरिष्ठांसमक्ष झालेल्या चर्चेनुसार श्री.संगमनेरे यांना सेवा निलंबीत करणेत येवुन, विभागीय चौकशी करणेत यावी याबाबतचा प्रस्ताव निर्णयास्तव समिती समोर सादर करावा, असे निर्देश मिळालेले आहेत.

श्री. दिलीप विठ्ठलराव संगमनेरे, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय,शिर्डी यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत संस्थान सेवेतून “सेवा निलंबीत” करुन, त्यांची विभागीय खाते चौकशी करता येईल. तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचेसमोर निर्णयास्तव सादर करणेत आलेला होता.

दि.०९.०६.२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर निर्णय क्रं.३१२ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे,सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी केलेले गैरशिस्तवर्तन व त्याबाबत प्रशासनाने वेळोवेळी केलेली कार्यवाही याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.

तसेच मुख्याध्यापक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी दि.०७.०७.२०२० रोजीचे पत्रान्वये असे कळविले आहे कि

“.. .. श्री.दिलीप वि. संगमनेरे यांनी दि. ०९.०३.२०२० रोजी मुख्याध्यापक अथवा लिपीक यांना न कळवता दि. ११.०३.२०२० रोजीचा रजा अर्ज भरुन, हजेरी मस्टरला ठेऊन दिला होता. तसेच त्यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी दि.११.०३.२०२० रोजी समक्ष भेटण्यास बोलविले आहे, असा निरोप एक दिवस आधी देऊनही श्री.संगमनेरे विनापरवानगी दि.११.०३.२०२० रोजी रजेवर गेले. सदर दिवशीची श्री. संगमनेरे यांची रजा नामंजूर करुन विनावेतन केलेली आहे.”

तरी उपरोक्त प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री.संगमनेरे यांचे विरुध्द विभागाने दिलेल्या प्रति आरोपावर सविस्तर चौकशी करुन व श्री.संगमनेरे यांचा खुलासा घेऊन प्रशासकीय कार्यवाही करावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन)**

---

**विषय नं.०९** **माहे एप्रिल-२०१९ ते मार्च-२०२० अखेर लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत कंत्राटी पध्दतीने पुरविण्यात आलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदीन व श्रमदिन संख्येचे विभागनिहाय तपशिलवार तक्ते प्रत्येक महिन्यास मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत व आर्थिक वर्षाचे शेवटी उपरोक्त विषयांचा एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समिती समोर नोंद घेण्यासाठी सादर करणेत यावा बाबत मा.विश्वस्तांचे सूचने नुसार उपरोक्त संदर्भीय ठरावान्वये मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त मा.विश्वस्तांचे सूचनेनुसार माहे एप्रिल-२०१९ ते माहे मार्च-२०२० अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत कंत्राटी पध्दतीने पुरविण्यात आलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदीन व श्रमदिन संख्येचा तपशिल खालीलप्रमाणे देणेत येत आहे.

| अ.नं | कालावधी | तपशील | अकुशल | | कुशल | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या |
| ०१ | एप्रिल-२०१९ | लेबर | १०८२ | २८५६७ | ६३७ | १७५५५ | १७१९ | ४६१२२ |
| | | सिक्युरीटी | ८४३ | २१४८८ | ६३ | १७३६ | ९०६ | २३२२४ |
| ०२ | मे-२०१९ | लेबर | १०८२ | २८६९६ | ६३८ | १७०५८ | १७२० | ४५७५४ |
| | | सिक्युरीटी | ७७८ | २२०९५ | ६४ | १७७५ | ८४२ | २३८७० |
| ०३ | जून-२०१९ | लेबर | १०८२ | २८६९६ | ६३८ | १७०५८ | १७२० | ४५७५४ |
| | | सिक्युरीटी | ७७४ | २२४९९ | ६८ | १७४५ | ८४२ | २४२४४ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | **जूलै-२०१९** | लेबर | १०७५ | २९८३९ | ६४४ | १८३७६ | १७१९ | ४८२१५ |
| | | सिक्युरीटी | ७९४ | २२५७७ | ६५ | १७७४ | ८५९ | २४३५१ |
| ०५ | **ऑगष्ट-२०१९** | लेबर | १०६८ | २९५८९ | ६३८ | १८३०९ | १७०६ | ४७८९८ |
| | | सिक्युरीटी | ७७८ | २२५०० | ६६ | १८०२ | ८४४ | २४३०२ |
| ०६ | **सप्टेंबर-२०१९** | लेबर | १०६८ | २८९४० | ६४१ | १७५७७ | १७०९ | ४६५१७ |
| | | सिक्युरीटी | ७७९ | २१६४३ | ६७ | १८१७ | ८४६ | २३४६० |
| ०७ | **ऑकटोबर-२०१९** | लेबर | १०६७ | २९११८ | ६३९ | १७८४४ | १७०६ | ४६९६२ |
| | | सिक्युरीटी | ७७७ | २२७९५ | ६८ | १८५५ | ८४५ | २४६५० |
| ०८ | **नोव्हेंबर-२०१९** | लेबर | १०६६ | २७९१३ | ६४० | १७२८९ | १७०६ | ४५२०२ |
| | | सिक्युरीटी | ७८१ | २१२८६ | ७० | १८२६ | ८५१ | २३११२ |
| ०९ | **डिसेंबर-२०१९** | लेबर | १०६७ | २९६३२ | ६४० | १८१८६ | १७०७ | ४७८१८ |
| | | सिक्युरीटी | ७८२ | २२६१० | ७१ | १८९२ | ८५३ | २४५०२ |
| १० | **जानेवारी-२०२०** | लेबर | १०७१ | १९९९९ | ६४० | १५७८१ | १७११ | ३५७८० |
| | | सिक्युरीटी | ७७९ | १८३६० | ७४ | १९१७ | ८५३ | २०२७७ |
| ११ | **फेब्रूवारी-२०२०** | लेबर | ६९४ | १७९३१ | ५५४ | १४६१६ | १२४८ | ३२५४७ |
| | | सिक्युरीटी | ६३५ | १७०२४ | ७१ | १९०० | ७०६ | १८९२४ |
| १२ | **मार्च-२०२०** | लेबर | ६९६ | १९४९५ | ५५० | १५९२९ | १२४६ | ३५४२४ |
| | | सिक्युरीटी | ६३४ | १८७३९ | ७१ | २०५७ | ७०५ | २०७९६ |
| | **एकूण संख्या** | | **२१२५२** | **५७२०३१** | **८३१७** | **२२७६७४** | **२९५६९** | **७९९७०५** |

उपरोक्त नमूद केले प्रमाणे माहे एप्रिल-२०१९ ते माहे मार्च-२०२० अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत कंत्राटी पध्दतीने कुशल, अकुशल व सुरक्षा कामगार आवश्यकतेप्रमाणे पुरविणेत आलेले आहे.तरी सदर प्रतिदिन व श्रमदिन संख्येची नोंद घेणेत येवून, त्यास मान्यता असावी.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल-२०१९ ते माहे मार्च-२०२० या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत कंत्राटी पध्दतीने आवश्यकतेप्रमाणे पुरविण्यात आलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कामगार प्रतिदिन व श्रमदिन संख्येची नोंद घेण्यात येऊन त्यास मान्यता देण्यात आली. मात्र कुठलाही धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रशासनाने या नोंदीचा उपयोग करु नये, असे निर्देश देण्यात आले.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.१०** **अॅड संदिप सुधाकर देशमुख, नवी दिल्ली यांची संस्थानचे ॲडव्होकेट पॅनलवर नियुक्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयांस अनुसरुन मा. तदर्थ समितीचे दि.९/६/२०२०, रोजीचे सभेत सामान्य प्रशासन विभागामार्फत विषय क्र.६ आय.टी.आय. विभागाकरीता निदेशक यांना मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद व मा.उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार सातव्या वेतन आयोगाची फरकाची रक्कम आदा करणेबाबतचा विषय ठेवणेत आलेला होता. सदरचे विषयांवर खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

**निर्णय क्र.३११-** "यावर सविस्तर चर्चा होऊन, आय.टी.आय. विभागाकरीता निदेशक यांची प्रस्तावात नमुद केल्यानुसार अति प्रदानाची वसुली त्यांना सातव्या वेतन आयोगाच्या (दि.०१/०१/२०१६ पासून देय होणा-या ) थकबाकीच्या रकमेतुन वसुल न करणेबाबतच्या मा. उच्च न्यायालयाचे निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल करण्यास तसेच त्या अनुषंगाने येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. मात्र याकामी संस्थानमार्फत शक्यतो निशुल्क सेवा देणा-या साईभक्ताची विधीतज्ञ म्हणुन नियुक्ती करण्यास प्राधान्य देण्यात यावे, असे ठरले."

ॲड संदीप सुधाकर देशमुख , नवी दिल्ली, यांनी दि.८/२/२०१९, रोजीचे अर्जानवये संस्थानकडे अर्ज केला होता सदर अर्जात नमुद केले होते की, "I,the undersigned, am practicing exclusively before the Hon'ble Supreme Court of India as an Advocate. I have been certified to be an

"Advocate-On - Record" (AOR) by the Hon'ble Supreme Court of India.I am desirous of representing the holy Trust before the Hon'ble Supreme Court Of India and hence do hereby grant my consent for consideration of my requisition for being appointed as Standing Counsel on Pro-Bono basis (free of cost) for the shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi). Please note that, I am interested in representing the Holy Trust at no cost towards conducting the matters/ representing the Trust before the Hon'ble Superme Court Of India. I hereby also assure to represent the Trust with complete devotion and integrity at my command. Please find copy of my Curriculum Vitae attached herewith "

त्यास अनुसरुन त्यांच्या अर्जावर मा.तदर्थ समितीचे दि.६/६/२०१९, रोजीचे सभेत निर्णय क्र.२०७, पुढील प्रमाणे झालेला आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन ,सदरचा विषय मा. उपसमितीचे सभेसमोर ठेवण्यात येऊन अॅड. संदीप सुधाकर देशमुख यांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे. या संदर्भात दि.२१/८/२०१९ रोजीचे सभेतील **निर्णय क्र.४४८** नुसार "यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तुत प्रकरणी समिती सदस्य अॅड मोहन जयकर यांचा अभिप्राय घेवून त्यांचे सल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. असे ठरले होते. त्यास अनुसरुन जा. नं. एसएसएस/वशी-विधी/२३५८/२०१९, दि.१६/९/२०१९ रोजीचे पत्रान्वये अॅड. जयकर यांचा अभिप्राय मागविण्यात आला होता. परंतु सदरचा अभिप्राय अद्याप पर्यंत प्राप्त झालेला नाही.

अॅड. संदिप सुधाकर देशमुख, नवी दिल्ली हे मा. सर्वोच्च न्यायालयात विनामुल्य कामकाज पहाण्यास तयार असल्याने त्यांची श्री साईबाबा संस्थानचे अॅडव्होकेट पॅनलवर नियुक्ती करता येईल तसेच वकील फी व्यतीरीक्त इतर अनुशंगीक मागणी केलेला खर्च त्यांना अदा करता येईल.

तरी अॅड. संदिप देशमुख, नवी दिल्ली, यांची मा.सर्वोच्च न्यायालयात संस्थानचे वतीने विनामुल्य कामकाज पहाण्यास तयार असल्याने त्यांची श्री साईबाबा संस्थानचे अॅडव्होकेट पॅनलवर नियुक्ती करणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अॅड संदीप देशमुख यांचा अर्ज नस्तीबंद करण्यात येत आहे. मा.सर्वोच्च न्यायालय तसेच मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानचे वतीने न्यायालयीन कामकाज पाहणेसाठी संस्थानचे अॅडव्होकेट पॅनल तयार करण्यासाठी इच्छुक अॅडव्होकेट यांचेकडून संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत. सदरच्या जाहिरातीमध्ये खालील अटी व शर्ती नमुद करण्यात याव्यात.**

१. **मा. सर्वोच्च न्यायालयातील संस्थानचे कामकाज पाहण्यासाठी इच्छुक अर्जदारांचा मा.सर्वोच्च न्यायालयातील कामकाजाचा २० वर्षांचा नियमित सराव असावा, तर मा.उच्च न्यायालयातील कामकाज पाहण्यासाठी इच्छुक अर्जदारांचा मा.उच्च न्यायालयातील कामकाजाचा १५ वर्षाचा नियमित सराव असावा**

२. **अर्जदार किंवा फर्म यांची मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली/ मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे नोंदणी झालेली असावी.**

३. **अर्जदारावर कोणत्याही स्वरुपाचा फौजदारी गुन्हा कुठल्याही न्यायालयात दाखल झालेला नसावा किंवा प्रलंबीत नसावा. तसेच कुठल्याही पोलीस स्टेशनला त्यांचेविरुध्द फौजदारी तक्रार दाखल झालेली नसावी किंवा प्रलंबीत नसावी. व याबाबत त्यांनी सक्षम प्राधिकाऱ्यांसमोर केलेले शपथपत्र दाखल करणे आवश्यक आहे.**

४. **विनामुल्य सेवा देणा-या अर्जदारांना प्राधान्य देण्यात येईल. तथापी जे विधिज्ञ फी स्विकारु इच्छितात त्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयातील/मा.उच्च न्यायालयातील संस्थानच्या प्रत्येक विधायक तारखेस किती फी आकारणार अथवा प्रकरणाची एकुण फी किती आकारणार, संस्थानने एखाद्या विषयाचे बाबतीत आपले कायदेशीर मत मागवल्यास अशा प्रकरणात किती फी आकारणार व इतर तत्सम गोष्टींसाठी किती फी आकारणार, अशा रितीने आपणास संस्थानकडून किती मानधनाची/फी ची अपेक्षा आहे. याबाबतचा स्पष्ट उल्लेख अर्जामध्ये करावा.**

५. **अर्जदार यांनी यापुर्वी मा.न्यायालयात संस्थानचे विरोधात काम केलेले नसावे. तसचे सद्याही**

**अर्जदार संस्थानचे विरोधात काम करीत नसावा व संस्थानचे पॅनलवर नेमणूक झाल्यास संस्थानचे हिताचे विरोधात काम करणार नाही अशी लेखी हमी अर्जदारास द्यावी लागेल.**

**६. संस्थानचे पॅनलवर नेमणूक केलेल्या ॲडव्होकेटची/कायदा सल्लागाराची नेमणूक ही तात्पुरत्या स्वरुपाची असून सर्व ॲडव्होकेट्स चा कालावधी नेमणूक तारखेपासून ते पुढील आदेश होईपर्यंत राहील. तसेच संस्थान पॅनलवर नेमलेल्या ॲडव्होकेटला संस्थानचे सेवेत नोकरीवर हक्क सांगता येणार नाही.**

**७. पॅनलवरील ॲडव्होकेट्सच्या संख्येचे बंधन राहणार नाही.**

**८. संस्थानचे पॅनलवर नियुक्ती झाल्यांनतर अर्जदाराने दिलेली माहिती चुकीची आढळून आल्यास किंवा पॅनलवरील नियुक्तीनंतर अर्जदाराच्या काही आक्षेपार्ह गोष्टी संस्थानचे हिताचे विरोधात आढळून आल्यास त्यांना विना नोटीस संस्थानचे पॅनलवरुन कमी केले जाईल. व सदर अर्जदार विधिज्ञा विरुध्द त्यांचेशी संबधीत बार कौन्सीलकडे/बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांचेकडे तक्रार करण्याचा अधिकार संस्थानकडे राखून ठेवत आहे.**

**९. मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयात काम पहाणा-या ॲडव्होकेटने सामान्यपणे आकलन होईल अशी सर्व माहिती व सल्ला संस्थानला द्यावा लागेल.**

**१०. संस्थान पॅनलवर नेमणूक होण्यासाठी अर्जदार-ॲडव्होकेट श्री साईबाबांचा भक्त असावा.**

**११. संस्थान पॅनलवर नेमणूक केलेल्या ॲडव्होकेटची नेमणूक कोणतेही कारण न देता रद्द करण्यांचा अधिकार संस्थानला राहील व तशी नेमणूक रद्द केल्यावर संबंधीत वकीलाने काम न पहाणे व सुपूर्त केलेले कागदपत्र संस्थानला परत देणे बंधनकारक राहील.**

**(कार्यवाही-विधी विभाग)**

---

**विषय नं.११** **संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/१ पै.मधील नवीन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा तट कालव्यामधुन पाणी घेणेकरीता जलवाहीनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सल्लागार म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करुन नव्याने सल्लागार नियुक्तीकरीता या क्षेत्रातील तांत्रिक सल्लागाराकडून e-RFP (e-Request for Proposal) प्रस्ताव मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पूरविणे, तसेच पोट कलम १ (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय:-**

१. दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.४५ संमत झालेला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/१ मधील नवीन साठवण तलावामध्ये पाणी घेणेकरीता ९०० mm व्यासाची पाईपलाईन व इतर अनुषंगिक कामे करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी त्यांना आदा करावयाचे फी बाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले."

२. दि.११/०५/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.३०३ संमत झालेला आहे.

"...सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला.तसेच संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/१ पै.मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा तट कालव्यामधून पाणी घेणेकरीता जलवाहिनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचे सल्लागार म्हणून करणेत आलेली नियुक्ती रद्द करुन नव्याने सल्लागार नियुक्ती करीता या क्षेत्रातील तांत्रिक सल्लागारांकडून e-RFP (e-Request for Proposal) प्रस्ताव मागवण्याबाबत आभ्यासपूर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर ठेवणेत यावा, असे ठरले"

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं.२४५/१ मध्ये देणगीदार साईभक्त यांचे देणगीतून पाणीपुरवठा विभागामार्फत नविन साठवण तलावाची निर्मिती करणेत आलेली आहे. सदरहू तलावाचे काम पूर्ण झाले असून गोदावरी उजवा तट कालव्यापासून पाईपलाईन टाकणेचे काम बाकी आहे. याबाबत पाणीपूरवठा विभागाने दि.०७/०१/२०१९ च्या आदेशान्वये इकडील विभागास खालील कामे पूर्ण करुन त्याबाबतचा लेखी अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे.

अ) साठवण तलावात पाणी घेणेकरीता ९०० एम.एम व्यासाची पाईपलाईन टाकणेबाबत इस्टीमेट तयार करुन कार्यवाही करणे (९०० एम.एम व्यासाची पाईपलाईन टाकणे, मीटर रुम बांधणे, वॉटर फ्लो मीटर, कॅनॉल गेट तयार करणे व ठिकठिकाणी चेंबरचे बांधकाम करणे).

ब) नविन साठवण तलाव निमगांव-को-हाळे गट नं.२४५/१ ते जुना साठवण कनकुरी फिल्टर प्लॅन्टपर्यंत पाईपलाईन टाकणेकरीता नाली खोदाई करणे.

उपरोक्त कामे करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाहीचे टप्पे पूर्ण करणे आवश्यक आहे.

१. कॅनॉल, नविन साठवण तलाव, जुना साठवण तलाव यांचे लोकेशन, अलाईनमेंट व लेव्हल घेणेसाठी टोटल स्टेशन सर्व्हे करणे.

२. पाईपलाईन डिझाईन करणे, इनटेक वेल तयार करणे, मीटर रुमचे प्लॅन व डिझाईन करणे, वॉटर फ्लो मीटर, कॅनॉल गेट डिझाईन करणे, मोजमापासह नकाशे तयार करणे इ.

३. वर नमूद कामांचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रीक मान्यता घेणे व मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे.

४. ई-निविदा प्रक्रिया राबविणे.

वर नमूद कामे ही वैशिष्टपूर्ण (Specialized) स्वरुपाची असून त्यासाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ बांधकाम विभागाकडे उपलब्ध नसल्याने संस्थानचे मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.२४५/१ पै. मधील नवीन साठवण तलावामध्ये पाणी घेणेकरीता पाईपलाईन टाकणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेकामाचा प्रस्ताव दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला असता, त्यावर वर नमूद केलेप्रमाणे निर्णय क्र.४५ समंत झाला आहे.

नविन साठवण तलावामध्ये पाणी घेणेकरीता गोदावरी उजवा कालव्यावर गेट (Canal Intake / Head Regulatar) बांधण्यासाठी जलसंपदा विभागाची परवानगी घेण्याची कार्यवाही संस्थानचे पाणीपुरवठा विभागामार्फत करण्यात येत आहे. त्यासाठी रु.१०,८६,५२४/- मात्र इतकी रक्कम कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडे जमा करणेत आली असून सदर गेटचे बांधकाम जलसंपदा विभागामार्फत करण्यात येणार आहे.

दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील वर नमूद निर्णय क्र.४५ अन्वये,मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं.२४५/१ मधील नविन साठवण तलावामध्येगोदावरी उजवा तट कालव्यामधून पाणी घेणेकरीता जलवाहीनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची नियुक्ती करणेस मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नाशिक यांना जा.क्र.२०७६/२०१९, दि.२९/०८/२०१९ अन्वयेनियुक्ती पत्र देणेत आले आहे. तसेच म. जि. प्रा. यांचेशी समक्ष शिर्डी येथिल बैठकांमध्ये तसेच दुरध्वनीवर वेळोवेळी पाठपुरावा करणेत आला आहे. परंतू त्यांचेकडून अद्याप सर्वेक्षण, डिझाईन, सविस्तर अंदाजपत्रक प्राप्त झालेले नाही.

तथापी मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नाशिक यांनी दि.१२/०९/२०१९ चे पत्रान्वये, वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा (निळवंडे धरण उद्भव) या योजनेचे प्रकल्पव्यवस्थापन सल्लागार शुल्कापोटी उर्वरीत रक्कम रू.६,२७,१५,४१३/- मात्र म.जि.प्रा. कडे त्वरीत भरणा करणेत यावी. सदर शुल्काची रक्कम भरल्यानंतरच वरील विषयांकीत कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लगार म्हणून काम करणेबाबत निर्णय घेण्यात येईल, असे कळविले आहे.

तसेच मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नाशिक यांना संस्थानकडील दि.१९/१०/२०१९ चे पत्रान्वये, वरील विषयांकीत कामाचे सर्व्हेक्षण, डिझाईन, सविस्तर अंदाजपत्रक लवकरात लवकर सादर करावे, जेणेकरुन ई-निविदा राबविणेची कार्यवाही सुरु करता येईल. तसेच याकामाचा फी चा प्रस्ताव देखील या कार्यालयाकडे सादर करावा म्हणजे त्यास संस्थानचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर

करता येईल, असे कळविणेत आले. परंतू महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचेकडून अद्याप कुठलीही कार्यवाही झालेली नाही. तसेच मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नाशिक यांना संस्थानकडील दि.१०/१२/२०१९ चे पत्रान्वये, उक्त कामाबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करणेसाठी शिर्डी येथे दि.१७/१२/२०१९ राजी सकाळी ११:०० वाजता उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. तथापि सदर वेळी ते उपस्थित राहू शकले नाही.

यावरुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांना वरील विषयांकित प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करण्यात स्वारस्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर प्रकल्प लवकर कार्यान्वित होण्याचे दृष्टीने संस्थानमार्फत या क्षेत्रातील खाजगी तांत्रिक सल्लागाराची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणे उचित होईल, असे मत आहे.

त्याकरीता मौजे निमगांव-को-हाळे येथिल गट नं.२४५/१ पै. मधील नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा तट कालव्यामधून पाणी घेणेकरीता जलवाहीनी टाकणे व इतर अनुषंगीक कामांकरीता महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांना सल्लागार म्हणून नियुक्तीसाठी देणेत आलेला नियुक्ती आदेश रद्द करून सदर कामासाठी सल्लागार नियुक्तीकरीता ई-आरएफपी प्रस्ताव मागविणेत यावेत असे मत आहे. याबाबत सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर दि.११/०५/२०२० रोजीचे मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेत वर नमूद केलेप्रमाणे निर्णय क्र.३०३ समंत करणेत आलेला आहे.

याबाबत नव्याने नियुक्त करावयाचे सल्लागाराची कार्यकक्षा (Scope of Services) खालीलप्रमाणे असेल.

- Total station survey of Balancing tank & canal area including alignment of the proposed pipeline.
- Workout L-section of the pipeline.
- Prepering the Hydraulic design.
- Submission of detailed estimate & drawings.
- Submission of draft tender papers and evaluation of bids.
- Periodic supervision and certification of the contractor's bills.

**प्रस्ताव:-** तरी मौजे निमगांव-को-हाळे गट नं.२४५/१ पै. मधिल नविन साठवण तलावामध्ये गोदावरी उजवा कालव्यातून पाणी घेणेसाठी Meter Room, DI Pipe, Intake Well व इतर अनुषंगीक बाबींचे कामांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांना दि.२९/०८/२०१९ रोजी देणेत आलेला सल्लागार नियुक्तीचा आदेश रद्द करणेस तसेच सदरकामी सर्वेक्षण, संकल्पन, सविस्तर अंदाजपत्रक, नकाशे, निविदा प्रपत्रे तयार करणे, कामावर देखरेख ठेवून ठेकेदार यांची बिले प्रमाणित करणे या व इतर अनुषंगीक सेवा प्राप्त करणेसाठी नव्याने सल्लागार नियुक्तीकरीता वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे e-RFP (e-Request for Proposal) प्रस्ताव मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी मा.व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेले निर्णय व महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचेशी याबाबत झालेला पत्रव्यवहार यासह अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१२** **मे.लेजर व्हिजन लि.,हॉगकॉग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन कार्यवाही करणेकामी ॲडव्होकेटची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मौजे निमागांव कोऱ्हाळे येथील संस्थानचे गट नं.१९८, १९९, २०० व २०१ मध्ये मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेत साईगार्डन करण्याचे ठरले होते. या प्रकल्पातंर्गत श्री साईबाबांच्या जिवनावर अधारीत लेजर शो तयार करणेसाठी लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना US$५५,००,००० मात्रचा कार्यादेश देणेत आला होता. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेशी झालेल्या करारानुसार त्यांनी केलेल्या कामापोटी Payment Stages ०१ ते ०४ व ०७ ते ०८ करीता US$२१,४५,००० अदा करणेत आलेले आहे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांचे दि.०५/११/२०१२, दि.१७/१२/२०१२ व दि.२६/०२/२०१३ रोजीचे पत्रान्वये करारनाम्यातील Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$ १५,४०,००० ची बिले सादर केलेली होती.

संस्थानचे मा.त्रिसदस्य समितीचे दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र.१८२ अन्वये मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे बिल अदा करणेकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले होते. त्यानुसार संस्थानचे वकील श्री. संजय चौकीदार यांनी CAST/८७०८/२०१४ दि.२५/०७/२०१४ अन्वये मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल केले होते.

प्रस्तुत प्रकरणी मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांची Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले प्रलंबीत असल्यामुळे दि.०३/०३/२०१७ रोजीच्या (संस्थानकडे प्राप्त दि.२३/०३/२०१७) पत्रान्वये त्यांचेशी केलेले करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार संस्थानला टर्मिनेशन नोटीस दिलेली होती. त्यास संस्थानचे वतीने दि.११/०४/२०१७ रोजीचे पत्राने उत्तर पाठविणेत आले आहे. याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या तज्ञ समितीचे अहवालावर दि.०७/०४/२०१७ रोजी मा.उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

"The learned AGP has placed on record a copy of the report submitted by the Committee. The same is taken on record.

2. We would like toknow the stand of the Committee in the matter. Stand over to 21.04.2017**."**

मा.उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीचे म्हणणे न्यायालयात सादर करणेकामी दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेत निर्णय क्र.२७९ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

**"..** मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग संदर्भात मा.उच्च न्यायालयात समितीचे मत सादर करावयाचे आहे. या प्रकल्पाबाबत सविस्तर विषय चर्चेला ठेवणेत आलेला असून सदर प्रकल्प मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेमार्फत पूर्ण करायचा की, सदर प्रकल्पाबाबत करारनामा रद्द करायचा याचा निर्णय समितीने घ्यायचा आहे. यापूर्वी मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना २१,४५,००० मात्र डॉलर्सचे बिल अदा करणेत आलेले असून त्यांनी पुढील कामाचे १५,४०,००० मात्र डॉलर्स बिलाची मागणी केलेली आहे. सदर बिले या प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री.कापरे यांनी प्रमाणित केलेली आहेत. तसेच मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना पुढील काम थांबविणेत यावे, असे पत्र दि.०७.०३.२०१३ रोजी संस्थानचे वतीने देणेत आले होते. त्यामुळे मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी त्यानंतरचे काम थांबविले आहे. परंतू तत्पुर्वी त्यांनी केलेल्या कामाची व करारनाम्यातील **Payment Schedule** नुसार देय असलेल्या रकमेची मागणी केलेली आहे. सदर प्रकल्प व करारनामा रद्द झाल्यास त्यांना देय असलेल्या १५,४०,००० मात्र डॉलर्स रकमेबाबत संस्थानवर जबाबदारी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबर चर्चा/ वाटाघाटी करुन सदर प्रकल्प पूर्ण करणेबाबत समितीने निर्णय द्यावा, अशी माहिती कार्यकारी अधिकारी यांनी समिती सदस्यांना दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईगार्डन प्रकल्प लवकर कार्यान्वीत होणेकामी, तत्कालीन व्यवस्थापन समितीने लेझर शो उभारणी व त्यासाठी आवश्यक असलेले बांधकाम करणे ही दोन्ही कामे एकाच कंपनीला द्यायला हवी होती. तसेच लेझर शो उभारणीकामी मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग या कंपनीचा करारनामा व त्यामधील बीले अदायगीसाठीची कलमे सदोष असल्याचे दिसून येते. याकरीता सदर करारनामा रद्द करुन अर्बिस्ट्रेशनची प्रक्रिया सुरु करणेची कार्यवाही करणेत यावी. याचबरोबर गेल्या १० वर्षामध्ये तंत्रज्ञानामध्ये खुपच बदल झालेला असून इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किंमतीही कमी झालेल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करता, मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणेत येऊन, त्यांना अदा करण्यात आलेली बीलाची रक्कम वसूल करणेबाबत कायदेशीर कारवाई करणेत यावी व साईगार्डन प्रकल्पामधील लेझर शो उभारणीकामी विहीत पध्दतीने नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.

तसेच या प्रकरणाची निवृत्त न्यायमूर्तीमार्फत चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायमुर्तींची नेमणूक होणे व मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणे यासाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकरीता त्यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा व शासनाचे मार्गदर्शनाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी.**"** असे ठरले.

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकामी त्यांचेकडे दि.१४/०७/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता.

प्रस्तुत प्रकरणी मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांचे दि.१९/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये त्यांचेशी केलेले करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार संस्थानला टर्मिनेशन नोटीस दिलेली होती. सदर नोटीसबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी असा निर्णय झालेला आहे. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.१४/१२/२०१८ रोजीचे पत्रानुसार लेजन व्हिजन यांचेबरोबर झालेल्या करारनाम्यातील क्लॉज ३१ नुसार आर्बिट्रेशन करणेपुर्वी प्रथम Mediation साठी जाणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता.

सदर सभेत निर्णय क्रं.४१ अन्वये, संस्थानचे साईगार्डन प्रकल्पासंबधी मे.लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसीस अनुसुरुन करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे प्रथम मे.लेजर व्हिजन लि.हॉगकॉग यांना मिडीएशनची नोटीस द्यावी, असे ठरले त्यासाठी राजस्थान उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.पळशीकर यांना मिडीएटर म्हणून प्रस्तावित करावे, असे समिती सदस्य मा.अॅड. मोहन जयकर यांनी सूचविले, त्यास समितीने मान्यता दिली. तसेच मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी मिडीएशनसाठी तयारी न दर्शविल्यास करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी, असे ठरले आहे.

संस्थानचे वतीने अॅड.जुन्नरकर अॅण्ड असोशिएटस, मुंबई यांचेमार्फत लेजन व्हिजन यांना दि.११/०२/२०१९ रोजीचे पत्राने मिडीएशन करीता नोटीस दिलेली आहे. यामध्ये मिडीएटर म्हणून श्री नितिन जी ठक्कर, सिनिअर काऊंसिल, मुंबई यांची नेमणूक करणेबाबत कळविले होते. उपरोक्त प्रमाणे झालेली कार्यवाही मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेपुढे माहिती व मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. सदरहू सभेतील निर्णय क्र.१८९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे साईगार्डन प्रकल्पासंबधी मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसीस अनुसरुन करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांना संस्थानचे वतीने अॅड.जुन्नरकर अॅण्ड असोशिएटस, मुंबई यांचेमार्फत मिडीएशन करीता नोटीस देण्यात आलेली असुन त्याची नोंद घेण्यात आली. तसेच यासाठी निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.पळशीकर यांचे ऐवजी निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.ए.पी. कानडे यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली."

संस्थानचे वतीने अॅड.जुन्नरकर अॅण्ड असोशिएटस, मुंबई यांचेमार्फत लेजन व्हिजन यांना दि.१७/१०/२०१९ रोजीचे पत्राने मिडीएशन साठी त्यांनी घातलेल्या अटी अमान्य केल्या असल्याचे कळविले आहे. तसेच अॅड.जुन्नरकर अॅण्ड असोशिएटस, मुंबई यांनी दि.१८/१०/२०१९ रोजीचे पत्राने मिडीएटर श्री. नितीन ठक्कर यांना Mediation Failure Report देणेबाबत कळविले आहे.

मा. विश्वस्त श्री. मोहन जयकर यांनी त्यांचे दि.२३/१०/२०१९ रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे कळविले आहे.

*"Pursuant to the appointment of Mr. Nitin Thakker, Senior Advocate as the learned Mediator, Mr. Thakker had endeavoured to hold mediation meetings. However, M/s. Laservision Ltd., Hongkong came up with absurd suggestions and consequently the Mediator vide his Email dated 22nd October, 2019 has reported failure of the mediation proceedings. A copy of the Email sent by Mr. Thakker to M/s. Junnarkar & Associates is enclosed. Consequently stepswill now have to be taken for initiating arbitration proceedings.*

*I will now prepare a notice to be addressed to M/s. Laservision Ltd., Hongkong which will be sent through the Solicitors appointed for the Trust M/s. Junnarkar & Associates and will keep you informed of further proceedings."*

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांनी मिडीएशनसाठी तयारी न दर्शविल्यास करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी, असे ठरले आहे. विश्वस्त श्री. मोहन जयकर यांनी मे.जून्नरकर अॅण्ड असो., मुंबईयांचे मार्फत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांना अर्बिट्रेशन करणेकामी नोटीस देणेत येत असल्याचे दि.२३/१०/२०१९ रोजीचे पत्राने कळविले आहे.

तथापी आर्बिट्रेशची कार्यवाही लवकर सुरु व्हावी या करीतासंस्थानचे वतीने मा. उच्च न्यायालयात काम पहाणारे अॅड. नितीन भवर यांचेमार्फत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही सुरु करणेसाठी दि.०९/११/२०१९ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार अॅड. नितीन

भवर यांना संस्थानचे वतीने जा. क्र.३१५३/२०१९, दि.१४/११/२०१९ रोजीचे पत्राने मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशन प्रक्रियेची पुढील कार्यवाही करणेस कळविणेत आले आहे.

तसेच सदरहू प्रकरणी आता पुढील कार्यवाही ॲड. नितीन भवर, औरंगाबाद यांचेमार्फत करणेत येणार असल्याने मे. जुन्नरकर ॲण्ड असो., मुंबई यांचेमार्फत मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांना अर्बिट्रेशन करणेकामी नोटीस पाठविणेत येऊ नये अशा सुचना ॲड. श्री मोहन जयकर यांना संस्थानचे जा. क्रं.३६०५/२०१९, दि.१६/१२/२०१९ रोजीचे पत्राने देणेत आलेल्या आहेत. यावर ॲड मोहन जयकर यांनी दि.१८/१२/२०१९ रोजीचे ईमेल व्दारे खालीलप्रमाणे कळविले आहे.

"I have received your letter dated the 16th instant in connection with the arbitration to be initiated against M/s. Laseervision Ltd. HongKong. You have informed me that you have taken a decision to appoint Mr. Nitin Bhavar, Advocate to act on behalf of the Sansthan in the said arbitration.

I hope you are aware of the following:

a) The arbitration is an international arbitration.

b) That the venue of the arbitration is Mumbai.

c) The arbitration involves a claim of several crores of rupees.

d) That Mr. Kanade has already been appointed as the Arbitrator by M/s. Junnarkar & Associates pursuant to authority given by the Board.

Could you please inform me whether the instructions given by you are in abrogation of or in supersession of the decision taken by the Board.

I do not have any personal animosity against Mr. Nitin Bhavar but I am sure a dispute of this magnitude affecting the Sansthan should be dealt with deftly especially when Board after due deliberation had taken the decision to appoint M/s. Junnarkar & Associates.

You have informed me that the initiation of the arbitration proceedings has taken time, I hope you have perused the Arbitration Clause which specifically requires the process of mediation to be first gone through and it is only upon the failure in the mediation that arbitration proceedings can be commenced. The mediation proceedings which were pending before Mr. Nitin Thakkar, Senior Advocate of Mumbai High Court in Mumbai has given his Failure Report and it is pursuant thereto that the arbitration proceedings have to commence. I will therefore await your instructions. If, however, you are keen on appointing Mr. Nitin Bhavar, I have no objection and I leave it to your learned opinion.

त्यानूसार मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही संस्थानचे पॅनल वरील ॲड. नितीन भवर यांचेमार्फत करणेत यावी अथवा ॲड. श्री मोहन जयकर यांनी उपरोक्त पत्रात नमूद केलेप्रमाणे मे. जुन्नरकर ॲण्ड असो., मुंबई यांचेमार्फत करणेत येत असलेली कार्यवाही सुरू ठेवावी याबाबत निर्णय होणेसाठी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.२४/०२/२०२० रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील निर्णय क्र.१०१ अन्वये सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.

त्यानंतर मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.११/०५/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.२३७ अन्वये सदरहू विषयावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशन कार्यवाहीकरणेकामी आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्बिट्रेशन बाबत काम करणा-या वकीलांची नावे मागविणेत येऊन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव लवकरात लवकर मा. तदर्थ (Ad-hoc)समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले."*

**प्रस्ताव -** मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे उपरोक्त निर्णयानुसार मे. लेजर व्हिजन लि. हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशन कार्यवाही करणेकामी खालील आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्बिट्रेशन बाबत काम करणा-या वकीलांची नावे प्राप्त झाली आहेत.

१) अॅड. अमृत मुकुंद वेरनेकर, डब्ल्यु -०४, जिवन ज्योत, १८/२०, कावासजी पटेल रोड, फोर्ट, मुंबई - ४००००१.

२) अॅड. जुन्नरकर अॅण्ड असोसिएट्स, ३११/३१२, इंबसी सेंटर, नरीमन पॉईंट, मुंबई – ४०००२१.

३) अॅड. अशुतोष सी. गावनेकर, तिसरा मजला, रुषभ टॉवर, जकारीया क्रॉस बंदर रोड, सेवरी पश्चिम, मुंबई- ४०००१५.

४) अॅड. शारदुल सिंग, अॅडव्होकेट अली चेंबर्स, ५वा मजला, नागिनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई - ४००००१.

उपरोक्तपैकी अॅड.अमृत मुकुंद वेरनेकर,मुंबई यांनी संस्थानचे वर्ग ०४ कर्मचारी निवासस्थान इमारंतीचे बांधकाम करणेकामाचे ठेकेदार अस्मिता इडींया लि., मुंबई यांचे विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी या लवादात Sole Arbitrator Dr Justice F.I. Rebello यांचे समोर संस्थान वकिल म्हणून काम पाहिले आहे. तसेच अॅडव्होकेट वेरनेकर यांनी आतंरराष्ट्रीय पातळीवरील M/s Soma Canada Steel Inc. of Canada V/s M/s Indian Steel Corporation Ltd of India यांचे लवादात भारतीय कंपनीकडून कामकाज पाहिलेले आहे. तसेच अॅड. जुन्नरकर अॅण्ड असोसिएट्स, मुंबई हे संस्थानचे वतीने सदरहू प्रकरणी मिडीएशनसाठी वकिल म्हणून काम पाहीले आहे.

तरी मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन कार्यवाही करणेकामी वकिलाची नेमणूक करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३६६** **समितीचे सदस्य १) मा.श्री.श्रीकांत ल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर, २) मा.श्री.दिलीप स्वामी, अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक ३) मा.श्रीमती गीता बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी चर्चेअंती खालील निर्णय घेतला.**

**या विषयावर सविस्तर चर्चा झाली, यामध्ये Arbitration चे काम पाहणारे वकील नेमण्याअगोदर Arbitration & Conciliation Act चे कलम ११ प्रमाणे मे.लेजन व्हिजन लि.हॉगकॉग यांना Arbitrationचे नामनिर्देशन (nominate) करुन नोटीस देणे अपेक्षित आहे. याबाबत तदर्थ समितीचे सदस्य प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी निवृत्त न्यायमुर्ती मा.श्री.ए.एम.ढवळे यांचेशी विचारणा केली असता ते Arbitrator म्हणून काम करण्यास तयार आहेत असे त्यांनी सांगितले असल्याचे समिती समोर सांगण्यात आले. करीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संस्थानतर्फे मा.न्यायमुर्ती श्री.ए.एम ढवळे यांना dhavalearun@gmail.com या ई-मेलवर Arbitrator म्हणून काम करण्याबाबत रीतसर विनंती पाठवावी. सदरचे विषयाबाबत निर्णय दि.२४ जुलै,२०२० च्या तदर्थ समितीच्या पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल.**

**समिती सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.अरुण डोंगरे, (भा.प्र.से.) यांनी त्यांचे वस्तुस्थितीवर आधारीत खालील मत मांडले.**

**मे.लेजन व्हिजन लि.हॉगकॉग यांचेसमवेत Arbitration करणेकामी अॅडव्होकेट यांची नेमणूक करणेसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रकरणात कामकाज केलेले निवृत्त मा.उच्च न्यायालयाचे न्यायाधीश व विधिज्ञ यांचे आवश्यक फी व इतर अनुषंगीक खर्च इत्यादी बाबत वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावे व तदनंतर त्यांची नेमणूक करणेकामी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीने एकमताने निर्णय घ्यावा.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.१३** **साईगार्डन प्रकल्पाचे सिव्हील कामाचे ठेकेदार यांचे विरुध्द सिव्हील दावा दाखल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांचे सोयीसाठी मौजे निमगांव को-हाळे शिवारात संस्थान मालकीच्या गट नं.१९८,१९९, २०० व २०१ मधील एकूण २० एकर जमिनींमध्ये साई गार्डन प्रकल्पामधील सिव्हील कामांपैकील पहील्या टप्प्यातील लेजर शो करीता आवश्यक असणारे वॉटर बॉडी, प्रेक्षागृह व इतर अनुषंगिक सोयी-सुविधा (कार्यालय, नियंत्रण कक्ष, प्रसाधनगृहे, संरक्षक भिंत आदि) चे बांधकाम करणेचे काम ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांना देणेत आले होते. सदर प्रकल्पाची थोडक्यात माहीती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१. | कामाचे नांव | साईगार्डन प्रकल्पातंर्गत मुख्य इमारत व कम्पांउड भिंतीचे बांधकाम करणे. |
| ०२. | ठेकेदराचे नांव | मे. के. आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., हैद्राबाद |

| | | |
|---|---|---|
| ०३. | आर्किटेक्ट | मे. माथुर अ‍ॅण्ड काप्रे असोशिएटस्, नवी दिल्ली |
| ०४. | कार्यादेश क्र. व दिनांक | जा. क्र.२१८२/२०११, दि.०१/०८/२०११ |
| ०५. | मंजूर निविदा रक्कम | रु.३०,९५,२७,६६६/- |
| ०६. | काम पूर्ण करणेची मुदत | १२ महिने (दि.०८/०८/२०१२ अखेर) |
| ०७. | ठेकेदार यांनी केलेल्या कामापोटी अदा केलेली रक्कम | रु.८४,३२,३०२/- |
| ०८. | दंडापोटी जप्त केलेली रक्कम | रु.९८,४७,०१९/- |

ठेकेदार के.आर.आर. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांना वारंवार काम करणेची संधी देऊनही ठेकेदार सदरचे काम करणेस असमर्थ ठरल्याने प्रकल्पाचे आर्किटेक्ट यांचेमार्फत दि.०१/०६/२०१२ रोजी टर्मीनेशन पत्र देवून सदरचे काम काढून घेणेत आलेले आहे.

ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांचेकडून दंडाची रक्कम वसूल करणेसाठी निवीदेतील पृष्ठ क्र.२० शर्त क्र.०६ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

Liquidated Damages/Penalty–0.5% per day for delayed completion. The total Compensation for delay shall further be subject to an overall maximum of 10% (Ten percent) of the contract amount as awarded after which the Architect shall get the work done from any other party & deduct the sum thereafter from the main Contractors bill due on any account.

निवीदेतील उपरोक्त शर्तीनूसार ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांना प्रकल्प किमंत रु.३०,९५,२७,६६६/- मात्रचे १०% म्हणजेच रु.३,०९,५२,७६७/- मात्र दंड आकारणी करणेत आली. आर्किटेक्ट यांनी प्रमाणीत केलेनुसार ठेकेदार यांनी केलेले कामाचे अंतिम बिलापोटी उर्वरीत देय रक्कम व ठेकेदार यांची संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम मिळूण **एकुण रु.९८,४७,०१९/- मात्र संस्थानकडे जप्त करणेत आली**. दि.०४/०६/२०१३ रोजीचे पत्राने ठेकेदार यांना उर्वरित दंडाची रक्कम रु.२,११,०५,७४८/- मात्र संस्थानकडे जमा करणेबाबत कळविणे आले. त्यानंतर संस्थानचे विधी विभागामार्फत अ‍ॅड.एस.डी.कुलकर्णी, कोपरगांव यांचे सल्याने दि.०३/१२/२०१३ व दि.२८/०३/२०१४ रोजी नोटीस पाठविणेत आली होती. त्यावर ठेकेदार यांचेकडून कुठलाही प्रतीसाद न मिळाल्याने निविदेतील अटी व शर्तीनुसार दंडाची उर्वरीत रक्कम रु.२,११,०५,७४८/- तसेच याशिवाय इतर अनुज्ञेय खर्च K.R.R. Infra Project Pvt.Ltd. Hydrabad या कंपनी कडुन वसूल करणेकरीता अ‍ॅड.एस.डी.कुलकर्णी, कोपरगांव यांचेमार्फत सिव्हील कोर्टात दावा दाखल करणेबाबत कार्यवाही सुरू करणेत आली.

ठेकदार यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करणेसाठी विधी विभागामार्फत सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७०९ अन्वये ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांचेसमवेत झालेल्या करारातील Arbitration Clause वगैरे सर्व संबधीत माहितीसह सविस्तर प्रस्ताव पुढील सभेपुढे सादर करणेत यावा असे ठरले होते. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९४५ अन्वये ठेकेदार यांचेकडून उर्वरीत दंडाची रक्कम वसुल करणेकामी लवाद प्रकरण दाखल करणेत यावे असे ठरले.

दरम्यान ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांनी त्यांचे दि.१९/१२/२०१४ रोजीचे पत्राने त्यांचे कार्यालयाचा नविन पत्ता व प्रस्तुत प्रकरणी Sole Arbitrator ची संस्थानमार्फत नियुक्ती करणेबाबत कळविले.

इकडील विभागाचे दि.१६/०१/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये ठेकेदार यांचेकडून उर्वरीत दंडाची रक्कम वसूल करणेकामी लवाद प्रकरण दाखल करणेसाठी अ‍ॅड.एस.डी.कुलकर्णी, कोपरगांव यांचेकडून कायदेशीर मार्गदर्शन घेणेबाबत विधी विभागामार्फत पुढील कार्यवाही होणेस टिपणी सादर करणेत आली. त्यावर मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी Sole Arbitrator नेमणेबाबत कार्यवाही करणेबाबत निर्देश दिले.

ठेकेदार यांचे प्राप्त पत्राबाबत विधी विभागामार्फत अ‍ॅड. एस. डी. कुलकर्णी, कोपरगाव यांचा सल्ला घेणेत आला असता, अ‍ॅड.कुलकर्णी यांनी त्यांचे दि.१३/०२/२०१५ रोजीचे पत्राने "..मी के. आर.आर. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांचे दि.०५/०१/२०१५ चे पत्र पाहिले त्या पत्रात ज्या गोष्टी त्यांनी कथीत केल्या आहेत, त्यावर त्यांना संबंधीत प्रकरण विलंबीत करावयाचे आहे. संबधीत ठेकेदाराने ज्या तक्रारी खुप मोठया

विलंबाने केल्या आहेत. त्या मुदतीत नाही म्हणून के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्स प्रा.लि., हैद्राबाद यांना स्पष्ट नोटीस देऊन सिव्हील कोर्टात जाणे योग्य होईल" असा अभिप्राय दिला होता.

अ‍ॅड.एस.डी.कुलकर्णी, कोपरगांव यांनी उपरोक्त दिलेल्या अभिप्रायाबाबत विधी विभागाने दि.०६/०३/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये प्रस्तुत प्रकरणी लवाद दाखल न करता उर्वरीत दंडाची रक्कम वसूल करणेसाठी ठेकेदार यांचे विरुध्द सिव्हील कोर्टात दावा दाखल करणेस मान्यतेसाठी टिपणी सादर केली होती. त्यावर करारामध्ये लवादाची तरतुद आणि मा.व्यवस्थापन समितीचा ठरवही तसा आहे. त्यामुळे वेगळा विचार करण्याची गरज नाही. असे निर्देश तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी दिले होते.

उपरोक्त मंजूर टिपणीनुसार अ‍ॅड.एस.डी.कुलकर्णी यांना लवाद दाखल करणेबाबत विधी विभागाचे दि.२०/०३/२०१५, दि.२९/०३/२०१५, दि.२७/०५/२०१५, दि.०६/०७/२०१५, दि.३१/०७/२०१५ व दि.१६/०९/२०१५ रोजीचे पत्राने कळविणेत आले होते. पंरतु त्यांनी लवाद प्रकरण दाखल केले नाही. त्यामुळे विधी विभागाने दि.१०/१२/२०१५ रोजी सादर केलेल्या टिपणीवर सिव्हील कोर्टात दावा दाखल करणेबाबत तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी निर्देश दिले. त्यानुसार अ‍ॅड.एस.डी.कुलकर्णी यांना विधी विभागामार्फत दि.१५/०१/२०१६ रोजीचे पत्राने सिव्हील कोर्टात दावा दाखल करणेबाबत कळविणेत आले. अ‍ॅड.एस.डी.कुलकर्णी यांनी दि.२२/०४/२०१६ रोजीचे पत्राने दाव्याचा मसुदा तयार करुन दिला.

मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि., हैद्राबाद यांचे विरुध्द सिव्हील कोर्टात दावा दाखल करणे, स्टॅम्प डयुटी रक्कम रु.३ लक्ष, प्रोसेस फि रक्कम रु.१०,०००/- व वकील फी रु.५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन सिमतीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला. त्यावर दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२४ नुसार,के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि., हैद्राबाद या कंपनी विरुध्द तसेच कंपनीचे डायरेक्टर्स असे ०९ लोकां विरुध्द मे.सिव्हील जज्ज यांचे कोर्टात दावा दाखल करणेबाबतचे प्रस्तवावर मा.विश्वस्त श्री.मोहन जयकर साहेब यांचा अभिप्राय घेणेत येऊन त्यांचे अभिप्रायसह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा असे ठरले. मा.व्यवस्थापन सिमतीचे उपरोक्त निर्णयानुसार अ‍ॅड.श्री.मोहन जयकर यांचा अभिप्राय घेणेसाठी त्यांना विधी विभागामार्फत दि.१०/०९/२०१६, दि.०९/११/२०१६, दि.२५/०१/२०१७, दि.२६/०३/२०१७ व दि.०५/०४/२०१७ रोजीचे पत्राने विनंती करणेत आली. तथापी, त्यांनी अभिप्राय दिलेला नाही.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२४ चे कार्यवाही बाबत दि.१५/०६/२०१७ रोजी झालेल्या आढावा बैठकित तत्कालीन मा.अध्यक्ष साहेब यांनी के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि., हैद्राबाद या कंपनी विरुध्द तसेच कंपनीचे डायरेक्टर्स असे ०९ व्यक्ती विरुध्द मे.सिव्हील जज्ज, सिनियर डिव्हीजन, यांचे कोर्टात दावा दाखल करणेबाबत निर्देशीत केले. त्यानुसार दावा दाखल करणेसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०१ अन्वये, मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे व कंपनीचे संचालकां विरोधात मे.सिव्हील जज्ज, सिनियर डिव्हीजन यांचे कोर्टात संस्थान वकीलामार्फत दावा दाखल करणेत यावा व याकामी संस्थान विश्वस्त अ‍ॅड.मोहन जयकर यांचे मार्गदर्शन घेणेत यावे असे ठरले तसेच सदर दाव्याची प्रोसेस फी रु.१०,०००/- व स्टॅम्प डयुटीसाठी रु.३,००,०००/- याप्रमाणे वकील फी साठी येणारे अपेक्षित खर्चास मान्यता देणेत आली होती.

त्यानुसार याकामी अ‍ॅड.एस.डी.कुलकर्णी यांनी दाव्याचा मसूदा तयार केला असून त्यामध्ये संस्थानचा क्लेम खालीलप्रमाणे दाखविलेला होता.

| **Sr.No.** | **Amount in Rs.** | **Particulars** |
|---|---|---|
| A | 02,11,05,748.00 | Amount settled by the architect Mathur&KapreAsso. Pvt Ltd, New Delhi. |
| B | 22,20,00,000.00 | Loss of further income @ of Rs.1,00,000/- per day from June 2012 to June 2018. |
| C | 03,99,60,000.00 | Interest @ of 18% p.a.from the date of settlement by Mathur till June 2018. |
| D | 11,75,00,000.00 | Amount paid to laser vision Ltd; Hong-Kong as per agreement. |
| E | 09,85,60,000.00 | Unpaid amount of laser vision. |
| F | 05,91,36,000.00 | Interest towards amount of laser vision including unpaid amount. |
| G | 00,00,20,000.00 | Notice Charges. |
| | **55,82,81,748.00** | **Total Amount** |

तसेच ॲड. एस. डी. कुलकर्णी, कोपरगाव यांनी सदरहू दाव्यासाठी रु.२० लक्ष मात्र फी कळविली आहे. त्यास मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.६५३ अन्वये, मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे विरुध्द सिव्हील दावा दाखल करणेकामी ॲड.मोहन जयकर यांनी ॲड.एस.डी.कुलकर्णी यांचेशी दाव्याचे फी बाबत चर्चा करुन अहवाल सादर करावा, असे ठरले आहे.

त्यानुसार जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/४३६५/२०१८ दि.०३/१२/२०१८ रोजीचे पत्राव्दारे ॲड.मोहन जयकर यांना ॲड. एस. डी. कुलकर्णी यांचेशी दाव्याचे फी बाबत चर्चा करुन अहवाल सादर करणेबाबत विनंती करणेत आली होती. तसेच ॲड. जयकर मा. व्यवस्थापन समितीचे सभेसाठी शिर्डी येथे आले असता याबाबत त्यांचेशी चर्चा करणेत आली होती तथापी, वेळे अभावी त्यांची ॲड.एस.डी.कुलकर्णी यांचेशी चर्चा होऊ शकली नाही. करीता ॲड.मोहन जयकर यांना संस्थानचे दि.०७/०५/२०१९ व दि.१४/०९/२०१९ रोजीचे पत्राने कळविणेत आले आहे. तथापी त्यांचेकडून याबाबत अहवाल प्राप्त झालेला नाही.

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.२४/०२/२०२० रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील निर्णय क्र.१०३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"साईगार्डन प्रकल्पाचे सिव्हील कामाचे ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे विरुध्द सिव्हील दावा दाखल करणेबाबत मुदतीच्या कायद्याचे अनुषंगाने मुदतीविषयी अभ्यासपुर्वक प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती समोर सादर करण्यात यावा, असे ठरले."*

मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे उपरोक्त निर्णयानुसार मुदतीच्या कायद्याचे अनुषंगाने मुदतीविषयी माहीती कळविणेसाठी ॲड.एस.डी.कुलकर्णी, कोपरगाव यांना दि.२४/०४/२०२० रोजीचे पत्राने कळविणेत आले होते. त्यानूसार ॲड.एस.डी.कुलकर्णी यांनी मुदतीच्या कायद्याचे अनुषंगाने दि.०१/०६/२०२० रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केला आहे.

"We are in contact of the matter KRR Infra Projects Pvt. Ltd. Hydrabad since long.

Shri Sansthan passed various resolutions in connection of taking legal action against the company. Since from long the legal action is lingered due to various reasons.Since from 2014 the decision is pending due to dissolution of board of Trustees and also due to limited powers of administrative committee.Considering the entire situation how it appears that the matter seems to be beyond Law of Limitation.

Limitation for filing case against is over prior to two years. If you are willing to take legal action against the company then you will have to go for correspondence with the company you may find some way for taking legal action. According to me it is better for us to have personal talk. Sorry for inconvenience caused to you."

तरी मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.हैद्राबाद यांचे विरुध्द सिव्हील दावा दाखल करणेकामी ॲड.एस.डी.कुलकर्णी यांचे उपरोक्त अभिप्रायाचे अनुषंगाने निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे वकीलांचे मताप्रमाणे साईगार्डन प्रकल्पाचे सिव्हील कामाचे ठेकेदार मे.के.आर.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. हैद्राबाद यांचे विरुध्द दिवाणी दावा दाखल करण्याची आवश्यकता नाही, संस्थानचे वकिलांचा अभिप्राय मान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१४** **संस्थान निधीतुन शिर्डी नगरपंचायतीमार्फत शिर्डी शहरातील २४ रस्ते विकसन करणेकामी करणेत आलेल्या कार्यवाहीबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद**: अधिनियम कलम २१(२) अन्वये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"...पोटकलम (१) आणी (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल :-

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी.”

**प्रस्तावना**- शिर्डी नगरपंचायतीने दि.२०/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावात एकुण २७ रस्ते विकसनासाठी रु.१०.०१८ कोटी इतके अनुदान मिळणेबाबत विनंती केली होती. सदरहु प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीने दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेत मान्यता दिलेली आहे. दरम्यान शिर्डी नगरपंचायतीने दि.२६/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये २७ ऐवजी एकूण २४ रस्ते विकसित करणेसाठी रु.१०.०१८ ऐवजी सन २०१७-१८ चे प्रचलित ई-दरसूचीनुसार तयार केलेले रु.८,९७,८२,३००/-रकमेचे अंदाजपत्रक मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे तांत्रिक मान्यतेसह सादर केले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | रस्त्याचे नाव | लांबी मी. | रुंदी मी. | रक्कम(रु.) |
|---|---|---|---|---|
| १. | ओमसाईनगर मुख्य रस्ता (कोळेकर गल्ली चौक ते निमगाव- निघोज शिव रस्ता)–डांबरीकरण व कॉक्रीटीकरण करणे. | ५५३ | ४.५ | ४१,५२,०००/- |
| २. | स. नं. १११मधील गायकवाड वस्ती (बन रस्ता पुर्व व पश्चिम बाजु रस्ता) डांबरीकरण करणे. | ४०० | ४.५/६.० | ३३,९१,५००/- |
| ३. | स. नं. १११मधील पावलस गायकवाड वस्ती रस्ता (बन रस्ता पुर्व बाजु रस्ता) कॉक्रीटीकरण करणे. | ११० | २.८ | ९,९४,५००/- |
| ४. | पटेल कॉलनी रस्ता (१५ मी.डीपी रस्ता ते नगर मनमाड रस्ता) डांबरीकरण करणे. | २१० | ४.५ | १९,७७,९००/- |
| ५. | स. नं. १२३ मधील संदिप पारख लेआऊटमधील रस्ता ( न. म. रस्ता ते १२चारी रस्ता ) डांबरीकरण करणे. | २७५ | ८.० | ४६,२४,५००/- |
| ६. | स.नं.१४६मधील लेआऊट मधील रस्ता(नांदूर्खीरस्ता ते कॉलनी) डांबरीकरण करणे. | ३१० | ४.५ | ३०,३८,७००/- |
| ७. | झुलेलाल मंदीर लगत रस्ता (नाला रस्ता ते रमेश गोंदकर). | १४० | ५.५ | १८,१०,९००/- |
| ८. | माऊली नगर तुषार गोंदकर लगत रस्ता( इनामवाडी ते तुषार गोंदकर वस्ती) डांबरीकरण करणे. | २८० | ३.५ | २०,६७,४००/- |
| ९. | शिंदे वस्ती लगत रस्ता(चारी रस्ते रुई शीव रस्ता) डांबरीकरण करणे. | ४९० | ४.५ | ३५,७७,६००/- |
| १०. | साई पंढरीनगर रस्ता( स.नं. २७) अंतर्गत पुर्व पश्चिम रस्ता डांबरीकरण करणे. | ४२० | ४.५ | ३८,९६,४००/- |
| ११. | पिंपळवाडी रस्ता ते एस.टी.पी.प्रकल्प रस्ता डांबरीकरण करणे. | ८१० | ७.० | ९०,४२,२००/- |
| १२. | नवनाथ शेळके वस्तीलगत रस्ता (बिरेगावरस्ता ते वसाहत) डांबरीकरण करणे. | १४० | ३.५ | १०,७४,१००/- |
| १३. | भाऊसाहेब गायक वस्ती लगत रस्ता (पिंपळवाडीरस्ता ते भाऊसाहेब गायके वस्ती) डांबरीकरण करणे. | २२० | ३.५ | १६,४४,५००/- |
| १४. | सम्राटनगर रस्ता (पिंपळवाडीरस्ता ते सम्राटनगर) डांबरीकरण करणे. | २०० | ३.५ | १४,९४,७००/- |
| १५. | स.नं.४२ मधील रस्ता (बिरेगावरस्ता ते वसाहत अंतर्गत रस्ते) डांबरीकरण करणे.-कांदळकर वसाहत | ७१० | ६/४.५ | ७७,१६,७००/- |
| १६. | साईप्रयागा सिटीस.नं.६५(नालारस्ता ते वसाहत अंतर्गत रस्ते)डांबरीकरण करणे. | ५३० | ९/४.५० | ८७,४२,४००/- |
| १७. | स.नं.६६कॉलणी रस्ते (नालारस्ता ते वसाहत अंतर्गत रस्ते) डांबरीकरण करणे. | ४१० | ३.५ | २९,८८,६००/- |
| १८. | स. नं. ९० मधील मधुकर कोते लगत रस्ते (नाला रस्ते कोते वस्ती दोन रस्ते) डांबरीकरण करणे. | ३२५ | ३.५ | २२,३१,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९. | स.नं.७२ बर्डे वस्ती रस्ता (बिरोबा मदिर चौफुली ते बर्डे वस्ती) डांबरीकरण करणे.भाग -१ | ५०० | ५.५ | ४८,२७,१००/- |
| | स.नं.७२ बर्डे वस्ती रस्ता (साईट नं.५३ ते बर्डे वस्ती) डांबरीकरण करणे.भाग-२ | ८२० | ४.५० | ७७,६८,९००/- |
| २०. | शरदबाबा आश्रम रस्ता (नविन पिंपळवाडी रस्ता ते साईपदम आश्रम) डांबरीकरण करणे. | २७५ | ४.५/७.० | ३१,४२,७००/- |
| २१. | विजयशेळके वस्ती ( संभाजीनगर समोर) रस्ता (बन रस्ता ते शेळके वस्ती) डांबरीकरण करणे. | ३०० | ३.५ | २२,६६,२००/- |
| २२. | स.नं.९७ विरभद्रनगर रस्ते (बन रस्ता ते विरभद्र कॉलनी-२रस्ते) डांबरीकरण करणे. | ५१० | ४.० | ४१,८८,४००/- |
| २३. | स.नं.१२२मधीलजेजूरकर वस्ती रस्ता(स्वामी रिसोर्ट लगत रस्ता ते जेजूरकर वस्ती) डांबरीकरण करणे. | २३० | ३.५ | १८,२२,५००/- |
| २४. | स.नं.१३४मधील विजयनगर रस्ता (नांदूर्खी रस्ता ते कॉलनी) डांबरीकरण करणे. | १७० | ३.५० | १३,००,९००/- |
| | रस्त्याची एकुण लांबी | ९.३३८कि.मी. | | ८,९७,८२,३००/- |

वरील प्रमाणे २४ रस्त्याच्या कामांस शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय क्र. सासंवि-१०१८ /८१४/प्र.क्र.७१ /का.१६ दि.१० जानेवारी २०१९ अन्वये खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली आहे.

“..शिर्डी शहरातील २४ रस्त्यांच्या विकसनासाठी रु.८.९८ कोटी इतके अनुदान शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करून देण्यास तसेच कामे निविदा प्रकीयेसह शिर्डी नगरपंचायतीमार्फत करण्यास खालीलअटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येतआहे.

अट – सदर शिर्डी शहरातील २४ रस्त्यांची गुणवत्ता राखली जाईल, यांसाठी “तांत्रिक तपासणी त्रयस्थ संस्था” श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत नियुक्त करण्यात यावी....”

उपरोक्त शासन निर्णयातील अटीनुसार गुणवत्ता नियंत्रणासाठी “तांत्रिक तपासणी त्रयस्थ संस्था” संस्थानमार्फत नियुक्त करणेकामी प्रस्ताव मागविणेस व त्यासाठी येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेबाबत दि.३०/०१/२०१९ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत विषय सादर करणेत आला होता. त्यावरील निर्णय क्र.९५१ अन्वये सदरचा विषय स्थगित ठेवण्यात आला. त्यानंतर शिर्डी नगरपंचायतीने मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल केले. सदर पी.आय.एल.नं.८६/२०१८ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं.१७९१/२०२० बाबत दि.१३/०२/२०२०चे आदेशात खालील ठळक मुद्दे नमूद करण्यात आलेले आहेत. सदर आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

**06** The committee further observed thus :

“5.5 The Committee has found that all the roads from Sr No.1 to 25, except for the road at Sr. No.7 in the list (Exh.R.1) are urgently essential and necessary for civic upkeep and for maintaining the pace of development of the city. In so far as road at Sr No.7 is concerned, the Committee, felt that no concretization of the same would be required. A simple bituminous road can serve the purpose.”

08 Mr Hon, learned Senior Advocate submits before this Court that the work of roads was undertaken, tenders were floated, contract was awarded to the successful tenderer and the contractor has completed majority of the roads. The majority of the roads are completed barring 2 or 3 roads. It is the submission of Mr Hon that as the work is undertaken and nearing completion, the contractors are consistently approaching the applicant for payment of the amount due and payable to them under the terms and conditions. He further submits that the delay in releasing the funds would result in hampering the work of some of the roads and then it would lead to an extra financial burden on the applicant by paying the additional amount to the contractors and this would serve no public purpose and on the contrary, this would cause prejudice to the applicant as

well as to the residents of Shirdi town. He then submits that rider was created under the order of this Court, dated 30th January, 2019 with an intention that the amount of the Sansthan received from the devotees is not mis-utilised.

**10**. Considering all the aforesaid aspects, we are of the opinion that Mr Hon, learned Senior Advocate appearing for the applicant has made out a case and accordingly the application stands partly allowed in terms of prayer clause (A). Respondent No.3 - Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi is directed to release the funds allocated for the 25 roads under an approved amount of 8.98 Crores as per annexure 'R1' to the report of two members committee appointed by this Court.

मा. उच्च न्यायालयाचे दि.१३/०२/२०२० चे उपरोक्त आदेशाचे पार्श्वभुमीवर मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांचे दिनांक २६/०२/२०२० रोजीचे पत्रान्वये रु.८.९८ कोटी रक्कम वितरीत करणेबाबत विनंती केली होती. शिर्डी नगरपंचायतीने दि. २०/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावातील एकुण २७ रस्ते विकसनासाठी रु.१०.०१८ कोटी इतके अनुदान देणेस मा. व्यवस्थापन समितीने दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेत मान्यता दिलेली आहे. त्यानंतर नगरपंचायतीने ०३ रस्ते वगळून प्रस्तावातील एकुण २४ रस्ते विकसनासाठी रु.८,९७,८२,३००/-रकमेचे अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यास छाननी समितीचे दि. ०९/०४/२०१८ रोजीचे सभेत मान्यता दिलेली आहे. तसेच शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता प्राप्त आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार शिर्डी नगरपंचायतीस २५ रस्ते विकसनासाठी निधी अदा करणेत आला. नगरविकास विभागाचे दि.२८/०३/२०१८ रोजीचे शासन निर्णयात खालील नमूद नामिकासूचीवरील (एमपॅनेल) College of Engg. Pune (COEP) यांची "तांत्रिक तपासणी त्रयस्थ संस्था "संस्थानमार्फत नियुक्त करणेस इकडील दि.०६/०३/ २०२० रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देण्यात आली असुन नगरविकास विभागाचे उपरोक्त शासन निर्णयानुसार रु.५ ते १० कोटीचे कामासाठी कामाच्या किंमतीच्या ०.९० टक्केइतका फीचा दर नमूद केलेला असल्याने त्यानुसार रु.८.९८ कोटी रकमेवर फीची पुर्णांकीत रक्कम रु.८,०८,२००/- इतकी रक्कम College of Engg. Pune COEP यांना द्यावी लागणार असल्याने सदरची रक्कम रु.८.९८ कोटी मधून वजा करून उर्वरीत रक्कम रु.८,८९,९१,८००/- शिर्डी नगरपंचायतीस अदा करणेत आली आहे.

मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत यांनी दि.०३/०६/२०१९ रोजीचे पत्राने सदरहु कामाचा कार्यादेश पाठविला असून काम प्रगतीत असून "तांत्रिक तपासणी त्रयस्थ संस्था "संस्थानमार्फत नियुक्त करणेबाबत कळविले आहे.शिर्डी नगरपंचायतीचेउपरोक्त २५ रस्ते विकसनाचेत्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षणCollege of Engg. Pune (COEP) यांचेकडून करून घेणेकामी तसेच त्यांना कामाच्या किंमतीच्या ०.९० टक्के इतक्याशासनमान्य दराने फी अदा करता येत असुन त्यासाठी College of Engg. Pune (COEP) यांचेकडून करून घेणेकामी त्यांना कार्यादेश देणेत आला आहे.

प्रस्ताव- तरी संस्थान निधीतून शिर्डी नगरपचायतीमार्फत शिर्डी शहरातील २४ रस्ते विकसन करणेकामी करणेत आलेल्या कार्यवाहीचा उपरोक्तप्रमाणे अहवाल माहिती तथा मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निधीतुन शिर्डी नगरपंचायतीमार्फत शिर्डी शहरातील २४ रस्ते विकसन करणेसाठी करण्यात आलेल्या कार्यवाहीचे संबंधीतांनी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर justification द्यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१५** **पत्रव्यवहार, नाव व पत्ता बदलाबाबत श्री.अभिजित देविदास शिंदे, रा.श्रीरामपूर यांचे दि.०७.११.२०१९ रोजीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना**– मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.८० व ८५ मधील साईप्रसादालय इमारतीतील पहिल्या मजल्यावरील ७२०० चौ.फुट क्षेत्रफळ असलेली जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मधील तरतुदीनुसार श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांना **"ऐतिहासिक वस्तु व शस्त्रास्त्रे यांचे कलादालन व प्रदर्शन"** मांडण्याकरीता ११ महिन्यांच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर ११ वेळा वाढवून देण्यास काहीअटी व शर्तींवर मान्यता देण्यात आलेली आहे.

संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.५२ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"ऐतिहासिक वस्तु,शस्त्रास्त्रे,कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता श्री.अभिजित देविदास शिंदे, रा.श्रीरामपूर यांना संस्थान मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील साईप्रसादालय इमारतीतील वापरास दिलेल्या जागेचे दि.३१/०१/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ या ११ महिने कालावधीसाठीचे भाडेदराप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांचेकडून उक्त कालावधीसाठीची रक्कम रु.१,१०,०००/- इतकी त्यांनी उपरोक्तप्रमाणे दि.२५/१०/२०१७ रोजी संस्थानकडे जमा केलेल्या रक्कम रु.१,५०,८४०/- मधून वजा करुन उर्वरित रक्कम पुढील कालावधीसाठीच्या भाडे रकमेतून हिशोबित करुन समायोजित करणेस मान्यता देण्यात आली.

उपरोक्त जागा वापराची मुदत दि.०१/०१/२०१८ ते दि.३०/११/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी पूर्वीचे भाडेदराची रक्कम रु.१०,०००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच दरमहा रक्कम रु.११,०००/- इतके भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देणेस व करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच दि.०१/१२/२०१८ ते दि.३१/१०/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी यापूर्वीची भाडे रक्कम रु.११,०००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच दरमहा रक्कम रु.१२,१००/- इतके भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील जा.क्रं.सामंवि-१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ रोजीचे पत्रातील अटी व शर्तीस अधीन राहुन मुदतवाढ देणेस व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली."

सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही अलाहिदा करणेत आलेली असून श्री.अभिजित देविदास शिंदे यांना उक्त कारणासाठी वापरास दिलेल्या संस्थानच्या उक्त मिळकतीच्या वापराचा दि.०१/१२/२०१८ ते दि.३१/१०/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठीचा करारनामा दि.३०/१०/२०१९ रोजी अलाहिदा करणेत आलेला आहे.

तदनंतर श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी दि.०७/११/२०१९ रोजीचा पत्रव्यवहार व नाव व पत्ता बदलाबाबत इकडेस अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "मला शासनाचे मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई यांचेकडील पत्र जा.क्रं सासंवि/१०१६/८४०/प्र.कं.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ अन्वये शिर्डी संस्थानच्या मौजे निमगांव-को-हाळे, ता.राहाता येथील श्री साईप्रसादालय इमारतीतील आय.टी. विभागाशेजारील असलेली जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) (सुधारणा) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मधील तरतुदीनुसार सदर जागा ही ऐतिहासिक वस्तु व शस्त्रास्त्रे यांचे प्रदर्शन मांडण्याकरीता ११ महिन्यांच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर ११ वेळा वाढवून देण्यात आली आहे. सदर शस्त्र संग्रहालयासाठी महाराष्ट्र शासन वस्तु व वास्तु संग्रहालय पुरातत्व विभाग यांची मला शिवसृष्टी संग्रहालयासाठी परवानगी मिळालेली आहे. याची प्रत मालमत्ता विभागास दिलेली आहे. तरी यापुढे पत्रव्यवहार करतांना पुढीलप्रमाणे (**"शिवसृष्टी संग्रहालय"**) c/o Pro.अभिजीत शिंदे, श्री साई प्रसादालय इमारत, आय.टी.विभागा शेजारी, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर या नावानेच सदर जागेचे १) लाईटबील २) जागा भाडे पावती ३) संस्थानकडून होणारा पत्रव्यवहार या ठिकाणी या नावाने करण्यात यावा, ही विनंती" असेबाबत नमुद केलेले आहे.

श्री.अभिजित देविदास शिंदे यांचे उपरोक्त अर्जाचे अनुषंगाने पत्रव्यवहार व नाव व पत्ता बदलाबाबतची विनंती मान्य अथवा अमान्य करणेच्या निर्णयार्थचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.२७/०३/२०२० रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.१९० प्रमाणे "सदरचा विषय संपूर्ण तपशिलासह मा.तदर्थ समितीच्या पुढील सभेसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले,"असा झालेला आहे.

मा.तदर्थ समितीचे दि.२७/०३/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१९० चे अनुषंगाने सादर करणेत येते की, मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-१०१६/ ८४०/ प्र.क्र. ११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.८० व ८५ मधील साईप्रसादालय इमारतीतील पहिल्या मजल्यावरील ७२०० चौ.फुट क्षेत्रफळ असलेली जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था(शिर्डी) (सुधारणा) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मधील तरतुदीनुसार श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांना "ऐतिहासिक वस्तुव शस्त्रास्त्रे यांचे कलादालन व प्रदर्शन" मांडण्याकरीता ११ महिन्यांच्या लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर ११ वेळा वाढवून देण्यास काही अटी व शर्तींवर मान्यता देण्यात आलेली आहे.

शासन निर्णय व मा.व्यवस्थापन समितीचे वेळोवेळी झालेल्या निर्णयाप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांना उक्त  कारणासाठी वापरास दिलेल्या संस्थानच्या उक्त मिळकतीच्या वापराचा दि.०१/१२/२०१८ ते दि.३१/१०/२०१९ या ११ महिने कालावधीसाठीचा करारनामा दि.३०/१०/२०१९ रोजी अलाहिदा करणेत आलेला आहे.

उक्त करारनाम्याप्रमाणे सदर जागा वापराची मुदत दि.३१/१०/२०१९ रोजी संपुष्टात येत असलेने जागा वापराची पुढील मुदत दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० या ११ महिन्यांचे कालावधीसाठी तिसरी मुदतवाढ मिळणेकामी श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी त्यांचेकडील दि.१४/१०/२०१९ रोजीचे अर्जान्वये संस्थानकडे विनंती केली असून त्यात त्यांनी "महाराष्ट्र शासन यांचा दि.२२/१०/२०१८ रोजीचा निर्णय क्रं.सासंवि-१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६ नुसार त्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीची नवीन श्री साई प्रसादालय येथील जागा ११ महिन्यांचे लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर ११ वेळा वाढवून भाडेतत्वावर संग्रहालय (Museum) साठी वापरणेकामी दिलेली आहे. सदर जागेचा करार क्रं.२ रा दि.३१/१०/२०१९ रोजी त्याची मुदत संपत असल्याने पुढील कालावधीचा म्हणजेच तिसरा करार करणेस विनंती आहे," असे नमुद केलेले आहे.

अर्जदार श्री.अभिजित देविदास शिंदे यांचे उपरोक्त दि.१४/१०/२०१९ रोजीचे अर्जातील विनंतीप्रमाणे व मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील पत्र जा.क्रं.सासंवि-१०१६/८४०/ प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने ऐतिहासिक वस्तु,शस्त्रास्त्रे,कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांना वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील गट नं.८० व ८५ पै. यामधील साईप्रसादालय इमारतीतील पहिल्या मजल्यावरील आय.टी.विभागाशेजारी असलेला हॉल अंदाजे रुंदी दक्षिणोत्तर ६० फुट व लांबी पूर्व-पश्चिम १२० फुट याचे साधारणत: क्षेत्रफळ ७२०० चौ.फुट या जागेच्या वापराची तिसरी मुदतवाढ दि.०१/११/२०१९ ते दि.३०/०९/२०२० या ११ महिने कालावधीसाठी, यापूर्वीची मासिक भाडेदराची रक्कम रु.१२,१००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रु.१२,१००/-+ रु.१,२१०/- अशी एकुण रक्कम रु.१३,३१०/- इतकी आकारुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देणेच्या व यापूर्वीप्रमाणेच लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.५१० प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, तसेच सर्व वाचन केले व ऐकले असता असे दिसून येते की,सदरचे प्रदर्शन पाहण्यासाठी प्रवेश शुल्क आकारण्यात येते. याचा अर्थ असा की, नाममात्र शुल्कावर दिलेल्या इमारतीचा उपयोग वाणिज्यीक कारणासाठी केला जातो. येथे नमुद करावेसे वाटते की,शासनाने जा.क्रं.सासंवि-१०१६/८४०/ प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ चे पत्रान्वये खालील अटी शर्तीवर परवानगी दिलेली होती.

अ) प्रत्येक वेळी लिव्ह अॅण्ड लायसन्स करार करतांना मागील वर्षाच्या भाडयात १०% वाढ करण्यात यावी.

ब) या कलादालनात व प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या वस्तू या शिवकालीन व पुरातन असल्याचा उल्लेख करारनाम्यात करण्यात येणार नाही.

क) कोणत्याही व्यक्तीने या कलादालनात प्रदर्शनासाठी ठेवलेल्या वस्तू या शिवकालीन किंवा पुरातन नाहीत याबाबत घेतलेल्या  कोणत्याही आक्षेपा संदर्भात फक्त लायसेन्सी हेच जबाबदार असतील.

ड) सदर कलादालन/प्रदर्शनामुळे भविष्यात काही कायदेविषयक बाबी किंवा अन्य कारणास्तव होणा-या नुकसानीची,खर्चाची संपूर्ण भरपाई लायसेन्सीने संस्थानला करुन देणे आवश्यक राहील.

शासनाचे जा.क्रं.सासंवि-१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ चे पत्र समितीच्या निदर्शनास आणून दिले. जर ११ महिन्याच्या Licence प्रमाणे पुढील दहा वर्ष मुदतवाढ सदर पत्राद्वारे दिली तर ती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) चे उल्लंघन होणारे ठरेल व तसे करणे हे कायद्याच्या कलमांशी प्रतारणा करणारे ठरेल,असे समितीला वाटते.

सदरची इमारत श्री साई मंदिरापासून १ किमी. अंतरावर आहे. समितीने सर्व बाबींचा साकल्यपुर्ण विचार केला. सदरची जागा ही ७२०० चौ.फुट आहे व त्याचा वाणिज्यिक वापर दिसून येतो. अशा परिस्थितीत सदरची जागा नाममात्र शुल्कावर पुढील कालावधीसाठी देणे संस्थानच्या आर्थिक हिताच्या आड येण्याची शक्यता आहे,असे वाटते. अशा परिस्थितीत सदरच्या कराराची मुदत ऑक्टोबर २०१९ मध्ये संपलेली असल्याने श्री.शिंदे यांना लगेचच जागा खाली करा असे सांगणे उचित होणार नाही. करिता समिती सर्वानुमते असा निर्णय घेते की,

१) श्री.शिंदे यांचेकडून नोव्हेंबर २०१९ पासून ३१ मार्च २०२० पर्यंत पाचपट जास्त म्हणजेच दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र (१२,१००x५) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे असे शुल्क आकारण्यात येईल व असे शुल्क देण्यास ते तयार आहेत का? अशी विचारणा त्यांचेकडे करावी व त्यांनी त्यास तयारी दर्शविल्यास ३१ मार्च २०२० पर्यंत मुदतवाढ दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे या शुल्कावर द्यावी व पुढील कार्यवाही करावी.

२) सदर जागेचा सध्यस्थितीतील वाणिज्यीक वापरासाठीचा बाजारातील दर किती आहे याची पडताळणी संबंधीत विभागाकडून करावी व तसा अहवाल समितीला सादर करावा. त्यानंतर योग्य तो निर्णय समिती घेईल.

३) श्री.शिंदे यांना वरील क्रं.१ मधील नमुद बाब मान्य नसल्यास डिसेंबर २०१९ अखेर सदरची जागा खाली करण्यासाठी नोटीस श्री.शिंदे यांना द्यावी व सदरची जागा खाली करुन घेण्याची कारवाई करावी,असे सर्वानुमते ठरले.”

उक्त निर्णयाप्रमाणे १) श्री.अभिजित देविदास शिंदे हे माहे नोव्हेंबर २०१९ पासून ३१ मार्च २०२० पर्यंत पाचपट जास्त म्हणजेच दरमहा भाडे रक्कम रु.६०,५००/- मात्र (१२,१००x५) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे होणारे वेगळे शुल्क देण्यास तयार आहेत काय याबाबत श्री.अभिजित देविदास शिंदे यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/३७५८/२०१९ दि.२६/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये विचारणा करण्यात आली.
तदनुषंगाने श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी त्यांचेकडील दि.२८/१२/२०१९ रोजीच्या अर्जान्वये आपण शिवसृष्टीच्या वापरासाठी दिलेल्या साईप्रसादालयाच्या इमारतीतील जागेच्या संदर्भात दिलेल्या पत्रान्वये आमचे म्हणणे सादर करणेकामी दोन दिवसांची मुदत दिलेली आहे. मात्र सध्या नवीन वर्षानिमित्त शिर्डी येथे असलेली भाविकांची गर्दी विचारात घेता तसेच शिवसृष्टी संग्रहालयाचे सामाजिक,धार्मिक,ऐतिहासिक महत्व लक्षात घेवून याबाबत खुलासा देणेकामी किमान एक महिना मुदत मिळावी, असेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. सदरचा अर्ज मा.तदर्थ समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत आला.

तसेच सदर जागेचे वाणिज्यिक प्रयोनासाठीचे मासिक भाडेदराचे प्रमाणपत्र मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर यांचेकडून प्राप्त करुन घेतले असून मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर यांनी त्यांचेकडील दि.२७/१२/२०१९ रोजीचे डिजीटल भाडे प्रमाणपत्र निर्गत केलेले आहे. तदनुसार उक्त जागेचे मासिक भाडे रक्कम रु.८८,०२२/- (अक्षरी रु.अठ्ठयाऐंशी हजार बावीस मात्र) इतके निश्चित केलेले आहे.

दरम्यानचे काळात मा.तदर्थ समितीचे उपरोक्त दि.०४/१२/२०१९ रोजीच्या सभेतील उपरोक्त निर्णय क्रं.५१० चे अनुषंगाने श्री.अभिजित शिंदे यांनी दि.२५/०१/२०२० रोजीच्या अर्जान्वये सादर केलेला खुलासा मा.तदर्थ समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आलेला असून त्यात **आयत्या वेळचा** विषय नं.१ निर्णय क्रं.८७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा झाली. प्रस्तुत प्रकरणी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५१० अन्वये श्री.शिंदे यांचेकडून नोव्हेंबर २०१९ पासून ३१ मार्च २०२० पर्यंत पाचपट जास्त म्हणजेच दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र (१२,१००x५) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे असे शुल्क आकारण्यात यावे तसेच सदर जागेचा सध्यस्थितीतील वाणिज्यिक वापरासाठीचा बाजारातील दर किती आहे याची पडताळणी संबंधीत विभागाकडून करावी व तसा अहवाल समितीला सादर करावा,असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाबाबत श्री.शिंदे यांना दि.२६/१२/२०१९ रोजी पत्र देण्यात आले होते. यावर श्री.शिंदे यांनी दि.२५/०१/२०२० रोजीचे पत्रान्वये मा.तदर्थ (Ad-hoc) समिती जो निर्णय घेईल तो मान्य असेल असे कळविले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरहू जागेबाबत दि.२२/०१/२०२० रोजी दिलेल्या मासिक भाडेदराचे प्रमाणपत्रानुसार रक्कम रु.८८,०२२/- इतके दर निश्चित केले आहे. मालमत्ता विभागाचे प्रशासकीय अधिकारी श्री.किसवे यांनी समितीचे असे निदर्शनास आणून दिले की,सदरची जागा श्रीं चे मंदिरापासून १ किमी.अंतरावर श्री साई प्रसादालयाचे इमारतीमध्ये आहे व सध्यस्थितीत सदरहू जागेचा बाजारभावाप्रमाणे वाणिज्यिक वापराचा दर रु.१ लाख पेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.

अशा सर्व परिस्थितीत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५१० याद्वारे रद्द करण्यात येत आहे व श्री.शिंदे यांना मान्य असल्यास दि.०१ मार्च २०२० पासून पुढील ११ महिने कालावधीसाठी म्हणजेच दि.३१ जानेवारी २०२१ पर्यंत दरमहा रक्कम रु.१,००,०००/- मात्र परवान शुल्क ॲडव्हान्समध्ये संस्थानकडे जमा करणेच्या व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे या अटीवर सदरची जागा वापरास देत असल्याचे व याबाबत आपली अनुमती दि.१५ फेब्रुवारी २०२० चे आत कळवावी असे श्री.शिंदे यांना कळविण्यात यावे. श्री.शिंदे यांची संमती असल्यास पुढील कार्यवाही करण्यात यावी. तसेच श्री.शिंदे यांची संमती न आल्यास दि.२९ फेब्रुवारी २०२० पर्यंत सदरची जागा खाली करुन घेण्यात यावी, असे ठरले.

तदनंतर मा.तदर्थ समितीचे दि.२४/०२/२०२० रोजीचे सभेतील आयत्या वेळचा विषय नं.३ निर्णय क्रं.१६३ अन्वये उपरोक्त निर्णय क्रं.८७ वर चर्चा करणेत येवून खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

“प्रस्तुत प्रकरणी मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५१० अन्वये श्री.शिंदे यांचेकडून नोव्हेंबर २०१९ पासून ३१ मार्च २०२० पर्यंत पाचपट जास्त म्हणजेच दरमहा रक्कम रु.६०,५००/- मात्र (१२,१००x५) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे असे शुल्क आकारण्यात यावे तसेच सदर जागेचा सध्यस्थितीतील वाणिज्यिक वापरासाठीचा बाजारातील दर किती आहे याची पडताळणी संबंधीत विभागाकडून करावी व तसा अहवाल समितीला सादर करावा,असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाबाबत श्री.शिंदे यांना दि.२६/१२/२०१९ रोजी पत्र देण्यात आले होते. यावर श्री.शिंदे यांनी दि.२५/०१/२०२० रोजीचे पत्रान्वये मा.तदर्थ (Ad-hoc) समिती जो निर्णय घेईल तो मान्य असेल,असे कळविले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सदरहू जागेबाबत दि.२२/०१/२०२० रोजी दिलेल्या मासिक भाडेदराचे प्रमाणपत्रानुसार रक्कम रु.८८,०२२/- इतके दर निश्चित केले आहे. मालमत्ता विभागाचे प्रशासकीय अधिकारी श्री.किसवे यांनी समितीचे असे निदर्शनास आणून दिले की,सदरची जागा श्रीं चे मंदिरापासून १ किमी.अंतरावर श्री साई प्रसादालयाचे इमारतीमध्ये आहे व सध्यस्थितीत सदरहू जागेचा बाजारभावाप्रमाणे वाणिज्यिक वापराचा दर रु.१ लाख पेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.

अशा सर्व परिस्थितीत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५१० नुसार श्री.शिंदे यांना वापरास दिलेल्या संस्थान मालकीच्या उपरोक्त मिळकतीचे दि.०१/११/२०१९ ते दि.३१/०३/२०२० याकालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.६०,५००/- व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारणेत येऊन सदर कालावधीसाठीचा पूर्वीप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा श्री.शिंदे यांचेकडून करुन घेण्यात यावा,असे ठरले.

तसेच श्री.शिंदे यांना मान्य असल्यास दि.०१ एप्रिल २०२० पासून पुढील ११ महिने कालावधीसाठी म्हणजेच दि.२८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत दरमहा रक्कम रु.१,००,०००/- मात्र परवाना शुल्क ॲडव्हान्समध्ये संस्थानकडे जमा करणेच्या व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे या अटीवर सदरची जागा वापरास देत असल्याचे व याबाबत आपली अनुमती दि.१५ मार्च २०२० चे आत कळवावी,असे श्री.शिंदे यांना कळविण्यात यावे. श्री.शिंदे यांची संमती असल्यास

पुढील कार्यवाही करण्यात यावी. तसेच श्री.शिंदे यांची संमती न आल्यास दि.३१ मार्च २०२० पर्यंत सदरची जागा खाली करुन घेण्यात यावी,” असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/४९२८ /२०२० दि.१६/०३/२०२० रोजीच्या पत्रान्वये ऐतिहासिक वस्तू,शस्त्रास्त्रे,कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीची मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील साईप्रसादालय इमारतीतील वापरास दिलेल्या जागेच्या वापराचे दि.०१/११/२०१९ ते दि.३१/०३/२०२० या कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.६०,५००/- व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारणेच्या अटीवर सदर कालावधीसाठीचा पूर्वीप्रमाणेच लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा तात्काळ करुन देणेत यावा,असे बाबत कळविणेत आले.

तसेच दि.०१ एप्रिल २०२० पासून पुढील ११ महिने कालावधीसाठी म्हणजेच दि.२८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत दरमहा रक्कम रु.१,००,०००/- मात्र परवाना शुल्क ॲडव्हान्समध्ये संस्थानकडे जमा करणेच्या व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारणेच्या अटीवर सदरची जागा आपणास वापरास देण्यास उपरोक्त निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर निर्णयास आपली अनुमती असल्यास दि.१५ मार्च २०२० चे आत इकडेस कळवावे. सदर निर्णयास आपली अनुमती नसल्यास दि.३१ मार्च २०२० पर्यंत सदरची जागा खाली करुन देण्यात यावी,असेबाबत कळविणेत आलेले आहे.

सदर निर्णयाप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी दि.०१/११/२०१९ ते दि.३१/०३/२०२० या कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.६०,५००/- प्रमाणे संस्थानचे लेखाशाखा विभागाकडे अलाहिदा जमा केलेले आहेत.

तसेच श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांनी इकडील उपरोक्त दि.१६/०३/२०२० रोजीच्या पत्राचे अनुषंगाने "दि.०१/०४/२०२० पासून रु.१,००,०००/- चा जो भाडेवाढीचा निर्णय सध्यस्थितीत मान्य असेल. आपण या संग्रहालयाचे ऐतिहासिक,सामाजिक व शैक्षणिक महत्व लक्षात घेवून योग्य तो निर्णय घ्याल,अशी आशा मी बाळगतो,"वगैरेबाबत त्यांचेकडील दि.१६/०३/२०२० रोजीचे अर्जान्वये इकडेस कळविलेले आहे.

यापूर्वी श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी पत्रव्यवहार व नाव व पत्ता बदलाबाबत दि.०७/११/२०१९ रोजीचा इकडेस अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "मला शासनाचे मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील पत्र जा.क्रं सासंवि/१०१६/८४०/प्र.कं.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ अन्वये शिर्डी संस्थानच्या मौजे निमगांव-को-हाळे,ता.राहातायेथील श्री साईप्रसादालय इमारतीतील आय.टी. विभागाशेजारील असलेली जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) (सुधारणा) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मधील तरतुदीनुसार सदर जागा ही ऐतिहासिक वस्तु व शस्त्रास्त्रे यांचे प्रदर्शन मांडण्याकरीता ११ महिन्यांच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर ११ वेळा वाढवून देण्यात आली आहे. सदर शस्त्र संग्रहालयासाठी महाराष्ट्र शासन वस्तु व वास्तु संग्रहालय पुरातत्व विभाग यांची मला शिवसृष्टी संग्रहालयासाठी परवानगी मिळालेली आहे. याची प्रत मालमत्ता विभागास दिलेली आहे. तरी यापुढे पत्रव्यवहार करतांना पुढीलप्रमाणे (**"शिवसृष्टी संग्रहालय")** c/o Pro. अभिजीत शिंदे, श्री साईप्रसादालय इमारत, आय.टी.विभागा शेजारी, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर या नावानेच सदर जागेचे १) लाईटबील २) जागा भाडे पावती ३) संस्थानकडून होणारा पत्रव्यवहार या ठिकाणी या नावाने करण्यात यावा,ही विनंती" असेबाबत नमुद केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय-सध्यस्थितीत श्री.अभिजित देविदास शिंदे यांचा पत्रव्यवहाराचा पत्ता खालीलप्रमाणे आहे.

"श्री.अभिजित देविदास शिंदे,गंगोत्री निवास,वॉर्ड नं.७,थत्ते ग्रांऊंडजवळ , मु.पो.ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर" आता श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.०७/११/२०१९ रोजीच्या अर्जान्वये यापुढील पत्रव्यवहार करतांना खाली नमुद केलेल्या पत्त्याप्रमाणे करणेत यावा,असेबाबत विनंती केलेली आहे.

"शिवसृष्टी संग्रहालय, c/o Pro.अभिजीत शिंदे, श्री साई प्रसादालय इमारत,आय.टी. विभागाशेजारी, मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

तथापि मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील उपरोक्त दि.२२/१०/२०१८ रोजीच्या पत्रात उपरोक्त जागा वापराबाबत श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपुर यांना "ऐतिहासिक वस्तु व शस्त्रास्त्रे यांचे कलादालन व प्रदर्शन"असा नामोल्लेख केलेला आहे व सदर प्रदर्शन मांडण्याकरीता ११ महिन्यांच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर ११ वेळा वाढवून देण्यास अटी व शर्तींवर मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच शासनाकडील सदर पत्रातील अट (ब) मध्ये या कलादालनात व प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या वस्तु या शिवकालीन व पुरातन असल्याचा उल्लेख करारनाम्यात करण्यात येणार नाही,अशी अट नमुद केलेली आहे.

अशा परिस्थितीत उपरोक्त विवेचनावरुन अर्जदार श्री.अभिजित देविदास शिंदे यांचे दि.०७/११/२०१९ रोजीच्या अर्जातील पत्रव्यवहार व नाव व पत्ता बदलाबाबतची विनंती मान्य करता येणार नाही.

**प्रस्ताव**– श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांचे दि.०७/११/२०१९ रोजीच्या अर्जातील पत्रव्यवहार व नाव व पत्ता बदलाबाबतची विनंती अमान्य करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६९ सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१६ संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वीत करणेबाबतच्या मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०६.११.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९८६ मध्ये अशंत: दुरुस्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम ३(२) मध्ये नियत दिवशी, पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेची स्थावर किंवा जंगम अशी सर्व मालमत्ता (सर्व मत्ता, हक्क, दायित्वे व बंधने यांसह) या अधिनियमान्वये संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे हस्तांतरीत व निहित होईल आणि समितीच्या वतीने कार्यकारी अधिका-यास त्या दिवसापासून त्या मालमत्तेचा ताबा घेण्याचा व तिचे व्यवस्थापन करण्याचा हक्क असेल,असे नमुद आहे.

तसेच उक्त अधिनियमाचे कलम ४(३) मध्ये संस्थान विश्वस्तव्यवस्थेत विहित केलेल्या संपूर्ण स्थावर व जंगम मालमत्तेची, प्रत्येक मालमत्तेचे तपशिलवार वर्णन व अदमासे किंमत दर्शविणारी सुची तयार करील आणि तिची प्रत नियत दिनांकापासून ९० दिवसांचे आत धर्मादाय आयुक्त आणि प्रधान सचिव व विधी परामर्शी,विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करील. मालमत्तांची मुळ सुची संस्थान व्यवस्थेच्या कार्यालयामध्ये कायमस्वरुपी जतन करुन ठेवण्यात येईल. याची जबाबदारी कार्यकारी अधिका-यांवर सोपविण्यात आलेली आहे.

आणि कलम ४(४) मध्ये पोटकलम (१) किंवा (२) अन्वये तरतुद केल्याप्रमाणे कोणत्याही मालमत्ता सुपूर्द किंवा हस्तांतरीत करण्यात आली असेल त्याबाबतीत कार्यकारी अधिकारी वस्तुसुचीची यथोचित पडताळणी केल्यानंतर हस्तांतरकास त्याची योगय ती लेखी पावती देईल आणि त्यानंतर अशा मालमत्तेच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी कार्यकारी अधिकारी जबाबदार असेल,अशी तरतुद आहे.

प्रस्तावना-पूर्वपिठीका- यापूर्वी मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था,अधिनियम १९५० अन्वये शिर्डी, जि.अहमदनगर येथील श्री साईबाबा शिर्डी संस्थान या नावे नोंदणी झालेली होती. श्री शिर्डी साईबाबा संस्थानची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करण्याकरीता आणि विश्वस्तव्यवस्थेला जनतेसाठी अधिक व्यापक कल्याणकार्य हाती घेणे शक्य व्हावे म्हणून तिचे अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापन,प्रशासन,शासन व नियंत्रण करण्यासाठी तरतुद करण्याकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) अधिनियम २००४ चा दि.२३/०८/२००४ रोजी पासून अंमलात आलेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम ३(२) मध्ये नियत दिवशी,पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेची स्थावर किंवा जंगम अशी सर्व मालमत्ता (सर्व मत्ता,हक्क,दायित्वे व बंधने यांसह) या अधिनियमान्वये संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे हस्तांतरीत व निहित होईल आणि समितीच्या वतीने कार्यकारी अधिका-यास त्या दिवसापासून त्या मालमत्तेचा ताबा घेण्याचा व तिचे व्यवस्थापन करण्याचा हक्क असेल,असे नमुद आहे.

तसेच उक्त अधिनियमाचे कलम ४(३) मध्ये संस्थान विश्वस्तव्यवस्थेत विहित केलेल्या संपूर्ण स्थावर व जंगम मालमत्तेची, प्रत्येक मालमत्तेचे तपशिलवार वर्णन व अदमासे किंमत दर्शविणारी सुची तयार करील आणि तिची प्रत नियत दिनांकापासून ९० दिवसांचे आत धर्मादाय आयुक्त आणि प्रधान सचिव व विधी परामर्शी,विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करील. मालमत्तांची मुळ सुची संस्थान व्यवस्थेच्या कार्यालयामध्ये कायमस्वरुपी जतन करुन ठेवण्यात येईल. याची जबाबदारी कार्यकारी अधिका-यांवर सोपविण्यात आलेली आहे.

मात्र त्यावेळेस अभिलेखाचे योग्यरितीने जतन करणे व नोंदी वेळोवेळी अद्ययावत करणे अशी व्यवस्था केंद्रीभुतरित्या अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आलेने व शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असलेने साईभक्तांना मुलभूत सेवा सुविधा पुरविणेकामी संस्थानला मोठया प्रमाणात जागेची आवश्यकता भासल्याने, याकरीता संस्थानने शिर्डी व परिसरातील गावांमधील जमीनी भुसंपादनाने तसेच खरेदीने घेतलेल्या आहेत. या सर्व मालमत्तेचे व्यवस्थापन व संरक्षण करणे, त्यावर काही अतिक्रमण होवू नये यासाठी आवश्यक ती संरक्षण व्यवस्था उभारणे, माहिती फलक लावणे तसेच संस्थानने पूर्वी भाडेपट्टयावर दिलेल्या मालमत्तेचे आवश्यक असल्यास प्रचलित दराने नुतनीकरण करणे अथवा गरजेनुसार

त्याच्या उचित प्रयोजनासाठी विनियोग करणे इ. कामांचे महत्व व व्याप्ती ही मोठया प्रमाणात असल्याचे निदर्शनास आले.

त्यावेळेस संस्थानच्या सर्व मिळकतीचे रेकॉर्ड विधी विभागाकडे होते. याशिवाय संस्थानचे सर्व कायदेविषयक कामे ही विधी विभागामार्फत केली जात होती. त्यामुळे संस्थानच्या मिळकतीबाबत योग्य नियोजन करणे,देखभाल ठेवणे,वेळोवेळी मिळकतींना भेटी देणे, त्याबाबत असलेल्या अडीअडचणी दुर करणे,याबाबतची माहिती अद्ययावत ठेवणे,संस्थानच्या चल अचल मालमत्तेची माहिती मा.व्यवस्थापन समिती व कार्यकारी अधिकारी यांना उपलब्ध करुन देणे इ.कामे करणेस तत्कालीन यंत्रणा सक्षम नसल्याचे निदर्शनास आलेने उपरोक्त सर्व कामकाज करणेकामी स्वतंत्र विभाग आवश्यक असलेचे निदर्शनास आलेने संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वित करणेकामीचा प्रस्ताव संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. त्यात निर्णय क्रं.९८६ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

संस्थानच्या चल-अचल मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच या विभागाकरीता एक विभाग प्रमुख,एक जमीन मोजणीदार,एक वरिष्ठ लिपीक,एक लिपीक व एक मदतनीस इ. आवश्यक कर्मचारी संस्थान कर्मचा-यांमधून देण्यात यावे,असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे संस्थानचे सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्रं.एसएसएस/वशी-०१/३८३८/२०१४ दि.१९/११/२०१४ रोजीच्या आदेशान्वये संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वित करणेत आलेला आहे.

तदनुसार दि.१९/११/२०१४ पासून मालमत्ता विभागाचे स्वतंत्ररित्या कामकाज चालू झालेले आहे. संस्थानचे स्थावर मालमत्तेत दिवसेंदिवस वाढच होत असून उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार संस्थान मालकीच्या जमीनींच्या (स्थावर मालमत्तेच्या) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नियम १९५१ चे नियम २४ अ नुसार अनुसूची १०अअ, भाग १ (स्थावर मालमत्ता) प्रमाणे आवश्यक त्या नोंदी घेवून नोंदवहया अद्ययावत करणेचे कामकाज मालमत्ता विभागामार्फत चालू आहे. उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने संस्थानचे फक्त स्थावर मालमत्तेसंबंधात (अचल) मालमत्ता संबंधातील कामकाज मालमत्ता विभागामार्फत करणेचे अभिप्रेत आहे. त्याप्रमाणे संस्थानचे फक्त अचल मालमत्ते संबंधातीलच (स्थावर) कामकाज मालमत्ता विभागामार्फत करणेत येते.

संस्थानच्या चल मालमत्तेबाबत म्हणजेच सोने,चांदी,दागिनेव इतर चीज वस्तू याबाबतची माहिती मालमत्ता विभागाकडे उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्याबाबतच्या नोंदी मालमत्ता विभागामार्फत ठेवणेचा प्रश्न उदभवत नाही.

विभागाचा अभिप्राय– संस्थानचे चल मालमत्ते संबंधातील नोंदी संबंधीत विभागाने महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नियम १९५१ चे नियम २४ अ नुसार अनुसूची १०अअ, भाग २ (जंगम मालमत्ता) मध्ये अद्ययावत ठेवणे अभिप्रेत आहे. तदनुषंगाने चल मालमत्ता म्हणजेच सोने,चांदी,दागिने व इतर चीज वस्तू बाबतची माहिती संबंधीत विभागाकडे उपलब्ध असते व त्याच्या नोंदी ठेवण्याचे काम देखील संबंधीत विभागामार्फत केले जाते.

यास्तव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९८६ मध्ये संस्थानच्या चल-अचल मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आली. यात खालीलप्रमाणे अंशत: बदल करणे आवश्यक आहे.

संस्थानच्या चल-अचल मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आलीयाऐवजी संस्थानच्या अचल मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आली, अशी दुरुस्ती करता येईल.

प्रस्ताव– संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९८६ मध्ये संस्थानच्या चल-अचल मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आली याऐवजी संस्थानच्या अचल मालमत्तेकरीता स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) सुरु करणेस मान्यता देण्यात आली, अशी दुरुस्ती करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१७** **गुरस्थान मंदिराचे दक्षिणेकडील मोबाईल, कॅमेरा क्लोकरुम चालविणेस श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना मुदतवाढ देणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील जा.नं.श्री सासंएक्रसो/१९१/२०१९ दि.१४.१२.२०१९ चे पत्र.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- यापूर्वी साईभक्तांच्या सेवेसाठी व सोईसाठी संस्थानने संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.२०,नगरपंचायत मिळकत नं.७०६ मधील एक गाळा क्षेत्र ३७.७० चौ.फूट इतकी जागा श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना मोबाईल, कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायासाठी पूर्वीचेच अटी व शर्तीस अधीन राहून तसेच मागील कालावधीचे मासिक भाडेमध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.९,४३३/-+१०% रु.९४३/-एकुण रक्कम रु.१०,३७६/- (अक्षरी रु.दहा हजार तीनशे शहात्तर मात्र) इतके मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन व त्याप्रमाणे करारनामा करुन उक्त सोसायटीस पुढील ११ महिने कालावधीसाठी म्हणजेच दि.०७/०८/२०१९ ते दि.०६/०७/२०२० या कालावधीसाठी जागा वापरास मुदतवाढ देणेच्या निर्णयार्थचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीच्या सभेत सादर करणेत आला होता.

त्यात निर्णय क्रं.३९५ प्रमाणे श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.२० नगरपंचायत मिळकत नं.७०६ मधील एक गाळा क्षेत्र ३७.७० चौ.फूट इतकी जागा मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायासाठी पूर्वीचेच अटी व शर्तीस अधीन राहून मागील मासिक भाडेदरामध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.९,४३३/-+१०% रु.९४३/-एकुण रक्कम रु.१०,३७६/- इतके मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/०८/२०१९ ते दि.०६/०२/२०२० या सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास व त्याप्रमाणे करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम संस्थानमार्फत ना-नफा-ना-तोटा या तत्वावर चालविता येतील काय? याबाबत पडताळणी करुन सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा,असे ठरले,असेबाबतचा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयाचे पुर्वार्धात नमुद केलेप्रमाणे उक्त संस्थेकडून दि.०७/०८/२०१९ ते दि.०६/०२/२०२० या सहा महिने कालावधीसाठीचा जागा वापराचा करारनामा दि.१३/११/२०१९ रोजी नोटराईज करुन घेणेत आलेला आहे.

सदर जागा वापराची मुदत दि.०६/०२/२०२० रोजी संपुष्टात येत असलेने मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.श्रीसासंएक्रेसो/१९१/२०१९ दि.१४/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये संस्था"श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवर काम करत असलेल्या कायम कर्मचा-यांची नोंदणीकृत सहकारी संस्था असुन संस्था संस्थेच्या सभासदांना कर्ज पुरवठयाबरोबरच संस्थान परिसरात संस्थान मान्यतेने श्री साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी मोफत पादत्राणेगृह व बॅग क्लोकरुम सुविधा चालवत आहे.त्याचप्रमाणे मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व्यवस्था,प्रसाद विक्री स्टोअर, नॉव्हेल्टी स्टोअर,दुग्धजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टोअर,शालेय साहित्य विक्री केंद्र चालवत असुन त्या माध्यमातून श्री साईभक्तांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना वाजवी दरात चांगली सेवा पुरवित आहे. संस्थेस सदर व्यवसायांचे माध्यमातूनमिळणा-या उत्पन्नातून संस्था संस्थेच्या सभासदांना म्हणजेच संस्थान कर्मचा-यांना कमी व्याजदराने कर्ज पुरवठयाबरोबरच अनेक सुविधा पुरवत आहे त्यामुळे संस्था ही संस्थान कर्मचा-यांची कामधेनू ठरत आहे. संस्था साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी गुरुस्थान मंदिराचे दक्षिण बाजूस चालवत असलेल्या मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायासाठी जागा वापराची मुदत दि.०६/०२/२०२० रोजी पुर्ण होत असुन संस्थेस साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी सदर मोबाईल कमेरा क्लोकरुम व्यवसाय पुढील ११ महिण्यांसाठी चालविण्यास परवानगी मिळावी,ही विनंती," असेबाबत इकडेस कळविले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीच्या सभेतील उपरोक्त निर्णय क्रं.३९५ च्या उत्तरार्धात "मोबाईल कॅमेरा क्लोकरुम संस्थानमार्फत ना-नफा-ना-तोटा या तत्वावर चालविता येईल

काय,याबाबत पडताळणी करुन सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत यावा," असेबाबत नमुद केलेले आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेले १२ कियॉस्क/गाळे जागा वापरासंबंधात यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.३९४ च्या उत्तरार्धात "सदर १२ कियॉस्क/गाळयांमध्ये विक्री करण्यात येणा-या वस्तु साईभक्तांना माफक दरात उपलब्ध करुन देणेबाबतच्या अटी करारनाम्यामध्ये टाकण्यात याव्यात. साईभक्तांना विक्री करण्यात येणारे साहित्य व वस्तु यांचा दर्जा व किंमत तपासणीकामी उपमुख्य कार्यकारी अधिकारी,मुख्य लेखाधिकारी व संबंधीत विभागाचे प्रशासकीय अधिकारी यांची समिती नेमण्यात येऊन पाहणी करण्यात यावी,तसेच सदरचे व्यवसाय संस्थानमार्फत ना-नफा-ना-तोटा या तत्वावर चालविता येतील काय? याबाबत पडताळणी करुन सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा," असेबाबत निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयाप्रमाणे साईभक्तांना विक्री करण्यात येणारे साहित्य व वस्तू यांचा दर्जा व किंमत तपासणीकामी संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी,मुख्य लेखाधिकारी व संबंधीत विभागाचे प्रशासकीय अधिकारी यांची समिती नेमण्यात येवून पाहणी करण्यात आलेली असून सदरचे व्यवसाय संस्थानमार्फत ना-नफा-ना-तोटा या तत्वावर चालविता येईल किंवा कसे? याबाबतची पडताळणी संस्थानचे मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी व मा.प्रशासकीय अधिकारी यांनी करुन,त्याबाबतचा दि.१८/०३/२०२० रोजीचा खालीलप्रमाणे सविस्तर अहवाल सादर केलेला आहे.

-अहवाल -

विषय - श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी स्टॉल तपासणी अहवाल.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३९४ खालीलप्रमाणे –

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेले १२ कियॉस्क/गाळे जागा वापरास पूर्वीचेच अटी व शर्तीवर मागील भाडे रकमेत १०%वाढ करुन (रु.४,८३१/- मध्ये १०% वाढ रु.४८३/- = रु.५,३१४/-) रक्कम रु.५,३१४/- मात्र प्रति कियॉस्क/गाळा मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० या सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास व त्याप्रमाणे करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.

सदर १२ कियॉस्क/गाळयांमध्ये विक्री करण्यात येणा-या वस्तू साईभक्तांना माफक दरात उपलब्ध करुन देणेबाबतच्या अटी करारनाम्यामध्ये टाकण्यात याव्यात. साईभक्तांना विक्री करण्यात येणारे साहित्य व वस्तू यांचा दर्जा व किंमत तपासणीकामी उपमुख्य कार्यकारी अधिकारी,मुख्य लेखाधिकारी व संबंधीत विभागाचे प्रशासकीय अधिकारी यांची समिती नेमण्यात येऊन पाइणी करण्यात यावी. तसेच सदरचे व्यवसाय ना-नफा-ना-तोटा या तत्वावर चालविता येती काय? बाबत पडताळणी करुन सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा,असे ठरले.

त्यानुसार दि.०२/०३/२०२० ते दि.०४/०३/२०२० या कालावधीत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील १२ कियॉस्क/गाळे यांची पडताळणी करुन खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे मान्यतेने श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत संस्थान परिसरात मासिक भाडेतत्वावर श्री साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी थंडपेय स्टॉल,प्रसाद व नॉव्हेल्टीविभाग,जनरल स्टोअर इ. तसेच श्री साईभक्तांचे सेवेसाठी मोफत पादत्राणे विभाग तसेच मोफत बॅग क्लोकरुम चालविले जातात. तर समाधी मंदिर परिसरात सुरक्षेच्या कारणास्तव मोबाईल/कॅमेरा क्लोकरुम चालविले जातात.

सदरचे व्यवसायातून मिळणारे उत्पन्नामधून संस्थानचे कर्मचारी तथा संस्थेचे सभासद व कर्मचारी यांना त्यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी कमीत कमी दराने कर्जपुरवठा केला जातो. तसेच सोसायटीमार्फत सभासदांना दिपावलीनिमित्त भेट वस्तूत्याचप्रमाणे सभासदांना प्रासंगिक अनुदान,लग्न अनुदान याप्रमाणे सभासदांचे हिताचे व फायद्याचे दृष्टिने विविध योजना राबविल्या जातात.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत संस्थान परिसरात विविध ठिकाणी सध्या एकूण ३९ स्टॉल चालविले जात असून त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं. | व्यवसायाचे नाव | स्टॉलची संख्या |
|---|---|---|
| १ | दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री तसेच जनरल स्टोअर | ०५ |

| | | |
|---|---|---|
| २ | नॉव्हेल्टी स्टोअर व क्लोकरुम | ०३ |
| ३ | प्रसाद व थंडपेय विक्री स्टोअर | ०१ |
| ४ | शालेय साहित्य अल्पदराने विक्री | ०३ |
| ५ | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | ०६ |
| ६ | थंडपेय स्टॉल | ०८ |
| ७ | प्रसाद स्टोअर | ०५ |
| ८ | जनरल स्टोअर | ०१ |
| ९ | क्लोकरुम (मोफत सुविधा) | ०४ |
| १० | पादत्राणेगृह (मोफत सुविधा) | ०३ |
| | | ३९ |

सदरचे हे स्टॉल संस्थानचे सर्व भक्तनिवासस्थाने व मंदिर परिसरात असून श्री साईभक्तांचे सोईसाठी व सेवेसाठी दुध, दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व पेढा,शॉल तसेच साईबाबांचे फोटो,सौंदर्य प्रसाधनांची (साबण,कंगवे, टुथपेस्ट, ब्रश, पावडर) इ. विक्री योग्य ते शुल्क घेवून केली जाते.

मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.रविंद्र ठाकरे तसेच मुख्य लेखाधिकारी श्री.बाबासाहेब घोरपडे व प्रशासकीय अधिकारी डॉ.आकाश किसवे यांनी सदरचे स्टॉलची पाहणी केली असता स्टॉलमधून भक्तांना दिल्या जाणा-या वस्तू हया दर्जेदार असून त्यांची विक्रीही वाजवी दरात केली जाते,असे निदर्शनास आले आहे. या ठिकाणी विकल्या जाणा-या वस्तू व त्यांची किंमत यांची यादी सोबत माहितीस्तव जोडली आहे.

तसेच सदर कियॉस्क संस्थानचे ना-नफा-ना-तोटा तत्वावर चालविता येणे शक्त आहे काय? याबाबत पडताळणी करण्यात आली.

**१)** संस्थानमधील सर्व भक्तनिवासामधील हाऊस किपींगचे कामेही आऊटसोर्स केलेली आहेत,

२) सध्यस्थितीत सोसायटीमार्फत विक्री करण्यात येणा-या पदार्थांचे दर्जाबाबत कोणतीही तक्रार संस्थानकडे नाही,

३) सदर कियॉस्क संस्थानने चालविण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करावे लागेल तसेच सदर कियॉस्कमध्ये विक्रीसाठी ठेवावयाचा माल खरेदीसाठी स्वतंत्र कार्यवाही करावी लागेल,

४) सोसायटी विकत असलेल्या पदार्थामध्ये प्रसाद,थंडपेय,दुग्धजन्य पदार्थ यांचा समावेश असून त्यांचा वापराचा कालावधी अत्यंत कमी असतो. त्याबाबत संस्थानला दक्षता घ्यावी लागेल,

५) सोसायटीमार्फत क्लोकरुम,पादत्राणेगृह इ. सेवा विनाशुल्क पुरविले जातात.त्यामुळे संस्थानचे मनुष्यबळ वाचते. तसेच उत्सव कालावधीत संस्थानच्या मागणीनुसार अतिरिक्त क्लोकरुम/पादत्राणगृह उपलब्ध करुन देतात.

या सर्व बाबींचा विचार करता सदर कियॉस्क सध्या चालू आहेत त्याचप्रमाणे संस्थान कामगार सोसायटीमार्फत चालू ठेवावेत,असे वाटते,असेबाबतचा अहवाल सादर केलेला आहे.

सदर अहवालाची प्रत अवलोकनार्थ यासोबत सादर केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय-उपरोक्त निर्णय क्रं.३९४ मधील उत्तरार्धात नमूद केलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी व मा.प्रशासकीय अधिकारी यांनी सादर केलेल्या उपरोक्त दि.१८/०३/२०२० रोजीच्या संयुक्त अहवालाचे अवलोकन केले असता त्यात त्यांनी

१) संस्थानमधील सर्व भक्तनिवासामधील हाऊस किपींगचे कामेही आऊटसोर्स केलेली आहेत,

२) सध्यस्थितीत सोसायटीमार्फत विक्री करण्यात येणा-या पदार्थांचे दर्जाबाबत कोणतीही तक्रार संस्थानकडे नाही,

३) सदर कियॉस्क संस्थानने चालविण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करावे लागेल तसेच सदर कियॉस्कमध्ये विक्रीसाठी ठेवावयाचा माल खरेदीसाठी स्वतंत्र कार्यवाही करावी लागेल,

४) सोसायटी विकत असलेल्या पदार्थामध्ये प्रसाद,थंडपेय,दुग्धजन्य पदार्थ यांचा समावेश असून त्यांचा वापराचा कालावधी अत्यंत कमी असतो. त्याबाबत संस्थानला दक्षता घ्यावी लागेल,

५) सोसायटीमार्फत क्लोकरुम,पादत्राणेगृह इ. सेवा विनाशुल्क पुरविले जातात.त्यामुळे संस्थानचे मनुष्यबळ वाचते. तसेच उत्सव कालावधीत संस्थानच्या मागणीनुसार अतिरिक्त क्लोकरुम/पादत्राणगृह उपलब्ध करुन

देतात. या सर्व बाबींचा विचार करता सदर कियॉस्क सध्या चालू आहेत त्याचप्रमाणे संस्थान कामगार सोसायटीमार्फत चालू ठेवावेत,असे वाटते, अशा प्रकारचे अभिप्राय दिलेले आहेत.

त्यामुळे सदरचे व्यवसाय संस्थानमार्फत ना-नफा-ना-तोटा या तत्वावर चालविता येणार नाहीत. परिणामी साईभक्तांच्या सोयीसाठी उक्त व्यवसाय श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत पूर्वीप्रमाणेच चालू ठेवणे उचित होईल.

यास्तव मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.१४/१२/२०१९ रोजीच्या पत्रात नमुद केलेल्या विनंतीचे अनुषंगाने, साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी, संस्थानने संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.२०,नगरपंचायत मिळकत नं.७०६ मधील एक गाळा क्षेत्र ३७.७० चौ.फुट इतकी वापरास दिलेली जागा श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायासाठी पूर्वीचेच अटी व शर्तीस अधिन राहून मागील मासिक भाडेदरामध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.१०,३७६/-+ १०% वाढ रु.१,०३८/-= अशी एकूण रक्कम रु.११,४१४/- इतके मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/०२/२०२० ते दि.०६/०१/२०२१ या ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देता येईल व त्याप्रमाणे करारनामा नोटराईज करुन घेता येईल.

**प्रस्ताव**-मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.१४/१२/२०१९ रोजीच्या पत्रात नमुद केलेल्या विनंतीचे अनुषंगाने, साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी, संस्थानने संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.२०,नगरपंचायत मिळकत नं.७०६ मधील एक गाळा क्षेत्र ३७.७० चौ.फुट इतकी वापरास दिलेली जागा श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायासाठी पूर्वीचेच अटी व शर्तीस अधिन राहून मागील मासिक भाडेदरामध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.१०,३७६/-+ १०% वाढ रु.१,०३८/-= अशी एकूण रक्कम रु.११,४१४/- इतके मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/०२/२०२० ते दि.०६/०१/२०२१ या ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेच्या व त्याप्रमाणे करारनामा नोटराईज करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.२०, नगरपंचायत मिळकत नं.७०६ मधील एक गाळा क्षेत्र ३७.७० चौ.फुट इतकी वापरास दिलेली जागा श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायासाठी पूर्वीचेच अटी व शर्तीस अधिन राहून मागील मासिक भाडेदरामध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.१०,३७६/-+ १०% वाढ रु.१,०३८/-= अशी एकूण रक्कम रु.११,४१४/- इतके मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/०२/२०२० ते दि.०६/०१/२०२१ या ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली तसेच त्याप्रमाणे करारनामा नोटराईज करुन घेण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१८** **मौजे रुई, ता.राहाता, जिल्हा अहमदनगर येथील जमीन गट नं.२८८/अ,२८८/ब,२८८/क व गट नं.२९४ पैकी एकुण क्षेत्र १०.२३ हेक्टर क्षेत्र संस्थानला कायम खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतुद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादित करील किंवा खरेदी करील,अशी तरतुद आहे.

प्रस्तावना-

पूर्वपिठीका – १) यापूर्वी राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी मौजे रुई शिवारामध्ये सुमारे ५४ एकर ११ गुंठे जमीन संस्थानला काही अटी व शर्तीवर दान म्हणून देण्याचे प्रस्तावित केलेले होते. त्यात त्यांचे नावावर प्रत्यक्षात असलेल्या खालील नमूद केलेल्या जमीनी बक्षिसपत्राने देवू केलेल्या होत्या.

परिशिष्ट अ-

| अ.नं. | गट नंबर | दर्यानानी ट्रस्टचे नावावर असलेले क्षेत्र |
|---|---|---|
| १ | २९३ | ०७ हे ३२ आर ०० चौमी |

| | | |
|---|---|---|
| २ | २७५ | ०० हे ६९ आर ०० चौमी |
| ३ | २८० | ०० हे ६१ आर ०० चौमी |
| ४ | २८३ | ०० हे ४६ आर ०० चौमी |
| ५ | २८४ | ०० हे ४८ आर ०० चौमी |
| ६ | २८५ | ०० हे ५४ आर ०० चौमी |
| | एकूण | १० हे १० आर ०० चौमी |

तसेच खालील परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केलेल्या मौजे रुई,ता.राहाता येथील जमीनी त्यांचे प्रत्यक्षात नावावर नसलेल्या परंतु त्या जमीनी संबंधात राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांना असलेले कायदेशीर अधिकार संस्थानला देण्याबाबत प्रस्तावित केलेले आहे.

**परिशिष्ट ब-**

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र हे.आर.चौमी | कब्जेदार सदरी असलेली नावे |
|---|---|---|---|
| १ | २९४ | ०५.९०.०० | राजेंद्र चंदनमल भनसाळी/सुभाष चंदनमल भनसाळी |
| २ | २७३ | ०१.९२.०० | भिमबाई बाबुराव कहांडळ |
| ३ | २७४ | ००.७४.०० | एकनाथ सहादू पठारे/शिवनाथ सहादू पठारे/रेल्वेकडे |
| ४ | २८८ अ | ०३.०६.०० | लखीचंद कचरदास भंडारी |
| ५ | २८८ ब | ००.५४.०० | पुष्पाताई लखीचंद भंडारी |
| ६ | २८८ क | ००.९७.०० | पुष्पाताई लखीचंद भंडारी |
| | एकूण | १३.१३.०० | |

**२)** उपरोक्त परिशिष्ट अ मधील जमीन गट नं.२९३ क्षेत्र ७ हे.३२ आर इतके दर्यानानी ट्रस्टने संस्थानला दि.०१/१२/२००९ रोजी नोंदणीकृत बक्षिसपत्रान्वये दिलेले आहे. परिशिष्ट अ मधील उर्वरित जमीनीचे संबंधात न्यायालयात वाद सुरु असल्याने सदर जमीनींचे बक्षिसपत्र होवू शकलेले नाही.

**३)** उपरोक्त परिशिष्ट ब मधील जमीनींचे मूळ मालकाशी राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी सन १९८७-८८ मध्ये जमीन खरेदीचा करार केलेला होता.

**४)** तद्नंतर मुळ मालक श्री.लखीचंद कचरदास भंडारी व इतर यांनी त्रयस्थ इसम श्री.संग्राम माधवराव देशमुख यांचेबरोबर उक्त जमीनीचा व्यवहार ठरवून त्यांना विसार पावती करुन दिली.

**५)** सदर व्यवहारासंबंधात श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी दै.सार्वमत व दै.लोकमत मध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द केली. त्यास अनुसरुन राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांनी हरकत घेतली. त्यामुळे श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी श्री.भंडारी/ भनसाळी व दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांचेविरुध्द मा.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात स्पे.मु.नं. ४९/२००८ चा दावा दाखल केला. सदर दाव्यात दि.०५/०३/२०१२ रोजीच्या करारनाम्यानुसार वादी व प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांचे दि.०६/०३/२०१२ रोजी तडजोड होवून दावा निकाली काढण्यात आला.

**६)** उपरोक्त दावा चालू असतांना अर्जदार यांनी संस्थानकडे सदर जमीनी खरेदी करणेकामी दि.१७/११/२०११ रोजी अर्ज केलेला होता. त्या अनुषंगाने सदर जमीनीचे किंमतीबाबत दि.२४/०९/२०११ मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१७ मधील निर्णय क्रं.७५९ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून यापूर्वी मा.व्यवस्थापन मंडळाने दि.१०/१०/२०१० रोजीचे सभेत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन दर्यानानी ट्रस्ट यांची वर नमूद केलेली जमीन सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी व पुर्तता करुन रु.५५,००,०००/- प्रति एकर या दराने खरेदी करण्यात यावी. याकामी विहीत पध्दतीने संस्थान वकीलामार्फत जमीनीचा सर्च रिपोर्टसह अभिप्राय घेणेत यावा तसेच वकीलामार्फत जमीनीबाबत कोणत्याही व्यक्तीची/संस्थेची हरकत नाही याबाबत वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करुन जमीनी खरेदीस कोणाचीही हरकत नाही,याबाबत पडताळणी करण्यात यावी. दर्यानानी ट्रस्ट,संबंधीत जमीन मालक व इतर हितसंबंधीत व्यक्ती/संस्था यांचेत असणारे सर्व न्यायालयीन दावे निपटल्यानंतर जमीन मालकांनी संस्थानकडे जमीन विक्रीचा स्वतंत्ररित्या प्रस्ताव सादर करावा. त्यानुसार जमीनीचे खरेदीखत नोंदणीचे वेळेस जमीनीच्या

एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम अदा करणेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमीनीस संस्थानचे नाव लागलेनंतर संस्थानमार्फत रितसर शासकीय मोजणी करुन ताब्यात मिळणारे जमीनीच्या प्रमाणात रक्कम जमीन मालकांना अदा करणेस तसेच जमीन खरेदीकामी मुद्रांक व नोंदणी शुल्क,सरकारी मोजणी शुल्क, वकील फी आदी अनुषंगिक योग्य त्या समावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी,असे ठरले". असे बाबतचा निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने दि.१४/०१/२०१२ रोजीच्या दै.सार्वमत व दै.पुण्यनगरी आणि दि.१५/०१/२०१२ रोजीच्या दै.गावकरी या स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आल्या. त्यास अनुसरुन १) श्री.राजीव गणपत मयेकर यांनी हरकत घेवून जमीन मालक यांनी त्यांना २००७ साली विसार पावती करुन दिलेचे नमूद केलेले आहे. तसेच २) श्री.राजेंद्र चंदनमल भनसाळी यांनी हरकत घेवून उक्त वडीलोपार्जित जमीनीचे अद्यापपावेतो वाटप झालेले नसलेचे नमूद केलेले आहे. ३) मॅनेजर,साई नागरी सहकारी पतपुरवठा संस्था यांनी हरकत घेवून उक्त जमीनी जमीन मालक यांनी त्यांचे पतसंस्थेस नजर गहाणखत करुन दिलेले आहे. आणि ४) राधाबाई कालियनदास चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी हरकत घेवून त्यात उक्त जमीनीसंबंधात न्यायालयात वाद न्यायप्रविष्ट आहे. त्याचे निराकरण झालेशिवाय जमीन मालकांना उक्त जमीनी खरेदी देता येणार नाही,असेबाबत नमूद केलेले आहे.

उपरोक्त निर्णयात नमूद केलेप्रमाणे उक्त जमीनींचा सर्च रिपोर्टसंबंधात संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर यांनी उपरोक्त हरकतीचा विचार करता सदर जमीनीबाबतचे दावे मा.न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याने सदर बाबीचे प्रथम निराकरण झालेशिवाय उपरोक्त जमीन मालकांच्या जमीनी संस्थानकरीता खरेदी करणे योग्य व उचित आणि कायदेशीर होणार नाही,त्यामुळे सदर जमीनींचा ३० वर्षांचा सर्च रिपोर्ट तुर्त देणेचे कारण नाही,असेबाबत त्यांचेकडील दि.०७/०२/२०१२ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

**७)** तद्नंतर सदर जमीनींचे किंमतीबाबत दि.१७/०९/२०१३ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय नं.४ मध्ये निर्णय क्रं.६१६ प्रमाणे निर्णय झाला की, "सदरहू जमीनीचा शासनाच्या रेडी रेकनरप्रमाणे रेट घेण्यात यावा व त्यानुसार सुधारीत प्रस्ताव तयार करुन तो व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर करण्यात यावा,असे ठरले."

सदर निर्णयाप्रमाणे उक्त जमीनींचे मुल्यांकन मिळणेकामी मा.मुद्रांक जिल्हाधिकारी तथा सहजिल्हा निबंधक,अहमदनगर यांचेकडेस पत्रव्यवहार करणेत आला. तथापि दरम्यानचे काळात श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी मे.दिवाणी न्यायालय,व.स्तर, कोपरगाव यांचे कोर्टात स्पे.मु.नं.५९/२०१२ चा दाखल केलेला असलेने सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही पूर्ण झाली नाही.

८) तद्नंतर दि.०४/०२/२०१४ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत निर्णय क्रं.८९ अन्वये प्रमाणे, "साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेसाठी प्रस्तावित जमीनीची संस्थानला आवश्यकता असून जर सर्व पक्षकार एकत्रितपणे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठासमोर संस्थानला जमीन देणेकामी लेखी देत असतील तर तसा प्रस्ताव मा.खंडपीठासमोर सादर करता येईल. मात्र तत्पूर्वी याकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थानच्या वतीने काम पाहणारे ॲड.चौकीदार यांचा सल्ला घेण्यात यावा, असे ठरले."

सदर निर्णयाप्रमाणे ॲड.चौकीदार यांचेकडेस पत्रव्यवहार करणेत आलेला आहे व वेळोवेळी स्मरणपत्र देण्यात आले. तथापि त्यांचेकडून कोणत्याही प्रकारचे अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत.

**९)** उपरोक्त स्पे.मु.नं.४९/२००८ मधील दि.०६/०३/२०१२ रोजी झालेल्या तडजोडीप्रमाणे व त्यातील दि.०५/०३/२०१२ रोजीच्या करारनाम्यानुसार मूळ जमीन मालक यांनी उपरोक्त जमीनी संस्थानला विकत घेण्यास सहकार्य केले नाही व करारनाम्यानुसार कार्यवाही करणेस अडथळे निर्माण केले आणि ॲड.रविराज लालाजी गोतीस यांनी त्यांचे जाहीर न केलेल्या पक्षकारासाठी दावा मिळकत मूळ जमीन मालक यांचेकडून खरेदी घेणेबाबतचे विधान केले व त्यांना त्यापोटी विसार दिल्याचे विधान केले म्हणून श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी मे.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात सौ.पुष्पाताई लखीचंद भंडारी,श्री.लखीचंद कचरदास भंडारी, श्री.राजेंद्र चंदनमल भनसाळी,श्री.सुभाष चंदनमल भनसाळी,श्रीमती राधाबाई कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,श्री.अभिजित जितेंद्र शहा,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी आणि ॲड.रविराज लालाजी गोतीस यांचेविरुध्द दि.२६/०९/२०१२ रोजी स्पे.मु.नं.५९/२०१२ चा दावा दाखल केलेला आहे.

**१०)** सदर दाव्याचे कामकाज अद्याप चालू असून त्यात उपरोक्त वादी व प्रतिवादी नं.१ ते ६ यांनी या दाव्यात तडजोड करण्याचे निश्चित करुन दाव्यातील जमीनी संस्थानला कायम खरेदी देण्यास संमती दिली आहे व

तडजोडीचा मसुदा तयार करुन तो उपरोक्त वादी,प्रतिवादी यांना मान्य आहे. तडजोडीचे मसुद्याबरोबर संस्थानने प्रत्येकाला किती रक्कम द्यावयाची आहे याचा तक्ता तयार केलेला आहे व या पत्रानुसार वर्तन करण्याची तसेच स्पे.मु.नं.५९/२०१२ यात हुकूमनामा करुन घेण्याची उपरोक्त वादी, प्रतिवादी या सर्वांची जबाबदारी आहे. तरी सदरचा तडजोडीचा मसुदा तपासून त्यास मान्यता द्यावी व तडजोडीवर संस्थानच्या जबाबदारप्रतिनिधीमार्फत सही करावी,असेबाबतचा अर्ज श्री.संग्राम माधवराव देशमुख व इतर ६ यांनी दि.०४/०३/२०१६ रोजी इकडेस सादर करुन त्यासोबत तडजोडीचा मसुदा,श्री.अभिजित जितेंद्र शहा यांचे संमतीपत्र व इतर कागदपत्रे आणि कोर्ट हुकूमाच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केलेल्या आहेत.

**११)** त्या अनुषंगाने उपरोक्त जमीनीबाबतचे मुळ जमीन मालक व इतर आणि अर्जदार यांनी त्यांचे उपरोक्त वाद मे.कोर्टासमोर एकत्र येवून मिटवावेत व Clear Title झाल्यानंतर संबंधीत जमीन मालक यांनी त्यांचे मर्जीनुरुप संस्थानकडे सदर जमीनीच्या खरेदीबाबतचा प्रस्ताव सादर करावा,असे बाबत अर्जदार यांना दि.०७/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये अलाहीदा कळविणेत आलेले आहे. त्यानंतर देखील अर्जदार यांनी वारंवार अर्ज केलेले आहेत. त्यांना उपरोक्तप्रमाणे अलाहीदा कळविणेत आलेले आहे.

**१२)** प्रस्तुत जमीनी संदर्भात मे.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात स्पे.मु.नं.५९/२०१२ चा दाखल असून त्यात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी,ता.राहाता,जि.अहमदनगर तर्फे कार्यकारी अधिकारी श्री.किशोर रामराव मोरे यांना प्रतिवादी नं.७ म्हणून प्रतिवादीपणात सामील केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर हे मे.कोपरगाव येथील कोर्टात संस्थानतर्फे कामकाज पाहात असलेने प्रस्तुत दाव्यासंदर्भात त्यांचेबरोबर चर्चा करणेत आलेली आहे.

**१३)** दरम्यानचे काळात त्रयस्थ इसम श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी दि.१३/११/२०१७ रोजी इकडेस अर्ज सादर करुन त्यासोबत उपरोक्त तडजोडीचा मसुदा सादर करुन जमीनी संस्थानच्या ठरावाप्रमाणे संस्थानने खरेदी घेणेबाबतचा अर्ज सादर केलेला आहे. तसेच जमीन मालक श्री.लखीचंद कचरदास भंडारी व इतर ३ यांनी शासनाकडे दि.१३/०९/२०१७ रोजी अर्ज सादर केलेला आहे.

**१४)** अर्जात नमूद केलेल्या मौजे रुई येथील जमीन गट नं.२८८/अ,२८८/ब,२८८/क आणि गट नं.२९४ एकूण क्षेत्र १०.२३ हेक्टर हे संस्थानला दानपत्राद्वारे प्राप्त झालेल्या गट नं.२९३ क्षेत्र ७ हेक्टर ३२ आर या क्षेत्रालगत आहे.

**१५)** सदरच्या जमीनी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.टीपीएस १६१३/५१/प्र.क्र./०५/२०१३/नवि-९ दि.२८/०८/२०१४ अन्वये कृषी विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेत आलेल्या आहेत.

**१६)** सदर जमीनींचे सन २०१७-१८ चे बाजारमुल्य खालीलप्रमाणे होत आहे.

**श्री.भंडारी/भनसाळी यांची रुई येथील जमीनीचे बाजारमुल्य दर्शविणारा व त्यांनी सुचित केलेला दर दर्शविणारा तक्ता**

| गट नं. | क्षेत्र हे.आर | सन २०१७-१८ चे बाजारमुल्य रु. | बाजारमुल्याप्रमाणे प्रति एकर होणारा दर | श्री.भंडारी यांनी सुचित केलेला दर प्रति एकर | रु.५५,००,०००/- प्रति एकर प्रमाणे होणारी एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| २८८/अ | २.९२ | रु.४,५४,५४,५००/- | रु.६२,२६,६४०/- | रु.५५,००,०००/- | रु. ४,०१,५०,०००/- |
| २८८/ब | ०.५० | रु.१,१०,५६,५००/- | रु.८८,४५,२००/- | रु.५५,००,०००/- | रु. ६८,७५,०००/- |
| २८८/क | ०.९१ | रु.१,७७,७२,३००/- | रु.७८,१२,०००/- | रु.५५,००,०००/- | रु. १,२५,१२,५००/- |
| २९४ | ५.९० | रु.८,६१,३१,५००/- | रु.५८,३९,४४०/- | रु.५५,००,०००/- | रु. ८,११,२५,०००/- |
| | एकूण | रु.१६,०४,१४,८००/- | -- | -- | रु.१४,०६,६२,५००/- |

जमीन मालक श्री.लखीचंद कचरदास भंडारी व इतर यांनी शासनाकडेस केलेला दि.१३/०९/२०१७ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-१०१७/संक्र/१६६९/कार्यासन-१६ दि.३१/१०/२०१७ अन्वये "अर्जदारांची मौजे रुई येथील गट नं.२८८ पैकी व गट नं.२९४ पैकी या वडीलोपार्जित मालकी हक्काच्या वहीवाटीच्या जागा असून सदर जागा खरेदी करणेबाबतचा ठराव संस्थानच्या दि.२४ सप्टेंबर २०११ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला. तथापि आजतागायत सदर व्यवहार झालेला नाही. संस्थानशी सदर जमीनींचा व्यवहार करण्याचे निश्चित झाल्यामुळे विकासक जास्त मोबदल्यात सदर जमीन घ्यावयास तयार असूनही अर्जदार विकासकाशी सदर जमीनीचा व्यवहार करत नाहीत.

संस्थानला सदर जमीनीचा व्यवहार करावयाचा नसल्यास त्याबाबतचे पत्र अर्जदारास द्यावे,अशी विनंती अर्जदारांनी उक्त अर्जान्वये केली आहे." तरी प्रस्तुत प्रकरणी आपला अहवाल शासनास सादर करण्यात यावा, वगैरेबाबत नमूद केलेले आहे.

तद्नुषंगाने सदर जमीनीचे किंमतीबाबत दि.२४/०९/२०११ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१७ मधील निर्णय क्रं.७५९ प्रमाणे म्हणजेच "मा.व्यवस्थापन मंडळाने दि.१०/१०/२०१० रोजीचे सभेत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन दर्यानानी ट्रस्ट यांची वर नमूद केलेली जमीन सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी व पुर्तता करुन रु.५५,००,०००/- प्रति एकर या दराने खरेदी करण्यात यावी. याकामी विहीत पध्दतीने संस्थान वकीलामार्फत जमीनीचा सर्च रिपोर्टसह अभिप्राय घेणेत यावा तसेच वकीलामार्फत जमीनीबाबत कोणत्याही व्यक्तीची/संस्थेची हरकत नाही याबाबत वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करुन जमीनी खरेदीस कोणाचीही हरकत नाही,याबाबत पडताळणी करण्यात यावी. दर्यानानी ट्रस्ट,संबंधीत जमीन मालक व इतर हितसंबंधीत व्यक्ती/संस्था यांचेत असणारे सर्व न्यायालयीन दावे निपटल्यानंतर जमीन मालकांनी संस्थानकडे जमीन विक्रीचा स्वतंत्ररित्या प्रस्ताव सादर करावा. त्यानुसार जमीनीचे खरेदीखत नोंदणीचे वेळेस जमीनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम अदा करणेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमीनीस संस्थानचे नाव लागलेनंतर संस्थानमार्फत रितसर शासकीय मोजणी करुन ताब्यात मिळणारे जमीनीच्या प्रमाणात रक्कम जमीन मालकांना अदा करणेस तसेच जमीन खरेदीकामी मुद्रांक व नोंदणी शुल्क,सरकारी मोजणी शुल्क,वकील फी आदी अनुषंगिक योग्य त्या समावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी.''या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेकामी मान्यता मिळणेसाठी शासनाकडे अहवाल सादर करणेच्या निर्णयार्थ प्रस्तुतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीच्या सभेपूढे सादर करणेत आला.

सदर सभेत मा.मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी "शेती महामंडळाची जमीन खरेदीचा प्रस्ताव शासनाकडे प्रस्तावित आहे. त्यामुळे खाजगी जमीनीच्या खरेदीपेक्षा सरकारी जमीन प्राधान्याने खरेदी कराव्यात," अशी माहीती दिली. त्यावर निर्णय क्रं.९९ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन,शेती महामंडळाची जागा खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीने मान्य करुन शासन परवानगीसाठी पाठविणेत आलेला आहे. परंतु मौजे रुई,ता.राहाता, जि.अहमदनगर येथील जमीन गट नं.२८८अ,२८८/ब,२८८/क व गट नं.२९४ पै.एकूण क्षेत्र १०.२३ हेक्टर क्षेत्र हे येलो झोनमध्ये असून तेथील संस्थान मालकीच्या जमीनीलगत आहे व शेती महामंडळाकडून खरेदी करावयाच्या जमीनीपेक्षा कमी भावाने मिळत आहे. तसेच संस्थानने प्रस्तावित जमीन खरेदी केल्यास राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांची या व्यतिरिक्त तेथे असलेली उर्वरीत जमीन संस्थानला विनामुल्य दान देणेची शक्यता आहे. याकरीता सदरहू क्षेत्र शासनाची मान्यतेने कायम खरेदी करुन घेणेत यावे. यासाठी दि.२४/०९/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७५९ ची अंमलबजावणीसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा,असे ठरले.

सदर निर्णयाप्रमाणे मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/६२१२/२०१८ दि.१९/०२/२०१८ व जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/ २१००/२०१८ दि.३०/०७/२०१८ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेत आला.

तदनुषंगाने महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.सासंवि-१०१८/४४२/प्र.क्र.५४/का.१६ दि.२४/१०/२०१८ अन्वये खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गत केलेला आहे.

प्रस्तावना–श्री साईबाबा संस्थानच्या मालकीच्या गट नं.२९३ लगत असलेल्या गट नं.२८८/अ, २८८/ब,२८८/क व गट नं.२९४ पै.एकुण १०.२३ हेक्टर क्षेत्र संस्थानसाठी खरेदी करण्यासाठीचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. प्रस्तुत जमीनीबाबत मे.कोपरगाव येथील दिवाणी न्यायाधीश,व.स्तर यांच्या कोर्टात स्पे.मु.नं.५९/२०१२ दाखल असून सदर दाव्यातील वादी प्रतिवादी यांनी दि.१७/१२/२०१४ रोजी तडजोडीचा करारनामा केला असून सदरचे क्षेत्र श्री साईबाबा संस्थान खरेदीने घेत असल्यास सदरचे वाद संपुष्टात येणार असल्याचे नमुद केले आहे. रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर सदर करारनाम्याची छायांकित प्रत संस्थानला सादर केली असून सर्व हक्कदारांनी दि.१७/१२/२०१४ रोजी मेमोरेंडम ऑफ अंडरस्टॅण्डींग सहया केलेल्या आहेत. जमीन मालकाने सदर जमीन शिर्डी संस्थानला विक्री करण्यास संमतीपत्र सादर केले आहे. नगरविकास विभागाच्या दि.२८/०८/२०१४ रोजीच्या अधिसुचनेद्वारे सदर जमीन अकृषिक असा बदल करण्यात आला आहे. सदर जमीनीचा सर्च रिपोर्ट घेण्यात आला असून सदर मिळकत व इतर मिळकती कायमचे खरेदीखताने खरेदी करता येईल. त्यास कोणतीही कायदेशीर अडचण नाही. मात्र अगोदर दुय्यम निबंधक,राहाता यांच्याकडील सरकारी किंमतीची निश्चिती करणे जरुरीचे आहे. असा अहवाल प्राप्त झाला आहे. दुय्यम निबंधक

कार्यालय,ता.राहाता,जि.अहमदनगर यांनी सन २०१७-१८ च्या बाजारमुल्य भावाप्रमाणे सदर जमीनीचे मुल्य रु.१६,०४,१४,८००/- इतके निश्चित केले आहे. सदर जमीनधारक सदर जमीन रु.१४,०६,६२,५००/- इतक्या रकमेस शिर्डी संस्थानला विकण्यासाठी तयार आहे. सदर जमीन विकत घेतल्यास संस्थानला सलग १७.५५ हेक्टर एवढे क्षेत्र सलग उपलब्ध होणार असून या क्षेत्रावर संस्थानचे मेडीकल कॉलेज,नर्सिंग कालेज,कॅन्सर हॉस्पिटल यांच्याकरीता एकत्रित वैद्यकीय संकुल उभारता येईल. समितीच्या दि.१४/०९/२०११ रोजीच्या सभेत सदर जमीन प्रति एकर रु.५५,००,०००/- या दराने खरेदी करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. तसेच जमीनी खरेदी करण्यासाठी मुद्रांक नोंदणी शुल्क,सरकारी मोजणी शुल्क,वकील फी आदी अनुषंगिक आवश्यक त्या सर्व समावेशक खर्चास शासन मान्यता घेण्यात यावी,असा ठराव करण्यात आला. सदर ठरावानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी त्यांच्या संदर्भीय पत्र क्रं.१ व ३ अन्वये समितीने केलेल्या ठरावाप्रमाणे प्रस्तावास मंजुरी देण्याची विनंती केली आहे. शासनाने संदर्भाधीन पत्र क्रं.२ अन्वये जमीन धोरण निश्चित केले असून या धोरणांन्वये ठरविण्यात आलेले निकष,अटी व शर्ती सदर जमीन खरेदी प्रस्ताव पूर्ण करत असल्याचे संस्थानने कळविले आहे. त्यास अनुसरुन सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)(सुधारणा) अधिनियम २००४ च्या कलम २१(१)(झ) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या मालकीच्या गट नं.२९३ लगत असलेल्या गट नं.२८८/अ,२८८/ब,२८८/क व गट नं.२९४ पै.एकुण १०.२३ हेकटर क्षेत्र रु.१४,०६,६२,५००/- (रु.चौदा कोटी सहा लक्ष बासष्ट हजार पाचशे फक्त) इतक्या रकमेस खरेदी करण्यास तसेच यासाठी मुद्रांक नोंदणी शुल्क,सरकारी मोजणी शुल्क, वकील फी आदी अनुषंगिक आवश्यक त्या सर्व समावेशक खर्चास या शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) मा.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात दाखल स्पे.मु.नं.५९/२०१२ निकाली काढणेत यावी.

२) सदर जमीनीवरील सव हक्कदाराच्या जमीन विक्री करारनाम्यावर सहया घेण्यात याव्यात.

३) जमीन खरेदी करण्यापूर्वी उक्त जमीनीची मोजमापणी भुमी अभिलेख विभागाकडून करुन घेण्यात यावी.

४) जमीन खरेदी करतांना मालमत्ता हस्तांतरण अधिनियम १९८२ मधील कलम ५४ व ५५ मधील तरतुदीचे पालन करणेत यावे.

५) जमीनी खरेदी संदर्भात आवश्यक असणा-या इतर सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करण्यात याव्यात.

६) सदर जमीनीच्या खरेदीखत नोंदणीच्या वेळी जमीनीच्या एकुण मुल्याच्या ८०% रक्कम अदा करण्यात यावी. संस्थानच्या नावावर जमीन लागल्यानंतर (जमीनीचा ७/१२ संस्थानच्या नावे झाल्यानंतर) व रितसर शासकीय मोजणी करुन संस्थानच्या ताब्यात जमीन घेतल्यानंतर उर्वरित २०% रक्कम अदा करण्यात यावी.

शासनाकडील उपरोक्त निर्णयाप्रमाणे मौजे रुई येथील उपरोक्त विषयांकित जमीन संस्थानला कायम खरेदी करण्याबाबतची प्रक्रिया चालू करण्यात आली.

दरम्यानचे काळात प्रस्तुत प्रकरणाबाबतचा सविस्तर अहवाल संस्थानचे मा.तदर्थ समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीच्या सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत आलेला आहे. त्यात निर्णय क्रं.६६ प्रमाणे **"यावर सविस्तर चर्चा होऊन,मौजे रुई, ता.राहाता,जि.अहमदनगर येथील जमीन गट नं.२८८अ,२८८ब, २८८क व गट नं.२९४ पै.एकूण क्षेत्र १०.२३ हेक्टर क्षेत्र संस्थानला कायम खरेदी करणेकामी महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग यांचेकडील क्रं.सासंवि-१०१८/४४२/प्र.क्र.५४/ का.१६ दि.२४ ऑक्टोबर २०१८ चे शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या खालील अटींचे अधिन राहून सदरहू जमीनी संस्थानला कायम खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.**

**१) मा.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात दाखल स्पे.मु.नं.५९/२०१२ निकाली काढणेत यावा.**

**२) सदर जमीनीवरील सर्व हक्कदाराच्या जमीन विक्री करानाम्यावर सहया घेण्यात याव्यात.**

**३) जमीन खरेदी करण्यापूर्वी उक्त जमीनीची मोजमापणी भुमी अभिलेख विभागाकडून करुन घेण्यात यावी.**

**४) जमीन खरेदी करतांना मालमत्ता हस्तांतरण अधिनियम १९८२ मधील कलम ५४ व ५५ मधील तरतुदीचे पालन करणेत यावे.**

५) **जमीनी खरेदी संदर्भात आवश्यक असणा-या इतर सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करण्यात याव्यात.**

६) **सदर जमीनीच्या खरेदीखत नोंदणीच्या वेळी जमीनीच्या एकुण मुल्याच्या ८०% रक्कम अदा करण्यात यावी. संस्थानच्या नावावर जमीन लागल्यानंतर (जमीनीचा ७/१२ संस्थानच्या नावे झाल्यानंतर) व रितसर शासकीय मोजणी करुन संस्थानच्या ताब्यात जमीन घेतल्यानंतर उर्वरित २०% रक्कम अदा करण्यात यावी."** असेबाबत निर्णय झालेला आहे.

शासनाचे विधी व न्याय विभागाकडील उपरोक्त दि.२४/१०/२०१८ रोजीचे निर्णयाप्रमाणे व मा.तदर्थ समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६६ प्रमाणे प्रस्तुत प्रकरणी सर्वांगीण पुर्तता करणेत येवून उक्त जमीनींचे खरेदीखतांचे दस्त दि.२६/०३/२०२० रोजी मा.दुय्यम निबंधक,राहाता यांचेसमोर राहाता यांचेसमोर नोंदवून देणेकामी संबंधीत जमीन मालक यांना इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/५०२७/२०२० दि.२०/०३/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविणेत आले.

तथापि कोरोना या विषाणूच्या (कोविड-१९) प्रादुर्भावाचे प्रतिबंधाचे दृष्टिकोनातून शासनाने दि.२३/०३/२०२० पासून सर्वत्र लॉकडाऊन जाहीर केला असल्याने व शासकीय कार्यालये बंद करण्यात आली असल्याने सदर तारखेस प्रस्तुतचे दस्त नोंदविणेत आलेले नाहीत.

मात्र उक्त लॉकडाऊनचे अटी शर्तीमध्ये शासनाने दि.०६/०५/२०२० पासून शिथिलता आणून शासकीय कार्यालये सुरु करणेबाबतचे आदेश जारी केलेने शासकीय कार्यालये दि.०६/०५/२०२० पासून सुरु करणेत आली. त्यामुळे उपरोक्त प्रलंबित खरेदीखताचे दस्त दि.१४/०५/२०२० रोजी मा.दुय्यम निबंधक,राहाता यांचे कार्यालयात नोंदवून देणेकामी जमीन मालक यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/१९४/२०२० दि.१२/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविणेत आले.

त्याप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी मौजे रुई,ता.राहाता येथील जमीन गट नं.२८८/अ पै., २८८/ब पै. आणि २८८/क पै. या जमीनींचे एकूण क्षेत्र ४ हेक्टर ३३ आर इतके श्री.लखीचंद कचरदास भंडारी व सौ.पुष्पाताई लखीचंद भंडारी यांचेकडून दुय्यम निबंधक,राहाता यांचेकडील दस्त क्रं.१४०४/२०२० दि.१४/०५/२०२० अन्वये मोबदला रक्कम रु.५,९५,३७,५००/- इतके रकमेस कायम खरेदी केलेले आहे. तसेच जमीन गट नं.२९४ पै.या जमीनीचे एकूण क्षेत्र ५ हेक्टर ९० आर इतके श्री.सुभाष चंदनमल भनसाळी व श्री.राजेंद्र चंदनमल भनसाळी यांचेकडून दुय्यम निबंधक,राहाता यांचेकडील दस्त क्रं.१४०३/२०२० दि.१४/०५/२०२० अन्वये मोबदला रक्कम रु.८,११,२५,०००/- इतके रकमेस कायम खरेदी केलेले आहे.

**दरम्यानचे काळात श्री.उत्तमराव रंभाजी शेळके रा.शिर्डी यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचे कोर्टात दाखल असलेल्या पीआयएल पिटीशन नं.१२०/२०१९ मध्ये कंटेम्प्ट पिटीशन स्टॅम्प नं.१०६१३/२०२० चे महाराष्ट्र शासन व मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व इतर १ यांचेविरुध्द मे.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात दाखल केलेले आहे.त्यात मे.कोर्टाने दि.२९/०५/२०२० रोजी "At present issue simple notice to respondent no.2, returnable in six (06) weeks." असेबाबत आदेश केलेले आहेत.**

**प्रस्तुत प्रकरणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेवतीने मे.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टात कामकाज पाहणेसाठी संस्थान पॅनलवरील वकील ॲड श्री विनायक होन,यांना सुचीत केलेले आहे.व मे. कोर्टाचे उपरोक्त दि.२९/०५/२०२० रोजीचे आदेशाप्रमाणे संस्थानचे वतीने मे.कोर्टात प्रतिज्ञापत्र सादर करणेकामी अलाहिदा कळविण्यात आलेले आहे.**

**तसेच प्रस्तुत प्रकरणी संस्थानचे विधी विभागामार्फत मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टात सिव्हील ॲप्लीकेशन नं.१०६३५/२०२० चे अलाहिदा सादर करणेत आलेले आहे.**

**मौजे रुई,ता.राहाता,जिल्हा अहमदनगर येथील उपरोक्त जमीन ग. नं.२८८/अ,२८८/ब, २८८/क व ग.नं. २९४ पै या जमीनीचे एकुण क्षेत्र १०.२३ हेक्टर इतके श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना कायम खरेदी करणेकामी मान्यता मिळणेसाठीचा संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीच्या सभेतील उपरोक्त निर्णय क्रं.९९ प्रमाणे शासनास प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.** व सदर प्रस्तावास विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांचेकडील निर्णय क्रं.सासंवि-१०१८/४४२/प्र.क्र ५४/का.१६ दि.२४/१०/२०१८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. याशिवाय मे.उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या संस्थानचे मा.तदर्थ समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय

क्रं.६६ अन्वये उक्त जमीनी संस्थानला कायम खरेदी करणेकामी महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग मंत्रालय,मुंबई यांचेकडील
निर्णय क्रं.सासंवि-१०१८/४४२/प्र.क्र.५४/का.१६ दि.२४/१०/२०१८ चे शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या अटींचे अधिन राहून संस्थानला कायम खरेदी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

तदनुषंगाने शासन निर्णयातील अटींची पूर्तता करणेत येवून उक्त जमीनी संस्थानने दि.१४/०५/२०२० रोजी कायम खरेदी केलेल्या आहेत. बाजारभावाप्रमाणे (शासनाचे रेडीरेकनर प्रमाणे) सदर जमीनींची किंमत रु.१६,६०,११,८००/- (अक्षरी रक्कम सोळा कोटी साठ लाख अकरा हजार आठशे मात्र) इतकी होत असून संस्थानने मात्र सदर जमीनी रक्कम रु.१४,०६,६२,५००/- (अक्षरी रक्कम रु.चौदा कोटी सहा लाख बासष्ट हजार पाचशे मात्र) इतके रुपयास खरेदी केलेल्या आहेत.

**विभागाचा अभिप्राय** – १) मौजे रुई ता.राहाता येथील उपरोक्त खरेदी केलेले क्षेत्र १०.२३ हेक्टर हे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना यापुर्वी राधा कालियनदास दर्यानानी चॅरीटेबल ट्रस्ट या संस्थेने दि.०१/१२/२००९ रोजीचे नोंदणीकृत बक्षीसपत्राने दिलेलीजमीन ग.नं. २९३ क्षेत्र ७.३२ हेक्टर या क्षेत्रालगत असून सदरचे क्षेत्र हे येलो झोन मध्ये आहे. सदरचे क्षेत्र खरेदी केल्यामुळे त्या ठिकाणी संस्थानचे सद्यस्थितीत एकुण क्षेत्र १७.५५ हेक्टर (सुमारे ४४ एकर) इतके सलग झालेले आहे.याशिवाय या ठिकाणी राधा कालियनदास दर्यानानी चॅरीटेबल ट्रस्ट यांची असलेली उर्वरीत जमीन ते श्री साईबाबा संस्थानला विनामुल्य दान देण्याची शक्यता आहे.

२) सदर खरेदी केलेली जमीन ही शिर्डीलगत म्हणजेच शिर्डी शहरापासून साधारणतः ३ किमी अंतरावर आहे.

३) सदर ठिकाणी संस्थानला सलग मोठे क्षेत्र उपलब्ध झाल्याने भविष्यात त्या ठिकाणी हॉस्पीटल सारखा मोठा प्रकल्प उभारणेचे प्रस्तावित आहे.

४) सदर जमीन खरेदी करणेकामी तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.९९ प्रमाणे तसेच महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं. **सासंवि-१०१८/४४२/प्र.क्र.५४/ का.१६ दि.२४ ऑक्टोबर २०१८** अन्वये आणि मा.उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या संस्थानचे मा.तदर्थ समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६६ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

५) सदर जमीन खरेदीचे दर हे संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०९/२०११ रोजीचे बैठकीतील निर्णय क्रं.७५९ अन्वये रक्कम रु.५५,०००००/- (अक्षरी रक्कम रु.पंचावन्न लाख) प्रति एकर या दराने खरेदी करणेचे ठरविण्यात आलेले आहे. त्या दराप्रमाणे सदर जमीन खरेदी करण्यात आलेली आहे. त्यानंतर शासनाचे रेडीरेकनर (बाजारभाव) दरामध्ये सातत्याने वाढ झालेली आहे.

६) सदर जमीनीची बाजारभावाप्रमाणे (शासनाचे रेडीरेकनर प्रमाणे) किंमत रु.१६,६०,११,८००/- (अक्षरी रक्कम रु.सोळा कोटी साठ लाख आकरा हजार आठशे) इतकी होत असून संस्थानने मात्र सदर जमीन रक्कम रु.१४,०६,६२,५००/- (अक्षरी रक्कम रु.चौदा कोटी सहा लाख बासष्ट हजार पाचशे मात्र ) इतके रुपयास खरेदी केलेली आहे म्हणजेच प्रस्तुत प्रकरणी संस्थानला रक्कम रु.२,५३,४९,३००/- (अक्षरी रक्कम रु.दोन कोटी त्रेपन्न लाख एकोणपन्नास हजार तीनशे मात्र ) एवढया रक्कमेचा फायदा झालेला आहे.

७) उपरोक्त जमीन खरेदीच्या एकुण रक्कम रु.१४,०६,६२,५००/- या रक्कमेपैकी ८०% इतकी रक्कम जमीन मालकांना अदा करणेत आलेली असून,उर्वरीत २०% रक्कम रु.२,८१,३२,५००/- इतकी खरेदीखताप्रमाणे जमीनीची शासन दरबारी संस्थानचे नावाने नोंद झाल्यानंतर जमीन मालकांना अदा करणेबाबतची कार्यवाही मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबादयांचे निर्णयानंतर व संस्थानचे मा.तदर्थ समितीचे निर्णयाप्रमाणे पुढील उचित कार्यवाही करणेत येईल.

८) प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टात सिव्हील ॲप्लीकेशन नं.१०६३५/२०२० चे दि.०१/०६/२०२० रोजी दाखल केलेले आहे.त्यात मे. कोर्टाने दि.०२/०६/२०२० रोजी **"Liberty to move after the regular Court starts functioning "** असे आदेश दिलेले आहेत. सदर सिव्हील ॲप्लीकेशन अद्याप प्रलंबित आहे.

मौजे रुई,ता.राहाता येथील उपरोक्त जमीन ग.नं.२८८/ अ,२८८/ब,२८८/क, व ग.नं.२९४ पै एकुण क्षेत्र १०.२३ हेक्टर ही जमीन संस्थनला कायम स्वरुपी खरेदी करणेबाबतची पुर्वपिठीका व त्या संबंधित केलेल्या कार्यवाही बाबतची सद्यस्थिती अवलोकनार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३७२** **तदर्थ (Ad-hoc) समितीने या विषयाचे सखोल अवलोकन केले तसेच कार्यालयीन टिपणीची दखल घेतली. कार्यालयीन टिपणी ही सर्वसमावेषक नसली तरी अभिलेखावरुन हे स्पष्ट होते की, मा.उच्च न्यायालयाचे पी.आय.एल.नं.१८/२०११ मधील दि.१३.०३.२०१२ च्या आदेशानुसार श्री साईबाबा संस्थानने कुठल्याही प्रयोजनासाठी खर्च करावयाचा असल्यास मा.उच्च न्यायालयाची परवानगी घेणे क्रमप्राप्त होते.**

**समितीचे असेही निदर्शनास आले की, समिती ही प्रत्येक धोरणात्मक निर्णयात किंवा ज्यामध्ये वित्तीय बाब आहे अशा प्रकरणात सदर निर्णयाचे पुर्व, सदर बैठकीत व त्यानंतर सुध्दा मूलभूतरित्या नियमीतपणे संस्थानला मा.उच्च न्यायालयात पी.आय.एल.क्र.१२०/२०१९ मध्ये दिवाणी अर्ज (सिव्हील ॲप्लीकेशन) करण्याबाबत निर्णय देत असते. समितीच्या असेही निदर्शनास आले आहे की, बऱ्याच वेळेला समितीच्या बैठकीचे इतिवृत्त लिहितांना काही वेळेला असा दिलेला निर्देश लिहिण्याचे अनावधानाने राहुन गेलेले आहे. जरी तदर्थ (Ad-hoc) समितीच्या इतिवृत्तात असा निर्देश देण्याचे राहून गेले तरीही श्री साईबाबा संस्थान हे पी.आय.एल.क्र.१८/२०११ मधील मा.उच्च न्यायालयाचे आदेशाला बांधील आहे. त्यामुळे तदर्थ (Ad-hoc) समितीने असा निर्देश दिला किंवा नाही दिला तरी श्री साईबाबा संस्थानने पी.आय.एल.क्र.१८/२०११ मधील आदेशाचे पालन करणे अपरिहार्य होते.**

**समितीच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले की, सदर व्यवहाराचे खरेदीखत करते वेळी तसेच खरेदीची रक्कम ही मुळ मालकाला देतांना मा.उच्च न्यायालयाच्या पी.आय.एल.क्र.१८/२०११ मधील आदेशाची पुर्तता केलेली नव्हती. आता समितीच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले की, अशी परवानगी कार्योत्तर द्यावी म्हणून मा.उच्च न्यायालयात पी.आय.एल.क्र.१२०/२०१९ मध्ये सिव्हील ॲप्लीकेशन केलेले आहे. अभिलेखावरुन हे स्पष्ट होते की, मोबदल्याच्या रकमेपैकी २०% रक्कम ही मुळ मालकास अजून दिलेली नाही.**

**वरील परिस्थीतीत समिती खालील निर्णय घेत आहे:-**

**मूळ मालकास मा.उच्च न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत मोबदल्याची राहिलेली २०% रक्कम अदा करण्यात येवू नये.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१९** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था. शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रापैकी नगरपंचायत, शिर्डी यांना दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राव्यतिरिक्त संस्थान मालकीचे उर्वरीत क्षेत्रापैकीचे क्षेत्रात शिर्डी नगरपंचायतने अतिक्रमण केलेल्या ६.२५ आर इतके क्षेत्र नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस वर्ग करणेबाबतचे मा.तदर्थ समितीचे दिनांक ११/०५/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्र.२४३ बाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतुद**– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७ समितीचे कर्तव्ये व अधिकार यातील कलम १७(२)(छ) मध्ये विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची वेळोवेळी तपासणी करील किंवा तपासणी करण्याची व्यवस्था करील आणि अशा मालमत्तांवर कोणतेही अतिक्रमण झाले असल्यास ते दुर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करील,अशी तरतुद आहे.

तसेच कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

तसेच कलम २१(२)(दोन) यात स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतला सहाय्य करण्यासाठीची तरतुद आहे.

**प्रस्तावना -**

**प्रकरणाची पूर्वपिठीका**– शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांच्या शिर्डी शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या झोन क्रं.३ मधील जलकुंभाकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१०७ पै. उत्तर-पूर्व कोप-यात व झोन क्रं.२ मधील जलकुंभाकरीता सर्वे नं.१२६ पै. मधील नांदुर्खी रस्त्यालगत (प्रस्तावित विकास योजनेतील १८ मीटर वळण रस्त्यालगत) प्रत्येकी १२ आर इतके श्री साईबाबा संस्थान

विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या मालकीचे क्षेत्र शिर्डी नगरपंचायतीस महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.सासंवि/२००६/५८०/(७९)/का.१६ दि.२०/१२/२००६ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्याचवेळेस संस्थानकडून नगरपंचायत,शिर्डी यांनी सर्वे नं.१२६/४ पै. ०.१२ आर क्षेत्राचा ताबा संस्थानकडून घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

उपरोक्त सर्वे नं.१२६/४ चे क्षेत्रात नगरपंचायतीने नव्याने बांधकामासाठी आखणी केलेचे दि.१६/०२/२०१९ रोजी निदर्शनास आलेवरुन बांधकाम विभागाकडील मुकादम श्री.गिरीश चोळके व मालमत्ता विभागाकडील कं.मोजणीदार श्री.बाळासाहेब जाधव यांना तात्काळ संस्थानचे उक्त क्षेत्राचे समक्ष स्थळनिरीक्षण करुन अहवाल सादर करणेबाबत सुचित करणेत आले. त्याप्रमाणे त्यांनी दि.१६/०२/२०१९ रोजी उक्त क्षेत्राची समक्ष पाहणी करुन इकडेस अहवाल सादर केलेला आहे. त्यात त्यांनी “श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पैकी नांदुर्खी रस्त्यालगत क्षेत्र १२ आर इतके शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांच्या शिर्डी शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या झोन क्रं.२ मधील जलकुंभाकरीता देण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्याचवेळेस सदर क्षेत्राचा ताबा घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.त्या व्यतिरिक्त शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सदर क्षेत्रात कर्मचारी निवासस्थान बांधण्याचे व कंपाऊंड करणेचे प्रस्तावित केलेले असलेचे आज दि.१६/०२/२०१९ रोजी आमचे निदर्शनास आले असून सदर जलकुंभाचे परिसरात कर्मचारी निवासस्थानाचे चुना फक्कीने लाईनआऊट केलेले असून कॉलमचे खड्डे घेतलेले असलेचे दिसून आले आहे. सदरचे लाईनआऊटचे निरीक्षण केले असता नगरपंचायत,शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थानचे क्षेत्रात उक्त बांधकाम प्रस्तावित केले असलेचे दिसून येत आहे.” असेबाबत इकडेस अहवाल सादर केलेला आहे.

**मात्र संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थानचे उर्वरित क्षेत्रात नगरपंचायतने तयांचे कर्मचारी निवासस्थान व कंपाऊंडचे बांधकाम प्रस्तावित केलेले असलेचे व त्याप्रमाणे लाईनआऊट केलेचे संस्थानचे दि.१६/०२/२०१९ रोजी निदर्शनास आलेले आहे. सदर आखणी करतेवेळेस नगरपंचायतने संस्थानला कोणतीही पूर्वसुचना दिलेली नाही. यास्तव संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राचाच वापर करावा. त्या व्यतिरिक्त संस्थानचे मालकीचे उर्वरित क्षेत्राचा वापर करु नये अथवा त्यात बांधकाम करु नये,असेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायतयांना इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५६५०/२०१९ दि.२३/०२/२०१९ अन्वये कळविणेत आलेले आहे.**

तद्रुषंगाने मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्रं.नपं/टे-८/२/४९१/२०१९ दि.०१/०३/२०१९ अन्वये प्रस्तुत प्रकरणी इकडील जा.क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/५६५०/२०१९ दि.२३/०२/२०१९ च्या पत्रास अनुसरुन “शिर्डी नगरपंचायत हद्दीतील सर्वे क्रं.१२६/४ पै. मधील १२.७९ आर जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्रं.२४ निर्णय क्रं.३०५ नुसार व शासन निर्णय क्रं. सासंवि-२००६/५८०/ (७९)/का.सोळा दि.२० डिसेंबर २००६ अन्वये शिर्डी नगरपंचायतीस मिळालेली आहे. सदरजागेची महसुल दप्तरी ७/१२ उता-यावर नगरपंचायतची मालकी हक्क सदरी नोंद झालेली आहे. सदर जागेची उपअधिक्षक,भुमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन नकाशा प्राप्त करुन घेणेत आलेला आहे. सदरची जागा ही सुधारित (प्रारुप) शिर्डी विकास योजनेमध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी दर्शविलेली आहे. प्रस्तावित आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास

मा.सहसंचालक,नगररचना विभाग,नासिक यांचे शिफारशी नुसार सहायक संचालक,नगररचना विभाग,अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.बां.प/मौ.शिर्डी, ता.राहाता/ स.नं.१२६/४ (१२६/१ जुना) ससंअ/२७७५/१८ दि.२०/०८/२०१८ अन्वये मंजूरीची शिफारस केलेली आहे. मंजूर बांधकाम नकाशानुसार नगरपंचायत मालकीच्या सदर जागेतच बांधकाम चालू आहे. शिर्डी नगरपंचायतने नगरपंचायत मालकीचे जागेतच प्रस्तावित बांधकामाचे लाईन आऊट करुन बांधकाम सुरु केलेले असल्याने श्री साईबाबा संस्थानला पूर्वसुचना देण्याचा प्रश्नच उदभवत नाही,”असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

**प्रस्तुत पत्राचे अवलोकन केले असता नगरपंचायतीने शिर्डी सुधारीत प्रारुप विकास योजनेमध्ये संस्थानचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रामध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी क्षेत्र प्रस्तावित केलेले असलेचे नमुद केलेले आहे. शिवाय प्रस्तावित**

**आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास मा.सहायक संचालक, नगररचना यांनी मंजुरीची शिफारस केलेली असलेचेही नमुद केलेले आहे. म्हणजेच सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर झालेली नाही व अंतिम झालेली नाही.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६ पै. ०.१२ आर इतकेच क्षेत्र नगरपंचायतीस जलकुंभाचे बांधकाम करणेकामी सन २००६ मध्ये दिलेले आहे व तदनुसार त्याचवेळेस संस्थानकडून नगरपंचायत,शिर्डी यांनी सर्वे नं.१२६ पै.चे ०.१२ आर क्षेत्राचा ताबा संस्थानकडून घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.**

**म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांचे मालकीचे सध्यस्थितीत फक्त ०.१२ आर इतकेच क्षेत्र आहे. तरीदेखील नगरपंचायतने सदर सर्वे नं.१२६ पै.चे क्षेत्रात सुधारीत (प्रारुप) विकास योजनेत प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान दर्शविलेले आहे. मात्र सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर व अंतिम झालेली नाही. त्यामुळे नगरपंचायतीने त्यांना संस्थानने दिलेल्या ०.१२ आर क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात बांधकाम करणे अथवा संस्थानचे उर्वरित क्षेत्राचा वापर करणे ही बाब विधीग्राहय नाही.**

**वास्तविक पाहता नगरपंचायतीने सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजनेस अंतिम मंजुरी प्राप्त झालेनंतर त्याप्रमाणे भुसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन घेवून भुसंपादित क्षेत्र नगरपंचायतीकडे वर्ग झालेनंतर त्यात प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम करणे विधीग्राहय आहे.**

**मात्र नगरपंचायतीने उपरोक्तप्रमाणे प्रक्रिया पूर्ण न करता संस्थानचे जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम बेकायदेशीरपणे सुरु केलेले असलेचे निदर्शनास येत आहे. यास्तव सदरचे बांधकाम तात्काळ बंद करणेत यावे आणि संस्थानची मालकीची जागा पूर्ववत करुन देणेत यावी. संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राचे टाकीचे क्षेत्रासह जागेची निश्चिती करुन घेवून त्याव्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नयेअथवा संस्थानचे मालकीचे क्षेत्राचा वापर करु नये, असेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५८३८/२०१९ दि.०५/०३/२०१९ अन्वये पुन:श्च कळविणेत आले व प्रत संस्थानचे बांधकाम विभागास देणेत येवून शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत उपरोक्त ठिकाणी चालू असलेले बांधकाम तात्काळ बंद करणेत यावे व संस्थान मालकीची जागा पूर्ववत करुन घेणेत यावी,असेबाबत सुचित केलेले आहे.**

**तदनुषंगाने संस्थानचे बांधकाम विभागाने त्यांचेकडील दि.१३/०३/२०१९ रोजीच्या कार्यालयीन टिपणी अन्वये मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ मधील संस्थान मालकीचे क्षेत्रापैकी ०.१२ आर क्षेत्र शिर्डी नगरपंचायतीस जलकुंभाचे बांधकामासाठी देणेत आले होते. सदरहू जागेत नगरपंचायत,शिर्डी यांनी जलकुंभाचे बांधकाम सन २००६ मध्ये केले आहे. जलकुंभाचे पश्चिमेस नवीन रिंग रोड संस्थान निधीतून भुसंपादन करुन सन २०१०-१२ या कालावधीत विकसित करणेत आला आहे. या रस्त्याचे भुसंपादन व डिमार्केशन शिर्डी नगरपंचायतीने केलेले आहे. त्यानुसार सदर रिंग रोडलगत उपरोक्त जलकुंभासाठी दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राव्यतिरिक्त संस्थानचे अंदाजे ०.६ आर क्षेत्र शिल्लक असलेचे दिसून येते. संस्थानचे मालमत्ता विभागाकडील दि.२३/०२/२०१९ व दि.०५/०३/२०१९ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने बांधकाम विभागाचे उपअभियंता,संरक्षण विभागाचे मुकादम,मालमत्ता विभागाचे लिपीक व कं.मोजणीदार यांनी उक्त साईटवर दि.०७/०३/२०१९ रोजी समक्ष जावून सदरचे बांधकाम बंद करणेबाबत साईटवरील ठेकेदार प्रतिनिधी यांना समक्ष सांगितले. त्यावर ठेकेदार प्रतिनिधींनी नगरपंचायतीकडून काम बंद करणेबाबत कोणत्याही प्रकारची सुचना नसल्याने काम बंद करणेस असमर्थता व्यक्त केली,असेबाबत निदर्शनास आणून दिलेले आहे.**

याशिवाय मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी संस्थानने त्यांना निर्गत केलेल्या उपरोक्त पत्रास कोणताही प्रतिसाद दिलेला नसलेने प्रस्तुत प्रकरणा संदर्भात दि.०२/०४/२०१९ रोजी तहसिलदार,राहाता, मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत, शिर्डी,उपअधिक्षक,भुमी अभिलेख,राहाता यांची बैठक घेण्यात आली.

**सदर बैठकीत मुख्याधिकारी,नगरपंचायत,शिर्डी यांनी"संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६ पै. चे शिर्डी-नांदुर्खी या १८ मी. रस्त्यालगत ०.१२ गुंठे जागा नगरपंचायतीचे शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या जलकुंभाकरीता सन २००६ मध्ये शासनाच्या मान्यतेने दिलेली आहे.**

**त्याप्रमाणे नगरपंचायतचे नावाने नोंद झालेली आहे व सदर क्षेत्रात सन २०१३ मध्ये जलकुंभाचे बांधकाम पूर्ण करणेत आलेले आहे. संस्थानकडून नगरपंचायतला जलकुंभासाठी मिळालेल्या ०.१२ गुंठे जागेची मोजणी होवून निश्चिती करणेत आलेली नव्हती. त्यामुळे नगरपंचायतीने भुमी अभिलेख विभागाकडून नगरपंचायतीस मिळालेल्या जागेची मोजणी करुन घेतली असता सदर १८ मी. रस्त्यालगतच्या जागेपासून मोजमापानुसार संस्थानच्या जागेत सुमारे ५ ते ५.५ गुंठयात संस्थानच्या जागेकडे टाकी**

**सरकलेली आहे. रस्त्याकडील जागेत शिर्डी सुधारीत प्रारुप विकास आराखडयात नगरपंचायतीचे अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान दर्शविलेले आहे. त्या अनुषंगाने नगररचना विभागाकडून नगरपंचायतीने बांधकामास परवानगी घेतली आहे. त्यासाठी सुमारे २.५ कोटीचे टेंडर काढण्यात आलेले आहे आणि ठेकेदाराला कार्यारंभ आदेश देखील देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे टाकीचे दक्षिण बाजूकडील रस्त्यालगतच्या जागेत नगरपंचायतीचे अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम चालू करणेत आलेले आहे. सदरचे बांधकाम आता बंद करता येणार नाही. जलकुंभाचे बांधकाम संस्थानच्या जागेत सरकलेले आहे. सदरच्या अग्निशमन केंद्राचा उपयोग सार्वजनिक हितासाठीच होणार आहे. त्यासाठी सदरचे क्षेत्र नगरपंचायतीस संस्थानकडून मिळणेकामीचा प्रस्ताव नगरपंचायती मार्फत अलाहिदा सादर करणेत येईल व सदर जागेची होणारी किंमत नगरपंचायत संस्थानला अदा करेन. तरी सदरचे अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे चालू असलेले बांधकाम बंद करु नये,"असेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी विनंती केली.**

**प्रस्तुत बैठकीत झालेल्या चर्चेत संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१२६ पै.चे ०.१२ आर क्षेत्र नगरपंचायतीस जलकुंभासाठी देणेकामी सन २००६ साली शासनाने मान्यता दिलेली आहे. मात्र त्यावेळेस सदर क्षेत्राचा ताबा देणे-घेणेची कार्यवाही झालेली नसलेचे दिसून आले. तसेच शासन निर्णयामध्ये सदरचे ०.१२ आर क्षेत्र हे प्रस्तावित १८ मी. रुंदीच्या रस्त्यालगत पासून देण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे. मात्र सदरचा रस्ता त्यावेळी अस्तित्वात नसल्याकारणाने त्यावेळेस सदर ०.१२ आर क्षेत्राचे हद्दी निशाण्या निश्चित झालेल्या नसलेचे दिसून येते. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी सदर ०.१२ आर क्षेत्राची मोजणी करणेकामीची हद्द सध्यस्थितीत असलेल्या शिर्डी-नांदुर्खी रोडलगत पासून गृहीत धरुन त्या ठिकाणापासून मोजणी केली असल्याकारणाने नगरपंचायतीमार्फत बांधणेत आलेले जलकुंभ संस्थानच्या जागेत सरकलेले असलेचे दिसून येत आहे. नगरपंचायतने दि.०७/०४/२०१८ रोजीची मोजणी बेस धरुन संस्थान मालकीचे उर्वरित क्षेत्रात अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम सुरु केलेले आहे. सदरचे प्रस्तावित बांधकाम न करणेबाबत संस्थान प्रशासनाने नगरपंचायतीमार्फत सदर क्षेत्रात बांधकामासंबंधीची आखणी केली त्याचवेळेस लेखी कळविलेले आहे व तदनंतर देखील नगरपंचायतने सुरु केलेले बांधकाम संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राची निश्चिती होईपर्यंत बांधकाम करु नये,असेबाबत देखील नगरपंचायतीस संस्थानने लेखी कळविलेले आहे. तरीदेखील नगरपंचायतीने सदरचे बांधकाम सुरुच ठेवलेले आहे,असे निदर्शनास आलेले आहे.**

**नगरपंचायतमार्फत सुरु असलेले अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम हे सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून होत असलेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सांगितले असून त्यासाठीचे टेंडर काढून ठेकेदारास कार्यारंभ आदेश देखील पारित केला आहे व त्या ठिकाणी बांधकाम सुरु देखील करणेत आलेले आहे. अशा परिस्थितीत बांधकाम बंद करणे सार्वजनिक हिताचे दृष्टिने हितावह ठरणार नाही. सदर क्षेत्राची होणारी किंमत नगरपंचायत संस्थानला देणेस तयार आहे आणि जागा मागणीचा प्रस्ताव नगरपंचायत संस्थानकडे सादर करणार असलेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी सांगितलेने "नगरपंचायत,शिर्डी यांनी तसा जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे तात्काळ सादर करावा. तदनंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी,"** असे बैठकीत ठरले.

सदर बैठकीत ठरलेप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील उक्त सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रापैकी नगरपंचायत,शिर्डी यांना दिलेल्या क्षेत्राव्यतिरिक्त नगरपंचायतीने संस्थानचे क्षेत्रात प्रस्तावित केलेल्या बांधकामाखालील जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे प्राप्त

झालेनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेकामीचे उक्त सभेत ठरलेप्रमाणेच्या निर्णयास मंजूरी मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला. त्यात सदरचा विषय स्थगित ठेवणेत येवून मा.व्यवस्थापन समितीच्या पुढील बैठकीत सादर करणेत यावा, असे ठरले.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.३१८ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रापैकी नगरपंचायत,शिर्डी यांना दिलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्त शिर्डी नगरपंचायतीने संस्थानचे क्षेत्रात प्रस्तावित केलेल्या बांधकामाखालील जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे प्राप्त झालेनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच नगर-मनमाड रस्ता ते १६ गुंठे पर्यंतचा जुना पिंपळवाडी रोड No Vehicles Zone व No Hawkers Zone म्हणून घोषित करणेसाठीचा प्रस्ताव मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांचेकडे पाठविण्यात यावा,असे ठरले.**

उपरोक्त निर्णयाप्रमाणे इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/१६१०/२०१९ दि.३०/०७/२०१९ अन्वये मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना नगरपंचायतीने संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रातील नगरपंचायत,शिर्डी यांना दिलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थान मालकीचे इतर क्षेत्रात केलेल्या बांधकामाखालील जागा मागणीचा स्वतंत्र प्रस्ताव संस्थानकडे तात्काळ सादर करणेत यावा,असेबाबत अलाहिदा कळविणेत आलेले आहे.

मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१६४/४ पै. चे क्षेत्रापैकी नगरपंचायत,शिर्डी यांना दिलेल्या ०.१२ आर क्षेत्राव्यतिरिक्त संस्थान मालकीचे उर्वरित क्षेत्रापैकीचे क्षेत्रात नगरपंचायतने केलेल्या ०.०६.२५ आर इतके अतिक्रमण केलेले क्षेत्र नगरपंचायत,शिर्डी यांचेकडेस वर्ग करणेकामीचा परिपूर्ण प्रस्ताव इकडेस सादर न केल्याने प्रस्तुत कामीचा परिपुर्ण प्रस्ताव सादर करणेकामी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/३८४९/२०१९ दि.३१/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविणेत येवून त्यात खालीलप्रमाणे पुर्तता करणेबाबत सुचित करणेत आलेले आहे.

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रात केलेल्या अतिक्रमित क्षेत्राचा वापर कोणत्या कारणासाठी केलेला आहे अथवा उक्त अतिक्रमित क्षेत्र ६.२५ आर हे नगरपंचायतीकडे वर्ग करणेचे प्रयोजन काय आहे. याबाबत प्रस्तावात उल्लेख करावा.

२) उक्त अतिक्रमित क्षेत्रात केलेल्या बांधकामाचा रेखांकन आराखडा व बांधकाम अंदाजपत्रक प्रस्तावासोबत सादर करावे.

३) सदर बांधकामास नगररचना विभागाने दिलेल्या अभिप्रायाचे पत्राची प्रत प्रस्तावासोबत सादर करावी.

४) सक्षम अधिकारी यांचा बांधकाम परवाना प्रस्तावासोबत सादर करावा.

५) उक्त अतिक्रमित क्षेत्राचा मोजणी नकाशा सादर करावा.

६) उक्त अतिक्रमित क्षेत्र नगरपंचायतीकडे वर्ग करणेबाबतचा नगरपंचायत कमिटीचा ठराव प्रस्तावासोबत सादर करावा.

७) सदरचे अतिक्रमित क्षेत्र भुमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार होणा-या रकमेस नगरपंचायत, घेण्यास तयार आहेत काय याबाबत प्रस्तावात खुलासा करावा.

तदनुषंगाने मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.०८/४१/२०२० दि.०६/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये इकडेस प्रस्ताव सादर केला असून त्यात त्यांनी "उक्त जलकुंभाकरीता शिर्डी नगरपंचायतीस महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.सासंवि २००६/५८०/(७९)/का.१६ दि.२०/१२/२००६ नुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत उपलब्ध करुन दिलेल्या १२ आर क्षेत्राव्यतिरिक्त उत्तर बाजूस असलेल्या विद्यमान पाण्याच्या टाकीखालील ६.२५ आर जागा मागणी प्रस्ताव सादर केला आहे. संदर्भ क्रं.४ अन्वये कळविण्यात आलेल्या पत्रानुसार खालीलप्रमाणे पुर्तता करण्यात येत आहे.

| अ.नं. | संस्थानद्वारे उपस्थित केलेला मुद्दा | नगरपंचायतीद्वारे पुर्तता केलेली. |
|---|---|---|
| १ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | सर्वे नं.१२६/४ पै.मधील ६.२५ आर जागा ही विद्यमान पाण्याच्या |

| | | |
|---|---|---|
| | यांचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रात केलेल्या अतिक्रमित क्षेत्राचा वापर कोणत्या कारणासाठी केलेला आहे अथवा उक्त अतिक्रमित क्षेत्र ६.२५ आर हे नगरपंचायतकडे वर्ग करण्याचे प्रयोजन काय याबाबत प्रस्तावात उल्लेख करावा. | टाकीकरीता वापरणेत येत आहे. तरी त्याखालील जागा ही विद्यमान पाण्याच्या टाकीसाठी वापरण्याचे प्रयोजन आहे. याबाबत नगरपंचायतने सादर केलेल्या प्रस्तावात सर्वे नं.१२६/४ खालील जागेत उत्तर बाजूस सरकलेली पाण्याच्या टाकीखालील जागा ६.२५ आर जागा नगरपंचायतकडे वर्ग करणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. <br> याबाबत संदर्भ क्रं.१ चे प्रस्तावात व त्यानंतरच्या झालेल्या पत्रव्यवहारामध्ये सदर जागा मागणी केलेले प्रयोजनाचा उल्लेख झालेला आहे. <br> सदर बाबत प्रस्ताव हा दि.०२/०४/२०१९ रोजी आपलेसोबत झालेल्या बैठकीत ठरलेप्रमाणे पाण्याच्या टाकीखालील संस्थानच्या जागेत असलेले अतिरिक्त क्षेत्र मागणी करणेबाबत ठरलेनुसार दाखल केला आहे. |
| २ | उक्त अतिक्रमित क्षेत्रात केलेल्या बांधकामाचा रेखांकन आराखडा व बांधकाम अंदाजपत्रक प्रस्तावासोबत सादर करावे. | ६.२५ आर जागा मागणी प्रस्तावातील विद्यमान पाण्याच्या टाकीचे बांधकाम हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत पाणीपुरवठा योजनेचे कामाचे वेळी संस्थान यांनी दर्शविण्यात आलेल्या जागेत पूर्ण करण्यात आलेले आहे. याबाबत पाण्याच्या टाकीचे बांधकामाचा आराखडा व प्रकल्प अहवालातील टाकीचे बांधकामाचे अंदाजपत्रक सोबत देण्यात येत आहे. |
| ३ | सदर बांधकामास नगररचना विभागाने दिलेल्या अभिप्रायाचे पत्राची प्रत प्रस्तावासोबत सादर करावी. | पाण्याच्या टाकीचे बांधकाम हे पाणीपुरवठा योजनेतील मंजुर उपांग असून सदर योजना ही महाराष्ट्र शासनाद्वारे मंजूर करण्यात आलेली असल्याने टाकीसाठी नगररचना विभागाचे अभिप्राय घेतलेले नाही. |
| ४ | उक्त अतिक्रमित क्षेत्राचा मोजणी नकाशा सादर करावा. | नगरपंचायतने मागणी केलेल्या प्रस्तावामध्ये ६.२५ आर जागा ही मोजणी नकाशावर दर्शविण्यात येवून सदर नकाशा नगरपंचायतने जा.क्रं.नपंटे-८/२५४/१/२०१९ दि.१९/०८/२०१९ रोजी प्रस्तावात जोडलेला आहे. त्याबाबत सदर नकाशाचे कृपया अवलोकन करण्यात यावे. |
| ५ | उक्त अतिक्रमित क्षेत्र नगरपंचायतकडे वर्ग करणेबाबतचा नगरपंचायत कमिटीचा ठराव प्रस्तावासोबत सादर करावा. | दि.२१/१२/२०१९ रोजी नगरपंचायत सर्वसाधारण सभेमध्ये झालेल्या ठरावाची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. |
| ६ | सदरचे अतिक्रमित क्षेत्र भुमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार होणा-या रकमेस नगरपंचायत घेण्यास तयार आहेत काय, याबाबत प्रस्तावात खुलासा करावा. | ६.२५ आर जागा मागणी प्रस्तावातील विद्यमान पाण्याच्या टाकीचे बांधकाम हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत पाणीपुरवठा योजनेचे कामाचे वेळी संस्थान यांनी दर्शविण्यात आलेल्या जागेत पूर्ण करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर जागा ही विनामुल्य नगरपंचायतकडे वर्ग करणेबाबत प्रस्ताव आहे. |

संदर्भ क्रं.४ चे पत्रात नमुद ६.२५ आर क्षेत्राबाबत अतिक्रमित क्षेत्र असा वारंवार उल्लेख करण्यात आलेला असून त्याबाबत आक्षेप नोंदविण्यात येत आहे. नगरपंचायत सार्वजनिक पाण्याच्या टाकीचे बांधकाम करतेवेळी संस्थानचे संबंधीत अधिकारी यांचे उपस्थितीत सदर बांधकाम सुरु होवून मागील साधारण १० वर्षापासून सदर टाकीबाबत संसथानचे काहीही आक्षेप

नव्हते. दि.०२/०४/२०१९ रोजीचे आपले समवेत व तहसिलदार,राहाता यांचेसह संस्थान उपमुख्य कार्यकारी अधिकारी व इतर अधिका-यांच्या उपस्थितीत झालेल्या संयुक्त बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे ठरले आहे. सध्यस्थितीत उभा असलेला जलकुंभ हलविणे अगर त्याची अंशत: जागा संस्थानला देणे शक्य नसल्याने सार्वजनिक हिताच्या दृष्टिने जलकुंभाचा जेवढा भाग संस्थानच्या जागेत गेलेला आहे तेवढया अतिरिक्त जागेची मागणी नगरपंचायद्वारे श्री साईबाबा संस्थानकडे करण्यात यावी. शिर्डी नगरपंचायतने संदर्भ क्रं.५ व ६ चे पत्रान्वये याबाबत सविस्तर खुलासा केलेला आहे. सदरबाबत दि.०२/०४/२०१९ रोजी आपलेसोबत झालेल्या बैठकीत ठरलेप्रमाणे नगरपंचायत पाण्याच्या टाकीखालील संस्थानच्या जागेत असलेले अतिरिक्त क्षेत्र मागणी करणेबाबत

ठरलेनुसार सदर प्रस्ताव दाखल केला आहे. तरी विद्यमान पाण्याच्या टाकीखालील उत्तर बाजूस असलेली ६.२५ आर जागा शिर्डी नगरपंचायतकडे विनामुल्य हस्तांतर/वर्ग करणेबाबतची आवश्यक कार्यवाही पार पाडणेस विनंती आहे." असेबाबत नमुद केलेले आहे.

**मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावातील दि.०७/०४/२०१८ रोजीच्या मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता संस्थान मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्र १८.२५ आर इतके सध्यस्थितीत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचे ताब्यात असलेचे दिसून येत आहे. प्रत्यक्षात मात्र शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना उक्त सर्वे नं.१२६/४ पै. चे ०.१२ आर इतकेच क्षेत्र महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.सासंवि/२००६/५८०/(७९)/का.१६ दि.२०/१२/२००६ रोजीचे शासन निर्णयाप्रमाणे जलकुंभासाठी वर्ग करणेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांनी संस्थान मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रापैकी ६.२५ आर इतके क्षेत्रात जास्तीचे अतिक्रमण केलेले असलेचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.**

**मात्र मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै.चे जागेत उत्तर बाजूस सरकलेली पाण्याचे टाकीखालील ०.०६.२५ आर जागा नगरपंचायतीकडे वर्ग करणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.**

**मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सदर प्रस्तावात पाण्याची टाकी सरकलेबाबतचा केलेला उल्लेख संयुक्तिक वाटत नाही. सदर पाण्याच्या टाकीचे बांधकाम नगरपंचायतीने सन २००६ मध्येच पूर्ण केलेले आहे. त्यामुळे सदरची पाण्याची टाकी सरकण्याचा प्रश्न उदभवत नाही.**

**नगरपंचायत,शिर्डी यांना संस्थान मालकीचे उक्त क्षेत्रापैकी यापूर्वी जलकुंभासाठी ०.१२ आर क्षेत्र अलाहिदा वर्ग केलेले आहे व सदर क्षेत्रात नगरपंचायत,शिर्डी यांनी जलकुंभाचे बांधकाम त्याच वेळेस अलाहिदा पूर्ण केलेले आहे. आजमितीस नगरपंचायत,शिर्डी यांचे ताब्यात संस्थान मालकीचे उक्त सर्वे नं.१२६/४ पैकी ०.१८.२५ आर इतके क्षेत्र असलेचे मोजणी नकाशावरुन दिसून येत आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी यापूर्वी नगरपंचायत,शिर्डी यांना फक्त ०.१२ आर इतकेच क्षेत्र वर्ग केलेले आहे. म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांनी उक्त सर्वे नं.१२६/४ पै.चे क्षेत्रात ६.२५ इतके अतिरिक्त क्षेत्रात अतिक्रमण केलेले असलेचे दिसून येत आहे. म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांना वर्ग केलेल्या ०.१२ आर क्षेत्राव्यतिरिक्त ०.६.२५ आर इतके जास्तीचे क्षेत्रात अतिक्रमण केलेले असलेचे निष्पण्ण होत आहे.**

**प्रस्तुतचे अतिक्रमण संबंधात मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी /मालमत्ता/५६५०/२०१९ दि.२३/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या ०.१२ आर क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थानचे उर्वरित क्षेत्रात नगरपंचायतने त्यांचे कर्मचारी निवासस्थान व कंपाऊंडचे प्रस्तावित केलेले बांधकाम करु नये व संस्थानचे मालकीचे उर्वरित क्षेत्राचा वापर करु नये असेबाबत अलाहिदा कळविणेत आलेले आहे.**

तदनुषंगाने शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.०१/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदरची जागा हीसुधारित (प्रारुप) शिर्डी विकास योजनेमध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी दर्शविलेली आहे. प्रस्तावित आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास मा.सहसंचालक,नगररचना विभाग, नाशिक यांचे शिफारशीनुसार सहायक संचालक,नगररचना विभाग,अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि.२०/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मंजूरीची शिफारस केलेली आहे,वगैरेबाबत इकडेस कळविलेले आहे.

**तदनुषंगाने मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/५८३८/२०१९ दि.०५/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये शिर्डी सुधारीत प्रारुप विकास योजनेमध्ये संस्थानचे मालकीचे सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रामध्ये अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान या प्रयोजनासाठी क्षेत्र प्रस्तावित केलेले असलेचे नमुद केलेले आहे.**

**शिवाय प्रस्तावित आरक्षणानुसार सदर जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामाचे प्रस्तावास मा.सहायक संचालक,नगररचना यांनी मंजुरीची शिफारस केलेली असलेचेही नमुद केलेले आहे. म्हणजेच सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर झालेली नाही व अंतिम झालेली नाही.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे सर्वे नं.१२६ पै. ०.१२ आर इतकेच क्षेत्र नगरपंचायतीस जलकुंभाचे बांधकाम करणेकामी सन २००६ मध्ये दिलेले आहे व तदनुसार त्याचवेळेस संस्थानकडून नगरपंचायत,शिर्डी यांनी सर्वे नं.१२६ पै.चे ०.१२ आर क्षेत्राचा ताबा संस्थानकडून घेवून त्यात जलकुंभाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.**

**म्हणजेच नगरपंचायत,शिर्डी यांचे मालकीचे सध्यस्थितीत फक्त ०.१२ आर इतकेच क्षेत्र आहे. तरीदेखील नगरपंचायतने सदर सर्वे नं.१२६ पै.चे क्षेत्रात सुधारीत (प्रारुप) विकास योजनेत प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थान दर्शविलेले आहे व त्याप्रमाणे बांधकाम सुरु केलेले असलेचे आमचे निदर्शनास आले आहे. मात्र सदरची सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजना अद्यापपावेतो मंजूर व अंतिम झालेली नाही. त्यामुळे नगरपंचायतीने, नगरपंचायतीस संस्थानने दिलेल्या ०.१२ आर क्षेत्रा व्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात बांधकाम करणे अथवा संस्थानचे उर्वरित क्षेत्राचा वापर करणे ही बाब विधीग्राहय नाही.**

**वास्तविक पाहता नगरपंचायतीने सुधारीत (प्रारुप) शिर्डी विकास योजनेस अंतिम मंजुरी प्राप्त झालेनंतर त्याप्रमाणे भुसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन घेवून भुसंपादित क्षेत्र नगरपंचायतीकडे वर्ग झालेनंतर त्यात प्रस्तावित अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम करणे विधीग्राहय आहे.**

**मात्र नगरपंचायतीने उपरोक्तप्रमाणे प्रक्रिया पूर्ण न करता संस्थानचे जागेत अग्निशमन केंद्र व कर्मचारी निवासस्थानचे बांधकाम बेकायदेशीरपणे सुरु केलेले असलेचे निदर्शनास येत आहे. तरी सदरचे बांधकाम तात्काळ बंद करणेत यावे आणि संस्थानची सदरची जागा पूर्ववत स्थितीत करणेत यावी व संस्थानने नगरपंचायतीस दिलेल्या०.१२ आर क्षेत्राचे टाकीचे क्षेत्रासह जागेची निश्चिती करुन घेवून त्याव्यतिरिक्त संस्थानचे इतर क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नयेअथवा कोणत्याही परिस्थितीत संस्थानचे मालकीचे क्षेत्राचा वापर करु नये. आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडेस तात्काळ सादर करावा,** असेबाबत अलाहिदा कळविणेत आलेले आहे.

**मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.०६/०१/२०२० रोजीच्या प्रस्तावात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६ पै.चे क्षेत्रात नगरपंचायत, शिर्डी यांनी अतिक्रमण केलेले क्षेत्र ०.०६.२५ आर इतके विनामुल्य वर्ग करणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि प्रस्तुत अतिक्रमणासंबंधात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे अध्यक्षतेखाली प्रशासकीय स्तरावर दि.०२/०४/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत सदर अतिक्रमित जागेची होणारी किंमत नगरपंचायत संस्थानला अदा करेल,असेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी सांगितलेले आहे. तेंव्हा संस्थानचे हिताचे दृष्टिकोनातून सदर अतिक्रमित क्षेत्र महाराष्ट्र भुमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार होणा-या मुल्यांकनाप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना वर्ग करणे विधीग्राहय ठरेल.**

**यास्तव शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रात अतिक्रमण केलेले ०.०६.२५ आर इतके क्षेत्र महाराष्ट्र भुमी संपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार होणा-यामुल्यांकनाप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडेस वर्ग करणेस परवानगी मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३१८ मधील झालेल्या निर्णयाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करणेच्या निर्णयार्थ प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.११/०५/२०२० रोजीच्या सभेपुढे सादर करणेत आला.**

**त्यात निर्णय क्रं.२४३ प्रमाणे "प्रस्ताव स्पष्ट नाही,"वर्ग करणे" ही बाब स्पष्ट नाही. शिर्डी नगरपंचायत सदर अतिक्रमित जागा रेडी रेकनर दराने विकत घेण्यास तयार आहेत काय, हे स्पष्ट नाही. याबाबत सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-doc) समितीसमोर सादर करणेत यावा,"** असेबाबत निर्णय झालेला आहे.

दरम्यानचे काळात इकडील उपरोक्त दि.१५/०५/२०२० रोजीच्या कार्यालयीन टिपणीप्रमाणे इकडील पत्र जा.नं. एसएसएसटी/मालमत्ता/२४८/२०२० दि.२२/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना शिर्डी नगरपंचायत,शिर्डी हे उक्त अतिक्रमित जागेची शासनाचे शिघ्र सिध्द गणकानुसार (रेडी रेकनरनुसार) होणा-या रकमेस खरेदी देण्यास तयार आहे किंवा कसे याबाबत विचारणा करणेत आली.

त्यास अनुसरुन मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.नपं./टे-०८/७८२/२०२० दि.२८/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये "सदर जागेची शिघ्र सिध्द गणकानुसार प्राथमिक मुल्यांकन खालीलप्रमाणे होत आहे.

| स.नं. | सि.स. नं. | रेडी रेकनर विभाग क्रमांक. | रेडी रेकनर दर प्र.चौमी. | नोंदणी व मुद्रांक विभागाकडील परिपत्रक क्रं.४१६ दि.३१/०३/२०१७ च्या सहपत्रानुसार तक्ता रकाना क्रं.३० नुसार. | क्षेत्र चौमी. | जागेचे मुल्यांकन. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ (५x६) |
| 126 | 940 | 1/16 | 9400/- | विकास योजनेनुसारच्या आरक्षित/बाधीत क्षेत्राचे मुल्यांकन वार्षिक मुल्य दर तक्त्यातील नमुद दराच्या ८० टक्के दराने करण्याचे नमुद केलेले आहे. त्यानुसार प्रती चौमी. दर 7520/- इतका येत आहे. | 625 | 625x7520= 47,00,000/- |

सदर जागेची नगरपंचायतला खरेदी करावयाची झाल्यास प्रत्यक्ष खरेदी वेळी जागेचे मुल्यांकन दुय्यम निबंधक,राहाता कार्यालयाकडून निश्चित करुन घेणे आवश्यक राहील.

तथापि,खालील कारणास्तव सदर ६.२५ आर जागा नगरपंचायतला या जागेच्या उपरोक्तप्रमाणे होणा-या किंमतीच्या ५० टक्के रक्कम घेवून वर्ग करणेस मान्यता मिळावी,ही विनंती.

१) शिर्डी नगरपंचायत हे शिर्डी शहरामध्ये विविध विकास कामे करणारे स्थानिक प्राधिकरण असून नगरपंचायतला अशी विविध सार्वजनिक स्वरुपाची कामे करतांना असलेले उत्पन्नाचे स्त्रोत हे अत्यंत मर्यादित आहेत.

२) शिर्डी शहरात येणा-या लाखो साईभक्तांना विविध सुविधा पुरविण्यासाठी नगरपंचायतला सार्वजनिक कामांवर अतिरिक्त खर्च करावा लागत असला तरीदेखील शासनाकडून नगरपंचायतला शिर्डी येथे तीर्थक्षेत्र म्हणून विकास करण्यासाठी कुठलाही अतिरिक्त/विशेष निधी उपलब्ध करुन दिला जात नाही.

३) भांडवली स्वरुपाची विविध विकास कामे व दैनंदिन देखभाल दुरुस्तीची इतर कामे करतांना नगरपंचायतीकडे जमीन खरेदीसारख्या बाबींकरीता खर्च करण्यासाठी कुठलाही अतिरिक्त निधी शिल्लक राहत नाही. या पार्श्वभुमीवर उपरोक्त नमुद केलेप्रमाणे ६.२५ आर जागा संस्थानकडून खरेदी करण्यासाठी रु.४७.०० लक्ष इतक्या रकमेचा आर्थिक भार उचलणे नगरपंचायतला कठीण आहे.

४) सदर जागेमध्ये शिर्डी नगरपंचायतने श्री साईबाबा संस्थानशी समन्वय साधूनच जलकुंभाचे बांधकाम सन २००६ मध्ये सुरु करुन पूर्ण केलेले आहे. या जलकुंभाच्या पाण्याचा वापर शिर्डी शहरासह तातडीचे परिस्थितीत श्री साईबाबा संस्थानचे साईआश्रम, विविध आस्थापनांना व संस्थानचे कर्मचारी निवासस्थान करीत असलेल्या वसाहतींना पाणीपुरवठा करण्यासाठी देखील होत असतो.

५) शिर्डी शहरामधील बरीच हॉटेल्स,लॉजिंग,रेस्टॉरंट याशिवाय सार्वजनिक शौचालय या ठिकाणी साईभक्तांच्या सुविधेकरीता उपलब्ध करुन देण्यात येत असलेला पाणीपुरवठा हा याच जलकुंभातून होत असतो.

६) अस्तित्वातील नमुद जलकुंभाची जागा तसेच त्यालगतची जागा सुधारीत विकास योजनेमध्ये नगरपंचायत अग्निशमक केंद्रासाठी व अनुषंगिक जलकुंभ या प्रयोजनासाठी आरक्षित असल्याने सदर जागेचा वापर हा याच कारणासाठी करणे योग्य आहे.

७) सदर जागेवर नगरपंचायत जलकुंभाचे काम सुरु असताना श्री साईबाबा संस्थान यांनी सदर जागा काम करणेसाठी दाखवून दिली होती व गेली अनेक वर्षापासून सदर ठिकाणी जलकुंभ उभा असून त्याद्वारे शहराला सार्वजनकि पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

८) महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रं.सासंवि-२००६/५८०/(७९)/का. सोळा दि.२०/१२/२००६ नुसार नगरपंचायतला जलकुंभाकरीता यापूर्वी मोफत क्षेत्र उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. याच जलकुंभाचा संस्थान जागेत उत्तरेकडे सरकलेल्या भागाचे जागेसाठी नगरपंचायतद्वारे द्यावयाच्या मोबदल्यामध्ये किमान सवलत मिळण्याची मागणी करणे उचित वाटते.

९) शिर्डी नगरपंचायत हे नियोजन प्राधिकरण म्हणून शिर्डीमधील नागरीकांना व साईभक्तांना नगरपंचायतच्या संसाधनांचा वापर करुन सुविधा देत असून श्री साईबाबा संस्थानचा हेतू देखील यापेक्षा वेगळा नसल्याने गेल्या अनेक वर्षापासून नगरपंचायत व संस्थान यांनी परस्पर समन्वय ठेवून शहरातील विविध विकास कामे केली आहेत.

१०) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१(२)(ग) या तरतुदीनुसार स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी अशा संस्थांना अथवा व्यक्तींना किंवा **शिर्डी नगरपंचायतला** वित्त सहाय्य देणेबाबत

तरतुद आहे. म्हणजेच शिर्डी शहरात साईभक्तांना व स्थानिकांना नागरी सेवा व सुविधा देणेबाबत संस्थान व नगरपंचायत एकत्रितरित्या काम करत आहेत.

११) नमुद जलकुंभाखालील जागा ही शिर्डी शहर सार्वजनिक पाणीपुरवठयाकरीता असून या सार्वजनिक सोयी सुविधेचा वापर देखील सुरु असल्याने सदर जागा ही संस्थानकडून विनामुल्य वर्ग करण्यासाबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यामध्ये किमान ५० टक्के सवलत मिळण्याची मागणी उपरोक्त नमुद कारणास्तव उचित वाटते.

आपले संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने वरील कारणास्तव ६.२५ आर जागेचे रेडी रेकनरनुसार एकूण मुल्यांकन साधारणत: रु.४७,००,०००/- होत असल्याने त्यामध्ये ५० टक्के सवलत मिळून रक्कम रु.२३,५०,५००/- इतकी रक्कम नगरपंचायतच्या मे.सभेच्या मंजूरीस अधिन राहून खरेदी करता येईल. तरी सदर प्रस्ताव मंजूर करण्यास विनंती आहे.” वगैरे बाबत इकडेस कळविलेले आहे.

मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडील उपरोक्त पत्राचे अवलोकन केले असता उक्त अतिक्रमित क्षेत्राचे एकूण मुल्यांकन साधारणत: रु.४७,००,०००/- (अक्षरी रु.सत्तेचाळीस लाख मात्र) होत आहे. तथापि ५०% सवलत मिळून सदर अतिक्रमित

क्षेत्राची रक्कम रु.२३,५०,५००/- (अक्षरी रु.तेवीस लाख पन्नास हजार पाचशे मात्र) इतके रकमेस नगरपंचायतीस खरेदी मिळणेकामी विनंती केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय** - शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील उपरोक्त सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रात अतिक्रमण केलेले ०.०६.२५ आर इतके क्षेत्र शासनाचे सध्यस्थितीतील रेडी रेकनरनुसार होणा-या मुल्यांकनाप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना कायम खरेदी देणेसाठी आणि संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.३१८ मधील झालेल्या निर्णयाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस मान्यतेसाठी तसा प्रस्ताव सादर करता येईल.

**प्रस्ताव**– शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील उपरोक्त सर्वे नं.१२६/४ पै. चे क्षेत्रात अतिक्रमण केलेले ०.०६.२५ आर इतके क्षेत्र शासनाचे सध्यस्थितीतील रेडी रेकनरनुसार होणा-या मुल्यांकनाप्रमाणे शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना कायम खरेदी देणेच्या निर्णयार्थ आणि संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.३१८ मधील झालेल्या निर्णयाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडेस मान्यतेसाठी तसा प्रस्ताव सादर करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३७३** **या विषयाचा सखोल अभ्यास करण्यात आला, तसेच तदर्थ (Ad-hoc) समितीच्या प्रत्येक सदस्याने आपआपले मत मांडले.**

**अभिलेख तसेच संबंधीत विभागाने दिलेल्या टिपणीवरुन हे स्पष्ट होते की, शिर्डी नगरपंचायतीने पाण्याची टाकी नमुद ठिकाणी न बांधता इतर ठिकाणी बांधल्याचे मान्य केले आहे. व म्हणूनच शिर्डी नगरपंचायतीने सदर जमिन विकत घेण्यासाठी प्रस्ताव दिला आहे. संस्थानचे संबंधीत मालमत्ता विभागाने असा प्रस्ताव दिला आहे की, अतिक्रमीत क्षेत्र ready reckoner नुसार होणाऱ्या मुल्यांकनाप्रमाणे शिर्डी नगरपंचायत यांना कायम खरेदी द्यावे. मात्र हा प्रस्ताव श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या ध्येय धोरणाच्या विपरीत आहे. एका बाजुला संस्थान नविन जमिनी विकत घेण्याचे प्रस्तावीत करत आहे तर दुसऱ्या बाजुला अतिशय मोक्याच्या ठिकाणी असलेली जमीन ज्याचा उपयोग भविष्यात संस्थान करु शकेल असे असतांना शिर्डी नगरपंचायतीस विकत देऊ पाहत आहे. तदर्थ (Ad-hoc) समितीच्या काही सदस्यांच्या मते ही बाब अतिक्रमण नसून चुक/mistake आहे. नगरपंचायतीने म्हणजेच स्वायत्त संस्थेने चुक मान्य केली आहे.**

**वरील सर्व बाबींचा सांगोपांग विचार करता समितीचे सदस्य १) मा.श्री.श्रीकांत ल. आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर, २) मा.श्री.दिलीप स्वामी, अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक ३) मा.श्रीमती गीता बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी चर्चेअंती खालील निर्णय घेतला.**

**१. सदर क्षेत्र शिर्डी नगरपंचायतीस विक्री करण्याचा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे.**

**२. चुकीने शिर्डी नगरपंचायतीने घेतलेले क्षेत्र निश्चित आहे व त्याचे मुल्यांकन वगैरे या सर्व बाबी अभिलेखावर त्वरीत उपलब्ध आहेत,अशा परिस्थितीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी त्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्फत सदर क्षेत्राचा ताबा शिर्डी नगरपंचायत,**

शिर्डी यांचेकडून मिळवण्याबाबत दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, राहाता यांचेकडे त्वरीत दिवाणी दावा दाखल करावा.

३. सदर जमीन शासनाचे निर्णयाने दिल्याने, स्पष्टतेसाठी महाराष्ट्र शासनास पक्षकार करावे.

४. सदर दावा दाखल करणेकामी संस्थानचे वकीलांशी त्वरीत संपर्क करावा, त्यांचे फी बाबत संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्वरीत बोलणी करावी.

५. दाव्यासाठी लागणारा खर्च म्हणजेच कोर्ट फी स्टॅम्प व इतर योग्य तो अनुषंगीक खर्च करण्यास परवानगी देण्यात येत आहे. मात्र या सर्व खर्चाच्या पावत्या इत्यादी अभिलेखावर ठेवाव्यात.

६. तसचे सदर दाव्यात, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी सदर क्षेत्राबाबत कुणाशीही कुठलाही व्यवहार करु नये, त्या मिळकतीवर कोणतेही बांधकाम करु नये तसेच त्या क्षेत्राचा कुठल्याही कारणासाठी कुठल्याही प्रकारे वापर करु नये, असा तुर्तातूर्तचा मनाई हुकूम मागावा.

७. सदर दाव्यामध्ये संस्थानतर्फे नगरपंचायत शिर्डीकडून दरम्यानचे उत्पन्न (mesne profit) ची मागणी करावी तसेच सद्य स्थितीत शिर्डी नगरपंचायत त्या जागेचा वापर करत असल्याने व सदर जागेचा वापर वाणिज्य वापर म्हणून होऊ शकणारा असल्याने अंतरीम दरम्यानचे उत्पन्न (interim mesne profit) ची मागणी करणारा तुर्तातूर्तचा अर्ज त्यात दाखल करावा.

वरील सर्व कार्यवाही मालमत्ता विभागाने लवकरात लवकर पूर्ण करण्याची आहे व त्याचा अनुपालन अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर आजपासून एक महिन्याचे आंत ठेवण्याचा आहे.

समिती सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.अरुण डोंगरे, (भा.प्र.से.) यांनी त्यांचे वस्तुस्थितीवर आधारीत खालील मत मांडले.

१. सदरचा विषय मा.तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता त्यावर समितीने शिर्डी नगरपंचायत सदर अतिक्रमीत जागा रेडीरेकर दराने विकत घेण्यास तयार आहेत काय, हे स्पष्ट नाही. याबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार इकडील दि.२५.०५.२०२० रोजीचे पत्रान्वये मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना सदरची जागा शासनाचे शिघ्र सिध्द गणकानुसार (रेडी रेकनर) होणाऱ्या रकमेस खरेदी घेण्यास तयार आहे किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात आली होती, त्यावर मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांनी दि.२८.०५.२०२० रोजीचे पत्रान्वये रेडीरेकनर नुसार होणारे एकुण मुल्यांकनामध्ये ५० टक्के सवलत देऊन सदरची जागा शिर्डी नगरपंचायतीस खरेदी देणेबाबत विनंती केली आहे.

२. सदर अतिक्रमीत जागेमध्ये पिण्याच्या पाण्याची टाकी बांधण्यात आलेली असुन त्यामधुन गावासाठी पाणी पुरवठा केला जातो. त्यासंदर्भात कोर्टात दावा दाखल केल्यास गावाच्या पाणीपुरवठयामध्ये व्यत्यय येऊ शकतो. तसेच संस्थानकडून गावाला पाणीपुरवठा करणे, पाण्याच्या टाकीचा दुरुस्ती, देखभाल व इतर गोष्टी करणे शक्य होणार नाही. सदर जागेचे क्षेत्रफळ ६.२५ आर आहे व तिचा वापर निमशासकीय यंत्रणेमार्फत पाणी पुरवठा करण्यासाठी केला जात आहे.

३. शिर्डी शहर विकास आराखडयामध्ये सदरची जागा पाण्याच्या टाकीसाठी राखीव ठेवण्यात आली आहे. त्यामुळे जरी सदर जागा संस्थानने ताब्यात घेतली तरी त्याठीकाणी कोणतेही बांधकाम अनुज्ञेय होणार नाही.

तरी सदरची जागा शिर्डी नगरपंचायत यांना रेडीरेकनरच्या किंमतीत खरेदी देणेबाबत मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेने प्रस्ताव शासनाकडे सादर करणे योग्य राहील.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.२०** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था. शिर्डी कडून शिर्डी नगरपंचायतीला स्वच्छतेसाठी देण्यात येत असलेल्या अर्थसहाय्याबाबत नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत यांचे पत्र अवलोकनार्थ व मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांचेकडून प्राप्त झालेला अहवाल/अभिप्राय निर्णयार्थ सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत शिर्डी नगरपंचायतीस दैनंदिन स्वच्छतेसाठी दरमहा रु.४२,५१,५९९/- मात्र अर्थसहाय्य डिसेंबर २०१७ पासून देण्यात येत आहेत. मात्र लॉक डाऊनच्या

कालावधीतही शिर्डी नगरपंचायतीस स्वच्छतेबाबत रक्कम वितरणाबाबत शिर्डी ग्रामस्थांनी खालीलप्रमाणे निवेदन मा. मुख्यकार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दिले आहे.

**शिर्डी ग्रामस्थांचे निवेदन:-** शिर्डी नगरपंचायतीने श्री साईबाबा संस्थानला अनेक वेळेस विनंती करून शिर्डी शहराच्या स्वच्छतेसाठी साईबाबा संस्थानकडे दरमहा रु. ४२,५१,५९९/- पाच वर्षासाठी मंजूर केले आहेत. साधारण गेल्या अडीच ते तीन वर्षापासून श्री साईबाबा संस्थान नियमितपणे दरमहा ठरलेली रक्कम शिर्डी नगरपंचायतकडे वर्ग करत आहे. साधारण गेल्या अडीच ते तीन वर्षापासून शिर्डी नगरपंचायतने स्वच्छतेचा ठेका बी. व्ही. जी. कंपनी पुणे यांना ५ वर्षासाठी दिलेला आहे. दरमहा मिळत असलेले रु. ४२,५१,५९९/- कसे खर्च होणार याचा तपशील शिर्डी नगरपंचायतीन सबंधीत ठेकेदार व श्री साईबाबा संस्थानला सादर केलेला आहे. त्या तपशीलात उदाहरण म्हणून कर्मचा-यांना दरमहा रुपये १४,७२०/- इतका पगार मिळायला हवा होता. प्रत्यक्षात मात्र तसे न करता बीव्हीजी कंपनी कर्मचा-यांना त्यांच्या खात्यामध्ये रु. ९०००/- च्या आसपास रक्कम जमा करत आहे. व उरलेली रक्कम शिर्डी नगर पंचायत स्वतःच्या खिशात घालत आहे. अशा प्रकारे सर्वच १५७ स्वच्छता कर्मचा-यांच्या पगारात अफरातफर केली जात आहे. असे स्पष्टपणे दिसते.

यापूर्वी शिर्डी नगरपंचायतीच्या मा. सदस्यांनी व नागरिकांनी देखील प्रत्यक्ष , लेखी अथवा तोंडी स्वरुपात अनेक वेळेस शिर्डी नगरपंचायतीच्या मुख्याधिका-यांकडे वारंवार तक्रार करून देखील याबाबत काहीही खुलासा केलेला नाही. ही रक्कम श्री साईबाबांच्या झोळीतील असल्याने त्याचा कुणी गैरवापर अफरातफर करत असेल तर निश्चित कार्यवाही झाली पाहीजे. अशी आपणांस विनंती आहे. आपण या संदर्भांत चौकशी समितीची नेमणूक करावी. व या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करून शिर्डी नगरपंचायतीकडून सदरची रक्कम वसूल करून सबंधीत कर्मचा-यांचे हक्काची रक्कम त्यांच्या खात्यात जमा करावी. किंवा साईबाबा संस्थान यांना परत करावी. जो पर्यंत ही रक्कम जमा होत नाही तोपर्यंत श्री साईबाबा संस्थानने शिर्डी नगरपालिकेला दरमहा मंजूर केलेले रुपये ४२,५१,५९९/- त्वरीत देणे थांबवावे. स्वच्छता कर्मचा-यांचे दरमहा ठेवलेले पगार जर त्यांना मिळत नसेल आणि शिर्डी नगरपंचायत जर हे पैसे खिशात घालत असेल तर ही बाब गंभीर असून याबाबत गांभीर्यांने पाऊल उचलावेत ही अपेक्षा.

दि.१६.०३.२०२० पासून देशभरात कोरोना या विषाणूजन्य आजाराच्या संसर्गामुळे देशभर लॉकडाऊन सुरू आहे. तेव्हापासून दिवसाकाठी येणा-या सरासरी लाखभर भक्तांना साईबाबा मंदीर दर्शनासाठी बंद आहे. आणि ते कधी सुरू होईल याची शाश्वती नाही. शिर्डी शहरात दर्शनासाठी साईभक्त नसल्याने आणि व्यवसायिकांचे व्यवसाय देखील १००% बंद आहेत, परिणामी शहरात कचरा होण्याचा प्रश्नच येत नाही. सध्या शहर साफसफाईचे कुठलेच काम होत नाही. त्यामुळे याकाळात साईबाबा संस्थानने दिलेले पैसे परत करावेत आणि भविष्यात जोपर्यंत लॉकडाऊन उघडत नाही आणी साफसफाईला पुर्ण क्षमतेने सुरवात होत नाही तोपर्यंत साईबाबा संस्थानचे पैसे स्विकारू नयेत असे पत्रात नमूद केले आहे.

उपरोक्त निवेदन मा. तदर्थ समितीचे दि. ०९.०६.२०२० रोजीचे सभेत अवलोकनार्थ सादर केले असता निर्णय क्रं. ३२३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

**मा. तदर्थ समितीचा निर्णय:-** आजचे सभेत शिर्डी ग्रामस्थांचे निवेदनावर सांगोपांग चर्चा करण्यात आली. COVID -19 विषाणूच्या प्रार्दुभावाच्या पार्श्वभुमीवर दि.१७ मार्च,२०२० पासून श्री साई मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी बंद करण्यात आलेले आहे. त्यामुळे भाविकांचे येणे बंद झाले आहे, असे समितीस समक्ष दाखवुन देण्यात आले. तसेच समितीच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, शिर्डी शहरातील दुकाने, हॉटेल्स, हार-फुले प्रसादाची छोटी मोठी दुकाने व इतर सर्व वाणिज्यीक उपक्रम बंद आहेत. सद्यस्थितीत ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनाचा विचार करता समितीचे असे लक्षात आले की, शिर्डी नगरपंचायतीस दरमहा रु.४२,५१,५९९/- स्वच्छतेसाठी देत असतांना सदर रकमेचा विनियोग योग्य पध्दतीने होतो किंवा नाही, तसेच साफसफाई होते किंवा नाही, या सर्व देखरेखीसाठी कुठलीही उपाययोजना केलेली नाही.

वरील परिस्थितीत शिर्डी नगरपंचायतीस सदर दरमहा रक्कम रु.४२,५१,५९९/-देणे अव्यवहार्य आहे. तथापी माहे मार्च-२०२० व एप्रिल-२०२०चे दरमहा रु.४२,५१,५९९/-मात्र रक्कम शिर्डी नगरपंचायत यांना यापुर्वीच आदा केली असल्याने दि.०१.०५.२०२० पासून शिर्डी नगरपंचायतीस देणे बंद करावे. शिर्डी नगरपंचायतीस पैसे देणेबाबत समिती पुढील निर्णय योग्य वेळी घेईल.

शिर्डी ग्रामस्थांचे निवेदनाचा विचार करता जेव्हा शिर्डी संस्थानने इतकी मोठी रक्कम नगरपंचायत शिर्डी यांना दिली आहे तेव्हा पासून या रकमेचा विनियोग कशा पध्दतीने केला गेला, स्वच्छता कुठे व कशी केली गेली, त्याची देखरेख कशी केली गेली, व त्यासाठी किती कर्मचारी लावले गेले इत्यादी बाबी शिर्डी नगरपंचायतीकडून

स्पष्ट करुन घेणे गरजेचे आहे. करीता मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांना शिर्डी साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत तपशिलवार पत्र देऊन वरील तपशिल व बाबी स्पष्ट करणारा अहवाल मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांचेकडून त्वरीत मागवावा. वरील अहवाल साधारणत: १५ दिवसात येईल अशी विनंती मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांना करण्यात यावी. सदरचा अहवाल व अभिप्राय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर ठेवण्यात यावा, जेणे करुन याबाबत पुढील विचार करता येईल.असा निर्णय झाला आहे.

मा.तदर्थ समितीचे उपरोक्त निर्णयान्वये मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत यांचेकडून जा.न. एसएसएसटी/वशी-लेखा अनुदान /४८९/२०२० दि.३०.०६.२०२० अन्वये माहिती मागविण्यात आली.

१) कोव्हिड -१९ (COVID-19) च्या प्रादुर्भावामुळे दि.१७.०३.२०२० पासून भाविकांसाठी मंदिर परिसर बंद करण्यात आलेले आहे तसेच लॉकडाऊनमुळे प्रसाद व हार तसेच वाणिज्यिक आस्थापना बंद आहेत. त्यामुळे स्वच्छतेसाठी दिलेल्या ठेक्यातील बरीचशी कामे बंद किंवा कमी झाली असल्यामुळे एकंदरीत चालू असलेल्या कामाचे मुल्यमापन करून त्यावर लागणारे मनुष्यबळ व यंत्रसामुग्री तसेचा साफसफाईसाठी लागणारे घंटागाडी, ट्रॅक्टर, जेसीबी, डंपर, रोड स्वीपर मशीन, केमिकल्स व इतर अनुशांगिक साहित्य याबाबत माहिती सादर करावी.

२) संस्थानने शिर्डी नगरपंचायतील स्वच्छतेसाठी डिसेंबर २०१७ पासून दरमहा रु. ४२,५१,५९९/- इतकी मोठी रक्कम दिलेली आहे. सदर रकमेचा विनीयोग कशा पद्धतीने केला

३) सदर अनुदानातून स्वच्छता कुठे व कशी केली गेली.

४) त्याची देखरेख कशी केली गेली व त्यासाठी किती कर्मचारी नेमण्यात आले.

५) शिर्डी नगरपंचायतीने दिलेल्या ठोक ठेक्याच्या ठेकेदाराकडून करारनाम्यातील अटि व शर्तीनुसार सर्व बाबींची पूर्तता करण्यात येते काय याबाबत मुद्देनिहाय तपशील.

उपरोक्त प्रमाणे तपशील शिर्डी नगरपंचायतीकडून मागविण्यात आला आहे.

दरम्यानच्या काळात श्रीमती अर्चना उत्तमराव कोते पाटील, नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत यांचे खालीलप्रमाणे पत्र प्राप्त झाले आहे.

**मा. नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत यांचे पत्र:-** श्री साईबाबांचे समाधी क्षेत्र असलेले शिर्डी हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे तीर्थक्षेत्र आहे. श्री साईबाबांच्या समाधी क्षेत्र दर्शनासाठी वर्षभरात करोडो साईभक्त येत असतात. एवढया मोठया संखेने येथे साईभक्त येत असल्याने साहजिकच शिर्डी शहरात पाणीपुरवठा रस्ते दिवाबत्ती, ड्रेनेज,बगीचा, स्वच्छता यासारख्या सुविधा पुरविण्याची जबाबदारी नगरपंचायतवर येते. २०११ चे जनगणनेनुसार शिर्डी शहराची लोकसंख्या ३६००४ एवढी असून सदर लोकसंख्यमध्ये आजपर्यंत झालेली १५ ते २० टक्के वाढ गृहीत धरल्यास आज रोजी शहराची लोकसंख्या ४० ते ४५ हजार एवढी आहे. मात्र नगरपंचायतला शहराच्या कायम लोकसंख्या व्यतिरिक्त तरंगत्या लोकसंख्येचा विचार करूनच येथे मुलभूत पायाभुत सुविधांची उपलब्धता करून देणे क्रमप्राप्त ठरते. शिर्डी शहरात येणा-या लाखो साईभक्तांमुळे शहराच्या स्वच्छतेवर मोठा परिणाम होत असतो. दिवस रात्र साईभक्तांचा शहरात ओघ सुरू असल्याने प्रत्येक क्षणाला येथे स्वच्छता करत राहणे येथे भाग ठरते. या पार्श्वभूमीवर शहरात मोठी यंत्रणा उभारणी गरजेचे ठरते. स्वउत्पन्नाचे स्त्रोत कमी असल्याने नगरपंचायत द्वारे स्वतःच्या आर्थिक क्षमतेमध्ये स्वच्छतेची अशी यंत्रणा उभारणे शक्य नाही. यास्तव नगरपंचायतद्वारे यापूर्वी स्वच्छतेची खर्चाची विशेष तरतूद करण्यासाठी येथे येणा-या साईभक्तांचे वाहनाकडून नगर–मनमाड हायवेवर टोल नाका उभारून विशेष स्वच्छता कर वसूल केला जात असे. साईदर्शनासाठी येणा-या भक्तांवर आर्थीक भूर्दंड देवू नये याकरिता श्री साईबाबा संस्थानने स्वच्छतेसाठी शिर्डी नगरपंचायतला विशिष्ठ रक्कम देण्याचा प्रस्ताव देवून नगरपंचायतला सदर विधीग्राहय कर रद्द करणेस भाग पाडले. नगरपंचायतद्वारे सदर टोल नाका उभारून वसूल केला जात असलेला विशेष स्वच्छता कर रद्द केलेनंतर श्री साईबाबा संस्थानने नगरपंचायतला स्वच्छतेसाठी काही वर्ष निधी देखील दिला. मात्र कालंतराने संस्थानने असा निधी देणे बंद केले. परिणामी शिर्डी नगरपंचायला टोलद्वारे विशेष स्वच्छता कर मिळणेचा कायदेशिर मार्ग बंद होऊन याचा शहर स्वच्छतेवर प्रचंड विपरीत परिणाम झाला. शहरामध्ये अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले. येथे येणा-या लाखो करोडो साईभक्तांनी शहरभर फेकलेला कचरा, हॉटेल- रेस्टॉरंट येथून निघणारे वेस्ट सर्व शहरभर रस्त्यांवर व रिकाम्या प्लॉटवर विखूरलेले दिसत होते. परिणामी येथे येणा-या साईभक्तांना व स्थानिकांनादेखील याचा त्रास होऊन शिर्डी शहराची एक अस्वच्छ शहर अशी प्रतिमा तयार होणेस सुरवात झाली. खुद्द भारताचे तत्कालिन महामहिम राष्ट्रपती यांनी सदर अस्वच्छतेबाबत श्री साईबाबा संस्थानचे तत्कालिन अध्यक्ष यांना याबाबत काही उपाययोजना करणेबाबत सुचीत केले. वरिष्ठतम न्यायालयांचे मा. न्यायधिश यांचेसह महाराष्ट्राचे

तत्कालिन मुख्यमंत्री व इतर वरिष्ठ पदावरील व्यक्तींनी देखील शिर्डीत आलेनंतर स्वच्छतेबाबत नाराजी व्यक्त केली.

उपरोक्त सर्व पार्श्वभुमीवर श्री साईबाबा संस्थानकडूनच नगरपंचायतद्वारे स्वच्छतेची मोठी यंत्रणा उभारूण शिर्डी शहराची स्वच्छता करणेबाबत सुचीत करण्यात येवून त्यासाठी आवश्यक असणारा निधी पुन्हा श्री साईबाबा संस्थानद्वारे देवू केला. एवढेच नाही तर शिर्डी शहर स्वच्छतेची मोठी यंत्रणा उभी करून त्याबाबतची निविदा काढणेसाठी तत्कालिन पदाधिका-यांकडून वारंवार तगादा सुरू झाला. या पाश्वभुमीवर नगरंपचायतद्वारे सुपर्ण शिर्डी शहर दिवसभरातले सलग २० तास स्वच्छ राहील याबाबत नियोजन करून शहर स्वच्छतेबाबत ठोक मासिक दराच्या निविदा मागविण्यात आल्या निविदेतील अटीशर्तीनुसार सबंधीत मक्तेदाराला स्वच्छतेबाबत मोठया प्रमाणात कर्मचारी आणि यंत्रसामुग्री उभारणे बंधनकारक करण्यात आले. नगरपंचायतद्वारे प्रसिद्ध केलेल्या स्वच्छतेच्या ई- निवीदेनुसार मे. बी. व्ही. जी. इंडिया, पुणे यांची ऑनलाईन स्पर्धात्मक दराची ठोक मासिक रक्कम रु. ४२.५१ लक्ष रुपयांची निविदा प्राप्त झालेनंतर नगरपंचायतीने सदर निविदा मान्य करून संस्थानकडून निधीची मागणी केली.

संपूर्ण शिर्डी शहर स्वच्छ करणेबाबत नगरपंचायतीद्वारे प्रतिमहा मागविलेले ठोक मासिक स्पर्धात्मक दर रु. ४२.५१ लक्ष नुसार संस्थानकडे अनुदान मागीतल्यानंतर सदर रक्कम जास्त असलेबाबत संस्थानचे मत बनले. शिर्डी नगरपंचायत आणि संस्थानमध्ये याबाबत वारंवार झालेल्या चर्चेमध्ये नगरपंचायतला प्राप्त झालेली ई–निविदा रक्कम संस्थानला जास्त वाटत असल्यास सदर स्वच्छता कामाची निविदा संस्थानने स्वतः करावी संस्थानच्या स्पर्धात्मक निविदानुसार नगरपंचायत मक्तेदाराकडून काम करून घेईल. अथवा नगरपंचायतद्वारे केलेल्या निविदेतील प्राप्त स्पर्धात्मक दरानुसार शहर स्वच्छतेचे काम संस्थानने मक्तेदाराकडून करून घ्यावे. मक्तेदार देखरेख व पर्यवेक्षण करणे, बील काढणे वगैरे सर्व प्रकियादेखील संस्थानने करावी. नगरपंचायतद्वारे शहर स्वच्छतेसाठी सदर कामावर पर्यवेक्षण केले जाईल असा प्रस्तावदेखील नगरपंचायतद्वारे देण्यात आला होता. मात्र संस्थानची त्यास तयारी नव्हती. याबाबत वारंवार विविध स्तरावर चर्चा, बैठका होवून संस्थानद्वारे नगरपंचायतला मासिक रु. ३०.०० लक्ष पुढील ५ वर्ष देणेबाबतचा प्रस्ताव शासनाचे मंजूरीसाठी विधी व न्यायविभागाकडे पाठविण्यात आला. मात्र ई – निविदा प्रसिद्ध करून मागविलेल्या स्पर्धात्मक दरानुसार स्वच्छतेची रक्कम मिळावी यासाठी नगरपंचायतीद्वारे शासन स्तरावरदेखील पाठपुरावा करण्यात आला. शासन स्तरावर देखील सदरबाबत प्राप्त दरपत्रकाचे सविस्तर विश्लेषण करून आवश्यकतेनुसार तज्ञांचे अभिप्राय घेऊन शिर्डी नगरपंचायतीला सुरवातीला महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासननिर्णय क्रं. सासंवि-१०१८/१७९/प्र.क्र. २०/का-१६ दि. ०७ एप्रिल २०१८ अन्वये मासिक रु. ३०.०० लक्ष व त्यानंतर महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन शद्धीपत्रक क्रं. सासंवि-१०१८/१७९/प्र.क्र. २०/का-१६ दि. २२ नोव्हेंबर २०१८ अन्वये मासिक रु. ४२.५१ लक्ष श्री साईबाबा संस्थानकडून देणेबाबत आदेश पारीत करण्यात आला. शासन स्तरावरून सुरवातीला मासिक रु.३०.०० लक्ष व त्यानंतर दुरूस्ती शासन आदेशानुसार रु.४२.५१ लक्ष संस्थानद्वारे स्वच्छतेसाठी नगरपंचायतला अनुदान देणेबाबतचा दुरूस्ती आदेश होणे याचा अर्थ शासनाने याबाबत आलेल्या निविदेचे व त्यातील स्पर्धात्मक दराचे विश्लेषण करूनच सुधारीत आदेश पारीत केले असणार याची खात्री आहे.

१ डिसेंबर २०१७ पासून श्री साईबाबा संस्थानद्वारे शिर्डी नगरपचायतीला संपूर्ण शिर्डी शहर स्वच्छतेसाठी मासिक रु. ४२.५१ लक्ष देणे सुरू झाले आहे. सदर अनुदान देतांना संस्थानने नगरपंचायतीकडून पुन्हा साईभक्तांकडून टोलद्वारे विशेष स्वच्छता कर वसूल करू नये याबाबत करारनामा करून घेतला. आज रोजी संपूर्ण शिर्डी शहरात अत्यंत चांगल्या प्रकारे स्वच्छता होत असून नगरपंचायतीने शिर्डी शहराची एक अस्वच्छ शहर म्हणून होत असलेली प्रतिमा संस्थानच्या सहकार्यातून पुसून टाकली आहे. एवढेच नव्हे तर केंद्र पुरस्कृत स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धा २०१८ मध्ये नगरपंचायतीने संपूर्ण देशात पश्चिम विभागात तिसरा क्रमांक तर महाराष्ट्रात दुसरा क्रमांक मिळवला. याशिवाय नगरपंचायतने नुकतेच स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये थ्री स्टार रेटींग मिळविले. पाच जिल्हयांच्या सुपर्ण नाशिक विभागामध्ये केवळ दोनच नगरपालिकांना असे थ्री स्टार रेटींग मिळालेले असून त्यात शिर्डी शहराचा समावेश आहे. आजही शिर्डी नगरपंचायतद्वारे अत्यंत काटेकोरपणे संपूर्ण शिर्डी शहर स्वच्छतेबाबत दक्षता घेतली जात आहे. स्वच्छतेच्या मक्तेदाराकडून स्वच्छतेबाबत एकही चूक माफ केली जात नसुन झालेल्या चुकीबद्दल मक्तेदारास लागलीच दंड केला जातो. मक्तेदाराच्या बीलातून कपात केलेली दंडाची रक्कम पुन्हा श्री साईबाबा संस्थानला परत केली जाते.

उपरोक्त पार्श्वभुमीवर शिर्डी शहराची सर्व स्वच्छता योग्य व सुरळीतपणे सुरू असतांना काही नागरिक राजकीय हेतूने सदर स्वच्छतेच्या मक्त्याबाबत आपलेकडे व नगरपंचायतीकडे वारंवार तक्रार करत असतात. एक

वर्षानंतर शिर्डी नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक असल्याने अशा तक्रारीचे प्रमाण यापुढे वाढतच जाणार आहे. नगरपंचायतद्वारे सदर स्वच्छता कामाचा मक्ता देतांना कर्मचा-यांना किमान वेतन देणे बंधनकारक केले आहे. संपूर्ण शिर्डी शहराच्या स्वच्छतेबाबत ठोक मासिक रकमेची निविदा असतांना मक्तेदाराने इतर कोणत्या बाबींवर किती खर्च करावयाचा अथवा किती बचत करायची? हे बघणे नगरपंचायतीचे काम नसून नगरपंचायतद्वारे निर्धारित करून दिलेले काम मक्तेदार बंधनकारक केलेल्या यंत्रसामुग्री व कर्मचारी संख्येच्या माध्यमातून करत आहे की नाही? हे बघणे नगरपंचायतीचे काम आहे. नमूद संख्येपेक्षा कमी कर्मचारी हजर असतील तर त्यांच्या गैरहजेरीच्या प्रमाणात मक्तेदाराला कमी बील दिले जाते; तर नमूद कामापेक्षा कमी काम झाल्यास मक्तेदाराला त्याबाबत दंड केला जातो. गैरहजर कर्मचारी व कमी झालेले काम या कारणासाठी मक्तेदाराच्या बीलातून कपात केलेली रक्कम संस्थानला परत केली जाते. संस्थानला अशी आजपर्यंत परत केलेली रक्कम रु. २०.०० लक्ष पेक्षाही जास्त आहे. तरी याबाबत राजकीय हेतूने होत असलेल्या तक्रारीबाबत संस्थानने दखल घेणे अपेक्षीत नाही. मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी देखील शिर्डी शहर स्वच्छतेबाबत परिपूर्ण अहवाल मागवून त्याबाबत विश्लेषण केल्यानंतर शिर्डी नगरपंचायतीला स्वच्छतेचा निधी वितरीत करणेबाबत निर्देश दिले आहेत. मा. उच्च न्यायालय, महाराष्ट्र शासन यांनी नगरपंचायतला स्वच्छतेबाबत निधी वितरीत करणेबाबत आदेश/ निर्देश दिलेले असतांनाही राजकीय हेतूने दाखल तक्रारीची संस्थानद्वारे दखल घेऊन वारंवार नगरपंचायतकडून अहवाल मागवून त्याच त्याच बाबींचा खुलासा मागविणे, संस्थान कर्मचा-यांकडून नगरपंचायत स्वच्छता मक्तेदारकडून परस्पर कागदपत्रे मागविणे यासारख्या बाबी निश्चितच उचित नाही. शासन आदेश होऊनही संस्थानचा नगरपंचायतीवर विश्वास नसेल तर सदर शहर स्वच्छता कामाचा मक्ता संस्थाननेच चालवावा, असा आमचा आजही आग्रह आहे. संस्थान सदर मक्ता स्वतः चालविण्यास तयार असल्यास नगरपंचायत शहर स्वच्छतेसाठी आवश्यक ते इतर सर्व सहकार्य करण्यास तयार आहे. मात्र संस्थानकडून वितरीत करावयाचा निधी बंद करणे, राजकीय हेतूने तक्रार दाखल झाल्यास त्यावर लगेच त्याच त्याच बाबींचा खुलासा मागविणे यासारख्या बाबी अपेक्षीत नाही. मुळात संस्थानने नगरपंचायतीकडून टोल उभारून वसूल केला जाणारा विशेष स्वच्छता कर बंद करणेबाबतची अट लिहून घेतल्यामुळे नगरपंचायतचा स्वउत्पन्न मिळविण्याचा कायदेशीर अधिकार देखील बंद झालेला आहे.

सद्यस्थितीत कोविड १९ विषाणू संसर्गाच्या पार्श्वभुमीवर शिर्डीमध्ये येणा-या साईभक्तांचा ओघ कमी झाल्यामुळे शहरात निघणारा कचरा कमी झाला असून लॉकडाऊन मध्ये हॉटेल रेस्टॉरंट यासारख्या व्यवसायीक आस्थापना बंद असल्यामुळे त्यातून निघणारा कचरादेखील निश्चितच कमी झालेला आहे. मात्र नगरपंचायतद्वारे स्वच्छता मक्तेदाराकडून करून घेण्यात येत असलेले स्वच्छतेचे काम हे तेवढयाच यंत्रसामुग्रीत व कर्मचा-यांच्या माध्यमातून करून घेण्यात येत आहे. कचरा कमी निघत असला तरी आजही शहरातील सर्व परिसराची सफाई करणे टळलेले नाही. प्रत्येक घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा वर्गीकरण करून जमा करणे, चेंबर सफाई, फवारणी, कार्बोलीक पावडर मारणे यासारखी सर्व कामेदेखील लॉकडाऊनमध्ये सुरूच आहेत. कोविड १९ विषाणू संसर्गाच्या पार्श्वभुमीवर तर मक्तेदारामार्फत नगरपंचायतने नियमीत फवारणीपेक्षा चार ते पाच पट अधिक वेगाने सोडीयम हायपोक्लोराईन फवारणीच्या फे-या मारून घेतलेल्या आहेत. याशिवाय स्वच्छता कर्मचारी स्वतःचा जीव धोक्यात घालून इतर नागरिकांचे मास्क, हॅन्डग्लोव्हज, पिपीई किट उचलणे, क्वारंटाईन सेंटर साफ करणे यासारखी कामे करत आहेत. या शिवाय लॉकडाऊन काळामध्ये इतरवेळी करता येणे शक्य नसलेली रस्त्याच्या कडेचे गवत काढणे, मोठे नालेसफाई करणे यासारखी कामेदेखील स्वच्छता मक्तेदाराकडून करून घेण्यात आलेली आहे. याचाच अर्थ लॉकडाऊन कालावधीत देखील शिर्डी शहरात स्वच्छतेबाबतचे कुठलेही काम कमी झालेले नाही किंबहूना या कालावधीत स्वच्छतेची बरीचशी अतिरिक्त कामे करून घेण्यात आलेली आहे.

उपरोक्त सर्व पार्श्वभुमीवर अनावश्यक तक्रारींची दखल न घेता शिर्डी शहर स्वच्छतेसाठी संस्थानकडून नगरपंचायतला शासन आदेशानुसार उपलब्ध करून देत असलेले अनुदान नियमित सुरू रहावे असे त्यांचे पत्रात नमूद करून दरमहा रक्कम रु. ४२,५१,५९९/- नगरपंचायतीस देणेबाबत विनंती केली आहे.

मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांना संस्थानचे मा.तदर्थ समितीचे निर्णय क्रं.३२३ चे अनुषंगाने जा.नं.एसएसएसटी/लेखा-अनुदान/४८९/२०२० दि.३०.०६.२०२० अन्वये पाठविलेल्या पत्रानुसार, मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायतने त्यांचे जा.क्रं.नप/०६/९८५/२०२० दि.०१.०७.२०२० अन्वये खालीलप्रमाणे माहिती/ अहवाल सादर केला आहे.

मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांचेकडून प्राप्त अहवाल/खुलासा:-

१)	कोव्हिड -१९ (COVID -19) च्या प्रादुर्भावामुळे दि. १७.०३.२०२० पासून भाविकांसाठी मंदिर परिसर बंद करण्यात आलेले आहे तसेच लॉकडाऊनमुळे प्रसाद व हार तसेच वाणिज्यिक आस्थापना बंद आहेत. त्यामुळे स्वच्छतेसाठी दिलेल्या ठेक्यातील बरीचशी कामे बंद किंवा कमी झाली असल्यामुळे एकंदरीत चालू असलेल्या कामाचे मुल्यमापन करून त्यावर लागणारे मनुष्यबळ व यंत्रसामुग्री तसेच साफसफाईसाठी लागणारे घंटागाडी, ट्रॅक्टर, जेसीबी, डंपर, रोड स्वीपर मशीन, केमिकल्स व इतर अनुशांगिक साहित्य याबाबत माहिती.

स्वच्छतेसाठी दिलेल्या ठेक्यातील बरीचशी कामे बंद किंवा कमी झाली असलेबाबत काढलेला निष्कर्ष चुकीचा असून कोव्हिड -१९ विषाणू संसर्गाच्या पार्श्वभुमीवर शासनाकडून जाहिर झालेल्या लॉकडाऊन नंतर मंदिर बंद झालेमुळे स्वच्छतेची कुठलीही कामे झालेली नाही. शहरामध्ये लॉकडाऊनपुर्वी करावी लागणारी स्वच्छता लॉकडाऊनमध्येही करावी लागत आहे. ज्यामध्ये

A.	लॉकडाऊनपुर्वी शहरातील जेवढया घरांमध्ये घर ते घर कचरा वर्गीकरण करून जमा केला जात होता तेवढयाच घरांमध्ये लॉकडाऊननंतर देखील घर ते घर कचरा वर्गीकरण करून जमा केला जात आहे.

B.	लॉकडाऊनपुर्वी शहरातील जेवढया परिसराची झाडून स्वच्छता केली जात होती तेवढयाच परिसराची लॉकडाऊननंतर देखील झाडून स्वच्छता केली जात आहे. यामध्ये निघणारा कचरा जरी कमी जास्त असला तरी त्यातून परिसर झाडणेसाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ व काम मात्र तेवढेच करावे लागत आहे.

C.	लॉकडाऊनपुर्वी कचरा उचलणेसाठी दिवसाचे शिफ्टला १९ घंटागाडया तर संध्याकाळचे शिफ्टला ५ घंटागाडया सुरू होत्या लॉकडाऊननंतर देखील कचरा उचलेणेसाठी दिवसाचे शिफ्टला १९ घंटागाडया तर संध्याकाळचे शिफ्टला ५ घंटागाडया सुरू आहेत.

D.	लॉकडाऊनपुर्वी शहरामध्ये जंतुनाशक फवारणीसाठी एक ट्रॅक्टर सुरू होता. कोरोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभुमीवर शहरामध्ये सोडीयम हायपोक्लाराईडची फवारणी करून निर्जंतुकीकरण करणेसाठी चार ट्रॅक्टरद्वारे अशी फवारणी करण्यात आली. लॉकडाऊनपूर्वी शहरात दर १५ दिवसाला एक फेरी होत असते. फवारणीसाठी वाढविलेल्या यंत्रणेमुळे दर चार ते पाच दिवसाला सोडियम हायपोक्लोराईडची फवारणी फेरी पुर्ण करण्यात आली. यामध्ये कोरोना पॉझीटीव्ह पेशंट ज्या भागात असतील त्या भागात अतिरिक्त फवारणी करण्यात आली.

E.	लॉकडाऊनपुर्वी शहरातील व्यवसायीक आस्थापना उदा. हॉटेल रेस्टांरंट दुकाने इ. मधून निघणारा कचरा कमी झाला असला तरी सदर कचरा उचलण्यासाठी यापूर्वी वापरले जाणारे ५ ट्रॅक्टर व त्यावरी कर्मचारी यांचेकडून लॉकडाऊनपूर्वी केली जात असलेली अतिरिक्त कामे करून घेण्यात आली. शहराच्या मध्यभागातून जाणा-या जलसंपदा विभागाची चारीतील कचरा साफ करून त्यातील गवत काढणे, साकुरी शिव ते लुटे वस्ती दरम्यान ओढयातील काटेरी झुडपे काढणे, गणेश बंधा-याची सफाई करणे ही अतिरिक्त कामे लॉकडाऊमध्ये ज्या कर्मचा-यांचा व वाहनांचा कामाचा व्याप कमी झाला आहे त्यांचेकरवी करून घेण्यात आली.

F.	लॉकडाऊनपुर्वी ट्रक माउंटेड स्विपींग मशीनद्वारे दररोज साधारणतः ५५ ते ६० कि.मी. सफाई केली जात होती. लॉकडाऊनपुर्वी शहरातील ब-याच रस्त्यांवर वाहने लावली जात असल्यामुळे तेथे ट्रक माउंटेड स्विपींग मशीनद्वारे सफाई करता येत नव्हती. मात्र लॉकडाऊनमध्ये कॉलिनी भागातील देखील बरेच रस्ते वाहनमुक्त झालेने येथे देखील माउंटेड स्विपींग मशीनद्वारे सफाई करण्यात आलेमुळे या कालावधीत मशीनद्वारे साधारणतः ६० ते ६५ कि. मी. सफाई केली गेली.

G.	लॉकडाऊनपुर्वी शहरातून एकत्रीत केलेला सुका कचरा जेसीबीद्वारे भरून डंपीग ग्राऊंडकडे वाहतुक करणेसाठी सुरू असलेले जेसीबी व डंपर हे लॉकडाऊनंतर देखील त्याच पद्धतीने कार्यरत आहेत.

H.	स्वच्छतेसाठी वापरल्या जाणा-या मॅलीथियॅान या जंतुनाशक व्यतिरिक्त लॉकडाऊननंतर सोडीयम हायपोक्लोराईडचा देखील शहरात वारंवार फवारणी करण्यात आली. कचरा उचललेनंतर अस्वच्छ झालेल्या परिसरात दुर्गंधी येवू नये म्हणून वापरली जाणारी कार्बोलिक पावडर ही लॉकडाऊननंतर देखील त्याच प्रमाणात वापरली जात आहे. यामध्ये ड्रेनेजमधील मटेरियल उचललेनंतर, मेलेली जनावरे उचललेनंतर अथवा दुर्गंधी होणा-या परिसरात सदर कार्बोलिक पावडर मारली जाते.

I.	शहरामध्ये डास प्रतिबंधक उपाययोजनेसाठी केले जात असलेले फॉगींग हे लॉकडाऊनपुर्वी व लॉकडाऊननंतर देखील सुरू होते व आहे. फॉगींगकरिता किंगफॉग हे बायर या नामांकित कंपनीचे औषध वापरले जाते.

J.	शहरातील लक्ष्मीनगर वसाहतीतील सार्वजनिक शौचालयाचा नागरीक वापर करत असल्याने येथील दैनिक स्वच्छता, नगरपंचायतीचे बाजूस तसेच छत्रपती कॉम्पलेक्स येथील सार्वजनीक शौचालय हे शहराचे

मध्यवर्ती भागात असल्याने त्याचा वापर हा अत्यावश्यक सेवेतील दुकानदार, ग्राहक यांचेद्वारे सुरूच होता. यास्तव या शौचालयाची दैनिक सफाई देखील लॉकडाऊननंतर नियमितपणे करण्यात आली.

K. लॉकडाऊनपुर्वी १६० कर्मचा-यांचे माध्यमातून मक्तेदारास नेमून दिलेले शहर स्वच्छतेचे काम केले जात होते. लॉकडाऊनमध्ये देखील १६० कर्मचा-यांमार्फतच स्वच्छतेचे काम करण्यात येत आहे. कर्मचारी गैरहजर असल्यास त्यांचे गैरहजेरीच्या प्रमाणात बायोमेट्रीक हजेरी अहवालाच्या आधारावर मक्तेदारास कमी बील आदा केले जाते. मक्तेदाराच्या बीलातून कपात केलेली रक्कम संस्थानला परत केली जाते. मक्तेदाराने कामात हयगय करणे अथवा कर्मचारी गैरहजर असणे याबाबत नगरपंचायतने मक्तेदारच्या बीलातून कपात केलेली अशी रु. २०.०० लक्ष पेक्षा जास्त रक्कम संस्थानला परत करण्यात आलेली आहे. त्याबाबत मासिक अहवाल देखील संस्थानला देण्यात येतो.

L. कोरोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभुमीवर तयार करण्यात आलेले संस्थात्मक वि□लिगीकरण कक्षामध्ये आवश्यक असणारे कामदेखील या कालावधीत संबधीत मक्तेदारकडील कर्मचारी यांचेकडून करून घेण्यात आलेली आहेत. याशिवाय शासन निर्देशानुसार लॉकडाऊनमध्ये अडकलेल्या मजूरांसाठी उभारलेल्या निवारा केंद्रात सफाई करणे, फवारणी करणे ही कामे देखील संबधीत मक्तदाराचे कर्मचा-यांकडूनच करून घेण्यात आलेली आहेत.

**२) संस्थानने शिर्डी नगरपंचायतील स्वच्छतेसाठी डिसेंबर २०१७ पासून दरमहा रु. ४२,५१,५९९/- इतकी मोठी रक्कम दिलेली आहे. सदर रकमेचा विनीयोग कशा पद्धतीने केला.**

संपूर्ण शिर्डी शहर स्वच्छतेबाबत ठोक मासिक रकमेची निविदा करतांना नगरपंचायतद्वारे निर्धारीत करून दिलेली काम, बंधनकारक केलेल्या यंत्रसामुग्री व कर्मचारी संख्येच्या माध्यमातून मक्तेदार यांचेकडून करून घेण्यात आलेली आहेत. शिर्डी शहर स्वच्छतेसाठी ऑनलाईन जाहिर ई- निविदाद्वारे स्पर्धात्मक दरपत्रकानुसार राज्य शासनाने मंजूर केलेल्या रु. ४२.५१ लक्ष निधीचा शिर्डी शहर स्वच्छतेसाठी विहीत कायदेशीर मार्गाने विनीयोग करण्यात आला. शिर्डी शहर स्वच्छतेबाबतचे सर्व कामे काटेकोरेपणे केल्यामुळेच केंद्र शासन केंद्र पुरस्कृत स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धा २०१८ मध्ये शिर्डी नगरपंचायतीचा देशात तिसरा क्रमांक तर महाराष्ट्रात दुसरा क्रमांक आला. नगरपंचायतला स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये थ्री स्टार रेटींग मिळविले. पाच जिल्हयांच्या सुपर्ण नाशिक विभागामध्ये केवळ दोनच नगरपालिकांना असे थ्री स्टार रेटींग मिळालेले आहे. स्वच्छतेबाबत संस्थानने उपलब्ध करून दिलेल्या रक्कम रु.४२,५१,५९९/- अनुदानाचा शहर स्वच्छतेसाठी सुयोग्य विनीयोग केला म्हणूनच नगरपंचायतला राज्याचे मा. मुख्यमंत्री यांचे हस्ते रु. १५.०० कोटी रुपयांचे शहर स्वच्छतेचे बक्षीस मिळाले.

**३) सदर अनुदानातून स्वच्छता कुठे व कशी केली गेली.**

श्री साईबाबा संस्थानद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेल्या अनुदानातून शिर्डी शहरात स्वच्छतेबाबत ठोक मासिक रकमेची निवीदा करतांना नगरपंचायतद्वारे निर्धारीत करून दिलेनुसार मक्तेदारास बंधनकारक केलल्या यंत्रसामुग्री व कर्मचारी संख्येच्या माध्यामातून शहर स्वच्छता करून घेण्यात आलेली आहे.

**४) त्याची देखरेख कशी केली गेली व त्यासाठी किती कर्मचारी नेमण्यात आले.**

शिर्डी नगरपंचायत हद्दीत सुरू असलेल्या स्वच्छतेची नगरपंचायतेच दोन स्वच्छता निरीक्षक यांचेमार्फत दैनंदिन स्वरुपात देखरेख केली जाते. याशिवाय मक्तेदार यांचेकडील एक मॅनेजर व ११ सुपरवायझर यांचेमार्फत देखरेख करण्यात येते. नगरपंचायतद्वारे मक्तेदारामार्फत दररोज सुरू असलेल्या शहर स्वच्छतेबाबत कामावर देखरेख, नियंत्रण करणे व तातडीने सूचना करणेसाठी सोशल मिडीयाचा देखील वापर केला जात आहे. यामध्ये एक स्वतंत्र वॉटसअॅप ग्रुप तयार करून यामध्ये नगराध्यक्षा, सर्व नगरसेवक, मुख्याधिकारी, स्वच्छता निरीक्षक यांचेसह मक्तेदार यांचे मॅनेजर सुपरवायझर यांना सदस्य करण्यात आलेले आहे. शहर स्वच्छतेचे निरीक्षण करण्यासाठी त्रयस्थ पक्ष म्हणून शहरातील नावाजलेल्या वर्तमानपत्राचे पत्रकार देखील या ग्रुपचे सदस्य आहेत. मक्तेदार मॅनेजर व सुपरवायझर यांना दररोज चालणा-या या सर्व कामांचे फोटो काढून या ग्रुपवर टाकणेबाबत निर्देशीत करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने सर्वांना शहरात सुरु असलेल्या कामांबाबत माहिती मिळते, असे स्वच्छतेबाबत शेकडो फोटो दररोज या ग्रुपवर टाकले जातात. याशिवाय नगरपंचायत सदस्य यांना त्यांचे प्रभागात स्वच्छतेबाबत काही समस्या असल्यास या ग्रुपवर तक्रार करता येते. ग्रुपवर आलेल्या तक्रारीचा मक्तेदार कर्मचा-यांमार्फत तातडीने निपटारा केला जातो. नगरपंचायत प्रशासनाकडून देखील आवश्यक त्या सूचना सदर ग्रुपवर केल्या जातात. तर स्वच्छता निरिक्षक यांचेकडून प्रत्यक्ष जागेवर जावून सर्व काम केले जात आहे काय याबाबत पहाणी केली जाते. याशिवाय स्वच्छतेच्या कामाबाबत दैनिक लेखी अहवाल ठेवला जातो.

**५) शिर्डी नगरपंचायतीने दिलेल्या ठोक ठेक्याच्या ठेकेदाराकडून करारनाम्यातील अटि व शर्तीनुसार सर्व बाबींची पूर्तता करण्यात येते काय याबाबत मुद्देनिहाय तपशील.**

शिर्डी नगरपंचायत व मक्तेदार यांचेमध्ये शहर स्वच्छतेबाबत लेखी करारनामा झालेला असून सदर करारनाम्यात नमूद केलेप्रमाणे पुढीलप्रमाणे स्वच्छतेची कामे मक्तेदाराकडून करून घेतली जातात.

शहरातील दैनंदीन सर्व प्रमुख रस्ते, अंतर्गत रस्ते, उपनगरे सफाई करणे रस्त सफाई करतांना रस्त्यांचे कडेची माती उचलणे व वाहतूक करणे, शिर्डी शहरातील मालमत्तांचे प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन डोअर टू डोअर ओला व सुका कचरा विकेंद्रित पद्धतीने वर्गीकरण करून जमा करून त्याची प्रक्रियासाठी वाहतूक करणे, सार्वजनिक ठिकाणी झाडलोट करणे, झाडलेल्या ठिकाणचा कचरा विकेंद्रित पद्धतीने वर्गीकरण करून जमा करणे व प्रक्रिया ठिकाणी वाहतूक करणे. डपींग ग्राऊंड येथे आवश्यकतेनुसार ओला व सुका कचरा वर्गीकरण करणे, पक्रिया न होणारा कचरा डंप करणे, आवश्यकतेनुसार डपींग ग्राऊंडचे भाडे देणे, शहरातील सर्व वेस्ट स्वतंत्र पद्धतीने जमा करून प्रक्रियेच्या ठिकाणी वाहतूक करणे, तुंबलेले गटार लाईन पूर्ववत चालू करणे, चोकअप काढणे, पाऊसपाणी जाणेकरिता नाली काढणे, संपूर्ण शहरामध्ये नामांकित कंपनीचे औषधे वापरून फॉगिंग करणे, डास उत्पत्ती स्थाने नष्ट करणे, संपूर्ण शहरात दररोज नामांकित कंपनीचे औषधे वापरून यांत्रिक पद्धतीने जंतुनाशक फवारणी करणे, सार्वजनिक ठिकाणचा कचरा उचलले ठिकाणी दुर्गंधी येऊ नये याकरिता नामांकित कंपनीचे कार्बोलिक पावडर मारणे, नगरपंचायत मालकिचे शौचालय व मुतारी साफसफाई करणे, बेवारस मृतदेह/ मृत जनावरे यांची विल्हेवाट लावणे तसेच बेवारस आजारी व्यक्तीस औषधोपचार करणेकरिता दाखल करणेस मदत करणे व इतर आरोग्य विषयक काम करणे, शहरातील कचरा कुडयांमध्ये टाकलेले मटेरियल वाहतूक करणे, संपूर्ण शिर्डी शहरामध्ये घंटागाडी द्वारे गोळा केलेला कचरा डंपरमध्ये भरून डंपीग ग्राऊंडवर वाहतूक करणे, दैनंदिन साफसफाई विषयक इतर कामे पार पाडणे.

उपरोक्त प्रमाणे नमूद कामे मक्तेदाराकडून करून घेणेत येत असल्यामुळे करारनाम्यातील अटी शर्तीचे पुर्तता करण्यात येते.

श्री साईबाबा संस्थान यांचेकडून शिर्डी शहर स्वच्छतेसाठी शासन मंजूरीनुसार उपलब्ध करून देण्यात येत असलेले अनुदान माहे मे व माहे जून २०२० या दोन महिन्यांपासून उपलब्ध झालेले नाही. संस्थान स्तरावरून याबाबत नगरपंचायतला अधिकृतरित्या काही कळविले देखील गेलेले नाही. नगरपंचायतद्वारे शहर स्वच्छतेची सर्व कामे नियमितपणे सुरू असून कोविड १९ संसर्गाचे पार्श्वभुमीवर स्वच्छतेची कुठलेही कामे कमी झालेली नाही. किंबहूना या कालावधीत बरीचशी अतिरिक्त कामे सबंधीत मक्तेदाराकडून करून घेण्यात आलेली आहे. काही व्यक्ती सदर मक्तेदाराबाबत अनावश्यक रित्या वारंवार तक्रार करत असतात मात्र शासनस्तरावर सदर अनुदानाबाबत पुर्णतः विश्लेषण व खात्री करूनच नगरपंचायतला अनुदान वितरीत करणेबाबत मंजूरी देण्यात आलेली आहे. नगरपंचायतद्वारे देखील सदर अनुदानाचा अत्यंत सुयोग्य पद्धतीने विनीयोग करून शहर स्वच्छतेबाबत कार्यवाही केली जात आहे. यामुळेच नगरपंचायतने उपरोक्त नमूद केलेप्रमाणे राष्ट्रीय व राज्य स्तरावर स्वच्छतेचे बक्षीस देखील मिळविलेले आहे.

उपरोक्त सर्व पार्श्वभुमीवर नगरपंचायतला संस्थानद्वारे उपलब्ध करून देण्यात येत असलेले अनुदान नियमीतपणे सुरू ठेवावे असे त्यांचे अहवालात/खुलाशात नमूद केले आहे.

उपरोक्त प्रमाणे खुलासा मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत यांनी सादर केला आहे.

**प्रस्ताव :-**

१) मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत यांनी दि. ०२.०७.२०२० रोजीच्या पत्रान्वये माहे मे व जून २०२० या कालावधीतील प्रत्येकी रक्कम रु. ४२,५१,५९९/- प्रमाणे रक्कम रु.८५,०३,१९८ मात्र अनुदान मागणी केली आहे.

२) मा. नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत यांचे श्री साईबाबा संस्थानकडून शिर्डी नगरपंचायतीला शिर्डी शहर स्वच्छतेसाठी देण्यात येणारे अनुदान रक्कम रु. ४२,५१,५९९/- दरमहा नियमित देणेबाबत पत्र अवलोकनार्थ.

३) मा. तदर्थ समितीचे दि. ०९.०६.२०२० रोजीच्या बैठकीतील निर्णय क्रं. ३२३ नुसार मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी सादर केलेला अहवाल व अभिप्राय व त्यानुसार शिर्डी नगरपंचायतीस दरमहा शहर स्वच्छतेसाठी द्यावयाचे अनुदानाबाबत निर्णयास्तव सविनय सादर.

उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३७४** **वरील विषयाचा सखोल अभ्यास करण्यात आला, समितीच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले की, सन २०१७-१८ दरम्यान शिर्डी नगरपंचायत, शिर्डी दि.०५.०५.२०१७ च्या संयुक्त बैठकीमध्ये स्वच्छतेसाठी दरमहा रु.२५,००,०००/-इतक्या रकमेची मागणी केली होती. त्यावर या कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी व सदर निविदेनुसार येणारे निम्नतम दर किंवा शिर्डी नगरपंचायतीने मागणी केलेली २५,००,०००/-रुपयांची मागणी यापैकी जी रक्कम कमी असेल ती देण्याचा निर्णय**

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षातील बैठकीत त्यावेळी घेण्यात आला. त्यानंतर ०३.११.२०१७ रोजी शिर्डी नगरपंचायतीने नवीन वाढीव प्रस्ताव दिला की ज्यामध्ये दरमहा ४२,५१,५९९/-ची निविदा प्राप्त झाल्याने दरमहा तेवढया रकमेची मागणी केली.

सबब शिर्डी नगरपंचायतीस ठराविक रक्कम देण्याबाबतचा निर्णय घेतांना सदरचे प्रकरण छाननी समितीच्या समोर ठेवण्यात आले होते. छाननी समितीचे अध्यक्ष मा.न्यायमुर्ती श्री.चांदीवाल यांनी दिनांक १९.०१.२०१८ रोजीच्या छाननी समितीच्या सभेतील निर्णय क्र.२४ अन्वये दरमहा रक्कम रु.३०,००,०००/-पाच वर्षासाठी देणेबाबत निर्णय दिला व त्यानुसार या निधीच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र शासनाच्या न्याय व विधी विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला. दरम्यान व्यवस्थापन समितीने दि.१४/११/२०१७ रोजीच्या सभेत निर्णय क्र.९५२ अन्वये शिर्डी नगरपंचायतीस दरमहा रु.३५,००,०००/- एवढे अनुदान देण्यात यावे व उर्वरीत खर्चाची रक्कम शिर्डी नगरपंचायतीने सोसावी असा निर्णय घेतलेला होता.

महाराष्ट्र शासनाचे दि.७ एप्रिल २०१८ चे शासन निर्णयानुसार शिर्डी नगरपंचायतीस दरमहा रु.३०,००,०००/- इतका निधी पुढील पाच वर्षासाठी अनुदान स्वरुपात उपलब्ध करुन देण्याबाबत शासन मान्यता दिली. आणि या शासन निर्णयाप्रमाणे अनुदान देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली. परंतु शिर्डी नगरपंचायतीने दि.२८/०४/२०१८ रोजी पुन्हा प्रस्ताव पाठवुन प्रतिमहा रु.४२,५१,०००/- एवढया अनुदानाची मागणी केली. त्यावर तात्कालीन व्यवस्थापन समितीने ०२/०५/२०१८ चे सभेत निर्णय क्र.३३९ अन्वये शिर्डी नगरपंचायतीस दरमहा ३५,००,०००/- रु.एवढा निधी दि.०१/१२/२०१७ पासून द्यावा व त्यास छाननी समितीची मान्यता घेऊन शासनाकडे प्रस्ताव सादर करावा तथापि शिर्डी नगरपंचायतीची ४२,५१,०००/-रुपये प्रतिमहा मागणीची माहिती शासनाकडे पाठवावी असा निर्णय घेतला. त्यावर छाननी समिती अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ति श्री.चांदीवाल यांनी मत व्यक्त केले की, सर्व गोष्टीचा विचार करुन महाराष्ट्र शासनाने दि.७ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयानुसार दरमहा ३०,००,०००/-रुपये एवढे अनुदान देण्यास मान्यता दिलेली आहे व त्यामुळे ३०,००,०००/-रुपयांऐवजी ३५,००,०००/- रुपये अनुदान देणे अयोग्य आहे.

समितीच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, या दरम्यान व्यवस्थापन समितीच्या वैधतेबाबत मा.उच्च न्यायालयात पी.आय.एल.क्र.१०२/२०१६ ही प्रलंबीत होती.

अभिलेखावरुन असेही दिसून येते की, त्यानंतर शासन स्तरावर निर्णय होऊन दि.२२/११/२०१८ चे शासन निर्णयानुसार शुध्दीपत्रक काढून दि.०१/१२/२०१८ पासून दरमहा ४२,५१,५९९/- इतका निधी पुढील पाच वर्षासाठी अनुदान स्वरुपात शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करुन देण्यास संस्थानला मान्यता दिलेली दिसते.

वरील परिस्थीतीत शिर्डी येथील ग्रामस्थांनी समितीला तसेच इतर अधिकाऱ्यांना तक्रार अर्ज दिलेला आहे व सदर रकमेच्या विनियोगाबाबत गंभीर मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

तदर्थ (Ad-hoc) समितीने नगरपंचायतीस पैसे देण्याबाबतची पुर्वपिठिका तसेच त्या अनुषंगाने आलेली तक्रार याचा विचार तदर्थ (Ad-hoc) समितीच्या कार्यक्षेत्राच्या अधीन राहून केला असता असे लक्षात आले की, सदर विषयात बरीच गुंतागुंत आहे. समितीच्या असेही लक्षात आले की, एवढया मोठया प्रमाणावर रक्कम देतांना त्याचा विनियोग व त्याचा हिशोब या अनुषंगाने संस्थानचे नियंत्रणाबाबत त्यात कुठलीही तरतूद केलेली दिसून आली नाही.

दिनांक १७/०३/२०२० पासून कोव्हीड-१९ च्या संसर्गाचे उद्रेकामध्ये श्रींचे मंदिर दर्शनासाठी बंद आहे. पर्यायाने शिर्डी येथे येणाऱ्या भाविकांची संख्या कमी झाली नाही तर पुर्णत: संपुष्टात आलेली आहे. अशा परिस्थीतीत ज्या मुख्य कारणासाठी शिर्डी नगरपंचायतीस एवढी मोठी रक्कम देण्यात येत होती त्या रकमेची आवश्यकता किंवा कमीत कमी १७/०३/२०२० नंतर लागणारी स्वच्छतेबाबतची यंत्रसामग्री, साधने, मनुष्यबळ, स्वच्छतेसाठी लागणारी औषधे, फिनेल, ॲसीड पावडर इत्यादिचे प्रमाण हे निश्चितच मोठया प्रमाणात घटणे सहाजिक आहे.

समितीच्या असेही निदर्शनास आले की, सदर रक्कम देताना जो करार झालेला आहे त्यामध्ये संस्थान करारास पक्षकार नाही.

वरील सर्व परिस्थीतीत दि.०९/०६/२०२० रोजीच्या सभेतील निर्णय क्र.३२३ प्रमाणे तदर्थ (Ad-hoc) समितीने शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकाऱ्याकडून तक्रारींच्या अनुषंगाने खुलासा

मागवला होता. मुख्याधिकारी यांनी दिलेल्या त्या खुलाशावरुन स्पष्ट होते की, वादातील बऱ्याच मुद्दयांचे तसेच तक्रार अर्जातील मुद्दयांचे उत्तर तदर्थ (Ad-hoc) समिती स्तरावर सापडणे निव्वळ अशक्य आहे.

तदर्थ (Ad-hoc) समितीसमोरील अभिलेखावरुन असे स्पष्ट होते की, पी.आय.एल. क्र.१२०/२०१९ ही प्रलंबीत आहे व त्यातील याचिकाकर्ते हे संस्थानबाबत असलेल्या विविध विषयावर वेळोवेळी मा.उच्च न्यायालयासमोर त्यांची बाजू मांडतात तसेच विविध बाबी उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देतात.

वरील परिस्थीतीत समितीचे सदस्य १) मा.श्री.श्रीकांत ल.आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर, २) मा.श्री.दिलीप स्वामी, अपर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक ३) मा.श्रीमती गीता बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांनी चर्चेअंती खालील निर्णय घेतला.

१. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दि.१७.०३.२०२० नंतर स्वच्छतेसाठी किती रक्कम द्यावी तसेच मार्च, एप्रिल, मे २०२० या महिन्यात दिलेल्या रकमेचा हिशोब/लेखाजोखा कोणी व कशा पध्दतीने मागवावा,

२. भविष्यात साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी शिर्डी नगरपंचायतीस दरमहा स्वच्छतेसाठी किती रक्कम द्यावी तसेच या रकमेच्या मोबदल्यात नगरपंचायतीने संस्थानचे मालमत्तेवर सफाई करात व इतर करात सुट द्यावी किंवा कसे, तसेच इतर काही सवलती देण्याबाबत,

३. तक्रारकर्त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.

४. भविष्यात अशा तक्रारी होवू नयेत यासाठी उपाययोजना तसेच साईबाबा संस्थान यांचेकडून सदर रकमेच्या विनियोगाबाबत तसेच ज्या कारणासाठी ती रक्कम दिली आहे त्या कामाच्या देखरेखीबाबत,

वरील सर्व बाबींच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयासमोर पी.आय.एल.क्र.१२०/२०१९ मध्ये संस्थानने अहवाल दाखला करावा व याबाबत निर्देश देण्यासाठी मा.उच्च न्यायालयास विनंती करावी. यासाठी संस्थानने मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे पी.आय.एल क्र.१२०/२०१९ मध्ये दिवाणी अर्ज (सिव्हील ॲप्लीकेशन) दाखल करावा, असे ठरले.

समिती सदस्य तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.अरुण डोंगरे, (भा.प्र.से.) यांनी त्यांचे वस्तुस्थितीवर आधारीत खालील मत मांडले.

दि.१७ मार्च,२०२० पासुन श्री साईबाबांचे मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद करण्यात आले आहे. माहे मार्च व एप्रिल-२०२० या महिन्याची रक्कम शिर्डी नगरपंचायत यांना आदा करण्यात आलेली आहे. याबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांचेकडून वेळोवेळी अहवाल मागविण्यात आले असुन सदरचे अहवाल मा.समितिसमोर वेळोवेळी सादर करण्यात आलेले आहेत. तरी मा.तदर्थ समितीने उपस्थित केलेल्या मुद्याचे अनुषंगाने मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांना मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर दस्ताऐवजासह उपस्थित राहणेबाबत कळविता येईल. व लॉकडाऊनचे कालावधीत (मंदिर दर्शनाकरीता सुरु होईपर्यत) मुख्याधिकारी यांचे खुलाशानुसार किती रक्कम अदा करावयाची याबाबत निर्णय घ्यावा. व यासंदर्भात मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन मा.न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)

---

**विषय नं.२१** **आर्थिक अनुदान मागणीकरीता आलेल्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडे अर्थसहाय्य मागणीसाठी दररोज, नोंदणीकृत संस्था, शासकीय कार्यालये, निमशासकीय संस्था, तसेच वैयक्तीकरित्या अर्ज येत असतात. सदरच्या अर्जाद्वारे, १) बांधकाम, २) आश्रमातील लोकांचा खर्च, ३) वाचनालयासाठी पुस्तके-फर्निचर, ४) दवाखान्यासाठी मशिनरी / औषधे, ५) संमेलने, स्पर्धा, शिबिरे, ६) दुष्काळी भागाकरीता चारा/अन्नधान्य/पाणी ७) मुलांच्या शिक्षणासाठी मदत, ८) विधवा/निराधार/अपंग यांना दैनंदिन खर्चासाठी मदत, ९) व्यवसाय सुरू करणेकरीता मदत, १०) मुलांचे लग्नासाठी मदत, ११) जळीत झाल्याने मदत, अशाप्रकारे अनेक कारणासाठी अनुदान मागणी केली जाते.

**संस्थान अधिनियम तरतुद:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल."

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम २००४ चे कलम २१(२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या विविध प्रयोजनासाठी पुरेशा तरतूदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या तीस टक्कयापेक्षा अधिक नसेल एवढा भाग,समितीस वेळोवेळी खालील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

**कलम २१ (२) (एक)** " छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्य शासनाचे पूर्व मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रूग्णालय, आधारगृह, किंवा इतर धर्मदाय अथवा धार्मिक संस्था, अथवा कला वा साहित्याशी संबंधित असलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, किंवा नोंदणीकृत सोसायटी यांची स्थापना व देखभाल करून घेणेसाठी, अशी तरतुद आहे.

**संस्थानकडे अनुदान मागणीसाठी दाखल झालेले अर्ज**

दि.०१.०८.२०१९ ते ३१.०८.२०१९ कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता आलेले अर्ज खालीलप्रमाणे-

| अ.नं. | अर्जदाराचा/ संस्थेचे नाव व पत्ता | प्रयोजन | शेरा |
|---|---|---|---|
| १ | कु. शुभम भिकाजी चेचर, करवीर | शैक्षणीक मदत | मा. चंद्रकात पाटील, मंत्री महसूल,मदत व पुर्नवसन सार्वजनिक बांधकाम |
| २ | श्री मोहित तिवारी, हरीद्वार | कॅन्सर उपचारासाठी मदत | |
| ३ | प्रा. डॉ. आर. एल. बिडवाई, यवतमाळ | रोजगार निर्मिती कार्यासाठी | |
| ४ | न्यू इंग्लीश स्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय, तळेगांव दिघे | संगणक संच | |
| ५ | श्रीमती ज्योती सतीष धनसरे, सांगली | शैक्षणीक मदत | |
| ६ | कु. ओम योगेश वाघ, पारनेर | शैक्षणीक मदत | |
| ७ | तुळजाभवानी जिवदया गौरक्षण संस्थान, वाशिम | गोशाळा मदत | |
| ८ | श्रीमती संगीता संजीव मोरे, बार्शी | कॅन्सर उपचारासाठी घेतलेले पैसे परत करण्यासाठी | |
| ९ | जिल्हा रुग्णालय, अहमदनगर | सोनोग्राफी मशीनसाठी | |
| १० | Shri Helpless Women & Child Charitable Soc | अशिक्षितांसाठी मदत | |
| ११ | लोकनायक जयप्रकाश नारायण माध्यमिक व डॉ. ग. दा. सप्तर्षी उच्च माध्यमिक विद्यालय, कर्जत | बेंच मिळणेसाठी | |
| १२ | श्री शरद चौगूले, जयसिंगपूर | गाव दत्तक घेणेबाबत | |
| १३ | श्री शरद चौगूले, जयसिंगपूर | गाव दत्तक घेणेबाबत | |
| १४ | श्री प्रशांत पांडुरंग पाटील, सांगली | रस्त्यासाठी मदत | |
| १५ | ग्रामपंचायत कार्यालय घोगरगांव , नेवासा | जनावरांच्या चा-यासाठी | |
| १६ | आठगांव शिक्षण मंडळ, कोन ठाणे | प्रयोगशाळा व शाळा इमारत बांधकामासाठी | |
| १७ | श्री सुभाष बाबुराव शिंदे, पाटण | पावसामुळे किराणा दुकानाचे झालेले नुकसानीसाठी | |
| १८ | कु. सोनल पवन जैन, इंदैार | शिक्षणासाठी मदत | |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | श्रीमती शबाना बेगम, कानपूर | शिक्षणासाठी मदत | |
| २० | श्री तुकाराम बाजीराव गव्हाणे, कंत्राटी कर्मचारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | मुलाचे किडनी डायलेसिस व किडनी बदली करण्याचे उपचारासाठी | |
| २१ | श्रीहरी बालाजी मंदीर देवस्थान चिमूर (चंद्रपूर) | भक्तनिवास बांधकाम | मा. आ. किर्तीकुमार भांगडिया, चिमूर |
| २२ | मा. श्री राहूल द्विवेदी, जिल्हाधिकारी अहमदनगर | ध्वजदिन निधी संकलन | |
| २३ | ज्ञानगंगा दलित महिला वाचनालय, पाथर्डी | इमारत बांधकामासाठी | |
| २४ | राजे विक्रमसिंग घाटगे फांउडेशन, कोल्हापूर | पुरग्रस्तांना मदत | |
| २५ | राहाता तालुका तालिम संघ | कुस्ती स्पर्धा आयोजनासाठी | |
| २६ | कु. शेटे जयंत दिलीप, अहमदनगर | शैक्षणीक मदत | |
| २७ | श्री राजेंद्र भास्करराव सोनवणे, जळगांव | उदरनिर्वाहासाठी मदत | |
| २८ | कोपरगांव एज्युकेशन सोसायटी, कोपरगांव | इमारत बांधकाम | |
| २९ | श्री गणेश हायस्कूल गणेशवाडी | इमारत बांधकाम | |
| ३० | मनोज तिवारी, दिल्ली | घरासाठी मदत | |
| ३१ | फत्तेसिंगराव नाईक इंडोमेंट ट्रस्ट, चिखली | पुरग्रस्तांना मदत | |
| ३२ | श्रीमती नादराबाई आनंदराव देशमुख माध्यमिक विद्यालय, रुई | एक वर्ग खोली व स्वच्छतागृह बांधकाम | |
| ३३ | श्री शुभम आनंदा पाटील, कल्याण ई. | शैक्षणीक मदत | |
| ३४ | श्री चंद्रकांत जालिंदर पाटील, वाळवा | उदरनिर्वाहासाठी | |
| ३५ | श्री एस. डी. शेरखाने, सशस्त्र सीमा बल भारत सरकार | जवानाच्या मदतीसाठी | |
| ३६ | श्री बलराज धीर हिमाचल प्रदेश | उदरनिर्वाहासाठी | |
| ३७ | निहार अगस्ती, दिल्ली | आर्थिक मदत | |
| ३८ | दत्ताजीराव कदम हायस्कूल अर्जुनवाड,कोल्हापूर | शाळेसाठी मदत | |

**दि.२२.०२.२०२० ते ३०.०६.२०२०** कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता आलेले अर्ज खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **अर्जदाराचा/ संस्थेचे नाव व पत्ता** | **अनुदान मागणीचे कारण** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मराठी विज्ञान परिषद, मुंबई | विज्ञान कार्यक्रम निधी | |
| २ | माध्यमिक शाळा, पिंपळपाडा, नाशिक | अदिवासी शाळा बांधकाम | |
| ३ | शिवशंभो वृद्धाश्रम सेवा मंडळ ट्रस्ट | इमारत बांधकामासाठी | |
| ४ | श्रीमती पूर्वा सिमा विकास, मनीपूर | बेंचेस साठी मदत | |
| ५ | श्री जगदंबा बहूउद्देशीय सेवाभावी संस्था, राक्षसभुवन, बीड | आजोळ वृद्ध व अनाथालयासाठी | |
| ६ | जिल्हा शल्य चिकीत्सक, बीड | एक्स रे मशीनसाठी | |
| ७ | माऊली मेडिकल रिसर्च फाउंडेशन, राहाता | कार्यशाळेसाठी मदत | |
| ८ | गोरक्षण सेवा संस्था, जिंतूर | गायींना चा-यासाठी | |
| ९ | किर्ती माहेश्वरी, औरंगाबाद | शैक्षणीक मदत | |
| १० | श्री साईधाम मित्र मंडळ, घाटकोपर | पालखी निवारासाठी मदत | |
| ११ | श्री रामकृष्ण गणपत आव्हाड, सिन्नर | मुलींच्या राष्ट्रीय स्पर्धासाठी | |
| १२ | मु. पोसरे खाडेवाडी, ता. चिपळूण | पिण्याचे पाणी व्यवस्था | |
| १३ | किर्ती माहेश्वरी, औरंगाबाद | शैक्षणीक मदत | |
| १४ | ग्रामपंचायत कार्यालय पिंपळवाडी, राहाता | साईभक्त निवास व विकासकामे | |
| १५ | श्री तुषार जनार्दन जगताप, पुणे | कर्ज भरण्यासाठी | |
| १६ | थॅलेसेमिया बहूउद्देशीय कल्याणकारी संस्था, चंद्रपूर | बोनमॅरो ट्रॉन्सप्लॅन्ट साठी | |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | श्री अक्षय पतंगे, हिंगोली | धन फौंडेशनसाठी मदत | |
| १८ | श्री अशोक कुमार | पंतप्रधान सहाय्यता निधीसाठी | |
| १९ | श्रीमती रश्मी रतिश, केरळ | वैद्यकीय व इतर मदत | |
| २० | मा. श्री राधाकृष्ण ए. विखेपाटील | वैद्यकीय मदत | |
| २१ | श्री हरीष चौरासिया | घर बांधण्यासाठी | |
| २२ | श्री ओम देशमुख | आर्थिक मदत | |
| २३ | श्री संजय भोसले, पुणे | गरीबांना मदत करणेसाठी | |
| २४ | जीवन आनंद संस्था, कुडाळ | आश्रमास आर्थिक मदत | |
| २५ | मदर इंडस्ट्रीज, सांगली | कर्ज भरण्यासाठी | |
| २६ | हिमालया गोरखा फौंडेशन, सिलगुरी | शाळेसाठी मदत | |
| २७ | श्री एस. के. बालखांडे | अंध शाळेसाठी मदत | |
| २८ | सौ. रेखा ललेंद्र गजभिये, भंडारा | वैद्यकीय मदत | |
| २९ | श्री भगवान सिंग यादव, ग्वालियर | कोरोनाग्रस्तांसाठी मदत | |
| ३० | सौ. अर्चना का. भोये, नाशिक | आर्थिक मदत | |
| ३१ | श्री अभिनव सिंग ठाकूर, | कोरोनासाठी मदत | |
| ३२ | शिव साई एंटरप्राईजेस, शिर्डी | कामगारांना पगार देणेसाठी | |
| ३३ | आण्णाराव एज्युकेशन ॲंड चॅरिटेबल ट्रस्ट विजयपूरा | शाळेसाठी मदत | |
| ३४ | श्री संजय रामभाऊ जगताप, श्रीरामपूर | उपजिविकेसाठी | |
| ३५ | श्री अभिनंदन बोंदार्डे, सोलापूर | कर्जभरण्यासाठी | |
| ३६ | श्री ओम देशमुख | उपजिविकेसाठी | |
| ३७ | श्री उपांशू यादव, इटावा | मंदीर बांधण्यासाठी | |
| ३८ | श्री अभिजित दावने | आर्थिक मदत | |
| ३९ | श्री व्ही कुमार | कोरोनाग्रस्तांसाठी मदत | |
| ४० | शिवकामा सुंदरी | कोरोनाग्रस्तांसाठी मदत | |
| ४१ | श्री अभिजित दावने | आर्थिक मदत | |
| ४२ | दि. नॅशनल असोशिएशन फॉर द ब्लाइंड नाशिक | अंध व वृद्धाश्रमाकरिता | |
| ४३ | पंढरीनाथ जिजाबा आमरे पाटील ग्रामनवोदय ट्रस्ट | गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी | |
| ४४ | श्री बी. एस. रामलिंगम, चेन्नई | मंदीरासाठी | |
| ४५ | राष्ट्रीय स्वच्छता गंगा मिशन (नमामि गंगे) | गंगा स्वच्छता अभियान | |
| ४६ | श्री के . के. श्रीनिवासन | अन्नदानासाठी | |
| ४७ | श्री ओम देशमुख | शैक्षणीक मदत | |
| ४८ | श्रीमती प्रियंका प्रजापती | वैद्यकीय मदत | |
| ४९ | श्री देवराज राजेंद्र सामंत | वैद्यकीय मदत | |
| ५० | श्रीमती अग्रिता जोहरी | आर्थिक मदत | |
| ५१ | श्री अधिराज पिंपळकर | शैक्षणीक मदत | |
| ५२ | श्री अभिजीत दावने | आर्थिक मदत | |
| ५३ | श्री नविन पंडीता | आर्थिक मदत | |
| ५४ | श्री के. के. श्रीनिवासन | अन्नदान सेवा | |

**विभागाचा अभिप्राय :-**

१) वैयक्तीक आर्थिक मदत देणेबाबत अधिनियमात स्पष्ट तरतूद नाही.

२) आर्थिक मदत मागणीकरीता दिलेल्या अर्जाबाबतची सद्यस्थितीची अर्जदार विचारणा करीत असतात. त्याबाबत संबंधितांना त्यांच्या "**अर्जाबाबतची सद्यस्थिती कळविणेबाबतच्या विषयावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८.१०.२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र.७६६ अर्जदारास अर्जाची सद्यस्थिती कळविण्याची आवश्यकता नाही" असे ठरले आहे. "**

३) वैद्यकीय उपचारासाठी श्री साईनाथ रुग्णालयाकडून वैद्यकीय अनुदान दिले जाते त्यामुळे वैद्यकीय उपचारासाठींचे अर्ज विचारात घेऊ नये.

४) अधिनियम २००४ मध्ये ज्या बाबीसाठी अनुदानची स्पष्ट तरतूद आहे फक्त त्याच अर्जाचा अनुदान देतांना विचार व्हावा असे मत आहे.

५) मा. तदर्थ समितीचे दि. ०४.१२.२०१९ रोजीचे सभेत उपरोक्त अर्जांबाबत चर्चा होऊन मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. ३०.०१.२०१९ रोजी दिलेल्या आदेशान्वये संस्थानचे दैनंदीन खर्चाव्यतिरिक्त बाहेर निधी देण्यास प्रतिबंध केलेला असल्याने सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आलेला आहे.

**प्रस्ताव:-** दि.०१.०८.२०१९ ते दि .३१.०८.२०१९ व दि.२२.०२.२०२० ते ३०.०६.२०२० या कालावधीत आलेले अर्ज नस्तीबंद करण्याचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीपुढे सादर .

**निर्णय क्र.३७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१.०८.२०१९ ते दि.३१.०८.२०१९ व दि.२२.०२.२०२० ते दि.३०.०६.२०२० या कालावधीत संस्थानकडे आर्थिक अनुदान मागणी करीता आलेले सर्व अर्ज नस्तीबंद करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.२२** **श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,धुळे यांना (3 Tesla) एम आर आय मशीन व विथ टर्थ की बेसीकसाठी रक्कम रु.१४ कोटी मात्र अनुदान देणेचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. श्री गिरीष महाजन, माजी मंत्री वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास महाराष्ट्र शासन यांनी मुख्य कार्यकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना पत्र पाठवून खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान, शिर्डी मार्फत अनेक समाजपयोगी कामांकरिता मोठयाप्रमाणात देणगी स्वरुपात सहाय्य करण्यात येत आहे. ही बाब नक्कीच अभिनंदनीय आहे. श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे अंतर्गत गोरगरीब रुग्णांच्या तपासणी करणेकरिता एम. आर. आय. स्कॅन हे यंत्र श्री साईबाबा संस्थानकडून मिळणेकरिता प्रस्ताव अधिष्ठाता श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांनी सादर केला आहे.

सदर प्रस्तावात अधिष्ठाता श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथे ५४५ खाटा असून या ठिकाणी धुळे नंदुरबार, जळगांव मालेगांव या जिल्हयातील रुग्ण हे विविध उपचारासाठी येत असतात. ही संस्था सन १९८९ पासून सुरू झाल्यापासून येथील विद्यार्थी प्रवेशक्षमता ही १०० असून काही विभागात सीपीएस कोर्सेस, मॉर्डर्न फॉर्मोकोलॉजी कोर्सेस व फेलोशिप कोर्सेस या ठिकाणी सुरू आहे.

या संस्थेत पदव्युत्तर पदवी (पी. जी.) कोर्सेस सुरु होणे नितांत आवश्यक असून या संस्थेकडून चिकीत्सालयीन एकूण ७ विषयात पी. जी. कोर्सेस सुरू करण्यासाठी एमसीआय, नवी दिल्ली यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला असून नजीकच्या कालावधीत केंव्हाही या ठिकाणी पी. जी. करिता निरीक्षण प्रक्रिया सुरू होणार आहे. यामध्य प्रामुख्याने चिकीत्सालयीन विषय स्त्रिीरोग प्रसुती विभाग, शल्यचिकित्साशास्त्र, औषधवैद्यकशास्त्र, कान नाक घसा, अस्थिव्यंगोपचार, बालरोगशास्त्र, नेत्रशल्यचिकित्सा, यामध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.

या संस्थेत सद्यस्थितीत एम. आर. आय. हे यंत्र उपलब्ध नसल्यामुळे याठिकाणी उपचारासाठी येणा-या गोरगरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयात एम. आर. आय. ची चाचणी करण्याकरिता पाठविण्यात येत असते. त्यामुळे नाहक आर्थिक भुर्दंड हा बसत असतो. त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांच्या तसेच लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते यांची सातत्याने एमआरआय यंत्र उपलब्ध करण्याची मागणी आहे. यामुळे मेंदुच्या व मज्जासंस्थेच्या बारीक आजाराचे निदान करणेसाठी उपयोग होणार आहे.

तसेच धुळे शहर हे दोन राष्ट्रीय महामार्गावर वसलेले असल्यामुळे येथे मोठया प्रमाणात अपघात होत असतात. अपघातग्रस्त रुग्णांना तातडीने उपचार मिळण्यासाठी व निदान होण्यासाठी एमआरआय हे यंत्र अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. तसेच रुग्णालयाच्या लेखाशिर्षा क्रं. ५२ यंत्र व साधनसामुग्री अंतर्गत अनुदान उपलब्ध नसल्यामुळे आर्थिक अनुदान उपलब्ध करून देणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच त्यांनी एमआरआय मशीनचे Specification व रु. १४,००,००,०००/-किंमतीचे माहितीपत्रक सादर केले आहे.

अर्थ साहाय्यासाठी अधिनियमातील तरतुद:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:- सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. १३.१२.२०१८ रोजीचे सभेपुढे सादर केला असता निर्णय क्रं. ७३५ अन्वये प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आला आहे.

विभागाचा अभिप्राय :-

१. प्राध्यापक व विभाग प्रमुख, क्ष- किरण विभाग श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांनी दि. २०.०७.२०१८ रोजी अधिष्ठाता, श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांना लिहीलेल्या पत्रात एमआरआय मशीनसाठी लागणारा कर्मचारी वर्गाचा प्रस्ताव सादर करण्यात येत असून विभागात जे कर्मचारी आहेत त्यांच्याकडून एमआरआय मशिन चालविणे शक्य नाही. त्यासाठी प्रस्तावित पदे मंजूर होऊन भरणे तसेच अस्तित्वातील अध्यापक व तंत्रज्ञांची रिक्त पदे भरणे आवश्यक आहे/प्राथमिक निकड आहे, याच्या अधिन राहूनच सदर यंत्र प्रस्तावीत करण्यात यते आहे. अन्यथा मशीन विनावापर राहू शकते व त्याअनुषंगाने रुग्णसेवेच्या व प्रशासकीय अडचणी येऊ शकतात. कारण महागडी यंत्र सामुग्री हाताळण्यासाठी पुरेसे व तज्ञ मनुष्यबळ असणे खूपच आवश्यक आहे असे नमूद केले आहे.

२. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. ३०.०१.२०१९ रोजी “Shri Sai Baba Sasthan Trust, shall not disburse an amount of the Trust for other purposes than routine expense” असे आदेश दिलेले आहेत.

३. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना वैद्यकीय साधनसामुग्री व मशिनरी खरेदीसाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध होते.

४. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील आदेश तसेच उपरोक्त नमूद मुद्दयांचा विचार करता सदर प्रस्ताव अमान्य करणे योग्य होईल, असे नम्र मत आहे.

**प्रस्ताव-** श्री भाऊसाहेब हिंरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धुळे यांना (3 Tesla) एमआरआय मशीन व विथ टर्न की बेसीकसाठी रक्कम रु. १४ कोटी मात्र अनुदान देणेचे प्रस्ताव निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३७६ सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.२३ संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणाऱ्या सोने चांदी वस्तु कस लावून तपासणे व बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चित करणेकामी सोने-चांदी मुल्यांकनकारांना मासिक मानधनावर दोन वर्षाकरीता नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला दक्षिणापेटीतुन व लेखाशाखेमध्ये साईभक्तांकडुन समक्ष, सोने-चांदीचे अलंकार /वस्तू देणगी स्वरुपात प्राप्त होत असतात. सदर देणगी स्वरुपात येणा-या सोने-चांदीच्या वस्तु/ अलंकाराची कस लावून तपासणी करुन बाजारभावाने किंमत लावणेकामी, मागील वर्षी मुल्यांकनकार म्हणून १) श्री. गणेश दत्तात्रय नागरे, शिर्डी. व २) श्री. बाळासाहेब माधवराव नागरे, शिर्डी.व ३) श्री. सुधीर रमण वडनेरे, संगमनेर यांची नेमणुक करण्यात आली होती. सदर नेमणुकीची मुदत दि. ३१.०३.२०२० अखेर संपत असल्याने, त्यांना मुदतवाढ देणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने, दि.२७.०३.२०२० रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला होता. त्यावर निर्णय क्र.१८५ अन्वये, पुढील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

“संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणारे सोने चांदी वस्तुंची कस लावुन तपासणी करुन मुल्यांकन करणेकामी नेमणेत आलेल्या १) श्री. गणेश दत्तात्रय नागरे, शिर्डी. यांना प्रतिमाह एकत्रित रु. ५,०००/- मात्र व २) श्री. बाळासाहेब माधवराव नागरे, शिर्डी. ३) श्री. सुधीर रमण वडनेरे, संगमनेर यांना प्रत्येकी, प्रतिमाह एकत्रित रु. ३०००/- मात्र याप्रमाणे मानधनावर व पुर्वीचेच अटी शर्तीस अनुसरुन, दि.०१.०४.२०२० पासून पुढील सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.”

त्यास अनुसरुन, उपरोक्त निर्णयान्वये वरील तीनही मुल्यांकनकारांना सोने-चांदी कस लावून तपासणी करणे व बाजारभावाने मुल्यांकन करणे, याकरीता दि.०१.०४.२०२० पासून पुढे सहा महिने कालावधीकरीता (दि. ०१.०४.२०२० ते दि. ३०.९.२०२० पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली असलेबाबत कार्यादेश पाठविण्यात आले आहेत.

मंदिर व मंदिर परिसरात बसविण्यात आलेल्या दक्षिणा पेटीतील रकमेची मोजणी आठवडयातुन साधारणत: दोन वेळेस करण्यात येत असते. दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीचे वेळी हुंडित निघालेले तसेच इतर वेळी साईभक्तांनी दान केलेले सोने-चांदी वस्तुंची कस लावुन तपासणी करुन, मुल्यांकन करणेकामी तात्काळ मुल्यांकनकारांची गरज असते, त्यासाठी तीन मुल्यांकनकारांची नेमणुक करणे आवश्यक आहे. उपरोक्त नमुद तीनही मुल्यांकनकारांची मुदत दि. ३०/०९/२०२० अखेर संपत असल्याने, नव्याने मुल्यांकनकारांची नेमणुक करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन, पुढील दोन वर्ष कालावधीसाठी मुल्यांकनकारांची नेमणुक करणेकामी संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार दरपत्रके मागविणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर दि. १५.०५.२०२० ते दि. ३०.०५.२०२० पर्यंत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. मुल्यांकनकारांकडुन पात्रतेसाठी ज्वेलर्स शॉप अ‍ॅक्ट, लायसेन्स व मुल्यांकनकार असलेबाबत प्रमाणपत्र मागविण्यात आले होते. सदर कालावधीमध्ये विविध मुल्यांकनकार यांचेकडुन एकुण ०३ दरपत्रके प्राप्त झालेले असुन, प्राप्त मुल्यांकनकारांच्या तांत्रिक व दरपत्रके मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सो., यांचे समक्ष दि. २०/०६/२०२० रोजी झालेल्या मा. खरेदी समितीचे सभेमध्ये उघडण्यात आलेले असुन, प्राप्त सर्व दरपत्रके पात्र झालेले आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| **अ.नं.** | **मुल्यांकनकारांचे नाव** | **अपेक्षित मानधन** |
|---|---|---|
| ०१ | श्री. गणेश दत्तात्रय नागरे, व्दारकामाई ज्वेलर्स, शिर्डी. | ५०००/- प्रतिमाह |
| ०२ | श्री. बाळासाहेब माधवराव नागरे, लक्ष्मी अलंकार, शिर्डी. | ५०००/- प्रतिमाह |
| ०३ | श्री. सुधीर रमण वडनेरे, श्री ज्वेलर्स, संगमनेर | ५०००/- प्रतिमाह |

उपरोक्त तीनही मुल्यांकनकार साधारणत: सन २०१५ पासुन सोने-चांदी वस्तुंची कस लावुन तपासणीचे काम पाहत आहेत. उपरोक्तप्रमाणे तीन मुल्यांकनकार यांचे दरपत्रके प्राप्त झाले असुन, त्यांनी प्रत्येकी, प्रतिमाह एकत्रित रु. ५०००/- मात्र याप्रमाणे दिलेले दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुढील दोन वर्षाकरीता (दि. ०१.१०.२०२० ते दि. ३०.०९.२०२२) खालील अटी-शर्तीस अनुसरुन, कार्यादेश देता येईल, असे मत आहे.

**अटी-शर्ती-**

१. आपली नेमणुक दि. ०१/१०/२०२० ते दि. ३०/०९/२०२२ या दोन वर्षाचे कालावधी करीता राहील.

२. सदरील मुदतीनतंर आपली नेमणुक आपोआप संपुष्टात येईल. मुदत संपलेनंतर रद्द केलेचे वेगळे पत्र देण्यात येणार नाही.

३. याकामी आपणास पुढील नेमणुकीकरीता हक्क सांगता येणार नाही.

४. आपली नेमणुक ही मासिक एकत्रित मानधनावर करण्यात येत असुन, या कालावधीत आपणास निश्चित झालेले मासिक मानधन देण्यात येईल.

५. देय मानधनातुन प्रचलित नियमानुसार कर कपात करण्यात येतील.

६. आपणास संस्थान ज्या ज्या वेळी बोलावील त्या त्या वेळी (अर्धा तासाचे आत) सोने-चांदी वस्तु तपासणीकामी संस्थान कार्यालयात येणे बंधंनकारक राहील.

७. दक्षिणापेटया मोजणीच्या वेळी सोने-चांदी वस्तु तपासणीकामी (दरमहा साधारणे ९ वेळेस दक्षिणा पेटया माजणी असते) दक्षिणा पेटी मोजणी हॉलमध्ये सकाळी ८.३०वा. उपस्थित राहणे बंधंनकारक राहील. याबाबत आपणास पुर्व सुचना देण्यात येईल. याकामी अ.नं. ४ खेरीज कोणतेही जादा मानधन/भत्ता देण्यात येणार नाही.

८. आपणास प्रवास खर्च स्वत: करावयाचा आहे अ.नं. ४ खेरीज कोणतेही जादा मानधन/भत्ता देण्यात येणार नाही.

९. आपण तपासणी केलेल्या वस्तुची शुध्दता, वजन, बाजारभावाप्रमाणे किंमत याबाबतचे प्रमाणपत्र आपले सही शिक्यानिशी द्यावे लागेल.

१०. आपण तपासणी केलेल्या वस्तु बाबत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास त्याकामी आपणास न्यायालयात उपस्थित राहणे बंधंनकारक राहील.

११. आपणास दक्षिणा पेटी मोजणीचे वेळी संस्थानने दिलेला गणवेश परीधान करणे बंधंनकारक राहील.

१२. दक्षिणा पेटी मोजणीचे वेळी चहा व अल्पोपहार संस्थानमार्फत विनामुल्य देण्यात येईल.

तरी, संस्थानला दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीचे वेळी हुंडित निघालेले, तसेच इतर वेळी साईभक्तांनी देणगी स्वरुपात प्राप्त होणारे सोने चांदी वस्तुंची कस लावुन तपासणी करुन, मुल्यांकन करणेकामी १) श्री. गणेश

दत्तात्रय नागरे, व्दारकामाई ज्वेलर्स, गुरुस्थान मंदिर रोड, शिर्डी. २) श्री. बाळासाहेब माधवराव नागरे, लक्ष्मी अलंकार, पालखी रोड, शिर्डी. ३) श्री. सुधीर रमण वडनेरे, श्री ज्वेलर्स, बाजारपेठ, संगमनेर यांना पुढील दोन वर्षाकरीता (दि.०१/१०/२०२० ते दि. ३०/०९/२०२२ पर्यंत) प्रत्येकी, प्रतिमाह एकत्रित मानधन रु. ५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच हाजार मात्र) देणेस व उपरोक्त नमुद अटी-शर्तीस अनुसरुन, तीनही सराफांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामी, सदरचा प्रस्ताव मा. तदर्भ समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीचे वेळी हुंडीत निघालेले, तसेच इतर वेळी साईभक्तांनी देणगी स्वरुपात प्राप्त होणारे सोने चांदी वस्तुंची कस लावुन तपासणी करुन मुल्यांकन करणेकामी १) श्री. गणेश दत्तात्रय नागरे, व्दारकामाई ज्वेलर्स, गुरुस्थान मंदिर रोड, शिर्डी. २) श्री. बाळासाहेब माधवराव नागरे, लक्ष्मी अलंकार, पालखी रोड, शिर्डी. ३) श्री. सुधीर रमण वडनेरे, श्री ज्वेलर्स, बाजारपेठ, संगमनेर यांना पुढील दोन वर्षाकरीता (दि.०१/१०/२०२० ते दि.३०/०९/२०२२ पर्यंत) प्रत्येकी प्रतिमाह एकत्रित मानधन रु.५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच हजार मात्र) देण्यास तसेच उपरोक्त नमुद अटी-शर्तीस अनुसरुन तीनही सराफांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.२४** **श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील ए.सी.यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सर्व ऑपरेशन थिएटर्स व आय.सी.सी.यु. मध्ये सेंट्रल ए.सी. प्लांटच्या एकुण 13 यंत्रणा तसेच स्पिलट टाईप ए.सी. एकूण 71 नग, मॉरच्युरी 2 नग, मेडीसीन कोल्ड स्टोअर 1 नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकूण 26 नग कार्यान्वित आहे. त्याचप्रमाणे श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये स्प्लिट टाईप ए.सी. एकूण 38 नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकूण 24 नग कार्यान्वित आहे. ऑपरेशन शिएटरमध्ये ऑपरेशन करतेवेळी व नंतर आय.सी.यु. वॉर्डमध्ये ठेवण्यात येते. काही वेळा या यंत्रणेमधील काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावी लागते. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुस-या कंपनीच्या स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे हे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यत पर्यायाने ए.सी. यंत्रणा काही वेळा बंद ठेवावी लागते अथवा कमी क्षमतेवर कार्यान्वित ठेवावी लागते. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर तो बसवून ए.सी. यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केली जाते किंवा एखाद्या वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते. यासाठी प्रत्येक वर्षी सदर यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणेकामी वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देण्यात येते.

मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक–०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२३७ (६५) तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक–०९/०९/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी. यंत्रणेचे सन २०१९-२०२० याएक वर्षाचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मे.हेरंब एंटरप्राईजेस, जळगांव यांना दिनांक ०१/१०/२०१९ ते दि. ३०/०९/२०२० याकालावधी करीता रुपये ७,६४,६००/-+GST मात्रचे रकमेस कार्यादेश देण्यात आला आहे. यासर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३०/०९/२०२० रोजी संपत आहे. ए.सी. यंत्रणा व्यवस्थित कार्यरत राहणेकरीता पुढील एक वर्षाकरीता CAMC देणे आवश्यक आहे.

श्री साईबाबा संस्थान मधील श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी यंत्रणेचे पुढील एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी मागील वर्षीचे प्राप्त दरानुसार अंदाजे अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.नं. | तपशील | २०१९-२० या वर्षातील कार्यादेशातील रक्कम रुपये | सन २०२०-२०२१ वर्षाकरीता अपेक्षित खर्च रुपये (मागिल एकूण खर्चात ५% रक्कम वाढ गृहीत धरुन) |
|---|---|---|---|
| ०१ | CAMC of Central AHU with condensing units & other air conditioning units | ७,६४,६००/-+ GST | ८,०२,८३०/-+ GST |

| | | | |
|---|---|---|---|
| | insatalled in ShriSaibaba Hospital &ShriSainath Hospital | | |

उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी यंत्रणेचे सन२०२०-२०२१ यावर्षा करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये–८,०२,८३०/-+GST (अक्षरी रक्कम रुपये– आठ लाख, दोन हजार, आठशे, तीस+GST) मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाचे मंजूर अंदाजपत्रकामध्ये तरतूद केलेल्या *'मशीनरी दुरुस्ती व देखाभाल खर्च'* या शिर्षाखालील रक्कमेतून करता येईल. याकामी महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुनकंत्राटदारांकडून ई-निविदा मागवाव्या लागतील. या कार्यवाहीस मा. तदर्थ (Ad-hoc) समितीची मान्यता घ्यावी लागेल.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी यंत्रणेचे एक वर्षाचे करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या रक्कम रुपये–८,०२,८३०/-+ GST (अक्षरी रक्कम रुपये–आठ लाख, दोन हजार, आठशे,तीस+GST) अपेक्षित खर्चास मान्यता घेणेकामी मा. तदर्थ (Ad- hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील ए.सी यंत्रणेचे एक वर्षाचे करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी अभ्यासपुर्वक सुधारीत प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२५** **मंदिर व परिसर, व्दारावती भक्तनिवास आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत**.

**प्रस्ताव-** मंदिर व परिसर, व्दारावती तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान येथे श्री साईभक्तांच्या सोयीकरीता ए.सी. व फ्रिज बसवून कार्यरत आहेत. सदर यत्रणा सतत कार्यरत असणे आवश्यक आहे. यदा कदाचित यंत्रणा बंद पडल्यास, ती तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. यासाठी या यंत्रणेमधील काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावे लागतात. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुस-या कंपनीच्या स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे हे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यत पर्यायाने ए.सी. यंत्रणा काही वेळा बंद ठेवावी लागते अथवा कमी क्षमतेवर कार्यान्वित ठेवावी लागते. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर तो बसवून ए.सी. यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केली जाते किंवा एखाद्या वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते. मेकॅनिकल विभागाकडे २ कायम व ६ कंत्राटी ए.सी मेकॅनिक आहेत. कायम कर्मचा-यां पैकी एक कर्मचारी संस्थानचे सर्व ए.सी यंत्रणा दैंनदीन काम सुपरव्हीजनचे काम करतो व उर्वरीत कर्मचा-यांन पैकी एक कर्मचारी साईआश्रम भक्तनिवास येथील VRV ए.सी यंत्रणा ऑपरेटींग करणे, तीन कर्मचारी साईबाबा हॉस्पीटल येथील तीन सेंट्रल ए.सी प्लॅन्ट ऑपरेटींग (३ शिफ्ट मध्ये प्रत्येकी १) काम करतात. दर्शनरांग मधील सेंट्रल ए.सी यंत्रणा दर्शन रांगेतील ५८ नग जम्बो एअर कुलर यांचे देखभाल दुरूस्तीची कामे विभागांर्तगत होत असलेने सदरील कामाकरीता २ कर्मचारी आवश्यक असतात. त्यामुळे इतर कामाकरीता मनुष्यबळ अपुरे असलेनेसाईभक्तांना देण्यात येणा-या सेवा सुविधांमध्ये व्यत्यय निर्माण होतो. याकरीता प्रत्येक वर्षी तातडीने जागेवरच दुरुस्ती करणेकामी सदर ठिकाणातील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे CAMC देण्यात येते. सध्या संस्थानकडे पुढील प्रकारच्या ए.सी. यंत्रणा कार्यरत आहेत :

| **अ.नं.** | **ठिकाण** | **यंत्रणेचा तशील** | **संख्या** |
|---|---|---|---|
| १. | मंदिर व परिसर | ए.सी. - १ टन | २५ |
| | | ए.सी. - १.५ टन | ४३ |
| | | ए.सी. - २ टन | ६९ |
| | | ए.सी. - ५ टन | ०३ |
| | | बॉटल कुलर आणि फ्रिज | १६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ए.सी. - १.५ टन | ३२ |
| २. | द्वारावती भक्तनिवास | ए.सी. - २ टन | ४८ |
| ३. | साईबाबा भक्तनिवास व परिसर | ए.सी. - १ टन - ७ | ०७ |
| | | ए.सी. - १.५ टन | १७ |
| | | ए.सी. - २ टन | ११ |
| | | बॉटल कुलर आणि फ्रिज | ०७ |
| ४. | साई प्रसादालय व्ही.आय.पी. भोजन हॉल | ए.सी. - १ टन | ०१ |
| | | ए.सी. - १.५ टन | ०५ |
| | | ए.सी. - २ टन | ०९ |
| | | डिप फ्रिज | १० |
| | | कोल्ड स्टोरेज - ५ टन | ०१ |
| | | कोल्ड स्टोरेज - ३ टन | ०१ |
| | | **एकूण :** | **३०५** |

उपरोक्त प्रमाणे श्री साई भक्तांकरीता ए.सी. यंत्रणा संस्थानमध्ये कार्यरत आहे. मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८७ (३०) अन्वये मंदिर व परिसर आणि श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन २०१९ -२०२० याएक वर्षाचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे.हेरंब एंटरप्राईजेस, जळगांव यांना दिनांक ०१/१०/२०१९ ते ३०/०९/२०२० याएक वर्षाचे कालावधी करीता रुपये–३,४७,४०८/-+GST मात्रचे रकमेस कार्यादेश देण्यात आला आहे. यासर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३०/०९/२०२० रोजी संपत आहे. ए.सी. यंत्रणा व्यवस्थित कार्यरत राहणेकरीता पुढील एक वर्षाकरीता CAMC देणे आवश्यक आहे.

व्दारावती भक्तनिवास इमारतीतील ८० नग ए.सी. माहे एप्रिल २०१९ मध्ये बायबॅक देवुन त्या ठिकाणी नवीन ए.सी. बसविणेत आलेले असलेने मागील वर्षी देणेत आलेल्या CAMC कार्यादेश मध्ये सदर ८० नग एसीचा समावेश नव्हता. सदर एसीचा वॉरंटी कालावधी संपलेला असलेने त्याचीही CAMC द्यावी लागेल. त्यामुळे द्वारावती इमारतीतील एसी व श्री साईबाबा संस्थानमधील मंदिर व परिसर आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे पुढील एकवर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मागील वर्षीचे प्राप्त दरानुसार अंदाजे अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.नं. | तपशील | २०१९ -२०२० या वर्षातील कार्यादेशातील दर रुपये (GSTवगळुन) | २०१९-२०२१ या वर्षातील अपेक्षित खर्च रुपये (मागिल वर्षाचा खर्च+५%) (GST वगळुन) |
|---|---|---|---|
| ०१ | CAMC of Air Conditioning Units Installed Temple & Campus, Saibaba Bhaktaniwas sthan | ३,४७,४०८/- | ३,६४,७७८ /- (द्वारावती भक्तनिवास स्थान येथील ८० नग एसी करीता अपेक्षीत खर्च रु.१,३१,०००/-)<br>**एकुण रक्कम रु. ४,९५,८१८/-** |

उपरोक्तप्रमाणे मंदिर व परिसर आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन २०१९-२०२० यावर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामीअंदाजे रक्कम रुपये- ४,९५,८१८/- (अक्षरी रक्कम रुपये– चार लाख पंच्यान्नो हजार आठशे अठरा )+ GSTमात्र खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाचे अंदाजपत्रकामध्ये तरतूद केलेल्या *'मशीनरी दुरुस्ती व देखाभाल खर्च'* या शिर्षाखालील रकमेतून करता येईल व महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या तसेच संस्थान संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवून CAMC देता येईल. या कार्यवाहीस मा. तदर्थ (Ad- hoc) समितीची मान्यता घ्यावी लागेल.

**प्रस्ताव:-** तरी उपरोक्तप्रमाणे मंदिर व परिसर आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचेएक वर्षाचे कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित रक्कम रुपये-४,९५,८१८/- (अक्षरी रक्कम रुपये– चार लाख पंच्यान्नो

हजार आठशे अठरा )+GST मात्र खर्चास मान्यता घेणेकामी मा.तदर्थ (Ad- hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर व परिसर आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचेएक वर्षाचे कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी अभ्यासपुर्वक सुधारीत प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२६** **श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथील असणाऱ्या साईटेक प्रोजक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी.यंत्रणेचे सन २०२०-२०२१ याएक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्त निवास येथे असणा-या सर्व विभाग संगणकीकृत करून साईटेक प्राजेक्ट तयार कण्यात येऊन या प्रोजेक्टचे डाटा सेंटर हे श्री साई प्रसादालयातील पहिला माळा या ठिकाणी तयार करण्यात आलेले आहे. या ठिकाणी अत्याधुनिक व संवेदनशील मशीनरी (Main Server, Data Storage, Racks, Tape Library, Power Edge Server & etc.) बसविण्यात आलेले असल्याने येथील मशीनरी विशिष्ठ व स्थिर तापमानाला थंड ठेवाव्या लागतात. या मशीनरी विशिष्ट व स्थिर तापमानाला थंड ठेवण्याकरीता स्पेशल टाईपचे प्रसिजन टाईप डाटा सेंटरकरीता व युपीएससाठी एकूण ४ नग डक्टेबल सेंट्रल ए.सी. प्लॅन्ट यंत्रणा मे. ब्ल्युस्टार कंपनीकडून बसविण्यात आलली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६/०६/२०१९रोजीचे सभेतील निर्णय क्र. २९० (३३) अन्वये श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्तनिवास येथे असणा-या साईटेक प्राजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए. सी. यंत्रणेचे सन २०१९ – २०२० या एक वर्षाचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे. हेरंब एंटरप्राईजेस, जळगाव यांना दिनांक ०१/०७/२०१९ ते ३०/०६/२०२० या कालावधीकरीता रुपये ३,२७,०००/- मात्रचे रकमेस कार्यादेश देण्यात आला आहे. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३०/०६/२०२० रोजी संपत आहे. ए.सी यंत्रणा व्यवस्थित कार्यरत राहणेकरीता पुढील एक वर्षाकरीता CAMC देणे आवश्यक आहे.

श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्त निवास येथील ए.सी यंत्रणेचे पुढील एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह् सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मागील वर्षीचे प्राप्त दरानुसार अंदाजे अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ. नं. | तपशील | सन २०१९-२०२० या वर्षातील कार्यादेशातील रक्कम रुपये | पुढील वर्षाकरीता अपेक्षित खर्च रु. (मागिल एकूण खर्चात ५% रक्कम वाढ गृहीत धरुन) |
|---|---|---|---|
| ०१ | Comprehensive Annual Maintenance Contract of Precision Type A.C. & other Split type A.C. Installed at Saitech Data Centre | 3,27,000/- | 343,350/- |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्त निवास साईटेक डाटा सेंटर येथील ए.सी. यंत्रणेचे सन २०२० - २०२१या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये - ३,४३,३५०/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाचे मंजूर अंदाजपत्रका- मध्ये तरतूद केलेल्या *'मशीनरी दुरुस्ती व देखाभाल खर्च'* या शिर्षाखालील रक्कमेतून करता येईल. याकामी महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवाव्या लागतील.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्त निवास साईटेक डाटा सेंटर येथील ए.सी. यंत्रणेचे एक वर्षाचे करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्त निवास साईटेक डाटा सेंटर येथील ए. सी. यंत्रणेचे एक वर्षाचे करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी अभ्यासपुर्वक सुधारीत प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२७** **श्री साई प्रसादालयाकरीता वायुवीजन यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालय येथील मुख्य किचन, बुंदीकिचन, लाडूकिचन, पुरी किचन तसेच चपाती किचन येथील कर्मचाऱ्यांना उन्हाळ्यात त्याठिकाणी काम करणे सुसह्य व्हावे म्हणून तापमान सुस्थितीत ठेवणेसाठी बाहेरुन गार हवेचा झोत सोडून तापमान नियंत्रणात ठेवणे तसेच हवेतील आर्द्रता नियंत्रणात ठेवणे जेणेकरुन त्या-त्या किचन मध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ नये. शिवाय किचन मधील जळालेले तेलाचे बाष्प् आणि इतर घाण एक्झॉस्ट व्दारे बाहेर जावी याकरीता ८ नग डक्टेबल वायुविजन यंत्रणा व १० नग सेंट्री फ्युगल डक्टेबल एक्झॉस्ट यंत्रणा डिसेंबर,२००८ पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

सदरची वायुविजन यंत्रणा सतत कार्यान्वित असते. सततच्या वापरामुळे वायुविजन यंत्रणेत बिघाड झाल्यास तेथील किचनमध्ये तापमान वाढून आर्द्रता कमी होऊन काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना श्वसनाचा त्रास होऊ शकतो. प्रसंगी सदरचा कर्मचारी बेशुध्द सुध्दा पडू शकतो. त्याकरीता वायुविजन यंत्रणा तातडीने दुरुस्त करुन चालू करणे गरजेचे असते. अशा वेळेस वायुविजन यंत्रणा दुरुस्ती करीता लागणारे स्पेअर पार्ट त्वरीत उपलब्धअसणे गरजेचे आहे. जर स्पेअर्स उपलब्ध नसतील तर वायुविजन यंत्रणेचे दुरुस्ती कामामध्ये अडचण निर्माण होते व कर्मचाऱ्यांच्या प्रकृतीला त्रास होऊन कामकाजात खंड पडू शकतो.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक–२६/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४०४ अन्वये श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे सन २०१९-२०२० याएक वर्षाचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे.कैलास फेब्रीकेशन वर्क, मुंबई यांना दिनांक ०१/०८/२०१९ ते ३१/०७/२०२० याकालावधी करीता रुपये-३,४९,२००/-+GST मात्रचे रकमेस कार्यादेश देण्यात आला आहे. यासर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३१/०७/२०२० रोजी संपत आहे. वायुवीजन यंत्रणा व्यवस्थित कार्यरत राहणेकरीता पुढील एक वर्षाकरीता CAMC देणे आवश्यक आहे.

श्री साईबाबा संस्थान मधील श्री साई प्रसादालयातील वायुवीजन यंत्रणेचे पुढील एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मागील वर्षीचे प्राप्त दरानुसार अंदाजे अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ. नं. | तपशील | २०१९-२०या वर्षातील कार्यादेशातील दर रुपये | २०२०-२०२१या वर्षातील अपेक्षित खर्च रुपये ( मागिल वर्षाचा खर्च+५%) |
|---|---|---|---|
| ०१ | AMC of Air Ventilation System & Exhaust System Installed in Shri Sai Prasadalaya | ३,४९,२००/- + GST | ३,६६,६६०/-+ GST |

उपरोक्त प्रमाणे श्री साई प्रसादालयातील वायुवीजन यंत्रणेचे सन २०२०– २०२१ यावर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये-३६६,६६०/-+GST (अक्षरी रक्कम रुपये–तीन लाख, सहास्ष्ट हजार, सहाशे साठ+GST ) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाचे अंदाजपत्रक २०२०-२०२१ मध्ये तरतूद केलेल्या *'मशीनरी दुरुस्ती व देखाभाल खर्च'* या शिर्षाखालील रकमेतून करता येईल व महाराष्ट्र शासनाचे www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवून CAMC देता येईल. याकामी मा.तदर्थ समितीचे सभेमध्ये मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे एक वर्षाचे कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीसकॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या रक्कम रु. ३,६६,६६०/- + GST ( अक्षरी रक्कम रुपये तीन लाख सहासष्ट हजार सहाशे साठ + GST) अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. तदर्थ (Ad- hoc)समितीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे एक वर्षाचे कालावधी करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (CAMC) देणेकामी ई-निविदा मागविणेसाठी अभ्यासपुर्वक सुधारीत प्रस्ताव मा.तदर्थ समिती सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२८** **साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे पाणी वाटप काम करत असलेले २८ कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन खर्चाचे मान्यतेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद - २१(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. या अधिनियम व तरतुदी नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा करण्यात येते.

प्रस्तावीक– दि.०९/०६/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे साईभक्तांना पिण्याचे पाणी वाटपासाठी कार्यरत असलेले २८ आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी यांचे खर्चा बाबत प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.३३७ अन्वये सविस्तर चर्चा होऊन दि.१७ मार्च २०२० रोजी मंदिर बंद होण्यापुर्वी कधीपासून पाणी वाटपाचे काम करत आहे, किती शिफ्ट मध्ये पाणी वाटप केले, सदर पाणीवाटप कर्मचारी यांना कधी पासून वेतन देण्यात आलेले नाही. याबाबतच्या माहितीसह सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले. त्यास अनुसरुन सविस्तर फेर प्रस्ताव खालील प्रमाणे -

<table>
<tr><th>अ.नं.</th><th>झालेला निर्णय</th><th>सविस्तर अहवाल</th></tr>
<tr><td>०१</td><td>दि.१७ मार्च २०२० रोजी मंदिर बंद होण्यापुर्वी कधीपासून पाणी वाटपाचे काम करत आहे,</td><td>१. दि.११/१०/२०१६ रोजी संस्थानचे मा.अध्यक्ष महोदय श्री हावरे साहेब यांनी मंदिर परिसर व दर्शनलाईन मध्ये राऊंड घेऊन पाहणी केली असता, मदिर परिसर व दर्शनलाईन मध्ये साईभक्तांसाठी पिण्याचे पाणी वाटप व्यवस्था सुरु करणेच्या तत्कालीन वरिष्ठ अधिका-यांना सुचना दिलेल्या होत्या.<br>२. त्याअनुषंगाने सदर ठिकाणी पाणी वाटपाकरीता कामगार विभागाने जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/२८८१/२०१६ दि.०३/११/२०१६ व त्यानंतरचे इतर आदेशान्वये प्रसादालयाकडील २८ कंत्राटी कर्मचारी साईप्रसाद निवासस्थान विभागास ठेकेदारामार्फत पुरविण्यात आले होते.<br>३. सदर कर्मचा-यांकडून मंदिर परिसर व दर्शनलाईन मध्ये दि.१६/११/२०१६ पासून दि.१७/०३/२०२० पर्यंत खालील पॉईंटवर पाणीवाटपाचे काम करणेत आले आहे.</td></tr>
<tr><td>०२</td><td>किती शिफ्ट मध्ये पाणी वाटप केले,</td><td>मंदिर परिसर व दर्शनलाईन मध्ये खालील पॉईंटवर दोन शिफ्ट मध्ये पाणीवाटप केले आहे.
<table>
<tr><th>अ.नं.</th><th>पॉईंट</th><th>कर्मचारी संख्या व डयुटी वेळ ०६/१४</th><th>कर्मचारी संख्या व डयुटी वेळ १४/२२</th><th>एकूण</th></tr>
<tr><td>०१</td><td>शांतीनिवास तळ मजला हॉल स्कॅनर जवळ</td><td>०१</td><td>०१</td><td>०२</td></tr>
<tr><td>०२</td><td>शांतीनिवास तळ मजला हॉल जनरल बाथरुम जवळ</td><td>०१</td><td>०१</td><td>०२</td></tr>
<tr><td>०३</td><td>भक्तनिवास तळमजला हॉल जनरल बाथरुम समोर</td><td>०१</td><td>०१</td><td>०२</td></tr>
<tr><td>०४</td><td>शांतीनिवास पहिला मजला जनरल बाथरुम समोर</td><td>०१</td><td>०१</td><td>०२</td></tr>
<tr><td>०५</td><td>भक्तनिवास पहिला मजला जनरल बाथरुम समोर</td><td>०१</td><td>०१</td><td>०२</td></tr>
<tr><td>०६</td><td>व्ही.आय.पी.गेट नं.०२ बाहेरुन</td><td>०१</td><td>०१</td><td>०२</td></tr>
</table></td></tr>
</table>

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ०७ | अब्दुलबाबा समाधी जवळ | ०१ | ०१ | ०२ |
| | | ०८ | बुकस्टॉल शेजारी | ०१ | ०१ | ०२ |
| | | ०९ | १६ गुंठे परिसर | ०१ | ०१ | ०२ |
| | | १० | जुने प्रसादालय बायोमॅट्रीक काऊंटर जवळ | ०१ | ०१ | ०२ |
| | | | पाणी वाटपाचे एकूण पॉईंट | १० | १० | **२०** |
| | | | अ.नं.०७ व ०८ या पॉईटवर पाणी वाहणे | ०२ | ०२ | ०४ |
| | | | अ.नं.०९ व १० या पॉईटवर पाणी वाहणे | ०२ | ०२ | ०४ |
| | | | एकूण - | १४ | १४ | **२८** |
| | | | आठवडा सुट्टी सोडविणेकामी कर्मचारी संख्या | | | **०४** |
| | | | एकूण कर्मचारी संख्या - | | | **३२** |
| ०३ | सदर पाणीवाटप कर्मचारी यांना कधी पासून वेतन देण्यात आलेले नाही. | सदर पाणीवाटप कर्मचा-यांचे दि.१५/०९/२०१९ ते दि.१७/०३/२०२० अखेर १८५ दिवसांचे वेतन आदा केलेले नाही. | | | | |

सदर कर्मचारी कामगार विभागाचे जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/१७३३/२०१९ दि.३०/१०/२०१९ चे आदेशान्वये प्रसादालय विभागाकडील ठेकेदार मे फोकस फॅसेलिटी ॲण्ड सिक्युरीटी सर्व्हिसेस, मुंबई यांचेकडे दि.१५/०९/२०१९ पासून वर्ग केले व त्यांची वेतन बीले मे फोकस फॅसेलिटी ॲण्ड सिक्युरीटी सर्व्हिसेस, मुंबई यांनी तयार करुन, प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान व प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय विभाग यांचे मार्फत लेखाशाखा विभागाकडे पुर्वीचेच प्रचलित पद्धतीने सादर करणे बाबत कळविणेत आले आहे.

सदर ठेकेदार यांनी आवक.नं.१४६२६ दि.१८/१२/२०१९ चे पत्रात प्रसादालयाच्या दराप्रमाणे (अकुशल कामगारांना प्रत्येकी दरमहा रु.१२७५०/-) हा दर श्री साईप्रसादालय हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोल ई-निवीदेतील BOQ-B व प्रसादालयाकडील कार्यादेशा नुसार कामगार खर्च (अकुशल कर्मचारी किमान वेतन, गणवेश, सानुग्रह अनुदान, ओळखपत्र, वर्कमॅन कॉम्पनसेशन व प्रा.फंडासह इत्यादि सर्व करासहीत) मंजूर दर आहे याप्रमाणे वेतन मिळणे बाबत पत्रात विनंती केली असून तसा लिखीत स्वरुपात कार्यादेश मिळणे बाबत मागणी केली आहे. त्यामुळे सदर कर्मचा-यांचे माहे नोव्हेंबर २०१९ ते १७ मार्च २०२० अखेर पगार अद्याप आदा करता आलेला नाही.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय–वरील सर्व बाबींचा विचार करता सदर २८ कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन सध्या प्रसादालयाकडील ई-निवीदा कालावधी दि.१५/०९/२०१९ ते दि.१४/०९/२०२० अखेर एक वर्ष पर्यंत असल्याने, खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल असे मत आहे.

अ) पाणीवाटप कर्मचा-यांचे दि.१५/०९/२०१९ ते दि.१७/०३/२०२० अखेर १८५ दिवसांचे वेतन आदा करणेकामी प्रस्तावात नमुद प्रसादालयाकडील सन २०१९-२० चे निवीदेतील मंजुर दरानुसार सदर २८ कंत्राटी कर्मचा-यांसाठीचा मासिक वेतन खर्च (एका कर्मचा-याकरीता दरमहा रु.१२,७५०/-) प्रमाणे २८ पाणीवाटप कर्मचा-यांसाठी दरमहा एकूण रु. ३,५७,०००/- प्रमाणे (दि.१५/०९/२०१९ ते दि.१७/०३/२०२० या कालावधीतील १८५ कामाचे हजर दिवसांसाठी) + जी.एस.टी. १८ %सह एकूण खर्च रक्कम रु.२५,९७,७७०/- मात्र (अक्षरी – पंचवीस लाख, सत्याण्णव हजार, सातशे सत्तर रुपये मात्र) देय असून सदर खर्च साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील कंत्राटी कर्मचारी सन २०२०-२१ चे मंजुर अंदाजपत्रकातून करता येईल.

ब) पाणीवाटपाची व्यवस्था यापुढे साईसेवकांकडून करुन घेता येईल.

**क)** पाणीवाटपासाठी कार्यरत असलेले एकूण ३२ कंत्राटी कर्मचारी पुर्ववत प्रसादालय विभागाकडे वर्ग करता येतील.

तरी उपरोक्त अ, ब व क प्रमाणे कार्यवाही करणेस व सदर खर्चाला मान्यता मिळणेकामी सदरचा फेर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिति सभेपुढे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.३८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे पाणी वाटप काम करत असलेले २८ कंत्राटी कर्मचाऱ्यांनी दि.१५/०९/२०१९ ते दि.१७/०३/२०२० या कालावधीत केलेल्या कामाचे वेतन प्रसादालयाकडील सन २०१९-२० चे निविदेतील मंजुर दरानुसार विहीत पध्दतीने त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच प्रस्तावातील 'ब'पाणी वाटपाची व्यवस्था यापुढे साईसेवकांकडून करुन घेता येईल.व 'क' पाणीवाटपासाठी कार्यरत असलेले एकूण ३२ कंत्राटी कर्मचारी पुर्ववत प्रसादालय विभागाकडे वर्ग करता येतील, हे मुद्दे नामंजुर करण्यात आले.**

**(कार्यवाही-साईप्रसाद निवासस्थान)**

---

**विषय नं.२९** **सन २०२०-२०२१ साठी दि.०१.१०.२०२० ते दि.३०.०९.२०२१ या एक वर्ष कालावधीसाठी साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंन्ट्रोल करणे कामी येणाऱ्या खर्चास तसेच जाहिरात व ई-निविदेचा मसुदा मान्यतेसाठी व दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात देऊन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियमाचे कलम-(१)१४/२ घ-भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ती काम किंवा उपाययोजना हाती घेणे. (२)पोट कलम (१)(ख)भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृह बांधणे व त्यांची देखभाल करणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव:- निरंक

प्रस्ताविक:- श्रींच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे निवासासाठी साईआश्रम भक्तनिवास या विभागाकडे १२ इमारती असुन, एका इमारतीमध्ये १२८ रुम याप्रमाणे एकुण १२ इमारती मध्ये १५३६ रुम्स आहेत.

तसेच साईधर्मशाळा विभागात एकुण ४ इमारती आहेत. एका इमारतीत ३२ हॉल प्रमाणे एकुण ४ इमारतीमध्ये १२८ हॉल असुन, सदरील रुम/हॉलमध्ये सहली, ग्रुपने येणारे साईभक्त,अंध/अपंग इत्यादींची निवास व्यवस्था करण्यात येत आहे.

संदर्भ क्र.०१ नुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०४ (०६) नुसार- सन २०१९ -२० या आर्थिक वर्षासाठी (दि.०१/१०/२०१९ ते दि. ३०/०९/२०२० ) करीता साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणे कामी मे. पेस्ट कंट्रोल एम. वॉल्श, मुंबई यांचे रु. १.५० मात्र प्रति चौ.फुट अंतिम दर स्विकारणेत येऊन सहा फवारणी कामी रु.६,८२,७०२/-(आठ सहा लाख ब्येएंशी हजार सातशे दोन मात्र) खर्चास मान्यता देण्यात आली होती.

त्यानुसार मे. पेस्ट कंट्रोल एम. वॉल्श, मुंबई यांना विभागासाठी जा.नं.एसएसएस/वशी-साई धर्मशाळा/ १९०१/२०१९ दि.१७/०८/२०१९ अन्वये दि.०१/१०/२०१९ ते दि. ३०/०९/२०२० या एक वर्ष कालावधीत दोन्ही निवासस्थानामध्ये सहा औषध फवारणी करणे कामी कार्यादेश देण्यात आलेला आहे. कोरोनो विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी साई आश्रम भक्तनिवासस्थान व साई धर्मशाळा विभागातील निवासव्यवस्था दि.१७/०३/२०२० पासुन पुढील आदेश होईपर्यंत बंद करण्यात आली आहे. त्यामुळे दोन्ही विभागात तीन औषध फवारणी करण्यात आल्या असुन तीन औषध फवारणी बाकी आहे. तसेच दि.०५/०४/२०२० पासुन साई धर्मशाळा विभागातील ०४ (A,B,E,F) इमारतीमध्ये कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी रुग्णांची संस्थानत्मक विलगीकरण व कोव्हीड सेंटरसाठी वापरण्यात देण्यात आलेली आहे. पेस्ट कंट्रोल एम वॉल्शे, मुंबई यांना देण्यात आलेल्या कार्यदेशाची मुदत ३०/०९/२०२० अखेर सपुंष्ठात येत आहे.

साईभक्तांना ढेकुण,डास,झुरळे इ.चा त्रास होऊ नये याकरीता संस्थानचे निवासस्थानामध्ये वेळोवेळी औषध फवारणी होणे गरजेचे आहे. साईआश्रम भक्तनिवास आणि साईधर्मशाळा या निवासस्थानामध्ये किटकनाशक औषध फवारणी तातडीने पुर्ण करुन साईभक्तांना सेवा पुरविणे आवश्यक आहे.

साई धर्मशाळा विभागाचे सन २०१८-१९ मध्ये एकुण ६ इमारती मधील १९२ हॉलसाठी एकुण क्षेत्रफळ १,५७,९८२.३२ चौ.फुटासाठी पेस्ट कंट्रोलचे काम देण्यात आले होते. परंतु आता या विभागाकडील २ इमारती हया कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयास विद्यार्थांचे शैक्षणीक कामासाठी वापरण्यास देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे २ इमारतीचे क्षेत्रफळ ५२,५८३.६८ चौ.फुट कमी करण्यात येवून उर्वरीत ४ इमारतीचे व आर इमारतीचे (प्रशासकीय इमारत) क्षेत्रफळ मिळुन १,०५,३९९.६८ चौ.फुटासाठी येणा-या खर्चास मान्यता घ्यावी लागेल.

सन २०२०-२१ सालासाठी दि.०१/१०/२०२० ते दि.३०/०९/२०२१ अखेर एक वर्ष कालावधीसाठी दोन्ही विभागांची नव्याने एकत्रित पेस्ट कंट्रोल करणे कामी येणा-या अंदाजे खर्चास मा. तदर्थ (Ad-hoc) समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेकामी सादर करता येईल.

| अ. नं | विभागाचे नांव | मागील वर्षाचे सहा फवारणीसाठीचा खर्च | १०% वाढ | होणारी रक्कम | १८ % जीएसटी | एक वर्षात सहा फवारणी साठी अंदाजित एकूण रक्कम (पुर्णांकित) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | साईआश्रम भक्तनिवास | ५,२४,६०२/- | ५२,४६०/- | ५,७७,०६२/- | १,०३,८७१/- | ६,८०,९३३/- |
| २. | साई धर्मशाळा | १,५८,०९९/- | १५,८१०/- | १,७३,९०९/- | ३१,३०४/- | २,०५,२१३/- |
| | **एकूण रक्कम** | **६,८२,७०१/-** | **६८,२७०/-** | **७,५०,९७१/-** | **१,३५,१७५/-** | **८,८६,१४६/-** |

साई आश्रम भक्तनिवासस्थान विभागासाठी अंदाजे खर्च रु.५,७७,०६२/-+१,०३,८७१/-(18% GST)=६,८०,९३३/- तसेच साई धर्मशाळा विभागासाठी अंदाजे खर्च रु. १,७३,९०९/- + ३१,३०४/- (18% GST)=२,०५,२१३/- तसेच दोन्ही विभागा करिता एकत्रित अंदाजे खर्च मुळ रक्कम रु.**८,८६,१४६**/-+**१,५९,५०६**/-(18% GST)= **रु.१०,४५,६५२/-**(अक्षरी रु.दहा लाख पच्चेंचाळीस हजार सहाशे बाव्वन मात्र) खर्चास मान्यता घ्यावी लागणार आहे.

**मागणी:-** सन २०२०-२१ साठी दि.०१/१०/२०२० ते दि.३०/०९/२०२१ या एक वर्ष कालावधीसाठी साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणे कामी येणा-या खर्चास तसेच जाहिरात व ई - निविदेचा मसुदा मान्यतेसाठी व दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात देऊन ई- निविदा मागविणेस मान्यता मिळणे बाबत.

**संस्थान अधिनियम/ठराव नुसार अनुमान:-** मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे मान्यतेनुसार कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा विभागातील निवासी साईभक्तांना ढेकुण,डास झुरळांचा तसेच इतर किटकांचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी औषध फवारणी कामी.

१) साईआश्रम भक्तनिवास विभागासाठी १२ इमारतीसाठी एकुण क्षेत्रफळ ३,४९,७३५ चौ.फुटास तसेच साई धर्मशाळा विभागातील ०४ इमारतीसाठी एकुण क्षेत्रफळ १,०५,३९९.६८ चौ.फुटास पेस्ट कंट्रोल करणेस.

२) साई आश्रम भक्तनिवासस्थान व साई धर्मशाळा विभागासाठी एकत्रित अंदाजे खर्च मुळ रु.**८,८६,१४६**/-+**१,५९,५०६**/-(18%GST)= **रु.१०,४५,६५२/-** ( अक्षरी रु. दहा लाख पच्चेंचाळीस हजार सहाशे पहासष्ठ मात्र)
खर्चास मान्यता मिळणेस.

३) दोन्ही विभागाकडील औषध फवारणी करणेकामी एकत्रित जाहिरात मसुदा व ई- निविदा मसुदा मान्यतेसाठी.

४) सन २०२०-२१ साठी दि. ०१/१०/२०२० ते दि. ३०/०९/२०२१ या एक वर्ष कालावधीसाठी किटक नाषक औषध फवारणी करुन घेणेकामी जनसंपर्क विभागामार्फत शासकीय दराने एकत्रित ई-निविदा जाहिरात मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद , नागपुर या शहरासह अहमदनगर जिल्हातील दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेस व त्याकामी येणा-या खर्चास.

५) ईडीपी मॅनेजर यांचेमार्फत महाराष्ट्र राज्याच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सुचना जाहिरात व त्या संदर्भातील Document Upload करणेस.

६) माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संकेतस्थळावर ई-निविदा सुचना जाहिरात प्रसिध्द करणेस.

तरी उपरोक्त १, २, ३, ४, ५ व ६ प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१.१०.२०२० ते दि.३०.०९.२०२१ या एक वर्ष कालावधीसाठी साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंन्ट्रोल करणेकामी मागील वर्षीच्या खर्चाची रक्कम रु.६,८२,७०१/-+G.S.T. ग्राहय धरुन विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-साई धर्मशाळा)**

---

**विषय नं.३०** **सन २०२०-२०२१ करीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट,उशीकव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुऊन ड्रायर करणे, सोलापुर चादर धुणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणेकामी वर्तमानपत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत**.

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१(१) (ग) "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) " भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

प्रस्तावनाः- श्रींचेदर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश विदेशातून येणा-या साईभक्तांचेनिवासाचे सोयीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी मार्फत साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या विभागात साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. या विभागातील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागातील बेडशीट, उशी कव्हर धूणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणेचे कामे आऊटसोर्स लॉण्ड्री ठेकेदाराकडून करुन घेतले जातात.

सन २०१९-२० मधील दि.०१/०९/२०१९ ते दि.३१/०८/२०२० अखेर एक वर्षासाठी साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागातील लॉन्ड्री कामाचा मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०७/२०१९ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०१ निर्णय क्र.४०४ (७) अन्वये गुरुकृपा लॉण्ड्री, शिर्डी यांना जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/१८८८/२०१९ दि.१६/०८/२०१९ चा कार्यादेश नुसार खालील कोष्टकात दर्शविले प्रमाणे कार्यादेश देण्यात आलेला आहे.

अ) **संस्थानचे कपडे धुणे इस्त्री करणे कामासाठीचे दर.**

| **अ.नं** | **कपड्यांचा तपशील** | **मुळ प्रती नग दर रुपये पैसे** | **GST 18% रुपये पैसे** | **प्रती नग दर रुपये (सर्वकरासह)** |
|---|---|---|---|---|
| १ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | ३.७३ | ०.६७ | ४.४० |
| २ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | १.६९ | ०.३१ | २.०० |
| ३ | टॉवेल धुवून ड्रायर करणे | ३.२२ | ०.५८ | ३.८० |
| ४ | सोलापुर चादर धुणे | ८.४७ | १.५३ | १०.०० |
| ५ | चादर धुणे | ६.९९ | १.२६ | ८.२५ |
| ६ | गादीच्या खोळी धुणे | ६.९९ | १.२६ | ८.२५ |

ब) **साईभक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करणे.**

| **अ.नं** | **कपड्यांचा तपशील** | **मुळ प्रती नग दर रुपये पैसे** | **GST 18% रुपये पैसे** | **प्रती नग दर रु. (सर्व करांसह)** |
|---|---|---|---|---|
| | **पुरषांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | २०.३४ | ३.६६ | २४ |
| २ | शर्ट /टी-शर्ट | ११.८६ | २.१४ | १४ |
| ३ | पॅन्ट / जिन्स पॅन्ट | ११.८६ | २.१४ | १४ |
| ४ | जाकेट/स्वेटर | ९.३२ | १.६८ | ११ |
| | **पुरुषांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | १०.१७ | १.८३ | १२ |
| २ | शर्ट /टी-शर्ट | ५.०८ | ०.९२ | ६ |
| ३ | पॅन्ट / जिन्स पॅन्ट | ५.०८ | ०.९२ | ६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | जाकेट/स्वेटर | ५.०८ | **०.९२** | **६** |
| | **महिलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | |
| १ | साडी | २०.३४ | **३.६६** | **२४** |
| २ | ब्लाऊज | ५.९३ | **१.०७** | **७** |
| ३ | टी-शर्ट | ११.८६ | **२.१४** | **१४** |
| ४ | स्लॅक्स/ शॉर्ट पॅन्ट | ११.८६ | **२.१४** | **१४** |
| ५ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ११.८६ | **२.१४** | **१४** |
| ६ | नाईट सुट | २०.३४ | **३.६६** | **२४** |
| ७ | जाकेट /स्वेटर | ११.८६ | **२.१४** | **१४** |
| ८ | पेटीकोट/गाऊन | ११.८६ | **२.१४** | **१४** |
| | **महिलांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | |
| १ | साडी | ११.८६ | **२.१४** | **१४** |
| २ | ब्लाऊज | ४.२४ | **०.७६** | **५** |
| ३ | टी-शर्ट | ५.०८ | **०.९२** | **६** |
| ४ | स्लॅक्स/शॉर्ट पॅन्ट | ५.०८ | **०.९२** | **६** |
| ५ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ५.०८ | **०.९२** | **६** |
| ६ | नाईट सुट | ५.०८ | **०.९२** | **६** |
| ७ | जाकेट/स्वेटर | ५.०८ | **०.९२** | **६** |
| ८ | पेटीकोट/गाऊन | ५.०८ | **०.९२** | **६** |
| | **मुलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | ११.८६ | **२.१४** | **१४** |
| २ | शर्ट/ टी-शर्ट | ९.३२ | **१.६८** | **११** |
| ३ | पॅन्ट / जिन्स पॅन्ट | ११.८६ | **२.१४** | **१४** |
| ४ | जाकेट/ स्वेटर | ११.८६ | **२.१४** | **१४** |
| ५ | शॉर्ट पॅन्ट | ७.६३ | **१.३७** | **९** |
| | **मुलांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | ५.०८ | **०.९२** | **६** |
| २ | शर्ट/ टी-शर्ट | ५.०८ | **०.९२** | **६** |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ५.०८ | **०.९२** | **६** |
| ४ | जकेट/स्वेटर | ५.०८ | **०.९२** | **६** |
| ५ | शॉर्ट पॅन्ट | ५.०८ | **०.९२** | **६** |

प्रस्तावः-सन २०१९-२० या वर्षामध्ये साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धूणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणेचे काम करत असलेल्या लॉण्ड्री कॉन्ट्रॅक्टर गुरुकृपा लॉण्ड्री, शिर्डी यांचा कार्यादेशाचा कालावधी दि.०१/०९/२०१९ ते दि.३१/०८/२०२० अखेर असून, सदर कालावधी दि.३१/०८/२०२० रोजी संपुष्टात येणार असल्याने, साईभक्तांना देण्यात येत असलेली लॉण्ड्री सेवा सुविधामध्ये गैरसोय होऊ नये. यासाठी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी नवीन कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक करणेकामी वर्तमान पत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

त्यासाठी सन २०१९-२० मधील साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील माहे सप्टेंबर-२०१९ ते माहे-मार्च २०२० अखेर सात महिन्यांमध्ये रु.१२,१०,४५१/- एवढा खर्च झालेला आहे. माहे एप्रिल २०२० ते ऑगस्ट २०२० अखेर पाच महिन्यांमध्ये सुमारे खर्च **रु.**१०,९७,६६०/- इतका होईल. असे एकूण आर्थिक वर्षात रु.२३,०८,१११/- एवढा खर्च अपेक्षित आहे. त्याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | महिना | गुरुकृपा लॉण्ड्री शिर्डी बील रक्कम रुपये. | | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| | | साईआश्रम भक्तनिवास | साईधर्मशाळा | |
| ०१ | सप्टेंबर-२०१९ | १,७९,८९१ | १४,९५३ | १,९४,८४४ |
| ०२ | ऑक्टोंबर-२०१९ | १,६०,०८२ | १६,२९८ | १,७६,३८० |
| ०३ | नोव्हेंबर-२०१९ | १,५४,०४१ | १५,७०४ | १,६९,७४५ |
| ०४ | डिसेंबर-२०१९ | १,४६,३२८ | ७,५३६ | १,५३,८६४ |
| ०५ | जानेवारी-२०२० | १,५५,३४१ | १९,२५९ | १,७४,६०० |
| ०६ | फेब्रुवारी-२०२० | १,०६,७०९ | १४,७७७ | १,२१,४८६ |
| ०७ | मार्च- २०२० | २,०६,७८६ | १२,७४६ | २,१९,५३२ |
| | एकूण | ११,०९,१७८ | १,०१,२७३ | १२,१०,४५१ |
| | | | **एकूण झालेला खर्च** | **१२,१०,४५१** |
| या चालू वर्षातील माहे एप्रिल-२०२० ते ऑगस्ट २०२० अखेर होणारा संभाव्य खर्च (माहे मार्च-२०२० मध्ये झालेला खर्च रु.२,१९,५३२/- दरमहा खर्च गृहीत धरुन ०५ महिन्यांचा होणारा संभाव्य खर्च) | | | | १०,९७,६६०/- |
| | | | एकूण खर्च | २३,०८,१११/- |

सन २०२०-२१ या वर्षाकरीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या विभागातील लॉण्ड्री कामासाठी येणा-या अंदाजे खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| २०१९-२० मधील खर्च | सन २०२०-२१ पुढील वर्षासाठी होणारा वाढीव खर्च ५ % | अंदाजे ५ % वाढसह एकूण रक्कम रुपये | १८ % GST रक्कम रुपये | एकूण सन २०२०-२१ वर्षासाठी अंदाजे एकूण रक्कम रुपये. |
|---|---|---|---|---|
| २३,०८,१११/- | १,१५,४०६/- | २४,२३,५१७/- | ४,३६,२३३/- | २८,५९,७५०/- |

सन २०२०-२१ या वर्षाकरीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील लॉण्ड्री कामासाठी अंदाजे रक्कम रु.२८,५९,७५०/- (अक्षरी रु.आठ्ठावीस लाख एकोणसाठ हजार सातशे पन्नास मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. त्यास मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेची मान्यता मिळाल्यानंतर ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-**

१) सन २०१९-२० करीता गुरुकृपा लॉण्ड्री शिर्डी यांना साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धूणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर धुणे, गादीच्या खोळी तसेच साईभक्तांचे कपडे भक्तांकडून शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करणेचे काम देण्यात आले होते. परंतू सदर कालावधीतमध्ये साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील निवासी भक्तांनी आजपावेतो सदर ठेकेदार यांना लॉण्ड्रीकरीता कपडे दिलेले नाहीत. तसेच सदर ठेकेदारामार्फत सर्व इमारतीमध्ये व स्वागत कक्षेमध्ये लॉण्ड्री सुविधा उपलब्ध असलेबाबत व संस्थानने ठरवून दिलेल्या दरांचे बोर्ड लावण्यात आलेले आहे. तरी साईभक्त लॉण्ड्रीकरीता कपडे देत नसल्याने, सन २०२०-२१ करीता नव्याने राबविण्यात येणा-या ई-निविदेतून सदर भक्तांचे कपडे धुणे/इस्त्री करणेचे काम कमी करुन फक्त संस्थानचे कपडे बेडशीट, उशी कव्हर धूणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणे या कामाचीच ई-निविदा प्रक्रिया राबिवणेस,

२) सन २०२०-२१ मधील गुरुकृपा लॉण्ड्री शिर्डी यांचा कार्यादेशाचा कालावधी दि.०१/०९/२०१९ ते दि.३१/०८/२०२० अखेर असून, सदर कालावधी दि.३१/०८/२०२० रोजी संपुष्टात येणार असल्याने, साईभक्तांना देण्यात येत असलेली लॉण्ड्री सेवा सुविधामध्ये गैरसोय होऊ नये. यासाठी सन २०२०-२१ (दि.०१/०९/२०२० ते दि.३१/०८/२०२१) या कालावधीसाठी साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धूणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवून नवीन ठेकेदाराची नेमणूक करणेकामी जनसंपर्क कार्यालयामार्फत दैनिक वर्तमानपत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस,

३) सन २०२०-२१ साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धूणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणेकामी येणा-या सुमारे रक्कम रु.२८,५९,७५०/- (अक्षरी रु.आठ्ठावीस लाख एकोणसाठ हजार सातशे पन्नास मात्र) या अपेक्षित खर्चास,

उपरोक्त प्रस्तावीत केलेप्रमाणे०१ व ०३ बाबींस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२०-२०२१ करीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशीकव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुऊन ड्रायर करणे, सोलापुर चादर धुणे, चादर धुणे, गादीच्या खोळी धुणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२८,५९,७५०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली**.

**(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास/ साईधर्मशाळा)**

---

**विषय नं.३१** **व्यावसायीक १९ किलोचे गॅस सिलेंडर पुरवठा आदेशास मुदतवाढ मिळणेबाबत**.

**प्रस्ताव-** सन २००४ मधील महाराष्ट्र शासन राजपत्रातील अधिनियम १७/१ मध्ये भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी तरतुद करून देण्यात आलेली आहे. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील कॅन्टीन सन २००६ पासुन चालु करण्यात आली. तेथे चहा,दुध,कॉफी तयार करण्यात येते . तेथे चहा,कॉफी,दुध तयार करण्यासाठी गॅस सिलेंडर्सचा वापर केला जात आहे सदरचे गॅस सिलेंडर्स खरेदी कामी मा.व्यवस्थापन समितिचे दि. १५/०४/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३६३ " संस्थानचे कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांना अल्पदरात चहा,कॉफी,दुध,बिस्कीटे मिनरल वॉटर इत्यादींचा प्रसादरूपाने विक्री करण्यात येते. चहा,कॉफी,दुध तयार करणेकामी गॅस सिलेंडर एच.पी.कंपनीचा १४.२ कि.ग्रॅम वजनाचा गॅस वापरण्यात येतो. पूर्वी प्रसादालय व कॅन्टीन मिळून एक विभाग होता . सन १९९९ पासून कॅन्टीन विभाग स्वतंत्र झाला तेव्हा पासून प्रसादालय विभागाकडुन २० गॅस सिलेंडर्स कॅन्टीन विभागाकडे मिळालेले आहेत. सध्या साईगणेश गॅस एजन्सी , शिर्डी यांचेकडुन एच.पी.कंपनीचा १४.२ कि.ग्रॅम वजनाचा गॅस सिलेंडर (सध्याचे प्रचलित दराप्रमाणे) आवश्यकतेनुसार भरून घेतले जातात. गर्दीचे काळात व उत्सवात मुख्य कॅन्टीनला एक महिन्यास अंदाजे १४० ते १५० नग गॅस सिलेंडर्स लागतात. तसेच नवीन भक्तिनवास चहा कॅन्टीनला एक महिन्यास ८० ते ९० गॅस सिलेंडर्स लागतात. बिलात होणारी दरवाढ व घट ( शासनाचे जी.आर प्रमाणे ) बिले लेखाशाखेमार्फत थेट आदा करण्यात येतात. सध्या घरगुती गॅसचा वापर केला जात आहे. तरी कॅन्टीन करीता गॅस सिलेंडर आवश्यकतेनुसार वेळोवेळी साईगणेश गॅस एजन्सी , शिर्डी. अथवा इतर गॅस एजन्सीकडून जी.आर प्रमाणे घरगुती अथवा कमर्शियल गॅस सिलेंडर्स भरूण घेणेस व शासनाचे दराप्रमाणे बिले वेळोवेळी आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात आली." असा निर्णय झालेला आहे.

सदरचे निर्णयानुसार १९ किलोचे व्यावसायीक गॅस सिलेंडर्स हिंदुस्थान पेट्रोलियमचे अधिकृत विक्रेते श्री साई गणेस गॅस एजन्सी , शिर्डी यांचेकडुन शासन दराप्रमाणे खरेदी करण्यात येत होते. प्रति गॅस सिलेंडर्ससाठी रू. १७०० मात्र अनामत रक्कम त्यांचेकडे ठेवण्यात आलेली होती.

जुने प्रसादालय इमारतीमधील किचन मधे मुख्य कॅन्टीनचे (मंदिर परीसरातील स्टॉलसाठी) चहा, दुध, कॉफी तयार करण्यात येत होते. त्यासाठी लागणारा गॅस हा मॅकेनिकल विभागामार्फत मोठया टाकीमधे साठविलेल्या टाकीमधुन पुरवठा केला जात होता. वाढीव दर्शनरांग इमारतीचे नियोजन करावयाचे असल्याने तेथील कॅन्टीन स्थलांतरीत करून ती श्री साईनाथ मंगलकार्यालय येथे कार्यान्वीत करण्यात आली. तेथे १९ किलोचे व्यावसायीक गॅस सिलेंडर्सचा वापर करण्यात येवु लागला सदरचे सिलेंडर्स श्री साईबाबा भक्तनिवासस्थानकडील पध्दतीप्रमाणेच मुख्य कॅन्टीनकरीता मान्यता घेवुन खरेदी करण्यात येवु लागले. व वाढीव गॅस सिलेंडर्स करीता प्रति नग रू. १७०० मात्र अनामत रक्कम भरण्यात आली. व दोनही ठिकाणी दि. ३१/०८/२०१८ पर्यत गॅस सिलेंडर्सचा पुरवठा श्री साई गणेश गॅस एजन्सी, शिर्डी यांचेकडुन शासकिय दराप्रमाणे होत होता .

दि.२३/०६/२०१८ रोजी भारत गॅसचे अधिकृत विक्रेते साई पॅराडाईज गॅस एजन्सी, शिर्डी यांना भारत गॅसची एजन्सी मिळाल्याने त्यांनी संस्थानला शासन दराप्रमाणे गॅस पुरवठा करण्यास तयार आहोत असे पत्र दिले त्यास अनुसरुन दोन्ही गॅस धारकाकडुन दरपत्रके मागविण्यात आली. त्यामध्ये दोघांनीही गॅस सिलेंडर्स साठी डिपॉझीट रक्कम ठेवावी लागणार नाही. असे नमुद केले व साई पॅराडाईज एजन्सी यांनी शासकीय दरामध्ये रु.

२८/- मात्र व श्री साई गणेश गॅस एजन्सी यांनी रु. १२५/- मात्र.ही प्रतिनगासाठी सवलत देवु केली त्यास अनुसरून उच्चतम सवलत देणारे श्री साई गणेश गॅस एजन्सी, शिर्डी यांची रु. १२५/- मात्र प्रति नग व गॅस सिलेंडर विना डिपॉझीट ही सवलत स्विकारुन त्यांना कॅन्टीन विभागास दि. ०१/०९/२०१८ पासुन नियमित गॅस सिलेंडर पुरवठा करणेचा आदेश देण्यात आलेला असुन त्यानुसार सध्या गॅस सिलेंडरचा पुरवठा होत आहे. व त्यांनी आपणांस आवश्यक असलेले ६० नग सिलेंडर्स विनाडिपॉझिट पुरविलेले आहेत. आणि त्यांचेकडे असलेली डिपॉझीट रक्कम त्यांनी संस्थानला परत केली आहे. सध्या श्री साई गणेश गॅस एजन्सी यांचेकडुन प्राप्त देयके कॅन्टीन विभागाकडुन तपासुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेनंतर लेखाशाखा विभागामार्फत आर .टी. जी. एस व्दारे अदा करण्यात येतात.

सन २०१९ - २०२० मध्ये श्री साई गणेश गॅस एजन्सीकडुन ३३४९ इतके गॅस सिलेंडर खरेदी केले असुन त्यांची बिलांची रक्कम रू.४०,३८,११८/- असुन रू. ४,१८,६२५/- सुट वजा जाता रू.३६,१९,४९३/- एजन्सीला प्रत्यक्ष अदा करण्यात आले आहेत.

**विभागाचा अभिप्राय :-**

१) श्री साई गणेश एजन्सी यांनी डिपॉझीट रक्कम घेतलेली नाही.

२) श्री साई गणेश एजन्सी यांनी शासकिय दरावर रक्कम रू. १२५/- मात्र प्रति नग गॅस सिलेंडर करीता सुट दिलेली आहे.

३) मागणी प्रमाणे गॅस सिलेंडरचा नियमित , वेळेवर पुरवठा करतात. त्यांची सेवा समाधानकारक आहे.

सबब श्री साई गणेश गॅस एजन्सी यांना दि. ३१/०३/२०२१ पर्यंत मुदतवाढ देणेस हरकत नसावी.

तरी श्री साई गणेश गॅस एजन्सी, शिर्डी यांच्या दि.०८/०९/२०१८ रोजी दिलेल्या पुरवठा आदेशास व त्यातील अटी शर्तीस अधिन राहुन दि. ३१/०३/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समिती समोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता व्यावसायीक १९ किलोचे गॅस सिलेंडर पुरवठा करणारे श्री साई गणेश गॅस एजन्सी, शिर्डी यांना दि.०८/०९/२०१८ रोजी दिलेल्या पुरवठा आदेशास त्यातील अटी शर्तीस अधिन राहुन दि.३१/०३/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-कॅन्टीन विभाग)**

---

**विषय नं.३२** **सन २०२०-२०२१ करीता श्री साई प्रसादालयातील डिश वॉशिंग (ताटे धुणे) मशिन करीता व भांडी धुणेसाठी लिक्विड सोप खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद :-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तवित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालवणे.

**प्रस्ताविक:-** श्री साई प्रसादालयात प्रसाद भोजन घेणा-या साईभक्तांना जेवण देणेसाठी स्टिल ताटांचा वापर करणेत येतो. प्रसादभोजनातील पदार्थ बनविणेसाठी तेलाचा व तुपाचा वापर करण्यात येत असल्यामुळे पदार्थ बनवण्यासाठी लागणारे कढया, पातेले, प्रसाद भोजनाची ताटे व जेवण वाढण्यासाठी हॉलमध्ये वापरण्यात येणा-या फुड सर्व्हिस ट्रॉलीज, चमचे, भातवाढ्या व इतर भांडे तेलकट व तुपकट होतात परिणामी त्यांचा खराब वास येतो त्यामुळे सदर ताटे व डिशेस फक्त पाण्याने धुतल्याने स्वच्छ होत नसल्याने लिक्विड सोपचा वापर करावा लागतो. प्रसादालयातील भांडी धुणेसाठी प्रतिदिन अंदाजे ४० ते ४५ लिटर याप्रमाणे एका वर्षासाठी १६३५० लिटर व भांडे मशिनकरीता अंदाजे प्रतिदिन १० लिटर प्रमाणे ३६५० लिटर लिक्विड सोप असे एकुण अंदाजे २०,००० लिटर लिक्विड सोपची आवश्यकता आहे.

सध्या प्रसादालयामध्ये २०० लिटर लिक्विड सोप शिल्लक असून पुरवठा आदेशानुसार १०,८५० लिटर लिक्विड सोप व्यापा-याकडून येणे बाकी आहे. सदर लिक्विड सोप प्रसादालयास ५ ते ६ महिने पुरेल. तथापि सन २०१९-२० करीता २१९०० लिटर लिक्विड सोपचा वार्षिक पुरवठा आदेश देणेत आलेला असुन त्याची मुदत दि. १४/०६/२०२० रोजी संपत असल्याने पुढील वर्षासाठी स्वतंत्र प्रस्ताव करुन त्यास प्रशासकीय मान्यता घेणेबाबत खरेदी विभागाने कळविले आहे. लिक्वीड सोप पुरवठयाबाबत स्थानिक मार्केटमधील व्यापारी तसेच पुरवठा करणारे पुरवठाधारकांकडून माहिती घेतली असून काही ब्रॅण्ड व स्पेसिफीकेशनबाबत खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झालेली आहे.

१. **लिक्वीड सोप कंपनी किंवा ब्रॅण्ड** – सध्या मार्केटमध्ये विविध कंपनीचे लिक्वीड सोप उपलब्ध असून त्यापैकी नामांकित असलेले विम ब्रॅण्डमध्ये लिक्वीड स्वरुपात सोप उपलब्ध नसून जेल स्वरुपात रु.२१०/- प्र.लिटर दराने व प्रिल कंपनीचे लिक्वीड सोप हे रु.३६०/- प्र. लिटर दराने उपलब्ध आहे. तथापि इतर लोकल ब्रॅण्डचे रु.३५/- ते रु.६०/- प्रती लिटर दराने लिक्वीड सोप उपलब्ध आहे.

यापूर्वी प्रसादालयाकरीता आवश्यक असणारे लिक्वीड सोप हे लिक्वीड सोप बनविणा-या लघु उदयोग कारखान्यांकडून कोटेशनद्वारे, निविदाद्वारे अथवा ई-निविदाद्वारे ५० लिटर/२०० लिटरचे पॅकींगमध्ये घेण्यात आलेले होते. त्यामुळे त्यावर कोणतीही कंपनी/ब्रॅण्ड नव्हता तथापि पुरवठा करणारे हे स्वतः उत्पादक कंपन्या होत्या. मार्केटमधील नामांकित विम अथवा प्रिल कंपन्याचे लिक्वीड सोप हे मागणी कमी करुन घ्यावयाचे ठरल्यास अंदाजे रु.३० ते ५० लाख अपेक्षित आहे. प्रसादालयात लिक्वीड सोपचा वापर मोठया प्रमाणात असल्याने चांगले दर्जाचे मात्र लुज स्वरुपातील लिक्वीड सोप घेणेस योग्य राहील असे नम्र मत आहे.

२. **लिक्वीड सोपचे स्पेसिफीकेशन-** सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या कोणत्याही लिक्वीड सोपच्या पॅकींगवर त्याचे स्पेसिफीकशेन येत नाही. याबाबत इचलकरंजीचे लिक्वीड सोपचे उत्पादक मे.साईनाथ कार्पोरेशन यांना दूरध्वनीवरुन विचारणा केली असता, प्रत्येक कंपनी लिक्वीड सोप बनविणेसाठी वेगवेगळे केमिकल्स वापरतात. तसेच त्याचे प्रमाणही एकसारखे नसतात. काही कंपन्या सोडीयम हायड्रॉक्साईड, सोडीयम क्लोराईड वापरतात तर काही कंपन्या कॉस्टीक व ॲसिड वापरतात. त्यामुळे एकसारखे स्पेसिफीकेशन येऊ शकत नाही. तथापि शरीरास इजा होऊ नये म्हणून PH बॅलेन्स केलेला असतो तसेच क्षमतेचा उल्लेख केलेला असतो.

करीता निविदेमध्ये **लिक्विड सोप – [ Neutral Grade (PH-7.8 to 8.5), Capacity : 1 Ltr. Liquid soap in 10 Ltr. Water, Packing : 50 Ltr. Drum, Purpose : For Manual dish wash & Dish Washing Machine]** असा उल्लेख करता येईल.

सन १९२०-२१ या कालावधीकरीता प्रसादालयासाठी आवश्यक असणारे लिक्विड सोपचे दराबाबत लिक्विड सोप पुरवठा करणा-या व्यापा-यांचे ई-मेलद्वारे तसेच काही कंपन्यांचे ऑनलाइन दर घेणेत आलेले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| **अ.नं** | **लिक्विड सोप पुरवठा करणारे व्यापारी** | **प्रती लिटर दर** |
|---|---|---|
| १ | मे.हितु जितू एन्टरप्रायझेस, मुंबई (सन २०१९-२० चे पुरवठादार) | रु.१६.७५ |
| २ | मे.साईनाथ कॉर्पोरेशन, इचलकरंजी (ई-मेलद्वारे दरपत्रक) | रु.३५.०० |
| ३ | मे. केशरी ट्रेडींग, मुंबई (ऑनलाईन दरपत्रक) | रु.३८.०० |
| ४ | मे. वेस्टर्न कंन्झुमर केअर, संगमनेर (ऑनलाईन दरपत्रक) | रु.४५.०० |
| ५ | मे. कम्प्लेट सोल्युशन, पुणे (ऑनलाईन दरपत्रक ) फ्लॉयकॉस कंपनी | रु.४५.०० |
| | **सरासरी दर =** | रु.३५.९५ |

उपरोक्त दर हे ऑनलाईनद्वारे घेणेत आलेले असल्याने सरासरी दर हे रु.३५.९५ प्रती लिटर आहे. तथापि सन २०१९-२० करीता प्रसादालयाकरीता आवश्यक असणारे लिक्वीड सोप हे ई-निविदा पद्धतीद्वारे करणेत आलेले होते. तसेच खरेदीची मागणी ही जादा प्रमाणात असल्याने त्याचा दर रु.१६.७५ प्रती लिटर आलेला होता. सन २०२०-२१ मध्येही ई- निविदा पद्धतीने खरेदी करावयाची मागणी २०,००० लिटर असल्याने व अंदाजे दर रु.२५ ते २६/- प्रती लिटर दर अपेक्षित असून सदर लिक्विड सोप खरेदीसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **मागणी (लिटरमध्ये)** | **अंदाजे दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १ | लिक्वीड सोप<br>Neutral Grade (PH-7.8 to 8.5)<br>क्षमता- १ लिटरमध्ये लिक्वीड सोपमध्ये १० लिटर पाणी | २०,००० लिटर (५० लि.कॅनमध्ये) | रु.२६.०० प्रती लिटर | रु.५,२०,०००/- |
| | | **एकुण अंदाजे रक्कम =** | | **रु.५,२०,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे लिक्विड सोप खरेदीस अंदाजे रु.५,२०,०००/- (अक्षरी रुपये- पाच लाख वीस हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च अंदाजपत्रकीय तरतूद सन २०२०-२०२१ मधील प्रसादालय खर्च या सदरा खालील मंजूर असलेल्या १९.२५ कोटी रकमेतून करता येईल.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान :- आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत/मागणी:- तरी सन २०२०-२१ करीता प्रसादालयासाठी आवश्यक असणारे २०,००० लिटर लिक्विड सोप–[Neutral Grade (PH-7.8 to 8.5), Capacity:1 Ltr. Liquid soap in 10 Ltr. Water, Packing : 50 Ltr. Drum, Purpose : For Manual dish wash & Dish Washing Machine] खरेदीस व त्यासाठी येणारी अंदाजित रक्कम रु.५,२०,०००/- (अक्षरी रुपये- पाच लाख विस हजार मात्र) चे खर्चास व तसेच सदरील खरेदी ही खरेदी विभागामार्फत ई-निविदा पद्धतीने खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२०-२०२१ करीता श्री साई प्रसादालयातील डिश वॉशिंग (ताटे धुणे) मशिन करीता व भांडी धुणेसाठी** २०,००० लिटर **लिक्विड सोप खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत रक्कम रु.५,२०,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.३३** **सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबतचा वस्तुनिष्ट अहवाल.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ भाग-४ मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रस्ताविक:-** श्री साई प्रसादालयातील प्रसाद-भोजनासाठी लागणारा किराणा माल, धान्य-कडधान्य डाळी इत्यादी माल डिस्टोनर मशिनद्वारे व मनुष्यबळाकरवी साफ करण्यात येतो. गहू, हरबरा दाळ, अखंड मिरची, अखंड हळद, अखंड धने दळल्यानंतर काही प्रमाणात घट येते. त्याचप्रमाणे दळण-कांडन व साफ केल्यानंतर काही प्रमाणात कचरा, खडे, मातेरे निघते. तसेच वातावरणातील बदलामुळेही कडधान्याच्या वजनात घट येते. सन २०१९-२०२० मध्ये आलेला घट-तुटीचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे मार्गदर्शक मुद्देसह असलेली माहिती खालीलप्रमाणे-

१. फुड कार्पोरेशन ऑफ इंडीया (FCI) मधील तुटीचे प्रमाण- फुड कार्पोरेशन ऑफ इंडीया मधील तुटीचे प्रमाणाबाबत किराणा मालाचे परिशिष्ट आढळून आलेले नाही. तथापि शासनाचे फुड सेफ्टी अँण्ड स्टॅण्डर्ड अॅक्ट २००६, रुल्स २०११, रेग्युलेशन २०११ मधील नियम २.४.६ मध्ये विविध किराणा मालामध्ये गहू, तांदुळ, कडधान्य, डाळी तसेच मसाला आदी मालास १०% ते १६% आद्रता (Moisture) व इतर वस्तु, बारीक दगड, काडीकचरा आदीस १% (Foreign Matter/Extraneous Matter) प्रमाण शासनाने निश्चीत केलेले आहे. त्याबाबतचे सोबत परिशिष्ट 'ब' म्हणून सादर केलेले आहे. हवेतील आद्रता अथवा इतर बाबीमुळे मालाचे वजन कमी होऊ शकते. तसेच फुड कार्पोरेशन ऑफ इंडीया, न्यु दिल्ली यांचे No.STK/RL/Misc./ NZ/ 11/ Vol.III/581 दि.१२.१२.२०१२ चे मध्यवर्ती गहू व तांदुळ साठयामधील घट व तुटीबाबतचे परिपत्रकामध्ये तांदुळाचे घटीबाबत उदाहरण दिलेले असून त्यात For subsequent driage i.e.from 14% moisture level to below, the allowance @0.7% for every 1% driage has been allowed असा उल्लेख केलेला आहे. शासनाचे फुड सेफ्टी अॅक्ट मधील नियमाचा विचार करता प्रसादालयात आलेला मालाचे दळण-कांडन आदीनंतर अल्पशः प्रमाणात घट आलेली आहे.

२. शासकीय गोदामामध्ये शासन जी आर मधील तुटीबाबत- महाराष्ट्र शासन, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्र.गोतुनि १०९९/१२३६/ प्र.क्र.८४०/ना.पु.१६-ब दि.३नोव्हेंबर, १९९९ मधील शासकीय गोदामातील धान्य तुटीचे मूल्य निर्लेखित करण्याबाबतच्या आदेशामध्ये शासनाने तुटीची कोणतीही अनुज्ञेय मर्यादा निश्चित केलेली नसून प्रत्येक प्रकरणी गुणवत्तेच्या आधारेच तूट निर्लेखित करणे आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे.

श्री साई प्रसादालयाचे लेखापरिक्षणामधील मुद्दा व मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०५/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४०५ नूसार सन २००७-०८ पासून श्री लोंगाणी, स्थानिक अंतर्गत लेखापरिक्षक यांचे

सुचनेनूसार शासकीय डिपार्टमेंटकडून माहीती घेवून त्यांचे मार्गदर्शनाने नियमावली करुन घट-तुट दर्शविण्याची कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली होती. घट-तुटीबाबत शासनाची निश्चित अशी नियमावली नसल्यामुळे त्याकरीता शासकीय संस्था, इतर देवस्थान, सरकारी कारागृह, मिलीटरी कॅम्प, सरकारी अन्नधान्य महामंडळ अशा १० सस्थांना प्रशासन शाखा जा.नं.७८३७ दि.२१/०५/२००७ पत्र पाठवून त्यांचेकडे असलेली धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीची पध्दती लिखीत स्वरुपात मागविणेत आलेली होती.

त्यानूसार धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत खालील तीन शासकीय व धार्मिक देवस्थानांकडून धान्य कडधान्य व किराणा मालाचे प्रचलीत घट-तुटीबाबत माहीती प्राप्त झालेली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **संस्थेचे नांव** | **तपशिल (प्रति क्विंटल घट-तुट)** |
|---|---|---|
| ०१. | येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे | ज्वारी-४%, बाजरी-५%, गहू-५%, तांदूळ-२%, सर्व प्रकारच्या डाळी-२%, फळभाजी-५%, पालेभाजी-१०%, ज.लाकूड/कोळसा-५% |
| ०२. | मध्यवर्ती कारागृह, नासिकरोड | साखर व वन.तुप या खाद्यतेलास घट नाही मात्र कडधान्य व डाळी-२% |
| ०३. | गजानन महाराज संस्थान, शेगांव | प्रती क्विंटल ३% ते ५% एवढी घट-तुट दर्शविलेली आहे. |

उपरोक्त सदर पध्दतीचा विचार करुन मा.श्री अभय शास्त्री (सी.ए.), मा.श्री.ए.जी.लोंगाणी, (सी.ए.) हे संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांनी संस्थानची घट-तुटीबाबतची खालील नियमावली बनविणेत आलेली होती.

१) सन २००७ -२००८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचिलत घट- तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असून इतरांचे तुलनेने कमी असलेने दर सहा महिन्यानंतर प्रस्तावित घट-तुट नांवे टाकणेत यावी.

२) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे दिसणारा मालाचा साठा याची पडताळणी करावी.

३) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.व्यवस्थापन समिती समोर अवलोकनार्थ सादर करावा. मात्र प्रस्तावित सरासरी पेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७.०७.२००८ निर्णय क्र.५६० अन्वये सन २००८ पासून प्रसादालय किराणा माल घट-तुटीचे प्रमाणास मान्यता मिळालेली असल्याने तेव्हापासून प्रचलीत नियमावलीप्रमाणे आजतागायत कार्यवाही चालू आहे. सन २०१९-२० मध्ये प्रसादालयातील किराणा मालाची घट-तुट ही प्रस्तावीत सरासरीपेक्षा कमी आलेली आहे.

३. सन २०१९-२०२० मधील घट-तुटीची रक्कम- मध्यवर्ती भांडार विभागाकडून प्राप्त झालेल्या व प्रसादभोजनासाठी वापरणेत आलेल्या किराणा मालाचे दळण-कांडण आदीमुळे काही प्रमाणात घट आढळून आलेली आहे. त्यानुसार एकुण खरेदी करणेत आलेला अथवा मध्यवर्ती भांडार विभागाकडून घेणेत आलेला माल, प्रत्यक्ष वापरणेत आलेला माल, त्यात निघालेली घट-तुट, घट-तुटीचे प्रमाण व एकुण रकमेबाबतचा तपशिल सोबत परिशिष्ट 'अ' म्हणून सादर केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत**:-अ)** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७.०७.२००८ मधील निर्णय क्र.५६० मध्ये लेखापरिक्षकांची मान्य झालेल्या नियमावलीतील घट-तुटीचा विचार करता, सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षामध्ये श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा मालातील प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही संस्थानने निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा कमी असून त्यांचा दरासह होणारी एकुण रक्कम याबाबतचा तपशिल सोबत परिशिष्ट 'अ' म्हणून सादर केला आहे.

**ब)** शासनाचे फुड सेफ्टी अॅण्ड स्टॅण्डर्ड अॅक्ट २००६, रुल्स २०११, रेग्युलेशन २०११ मधील नियम २.४.६ मध्ये विविध किराणा मालामध्ये गहू, तांदुळ, कडधान्य, डाळी तसेच मसाला आदी मालास १०% ते १६% आद्रता (Moisture) व इतर वस्तु, बारीक दगड, काडीकचरा आदीस १% (Foreign Matter/Extraneous Matter) प्रमाण शासनाने निश्चीत केलेले आहे. त्याबाबतचे सोबत परिशिष्ट 'ब' म्हणून सादर केलेले आहे.

तरी उपरोक्त अ व ब बाबतचे अवलोकन करता, प्रसादालयातील धान्य व कडधान्य किराणा मालातील प्रत्यक्ष आलेली घट तुट ही संस्थानने निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा कमी आहे. करीता सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षामध्ये श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा माल घट-तुटीची वस्तुनिष्ठ अहवालाची टिपणी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.३८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षामध्ये श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य व किराणा माल घट-तुटीच्या वस्तुनिष्ठ अहवालाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.३४** **श्री साई प्रसादालयातील माहे एप्रिल-२०१९ ते मार्च-२०२० अखेर खाद्यतेल, तुप व काजुचे रिकामे डब्यांचा अहवाल**.

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियम २००४ कलम १७ (४) नुसार निरुपयोगी वस्तुंची विल्हेवाट लावणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव:-मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०७/२०१४ मधील निर्णय क्र.५९२.

प्रास्ताविक:- संस्थानचे साईप्रसादालयामध्ये सकाळी १०.०० ते रात्री १०.०० या वेळेत साईभक्तांना प्रसादभोजनाची सुविधा पुरविली जाते. प्रसादभोजनामध्ये चपाती, पुरी, भाजी, बर्फी इ.पदार्थ दिले जात असून सदरील पदार्थ बनविण्यासाठी खाद्यतेल, गावरान तूप, वनस्पती तूपाचा वापर होत असतो. सदर डब्यांचा मध्यवर्ती भांडार विभागाकडून पत्र्याच्या नविन डब्यात पुरवठा होत असून रिकामे झालेल्या डब्यांची अभिलेख कक्षामार्फत विक्री केली जाते.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०७/२०१४ मधील निर्णय क्र.५९२ अन्वये तेला-तूपाचे एकुण डबे, रिकामे झालेले डबे तसेच रिकामे डबे कोठे वापरण्यात आले त्याच्या नोंदी ठेवणेत येऊन, त्याचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचे समोर व वार्षिक अहवाल मा.त्रिसदस्य समितीसमोर सादर करणेत यावा असे ठरलेले आहे. त्यानुसार मासिक अहवाल वेळोवेळी मा.कार्यकारी अधिकारी यांचेसमोर सादर करणेत येत आहे.
खाद्यतेल, वनस्पती तूप, गावरान तूप व काजूचे रिकामे झालेले डबे अभिलेख कक्षामार्फत विक्री करण्यात येतात. तसेच संस्थानमधील इतर विभागांना त्यांचे मागणीनुसार व वापराकामी आवश्यकतेनुसार डबे दिले जातात व प्रसादालयाचे गिरण्या पॅकींगकरीता काही डबे वापरले जातात.

खरेदी करणेत आलेल्या व विक्री तसेच वापरणेत आलेल्या डब्यांचा दि.०१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० अखेर ताळमेळाचा तपशिल खालीलप्रमाणे-

| तपशिल | खरेदी व मागील शिल्लक एकुण डबे | | | विक्री व वापरणेत आलेले डबे **(०१ एप्रिल १९ ते ३१ मार्च २०)** | | एकुण खर्च डबे | ०१ एप्रिल-२०२० रोजी शिल्लक रिकामे डबे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३१ मार्च २०१९ रोजी शिल्लक | संस्थानसाठी खरेदी करणेत आलेले तेल,तूप व काजूचे डबे (मध्यवर्ती भांडार विभागामार्फत) | | प्रसादालय, स्वच्छता, मंदिर, लाडू विभागासाठी वापरणेत/देणेत आलेले डबे | अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेत आलेले डबे | | |
| | रिकामे डबे | आवक डबे | एकुण जमा डबे | | | | |
| खाद्यतेल | ५३६ | १७२९९+ १३ (देणगी) | १७८४८ | ३३ | १४८१८ | १४८५१ | २९९७ |
| वनस्पती तूप | ८६ | ३६८९ | ३७७५ | २० | २९२८ | २९४८ | ८२७ |
| काजू डबे | ५ | २८ | ३३ | ३१ | ०० | ३१ | ०२ |
| गावरान तूप | ४ | ४४ | ४८ | ४३ | ०० | ४३ | ०५ |
| **एकुण** | **६३१** | **२१०७३** | **२१७०४** | **१२७** | **१७७४६** | **१७८७३** | **३८३१** |

| अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेत आलेले एकुण डबे - | अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेत आलेल्या रिकाम्या डब्यांची रक्कम- |
|---|---|
| १४८१८+ २९२८ = १७७४६ डबे | **रु. ४,३५,०२१ /-** |

मागणी :- संस्थानसाठी माहे एप्रिल-२०१९ ते मार्च-२०२० अखेर खरेदी करणेत आलेले तेल, तूप व काजूचे रिकामे झालेल्या डब्यांचा अहवाल सादर करणेस मान्यता असावी हि विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान :- आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-उपरोक्त प्रमाणे माहे एप्रिल-२०१९ ते मार्च-२०२० अखेर एकुण खरेदी करणेत आलेल्या मालाचे रिकामे डबे अभिलेख कक्षामार्फत विक्री करणे व दैनंदिन वापरणेसाठी देण्यात आलेल्या रिकाम्या डब्यांच्या अहवालाची नोंद घेणेकामी उपरोक्त विषयाची टिप्पणी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, एप्रिल-२०१९ ते मार्च-२०२० अखेर एकुण खरेदी करणेत आलेल्या मालाचे रिकामे डबे अभिलेख कक्षामार्फत विक्री करणे व दैनंदिन वापरणेसाठी देण्यात आलेल्या रिकाम्या डब्यांच्या अहवालाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.३५** **संस्थानचे मंदिर विभागासाठी रानशेणी गोवरी खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे मंदिर विभागासाठी रानशेणी गोवरी खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्याचा तपशील खालील प्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | संस्थानचे मंदिर विभागासाठी रानशेणी गोवरी खरेदी |
| ०२ | मागणी | रानशेणी गोवरी |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि. ०६.०४.२०२० ते दि. १७.०४.२०२० |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | ०३ पुरवठादारांना दुरध्वनीव्दारे |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – ०६.०४.२०२०<br>टेक्निकल बीड – २०.०५.२०२०<br>कमर्शियल बीड – १५.०६.२०२० |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०३ (तीन) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०३ (तीन) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | ०३ ही निविदाधारकांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | --- |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – खालील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे | |

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | m/s laxmi enterprises | Vijay Dhondu Gawali | RENUKA SERVICES |
|---|---|---|---|---|---|---|
| 1.00 | रानशेणी गोवरी (वाळलेली) | 250000.00 | किलो | 8.49 | 6.30 | 12.85 |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – पुरवठादार मे. विजय धोंडीबा गवळी, धुळे, दर रुपये ५.७० पैसे प्रती किलो | |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - ---- | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | --- |
| १६ | मागील खरेदी दर | रु. ५.७०पैसे प्रती किलो |
| १७ | मागील पुरवठादार | मे. विजय धोंडीबा गवळी, धुळे |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं १२ मध्ये नमुद केले आहेत. |

| | | |
|---|---|---|
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे. विजय धोंडीबा गवळी, धुळे |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर -<br>करण्यात आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर<br>करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | मागील खरेदी सध्याचे प्राप्त दर फरक % ने कमी/जास्त<br>रु. ५.७० पैसे रु. ६.३० पैसे ०.६० पैसे १०.५२% ने जास्त - | |

२३. संक्षिप्त टीप – (प्रस्ताव)- संस्थानचे मंदिर विभागासाठी रानशेणी गोवरी खरेदीसाठी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. त्याची मुदत दि. १७.०४.२०२० रोजी संपलेली होती. या ई- निविदेत ०३ निविदाकारांनी भाग घेतला होता. दि. २०.०५.२०२० रोजी या निविदेचे तांत्रिक बीड उघडण्यात आले आहेत. यामध्ये ०३ ही निविदाकार तांत्रिक दृष्टया पात्र ठरले होते. त्यामुळे एकुण ०३ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि. १५.०६.२०२० रोजीचे मा. खरेदी समिती सभेत उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये मे. विजय धोडींबा गवळी यांचे दर वर गडद व अधोरेखित केलेप्रमाणे न्युनतम आहेत. त्यांचेशी त्यांनी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन अंतिम निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. तदर्थ (Ad- hoc) समितीचे सभेत सादर.

**निर्णय क्र.३८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मंदिर विभागासाठी रानशेणी गोवरी खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.विजय धोडींबा गवळी यांचे प्रति किलो रु.६.३० मात्र दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.३६** **सन २०२०-२०२१ वर्षाकरीता किराणामाल खरेदीकामी नमुने निवडणेचे काम मा.तदर्थ समितीचे सदस्यांसमोर अगर मा.तदर्थ समितीने नियुक्त केलेले सदस्यांचे उपस्थितीत करणेकामी निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत दरवर्षी वार्षिक किराणामालाची खरेदी ई-निविदा पध्दतीने केली जाते. याकामी ई-निविदा मुदत संपलेनंतर किराणामालाचे नमुने मागविण्यात येतात. त्यानंतर तांत्रिक निविदा उघडण्यात येऊन तांत्रिक दृष्टया पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्या नमुन्यांतून योग्य नमुन्यांची निवड राहुरी कृषी विद्यापीठातील तज्ञ, संस्थान आचारी यांचेकडून केली जाते. ज्या निविदाधारकांचे ज्या आयटेम्सचे नमुने निवडले जातात त्यांचेच दरांचा तुलनात्मक विचार करून त्यातील न्युनतम दरधारकाला पुरवठा आदेश दिला जातो.

सन २०१२-१३ पासूनचे किराणामाल खरेदी प्रक्रीयेपासून राहुरी कृषी विद्यापीठातील दोन तज्ञांना बोलाविण्यात येत आहे. तसेच संस्थानचेही दोन आचारी याकामी उपस्थित असतात. किराणामाल निवडीच्या प्रक्रियेचे व्हिडीओ शुटींग केले जाते. तसेच नमुने निवडतांना तज्ञांना कुणाचा नमुना आहे हे न कळण्याची काळजी घेण्यात येते. निवडलेले नमुने प्रक्रिया पुर्ण केलेनंतर कमर्शिअल बीड उघडण्यात येतात. निवडलेल्या नमुन्यांचे तुलनात्मक दृष्टया न्युनतम दर असणा-या निविदाधारकाच्या मालाचे नमुने प्रशासकीय अधिकारी, खरेदी यांचे उपस्थितीत आयटेमवाईज प्रत्येकी दोन बरण्यामध्ये सीलबंद केले जातात व एक बरणी पुरवठाधारकाकडे व एक बरणी संस्थानकडे ठेवली जाते.

महात्मा फुले कृषी विदयापीठ, राहुरी येथील तज्ञांना राहुरी येथून शिर्डी येथे आणणे व परत पोहच करणेसाठी संस्थान वाहनाची व्यवस्था करण्यात येते. तसेच सन २०१५-१६ या वर्षीपासून तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी व मुख्यलेखाधिकारी यांच्या सुचनेनुसार राहुरी कृषी विद्यापीठातील दोन तज्ञांना प्रत्येकी रु.५,०००/- प्रमाणे एकुण रु.१०,०००/- मानधन देण्यास सुरवात झालेली होती. त्याप्रमाणे मागील ५ वर्षापासून नमुने निवडणेच्या कामासाठी प्रत्येकी ५,०००/- प्रमाणे दोन तज्ञांना मानधन देण्यात येत आहे.

संस्थानकडून सन २०२०-२१ करीता प्रसादालय,लाडु निर्मिती, मंदिर व कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांना सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी किराणामाल व इतर अनुषंगिक साहित्याची ई-निविदा पध्दतीने वार्षिक खरेदी करणेसाठी मागविण्यात आल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

१. किराणामाल, धान्य, कडधान्य, डाळी, ड्रायफ्रुटस, वनस्पती तूप व इतर वस्तु, २. मसाले, ३ खादयतेल, ४. पेपर पिशवी, ५. टोण्ड गाय दुध, ६. बिस्कीटे, ७.पेपर कप ८. पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर, ९.चहा पावडर व कॉफी १०. पत्रावळ,

वरील ई-निविदाचे नमुने दि.१८.०३.२०२० ते १९.०३.२०२० रोजी निविदा भरलेल्या आयटेम्सचे नमुने स्विकारणेचे जाहिर केले होते. तथापि कोरोना व्हायरसमुळे निर्माण झालेली आपतकालीन परिस्थिती विचारात घेता सदर नमुने दि.२५.०३.२०२० रोजी पर्यंत स्विकारणेस मान्यता घेण्यात आली होती. त्याप्रमाणे अनं.१ ते ९ या ई-निविदांचे नमुने जमा झालेले आहेत.

तर अ.नं. १० पत्रावळसाठी ३ पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यामुळे ३ मुदतवाढी देण्यात आल्या होत्या. परंतु पत्रावळ खरेदीसाठी ३ मुदतवाढीनंतरही एकच निविदा प्राप्त झालेमुळे सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली आहे.

मा.उच्च न्यायालयाने गहु, तांदुळ, साखर FCI कडून खरेदी करण्याची सूचना केली होती. त्याप्रमाणे FCI शी याबाबत पत्रव्यवहार करून मा.तदर्थ समितीचे दि.२४.०२.२०२० चे सभेत याबाबत निर्णय झालेनंतर गहु, तांदुळ, हरबराडाळ व साखर इ. ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. सदर ई-निविदेची मुदत २३.०३.२०२० रोजी संपली असून याकामी १२ निविदा प्राप्त झाल्या आहेत. सदर १२ ही निविदाधारकांनी नमुने संस्थानकडे जमा केलेले आहेत.

सन २०२०-२१ वर्षाकरीता किराणामाल खरेदीकामी नमुने निवडीबाबत दि.०२.०४.२०२० रोजी प्रस्ताव सादर केला होता. त्यावर “१. यापुर्वी नमुने निवडीचे काम कोणासमोर केले गेले आहे याबाबत टिपणीत नमूद करावे. २. सदयस्थितीत लॉकडाऊन मुळे मालाचे नमुने प्राप्त नाही तरी लॉकडाऊन कालावधी संपल्यानंतर लगेचच कार्यवाही करावी असे मत आहे.” असे निर्देश होते. त्यामुळे सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आला होता.
केंद्र सरकारने ८ जूनपासून अनलॉक १ कालावधी सुरू केला आहे. त्याअंतर्गत महाराष्ट्र शासनानेही ३० जून अखेरपर्यंत लॉकडाऊन कालावधी वाढविला असून कंन्टेनमेन्ट झोन वगळता इतरत्र कामकाजास परवानगी दिली आहे. त्यामुळे सन २०२०-२१ करीता संस्थानला खरेदी करावयाच्या किराणा मालाचे नमुने निवडीचे कामासाठी महात्मा फुले कृषी विदयापीठ, राहुरी येथील तज्ञांशी त्यांचे उपलब्धतेबाबत संपर्क केला असता त्यांनी १५ जून नंतर (२८ व २९ जून हे २ दिवस वगळता) याकामी शिर्डी येथे येणेसाठी वेळ देता येईल असे सांगितले आहे. तथापि याकामी त्यांना लेखी पत्राद्वारे निमंत्रित करावे लागेल.

सन २०१७-१८ व २०१८-१९ या दोन वर्षी नमूने निवडीच्या दिवशी मा.स्थानिक उपसमितीची सभा घेण्यात आली होती. एकाच हॉलमध्ये एका बाजूला नमूने निवडण्याचे काम चालू होते व दुस-या बाजूला स्थानिक उपसमितीची सभेचे कामकाज चालू होते. निविदाधारकांना बोलविण्यात येऊन बाहेर थांबविण्यात आले होते. नमूने निवडीचे काम पूर्ण झालेनंतर सदर नमूने निवडीची यादी उपस्थित निविदाधारकांना सभागृहात बोलावून वाचून दाखविण्यात आली होती. तर मागील वर्षी सन २०१९-२० चे नमुने निवडीचे काम प्र.प्रशासकीय अधिकारी, खरेदी विभाग यांचे उपस्थितीत केले होते. तसेच मागील वर्षी नमुने निवडीचे वेळी निविदाधारकांना बोलाविले होते व ते सभागृहात उपस्थित होते. नमूने निवडून झालेनंतर अंतिम नमूने निवडीची यादी निविदाधारकांसमोर वाचून दाखविण्यात आली होती.

करोना व्हायरस प्रादुर्भावामुळे निर्माण झालेली सध्याची आपतकालीन परिस्थिती विचारात घेता किराणा मालासाठी प्राप्त झालेल्या निविदांचे निविदाधारक हे विविध जिल्हयातील असल्यामुळे व सोशल डिस्टसिंगचा विचार करता निविदाधारकांना नमूने निवडीच्या वेळी बोलावू नये असे मत आहे.

किराणा माल नमुने निवडीसाठी अगोदरच्या दिवशी जर प्राप्त किराणा मालाचे नमुने सभागृहात व्यवस्थित लावून घेतले तर नमुने निवडीच्या दिवशी नमुने निवडीच्या कामासाठी साधारण ५-६ तासांचा कालावधी लागतो. संस्थानकडून नमूने निवडीचे काम पारदर्शकपणे केले जाते. तसेच या संपुर्ण प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रिकरणही केले जाते. त्यामुळे नमूने निवडण्याचे काम अंतिम झालेनंतर सर्व निविदाधारकांना याबाबतची आवश्यक ती माहिती दुरध्वनीवरून देता येईल.

बहुतेक किराणा मालाचे नमुने प्राप्त होऊन जवळपास ३ महिने झाले आहेत. कोरोना व्हायरस प्रादुर्भावामुळे महाराष्ट्र राज्यामध्ये लॉकडाऊन लागू झाल्यामुळे या प्रक्रियेसाठी जवळपास ३ महिन्यांचा विलंब झालेला आहे व संस्थानला प्रसाद भोजनाची, लाडू प्रसादाची अगर कॅन्टीन सेवा सुरु करावयाची असल्यास याकामी किराणा माल व इतर साहित्याची गरज पडू शकेल म्हणून सन २०२०-२१ चे किराणामाल खरेदीसाठी

किराणा माल नमुने निवडणे, कमर्शियल निविदा उघडणे, चर्चा वाटाघाटी होऊन पुरवठा आदेश देणेबाबतचा अंतिम निर्णय मा.तदर्थ समितीचे सभेत होणे ही कार्यवाही तातडीने होणे गरजेचे आहे.

तरी सन २०२०-२१ या वर्षाचे किराणा माल नमुने निवडीचे काम मा.तदर्थ समिती समोर अगर मा.तदर्थ समितीने नियुक्त केलेले कोणत्या सदस्यासमोर (मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सोडून) करावयाचे? याबाबत निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.३९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता किराणामाल खरेदीकामी नमुने निवडणेसाठी समिती सदस्य मा.श्री.दिलीप स्वामी व महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील तज्ञ यांची समिती नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.३७** **संस्थानचे विविध विभागाकरीता कार्यालयीन व संगणक प्रि-प्रिंटेड छपाई करुन घेणेकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे प्रसादालय विभागाकरीता वार्षिक भाजीपाला खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | कार्यालयीन जनरल व संगणक प्रि-प्रिंटेड छपाई करणे |
| ०२ | मागणी | ई-निविदा BOQ मधील मागणीप्रमाणे |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | १२.०३.२०२० ते ३१.०३.२०२० प्रथम मुदतवाढ दि. १५.१४.२०२०, दुसरी मुदतवाढ १५.०५.२०२० |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, ई-मेल व पुरवठाधारकांना दुरध्वनीव्दारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | संस्थानकडे उपलब्ध असलेल्या १६ ई-मेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक –१२.०३.२०२०<br>टेक्निकल बीड – २०.०५.२०२०<br>कमर्शियल बीड – १५.०६.२०२० |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०५ (पाच) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०५ (पाच) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागणी केलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | होय. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | नमुने मागणी केलेले नाहीत. |
| १२ | निविदाधारकांनी सादर केलेले दर- | |

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | SAMPRATI OFFSET PRINTERS | NATIONAL PAPER INDUSTRIES | Pravara Offset | SHREE GANESH ENTERPRISES | Sai Offset Printing Press |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | Rate | Rate | Rate |
| 1.00 | A - लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग | | | | | | | |
| 1.01 | मटेरियल जावक चलन/गेटपास (०४ प्रतीत) सफेद,गुलाबी,पिवळा,फिका सफेद(सफेद रफ पेपर), कागदाचा प्रकार-सफेद मॅपलिथो पेपर ५८ जीएसएम, साईज-२२ सें.मी. x १८ सें.मी., पाने/पेजेस-१x३x१००, नंबरींग प्रकार-१ ते १०० | 50.00 | बुके | 123 | NQ | **120** | 129.3 | NQ |
| 2.00 | B - साईप्रसाद निवासस्थान | | | | | | | |
| 2.01 | रुम नोंद रजिस्टर, पाने/पेजेस- १००/२००, कागदाचा प्रकार व GSM- लेजर पेपर, ७० GSM, साईज- ३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार- ०१ ते १०० | 500.00 | नग | 84.5 | NQ | **69.2** | 85.26 | NQ |
| 2.02 | डयुटी पॉईंट रजिस्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर, ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० | 24.00 | नग | 108 | NQ | **95** | 110.21 | NQ |
| 2.03 | रुग्णांचे नातेवाईक नोंद रजिस्टर, पाने/पेजेस-२००/४००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर, ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते २०० | 300.00 | नग | 128 | NQ | **69.2** | 136.62 | NQ |
| 2.04 | भक्त नावनोंदणी फॉर्म-(पाठपोठ छपाई), पाने/पेजेस-०१=१००, कागदाचा प्रकार-सफेद मॅपलिथो पेपर ५८ जीएसएम, साईज-१८ सेमी x२३ सें.मी., नंबरींग प्रकार-०१ ते १०० | 1000.00 | पॅड | **31.25** | NQ | **28** | 36.9 | NQ |
| 2.05 | माल मागणी पत्र (डुप्लीकेट), पाने/पेजेस-०१x०१x१००, कागदाचा प्रकार-पहिला पेपर सफेद मॅपलिथो ७० जीएसएम व दुसरा पेपर ५८ जीएसएम फिकट सफेद, साईज-१८.५ सेंमी.x२०.५ से.मी., नंबरींग प्रकार-०१ ते १०० | 50.00 | बुके | **57.5** | NQ | 69 | 80.38 | NQ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3.00 | C - व्दारावती भक्तनिवास | | | | | | | |
| 3.01 | रुम नोंद रजिस्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर, ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० | 150.00 | नग | 84 | NQ | **72** | 88.52 | NQ |
| 3.02 | दैनंदिन डयुटी रजिस्टर, पाने/पेजेस-१५०/३००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर, ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १५० | 4.00 | नग | 220 | NQ | **148** | 285.5 | NQ |
| 3.03 | रुम बुकिंग काऊंटर कॅश देवाण घेवाण रजिस्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर, ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० | 4.00 | नग | 195 | NQ | **145** | 258.25 | NQ |
| 3.04 | रुम मागणी फॉर्म पॅड (पाठपोठ छपाई नंबरींगसह), पाने/पेजेस-०१ ते १००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर, ७० GSM, साईज-१८ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते ५००० | 500.00 | पॅड | **31.25** | NQ | 34 | 44.2 | NQ |
| 4.00 | D - अभिलेख कक्ष | | | | | | | |
| 4.01 | भंगार साहित्य विक्री नोंद रजिस्टर (प्रथम २५० पाने नमुणा क्रं.०१ प्रमाणे व पुढील ५० पाने नमुणा क्रं.०२ प्रमाणे), पाने/पेजेस-३००/६००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते ३०० | 2.00 | नग | 750 | NQ | **245** | 531.5 | NQ |
| 4.02 | फाईल देवाण- घेवाण नोंद रजिस्टर, पाने/पेजेस-२००/४००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार- १ ते १०० | 2.00 | नग | 650 | NQ | **244** | 487 | NQ |
| 4.03 | बजेट रजिस्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-१ ते १०० | 1.00 | नग | 900 | NQ | **380** | 677 | NQ |
| 5.00 | E - जनसंपर्क विभाग | | | | | | | |
| 5.01 | साईभक्त नांव नोंदणी रजिष्टर, पाने/पेजेस-२००/४००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर ७० GSM, साईज- ४१ सेमी x ३३ सेमी, नंबरींग प्रकार- १ ते २०० | 12.00 | नग | 160 | NQ | **140** | 192.75 | NQ |
| 5.02 | देणगीदार दर्शन/आरती नोंद रजिष्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० | 12.00 | नग | 128 | NQ | **95** | 138.34 | NQ |
| 5.03 | मान्यवरांची शिर्डी भेट (निरोप) रजिस्टर, पाने/पेजेस-२००/४००, कागदाचा प्रकार- लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते २०० | 5.00 | नग | 280 | NQ | **160** | 336 | NQ |
| 5.04 | बजेट रजिष्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार- लेजर पेपर ७० GSM, साईज- ३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार- ०१ ते १०० | 1.00 | नग | 900 | NQ | **390** | 677 | NQ |
| 6.00 | F - ध्वनिक्षेपन व टेलिफोन | | | | | | | |
| 6.01 | अंदाज पत्रक (बजेट) रजिष्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० | 2.00 | नग | 650 | NQ | **239** | 437 | NQ |
| 6.02 | डयुटी नोंद रजिष्टर, पाने/पेजेस-२००/४००, कागदाचा प्रकार- लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते २०० | 2.00 | नग | 650 | NQ | **290** | 487 | NQ |
| 7.00 | G - बगिचा विभाग | | | | | | | |
| 7.01 | अॅलोकेशन रजिस्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार- लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार- ०१ ते १०० | 10.00 | नग | 105 | NQ | **95** | 150.3 | NQ |
| 7.02 | वाहन लॉग बुक, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार- लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार- ०१ ते १०० | 3.00 | नग | 350 | NQ | **220** | 318 | NQ |
| 7.03 | बजेट रजिस्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-१ ते १०० | 2.00 | नग | 350 | NQ | **239** | 437 | NQ |
| 7.04 | आवक रजिस्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार- लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार- ०१ ते १०० | 2.00 | नग | 350 | NQ | **239** | 437 | NQ |
| 8.00 | H - पाणी पुरवठा विभाग | | | | | | | |
| 8.01 | बजेट रजिष्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार- लेजर पेपर ७० GSM, साईज- ३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार- ०१ ते १०० | 2.00 | नग | 350 | NQ | **239** | 437 | NQ |
| 8.02 | कनकुरी साठवण तलाव शिफ्ट चार्ज-देवाण घेवाण रजिष्टर, पाने/पेजेस-१५०/३००, कागदाचा प्रकार- लेजर पेपर ७० GSM, साईज- ३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार- ०१ ते ३०० | 20.00 | नग | **128** | NQ | **128** | 146 | NQ |
| 8.03 | कनकुरी साठवण तलाव मटेरियल देवाण-घेवाण रजिस्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार- लेजर पेपर ७० GSM, साईज- ३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार- ०१ ते २०० | 10.00 | नग | 110 | NQ | **95** | 197.3 | NQ |
| 8.04 | वॉटर सॅम्पल इनवर्ड रजिष्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार- लेजर पेपर ७० GSM, साईज- ३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार- ०१ ते १०० | 4.00 | नग | 260 | NQ | **125** | 258.25 | NQ |
| 8.05 | वॉटर सॅम्पल अॅनलायसिस रजिस्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार- लेजर पेपर ७० GSM, साईज- ३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० | 6.00 | नग | 360 | NQ | **129** | 198.17 | NQ |
| 9.00 | I - साईआश्रम भक्तनिवास | | | | | | | |
| 9.01 | रुम नोदं रजिस्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० LVS नंबरीगसह | 1200.00 | नग | 84 | NQ | **69** | 84.85 | NQ |
| 9.02 | भरणा रजिस्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर ७० GSM, साईज-४२ सेंमी × ३० सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० LVS नंबरीगसह | 6.00 | नग | 320 | NQ | **129** | 289.34 | NQ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9.03 | कॅश देवाण घेवाण रजिस्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० पाठपोठ नंबर | 20.00 | नग | 105 | NQ | 92 | **87.05** | **NQ** |
| | 9.04 | चालु शिल्लक व मेन्टनंन्स रुम तक्ता, पाने/पेजेस-१००=०१ पॅड, कागदाचा प्रकार-सफेद मॅपलिथो पेपर ७० जीएसएम, साईज-३७ सेंमी × २५ सेंमी, नंबरींग नाही | 50.00 | पॅड | 68 | NQ | **65** | 90.06 | NQ |
| | 9.05 | लगेज ट्रॉली अहवाल तक्ते, पाने/पेजेस-१००=०१ पॅड, कागदाचा प्रकार-व्हाईट प्रिंट कागद, ५८ जीएसएम, साईज-३३.५ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग नाही. | 12.00 | पॅड | 90 | NQ | **55** | 82.75 | NQ |
| | 9.06 | साईभक्त नाव नोंदणी (टोकण फॉर्म) पाठपोठ छपाई, पाने/पेजेस-१००=०१ पॅड, कागदाचा प्रकार-सफेद मॅपलिथो पेपर ७० जीएसएम, साईज-२१सेंमी × १८ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० LVS नंबरीगसह | 2000.00 | पॅड | 45 | NQ | **26** | 45.25 | NQ |
| | 9.07 | बस रजिस्टर (०७ ते १५,१५ ते २३), पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० | 5.00 | नग | 215 | NQ | **130** | 203.4 | NQ |
| | 9.08 | बस रजिस्टर (०४ते१२,१२ते०८, ०८ते०४), पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० LVS नंबरीगसह | 5.00 | नग | 215 | NQ | **129** | 203.4 | NQ |
| | 9.09 | बस रजिस्टर (०५ते१३,१३ते२१,२१ते०५), पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार- लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० LVS नंबरीगसह | 5.00 | नग | 215 | NQ | **129** | 203.4 | NQ |
| | 9.10 | लॉण्ड्री नोंद तक्ते, पाने/पेजेस-१००=०१ पॅड, कागदाचा प्रकार-व्हाईट प्रिंट कागद, ५८ जीएसएम, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग नाही. | 10.00 | पॅड | 215 | NQ | **65** | 80.8 | NQ |
| | 9.11 | लॉण्ड्री हिशोबाचे तक्ते, पाने/पेजेस-१००=०१ पॅड, कागदाचा प्रकार-व्हाईट प्रिंट कागद, ५८ जीएसएम, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग नाही. | 100.00 | पॅड | 68 | NQ | 59 | **58.71** | **NQ** |
| | 9.12 | खोल्या साफ सफाई कामाचे जॉब कार्ड तक्ते, पाने/पेजेस-१००=०१ पॅड, कागदाचा प्रकार-व्हाईट प्रिंट कागद, ५८ जीएसएम, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग नाही. | 50.00 | पॅड | 84 | NQ | **59** | 65.76 | NQ |
| | 10.00 | J - बांधकाम विभाग | | | | | | | |
| | 10.01 | बजेट रजिस्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० | 5.00 | नग | 215 | NQ | **124** | 203.4 | NQ |
| | 10.02 | खात्यामार्फत चालू असलेल्या कामाचे दैनंदिन रजिष्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० | 10.00 | नग | 215 | NQ | **97** | 150.3 | NQ |
| | 10.03 | माल आवक रजिष्टर, पाने/पेजेस-१००/२००, कागदाचा प्रकार-लेजर पेपर ७० GSM, साईज-३३ सेंमी × २१ सेंमी, नंबरींग प्रकार-०१ ते १०० | 5.00 | नग | 215 | NQ | **118** | 203.4 | NQ |
| | 11.00 | K - मेकॅनिकल विभाग | | | | | | | |
**प्रस्तावना:-** संस्थानकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्त पाणी पुरवठा योजनेच्या मौजे कनकुरी हद्दीतील पाणी साठवण तलावातुन पाणी पुरवठा करणेत येत आहे. या ठिकाणी पाणी साठविणेसाठी चार साठवण तलावांची निर्मिती करणे आलेली असून, सदरहू चार साठवण तलावांची एकुण पाणी साठवण क्षमता ३११ एम.एल.(द.ल.लिटर) इतकी आहे. सदर साठवण तलावात जलसंपदा (इरिगेशन) विभागाकडुन गोदावरी/दारणा नदी, गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे शासन मंजुरीनुसार पाणी पुरवठा आवर्तन देण्यात येत आहे. याबाबत नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन ५३.३२०५ एम.सी.एफ.टी वार्षिक पाणी साठा मंजुर आहे.

संस्थानचे मौजे कनकुरी, ता.राहाता येथे साठवण तलावालगत जलशुध्दीकरण केंद्र असून, साठवण तलावातील पाणी शुध्द करणेसाठी ब्लीचिंग पावडर (विक्रम ब्रॅन्ड, ग्रासिम मेक, डी.सी.एच. (डी.एस.सी.एल.), आय.एस.आय मार्क, ३४% क्लोरीन उपलब्ध), फेरीक ॲलम (१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) व क्लोरीन गॅस सिलेंडर यांची दैनदिन आवश्यकता भासते.

मागील वर्षी साठवण तलावातील पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक बूलीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर इ. साहित्य ई-निविदा मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे **रु.१७,०८,०००/-** मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

यावर मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०२/०५/२०१८, निर्णय क्रं.३१७ खालीलप्रमाणे पारित करणेत आलेला होता.

"**...** यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी शुध्दीकरणासाठी माहे- ऑगस्ट -२०१९ ते जुलै-२०२० या बारा महिन्याचे कालावधीसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिंलेडर खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निवीदा प्रक्रीया राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. १७,०८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.."

याबाबत मा.उपसमिती सभा दि.१२/०९/२०१९ रोजीचे सभेतील निर्णया अन्वये १) मे. के एस. एंटरप्रायजेस, औरंगाबाद यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/२२९३/२०१९, दि.१३/०९/२०१९ अन्वये ब्लिचिंग पावडर रु.२२,८३०/- प्रती टन (जी.एस.टी. सह) या दराने ३५ मे.टन २) अलमायटी केमिकल्स, नाशिक यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/२२९४/२०१९, दि.१३/०९/२०१९ अन्वये व फेरीक ॲलम रु.७,३९९/- प्रती टन (जी.एस.टी. सह) या दराने ५५ मे.टन करीता व ३) मे.श्री गणेश एंटरप्रायजेस, नासिक यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/२२९२/२०१९, दि.१३/०९/२०१९ अन्वये क्लोरीन गॅस सिलेंडर (१०० किलोचे ४५ नग ) रु.३,८५०/- प्रती सिलेंडर (जी.एस.टी. सह ) करीता सदरहू पुरवठाधारकांना एक वर्ष कालावधीसाठी पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. सदरहु कालावधी माहे ऑगस्ट २०२० अखेर असुन त्यानंतर पुढील कालावधीसाठी नव्याने खरेदी प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिंलेडर करीता सन २०१८-१९ या वार्षिक टेंडरचे कालावधीत झालेल्या खर्चाचा तपशिल.

| अ. नं | तपशिल | ऑगस्ट-२०१८ सुरवातीची विभागाकडील शिल्लक | ऑगस्ट-२०१८ ते ऑगस्ट -२०१९ मागणी करण्यात आलेले मटेरीयल | एकुण | माहे ऑगस्ट - २०१९ अखेर खर्च | विभागाकडील शिल्लक ऑगस्ट - २०१९ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लिचींग पावडर | ०.५७५ मे.टन | ३४.७५० मे.टन | ३५.३२५ मे.टन | ३०.५५० मे.टन | ४.७७५ मे.टन |
| ०२ | फेरीक ॲलम | ३.०६० मे.टन | ५४.९२० मे.टन | ५७.९८० मे.टन | ४९.९६० मे.टन | ८.०२० मे.टन |
| ०३ | क्लोरीन गॅस सिलेंडर (प्रत्येकी १०० किलो वजन) | ०२ सिलेंडर | ५१ सिलेंडर | ५३ सिलेंडर | ४६ सिलेंडर | ०७ सिलेंडर |

पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिंलेडर करीता सन २०१९-२० या वार्षिक टेंडरचे कालावधीत झालेल्या खर्चाचा तपशिल.

| अ. नं | तपशिल | सप्टेंबर-२०१९ सुरवातीची विभागाकडील शिल्लक | सप्टेंबर-२०१९ ते मे-२०२० मागणी करण्यात आलेले मटेरीयल | एकुण | माहे मे-२०२० अखेर खर्च | विभागाकडील शिल्लक मे-२०२० अखेर |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लिचींग पावडर | ४.७७५ मे.टन | १८.७५० मे.टन | २३.५२५ मे.टन | १९.२५० मे.टन | ४.२७५ मे.टन |
| ०२ | फेरीक ॲलम | ८.०२० मे.टन | २९.९९० मे.टन | ३८.०१० मे.टन | २९.१५० मे.टन | ८.८६० मे.टन |
| ०३ | क्लोरीन गॅस सिलेंडर (प्रत्येकी १०० किलो वजन) | ०७ सिलेंडर | २६ सिलेंडर | ३३ सिलेंडर | २९ सिलेंडर | ०४ सिलेंडर |

Covid-19 लॉकडाऊनचे काळात ब्लिचींग पावडर, ॲलम, क्लोरीन गॅसचा वापर कमी झालेला आहे. परंतु सदर मालाचा पुरवठा आदेश हा एक वर्ष कालावधीचा (ऑगस्ट -२०२० पर्यंत) असुन सदर कालावधी नंतर पुरवठा होत नाही. नविन खरेदी प्रक्रीयेस काही कारणस्त्व विलंब झालेस पाणी शुध्दीकरणासाठी अडचण येऊ नये म्हणुन टेंडर कालावधीचे शेवटचे महिण्यात आपलेकडे १ ते २ महिने पुरेल एवढा माल साठा करुन ठेवण्यात येतो. तसेच माहे एप्रिल ते जुलै या कालावधीत जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन पुरविण्यात येणारे पाणी हे जादा प्रमाणात दुषित, गाळ मिश्रीत व पाण्याला वास येत असलेने या कालावधीत पाणी शुध्दीकरणांसाठी जादा प्रमाणात मटेरियलचा वापर करावा लागतो.

**प्रस्ताव:-** माहे सप्टेंबर -२०२० ते ऑगस्ट -२०२१ या पुढील १२ (बारा) महिन्यांचे कालावधीसाठी पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिंलेडर इ. मटेरियलचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **खरेदी करावयाच्या साहित्याचा तपशिल** | **आवश्यकता** | **अंदाजे दर (GST18%सह)** | **एकुण रक्कम** |
|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लीचिंग पावडर (विक्रम ब्रॅन्ड, ग्रासिम मेक,डी.सी.एच. (जी.ए..सी.एल.), आय.एस.आय मार्क, ३४% क्लोरीन उपलब्ध) | ३५ मे.टन | रु.३७,५००/- प्रती मे.टन (सर्वसमावेशक दर) | १३,१२,५००/- |
| ०२ | फेरीक ॲलम (१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) | ५५ मे.टन | रु. १०,००० /- प्रती मे.टन (सर्वसमावेशक दर) | ५,५०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | क्लोरीन गॅस सिलेंडर<br>(प्रत्येकी १०० किलो वजन) | ५०<br>सिलेंडर | रु.६,५०० प्रती सिलेंडर<br>(सर्वसमावेशक दर) | ३,२५,०००/- |
| **(अक्षरी रुपये एकवीस लाख सत्यांशी हजार पाचशे मात्र)** | | | **एकुण रक्कम:-** | **२१,८७,५००/-** |

**विभागाचा अभिप्राय:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ नुसार वरील नमुद तरतुदीस अनुसरुन मा.तदर्थ(Ad-hoc) समितीची मान्यता घेवून खरेदी विभागामार्फत माहे सप्टेंबर -२०२० ते ऑगस्ट -२०२१ या पुढील १२ (बारा) महिन्यांचे कालावधीसाठी पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून मटेरियल खरेदी करता येईल असे नम्र मत आहे.

तरी वरील नमुद केलेनुसार पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक मटेरियल खरेदी करणेसाठी अंदाजे **रु.२१,८७,५००/-** मात्र खर्च अपेक्षित आहे. त्याकरिता सदरचे साहित्य ई-निविदा मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे **रु.२१,८७,५००/-** मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी शुध्दीकरणासाठी माहे सप्टेंबर-२०२० ते ऑगस्ट-२०२१ या कालावधीसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२१,८७,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली**.

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.४६** **श्री साईनाथ स्तवनमंजरी पुस्तकाचे ओरिया भाषेत प्रकाशन करणेसाठी आलेल्या विनंती पत्राबाबत**.

**प्रस्ताव-** **अधिनियम-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालील प्रकारे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य,त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील."

**प्रास्तविक-** श्री.सत्यजित अक्षयकुमार मोहंती, बंगलोर यांनी त्यांच्या दिनांक ०७.१०.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मी ओरिसा येथील कायमस्वरुपी रहिवासी असून ओरिसा राज्यामध्ये मोठया प्रमाणात साईभक्त असून, बरेचसे साईभक्त बाबांचे दर्शनासाठी शिर्डी येथे वेळोवळी येत असतात व शिर्डी येथे श्री साईसच्चरित्राचे पारायण करीत असतात. संस्थानने साईचरित्र ओरिया भाषेत यापुर्वीच प्रकाशित केलेले असलेने ओरिसा राज्यातून येणा-या साईभक्तांना ओरिया भाषेतील साईचरित्र सहजासहजी उपलब्ध होते.

ओरिसा राज्यातून येणा-या ब-याचशा साईभक्तांची बाबांची स्तवनमंजरी दररोज वाचन करण्याची इच्छा असते. परंतु ओरिया भाषेतील स्तवनमंजरी प्रकाशित झालेली नसलेने ओरिसा राज्यातून येणा-या साईभक्तांना रोज स्तवनमंजरी वाचणेची इच्छा पुर्ण होत नाही.

यासाठी ओरिसा राज्यातून येणा-या साईभक्तांसाठी मी ओरिया भाषेतील स्तवनमंजरी तयार केलेली आहे. सदर स्तवनमंजरीचे आपले संस्थानमार्फत पडताळणी करुन त्याप्रमाणे संस्थानमार्फत साईबाबांचे ओरिया भाषेतील सच्चरित्राप्रमाणेच साईंची ओरिया भाषेतील स्तवनमंजरी संस्थानमार्फत प्रकाशित होणेस विनंती आहे.

सोबत ओरिया भाषेत तयार केलेली स्तवनमंजरीची प्रत सादर केली आहे, असे कळविले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** सध्या विक्री करणेत येत असलेल्या प्रत्येक संस्थान प्रकाशित पुस्तकांची छपाई करण्यापूर्वी त्याचे प्रुफ रिडींग संबधित भाषेच्या प्रांतातील मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील तज्ञ व्यक्तीकडून केले जाते. त्याप्रमाणे प्रेसधारकांकडून छपाई करण्यात येते.

संस्थानमार्फत श्री साईबाबांच्या जीवनावर आधारित श्री साईसच्चरित १६ भाषांमधून व इतर तत्संबंधित भाषांमधून प्रकाशित करण्यात येतात. त्यातील श्री साईनाथ स्तवनमंजरी मराठी, हिन्दी, इंग्रजी व इतर सहा भाषेमध्ये उपलब्ध आहे. ओरिया भाषेतील श्रीसाईचरित्राची सन १८-१९ मध्ये वार्षिक विक्री ८५२८ नग व ओरिया आरतीची विक्री ५९०३ नग झालेली आहे.

श्रीसाईनाथ स्तवनमंजरीचे महत्व विचारात घेता,अर्जदार यांनी सादर केलेली ओरिया भाषेतील स्तवनमंजरीची प्रत त्या प्रांतातील मान्यताप्राप्त विद्यापीठातील तज्ञ व्यक्तीकडून पुर्वतपासणी करुन त्यानंतर

प्रायोगिक तत्वावर सुरवातीस या पुस्तिकेच्या साधारण ५००० प्रती छापून विक्रीचा अंदाज घेता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव- तरी विभागाच्या आभिप्रायात नमुद केल्याप्रमाणे ओरिया भाषेतील स्तवनमंजरीची प्रत त्या प्रांतातील मान्यताप्राप्त विद्यापीठातील तज्ञ व्यक्तीकडून पुर्वतपासणी करुन त्यानंतर प्रायोगिक तत्वावर सुरवातीस या पुस्तिकेच्या साधारण ५००० प्रती छापून घेणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ स्तवनमंजरी पुस्तक ओरिया भाषेत छपाई करुन त्या प्रांतातील मान्यताप्राप्त विद्यापीठातील तज्ञ व्यक्तीकडून तपासणी करुन त्याचा अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.४७** **देणगीदार व मान्यवरांना भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह खर्ची टाकणेबाबत**.

**प्रस्ताव-** अधिनियमः-सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ मध्ये मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयः-

१) दि.०४.०७.२०१९ निर्णय क्रं.३२७.- यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१.०४.२०१८ ते ३१.०३.२०१९ या कालावधीत मान्यवरांना देण्यास आलेल्या पुस्तके, फोटो, सीडी, डायरी व कॅलेंडर्स याकामी झालेल्या एकुण रक्कम रु १७,७९,२४९/-मात्रचे खर्चास तसेच सदरची रक्कम प्रकाशने विभाग (Publication Expenses) खाती खर्ची टाकणेस मान्यता देण्यात आली.

प्रास्तविकः- संस्थानचे देणगीदार साईभक्त, श्रींचे दर्शनासाठी आलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रातील अतिमहत्वाच्या व्यक्तींना, जनसंपर्क कार्यालयामार्फत आयोजीत पत्रकार दिन, संतकवी दासगणु महाराज पुण्यतिथी उत्सव कार्यक्रम, मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.सदस्य व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, शैक्षणिक संकुलात होणारे कार्यक्रम व सेवानिवृत्त कर्मचारी निरोप समारंभ इत्यादीना पुस्तके, फोटो, सीडी, डायरी व कॅलेंडर्स भेट म्हणुन देण्यात येत असतात. सदरचे प्रकाशने साहित्य सन २०१९-२०२० साठी विभागांचे मागणीनुसार निःशुल्क देण्यात आले असून सदरचा तपशील खालील तक्त्यात नमुद केलेला आहे.

| **अ.नं** | **पी यु बी कोड नं.** | **पुस्तकांचे नाव** | **भाषा** | **प्रती X छपाई मुल्य** | **एकूण रुपये** |
|---|---|---|---|---|---|
| १. | पी यु बी नं १ | श्री साईसच्चरित | मराठी | ६८३ X ८४.०० | ५७,३७२.०० |
| २. | पी यु बी नं १ | श्री साईसच्चरित | मराठी | ३७७ X ८७.३६ | ३२,९३४.७२ |
| ३. | पी यु बी नं २ | श्री साईचरित्र | हिंदी | २१८७ X ४२.५० | ९२,९४७.५० |
| ४. | पी यु बी नं ३ | श्री साईचरित्र | इंग्रजी | ३६१६ X ३७.३० | १,३४,८७६.८० |
| ५. | पी यु बी नं ४ | श्री साईचरित्र | गुजराथी | ४२१ X ४३.०० | १८,१०३.०० |
| ६. | पी यु बी नं ५ | श्री साईचरित्र | कन्नड | ५१४ X ४७.०० | २४,१५८.०० |
| ७. | पी यु बी नं ६ | श्री साईचरित्र | तेलुगु | ३२०३ X ४६.५० | १,४८,९३९.५० |
| ८. | पी यु बी नं ७ | श्री साईचरित्र | तामीळ | ९४८ X ६०.७० | ५७,५४३.६० |
| ९. | पी यु बी नं १४ | श्री साईबाबा आरती | मराठी | ५० X ४.८० | २४०.०० |
| १०. | पी यु बी नं १९ | श्री साईबाबा स्तवंनमंजरी | मराठी | ३३६ X २.३६ | ७९२.९६ |
| ११. | पी यु बी नं १०० | श्री साईसच्चरित डिलक्स पोथी | मराठी | ३० X १५८.०० | ४,७४०.०० |
| | | | | **एकुण रुपये** | **५,७२,६४८.०८** |
| **अ.नं** | **पी यु बी कोड नं.** | **सीडीचे नाव** | **भाषा** | **प्रतीX छपाई मुल्य** | **एकुण रुपये** |
| १. | पी यु बी नं २१८ | आरती यु एस बी व्हीडीओ | मराठी | १ X ३२८.०० | ३२८.०० |
| | | | | **एकुण रुपये** | **३२८.००** |

| अ.नं | पी यु बी कोड नं. | श्री साई डायरी व कॅलेंडर्स | वर्ष | प्रतीX छपाई मुल्य | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | पी यु बी नं ३१७ | श्री साई डायरी (डिलक्स)-२०१९ | २०१९ | ९४३ X ८५.४० | ८०,५३२.२० |
| २. | पी यु बी नं ३१९ | श्री साई डायरी (डिलक्स)-२०२० | २०२० | १३६ X ८१.७५ | ११,११८.०० |
| ३. | पी यु बी नं ४६७ | श्री साई कॅलेंडर्स २०१९ | २०१९ | २ X १४.९६ | २९.९२ |
| ४. | पी यु बी नं ४६८ | श्री साई डिलक्स वॉल कॅलेंडर्स २०१९ | २०१९ | ५१ X २०७.०० | १०,५५७.०० |
| ५. | पी यु बी नं ४७० | श्री साई 3D वॉल कॅलेंडर्स २०१९ | २०१९ | ४ X २३५.०० | ९४०.०० |
| ६. | पी यु बी नं ४७१ | श्री साई 3D डेस्क कॅलेंडर्स२०१९ | २०१९ | ५ X ११९.०० | ५९५.०० |
| ७. | पी यु बी नं ४७२ | श्री साई डेस्क कॅलेंडर्स२०१९ | २०१९ | २२ X ५०.४० | १,१०८.८० |
| ८. | पी यु बी नं ४७३ | श्री साई वॉलकॅलेंडर्स(ऑफिस)२०१९ | २०१९ | ६ X २४.६६ | १४७.९६ |
| ९. | पी यु बी नं ४७७ | श्री साई डिलक्स वॉल कॅलेंडर्स २०२० | २०२० | २० X १७८.०० | ३,५६०.०० |
| १०. | पी यु बी नं ४७८ | श्री साई मॅटपॅट वॉल कॅलेंडर्स २०२० | २०२० | १ X १७२.०० | १७२.०० |
| | | | | **एकुण रुपये** | **१,०८,७६०.८८** |

| अ.नं | पी यु बी कोड नं | फोटोंचा तपशील | प्रतीXछपाई मुल्य | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | पी यु बी नं ७२८ | द्वारकामाई फोटो (२० X २८) | ५ X ६.२० | ३१.०० |
| २. | पी यु बी नं ७३८ | 3D साईबाबा फोटो (फायबर फ्रेम) | १११ X २३६.०० | २६,१९६.०० |
| ३. | पी यु बी नं ७४० | 3D फोटो पालखी POKET B/w | ३००X३.८७ | १,१६१.०० |
| ४. | पी यु बी नं ७४१ | 3D फोटो स्टोन POKET B/w | ११३०० X ३.७४ | ४२,२६२.०० |
| | | | एकुण रुपये | **६९,६५०.००** |

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | पुस्तके | ५,७२,६४८.०८ |
| ०२. | सीडी | ३२८.०० |
| ०३. | श्री साई डायरी व कॅलेंडर्स | १,०८,७६०.८८ |
| ०४. | फोटो | ६९,६५०.०० |
| | **एकुण रुपये** | **७,५१,३८६.९६** |
| | **पुर्णांकीत रुपये** | **७,५१,३८७.००** |

**(अक्षरी रु.** सात लाख, एक्कावन हजार,तीनशे सत्याऐंशी मात्र**)**

**विभागाचा अभिप्राय-** अधिनियमातील तरतुदीस अधिन राहून आर्थिक वर्ष २०१९-२०२० करिता संस्थानमार्फत भेट देण्यात आलेली प्रकाशने (पुस्तके, फोटो, सीडी, डायरी व कॅलेंडर्स) किंमतीसह खर्ची टाकता येतील, असे नम्र मत आहे.

**प्रस्ताव-** तरी दि.०१.०४.२०१९ ते ३१.०३.२०२० अखेर मोफत देण्यात आलेल्या पुस्तके, फोटो, सीडी, डायरी व कॅलेंडर्सच्या रक्कम रुपये. **७,५१,३८७/-** झालेल्या खर्चास मान्यता मिळणेस व सदर खर्च प्रकाशने विभाग (Publication Expenses) खाती खर्ची टाकणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१.०४.२०१९ ते ३१.०३.२०२० या कालावधीत मोफत देण्यात आलेल्या पुस्तके, फोटो, सीडी, डायरी व कॅलेंडर्सच्या रक्कम रु.७,५१,३८७/-मात्रचे खर्चास तसेच सदरचा खर्च प्रकाशने विभाग (Publication Expenses) खाती खर्ची टाकण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.४८** **श्री गुरुपौर्णीमा व श्री पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका, पाकीटे छपाईकामी प्राप्त ई-निविदेतील न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत**.

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

४) अधिनियम कलम १९ (१) समारंभ,उत्सव, पूजा इत्यादींची शिफारस करण्यासाठी आश्रयदाते, आजीव सदस्य, सर्वसामान्य सदस्य, सन्मान्य सदस्य, सहयोगी सदस्य आणि संस्था सदस्य (संलग्न) यांचा समावेश असलेले एक भक्त मंडळ असेल, सदस्यत्वाच्या प्रत्येक प्रकारासाठी वर्गणीचा दर विनियमांव्दारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असेल.

(२) कोणत्याही व्यक्तीस, मग तिची जात, धर्म अथवा लिंग कोणतेही असले तरी, भक्तमंडळाचे सदस्यत्व देण्यात येईल. परंतु, अशा व्यक्तीने वयाची अठरा वर्ष पूर्ण केली असली पाहिजेत व ती श्री साईबाबांचा भक्त असली पाहिजे.

(३) भक्तमंडळाच्या सदस्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि कर्तव्ये विनियमांव्दारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असतील.समिती, भक्तमंडळाच्या सदस्यत्वासाठी अर्ज करणा-या अर्जदाराने पूर्ण करावयाच्या इतर अटी व शर्ती देखील विनियमांव्दारे निर्धारित करुन देईल.

उपरोक्त अधिनियमास अनुसरुन संस्थान व्यवस्थापनाने तयार केलेले श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) भक्तमंडळ विनियम सन २०१३ मध्ये शासनाने मान्य केलेले आहेत. या विनियमातील कलम (४) भक्त मंडळाच्या सभासदांचे हक्क आणि विशेषाधिकार यामध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

१) भक्तमंडळांच्या सभासदांना संस्थानच्या तीन उत्सवाचे म्हणजेच रामनवमी, गुरुपौर्णिमा आणि साईबाबांची पुण्यतिथी या उत्सवांचे निमंत्रण पाठविण्यात येईल. असे निमंत्रण डाकेने, एक्सप्रेस कुरीयरने, फॅक्स, ई-मेल व्दारा किंवा इलेक्ट्रॉनीक संपर्काच्या इतर कोणत्याही पध्दतीने पाठविण्यात येईल.

२) वर उल्लेख केलेल्या तीन अधिकृत उत्सवानंतर प्रत्येक सभासद डाकेने **‘उदीप्रसाद’** प्राप्त होण्यास पात्र असेल.

३) हे विनियम लागू होण्यापूर्वीचे आश्रयदाते आणि आजीव सभासदांचे सर्व हक्क आणि विशेषाधिकार पुढे चालु रहातील

मा. तदर्थ समितीचे दि.०६.०२.२०२० चे सभेतील निर्णय क्र.७१- वरील नियमांचे अवलोकन करण्यात येऊन, तसेच भक्तमंडळाच्या सभासदत्वापोटी( कायम निधी- Permanent Fund) दि.३१.०३.२०१९ अखेर रक्कम रुपये २८,०३,१८,२७३/- एवढी व्याजासह जमा आहे. साईभक्त सभासदांना उत्सवाच्या ज्या निमंत्रण पत्रिका पाठवल्या जातात त्यांचा छपाईपासून त्या पोस्टात पडेपर्यंतचा सर्व खर्च या व्याजातूनच वळता होत असल्याने त्यासाठी संस्थानच्या तिजोरीतून कुठलीही वेगळी किंवा जास्तीची रक्कम खर्च होत नाही. तसेच या निमंत्रण पत्रिकेच्या पाकीटातूनच ‘उदीप्रसाद’ पाठविला जातो कारण तशी तरतुद आहे व ‘उदीप्रसादाशी’ भक्तांच्या धार्मिक भावना जोडलेल्या आहेत. त्यामुळे पाकीट व्यवस्थित असणे आवश्यक आहे, असे समितीचे मत झाले. याकरीता संस्थानमार्फत साज-या होणा-या सन २०२० मधील तीनही उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या पर्याय क्रमांक १ प्रमाणे छपाई करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.११,५५,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे असे ठरले.

मा. तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० चे सभेतील निर्णय क्र.२६९- श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२० चे निमंत्रण भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना, मान्यवरांना ई-मेल/SMS व्दारे देण्यात यावे

व नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रातून प्रेस नोट (न्यूज ॲटम) प्रसिध्दीस देण्यात यावी. तसेच उदी प्रसाद पोस्टाव्दारे पाठविण्यात यावा,असे ठरले. यासाठी किती खर्च अपेक्षीत आहे, याचा अभ्यास करुन चक्रिय पद्धतीने मान्यता घ्यावी, असे ठरले.

सध्या संपूर्ण भारतात कोव्हीड १९ (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने शनिवार, दि.०४.०७.२०२० ते सोमवार, दि.०६.०७.२०२० याकालावधीत साजरा करावयाच्या श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२० बाबत अभ्यासपूर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले.

प्रस्तावना:– मा.तदर्थ समितीचे दि.०६/०२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.७१ अन्वये सन २०२० मध्ये संस्थानमार्फत साज-या करण्यात येणा-या प्रत्येक उत्सवाच्या १,८०,००० निमंत्रणपत्रिका व पाकिटे छपाई करणेकामी विहीत पध्दतीने ई-निवीदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.११,५५,६००/- (रुपये अकरा लाख पंच्चावन्न हजार सहाशे) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे असे ठरले होते.

त्यास अनुसरुन संस्थानमार्फत साज-या होणा-या सन २०२० मधील तीन उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका छपाई करणेबाबतचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दाखल करण्यात आला असता उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.११,५५,६००/- मात्रचे खर्चास मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०९/०३/२०२० रोजी मान्यता दिली आहे

मा. उच्च न्यायालयाच्या मान्यतेनूसार श्री रामनवमी उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेकामी ई-निविदा मागविणेकामी जाहिरात देणे, ई-निविदा मागविणे, ई-निविदा उघडणे व याबाबतचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेस, इतिवृत्त प्राप्त होणे, छपाईधारकास छपाई कामाचा कार्यादेश देणे, पत्रिकेचे नमुने तयार करणे, मान्य होणे, प्रुफ तपासणे अशा कामांसाठी अंदाजे २५ ते ३० दिवसांचा कालावधी लागणार असल्याने, उत्सवापूर्वी भक्तमंडळाच्या सभासदांना निमंत्रण पत्रिका वेळेत पाठविता येणे शक्य नसल्याने तातडीची बाब म्हणून शासन खरेदी नियमावलीतील प्रकरण क्र.४.५ मधील (पान नं.६८) तातडीची खरेदी आदेश प्रक्रियातील तरतुदीचा आधार घेण्यात येऊन सोहेल एंटरप्रायेजस, मुंबई यांनी देवू केलेल्या निम्नतम दरात (दर रु.२.११६८ एकूण रक्कम ३,८१,०२४/-) निमंत्रणपत्रिका छापून घेण्यात आल्या.

त्यानंतर श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका,पाकीटे छपाईकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन दि.३०.०४.२०२० ते दि. ०८.०५.२०२० अखेर ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. याकामी एकूण ७ निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदरच्या ई-निविदेतील तांत्रिक (Technical Bid) बीड दि.२०.०५.२०२० रोजीचे खेरदी समितीचे सभेत उघडण्यात येऊन, निविदेतील कागदपत्रांची तपासणी केली असता,खालील नमुद केलेप्रमाणे सर्व निविदाधारक पात्र ठरले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | पात्र/ अपात्र |
|---|---|---|
| १ | अभियांकित प्रिंटर्स, नाशिक | पात्र |
| २ | गणेश आर्ट प्रिन्टर्स, अहमदनगर | पात्र |
| ३ | मधुरा प्रिंट सोलूशन, नाशिक | पात्र |
| ४ | निट प्रिंटर्स, अहमदनगर | पात्र |
| ५ | प्रदीप पॅकेजींग, दौंड पुणे | पात्र |
| ६ | प्रवरा ऑफसेट, लोणी | पात्र |
| ७ | श्री गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक | पात्र |

त्यानंतर दि. १५.०६.२०२० रोजीचे खेरदी समितीचे सभेत ई-निविदेतील तांत्रिक बीडमध्ये पात्र असलेल्या ७ निविदाकारांचे व्यावसायिक (Commercial) बीड उघडण्यात आले, त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं | निविदा धारकाचे नांव | सादर केलेलेदर प्रती नग रु. | जीएसटी | एकूण दर |
|---|---|---|---|---|
| १ | अभियांकित प्रिंटर्स, नाशिक | २.०७ | ०.२५ | २.३२ |
| २ | गणेश आर्ट प्रिन्टर्स,अहमदनगर | ३.१५ | ०.३८ | ३.५३ |
| ३ | मधुरा प्रिंट सोलूशन, नाशिक | १.८५ | ०.३३ | २.१८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | निट प्रिंटर्स, अहमदनगर | २.६८ | ०.३२ | ३.०० |
| ५ | प्रदीप पॅकेजींग, दौंड पुणे | १.९० | ०.२३ | २.१३ |
| **६** | **प्रवरा ऑफसेट, लोणी** | १.८४ | ०.२२ | २.०६ |
| ७ | श्री गणेश एन्टरप्रायजेस, नाशिक | २.०७ | ०.३७ | २.४४ |

**विभागाचा अभिप्रायः-** मा.तदर्थ समितीचे दि.११/०५/२०२० चे सभेतील निर्णय क्र.२६९ अन्वये श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२० चे निमंत्रण भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना, मान्यवरांना ई-मेल/SMS व्दारे देण्यात यावे व नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रातून प्रेस नोट (न्यूज ॲटम) प्रसिध्दीस देण्यात यावी. तसेच उदी प्रसाद पोस्टाव्दारे पाठविण्यात यावा,असे ठरले आहे. त्यामुळे गुरुपौर्णिमा उत्सवाच्या निमंत्रणपत्रिकांची छपाई आता करण्यात येणार नाही.आता फक्त श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२० च्या निमंत्रणपत्रिका उपरोक्त नमुद केलेल्या तक्त्यातील अ.नं.६ चे न्युनतम प्रेसधारक प्रवरा ऑफसेट, लोणी यांचेकडून प्रती नग रु.२.०६ पैसे या दरात छपाई करुन घेता येतील असे नम्र मत आहे.

**प्रस्तावः-** तरी विभागाचे अभिप्रायात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०२० च्या निमंत्रणपत्रिका न्युनतम प्रेसधारक प्रवरा ऑफसेट, लोणी यांचेकडून प्रती नग रु.२.०६ पैसे या दरात छपाई करुन घेणेकामी निर्णयार्थ सादर .

**निर्णय क्र.४०२ सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-शताब्दी कक्ष )**

---

**विषय नं.४९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी, नाटयरसिक मंच (संच) व शिर्डी ग्रामस्थ यांचे संयुक्त विद्यमाने २६वा श्री साईसच्चरित पारायण सोहळा साजरा करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्याप्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील

**मा. तदर्थ(Ad-hoc) समितीचे सभेतील निर्णय-** दि.११.०५.२०२० चे सभेतील निर्णय क्र.२७२

सध्या संपुर्ण भारतात कोव्हीड १९ (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने या पार्श्वभुमीवर श्री साईसच्चरित पारायण सोहळा कार्यक्रमाचे स्वरुप निश्चित करण्यात येऊन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.

**प्रस्तावना–** दरवर्षी श्रावण महिन्यात (श्रावण शुध्द प्रतिपदेला) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी आयोजित नाट्य रसिक मंच (संच)शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ यांचे सहकार्याने सामुदायिक श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित करण्यात येतो.

श्री साईसच्चरित पारायणाची सुरुवात श्रावण शुध्द प्रतिपदेला समाधी मंदिरातून श्रींच्या पोथी व फोटोची व्दारकामाई मार्गे पारायण मंडपापर्यंत मिरवणूक व ग्रंथ आणि कलश पूजा करुन होते. त्यानंतर रोज साईचरित्रात नमुद केलेप्रमाणे दोन सत्रात (पुरुष सकाळी स्त्री दुपारी) अध्याय वाचन केले जाते. आठव्या दिवशी अवतरणीकेचे वाचन होते त्याच दिवशी सायंकाळी साईचरित्र पोथीची गावातून मिरवणूक निघत असते . नवव्या दिवशी काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसाद दिला जातो.

परंपरेप्रमाणे श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे हे २६ वे वर्ष असून हा सोहळा मंगळवार, दि.२१.०७.२०२० ते बुधवार दि.२९.०७.२०२० या कालावधीत आहे.

नाट्य रसिक मंच (संच), शिर्डी यांचे दि.०६.०४.२०२० रोजीचे पत्रास अनुसरुन श्री साईसच्चरित पारायण सोहळा २०२० साजरा करणेस व त्याचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० चे सभेत सादर करण्यात आला असता उपरोक्त नमुद केलेप्रमाणे निर्णय झाला आहे.

त्यानंतर आता शिर्डी ग्रामस्थ यांचे दि.२३.०६.२०२० चे निवेदन आहे की, "दरवर्षी श्री साईबाबा संस्थान व शिर्डी ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने श्रावण महिन्यात श्री साईचरित्राचे सामुदायिक पारायण आयोजित करण्यात येते. या पारायणास ग्रामस्थ व साईभक्त यांचा फार मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळतो.

तथापि, या वर्षी कोरोना व्हायरस संसर्गामुळे गर्दी करण्यावर, गर्दीचे कार्यक्रम करण्यावर निर्बंध घालण्यात आलेले आहेत. सदर पारायणासाठी सरासरी ७ हजार पारायणार्थी उपस्थित असतात. सध्या असलेल्या कोरोना व्हायरसच्या संसर्गाचा विचार करता एवढ्या मोठ्या प्रमाणात माणसें एकत्र येणें आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक ठरु शकतें. परंतु या पारायणाची गेल्या २५ वर्षांची दीर्घ परंपरा विचारात घेता या परंपरेला छेद जाऊ नये म्हणून सामुदायिक स्वरुपात पारायण आयोजित न करता संस्थानला सोयीस्कर असलेल्या ठिकाणी संस्थान पुजा-यांची पारायण वाचनाची बैठक व्यवस्था करुन (एखादा हॉल किंवा रुम) त्यांच्या वाचनाचे स्थानिक दूरचित्रवाहिन्यांव्दारे शिर्डी गावात थेट प्रक्षेपण करावे या प्रक्षेपणाच्या अनुषंगाने घरोघरी साईभक्त ग्रामस्थ पारायण करु शकतील. असें केल्यास पारायणाच्या दीर्घ परंपरेत खंड न पडता या परिस्थितीतही ते अखंडपणे सुरु राहिल. तरी या पध्दतीने पारायणाचे आयोजन करुन समस्त शिर्डी ग्रामस्थ व साईभक्तांना त्याचा लाभ करुन द्यावा अशी विनंती आहे."

त्यानंतर शिर्डी ग्रामस्थ यांचे दि.२५.०६.२०२० चे निवेदनानुसार शिर्डी ग्रामस्थांनी गोकुळाष्टमी उत्सव ८ दिवसांचा करावा व त्याचवेळी श्री साईसच्चरित पारायणाचे आयोजन करावे अशी विनंती केली आहे.

त्यानंतर नाटय रसिक मंच, शिर्डी यांनी दि.०१.०७.२०२० चे पत्रान्वये या वर्षीच्या श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे आयोजनाकामी,"आमचे मंडळाचे सदस्यांना चर्चेसाठी निमंत्रीत केल्यास आम्ही सर्व सदस्य प्रत्यक्ष हजर राहून त्यावर सविस्तर चर्चा करुन आपले मार्गदर्शनाप्रमाणे नियोजन करणेस सोईस्कर राहिल आणि त्याप्रमाणे वाचकांना कळविणेसाठी सोईस्कर राहिल वाचकांना निश्चित माहिती मिळेल त्यासाठी लवकर आम्ही सर्व मंडळाचे सदस्यांना आमंत्रित करावे" असे कळविले होते.

उपरोक्त दोन्ही पत्रांच्या अनुषंगाने दि.०७.०७.२०२० रोजी नाट्य रसिक मंच शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ यांना श्री साईसच्चरित पारायण सोहळा व गोकुळाष्टमी उत्सवाबाबत चर्चा करणेकामी निमंत्रित करण्यात आले होते.

नाटय रसिक मंच शिर्डी यांनी श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे आयोजन श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप (१६ गुंठे) या ठिकाणी करुन त्याचे प्रक्षेपण टाटा स्काय व स्थानिक दुरचित्रवाहिन्याव्दारे करावे, पारायण सोहळयाचे वेळी विणेकरी २४ तास उपलब्ध ठेवावा, काल्याचे कीर्तन ठेवावे तसेच पारायण समाप्तीनंतर महाप्रसाद वाटावा अशी विनंती केली आहे.

शिर्डी ग्रामस्थ, शिर्डी यांनी श्रावण महिन्याच्या पहिल्या दिवसापासून (प्रतिपदेपासून) सुरु होणारा श्री साईसच्चरित पारायण सोहळा पुढे ढकलून पारायण सोहळयाचे काल्याचे कीर्तन गोकुळाष्टमीचे दिवशी येईल अशा बेताने करावा, सध्या समाधी मंदिरात समाधीवर दोन पुजा-यामार्फत करण्यात येणा-या ग्रंथ वाचनाचे धर्तीवर त्याच ठिकाणी श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे वाचनाचे आयोजन करुन त्याचे प्रक्षेपण टाटा स्काय, वेबिनार व स्थानिक दुरचित्रवाहिन्याव्दारे करावे त्यासाठी ग्रामस्थामार्फत आवश्यक ती तांत्रिक मदत उपलब्ध करुन देण्यात येईल व पारायण समाप्तीनंतर महाप्रसाद वाटावा अशी विनंती केली आहे.

उपरोक्त दोन्ही प्रतिनिधींना त्यांची विनंती मा. तदर्थ समितीसमोर सादर करण्यात येऊन त्यावर होणारा निर्णय कळविला जाईल असे सांगण्यात आले.

**विभागाचा अभिप्राय-** सध्या संपूर्ण भारतात कोव्हीड १९ (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने श्री साईबाबांचे मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आले आहे. ते दर्शनासाठी परत कधी सुरु होईल याची शाश्वती नाही. कोरोना व्हायरसच्या संसर्गामुळे गर्दी करण्यावर, गर्दीचे कार्यक्रम करण्यावर शासनामार्फत निर्बंध घालण्यात आलेले आहेत. तसेच राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायद्यान्वये अधिसुचना निर्गमीत करण्यात आलेली आहे. सदरच्या अधिसूचनेचा कालावधी महाराष्ट्रात व

अहमदनगर जिल्ह्यात ३१ जुलै २०२० पर्यंत आहे त्यामुळे चालु वर्षी सामुदायिकरित्या पारायण सोहळा आयोजित करता येणार नाही.

तथापि या पारायण सोहळ्याची गेल्या २५ वर्षांची दीर्घ परंपरा विचारात घेता या परंपरेला छेद जाऊ नये म्हणून सामुदायिक स्वरुपात पारायण आयोजित न करता संस्थानला सोयीस्कर असलेल्या ठिकाणी (समाधी मंदिरासमोरील स्टेज, ध्यानमंदिर, पारायण हॉल) संस्थान पुजा-यांची पारायण वाचनाची बैठक व्यवस्था करुन वाचनाचे थेट प्रक्षेपणाबाबत मा. तदर्थ समितीचे निर्देशाप्रमाणे पुढील कार्यवाही करता असे नम्र मत आहे.

पारायण समाप्तीनंतर काल्याचे कीर्तन ठेवता येईल. तसेच पारायण समाप्तीनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवसथा, शिर्डी,नाटय रसिक मंच व शिर्डी ग्रामस्थ यांचेमार्फत घरोघरी महाप्रसाद (बुंदी) बंद पाकीटात वाटपाच्या व्यवस्थेबाबत प्रसंगानुरुप निर्णय घेण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असावेत असे नम्र मत आहे.

श्री साईसच्चरित पारायण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन उपरोक्तप्रमाणे केल्यास साधारणतः खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशील | श्री साई सच्चरित पारायण सोहळा -२०१९ | | श्री साई सच्चरित पारायण सोहळा -२०२० |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजे खर्च | **प्रत्यक्ष खर्च** | **अंदाजे खर्च** |
| १ | मंडप, मॅटिंन व स्टेज | २३,०३,४९० | **१२,८१,४००** | ० |
| २ | कलाकार/किर्तनकार बिदागी | १४,६०,००० | **५,९४,७७१** | ० |
| ३ | प्रसाद खर्च, (चहा,कॉफी व दुध खर्चासह) | ७,८३,४१६ | **५,६७,६४१** | (बुंदी प्रसादासाठी) २,५०,००० |
| ४ | जादा (कंत्राटी) कामगार | ३,४३,१३८ | **३,०१,५९१** | -- |
| ५ | फुल सजावट खर्च | ६०,००० | **७५,०००** | |
| ६ | इतर खर्च | ५०,२४० | **-** | ५०,००० |
| | **एकुण** | ५०,००,२८४ | **२८,२०,४०३** | **३,००,०००** |

सन २०१९ मध्ये पारायणासाठी बसलेल्या पारायणार्थी व इतर साईभक्त व ग्रामस्थ यांचेकडून रोख स्वरुपात अन्नदानखाती रक्कम रु.१,७७,४५९/- जमा झाली होती तर रक्कम रु.२,४८,५५०/-चा शिधा प्रसादालयात व रक्कम रु.२,४०,५४७/- चा शिधा (१७ वस्तु ) पारायणार्थी , इतर साईभक्त व ग्रामस्थ यांचेतर्फे संस्थानचे भांडारमध्ये जमा करण्यात आला होता. (एकूण रक्कम रु.६,६६,५५६/-)

प्रस्ताव– तरी विभागाच्या अभिप्रायात नमूद केलेप्रमाणे पारायण सोहळयाची गेल्या २५ वर्षांची दीर्घ परंपरा विचारात घेता या परंपरेला छेद जाऊ नये म्हणून सामुदायिक स्वरुपात पारायण आयोजित न करता संस्थानला सोयीस्कर असलेल्या ठिकाणी ( समाधी मंदिरासमोरील स्टेज, ध्यानमंदिर, पारायण हॉल) संस्थान पुजा-यांची पारायण वाचनाची बैठक व्यवस्था करुन त्याचे प्रक्षेपणाबाबत निर्णय होणेस , काल्याचे कीर्तन ठेवणेस, पारायण समाप्तीनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवसथा, शिर्डी,नाटय रसिक मंच व शिर्डी ग्रामस्थ यांचेमार्फत घरोघरी महाप्रसाद (बुंदी) बंद पाकीटात वाटपाच्या व्यवस्थेबाबत प्रसंगानुरुप निर्णय घेण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देणेस तसेच पारायण सोहळयास येणा-या रक्कम रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख ) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४०३** **सदरचे प्रस्तावावर आजचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०३ निर्णय क्र.४१६ नुसार निर्णय घेण्यात आलेला आहे.**

**(कार्यवाही-शताब्दी कक्ष )**

---

**विषय नं.५०** **श्री साईबाबा समाधी मंदिरात साजऱ्या होणाऱ्या गोकुळाष्टमीबाबत उत्सवाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे

आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्याप्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील

**प्रस्तावना**– शिर्डी ग्रामस्थ यांचे दि.२५.०६.२०२० चे निवेदन आहे की, "श्री साईबाबा समाधीस्त होण्यापूर्वी राधाकृष्णाआईच्या पुढाकारातून गोकुळाष्टमी या उत्सवाला सुरुवात झाली होती. बाबा दिवसाआड चावडीत झोपत. श्रीकृष्णाचा जन्मकाल रात्रीचा असल्याने गोकुळाष्टमीची रात्र बाबांच्या चावडीच्या दिवशी आली तरच कृष्णजन्म त्यांचेसमोर चावडीत केला जात असे. व्दारकामाईत रात्री ठरावीक भक्तांशिवाय इतरांना जाण्याचा रिवाज नसल्याने बाबा ज्या रात्री व्दारकामाईत असत त्या रात्री गोकुळाष्टमी असल्यास जन्मोत्सव साजरा करणे शक्य नसे. १९१८ साली बाबा समाधीस्त झाल्यानंतर शिर्डीतील चार मुख्य उत्सवाच्या जबाबदा-या वाटून देण्यात आल्या त्यात गोकुळाष्टमी उत्सव तात्या पाटील कोते यांच्याकडे सोपवण्यात आला.

या उत्सवात पूर्वीपासूनच सप्ताह, भजनी दिंड्या व मोठा भंडारा इकडेच जास्ती लक्ष दिले जात असे. जवळपासच्या गावातील दिंड्या यात सहभागी होत. बाबा समाधीस्त झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात नाऊर, नांदूर, सावखेडे, गोंडेगाव, वीरगाव, पढेगाव, लाडगाव, पुरणगाव, अंदरसुल, कोकमठाण, धोतरे, लाख, मातुलठाण, पुणतांबे, शिंगवे, भेर्डापूर, खुरसानगाव, पाथरे, मांजरी, राहाते, चिंचपूर आदी गावांमधून लोक दिंड्या घेवून येत. उत्सवात मारुतीबुवा राहतेकर, बाबुरावबुवा औरंगाबादकर, व्यंकटस्वामी पुणेकर, आप्पाजीबुवा मातूलठाणकर, गंगारामबुवा, कोकमठाणचे महाजनबुवा, पिंपळवाडीचे भिमाजीबुवा सुतार, भिकचंदबुवा आदी किर्तनकार मंडळी सकाळ संध्याकाळ कीर्तने करत.

श्रावण वद्य व्दितीयेपासून या उत्सवाला सुरुवात होत असे, गर्दीमुळे समाधी मंदीराचा सभामंडप अपुरा पडू लागला तर मशिदीसमोरील सभामंडपात सप्ताह उभा करण्यात येत असे. समाधी समोरील पटांगणात सकाळ संध्याकाळ किर्तने होत. आठही दिवस जेवणावळ्या चालत. जन्माष्टमीच्या रात्री कृष्णजन्माचा कार्यक्रम होत असे, नवमीच्या सकाळी सुर्योदयाला सप्ताहाची सांगता होत. त्याच संध्याकाळी गोपाळकाला होवून रात्री गावातून रथाची मिरवूणक निघे, या उत्सवाचा भोजन खर्च तात्या पाटील कोते, बाळा जगताप, बळवंतराव पुणेकर, सखाराम महादू कोते, मंगनीराम खाबिया, नंदराम संकलेचा, नारायण गणपत शेळके, राहात्याचे धनराज व दिपचंद पिपाडा, बापुराव पुणेकर आदी गावकरी मंडळी आपसात वाटून घेत. याशिवाय लागणारा खर्च तात्यापाटील करीत. श्रावणात आठवडाभराच्या या उत्सवामुळे गावात चैतन्य येई. कालौघात हा उत्सव मागे पडला. आता जन्माष्टमीच्या रात्री मंदीरात कृष्णजन्माचा कार्यक्रम होतो तर दुस-या दिवशी सकाळी गोपाळकाला व रात्री बाबांच्या रथाची गावातून मिरवणूक काढण्यात येते. गोकूळाष्टमी कधीकाळी संस्थानातील चौथा व महत्वाचा उत्सव होता याची आज दुर्दैवाने अनेकांना माहितीही नाही.

साईबाबा संस्थानात आज रामनवमी, गुरुपौर्णिमा व पुण्यतिथी (दसरा) हे तीन मुख्य उत्सव साजरे करण्यात येत असले तरी बाबांच्या हयातीत व नंतरही अनेक वर्षे सुरु असलेल्या गोकुळाष्टमी उत्सवाला मात्र कालौघात मर्यादित स्वरुप प्राप्त झाले आहे.

गेल्या पंचवीस वर्षापासून सुरु असलेला श्रावणातील साईसच्चरित्र पारायण सोहळा व कृष्ण जन्माष्टमीचा कार्यक्रम एकत्र जोडले तर साईसाक्षीने सुरु झालेला हा आठ दिवसांचा उत्सव पुनर्जिवीत होवू शकेल. यासाठी पारायण सोहळा केवळ पंधरा दिवस पुढे ढकलावा लागेल. यंदाचा पारायण सोहळा २१ जुलै २०२० पासून आठ दिवसाचा आहे. हे पारायण श्रावण वद्य १, म्हणजे ४ ऑगस्ट २०२० पासून सुरु केले तर गोकुळाष्टमीला जोडले जाईल. विशेष म्हणजे या दिवसापासून श्रीकृष्ण नवरात्राचाही आरंभं होतो. गोकुळाष्टमी उत्सवात पूर्वी आठ दिवस जसे आठवडाभर कीर्तन, प्रवचन चालत साईसच्चरित्र पारायणाने हे दिवस भरुन काढता येतील. यंदा कोरोनामुळे पारायण घरोघरी होणार असले तरी पुढील वर्षी या बदलत्या पारायण सोहळ्यामुळे गोकुळाष्टमी उत्सवात रंगत येईल. मुख्य म्हणजे साईबाबांच्या हयातीत सुरु असलेला व काळाच्या ओघात मागे पडलेला गोकुळाष्टमी उत्सव पुनर्जिवीत होईल. यासाठी साईबाबा संस्थान, नाटय रसिक संच, प्रमुख ग्रामस्थ व तज्ञ पुरोहित मंडळीबरोबर विचारविनीमय केला तर एक जुनाच उत्सव नव्याने सुरु होईल भाविकांनाही यानिमितीने पावसाळ्यात शिर्डीला येण्याचे निमित मिळेल. शिर्डीच्या उर्जीतावस्थेसाठीही हा उत्सव उपयुक्तच

ठरेल. यावर्षी पारायण सोहळ्याची कोणतीही तयारी करायची नसल्याने गोकुळाष्टमी उत्सवात बदल करण्यास मोठी संधी आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे गोकुळाष्टमी उत्सवाबाबत श्री साईबाबा संस्थानने निर्णय घेणेस विनंती आहे.''

**विभागाचा अभिप्राय-** शिर्डी ग्रामस्थांनी गोकुळअष्टमी व पारायण सोहळा एकत्रित आयोजित करणेबाबत केलेल्या विनंतीबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

गोकुळाष्टमीबद्दल संस्थान प्रकाशित व (कै) श्री.गोविंद रघुनाथ दाभोलकर रचित श्री साईसच्चरित ग्रंथातील अध्याय क्र. १२ व ५२ मध्ये खालीलप्रमाणे उल्लेख आहे.

**अध्याय १२**

एकदां काका महाजनी | शिरडीस गेले मुंबईहुनी | एक आठवडा शिरडीस राहुनी | परतावें मनीं तयांचे ||३४|| चावडी सुंदर शृंगारीत | बाबांसमोर पाळणा टांगीत | कृष्णजन्माचा उत्सव करीत | आनंदें नाचत भक्तजन ||३५|| गोकुळाष्टमीचाही सोहळा | आनंदानें पहावा डोळां | साधूनि ऐसी मौजेची वेळा | काका शिरडीला पातले ||३६|| आरंभींच बाबांच्या दर्शना | जातां बाबा पुसती तयांना | ''परतणार केव्हां निजसदना''| विस्मित मना तैं काका ||३७|| भेटतांक्षणींच हा कां प्रश्न | काका जाहले विस्मयापन्न | राहूं शिरडींत आठ दिन | होतें कीं मन तयांचें ||३८|| बाबाचि जेंव्हां स्वयें पुसती| उत्तर देणें काकांप्रती | तेंही वाटे बाबाचि सुचविती | म्हणूनि देती योग्य तें ||३९||'' बाबा जेव्हां देतील आज्ञा | परतेन तेव्हां आपुले सदना''| प्रत्युत्तर येतांचि काकांच्या वदना | ''उदयीक जा ना'' म्हणाले ||४०|| आज्ञा केली शिरसा प्रमाण | करुनि बाबांसी अभिवंदन | असता अष्टमीसारखा सण | केलें प्रयाण तेच दिनीं ||४१||

**अध्याय ५२**

आदरें करितां ग्रंथवाचन | साईसमर्थ सुप्रसन्न | करी अज्ञानदारिद्र्य विच्छिन्न | ज्ञानधनसंपन्नता देई ||४९|| ग्रंथरचनी साईसंकेत | तैसेंच तयाचें गुप्त मनोगत | होईल जो तच्चरणानुरक्त | धन्य त्या जीवित भक्ताचें ||५०|| चित्त करुनियां सुसमाहित | नेमनिष्ठ हें सच्चरित | वाचावा एक तरी अध्याय नित | होईल अमित सुखदायी ||५१|| जया मनी स्वहितविचार | तेणें हा ग्रंथ वाचावा साचार | जन्मोजन्मी साईंचे उपकार | आनंदनिर्भर आठवील ||५२|| गुरुपौर्णिमा गोकुळअष्टमी | पुण्यतिथी रामनवमी | या साईंच्या उत्सवीं नियमी | ग्रंथ निजधामीं वाचावा || ५३||

वरील दोन्हीही अध्यायातील ओवीबध्द मजकुराचा ले. कर्नल श्री. मु.ब.निंबाळकर लिखीत श्री साईचे सत्यचरित्र या ग्रंथात पुढीलप्रमाणे गद्य अनुवाद आहे. श्री साईचे सत्यचरित्र हा दाभोळकरकृत श्री साईसच्चरित या ग्रंथाचा संस्थान प्रकाशित गद्य अनुवाद आहे.

**अध्याय १२**

एकदा काका महाजनी हे मुंबईचे शेठ धरमसी जेठाभाई यांच्या पेढीवर मुख्य कारभारी होते. मुंबईहून शिरडीला गेले होते. तेथे एक आठवडा राहून मग परतावे, असे त्यांच्या मनात होते. चावडी सुंदर शृंगारुन , बाबांसमोर पाळणा टांगुन भक्तजन कृष्णजन्माचा उत्सव करीत आणि आनंदाने नाचत असत. गोकुळ अष्टमीचा समारंभ आनंदाने डोळ्यांनी पहावा म्हणून ही मौजेची वेळ साधून काका शिरडीत आले होते. परंतु सुरुवातीलाच बाबांच्या दर्शनाला जाताच बाबांनी त्यांना विचारले, आपल्या घरी परत केव्हा जाणार? काका मनात आश्चर्यचकित झाले की, भेटल्याबरोबरच का हा प्रश्न ? त्यांच्या मनात तर शिरडीत आठ दिवस रहायचे होते ! बाबांनीच स्वतः जेव्हा प्रश्न विचारला तेव्हा काकांना उत्तर देणे भागच होते. परंतु ते देखील जणू काय बाबांनीच सुचविले म्हणून काकांनी योग्य तेच उत्तर दिले, ''बाबा जेव्हा आज्ञा देतील तेव्हा आपल्या घरी परत जाईन'', काकांकडून उलट उत्तर येताच बाबा म्हणाले, ''उद्याच जा ना''. काकांनी ती आज्ञा शिर वाकवून नम्रपणाने मान्य केली आणि बाबांना नमस्कार करुन गोकुळ अष्टमीसारखा सण असूनही त्याच दिवशी प्रयाण केले.

**अध्याय ५२**

पूज्य बुध्दीने ग्रंथाचे वाचन केले म्हणजे साईसमर्थ सुप्रसन्न होतात आणि अज्ञानरुपी दारिद्र्याचा नाश करुन ज्ञानरुपी धनसंपन्नता देतात. या ग्रंथाची रचना करण्याची योजना साईंचीच होती तशीच त्यांची गुप्त इच्छापण होती. त्यांच्या चरणी जो आसक्त होईल त्या भक्ताचे आयुष्य धन्य होय. चित्त चांगले एकाग्र करुन या सच्चरिताचा नियमितपणे व मोठ्या निष्ठेने दररोज एक तरी अध्याय वाचावा म्हणजे अमर्याद सुखाचा लाभ होईल. ज्याच्या मनात आपल्या कल्याणाचा विचार असेल त्याने खरोखर, मनापासून हा ग्रंथ वाचावा म्हणजे आनंदाने भारावून जाऊन साईनी केलेले उपकार जन्मोजन्मी आठवतील.गुरुपौर्णिमा, गोकुळाष्टमी, पुण्यतिथी व रामनवमी या साईंच्या उत्सवदिनी नियमितपणे हा ग्रंथ आपल्या घरी वाचावा.

श्रावण महिन्यात श्रीकृष्णजन्मोत्सव श्रावण कृ सप्तमी व अष्टमी या दोन दिवशी साजरा केला जातो त्याची माहिती खालीलप्रमाणे.

साईबाबांच्या काळातही गोकुळाष्टमी हा सण साजरा होत असे, ही प्रथा आजही सुरु आहे. या दिवशी उपवास असल्याने श्रींना खिचडी, शेंगादाणे कूट किंवा फळांचा नैवेद्य दाखविला जातो. श्रीकृष्णजन्म असल्याने श्रीसाईबाबांच्या समाधी मंदिरात पाळणा बांधला जातो. त्यामध्ये बाळकृष्णाची चांदीची मुर्ती असते. यादिवशी समाधी मंदिरात रात्रौ १० वाजता कीर्तनास आरंभ होतो. समाधी चौथ-यावर रात्रौ कीर्तनाचे वेळी गोपाळकृष्णाची प्रतिमा ठेवली जाते. रात्रौ १२.०० वाजता श्रीकृष्ण भगवंताचा जन्मोत्सव होऊन कीर्तनाची सांगता होते. श्रीकृष्णजन्म झाल्यानंतर साईबाबांची शेजारती होते. शेजारतीचे वेळी सुंठवडा व शेंगादाणे कूट यांचा नैवेद्य दाखविला जातो व तो नंतर प्रसाद म्हणून वाटला जातो. शेजारतीनंतर समाधी मंदिर बंद होते जन्मोत्सवाच्या दुसरे दिवशी साईबाबांच्या मंगलस्नानानंतर समाधीवर व साईबबांच्या मुर्तीला तुळशीचा हार परिधान केला जातो. सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत गोपाळकाल्याचे कीर्तन होते. त्यानंतर दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम होतो. रात्रौ ९.१५ श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक निघते मिरवणूक परत आल्यानंतर शेजारती होते.

शिर्डी ग्रामस्थ यांनी केलेली सूचना ही स्तुत्य आहे. शिर्डी ग्रामस्थांनी गोकुळाष्टमी उत्सव आठ दिवस साजरा करावा तसेच श्रावण महिन्याच्या पहिल्या दिवसापासून (प्रतिपदेपासून) सुरु होणारा श्री साईचरित्र पारायण सोहळा पुढे ढकलून पारायण सोहळयाचे काल्याचे कीर्तन गोकुळाष्टमीच्या दिवशी येईल, अशा बेताने या सोहळयाचं आयोजन करावे अशी त्यांची मागणी आहे. श्रीसाईबाबांच्या काळात गोकुळाष्टमी उत्सव साजरा होत असे त्याचा श्री साईचरित्रात संदर्भ आहे. श्रीसाईचरित्रातील गोकुळाष्टमीच्या उत्सवाचा संदर्भ पहाता तो सुतुत्य आणि व्यवहार्य आहे असे मत आहे.

तथापि शिर्डी ग्रामस्थांनी सादर केलेल्या पत्रात, गोकुळाष्टमीचा उत्सव आठ दिवस होत असें असा जो उल्लेख आलेला आहे. तसा तो होत असल्याबाबतचा संदर्भ जुन्या दस्तऐवजात शोधावा लागेल तसेच तसा संदर्भ मिळून आल्यानंतर सध्या सुरु असलेल्या गोकुळाष्टमीत बदल करण्यासाठी शासनाची अनुमती घ्यावी लागेल. सबब, तोपर्यंत सध्या ज्या स्वरुपात व ज्या तिथीपासून पारायणसोहळा आयोजित केला जातो त्याप्रमाणे करणे योग्य होईल असे नम्र मत आहे.

प्रस्ताव– तरी गोकुळाष्टमीचा उत्सव आठ दिवस साजरा करणेबाबत व त्यास सुमारास श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित करणेबाबतची शिर्डी ग्रामस्थाची विनंती अवलोकनार्थ व पुढील आदेशार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४०४** **सदरचे प्रस्तावावर आजचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०३ निर्णय क्र.४१६ नुसार निर्णय घेण्यात आलेला आहे.**

**(कार्यवाही-शताब्दी कक्ष)**

---

**विषय नं.५१** **माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हेरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewall कालबाहय झाल्याने नविन ०२ नग Firewall प्रचलित पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७.११.२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९ अन्वये, माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली होती. याकामी प्रचलीत पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबवून प्रकल्प उभारणीसाठी मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. त्यानुसार प्रकल्पाअंतर्गत मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत संस्थानचे विवधि विभागांचे मागणीनुसार त्यांचे विभागाकरीता एकूण ३८ संगणकीय प्रणाली विकसीत करुन कार्यान्वीत करणेत आलेल्या आहेत. तसेच, मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत सदरच्या प्रणाली कार्यान्वीत करणेकरीता आवश्यक असलेले डेटा सेंटर, नेटवर्क, हार्डवेअर, युपीएस व इतर अनुषंगिक सुविधा कार्यान्वीत करणेत आलेल्या आहेत. साईटेक प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार प्रकल्प देखभालीचा मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कालावधी माहे-एप्रिल-२०१७ अखेर संपुष्टात आलेला आहे.

दरम्यानचे कालावधीमध्ये "साईटेक प्रकल्प-२" अंतर्गत संगणक प्रणालीबाबतची सर्व कार्यवाही तसेच Data Centre, Cloud Based Services, Hardware & Network बाबत सल्ला व व्यवस्थापनबाबतची कार्यवाही मोफत स्वरुपात करुन देण्याचे मे.टाटा सन्स यांचे प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७५ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती. सदर निर्णयान्वये

मे.टाटा सन्स यांनी मागणी केलेप्रमाणे प्रकल्प हस्तांतरीत करणेकामी मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना पुढील तीन महिन्यांकरीता (मे-२०१८ ते जुलै-२०१८) मुदतवाढ देणेत आली होती. त्याप्रमाणे Hardware करीता मे.टाटा सन्स यांचे सल्ल्यानुसार संस्थानचे प्रचलीत पद्धतीनुसार खरेदी प्रक्रिया राबविणेत यावी, असे निर्देशही सदर निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त निर्णयान्वये, मे.टाटा सन्स यांचेमार्फत मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (मे.टिसीएस) यांनी प्रकल्प हस्तांतरीत करणेची कार्यवाही दि.१५.०४.२०१८ पासून सुरू करुन प्रकल्पाअंतर्गतचे प्रत्यक्ष कार्यवाहीस दि.०१.०९.२०१८ पासून सुरूवात केलेली आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत असलेले हार्डवेअर (सर्व्हर, संगणके, युपीएस व संगणकीय साहित्य) नेटवर्क साहित्य (फायरवाल, स्विचेस, राऊटर्स, नेटवर्क रॅक, लॅन केबल, ऑप्टीक फायबर केबल) इ.सन-२०१०-११ मध्ये मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत खरेदी करुन कार्यान्वीत केलेले आहेत. प्रकल्प कालावधीकरीता या सर्व प्रणाली व साहित्यांचे व्यवस्थापन, दुरूस्ती/देखभाल याची कार्यवाही करारनाम्याप्रमाणे मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी केलेली आहे. सद्यस्थितीत सदरचे सर्व साहित्य कालबाह्य झालेले असून उत्पादक कंपनीमार्फत सदर साहित्यांचे दुरूस्ती / देखभालीचा कालावधी संपुष्टात आलेला आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे १६ सर्व्हर व नव्याने खरेदी केलेले ११ ब्लेड सर्व्हर कार्यान्वीत आहेत. सदरचे सर्व्हर हे प्रकल्पाअंतर्गतच्या सर्व प्रणाली कार्यान्वीत करणे, संस्थानचे विविध सुविधांचा प्रणालीमध्ये लाभ घेणा-या साईभक्तांची महत्वाची माहिती (Data) संकलीत करणे, संस्थानअंतर्गत व बाहेरील इंटरनेट व ई-मेल देवाण-घेवाण व्यवस्थापन, User व्यवस्थापन इ.करीता कार्यान्वीत करणेत आलेले आहेत. सर्व्हरवरील माहितीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने Firewall कार्यान्वीत करणेत आलेला आहे. Firewall चा मुख्य उद्देश सर्व्हरवरील माहिती सुरक्षीत रहावी, सर्व्हरला व्हायरसचा प्रादुर्भाव होऊ नये तसेच माहिती इंटरनेटचे माध्यमातून कोणी चोरु (Hack) करु नये हा आहे. प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत online.sai.org.in ह्या वेबसाईटद्वारे जगभरातील साईभक्तांनी विविध सुविधांचे केलेल्या बुकींगचा डेटा Cloud Server वरुन पुढील प्रक्रियेकरीता इंटरनेटद्वारे डेटा सेंटर येथील सर्व्हरवर वेळोवेळी स्टोअर केला जातो. तसेच मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञ प्रकल्पाअंतर्गत प्रणालीबाबतचे कार्यवाहीकरीता इंटरनेटद्वारे सदरचे सर्व्हरला संलग्न होतात. संस्थानअंतर्गत विविध विभागांना कार्यालयीन कामकाजाकरीता सदरचे सर्व्हरमार्फतच इंटरनेट उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

नमुद केलेप्रमाणे डेटा सेंटर येथे कार्यान्वीत असलेला Firewall हा कालबाह्य झालेला असून उत्पादक कंपनीकडून त्याचे देखभालीचा कालावधीही संपुष्टात आलेला आहे. सदरचे Firewall बाबत वारंवार तांत्रिक अडचणी येत आहेत. मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार सर्व्हरवरील प्रणाली व माहितीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने, मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञांना प्रणालीविषयक कार्यवाही करणेस अडचण येऊ नये तसेच संस्थानअंतर्गत व बाहेर ई-मेल देवाण-घेवाण करणेकामी इंटरनेट सुरक्षीतरित्या सुरळीत सुरु राहणे आवश्यक आहे. सबब, याकरीता मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार ०२ नग Firewall संस्थानचे प्रचलीत पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ७०,००,०००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव दि.०४.०५.२०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये मा.तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० रोजीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता. सदरचे सभेमध्ये सविस्तर चर्चेअंती नि.क्र.२६४ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आलेले आहेत.

"माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewall कालबाह्य झाल्याचे संबंधीत विभागाने नमुद केले आहे. तथापि सदरचा Firewall Virtual आहे की software based की Hardware based आहे, याबाबत खात्री करावी. आणि जर Firewall Software based असेल तर अनज्ञप्ती (Licences) नुतनीकरण करता येईल काय? याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा."

मा.तदर्थ समितीचे उपरोक्त निर्देशान्वये मे.टिसीएस यांना याबाबतचा अभिप्राय देणेबाबत दि.२९ मे २०२० रोजीचे ई-मेलव्दारे कळविणेत आलेले होते. त्यानुसार मे.टिसीएस यांनी त्यांचे दि.३०.०५.२०२० रोजीचे ई-मेलव्दारे पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

Firewall is a combination of both Hardware and Software.

It helps in the network security by ensuring intrusion prevention, application control, and anti-malware.

Since current firewall is 10 years old,

Hardware spare parts will not be available to support the motherboard / firmware, RAM, CPU etc.

Software is out dated and cannot be updated with the latest threat prevention / anti-malware protocols.

As the licenses are expired, we cannot modify the rules, cannot get software updates, cannot investigate source of the malware attack, desktop/laptop utilizing maximum network etc.

Also, OEM have announced End of Sale and Support of this product.

Firewall usage in SSST IT landscape and the risks of failure are listed in the attached PPT for quick reference.

मे.टिसीएस यांचेमार्फत प्राप्त झालेल्या उपरोक्त अभिप्रायानुसार प्रामुख्याने पुढील बाबी निदर्शनास येतात. Firewall हे Hardware व Software based आहे. याचा उपयोग प्रणाली व डेटा यांच्या सुरक्षिततेसाठी होतो. सदरचा Firewall दहा वर्ष जुना असल्याने त्याचे spare parts उदा.Motherboard/Firmware, RAM, CPU etc. हे सद्यस्थितीत उपलब्ध होऊ शकत नाहीत. सदर Firewall चे Software हे कालबाह्य झाल्याने सद्यस्थितीत प्रणालींशी सु-संगत होत नाही. सदर Firewall Licences हे कालबाह्य झालेले असल्याने अनुषंगीक कार्यवाही करणेस अडचणी निर्माण होतात. उत्पादक कंपनीनेही सदर Firewall चे Support थांबविला असल्याचे जाहिर केलेले आहे.

उपरोक्त प्रमाणे नविन दोन नग Firewall मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेने प्रचलीत पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.७०,००,०००/- + कर मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेकामी मा.तदर्थ समितीचे निर्णय क्रं.२६४ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे मे.टिसीएस यांचेमार्फत प्राप्त झालेल्या अभिप्रायासह प्रस्ताव इकडील विभागाचे दि.३० मे, २०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेसमोर सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावरील चर्चेच्या दरम्यान मे.टिसीएस यांचे प्रतिनिधी श्री राजीव गुप्ता यांनी Firewall संबंधातील सादरीकरण मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर केले असून विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावावर निर्णय क्र.३२८ अन्वये, पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आलेले आहेत. “माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewall कालबाह्य झाल्याने नविन ०२ नग Firewall खरेदी करणेकामी सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर सादर करण्यात यावा.”

उपरोक्त निर्देशान्वये, मे.टिसीएस यांचेबरोबर चर्चा करुन ०२ नग Firewall च्या आवश्यकतेबाबत तसेच Firewall मध्ये वापरण्यात येणा-या Processor बाबत अभिप्राय देणेबाबत कळविलेले होते. त्यानुसार मे.टिसीएस यांनी दि.२२ जुन, २०२० रोजीचे ई-मेलद्वारे पुढीलप्रमाणे अभिप्राय/स्पष्टीकरण सादर केलेले आहे.

As discussed on call, please find the detailed clarifications requested.

Currently, SSST is having 4 firewalls. TCS is planning to replace all these 4 end of life firewalls and with **2 Next Generation Firewalls**.

One firewall at L2 level managing Internet.

Two firewalls (HA) at L3 level managing LAN.

One more firewall at L3 level managing Servers.

Considering the criticality of the IT operations, 2 Firewalls are requested in order to configure in High Availability mode. So that one firewall will be in Active mode and another will be in passive mode. In case of failure, all the connections will be automatically switched to the Passive firewall. And will provide sufficient turnaround time to get failure one fixed through vendor/OEM without having any impact to end users/operations.

HA can be achieved smoothly by having same Make and Model using the respective OEM standards.

Also, TCS have ensured the proposed Make & configurations are compatible with the existing infrastructure (servers, network switches, etc).

All the proposed Firewalls are having Intel Processor (CPU) along with their proprietary processor to ensure the better throughput.

मे.टिसीएस यांनी कळविलेप्रमाणे सद्यस्थितीत ०४ नग Firewall कार्यान्वीत असून सदरचे सर्व Firewall कालबाह्य झाले असून त्यांचे ठिकाणी ०२ नग नविन Firewall कार्यान्वीत करण्याचे प्रस्तावित करणेत आलेले आहे. सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेल्या ०४ नग Firewall पैकी ०१ नग Firewall इंटरनेट व्यवस्थापन, ०२ नग Firewall LAN व्यवस्थापन व ०१ नग Firewall हा सर्व्हरसाठी कार्यरत आहे. संस्थानची सद्यस्थितीतील गरज पाहता, ०२ नग Firewall प्रस्तावित केलेले असून सदरचे Firewall पैकी ०१ नग Firewall हा Active Mode मध्ये कार्य करेल व ०१ नग Firewall हा Passive Mode असेल. काही तांत्रिक त्रुटींमुळे Active Mode मधील Firewall बंद पडल्यास सर्व Connections हे विनाव्यत्यय Passive Mode मधील Firewall द्वारे प्रस्तापित होतील. सबब, त्रुटींची दुरूस्ती होईपर्यंत सर्व प्रणाली विनाव्यत्यय सुरळीत सुरू राहतील. दोन्ही Firewall एकाच कंपनीचे व सारख्या क्षमतेचे असल्याने हे सहज शक्य होणार आहे. सदरचे Firewall हे भविष्यातील संभाव्य विस्तारीकरणास सु-संगत असे असणार आहेत. सदरचे Firewall मध्ये Intel कंपनीचे मुख्य Processor व उत्पादक कंपनीचे Co-Processor चा अंतर्भाव असणार आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे Firewall चा उपयोग हा प्रामुख्याने Internet व्यवस्थापन, सर्व्हर व डेटा सुरक्षीततेसाठी होतो. लॉकडाऊनच्या धर्तीवर साईभक्तांना श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणे शक्य होत नसल्याने असंख्य साईभक्त हे संस्थानचे वेबसाईट व मोबाईल ॲपद्वारे उपलब्ध असलेल्या लाईव्ह दर्शन सुविधेद्वारे श्रींचे दर्शनाचा लाभ घेतात. तसेच संस्थानचे online.sai.org.in या वेबसाईटद्वारे संस्थानला ऑनलाईन देणगी देतात. सद्यस्थितीत साईभक्तांना संस्थानला देणगी देणेकरीता हा एकमेव पर्याय सुलभ online.sai.org.in या वेबसाईट संदर्भात काही तांत्रिक अडचण आल्यास हेल्पडेस्कला प्राप्त होणा-या साईभक्तांच्या टेलिफोन कॉल व ई-मेलच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ होते. सबब, इंटरनेट सुविधा पर्यायाने online.sai.org.in व sai.org.in ह्या वेबसाईट अखंड सुरळीत चालण्याच्या दृष्टीने तसेच साईभक्तांची व संस्थानची महत्वपुर्ण माहिती सुरक्षीत राहणेच्या दृष्टीने मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार ०२ नग नविन Firewall खरेदी करणे अत्यावश्यक आहे.

सबब, ०२ नग नविन Firewall मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेने प्रचलीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.७०,००,०००/- + कर मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव निर्देशीत केलेप्रमाणेचा आवश्यक माहिती/स्पष्टीकरणासह प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewall कालबाहय झाल्याने, ०२ नग नविन Firewall मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेने प्रचलीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.७०,००,०००/- + कर मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२८ अन्वये, निर्देशीत केलेप्रमाणे सविस्तर प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव या नुसार छानन्नी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- डेटा सेंटर येथे कार्यान्वीत असलेले Firewall हे कालबाह्य झालेले असून उत्पादक कंपनीकडून त्यांचे देखभालीचा कालावधीही संपुष्टात आलेला आहे. सदरचे Firewall बाबत वारंवार तांत्रिक अडचणी येत आहेत. मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार सर्व्हरवरील प्रणाली व माहितीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने, मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञांना प्रणालीविषयक कार्यवाही करणेस अडचण येऊ नये तसेच संस्थानअंतर्गत व बाहेर ई-मेल देवाण-घेवाण करणेकामी इंटरनेट सुरक्षीतरित्या सुरळीत सुरु राहणे आवश्यक आहे. सबब, याकरीता मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार ०२ नग Firewall संस्थानचे प्रचलीत पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ७०,००,०००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव दि.०४.०५.२०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये मा.तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० रोजीचे सभेसमोर निर्णयार्थ

सादर करणेत आलेला होता. सदरचे सभेमध्ये सविस्तर चर्चेअंती निर्णय क्र.२६४ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आलेले आहेत.

"माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewall कालबाह्य झाल्याचे संबंधीत विभागाने नमुद केले आहे. तथापि सदरचा Firewall Virtual आहे की software based की Hardware based आहे, याबाबत खात्री करावी. आणि जर Firewall Software based असेल तर अनज्ञप्ती (Licences) नुतनीकरण करता येईल काय? याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा."

मा.तदर्थ समितीचे उपरोक्त निर्देशान्वये मे.टिसीएस यांना याबाबतचा अभिप्राय देणेबाबत दि.२९ मे २०२० रोजीचे ई-मेलव्दारे कळविणेत आलेले होते. त्यानुसार मे.टिसीएस यांनी त्यांचे दि.३०.०५.२०२० रोजीचे ई-मेलव्दारे त्यांचा अभिप्राय दिलेला आहे.

मे.टिसीएस यांचेकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार प्रामुख्याने पुढील बाबी निदर्शनास येतात. Firewall हे Hardware व Software based आहे. याचा उपयोग प्रणाली व डेटा यांच्या सुरक्षिततेसाठी होतो. सदरचा Firewall दहा वर्ष जुना असल्याने त्याचे spare parts उदा.Motherboard/Firmware, RAM, CPU etc. हे सद्यस्थितीत उपलब्ध होऊ शकत नाहीत. सदर Firewall चे Software हे कालबाह्य झाल्याने सद्यस्थितीत प्रणालींशी सु-संगत होत नाही. सदर Firewall Licences हे कालबाह्य झालेले असल्याने अनुषंगीक कार्यवाही करणेस अडचणी निर्माण होतात. उत्पादक कंपनीनेही सदर Firewall चे Support थांबविला असल्याचे जाहिर केलेले आहे.

उपरोक्त प्रमाणे नविन दोन नग Firewall मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेने प्रचलीत पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.७०,००,०००/-+कर मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेकामी मा.तदर्थ समितीचे निर्णय क्रं.२६४ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे मे.टिसीएस यांचेमार्फत प्राप्त झालेल्या अभिप्रायासह प्रस्ताव इकडील विभागाचे दि.३० मे, २०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेसमोर सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावरील चर्चेच्या दरम्यान मे.टिसीएस यांचे प्रतिनिधी श्री राजीव गुप्ता यांनी Firewall संबंधातील सादरीकरण मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर केले असून विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावावर निर्णय क्र.३२८ अन्वये, पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आलेले आहेत. "माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewall कालबाह्य झाल्याने नविन ०२ नग Firewall खरेदी करणेकामी सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर सादर करण्यात यावा."

उपरोक्त निर्देशान्वये, मे.टिसीएस यांचेबरोबर चर्चा करुन ०२ नग Firewall च्या आवश्यकतेबाबत तसेच Firewall मध्ये वापरण्यात येणा-या Processor बाबत अभिप्राय देणेबाबत कळविलेले होते. त्यानुसार मे.टिसीएस यांनी दि.२२ जुन, २०२० रोजीचे ई-मेलद्वारे पुढीलप्रमाणे अभिप्राय/स्पष्टीकरण सादर केलेले आहे.

As discussed on call, please find the detailed clarifications requested.

Currently, SSST is having 4 firewalls. TCS is planning to replace all these 4 end of life firewalls and with **2 Next Generation Firewalls**.

One firewall at L2 level managing Internet.

Two firewalls (HA) at L3 level managing LAN.

One more firewall at L3 level managing Servers.

Considering the criticality of the IT operations, 2 Firewalls are requested in order to configure in High Availability mode. So that one firewall will be in Active mode and another will be in passive mode. In case of failure, all the connections will be automatically switched to the Passive firewall. And will provide sufficient turnaround time to get failure one fixed through vendor/OEM without having any impact to end users/operations.

HA can be achieved smoothly by having same Make and Model using the respective OEM standards.

Also, TCS have ensured the proposed Make & configurations are compatible with the existing infrastructure (servers, network switches, etc).

All the proposed Firewalls are having Intel Processor (CPU) along with their proprietary processor to ensure the better throughput.

मे.टिसीएस यांनी कळविलेप्रमाणे सद्यस्थितीत ०४ नग Firewall कार्यान्वीत असून सदरचे सर्व Firewall कालबाह्य झाले असून त्यांचे ठिकाणी ०२ नग नविन Firewall कार्यान्वीत करण्याचे प्रस्तावित करणेत आलेले आहे. सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेल्या ०४ नग Firewall पैकी ०१ नग Firewall इंटरनेट व्यवस्थापन, ०२ नग Firewall LAN व्यवस्थापन व ०१ नग Firewall हा सर्व्हरसाठी कार्यरत आहे. संस्थानची सद्यस्थितीतील गरज पाहता, ०२ नग Firewall प्रस्तावित केलेले असून सदरचे Firewall पैकी ०१ नग Firewall हा Active Mode मध्ये कार्य करेल व ०१ नग Firewall हा Passive Mode असेल. काही तांत्रिक त्रुटींमुळे Active Mode मधील Firewall बंद पडल्यास सर्व Connections हे विनाव्यत्यय Passive Mode मधील Firewall द्वारे प्रस्तापित होतील. सबब, त्रुटींची दुरूस्ती होईपर्यंत सर्व प्रणाली विनाव्यत्यय सुरळीत सुरू राहतील. दोन्ही Firewall एकाच कंपनीचे व सारख्या क्षमतेचे असल्याने हे सहज शक्य होणार आहे. सदरचे Firewall हे भविष्यातील संभाव्य विस्तारीकरणास सु-संगत असे असणार आहेत. सदरचे Firewall मध्ये Intel कंपनीचे मुख्य Processor व उत्पादक कंपनीचे Co-Processor चा अंतर्भाव असणार आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे Firewall चा उपयोग हा प्रामुख्याने Internet व्यवस्थापन, सर्व्हर व डेटा सुरक्षीततेसाठी होतो. लॉकडाऊनच्या धर्तीवर साईभक्तांना श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणे शक्य होत नसल्याने असंख्य साईभक्त हे संस्थानचे वेबसाईट व मोबाईल ॲपद्वारे उपलब्ध असलेल्या लाईव्ह दर्शन सुविधेद्वारे श्रींचे दर्शनाचा लाभ घेतात. तसेच संस्थानचे online.sai.org.in या वेबसाईटद्वारे संस्थानला ऑनलाईन देणगी देतात. सद्यस्थितीत साईभक्तांना संस्थानला देणगी देणेकरीता हा एकमेव पर्याय सुलभ online.sai.org.in या वेबसाईट संदर्भात काही तांत्रिक अडचण आल्यास हेल्पडेस्कला प्राप्त होणा-या साईभक्तांच्या टेलिफोन कॉल व ई-मेलच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ होते. सबब, इंटरनेट सुविधा पर्यायाने online.sai.org.in व sai.org.in ह्या वेबसाईट अखंड सुरळीत चालण्याच्या दृष्टीने तसेच साईभक्तांची व संस्थानची महत्वपुर्ण माहिती सुरक्षीत राहणेच्या दृष्टीने मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार ०२ नग नविन Firewall खरेदी करणे अत्यावश्यक आहे.

सबब, मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार ०२ नग नविन Firewall मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेने प्रचलीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.७०,००,०००/- + कर मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव मा.तदर्थ समितीचे दि.०९.०६.२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२८ अन्वये, निर्देशीत केलेप्रमाणे सविस्तर प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.४०५** **यावर सविस्तर चर्चा झाली, संबधीत विभाग, TCS चे तंत्रज्ञ व संस्थेचे अधिकारी दोन नग Firewall खरेदी करण्याच्या प्रस्तावाची गरज/आवश्यकता कुठल्याही तर्काने पटवू शकले नाहीत. तसेच जुनी Firewall प्रणाली तातडीच्या काळात उपयोगात येऊ शकते असे समितीच्या लक्षात आणून देण्यात आले म्हणून माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewall कालबाहय झाल्याने नविन एक नग Firewall खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३५,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.५२** **सन २०२०-२१ मध्ये वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रथम, व्दितीय व तृतीय वर्ष शुल्क आकारणीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमः-** अधिनियम २००४ मधील तरतुद क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक –**

०१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.०६.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.३७०
०२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.२४२
०३. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०७.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.३६६

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा सस्थानचे नवीन वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकामी महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक – मान्यता – २०१८/(३०/१८)/माशि-४, दि.२८ फेब्रुवारी, २०१८ चे आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र मिळाले तसेच शासन आदेश क्रमांक एनजीसी २०१८/(१००/१८)/ मशि-४, दि.१५ जून, २०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे वर्ग सुरु करण्यात आलेले होते. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१.०६.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.३७० अन्वये सन २०१८-१९ मध्ये सुरु केलेल्या वर्गांसाठी विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वानुसार विनाअनुदानित महाविद्यालयांसाठी प्रस्तावित केलेले शुल्क आकारणेस मान्यता देण्यात आलेली होती, त्यानुसार शुल्क आकारणी करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे–**(सन २०१८-१९ चे शुल्क)**

| **वर्ग** | **कला** | **वाणिज्य** | **विज्ञान** |
|---|---|---|---|
| प्रथम वर्ष | ३,५६५/- | ३,४२५/- | ४,०६५/- |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.१०.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.६१३ (२१) नुसार श्री साईबाबा वरिष्ठ महाविद्यालयात B.Sc.(Computer Science) व BCA हा नवीन अभ्यासक्रम व कला, वाणिज्य शाखेची दुसरी तुकडी तसेच नैसर्गिक तुकडीवाढीचे वर्ग शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० मध्ये सुरु करणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक मान्यता २०१९/(१३१/१९)/मशि-४, दि.१५ जून, २०१९ अन्वये श्री साईबाबा महाविद्यालयामध्ये प्रस्तावित विशेषस्तर विषय तसेच बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) व बीसीए (विज्ञान) हे प्रस्तावित नवीन अभ्यासक्रमास कायम विनाअनुदानीत तत्त्वावर सुरु करणेस मान्यता दिलेली आहे. तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक मान्यता २०१९/(१३४/१९)/मशि-४, दि.१५ जून, २०१९ अन्वये कला व वाणिज्य शाखेच्या प्रथम वर्षासाठी प्रत्येकी एक अतिरिक्त तुकडी कायम विनाअनुदानीत तत्वावर सुरु करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रथम व द्वितीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान तसेच प्रथम वर्ष बी.एस्सी.(कॉम्प्युटर सायन्स) चे वर्ग सुरु करण्यात आलेले होते. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.२४२ अन्वये सन २०१९-२० मध्ये सुरु केलेल्या वर्गांसाठी विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वानुसार अनुदानित महाविद्यालयांसाठी (कला, वाणिज्य व विज्ञान) तसेच बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स हा विनाअनुदानित अभ्यासक्रम असल्याने त्याकरिता मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०७.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.३६६ अन्वये विनाअनुदानित अभ्यासक्रमासाठी प्रस्तावित केलेले शुल्क आकरणेस मान्यता देण्यात आलेली होती, त्यानुसार शुल्क आकारणी करण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे – **(सन २०१९-२० चे शुल्क)**

| **वर्ग** | **कला** | **वाणिज्य** | **विज्ञान** | **बी.एस्सी.(कॉम्प्युटर सायन्स)** |
|---|---|---|---|---|
| प्रथम वर्ष | ३,३९०/- | ३,४३०/- | ३,६६५/- | २६,०९०/- |
| द्वितीय वर्ष | ३,१००/- | ३,१८०/- | ३,२००/- | - |

आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडील जा.क्र.CA/Eleg.-Non Eleg/New CSSPDIF-A.Y.**2020-21** दि.२०.०३.२०२० अन्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी नवीन अभ्यास पाठयक्रम/विषय/विशेषस्तर विषय/नैसर्गिक वाढ/ अतिरिक्त तुकडी/जलदगती तुकडीची नियमितीकरण/प्रवेश क्षमता वाढ / विद्याशाखा इ.साठी सादर केलेल्या प्रस्तावास शिफारस देण्यात आलेली आहे. त्याबाबत शासन निर्णय येणे बाकी आहे.

विद्यापीठाने केलेल्या शिफारसनुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचे वर्ग, विशेषस्तर विषय, तसेच संगणकशास्त्र शाखेचे प्रथम व द्वितीय वर्षाचे अध्यापन करण्यात येणार आहे. सदर वर्गांसाठी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये आकारावयाचे सुधारीत

शुल्काबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने त्यांचेकडील आदेश क्र.PGS/**676** दि.२८.०२.२०२० अन्वये निर्देश दिलेले होते.

**मात्र सध्या कोरोना विषाणूच्या साथरोगामुळे देशभर सुरु असलेल्या संचारबंदीचे पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडील संदर्भ क्र.** PGS/**1032** Date– **27/06/2020 रोजीचे आदेशान्वये सन २०२०-२१ या वर्षी आदेश क्र.**PGS/**676 दि.२८.०२.२०२० अन्वये कळविलेले सुधारीत शुल्क न आकारता मागील वर्षीचेच शुल्क आकारणी करण्यात यावी**, **असे निर्देश दिलेले आहेत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.२४२ अन्वये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या प्रथम व द्वितीय वर्षासाठी मान्यता मिळालेले व मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०७.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.३६६ अन्वये प्रथम वर्ष संगणकशास्त्रासाठी प्रस्तावित केलेले शुल्क आकरणी करता येईल.

तसेच कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या तृतीय वर्ष व संगणकशास्त्र अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षासाठी विद्यापीठ आदेश क्र.५४२ दि.१७.०२.२०११ नुसार (आदेश पी.जी.एस.७८५२ दि.२३.१२.२००९) आकारावी लागेल. त्याचा सविस्तर तपशिल सोबतच्या परिशिष्ठात दिलेला आहे.

सोबतच्या परिशिष्ठातील तपशिलानुसार अनुदानित व विनाअनुदानित स्वरुपातील शुल्काचा गोषवारा खालीलप्रमाणे

| **वर्ग** | **कला** | **वाणिज्य** | **विज्ञान** | **बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स)** | **कला** | **वाणिज्य** | **विज्ञान** | **बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स)** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अनुदानित** | | | | **विनाअनुदानित** | | | |
| प्रथम वर्ष | ३,३९०/- | ३,४३०/- | ३,६६५/- | - | ६,४९०/- | ६,८३५/- | १७,१४०/- | २६,०९०/- |
| द्वितीय वर्ष | ३,१००/- | ३,१८०/- | ३,२००/- | - | ६,२००/- | ६,५४५/- | १६,७००/- | २५,७००/- |
| तृतीय वर्ष | २,८८०/- | ३,०००/- | ३,००५/- | - | ५,९८०/- | ६,३२५/- | १६,४८०/- | - |

(सोबतच्या तक्त्यात तपशिलवार माहिती सादर केलेली आहे. सदर नमुद तक्त्यामध्ये अ.क्र.२०Vridhi Process फी ही विद्यापीठाचे फी व्यतिरिक्त नमुद केलेली आहे. कारण सदरची रक्कम ही सबंधीत Software कंपनीस आदा करावी लागणार आहे. तसेच अ.क्र.२३ ते २५ चे शुल्क हे महाविद्यालयाचे विकासासाठी व इतर कार्यक्रमांसाठी स्विकारण्यात येत असते. तसेच जे विद्यार्थी द्वितीय वर्ष कला शाखेमध्ये भूगोल हा विशेषस्तर विषय निवडतील त्यांचेकडून रु.१२५/- मात्र प्रयोगशाळा फी आकारावी लागेल. तसेच तीनही शाखेचे द्वितीय वर्षाकरिता Environmental Awareness चे रु.२२०/- मात्र शुल्क आकारावे लागेल.)

संस्थानमार्फत सुरु करण्यात येणारे महाविद्यालय हे कायम विनाअनुदानित तत्वावर चालविण्यात येत आहे. विद्यापीठाचे मार्गदर्शक तत्वानुसार अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांसाठी शुल्क आकारणी करण्यात येत असते. यापैकी काही रक्कम नियमानुसार विद्यापीठास अदा करावी लागते. त्याबाबतचे चलन वेळोवेळी विद्यापीठाकडून कळविण्यात येत असते.

संस्थानचे महाविद्यालयामध्ये शिर्डी व परिसरातील शेतकरी, वंचित व आर्थिकदृष्टया गरीब असलेल्या विदयार्थ्यांनी प्रवेश घेतलेले आहेत. तसेच मुलांच्या तुलनेने मुलींची संख्या लक्षणीय आहे. एकूण विद्यार्थ्यांपैकी ६० टक्के मुली महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांकडून आकारावयाचे शुल्काबाबत सन २०१८-१९ मध्ये विनाअनुदानित व सन २०१९-२० मध्ये अनुदानित स्वरुपात शुल्क आकारण्यात आलेले आहे. तसेच बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स हा विनाअनुदानित अभ्यासक्रम असल्याने त्यासाठी विनाअनुदानित स्वरुपातील शुल्क आकारणी करण्यात येत असते.

विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती, मुलींची संख्या व सध्या कोरोना विषाणूची पार्श्वभूमी या सर्व बाबींचा विचार करता सन २०२०-२१ मध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकडून अनुदानित अथवा विना अनुदानित स्वरुपाचे शुल्क आकारावे, याबाबत निर्णय होणेकामी तसेच बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स हा विनाअनुदानित अभ्यासक्रम असल्याने त्यासाठी विनाअनुदानित स्वरुपातील शुल्क आकारणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

तसेच सदरची प्रवेश प्रक्रिया राबवितांना वृद्धी सॉफ्टवेअरद्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविता येईल, विद्यार्थ्यांकडून स्विकारण्यात येणारे शुल्क हे रोख स्वरुपात न घेता, विद्यार्थ्यांना ऑनलाईन / चलनाद्वारे बॅंकेत भरणा करणेबाबत कळविता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी– तरी प्रस्ताविकात नमुद केलेनुसार सन २०२०-२१ मध्ये महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकडून नमुद शैक्षणिक शुल्कामधील अनुदानित अथवा विनाअनुदानित यापैकी कोणत्याही स्वरुपाचे शुल्क स्विकारावे याबाबत निर्णय होणेस, बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स हा विनाअनुदानित अभ्यासक्रम असल्याने त्यासाठी विनाअनुदानित स्वरुपातील शुल्क आकारणेस मान्यता मिळणेकामी, तसेच सदरची प्रवेश प्रक्रिया राबवितांना वृद्धी सॉफ्टवेअरद्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविणेस आणि ऑनलाईन पद्धतीने शुल्क स्विकारणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-Hoc) समितीचे निर्णयार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.४०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईबाबा महाविद्यालयामध्ये सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकडून विद्यापिठाचे मार्गदर्शक तत्वानुसार अनुदानित स्वरुपाचे शुल्क आकारण्यात यावे,असे ठरले. तसेच बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स या अभ्यासक्रमासाठी अनुदानित स्वरुपात शुल्क आकरणीसाठी विद्यापीठाकडून माहिती घेण्यात यावी, सदरची माहिती उपलब्ध न झाल्यास बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स या अभ्यासक्रमासाठी विनाअनुदानित स्वरुपात शुल्क आकारण्यात यावे, असे ठरले. तसेच सदरची प्रवेश प्रक्रिया वृद्धी सॉफ्टवेअरद्वारे ऑनलाईन पद्धतीने राबविणेस आणि ऑनलाईन पद्धतीने शुल्क स्विकारणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.५३** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कायम सुरक्षा रक्षकांचा गणवेश बदलाबाबत.**

**प्रस्ताव-** प्र.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी जा.क्र.जिविशा/संरक्षण/१०११४/२०११ दि.११/११/२०१९ चे पत्रान्वये कळविले आहे की, दि.२८/०९/२०१९ रोजी ०९.४५ वाजता श्री साईबाबा संस्थान शिर्डी येथील सुरक्षा रक्षक रमेश तुकाराम कोते हे श्री साईबाबा मंदिर परिसरात एका अपंग व्यक्तीस मारहाण करीत असतानाचा व्ही.डी.ओ. सोशल मिडीयावर व्हायरल झालेला आहे. सदर व्ही.डी.ओ. मध्ये खाकी गणवेष परिधान केलेली व्यक्ती अपंग व्यक्तीस मारहाण करीत असतांना दिसत असल्याने अपंग संघटना, सामाजिक संघटना, वृत्तपत्र प्रतिनिधी व वरिष्ठ कार्यालयाकडुनच पोलीसानेच मारहाण केली असलेबाबत विचारणा झाली. सदर घटनेमुळे पोलीस प्रशासनाकडे पाहण्याचा जनसामान्यांचा दृष्टीकोन नकारात्मक होत असून जनमानसांत पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाली आहे.

सदचा व्ही.डी.ओ. विविध प्रकारच्या डिजीटल समाज माध्यमांमध्ये संपुर्ण देशभर व्हायरल झालेला आहे. आम्हीही सदर व्ही.डी.ओ. मध्ये प्रथमदर्शनी पोलीस कर्मचारीच दिव्यांग व्यक्तीस मारहाण करीत असल्याचे दिसत आहे. परंतू बारकाईने पाहीले असता सदरचा मारहाण करणारा व्यक्ती हा पोलीस सदृश्य गणवेष धारण करणारा असुन तो पोलीस नसल्याचे निदर्शनास आले आहे. सदरबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी यांनी घटना ठिकाणी भेट देवून चौकशी केली असता सदर व्यक्ती ही श्री साईबाबा संस्थानचा सुरक्षा रक्षक असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी दिव्यांग व्यक्तीस मारहाण करणारा व्यक्ती हा पोलीस अधिकारी / कर्मचारी नसून केवळ त्याने परिधान केलेला गणवेष हा सारखा असल्यामुळे संपुर्ण प्रसार माध्यमांमध्ये विनाकारण पोलीस दलाची बदनामी झालेली आहे. श्री साईबाबा संस्थान शिर्डी येथे कायमस्वरुपी १३२ खाजगी सुरक्षा रक्षक असून त्यांचा गणवेश हा खाकी असुन तो सामान्यव्यक्तीस पोलीस गणवेषच वाटतो. त्यामुळे यापुढे होणारी या प्रकारची संभाव्यबदनामी / प्रतिमा हणन टाळण्यासाठी श्री साईबाबा संस्थान शिर्डी येथे व इतर खाजगी सुरक्षा रक्षक यांचा गणवेष हा पोलीस अथवा लष्करी दलासारखा नसावा हा अहवाल उपविभागीय पोलीस अधिकारी शिर्डी विभाग, शिर्डी यांनी सादर केला आहे. सदर अहवालाशी आम्ही सहमत असलेबाबतचा अहवाल अपर पोलीस अधिक्षक, श्रीरामपुर यांनी सादर केलेला आहे. तरी साईबाबा मंदिर, शिर्डी येथील सुरक्षा रक्षकांचे गणवेष प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सी रेग्युलेशन ॲक्ट २००५ मधील तरतुदीनुसार होणेस विनंती करण्यात आलेली आहे.

वरीलप्रमाणे सुरक्षा रक्षकाने दिव्यांग व्यक्तीस मारहाण करतांनाचा व्हिडीओ व्हायरल झालेबाबत घडलेली घटना पुढील प्रमाणे - दि.०९/११/२०१९ रोजी श्री रमेश तुकाराम कोते यांची डयुटी सकाळी ०४.०० ते

१२.०० अशी १६ गुंठे परिस रसाईभक्तांची सुरक्षा, संस्थान मालमत्तेचे रक्षण करणेकामी तसेच या परिसरामध्ये भिक्षेकरी, किरकोळ विक्रेते यांना थांबु न देणेकामी नेमलेली होती. त्याप्रमाणे श्री रमेश कोते कर्तव्यावर हजर होवून नेमून दिलेले काम करत असतांना सकाळी ०८.०० ते० ९.३० वाजेच्या सुमारास एक अपंग व्यक्ती गेटनं.०३ चे बाहेरील बाजुस साईभक्तांकडून पैसे मागत असतांना दिसून आला. त्यास श्री रमेश कोते यांनी संस्थान परिसराचे बाहेर जावून भिक्षा मागणेबाबत सांगितले. सदर व्यक्ती त्या ठिकाणाहून जावून पुन्हा थोडया वेळाने त्याठिकाणी भिक्षा मागणेकामी आली. मी त्यास पुन्हा संस्थान परिसरामध्ये भिक्षा मागणेस मनाई असलेचे समजावून सांगून बाहेर जाण्यास सांगितले. त्यानंतर सदर व्यक्ती पुन्हा थोडया वेळाने मद्यपान करुन (दारु पिऊन) तिसऱ्यांदा भिक्षा मागणेस आला असता, तो साईभक्तांचे पायास हात लावून साईभक्तांना भिक्षा देण्यास मजबूर करत असल्याचे/ साईभक्तांना त्रास देत असल्याचे निदर्शनास आल्याने श्री.रमेश कोते यांनी त्यास बाहेर जाण्यास सांगितले असता तो ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता त्या इसमाने श्री.रमेश कोते यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केल्याने व त्यास सामंजस्याने सांगुन पण तो ऐकत नसल्याने व मंदिर परिसरातील शिस्तभंग होत असल्याने नाईलाजास्तव त्यास श्री.रमेश कोते बाहेर काढत असतांना कुणीतरी अज्ञात इसमाने व्ही.डी.ओ. शुटींग काढून व्हॉटस् अॅपवर प्रसारीत केली आहे. सदर प्रकरणी श्री.रमेश तुकाराम कोते यांस संस्थान प्रशासनामार्फत जा.नं.एसएसएस/साप्रशा /वशी-शिस्त/१५५८/२०१९ दि.०२/१०/२०१९ अन्वये कारणे दाखवा नोटीस देवून समज देण्यात आलेली आहे. तसेच श्री रमेश कोते यांना साईभक्तांशी सौजन्याने वागणे, बोलणेबाबत समज देण्यात आलेली आहे. तसेच भिक्षेकरी,अपंग यांना सामंजस्याने समजावून सांगुन संस्थान परिसराचे बाहेर जाण्यास सांगणेबाबतची समज देण्यात आली आहे.

यापुर्वी सन २०१४ मध्ये तत्कालीन पोलीस अधिक्षक, लखमी गौतम यांनी संस्थानचे सुरक्षा रक्षकांचे गणवेश बदलणेकामी सुचना केली होती. त्यानुसार संस्थान सुरक्षा रक्षकांचा गणवेश बदलणेकामी मा.व्यवस्थापन समिती दि.१६/०४/२०१५ रोजीचे सभेत विषय नं.१० नुसार निर्णय होणेकामी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदरचे विषयावर सविस्तर चर्चा होऊन, सुरक्षितेच्या कारणास्तव व पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचे पत्राचा विचार करता, संस्थान आस्थापनेवरील सुरक्षा रक्षकांच्या युनिफॉर्मचा रंग बदलणेस मान्यता देण्यात आली. युनिफॉर्मसाठी खरेदी करणेत आलेले कापड परत करणेत यावे. जर पुरवठाधारक कापड परत घेत नसेल तर ते कापड विद्यार्थ्यांना किंवा मंदिर परिसराच्या सुरक्षिततेसाठी नियुक्त पोलिस कर्मचा-यांना अथवा इतर विधायक कार्यासाठी देणेत यावे. तसेच संस्थान आस्थापनेवरील सुरक्षा रक्षकांच्या युनिफॉर्मसाठी नेव्ही ब्ल्यु (Nevy Blue) रंगाचे आवश्यक कापड खरेदी करणेत यावे. त्यासाठी जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, विहीत पध्दतीने निवीदा मागविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सुरक्षा कर्मचा-यांना गणवेश शिलाईकामी नेव्ही-ब्ल्यु रंगाचा कपडा देणगी स्वरुपात घेण्यात आला. परंतु तदनंतर कर्मचारी संघटनेची गणवेशाचा कलर बदलू नये याबाबत मागणी व तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांचे मौखीक निर्देश यानुसार सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आला होता. आता पुन्हा पोलीस अधिक्षक, अहमनगर यांनी दि.१३/१२/२०१९ चे पत्राने सुरक्षा रक्षकांचे गणवेष प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सी रेग्युलेशन अॅक्ट २००५ मधील तरतुदी नुसार होणेस कळविले आहे.

प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सी रेग्युलेशन अॅक्ट २००५ मधील गणवेशबाबत तरतुद खालीलप्रमाणे.

21.Penalty for unauthorised use of certain uniform – If any private seucirty guard or supervisor wears the uniform of Army, Air force, Navy or any other armed forces of the Union or Police or any dress having the appearance or bearing any of the distinctive marks of that uniform, he and the proprietor of the private security agency shall be punishable with imprisonment for a term which may extend to one year or with fine may extend to five thousand rupees, or with both.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कामकाज कामकाज हे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ नुसार चालते. या अधिनियमातील तरतुद ३१ नुसार विश्वस्तव्यवस्थेचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या आणि भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम २(ग) च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानन्यात आलेले आहे.

पोलीस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर यांचे दि.१३/१२/२०१९ चे पत्राचे अनुषंगाने सुरक्षा रक्षकांचे गणवेशाचा रंग बदलाबाबत प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर केला असता सदरचे प्रस्तावावर वरिष्ठांनी तिरुपती देवस्थान, पंढरपुर आदी संस्थानमध्ये सुरक्षा विभागांचे पोषाख कोणते? याबाबत नमुद करता येईल असे

निर्देश दिले होते. त्यानुसार इकडील पत्र क्र.जा.नं.एसएसएस/वशि/संरक्षण/४३७७/२०२० दि.०४/०२/२०२० चे पत्राने श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर ट्रस्ट, पंढरपुर व श्री सिध्दीविनायक गणपती मंदिर ट्रस्ट, मुंबई यांना तसेच क्र.जा.नं.एसएसएस/वशि/संरक्षण/४३७८/२०२० दि.०४/०२/२०२० चे पत्राने तिरुमला तिरुपती देवस्थान, तिरुपती यांना त्यांचेकडील सुरक्षा रक्षकांचे गणवेशबाबत माहिती मागविणेत आली होती. तथापी तिरुपती देवस्थान व पंढरपुर देवस्थानकडून अद्याप माहिती प्राप्त नाही.

श्री सिध्दी विनायक गणपती ट्रस्ट, मुंबई यांनी दि.२६/०२/२०२० चे पत्राने कळविले आहे की, श्री सिध्दीविनायक गणपती न्यासात सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत. सुरक्षा अधिकारी यांना खाकी रंगाचा गणवेश टोपी (पी-कॅप) व सुरक्षा रक्षक यांना खाकी रंगाचा गणवेश व गडद निळया रांगाची टोपी (बेअर कॅप) बक्कलसहित आहे. त्याच बरोबर त्यांना लाईनर, नेमप्लेट, शिटी, कॅनवास बेल्ट, बक्कलसहित ई. गणवेश सोबत देण्यात येतो. तसेच श्री सिध्दीविनायक गणपती न्यासात सुरक्षा कोणत्याही खाजगी सेवा सुरक्षा यंत्रणा नाही. माहितीकरीता सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक यांचा फोटो सोबत जोडलेला आहे.

विभागाचा अभिप्राय- श्री साईंचे दर्शनासाठी येणारे साईभक्तांचे गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी संस्थानमार्फत कायम सुरक्षा रक्षकांची समाधी मंदिरामध्ये, समाधी मंदिराचे गेटवर तसेच मंदिर परिसरात नियुक्ती करण्यात आलेली आहे. श्रींचे दर्शनासाठी शिर्डीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होत असते. संस्थानचे संरक्षण विभागातील कायम कर्मचा-यांना पुर्वीपासुनच खाकी गणवेष देण्यात आलेला आहे. सुरक्षा रक्षकांचे खाकी गणवेषामुळे त्यांची वेगळी छाप पडते. खाकी कलरचा गणवेष सुरक्षा रक्षकांचा एक प्रकारचा आधार आहे. संस्थानमधील कंत्राटी सुरक्षा रक्षकांना वेगळया कलरचा गणवेष असल्याने प्रायव्हेट सुरक्षा रक्षक समजून साईभक्त नेहमीच त्यांचेशी वाद घालतात. तर कायम सुरक्षा रक्षकांना खाकी कलरचा गणवेष असल्याने कायम सुरक्षा रक्षकांना गर्दीचे नियोजन करतेवेळी साईभक्त त्यांचेशी वाद घालत नाहीत. त्यांचे सर्व सुचनांचे पालन होण्याचा अनुभव नेहमीच येत आहे.

सध्या रिक्षा चालक, टॅक्सी चालक, एस.टी.चालक व वाहक, शेती महामंडळाचे सुरक्षा रक्षक, फॉरेस्ट खात्याचे सुरक्षा रक्षक व अधिकारी यांचे गणवेषाचा कलर खाकी असल्याचे दिसत आहे. संस्थानचे सुरक्षा रक्षकांचे गणवेषावर SSS ही अक्षरे छापलेली असतात. तसेच त्यांचे टोपी, शोल्डर व बेल्टवर सुध्दा संस्थानचा SSS हा लोगो आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कामकाज कामकाज हे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ नुसार चालते. या अधिनियमातील तरतुद ३१ नुसार विश्वस्ताव्यवस्थेचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या आणि भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम २(ग) च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानन्यात आलेले आहे.

**मागणी**– वरील स्वरुपाची तक्रार ही पहिल्यांदाच घडलेली असल्याने लगेच या कारणास्तव सुरक्षा रक्षकांचे गणवेश बदलणे योग्य होणार नाही. सध्या रिक्षा चालक, टॅक्सी चालक, एस.टी.चालक व वाहक, शेती महामंडळाचे सुरक्षा रक्षक, फॉरेस्ट खात्याचे सुरक्षा रक्षक व अधिकारी यांचे गणवेषाचा कलर खाकी असल्याचे दिसत आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कामकाज कामकाज हे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ नुसार चालते. या अधिनियमातील तरतुद ३१ नुसार विश्वस्ताव्यवस्थेचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या आणि भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम २(ग) च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानन्यात आलेले आहे. त्यामुळे संस्थानचे कायम सुरक्षा रक्षकांचा गणवेश आहे तसाच खाकी ठेवता येईल किंवा खाकी रंगाचे कलर शेडमध्ये बदल करुन गडद हिरवट खाकी रंगाचा गणवेश घेणेबाबतची कार्यवाही करता येईल.

तरी पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचे सुचनेनुसार संस्थानचे कायम सुरक्षा रक्षक यांचा गणवेश प्रायव्हेट सिक्युरिटी प्रमाणे न करता सध्या आहे तोच गणवेश कायम ठेवावा, किंवा सध्याचे खाकी रंगाचे गणवेशाचे कलर शेडमध्ये बदल करुन गडद हिरवट खाकी रंगाचे शेडचा गणवेश घ्यावा याबाबतचा प्रस्ताव अवलोकनार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४०७** **सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला**.

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.५४** **श्री साई मंदिर सुरक्षेकरीता CISF/CRPF किंवा महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची सुरक्षा व्यवस्था घेणेबाबत**.

**प्रस्ताव-** सी.आय.एस.एफ. यांचे मार्फत सुरक्षा यंत्रणा घेणेबाबतची यापुर्वी कार्यवाही – सी.आय.एस.एफ. यांचे मार्फत सुरक्षा यंत्रणा घेणेबाबतची यापुर्वी कार्यवाही- तत्कालीन मा.श्री राधाकृष्ण विखे पा. मंत्री, कृषी व पणन, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचे दि.०२/०८/२०१२ रोजीचे पत्राद्वारे तत्कालीन मा.नामदार श्री पृथ्वीराज चव्हाण साहेब, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांना पत्राद्वारे कळविले होते की, "श्री साई मंदिराच्या सुरक्षेसाठी मंदिराची अंतर्गत सुरक्षा व्यवस्था केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल (CISF) कडे सोपण्यािबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी. तदनंतर दि.०८/१०/२०१२ चे मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये आयत्या वेळेचा विषय नं.०४ ने निर्णय क्र.८५७ नुसार श्री साई मंदिराचे सुरक्षेकरीता केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यांचेशी पत्रव्यवहार करुन संस्थानसाठी संरक्षण यंत्रणा शक्य तेवढया लवकर कार्यान्वीत करणेत यावी, असा निर्णय झालेला होता तसेच मा.मंत्री कृषी व पणन, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांचे पत्र कार्यासन अधिकारी विधी व न्याय विभाग यांना प्राप्त झालेले पत्राचे अनुषंगाने क्र.सासंवि-२०१२/संदर्भ५६७/का.सोळा, विधी व न्याय विभाग यांचे दि.२० नोव्हेंबबर २०१२ रोजीचे पत्राद्वारे सदर विषयाबाबत अभिप्रायासह वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास साद करणेबाबत कळविले होते. तानुसार श्री साईबाबा संस्थान सी.आय.एस.एफ. यंत्रणा घेण्यास तयार असलेबाबत अभिप्राय विधी व न्याय विभागास सादरकरण्यात येऊन जा.नं.एसएसएसवशि/संरक्षण३८८३/२०१२ दि.२७/११/२०१२ नुसार Director General, CISF, New Delhi यांचेशी पत्रव्यवहार केल्यानुसार त्यांचे वरिष्ठ प्र.शा.अधिकारी, CISF यांचे क्र.१२०१३(१०)/१९/१२आईएन्डपी/२०१३ दि.०४/०२/२०१३ चे पत्राप्रमाणे श्री जे.के.बागडी, वरिष्ठ प्र.शा. अधिकारी (प्रवनी) यांनी सदरचा प्रस्ताव गृहमंत्रालय, भारत सरकार यांचेकडे पाठविलेचे इकडील कार्यालयास कळविले तदनंतर जा.नं.एसएसएस/वशी-संरक्षण५२३९/२०१३ दि.१०/०२/२०१३ अन्वये कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांना दिलेले पत्र रितु अरोरा, DIG, CISF यांचे क्र.ID/१२०१३(१०)६३/१२/I&P/१९७ दि.१४/०२/२०१५ चे पत्राद्वारे

*"The Government of Maharashtra may continue to provide security to the temple and the Central Armed Police Force could be requisitioned for assisting the State Government in law & order duties for a specific short period as and when required."* असे संस्थानला कळविले होते.

त्यानंतर–श्री शिवदत्त कुमार, Du.com. CISF India Security Force, Nashik यांचे पत्र क्र.इ-४२०१९ केऔसुब/आईएसपी (ना)१४/४०३२ दि.०७/१०/२०१४ चे पत्रान्वये उप कमांडंट, केंद्रीय औद्योगि सुरक्षा बल भारतीय टाकसाळ, छापखाना, नाशिक यांचे दि.०७/१०/२०१४ रोजीचे पत्रामध्ये त्यांनी नमुद केले आहे की, श्री साईबाबा संस्थानला सुरक्षा संदर्भात सी.आय.एस.एफ. च्या सल्ल्याची आवश्यकता असेल व ती त्यांना हवी असेल तर आमची सदर सेवा पुरविण्याची तयारी आहे. त्यानुसार सी.आय.एस.एफ. यांचे मार्फत सुरक्षा मार्गदर्शन सल्ल्याची आवश्यकता असल्याने सदर विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१४ चे सभेपुढे सादर करण्यात आला. सदरचे विषयावर चर्चा होऊन निर्णय क्र.९०२ ने मुद्दा १) केंद्रीय औद्योगिक सुरक्षाबल संस्थेकडून संस्थानला मार्गदर्शनाची आवश्यकता असल्याने सदर संस्थेची विनामुल्य अथवा मानधन तत्वावर कन्सलटंट म्हणुन नेमणू करणेकामी त्यांचेकडे सविस्तर विचारणा करणेबाबत कळविले होते. त्याचप्रमाणे मुद्दा २) त्यांचे मार्फत मंदिर व मंदिर परिसराच्या सुरक्षेसाठी सुरक्षा कम्रचारी घ्यावयाचे झालयास त्यांचे वेतन व मानधन यावर किती खर्च येईल याबाबत सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असा निर्णय झाला. त्यास अनुसरुन मुद्दा क्र.०१ श्री शिवदत्त कुमार, डेप्युटी कमांडंट, CISF, इंडीया सिक्युरिटी फोर्स यांचेकडेकन्सलटंन्सी सेवा पुरविणेबाबत व सुरक्षा पुरविणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्याकामी त्यांना जा.नं.एसएसएस/वशि/संरक्षण/३३८७/२०१४ दि.१७/१०/२०१४ ने श्री शिवदत्त कुमार, डेप्युटी कमांडंट, CISF, नाशिक यांना कळविण्यात आले होते. त्यावर त्यांनी श्री सुमंत सिंग, असिस्टंट इन्स्पेक्टर जनरल, दिल्ली यांचे दि.०२/१२/२०१४ चे पत्राने कन्सलटंन्सी सेवा पुरविणेकामी रु.३ लाख २५ हजार इतका खर्च कळविला. सदर खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आली व त्याप्रमाणे त्यांचे समवेत वेळोवेळी पत्रव्यवहार व मिटींग आयोजीत करण्यात येऊन त्यांचे मार्फत सुरक्षा विषयक मार्गदर्शन घेण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे त्यांनी केलेला पहाणी अंती ऑडीट रिपोर्ट सादर केला आहे.

परंतू मुद्दा क्र.०२ नुसार जा.नं.एसएसएस/वशि/संरक्षण/४८८७/२०१५ दि.०६/०१/२०१५ ने AIG, CISF, दिल्ली यांना दिलेले पत्र. श्री सुमंत सिंग असि. इन्सपेक्टर जनरल / टेक महानिर्देशक केंद्रिय औद्योगिक सुरक्षा बल यांना एकुण मंदिर सुरक्षेकरीता ऑफीसर ग्रेडचे अधिकारी ०१, सुपरवायझर ग्रेडचे ०३ व सिक्युरिटी गार्ड ग्रेडचे ११३ असे ११७ कर्मचारी पुरविणेकामी खर्चाचा अंदाज कळविणे व मिटींग आयोजीत करणेकामी

कळविणेत आलेले आहे. सदरचे पत्राचे अनुषंगाने उप महानिर्देशक (प्रवनी) CISF, यांचे क्र.आईडी १०/१६३/१२/I&P/२०१५-१३३ दि.०६/०२/२०१५ चे पत्रान्वये,

*"The Government of Maharashtra may continue to provide security to the temple and the Central Armed Police Force could be requisitioned for assisting the State Government in law & order duties for a specific short period as and when required."* असे कळविले आहे. यावरुन असे सिध्द होते की, महानिर्देशक केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल (गृहमंत्रालय) दिल्ली यांचे समवेत झालेल्या पत्रव्यवहारावरुन त्यांना वेळोवेळी केंद्रीय सुरक्षा बल श्री साईबाबा संस्थान यांना State Government in law & order प्रमाणे देणे शक्य नाही असेच कळविलेले आहे.

त्यानंतर–१) मा.श्री राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा मुंबई यांचे दि.०५/०२/२०१५ चे पत्रावर कार्यवाही होणेबाबत अपर जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे क्र.डीसी/कार्या. ९ब/ २०५६/२०१५ दि.०४/०८/२०१५ चे पत्र जा.नं.एसएसएस/वशी/संरक्षण/ २५८५/२०१५ दि.०७/०८/२०१५ रोजी मा.जिल्हाधिकारी सो. अहमदनगर यांना दिलेले पत्र अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचे क्र.एसएसए/ ०३१५/प्र.क्र.१७/विशा-४ गृह विभाग मंत्रालय, मुंबई यांचे दि.१३/०७/२०१५ रोजीचे पत्र मा.जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांना प्राप्त होऊन सदर पत्राची प्रत इकडील कार्यालयास प्राप्त झाली त्यामध्ये श्री साईबाबा मंदिरासाठी सी.आय.एस.एफ. सुरक्षा दलामार्फत पुरविण्यात यावी. सदर सुरक्षेकरीता आवश्यक तो निधी श्री साईबाबा संस्थान शिर्डी करणार आहे. त्यामुळे राज्य शासन व केंद्र शासनावर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही, असे विरोधी पक्षनेते महाराष्ट्र शासन यांचे दि.०५/१२/२०१५ चे पत्रान्वये कळविले आहे. तथापी सदर त्यानुसार श्री शिर्डी संस्थानचे ठरावाबाबतचे कोणतेही पत्र शासनाकडे दिसून येत नाही. तसेच विधानसभेतील अश्वासन क्र.६९४ तसेच लोकसभा अतारांकित प्रश्न क्र.५७०२ हे दोन्ही विषय याच विषयास अनुसरुन असल्याने ते प्रलंबित आहेत. श्री साईबबा संस्थान खर्च करण्यास तयार आहे किंवा याबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास तात्काळ सादर करण्यात यावा असे कळविल होते.

i. त्याप्रमाणे जा.नं.एसएसएस/वशी/संरक्षण/२५८५/२०१५ दि.१७/०६/२०१५ रोजी मा.जिल्हाधिकारी साहेब, अहमदनगर यांना सविस्तर अहवालासह सादर करण्यात येऊन कळविण्यात आले आहे की, साई मंदिर सुरक्षेकरीता सी.आय.एस.एफ. यांचे मार्फत सुरक्षा व्यवस्था घेणेबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तयार आहे. त्याकामी श्री सुमंज सिंह, असि.डायरेक्टर जनरल (टेक्नी) न्यु दिल्ली यांचेशी ११७ कर्मचा-यांचा खर्च कळविणेबाबत पत्रव्यवहार केलेला असुन त्यांचेकडून खर्चाचा अंदाज प्राप्त झालेनंतर सी.आय.एस.एफ. ची सुरक्षा व्यवस्था घेणेबाबत निर्णय घेण्यात येईल.

ii. सी.आय.एस.एफ. यांचे बरोबर वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात येऊन उप महानिर्देशालय / प्रवेश व निती यांचे पत्रांक : आईडी-१२०१३(१०) १६३/१२/I&P/२०१६-८७ दि.२५ जानेवारी २०१६ चे पत्रात श्री साईबाबा संस्थान, शिर्डी (महाराष्ट्र) यांनी दि.२७/११/२०१२ च्या पत्रानुसार केंद्रीय औद्योगिक सुरक्षाबल नेमणुक करणेबाबत विनंती केली होती. ती या संचालनास प्राप्त झाली आणि पुढे मिनीस्ट्री ऑफ होम अफेयर्स यांचेकडे विचार करण्याकरीता आणि पुढील आदेशासाठी पाठविण्यात आली. या विषयी झालेल्या निर्णयाबाबत आपणास यापुर्वी सुध्दा आमच्या संचानलयाच्या पत्र क्र.(१९७) दि.१४/०२/२०१४ द्वारे कळविण्यात आले होते.

*"The Government of Maharashtra may continue to provide security to the temple and the Central Armed Police Force could be requisitioned for assisting the State Government in law & order duties for a specific short period as and when required."* या प्रमाणे निर्णय असल्याने श्री साईबाबा मंदिर परिसर येथे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाची कायमस्वरुपी नियुक्ती करणे योग्य नाही. परंतु जेंव्हा गरज पडेल तेंव्हा एका छोटया वेळेसाठी कायदा आणि सुरक्षा कायम ठेवण्यासाठी बोलावू शकतात, असे नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचे समवेत केलेले पत्रव्यवहार – महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचे मार्फत सुरक्षा कर्मचारी घेणेकामी पत्रव्यवहार करण्यात आला तथापी श्रींचे शताब्दी महोत्सव २०१८ चे नियोजनकामी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचे मार्फत CISF ची सुरक्षा व्यवस्था मिळेपर्यंत तातडीची गरज म्हणुन मंदिराचे महाद्वार व दर्शनरांग प्रवेशद्वार तसेच ज्या ठिकाणी संस्थानचे आर्थिक व्यवहार चालतात अशा ठिकाणी बंदुक / शस्त्रधारी सुरक्षा कर्मचारी घेणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचे मार्फत सुरक्षेची तजवीज करावयाची झाल्यास खर्चाचा अंदाज घेणेसाठी त्यांना पत्र देवून प्रतिमहा किती वेतन द्यावे लागेल याबाबत प्रस्ताव जा.नं.एसएसएस/वशी/संरक्षण/५४२७/२०१५

दि.३१/१२/२०१५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला. तूयानंतर जा.नं.मरासुम/२०१/२०१६ दि.१६/०१/२०१६ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले.

त्यावर वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात येऊन खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे.

१) दि.१६/०८/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये विषय नं.०४ – मंदिर व मंदिर परिसर, संस्थानचे इतर विभागातील सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची सुरक्षा घेणेबाबत यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.५१३ अन्वये सुरक्षा कर्मचारी घेण्यासाठी सिक्युरिटी ऑडीट करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. सुरक्षा ऑडीट अंती एकुण २०४ कर्मचारी यांची आवश्यकता असलेबाबत ठरले.

२) दि.२५/०७/२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये विषय नं.२० – यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सध्या संस्थानचे कायम व कंत्राटी सुरक्षा रक्षकांची संख्या जास्त असल्यामुळे संस्थानला मोठया प्रमाणावर आर्थिक भार पडत आहे. तथापी मंदिर सुरक्षा हाही अतिशय प्राधान्याचा विषय आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे ५० सुरक्षा कर्मचारी व एक सुरक्षा अधिकारी एवढे मनुष्यबळ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने सुरुवातीस एक वर्ष (दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.३० सप्टेंबर २०१८) कालावधीसाठी घेणेत यावे व त्यांना कामाच्या अनुभवानुसार गरज पाहुन मनुष्यबळ वाढविणेबाबत पुढील निर्णय घेण्यात यावा.

**त्यानंतर वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात येऊन.**

३) दि.२५/०९/२०१७ रोजी विषय नं.१० वरील निर्णय क्र.८४० नुसार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे मार्फत श्री साई मंदिर सुरक्षेकामी प्रायोगीक तत्वावर ०३ महिने कालावधीसाठी १०० सुरक्षा कर्मचारी व त्यानुसार आवश्यक असलेले अधिकारी घेण्यात यावे तसेच या महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या कर्मचा-यांमध्ये संस्थान कर्मचा-यांचीही नेमणुक करणेत यावी, असे ठरले. **त्यावर त्यांनी ०३ महिने कालावधीसाठी सुरक्षा कर्मचारी पुरविणेस संमती दर्शविली नाही.**

४) दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८४० अन्वये महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे मार्फत श्री साई मंदिर सुरक्षेकामी प्रायोगिक तत्वावर ०३ महिणे कालावधीसाठी १०० सुरक्षा कर्मचारी व त्यानुसार आवश्यक असलेले अधिकारी घेण्यात यावे असे ठरले आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचेबरोबर पत्रव्यवहार केला असता त्यांनी दि.२७/११/२०१७ रोजीचे पत्रान्वये त्यांचेकडील ०४ अधिकारी व १२८ सुरक्षा रक्षकांसाठी आवश्यक डिपॉझीट + ०१ महिन्याचे वेतनाकरीता रु.१,११,७७,३२०/- मात्र रकमेची मागणी केली आहे. परंतु सध्या समाधी शताब्दी वर्षास सुरुवात झालेली असून अपेक्षेप्रमाणे साईभक्तांची गर्दी नसल्यामुळे महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे मार्फत सुरक्षा कर्मचारी घेणेबाबतचा निर्णय रद्द करणेत यावा, असे ठरले.

**सद्यस्थिती:-**१) डॉ.राजेंद्र बाली सिंग यांचे सा.प्र.शा. विभागाकडील आवक क्र.११४१० दि.१७/१०/२०१९ रोजी प्राप्त पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी "श्री साईबाबा मंदिर, शिर्डी येथील सुरक्षा आणि सतर्कते विषयी ब-याच वेळा मी SSST बोर्ड मिटींगमध्ये आणि ईतर मेंबर्सना ब-याच वेळा मी CISF अथवा CRPF यांच्याकडून सुरक्षा घेण्याविषयी माझो मत मांडले आहे. परत एकदा देशातील काही मंदिरांना तोडफोड आणि दंगे करण्याविषयी भितीचे पत्र पाठविले आहे. मी सुचवू इच्छितो की मंदिर परिसरात CISF/CRPF यांच्याकडुन सुरक्षा घ्यावी. त्या एजन्सीज देशाच्या विविधतेने आणि कुशलतेने सज्ज आहेत, अगदी विचित्र आणि संवेदनशिल स्थितीत देशातील दुर्गम भागात संसासधंना सुरक्षा पुरवितात. कृपया मी केलेली सुचना लक्षात घेऊन श्री साईबाबा मंदिर आणि भक्तांना शांततेने दर्शनासाठी सुचविलेली सुरक्षा यंत्रणा पुरवावी" असे नमुद केलेले आहे.

२) पोलीस निरीक्षक कार्यालय, शिर्डी यांचे सा.प्र.शा.वि.आवक क्र.१३३३८ दि.२८/११/२०१९ चे पत्र पोलीस निरीक्षक कार्यालय शिर्डी यांचे सा.प्र.शा.विभागाकडील आवक क्र.१४३११ दि.१३/१२/२०१९ चे पत्र. साई मंदिर सुरक्षा (पोलीस) यांचे सा.प्र.शा. विभागाकडील आवक क्र.१५३३१ दि.३०/१२/२०१९ चे पत्र नुसार पोलीस निरीक्षक, शिर्डी तसेच साई मंदिर सुरक्षा, शिर्डी यांचे गोपनीय जावक क्रमांक शिर्डी पो.स्टे.३१५/२०१९ दि.२८/११/२०१९ अन्वये पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असुन सदर पत्रात त्यांनी साईबाबा मंदिर सुरक्षा आणि संरक्षणासाठी मंदिरात केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (CISF), केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) यांची सुरक्षा व्यवस्था पुरविणेबाबत मत नोंदविल्याचे कळविलेले आहे. या अगोदर संस्थानास विनाशी धमकी देणारे पत्र आणि देशातील काही मंदिरात हिंसाचाराचा देण्यात आलेला इशारा या अनुषंगाने CISF व CRPF देशातील बहुकुशल संस्था आहेत. ज्या देशातील विविध गंभीर आणि संवेदनशील पायाभुत क्षेत्रांना विविध क्षेत्रांत सुरक्षा

प्रसाद करण्यासाठी कटीबध्द आहेत. त्या अनुषंगाने श्री साईबाबा संस्थन, शिर्डी हे सदरची सुरक्षा व्यवस्था घेणेस तयार आहे अगर कसे याचा स्पष्ट अहवाल मिळणेस कळविले होते.

CISF यांनी यापुर्वी श्री साईबाबा संस्थानला सुरक्षा देता येत नाही असे, महानिर्देशालय, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल (गृहमंत्रालय) यांचे पत्रांक आई डी-१२०१२ (१०)/१६३/१२/I&C/२०१६/८७ दि.२५/०१/२०१६ चे पत्रान्वये कळविलेले असुन CISF यांची सेवा घ्यावयाची झाल्यास त्यासाठी येणारा खर्च तसेच तरतुदी व त्यांची मागणी (requirements) बाबत त्यांनी आजपर्यंत कळविलेला नाही. परंतु श्रींचे दर्शनार्थ साईभक्तांची वाढती गर्दी, देशात घडणारे घातपात लक्षात घेता मंदिर व मंदिर सुरक्षा तसेच साईभक्तांची सुरक्षितता ही बाब अतिशय संवेदशनशिल आहे.

करीता पुनश्च: मंदिर सुरक्षा करीता CISF व CRPF यांचे समवेत सुरक्षा घेणेकामी पत्रव्यवहार करुन पाठपुरावा करणे आवश्यक असल्याने सुरक्षा हा विषय धोरणात्मक बाब असून या अगोदर संस्थानास धमकी देणारे पत्र आणि देशातील काही मंदिरात हिंसाचाराचा देण्यात आलेला इशारा या अनुषंगाने CISF व CRPF या देशातील बहुकुशल सुरक्षा संस्था आहेत. ज्या देशातील विविध गंभीर आणि संवेदनशील पायाभुत क्षेत्रांना विविध सुरक्षा प्रदान करण्यासाठी कटीबध्द आहेत. याकामी The Director General, Central Industrial Security Force, New Delhi यांना पत्र देणे आवश्यक आहे.

तरी साई मंदिराचे महाद्वार तसेच दर्शन रांगेचे प्रवेशद्वारावर साईभक्तांची चेकींगकामी CISF व CRPF यांचे सुरक्षा व्यवस्था घेणे अत्यंत जरुरीचे असल्याने सदर धोरणात्मक बाब म्हणुन श्री साईबाबा मंदिरासाठी CISF व CRPF यांचे मार्फत सुरक्षा घेणेस संस्थान तयार आहे किंवा नाही याकामी मा.तदर्थ समिती दि.२४/०२/२०२० चे सभेमध्ये विषय नं.३५ नुसार प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदरचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.१३५ पुढीलप्रमाणे झाला आहे. साईमंदिर सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचेकडे पत्रव्यवहार करणेत येऊन सविस्तर माहीतीस्तव प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा,असे ठरले आहे.

तथापी CISF / CRPF /MSSC ची सुरक्षा घेणेकामी खालीलप्रमाणे मर्यादा येत असुन खालील मुद्यांचे अवलोकन होणेस विनंती.

**अ) CISF/ CRPF ची सुरक्षा ची नेमणूकीस मर्यादा.**

१) CISF/ CRPF सुरक्षा ही व्यावसाईक एजन्सी आहे.

२) संस्थान मध्ये येणारा व्यक्ती हा भाविक असल्याने त्यांचे बरोबर नम्रतेने व्यवहार करावा लागेल अन्यथा वादाचे प्रसंग उदभवतील.

३) CISF ही सुरक्षा एजन्सी साईभक्तांची चेकींग फ्रिस्किंग करतील व त्यासाठी जास्त वेळ लागेल तसेच सुट्टीच्या दिवशी, उत्सवाच्या दिवशी प्रंचड गर्दी होत असल्याने CISF त्यांचे वेळेत चेकिंग फ्रिस्किंग वेळेत पुर्ण न केल्यास भक्तांचे दर्शन वेळेत होणार नाही त्यामुळे भाविंकाची गर्दी नियंत्रीत करणे शक्य होणार नाही.

४) CISF ची सेवा घेतली तर संस्थानचेच सुरक्षा रक्षक अतिरिक्त ठरतील त्यामुळे त्यांना काम कमी मिळेल किंवा कर्मचारी यांच्या सेवा संपुष्टात आणाव्या लागतील त्यामुळे असंतोष वाढेल.

५) सन २०१७ मध्ये MSSC यांनी मंदिर सुरक्षेकरीता दिलेली संख्या (६४४) जादा वाटत असल्याने पोलीस विभागामार्फत पुनश्च आढावा घेवून मंदिर सुरक्षेकरीता **२०४** कर्मचारी संख्या निश्चीत करण्यात आली होती.

५) सद्यस्थितीत CISF/ CRPF कर्मचा-यांना,पगार,निवास,भोजन, व इतर भत्ते सुविधा खर्च यासाठी अंदाजे खर्च यासाठी अदांजे ५० हजार प्रति कर्मचारी प्रमाणे प्रति माह २०४ कर्मचा-यांकरीता ०१ कोटी व वार्षिक सुमारे १२ कोटी खर्च येईल व दरवर्षी या खर्चात वाढ होत असल्याने संस्थानवर मोठा आर्थिक भार पडेल.

६) सद्यस्थितीत कोरोनो (covid 19) मुळे मंदिर भाविकांना दर्शनाकरीता बंद आहे, सदरची परिस्थीती किती वेळ चालेल याबाबत काहीही निश्चित नसलेने सदरचा खर्च संस्थानला परवडणार नाही.

७) डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल, (I&P) डायरेक्टर जनरल CISF, गृह विभाग, यांनी No.ID-12013(10)/163/12/I&P/197 Dt.14, Feb, 2014 चे पत्रान्वये संस्थानला कळविले आहे की,

"The Government of Maharashtra may continue to provide security to the temple and the Central Armed Police Force could be requisitioned for assisting the State Government in law & order duties for a specific short period as and when required."

याप्रमाणे निर्णय असल्याने श्री साईबाबा मंदिर परिसर शिर्डी येथे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाची कायमस्वरुपी

नियुक्ती करणे योग्य नाही. परंतू जेंव्हा गरज पडेल तेंव्हा एका छोटया वेळेसाठी कायदा आणि सुरक्षा कायम ठेवण्यासाठी बोलावू शकतात.असे नमूद केलेले आहे.

**ब) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ ( MSSC) ची सुरक्षा नेमणुकीस मर्यादा.**

१) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे सुरक्षा कर्मचारी हे सेवानिवृ-त / प्रशिक्षीत कर्मचा-यांची नेमणुक केली जाते. सद्यस्थितीत सदर कर्मचारी यांचा पगार, निवास,भोजन व इतर खर्च याकामी प्रति व्यक्ती सुमारे ३० ते ४० हजार खर्च अपेक्षित असुन २०४ कर्मचा-यांकरीता प्रतिमाह सुमारे ७० लाख व वार्षिक सुमारे ८.५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.तसेच दरवर्षीचा पगारवाढ खर्च संस्थानला परवाडणारा नाही.

२) दिनांक २५/०९/२०१७ रोजीचे व्यवस्थापन समितीचे विषय नं.०७ निर्णय क्रं.८४० नुसार साईमंदिर सुरक्षेकामी प्रयोगिक तत्वावर ३ महिणे कालावधीसाठी १०० सुरक्षा कर्मचारी व त्यानुसार आवश्यक असलेले अधिकारी घेण्यात यावे. तसेच या महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या कर्मचा-यामध्ये संस्थान कर्मचा-यांची नेमणूक करणेत यावी असे ठरले होते. त्यावर म.रा.सु.म.यांनी ०३ महिने कालावधीसाठी सुरक्षा कर्मचारी पुरविणेस संमती दर्शविली नाही. परंतु सध्या समाधी शताब्दी वर्षास सुरवात झालेली असून अपेक्षा प्रमाणे साईभक्तांची गर्दी नसल्याने महाराष्ट्रराज्य सुरक्षा महामंडळ यांचे मार्फत सुरक्षा कर्मचारी घेणेबाबतचा निर्णय रद्द करण्याचा ठराव झालेला आहे.

३) सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे कर्मचा-यांचा पगार, निवास, भोजन व इतर भत्ते याकामी येणारे वार्षिक अंदाजे रु.८.५ कोटी खर्च हा संस्थानला परवडणारा नाही, त्यामुळे संस्थानवर मोठा आर्थीक भार पडेल.

४) सद्यस्थितीत कोरोनो (covid19) मुळे मंदिर भाविकांना दर्शनाकरीता बंद आहे तसेच सदरची परीस्थीती किती वेळ चालेल याबाबत काहीही निश्चित नसलेने सदरचा खर्च संस्थानला परवडणार नाही.

५) सध्यस्थितीत संस्थानकडे मॉडर्ण विर रेस सिक्युरिटी या सुरक्षा एजन्सी मार्फत प्रशिक्षित असे माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांचे मार्फत साईमंदिराचे महाव्दार तसेच दर्शनरांग प्रवेशव्दारावर साईभक्तांची चेकिंग फ्रिस्किंग केली जाते.

**क) संस्थानचे उद्दीष्ट ,**

१) साई दर्शनाकरीता जास्तीत जास्त साईभक्त यावे व त्यांना संस्थानकडून चांगली सेवा पुरविणे.

२) वरील दोन्हीही एजन्सीज अतिमहाग आहेत.

३) यावर उपाय योजना म्हणुन CISF / CRPF / MSSC / YASHDA यांचेकडून सुरक्षा कर्मचा-यांना प्रशिक्षण देता येईल.

४) सद्यस्थित साईबाबा संस्थानकडे पुरेशा प्रमाणात सुरक्षारक्षक उपलब्ध आहेत.

५) सद्यस्थितीत देशातील सर्वात मोठे तिरूपती देवस्थान येथेही त्यांचे स्वत:चे सुरक्षा रक्षकांमार्फत सुरक्षेचे काम केले जात आहे तसेच तसेच सिध्दी विनायक देवस्थान मुंबई, विठ्ठल रुख्मिणी मंदिर देवस्थान पंढरपुर, महालक्ष्मी देवस्थान, कोल्हापुर, तुळजा भवानी देवस्थान, तुळजापुर येथेही सुरक्षेचे काम मंदिराच्या सुरक्षा विभागामार्फत केले जाते. अद्याप कोणत्याही देवस्थानने CISF / CRPF ची सुरक्षा व्यवस्था घेतलेली नाही.

६) गर्दीच्या वेळी Crowd Management हा महत्वाचा विषय असतो.

**ड) सुरक्षा कर्मचा-यांना खालील प्रमाणे प्रशिक्षण घेता येईल.**

१) CISF मार्फत चेकींग / फ्रिस्कींग बाबत वेगळे प्रशिक्षण घेता येईल.

२) यशदा, पुणे यांचे मार्फत संस्थानचे कायम व कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांना साईभक्तांशी नम्र बोलणे, वागणे, आपत्ती व्यवस्थापन याबाबतचे प्रशिक्षण देता येईल.

३) साई मंदिराचे मुख्य प्रवेशद्वारावर तसेच दर्शन रांगेचे प्रवेशद्वारावर साईभक्तांचे चेकींग फ्रिस्किंगकामी मॉडर्ण विर रेज सिक्युरिटी सर्व्हीसेस या एजन्सी मार्फत सेवानिवृत्त प्रशिक्षीत असे माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी संस्थानमार्फत नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यांचे सोबत साई मंदिर सुरक्षा पोलीस कर्मचारी यांचे मार्फतही चेकींग फ्रिस्किंग करता येईल.

४) पोलीस विभागामार्फतही सुरक्षा कर्मचा-यांना चेकींग, फ्रिस्किंग, व बेवारस/संशयीत वस्तु मिळून आल्यास करावयाची कार्यवाही याबाबतचेही प्रशिक्षण देता येईल.

साई मंदिर सुरक्षेकामी CISF / CRPF / MSSC ची सुरक्षा घेणेकामी वरील "**अ**", "**ब**" प्रमाणे मर्यादा येत असुन वरील "**क**", प्रमाणे साईभक्तांना चांगल्या प्रकारे सुविधा प्राप्त करुन देणे संस्थानचे उद्दीष्ट

आहे. तरी साई मंदिर सुरक्षेकामी CISF / CRPF / MSSC ची सुरक्षा घेणेकामी येणा-या मर्यादा विचारात घेता मुद्दा क्र. “ड”, प्रमाणे सुरक्षा कर्मचा-यांना प्रशिक्षण देणेकामी सदरचा प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन फेरनिर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई मंदिर सुरक्षेकरीता शस्त्रधारी व विनाशस्त्रधारी असे एकुण २०४ सुरक्षा कर्मचारी पुरविणे बाबत महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ याचेशी पत्रव्यवहार करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.५५** **संरक्षण विभागाकरीता प्राप्त देणगी सुरक्षा साहित्याचे वॉरंटी/गॅरंटी पिरेड नंतर मेन्टनंन्सकामी CAMC कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** संरक्षण विभागाकरीता रिलायन्स इंडस्ट्रीज मुंबई यांचेकडून खालीलप्रमाणे सुरक्षा साहित्य देणगी स्वरुपात प्राप्त झालेले असुन मागील वर्षी माहे जुलै २०१९ व ऑगष्ट २०१९ मध्ये साहित्याचे इन्स्टॉलेशन पुर्ण करुन साहित्य वापरास सुरुवात करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | **देणगी साहित्य तपशिल** | **नग** | **एकुण रक्कम** | **इन्स्टॉलेशन दिनांक** | **वॉरंटी / गॅरंटी पिरेड संपुष्टात येण्याची दिनांक** |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | X-Ray Baggage Scanner<br>Krystalvision KV6040 Advanced X-Ray Machine, | ०४ | ४५,३१,२००/- | १९/०७/२०१९ | १८/०७/२०२० |
| ०२. | Doar Frame Metal Detector (DFMD) Model - Garrett PD6500i 33 Zone | १५ | ४६,०२,०००/- | २५/०७/२०१९ | २४/०७/२०२१ |
| ०३. | Hand Held Metal Detector (HHMD) Model – Garrett Super Wand with Rechargeable Battery Kit | ४० | ८,०२,४००/- | २५/०७/२०१९ | |
| ०४. | MotorolaWalky Talky VHF Model - XIRP-3688 | ७५ | १२,०९,२०५/- | ०२/०८/२०१९ | ०१/०८/२०२१ |
| ०५. | Motorola VHF Basestation Model – XIRM 6660i | ०१ | ४३,०७०/- | ०२/०८/२०१९ | |
| ०६. | Motorola SLR-5300 VHF Repeater With all Std. Accessories | ०१ | ३,३३,७९२.५० | ०२/०८/२०१९ | |
| ०७. | Batteries for Motorola XIRP-3688 VHF (2250mAh Li-on Battery) | ७५ | १,८५,११२.५० | ०२/०८/२०१९ | |
| | एकुण रक्कम - | | १,१७,०६,७८०/- | | |

उपरोक्त तक्तामध्ये अ.नं.२ ते ७ यांचा गॅरंटी व वारंटी कालावधी दोन वर्षे म्हणजे २४/०७/२०२१ व ०१/०८/२०२१ पर्यंत आहे. अ.नं.१ X-Ray Baggage Scanner ची गॅरंटी / वॉरंटी कालावधी दि.१८/०७/२०२० पर्यंत आहे. सदर बॅगेज स्कॅनरची वॉरंटी / गॅरंटी कालावधी संपलेनंतर मशिन नादुरुस्त झालेस दुरुस्तीसाठी आवश्यक स्पेअरपार्ट व टेक्नीशियन नसल्यामुळे अडचण येईल. त्यामुळे X-Ray Baggage Scanner सुस्थितीत कार्यान्वीत राहणेकामी सदर कंपनीस CAMC (कॉम्प्रेसिव्ह वार्षिक मेन्टेनंन्स कॉन्ट्रॅक्ट) देणे आवश्यक आहे.

त्याबाबत मशिन उत्पादक व पुरवठादार मे. Krystalvision Image Systems Pvt.Ltd. Pune यांना ०४ नग X-Ray Baggage Scanner करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह मेन्टेनंन्स कॉन्ट्रॅक्टचा प्रस्ताव पाठविणेस कळविले असता त्यांनी दि.२४/०६/२०२० रोजीचे ई-मेल द्वारे खालीलप्रमाणे प्रस्ताव दिलेला आहे.

| अ.नं. | तपशिल | प्रति नग दर | नग | एकुण रु. |
|---|---|---|---|---|
| ०१. | CAMC for KV6040 SV Model Baggage Scanner | 1,20,000/- | 04 | 5,20,000/- |
| | Comprehensive Annual Maintenance Contract (CAMC) Charges for 1 year | | SGST 9% | 46,800/- |
| | | | CGST 9% | 46,800/- |
| | | | एकुण रु.- | 6,13,600/- |
| | | | | अक्षरी रु. सहा लाख तेरा हजार सहाशे मात्र. |

**विभागाचा अभिप्राय:-** संरक्षण विभागाकडे कार्यान्वीत असलेल्या ०४ नग X-Ray Baggage Scanner सुस्थितीत चालू राहणेकरीता मशिनच्या उत्पादक व पुरवठादार मे. Krystalvision Image Systems Pvt.Ltd. Pune यांना वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणे आवश्यक आहे.

**मागणी:-** तरी संरक्षण विभागाच्या सुरक्षा साहित्यापैकी ०४ नग X-Ray Baggage Scanner चे CAMC (वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट) देणेकामी मे. Krystalvision Image Systems Pvt.Ltd. Pune यांनी दिलेले वार्षिक दर रु.६,१३,६००/- चे खर्चास मान्यता मिळणेकामी कंपनीचे प्रतिनीधी यांचेशी चर्चा / वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.४०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संरक्षण विभागाकडे देणगी स्वरुपात प्राप्त झालेल्या सुरक्षा साहित्याचे मेन्टनंन्स करीता विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी,असे ठरले.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.५६** **श्री साईनाथ रुग्णालयात माहे जानेवारी-२०२० ते मार्च-२०२० अखेर वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.२,८८,३५,४९९/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद– कलम १७(१) व १७(२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र - १) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २२/१२/२०१६ रोजीच्या निर्णय क्र. ९४४.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २५/०२/२०१७ रोजीच्या निर्णय क्र. ०६.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०१/११/२०१८ रोजीच्या निर्णय क्र. ६३८.

प्रस्तावना- श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन गरीब व गरजु रुग्णांना मोफत उपचार पुरविण्याच्या दृष्टीने श्री साईनाथ रुग्णालय उपरोक्त संदर्भ क्र. ०१ नुसार दि. ०१/०१/२०१७ रोजी पासुन संपुर्णपणे मोफत उपचार सुरु केलेले आहे. संदर्भ क्र. ०२ नुसार दि. ०१/०३/२०१७ रोजी पासुन श्री साईनाथ रुणालय भरती होणा-या रुग्णांना आवश्यकते प्रमाणे उपचारासाठी लागणारे रक्त व रक्तघटक मोफत देण्यात येत आहेत. तसेच मा. व्यवस्थापन सभा दि.०१/११/२०१८ रोजीच्या निर्णय क्र. ६३८ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील सद्यास्थितीला लागु असणारे दर जसेच्या तसे श्री साईनाथ रुग्णालयात लागु करणेत यावेत, व ते उपचार, शस्त्रक्रिया श्री साईबाबा रुग्णालयात होत नाहीत परंतु शासकीय रुग्णालयात होत आहेत. अशा उपचारांचे दर शासनाच्या दराप्रमाणे घेण्यात यावेत. तसेच शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे शासकीय रुग्णालयामधुन देण्यात येणा-या तपासणी व त्याबाबतच्या रुग्णशुल्काबाबतचे सेवाआकारामध्ये आकारण्यात येणा-या शुल्क दरामध्ये दर दोन वर्षांनी १५ ते २० टक्के वाढ करणेत येईल असे नमुद केलेले आहे. याअनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालयातील दर निश्चीत झालेनंतर दोन वर्षांनी १० टक्के वाढ करणेस मान्यता देण्यात आली. सदर निर्णयाची अंमलबजावणी दि. ०१/०१/२०१९ नुसार करण्यात आलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयात माहे जानेवारी २०२० ते मार्च २०२० अखेर सर्व घटकातील रुग्णांना मोफत तपासणी, शस्त्रक्रिया व औषधांवरील झालेल्या खर्च रक्कम रु.२,८८,३५,४९९/- मात्र देण्यात आलेली सवलतीचे विवरण खालील प्रमाणे आहे.

**अंतररुग्णांवर झालेला खर्च –**

| अ.नं | महिना | एकुण रुग्ण संख्या | जनरल रुग्णांपोटी झालेला खर्च | संस्थान कायम कर्मचारीपोटी झालेला खर्च | संस्थान कंत्राटी कर्मचारीपोटी झालेला खर्च | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | जानेवारी २०२० | १,४४८ | ५७,२०,४५५/- | ३३,०२८/- | ९,७९४/- | **५७,६३,२७७/-** |
| ०२ | फेब्रुवारी २०२० | १,४१५ | ५१,०१,४१२/- | १,११,४७६/- | ४,००७/- | **५२,१६,८९५/-** |
| ०३ | मार्च २०२० | ८६७ | ४५,००,१०२/- | ६८,०६०/- | ०/- | **४५,६८,१६२/-** |
| | | | | | **एकुण रक्कम रुपये** | **१,५५,४८,३३४/-** |

**बाह्यरुग्णांवर झालेला खर्च -**

| अ.नं | महिना | एकुण रुग्ण संख्या | जनरल रुग्णांपोटी झालेला खर्च | संस्थान कायम कर्मचारीपोटी झालेला खर्च | संस्थान कंत्राटी कर्मचारीपोटी झालेला खर्च | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | जानेवारी २०२० | ३०,६१३ | १७,७९,५९४/- | १,०९,९४३/- | ८३,२४०/- | **१९,७२,७७७/-** |
| ०२ | फेब्रुवारी २०२० | ३२,९३३ | १९,६८,६५२/- | ९४,९०६/- | ८४,५४५/- | **२१,४८,१०३/-** |
| ०३ | मार्च २०२० | २४,३६४ | ११,९७,७२५/- | ६९,८५४/- | ६१,३२२/- | **१३,२८,९०१/-** |
| | | | | | **एकुण रक्कम रुपये** | **५४,४९,७८१/-** |

**औषधांवरील झालेला एकुण खर्च –**

| अ.नं | महिना | एकुण रुपये |
|---|---|---|
| ०१ | जानेवारी २०२० | ३६,९७,८०२/- |
| ०२ | फेब्रुवारी २०२० | १९,८५,१४१/- |
| ०३ | मार्च २०२० | २१,५४,४४१/- |
| **एकुण रक्कम रुपये** | | **७८,३७,३८४/-** |

**एकुण खर्च रक्कम विवरण –**

| अ. नं | महिना | अंतर्रुग्ण संख्या | अंतररुग्णांवर झालेला खर्च रक्कम रुपये | बाह्यरुग्ण संख्या | बाह्य रुग्णांवर झालेला खर्च रक्कम रुपये | औषधांवर खर्च झालेला एकुण रक्कम रुपये | एकुण रुग्ण संख्या (३+५) | एकुण रुपये (४+६+७= ९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ०१ | जाने. २० | १,४४८ | ५७,६३,२७७/- | ३०,६१३ | १९,७२,७७७/- | ३६,९७,८०२/- | ३२,०६१ | १,१४,३३,८५६/- |
| ०२ | फेब्रु. २० | १,४१५ | ५२,१६,८९५/- | ३२,९३३ | २१,४८,१०३/- | १९,८५,१४१/- | ३४,३४८ | ९३,५०,१३९/- |
| ०३ | मार्च २० | ८६७ | ४५,६८,१६२/- | २४,३६४ | १३,२८,९०१/- | २१,५४,४४१/- | २५,२३१ | ८०,५१,५०४/- |
| | | | | | | एकुण | ९१,६४० | २,८८,३५,४९९/- |

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान –**

१) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २२/१२/२०१६ रोजीच्या निर्णय क्र. ९४४ नुसार दि. ०१/०१/२०१७ रोजी पासुन संपुर्णपणे मोफत उपचार सुरु केलेले आहे.

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २५/०२/२०१७ रोजीच्या निर्णय क्र. ०६ नुसार दि. ०१/०३/२०१७ रोजी पासुन श्री साईनाथ रुग्णालय भरती होणा-या रुगणांना आवश्यकतेनुसार प्रमाणे उपचारासाठी लागणारे रक्त व रक्तघटक मोफत देण्यात येत आहेत.

३) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०१/११/२०१८ रोजी पासुन श्री साईबाबा हॉस्पीटल मधील सद्यस्थितीला लागु असणारे दर जसेच्या तसे श्री साईनाथ रुग्णालयात लागु करणेत यावेत, व श्री साईनाथ रुग्णालयाचे दर निश्चित झालेनंतर दर दोन वर्षांनी १० टक्के वाढ करणेस मान्यता देण्यात आली.

प्रस्ताव- माहे. जानेवारी २०२० ते मार्च २०२० श्री साईनाथ रुग्णालयात एकुण रुग्ण संख्या ९१,६४० वर रक्कम रु. २,८८,३५,४९९/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी आठयांशी लाख पसतीस हजार चारशे नव्यानऊ मात्र) इतक्या रक्कमेची वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलतीची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीच्या खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीच्या सभेसमोर निर्णयार्थ सादर तसेच मा.तदर्थ समितीची मान्यता मिळालेनंतर सदरचा विषय मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद समोर मान्यतेकरीता सादर.

**निर्णय क्र.४१०** **यावर सविस्तर चर्चा करुन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये माहे जानेवारी २०२० ते मार्च २०२० या कालावधीत एकुण ९१,६४० रुग्णांकरीता वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलतीची रक्कम रु.२,८८,३५,४९९/-मात्र रकमेची नोंद घेऊन त्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे,असे ठरले.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय/विधी विभाग)**

---

**विषय नं.५७** **अ) संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद –

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –१) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक– खालील संस्थान कर्मचा-यांची वार्षिक रु.२०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी – पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले -** | | | | | | |
| १. | नवनाथ साहेबराव जाधव विभाग-बगीचा हुद्दा-मदतनीस | आई | पटकी झटके येणे | डॉ.गोडगे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ८५०२.०० | ८५०२.०० |
| २. | संध्या विनायक जाधव विभाग- साईबाबा हॉस्पि. हुद्दा-परिचारिका | पती | High Blood Pressure उच्च रक्तदाब | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ९२१२.०० | ९२१२.०० |
| ३ | लिली जोश विदयाथील विभाग-साईनाथ हॉस्पि. हुददा-लॅब टेक्निशियन | पती | DM/Nephro मधुमेह व किडनी आजार | डॉ.वाघुळदे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३९००.०० | ३९००.०० |
| ४. | योगेश बाळकृष्ण गेठे विभाग-साईनाथ हॉस्पि. हुददा-ई.एन.टी .सर्जन | वडिल आई | Diabetes High Blood Pressure मधुमेह उच्च रक्तदाब | डॉ.गायकवाड | श्री साईबाबा हॉस्पिटल | ६५८४.०० | ६५८४.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | सचिन राजेंद्र क्षिरसागर विभाग-वाहन हुद्दा-मॅकनिकल | वडिल मुलगा | Diabetes High Blood Pressure मधुमेह उच्च रक्तदाब | डॉ.इंगळे डॉ.साबळे | श्री साईबाबा हॉस्पिटल श्री साईनाथ हॉस्पिटल | ६७३५.०० | ६७३५.०० |
| ६ | वर्पेसविता चांगदेव विभाग- साईबाबा हॉस्पि. हुद्दा-परिचारिका | आई | Diabetes मधुमेह | डॉ.ढाकणे डॉ.उंबरकर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३३१५.०० | ३३१५.०० |
| ७. | राजेश रमणलाल वाकडे विभाग-साईबाबा हॉस्पि. हुददा-बायो. इंजिनिअर | स्वतः | Ulcerative Colities आतड्याच्या सुजेने होणारा अल्सर | डॉ.बच्छाव डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४८१६२.०० | ४७८४६.०० |
| | **अ एकूण रक्कम रु.** | | | | | ८६४१०.०० | ८६०९४.०० |
| | **ब. संस्थान रुग्णालयात उपचार न झालेले संस्थान मान्य यादीत रेफर केलेले** | | | | | | |
| ८. | योगेश त्रिंबक साळवी विभाग-प्रसादालय हुद्दा-मदतनीस | स्वत: | कर्करोग Ca | डॉ.खांदे | क्युरी मानवता सेंटर नासिक | १७१७२.०० | १७१७२.०० |
| ९. | स्वाती इंद्रभान कडु विभाग-ज्यु.कॉलेज हुद्दा-मॅकनिकल | स्वत: | Ca Breast स्तनाचा कॅन्सर | डॉ.बो-हाडे मॅडम | रुबी हॉल क्लिनिक पुणे | १६६६९२.०० | १६०९३२.०० |
| १०. | मनोरंजन रामजी सिंग विभाग-साईबाबा हॉस्पि. हुददा-आर.एम.ओ | मुलगी | Right Eye उजव्या डोळयाचे उपचार | डॉ.अजित पाटील | L.V.prasad eye Hydrabad Telagana | ६७१०६.०० | ५३६८५.०० |
| ११. | शेख शकिला सलीम विभाग-साईनाथ हॉस्पिटल हुद्दा-मदतनीस | पती | Caकर्करोग | डॉ.राम नाईक | रुबी हॉल क्लिनिक पुणे | २४३६२६.०० | १३६६६२.०० |
| १२. | भाऊसाहेब गंगाधर काळे विभाग-संरक्षण हुददा-पहारेकरी | स्वत: | Liver Limob यकृताचा आजार | डॉ.ढाकणे | सहयाद्री हॉस्पिटल, नासिक | ७०८६२.०० | ५२४५७.०० |
| १३. | उल्हास गोपीनाथ पवार विभाग-साईबाबा हॉस्पि. हुददा-आर.एम.ओ | | Interstitial Lungs disease फुप्फुसाचा आजार | डॉ.जाधवर | सहयाद्री हॉस्पिटल, नासिक | २८६५४८.०० | २३४५४२.०० |
| | **ब एकूण रक्कम रु.** | | | | | ८६८३०६.०० | ६५५४५०.०० |
| | **क.संस्थान रुग्णालयात उपचार न घेतलेले रेफर न केलेले परंतु तातडीने खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | |
| १४. | पोपट गणपत ढमाले विभाग-प्रसादालय हुद्दा-मदतनीस | मुलगी | RTA with Hemopenporious | डॉ.अरुण डॉ.बो-हाडे डॉ.साळुंके | सद्गुरु हॉस्पिटल , नासिक | १६८६३३.०० | १२८२२४.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १५. | लता बबन शिंदे<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुददा-स्टाफ नर्स | स्वत: | CA Cermix with pr Bleeding | डॉ.जोशी | डॉ.विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल, अहमदनगर | १८४७५६.०० | ११४९५७.०० |
| | **क एकूण रक्कम रु.** | | | | | ३५३३८९.०० | २४३१८१.०० |
| | **अ+ब+क एकूण रक्कम रु.** | | | | | १२९१८०५.०० | ९८४७२५.०० |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.९,८४,७२५/-इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढीलउपचाराकरीता पाठविण्यात आले होते व काही ठिकाणी निकडीच्या प्रसंगी बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

प्रस्ताव– उपरोक्त १५ कर्मचारी /कर्मचा-यांवर अवलंबित व्यक्ती यांचे वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.९,८४,७२५/-मात्र अदा करण्यास मान्यता असावी.

---

**ब) संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत. (अ+ब)**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद –

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.– १) जा. नं. एसएसएस-वशी रुगणालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९.

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक – खालील संस्थान कर्मचा-यांची वार्षिक रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी – पुढील तक्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| **अ. नं.** | **कर्मचा-याचे नाव** | **कर्मचा -याशी नाते** | **आजाराचे नाव** | **डॉक्टरांचे नाव** | **रुग्णालयाचे नाव** | **एकूण मागणी रक्कम** | **एकूण देय रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **<u>अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले -</u>** | | | | | | |
| १. | वाल्मिक बापुराव धरम<br>विभाग- सी.सी.टी.व्ही.<br>हुद्दा-मदतनीस | स्वत: | Diabetes High Blood Pressure<br>मधुमेह<br>उच्च रक्तदाब | डॉ.देवरे<br>डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ७४५५.०० | ७४५५.०० |
| २. | ज्योतिलाल भिका जाधव<br>विभाग-आय.टी.आय.<br>हुद्दा- सहा.भांडारपाल | स्वत: | Diabetes High Blood Pressure<br>मधुमेह<br>उच्च रक्तदाब | डॉ.पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल | ११५०१.०० | ११५०१.०० |
| ३ | राजेश रमणलाल वाकडे<br>विभाग-साईबाबा हॉस्पि.<br>हुददा-सि.बायो.इंजिनिअर | पती<br>स्वत:<br>आई | Ulcerative Colities<br>आतडयाच्या सुजेने होणारा अल्सर | डॉ.बच्छाव<br>डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३०५६.०० | ३०५६.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | रुक्साना साजिद खान विभाग-साईबाबा हॉस्पि. हुद्दा-परिचारिका | स्वत: | High Blood Pressure उच्च रक्तदाब | डॉ.गगन शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ७३००.०० | ७३००.०० |
| ५. | सविता चांगदेव वर्पे विभाग- साईबाबा हॉस्पि. हुद्दा- परिचारिका | आई | Diabetes मधुमेह | डॉ.ढाकणे डॉ.उंबरकर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ५५४८.०० | ४६६६.०० |
| | **अ एकूण रक्कम रु.** | | | | | ३४८६०.०० | ३३९७८.०० |
| | **ब. संस्थान रुग्णालयात उपचार न झालेले संस्थान मान्य यादीत रेफर केलेले** | | | | | | |
| ६. | शकिला सलीम शेख विभाग- साईनाथ हॉस्पिटल हुद्दा-मदतनीस | पती | कर्करोग Ca | डॉ.राम नाईक | रुबी हॉल क्लीनीक,पुणे | ६०१९५.०० | ५४४३५.०० |
| ७. | भाऊसाहेब गंगाधर काळे विभाग-संरक्षण हुद्दा- पहारेकरी | स्वत: | Liver Limohesis | डॉ.ढाकणे | सहयाद्री हॉस्पिटल ,नासिक | ४९९२७.०० | ४७३७१.०० |
| ८. | सुभाष मल्हारी बंदावणे विभाग- ध्वनीक्षेपण हुद्दा- विद्युत पर्यवेक्षक | मुला | Renal transplant किडनी प्रत्यारोपण | डॉ.कांदळकर | रुबी हॉल क्लीनीक,पुणे सहयाद्री हॉस्पिटल ,नासिक | ८६९९६.०० | ८६९९६.०० |
| ९. | संजय लक्ष्मण कुंभार विभाग- मंदीर विभाग हुद्दा- वरिष्ठ लिपिक | स्वत: | कर्करोग Ca | डॉ.राम नाईक | टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई | २९९६६.०० | २८००६.०० |
| १०. | स्वाती इंद्रभान कडु विभाग-ज्यु.कॉलेज हुद्दा-सहा.शिक्षिका | स्वत: | कर्करोग Ca | डॉ.बो-हाडे | रुबी हॉल क्लीनीक,पुणे | ८४४८०.०० | ८१६००.०० |
| ११. | परसराम सोमाजी भालेराव विभाग-संरक्षण हुद्दा- पहारेकरी | पत्नी | Dengue | डॉ.जाधवर | रुबी हॉल क्लीनीक,पुणे | १९०००.०० | १९०००.०० |
| | **ब एकूण रक्कम रु.** | | | | | ३३०५६४.०० | ३१७४०८.०० |
| | **अ + ब एकूण रक्कम रु.** | | | | | ३६५४२४.०० | ३५१३८६.०० |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.३,५१,३८६ -/-इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले होते व काही ठिकाणी निकडीच्या प्रसंगी बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही, असे मत आहे.

प्रस्ताव– उपरोक्त ११ कर्मचारी/कर्मचा-यांवर अवलंबित व्यक्ती यांचे वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु. ३,५१,३८६/- मात्र अदा करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा करणेकामी नियमावली तयार करण्यात यावी, असे ठरले. तसेच उपरोक्त प्रस्ताव 'अ' मधील अ.नं.१२ भाऊसाहेब गंगाधर काळे व अ.नं.१४ पोपट गणपत ढमाले तसेच प्रस्ताव 'ब' मधील अ.नं.७ भाऊसाहेब गंगाधर काळे यांचे बिलाची फेर तपासणी करण्यात यावी,असे ठरले.**

**तसेच उपरोक्त प्रस्ताव 'अ' मधील अ.नं.१२ भाऊसाहेब गंगाधर काळे व अ.नं.१४ पोपट गणपत ढमाले तसेच प्रस्ताव 'ब' मधील अ.नं.७ भाऊसाहेब गंगाधर काळे यांचे वैद्यकीय बिलांची फेर तपासणीच्या अधिन राहुन प्रस्ताव 'अ' मधील १५ कर्मचाऱ्यांना देय असणारी वैद्यकीय बिलाची रक्कम रु.९,८४,७२५/-मात्र तसेच प्रस्ताव 'ब' मधील ११ कर्मचाऱ्यांना देय असणारी वैद्यकीय बिलाची रक्कम रु.३,५१,३८६/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५८** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मे-२०२० महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.२५,४०,१४६/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/ दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/ वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **मे २०२०** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **५,५८१** व **४५०**आयपीडी रुग्णांपैकी **७२०** ओपीडी व **२११**आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.२४,१९,३४६/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **१२५**रुग्णाना रक्कम **रु.१,२०,८००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

(अ) **श्री साईबाबा हॉस्पिटल**

| **अ.नं.** | **रुग्णांची गटवारी** | **लाभार्थी संख्या** | **एकुण बिल रक्कम** | **बिलापोटी मिळालेली रक्कम** | **बिलात दिलेली सवलत** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ४८ | ४,३१,७०५/- | - | ४,३१,७०५/- |
| **२** | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १५८ | १४,१७,९२६/- | ६,२६,२११/- | ७,९१,७१५/- |
| **३** | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २ | ३६,५७०/- | १०,०००/- | २६,५७०/- |
| **४** | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | २४७ | ११,८५,३६८/- | ७,३४,८७७/- | ४,५०,४९१/- |
| **५** | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ७३ | १६,८६,५३६/- | ११,६५,६२६/- | ५,२०,९१०/- |
| **६** | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४०३ | १,९७,९५५/- | - | १,९७,९५५/- |
| | **एकुण** | **९३१** | **४९,५६,०६०/-** | **२५,३६,७१४/-** | **२४,१९,३४६/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| **अ.नं.** | **रुग्णांची गटवारी** | **लाभार्थी संख्या** | **एकुण बिल रक्कम** | **बिलापोटी मिळालेली रक्कम** | **बिलात दिलेली सवलत** |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४६ | ५०,६००/- | - | ५०,६००/- |
| २ | हिमोफिलीया | २ | २,४००/- | - | २,४००/- |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ९ | ९,६००/- | - | ९,६००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | २३ | २,८००/- | - | २,८००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | ६ | ५,४००/- | - | ५,४००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ४ | ५,०००/- | - | ५,०००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ३ | ४,८००/- | - | ४,८००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ३२ | ४०,२००/- | - | ४०,२००/- |
| | **एकुण** | १२५ | १,२०,८००/- | - | १,२०,८००/- |
| | **एकुण अ+ब** | **१,०५६** | **५०,७६,८६०/-** | **२५,३६,७१४/-** | **२५,४०,१४६/-** |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये **मे २०२०** मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम **रु.२५,४०,१४६/-** ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.४१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे मे-२०२० मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.२५,४०,१४६/- मात्रची नोंद घेण्यात येऊन त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५९** **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सुरु असलेल्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (आयुष्यमान भारत) या योजनेसाठी करारनामा (MOU) करण्यास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महाराष्ट्र शासनाची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना दि.१४/०२/२०१३ पासून सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेच्या नावांत शासनाने दि.०१/०६/२०१७ पासून महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना असे नामकरण केलेले आहे. राजीव गांधी योजनेचे कामकाज सुरूवातीला National Insurance Company Ltd मार्फत MDIndia Healthcare Services (TPA) Pvt. Ltd., Pune या टीपीए कंपनीकडून काम चालू होते. त्यामूळे National Insurance Company Ltd व Third Party Assurance म्हणून MDIndia Healthcare Services (TPA) Pvt. Ltd., Pune सोबत दि.१०/०१/२०१३ रोजी करार करण्यात आलेला होता, परंतू नंतर शासनाने टीपीए कंपनीत दि. २१/११/२०१३ पासून जिल्हानिहाय बदल केल्यानंतर Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd कडे अहमदनगर जिल्हयाचे काम दिलेले होते, त्यामूळे दि. ०९/०१/२०१६ रोजी National Insurance Company Ltd व Third Party Assurance म्हणून Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd सोबत करार करण्यात आलेला होता.

आता दि.०१/०४/२०२० पासून महात्मा ज्यातिबा फुले जन आरोग्य योजनेचे कामकाज National Insurance Company Ltd ऐवजी United India Insurance Co. Ltd. यांचेकडे देण्यात आलेले आहे. त्यामूळे United India Insurance Co. Ltd. Third Party Assurance म्हणून Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd सोबत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना करार करण्यासाठी १७/०४/२०२० रोजी योजनेचे डॉ. विश्वजित माने Senior Manager- Operations यांनी करार करण्यासाठी मेल केलेला होता. परंतू भारतात आलेली Covid 19 च्या आजाराची साथ व त्यामूळे करण्यात आलेल्या Lokdown मूळे सदरच्या दोन्ही योजनांचा एकत्रित MOU पुढील काही दिवसांतच करण्याच्या हमीवर सुरू ठेवण्यात आलेल्या आहेत. संदर्भ क्रं. ५ प्रमाणे रूग्णालयाकडून प्रोजेक्ट हेड यांना हमीपत्र देण्यात आलेले आहे.

पूर्वीच्या National Insurance Company Ltd सोबत केलेल्या करारांत व आता करावयाच्या United India Insurance Co. Ltd. सोबतच्या करारात काही बदल करण्यात आलेले आहेत. त्यावरील तुलनात्मक मुददे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं | National Insurance co ltd मार्फत Media | United India Insuracne co. Ltd मार्फत Media assist |
|---|---|---|

| | assist India ltd co. सोबत झालेल्या करारातील मुददे | India ltd co. सोबत करावयाच्या करारातील मुददे |
|---|---|---|
| १ | रूग्णालयास परीसरातील गावोगावी जावून Medical Health Camp घेण्यातून सूट देण्यात आलेली होती. | Medical Health Camp घेणे बंधनकारक केलेले आहे. महिन्यातून एकदा Camp घ्यावा लागेल. त्यासाठी प्रतिकॅम्प रू. ५००० रूग्णालयास प्राप्त होतील, परंतू त्यासाठी रूग्णालयाची गाडी, एक डॉक्टर, स्टाफनर्स, मदतनीस इ. कर्मचारी सोबत दयावे लागतील. एकंदर दिवसाचा खर्च रूग्णालयास मिळणा-या रकमेपेक्षा जास्त असेल. |
| २ | रूग्ण डिसचार्ज करतांना रूग्णास दयावयाचे प्रवासभाडे खालीलप्रमाणे होते.<br>राहाता तालुक्यातील रूग्णांसाठी ५० रू.<br>अहमदनगर जिल्हयातील रूग्णांसाठी १०० रू.<br>जिल्हयाबाहेरील रूग्णांसाठी सरसकट १५० रू. | रूग्ण डिसचार्ज करतांना रूग्णास दयावयाचे प्रवासभाडे रूग्णालयापासून रूग्णाच्या घरापर्यंत लागणा-या प्रवासाच्या प्रतिकिमी. एक रूपयाप्रमाणे दयावे लागणार आहे. |
| ३ | उपचार व शस्त्रक्रियेच्या पॅकेजची रक्कम खालीलप्रमाणे पॅकेजमध्ये अशी होती.<br>CABG Of pump without Iabp (S7f6.2)= Rs.125000<br>Coronary bypass surgery off pump with Iabp (S7f6.6) = Rs. 150000 | उपचार व शस्त्रक्रियेच्या पॅकेजची रक्कम खालीलप्रमाणे पॅकेजमध्ये अशी आहे.<br>CABG Off pump without Iabp(S7f6.2)= Rs.100000<br>Coronary bypass surgery off pump with Iabp (S7f6.6) = Rs. 125000 |

१. पूर्वीच्या करारामध्ये Medical Health Camp घेण्यातून आपल्या रूग्णालयास सूट देण्यात आलेली होती. परंतू आता करावयाच्या करारामध्ये अशी कोणतीही सूट देण्यात येवू शकत नाही. त्यामूळे महिन्यातून एकदा Camp घ्यावा लागेल. त्यासाठी प्रतिकॅम्प रू. ५००० रूग्णालयास प्राप्त होतील, परंतू त्यासाठी रूग्णालयाची गाडी, एक डॉक्टर, स्टाफनर्स, मदतनीस इ. कर्मचारी सोबत दयावे लागतील. एकंदर दिवसाचा खर्च रूग्णालयास मिळणा-या रकमेपेक्षा जास्त असेल.

२. पूर्वीच्या करारामध्ये रूग्ण डिसचार्ज करतांना रूग्णालयाकडून दयावयाचे प्रवासभाडे असे मंजूर करण्यात आलेले होते.

राहाता तालुक्यातील रूग्णांसाठी ५० रू.
अहमदनगर जिल्हयातील रूग्णांसाठी १०० रू.
जिल्हयाबाहेरील रूग्णांसाठी सरसकट १५० रू.

परंतू आता करावयाच्या करारानुसार रूग्ण डिसचार्ज करतांना रूग्णास दयावयाचे प्रवासभाडे रूग्णालयापासून रूग्णाच्या घरापर्यंत लागणा-या प्रवासाच्या प्रतिकिमी. एक रूपयाप्रमाणे दयावे लागणार आहे. त्यामुळे रूग्णालयाचा खर्चदेखील वाढणार आहे.

३. पूर्वीच्या करारामध्ये रूग्णावर करण्यात येणा-या उपचार व शस्त्रक्रियेच्या पॅकेजची रक्कम खालीलप्रमाणे पॅकेजमध्ये अशी होती.

CABG Of pump without Iabp (S7f6.2)= Rs.125000
Coronary bypass surgery off pump with Iabp (S7f6.6) = Rs. 150000

परंतू आता करावयाच्या करारानुसार वरीलप्रमाणे पॅकेजची रक्कम कमी झालेली आहे. ती पुढीलप्रमाणे.

CABG Off pump without Iabp(S7f6.2)= Rs.100000
Coronary bypass surgery off pump with Iabp (S7f6.6) = Rs.125000

म्हणून अशा पॅकेजमध्ये रूग्णालयास प्राप्त होणारी रक्कम कमी असल्याने रूग्णालयास काही प्रमाणात नुकसान सहन करावे लागणार आहे. तसेच सदर पॅकेजच्या रकमेत बदललेल्या पॅकेजप्रमाणे बीले करण्यास मान्यता असावी तसेच तफावत राहणारी बीले वित्त विभागामार्फत सेटल करावी लागतील.

सदरचे दोन्ही योजनेचे करार करण्यासाठी विलंब झाला तर रूग्णालय योजनेतून Delisted केले जावू शकते, म्हणून सदरच्या कंपनीने विहित केलेल्या नमुन्यामध्ये करारनामा (MOU) करण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीची मंजूरी घेणे गरजेचे आहे. त्याकरीता MJPJAY व PMJAY करीता रक्कम रू.५०० च्या स्टॅम्पपेपरवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था संचलित श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी यांचे वतीने प्र. वैदयकीय

संचालक यांचे स्वाक्षरीने Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd, Pune व United India Insurance Co. Ltd. सोबत करार (MOU) करण्याबाबतचा विषय मा. व्यवस्थापन समितीपूढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सुरु असलेल्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (आयुष्यमान भारत) या योजनेसाठी श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी यांचे वतीने प्र. वैदयकीय संचालक यांचे स्वाक्षरीने Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd, Pune व United India Insurance Co. Ltd. यांचे सोबत करारनामा (MOU) करण्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**यानंतर आजचे तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये आयत्या वेळी खालील विषयांवर निर्णय घेण्यात आले.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे आयकर रिफंड रक्कम रु.२०,८५,०२,५४०/-इतर वर्षाच्या देय करापोटी वर्ग करणेबाबत दाखल करण्यात आलेले सिव्हील ॲप्लीकेशन संस्थान नियुक्त जेष्ठ ॲड.एस.गणेश, दिल्ली यांचे अभिप्रायास अनुसरुन मागे घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** आयकर कायदा १९६१ कलम २४५ अन्वये, आयकर विभागाने करनिर्धारण वर्ष २०१८-१९ व २०१९-२० चे आयकर विवरणपत्रात रिफंड असणारी रक्कम करनिर्धारण वर्ष २०१३-१४, २०१५-१६, २०१६-१७व २०१७-१८ पोटी रिफंड वजा जाता प्रलंबित असलेल्या रु.४३७,४९,४८,३१०/- आयकरापोटी वर्ग करणेबाबत ई-मेलद्वारे दि.०९.०५.२०२० रोजी नोटीस पाठविली आहे. त्यामध्ये,“If no action taken by you within 30 days of this notice u/s 245, the outstanding demand as on that date will be considered for adjustment against your refund.” असा उल्लेख केलेला आहे. सदर नोटीस संस्थान कर सल्लागार सीए आर.आर. मुनी, मुंबई, सीए व्ही.के. बेसवाल, मुंबई व सीए दिपक टिकेकर, मुंबई यांना पाठविण्यात आली होती व त्यावर त्यांचे कायदेशीर मार्गदर्शन मागविले होते. या संबंधीत आवश्यक कागदपत्रे त्यांना पाठविण्यात आल्यानंतर सीए आर.आर. मुनी यांनी दि.११.०५.२०२० रोजीचे ई-मेलद्वारेअभिप्राय दिला होता. बाबत, मा.सदस्य यांनी सीए आर.आर. मुनी यांचेकडून स्पष्ट अभिप्राय घ्यावा असे सुचविले. त्यास अनुसरुन सीए आर.आर. मुनी यांनी दि.२९.०५.२०२० रोजी ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे अभिप्राय दिला आहे.

“With reference to your aforesaid notice u/s 245 received for assessment year 2018-2019 and 2019-20 seeking to adjust the refund due against the demand of the earlier years and telephonic discussion today with shriGhorpode and Shri Lanke, We recall our earlier expressed views:

For Assessment year 2013-14 and 2015-16, the department is presently restricted from making any recovery as per the order of Hon’ble Supreme Court.

With regard to Assessment year 2016-17 the demand as per the records is shown at 128.17 crores and for Asst. Year 2017-18 the demand raised is Rs. 58.45 Crores.

We suggested that the refund due for Asst Yr. 2018-2019 and 2019-20 be agreed to be adjusted against Asst. Year 2016-17.

The reasons for the same are that in any case, no refund will be ever issued by the department in case of any demand outstanding by the same person. The demand outstanding in the case is far more to the amount of refund seen to be due. So instead of the department forcibly adjusting the refund, we could show a gesture of co-operation to allow them to adjust the refund against the demands unpaid and outstanding on records.

As such they could ask us to deposit minimum 20% of the outstanding demand in appeal. We have applied for stay of recovery of the total demand which has not been disposed by them. They may do that any time. Before that if we write to them it will create a good and co-ordial situation. Else we may be required to go to the higher authorities (CIT OR High Court) and file further petitions. These are avoidable procedures. We feel allow them adjustment and remain benifited for good.

In the event of the ultimate appeal being decided in favour of the Sansthan, the amount adjusted shall be refunded with interest from the date of adjustment till the date of refunding the amount. Sansthan does not have the issue of liquidity and actually earns interest on fixed deposits. We do not envisage loss of interest in the issue.

If the appeal is finally lost and the demand is required to be paid.the amount so adjusted will reduce the interest burden as thee net demand will be reduced.

Hence we consider it prudent to allow them to adjust the refund due as per their notice u/s 245 issued.

Please pass necessary resolution to allow adjustment of any and all refunds due to Sansthan against the outstanding demand for assessment year 2016-17 and 2017-18 as they may deem proper. On doing so let us have a copy of the resolution with your instructions to write to the the department for adjustment of the refunds against the previous years' refunds."

त्यास अनुसरुन सदरचा विषय चक्रीय पद्धतीने दि.२९.०५.२०२० रोजीचे मा.तदर्थ समितीसमोर सादर करण्यात आला होता. त्यामध्ये खालीलप्रमाणे निर्णय झाला होता.

"The matter was discussed. The demand notice as well as the opinion of Chartered Accountant Company i.e. R.R. Muni & Company as well as V.K. Beswal& Co. is examined by the Committee. In the opinion of the Chartered Accountants, the proposal made by the Income Tax Department to adjust the existing refund for their demand for the subsequent years could be allowed because for some Assessment Years the proceedings filed by the Trust are pending before DCIT. In the opinion of the Committee, such consent for adjustment should be given only by reserving the right of the Trust to challenge demand for the year 2016-17 and that the amount so allowed be adjusted (refund) shall be without prejudice to the right of the Trust to agitate for the earlier demand for the year 2016-17. The Trust is, therefore, allowed to communicate to the Income Tax Authorities through Chartered Accountant.

Shri Ghorpade, Chief Accounts Office for the Trust, on the instructions from the Chief Executive Officer, suggested that the Trust may be directed to move Civil Application before Hon'ble High Court. In the opinion of one of the member of the Ad-hoc Committee i.e. Principal District Judge, Ahmednagar, the Trust is obliged to file Civil Application before Hon'ble High Court in respect of every financial matter because the Hon'ble High Court in PIL No.152 of 2018 and 86 of 2018 has directed the Trust not to disburse any amount for other purposes than the routine expenses. If that be so, it is the obligation of the Trust to approach Hon'ble High Court, whether it is suggested by the Ad-hoc Committee or not. It is an experience of one of the Member i.e. Principal District Judge, that most of the time though the Ad-hoc Committee has directed the Trust to move Civil Application, while writing the actual minutes was skipped. Therefore, whether the Ad-hoc Committee has specifically directed to move Civil Application or not, in the opinion of the Principal District Judge, the Trust is oblige to move such Civil Application before Hon'ble High Court, as indicated above."

...सदर निर्णयानुसार मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठात सिव्हील ॲप्लीकेशन नं.१०७०६/२०२० दि.१२.०६.२०२० रोजी दाखल करण्यात आले होते. त्याची सुनावणी दि.०३.०७.२०२० रोजी नियोजित होती. सामनेवाले यांनी सिव्हील ॲप्लीकेशनबाबत दि.०२.०७.२०२० रोजी रिप्लाय सादर केला. संस्थानचे ॲडव्होकेट यांनी सदर रिप्लाय संस्थान कर सल्लागार यांना पाठविण्यास सुचविले व त्यावर काही अभिप्राय असल्यास कळवावे असे कळविले. सदर रिप्लाय संस्थान कर सल्लागार यांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आला. त्यांनी न्यायालयीन बाब असल्यामुळे संस्थान नियुक्त वरिष्ठ ॲड.एस. गणेश, दिल्ली यांचा त्यावर

अभिप्राय घ्यावा असे कळविले. सदर रिप्लाय ॲड.एस. गणेश यांना दि.०३.०७.२०२० रोजी पाठविण्यात आला. त्यावर त्यांनी संस्थानचे औरंगाबाद येथील ॲडव्होकेट यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा-विचारविनिमय केला. सदर सिव्हील ॲप्लीकेशवर त्या दिवशी सुनावणी न होता पुढील तारीख दि.०६.०७.२०२० देण्यात आली. दरम्यान ॲड.एस. गणेश यांनी दि.०४.०७.२०२० रोजी खालीलप्रमाणे अभिप्राय दिला आहे.

"For the sake of brevity , I shall straightaway address the issue raised for my opinion viz what is the effect in law of the Supreme Court order dated 18/1/2019 passed in the Querist's case in respect of Asst.Year 2013-14.

The Supreme Court , in its said order noted with approval the order dated 27/3/2018 passed by the Bombay High Court in the Querist's case for A.Y. 2015-16 whereby recovery proceedings for that year were stayed until the disposal of the Querist's Appeal for A.Y 2015-16 pending before the C.I.T(A). The Supreme Court stated that since the very same issue regarding the interpretation of section 115BBC arose in both A.Y. 2013-14 and 2015-16, the same protection should be granted in A.Y. 2013-14 as well. The Supreme Court further directed that the Appeals for A.Y. 2013-14 and 2015-16 should be heard and disposed of together by the C.I.T (A). It is very important to note that, at the time the Supreme Court passed its order dated 18.1.2019 there were no demands raised on the Querist for any other Asst.Year based on S.115BBC of the I.T.Act.

The letter as well as the spirit of the said order of the Supreme Court is clear and unequivocal viz that no demand based on section 115BBC of the I.T.Act should be enforced against the Querist until the disposal of the said Appeals for A.Ys 2013-14 and 2015-16. In my opinion, this position should apply to all other Asst.Years also, for the simple reason that it cannot be that while the Appeals for A.Ys 2013-14 and 2015-16 still continue to remain pending before the C.I.T. (A), the Revenue can nevertheless proceed to enforce the demands raised on the Querist based on section 115 BBC for other Asst.Years. Such a reading of the Supreme Court order would completely defeat its object and purpose and render it a dead letter, which cannot possibly be countenanced.

I would, therefore, advise the Querist to take the stand emphatically and in writing before the I.T.Department that until the C.I.T. (A) decides the Querist's Appeals for A.Ys 2013-14 and 2015-16, the Revenue cannot enforce any demand based on S.115BBC in any Asst.Year against the Querist. The adjustment and appropriation u/s 245 of a refund due to the Querist against such a demand is nothing but enforcement of the demand which would be directly contrary to the Supreme Court order. If the Querist's stand is not accepted by the I.T.Department, the Querist should file a Writ Petition in the Bombay High Court raising this contention, and praying for appropriate relief by way of protection until the disposal of the said 2 years Appeals by the C.I.T (Appeals).

The Querist should also forthwith withdraw its Application before the Aurangabad Bench seeking permission to agree to the set-off of the refund due to it u/s 245 of the I.T.Act."

**प्रस्ताव:-** संस्थानचे आयकर विषयक न्यायालयीन कामकाज पाहणारे वरीष्ठ वकील सीए ॲड.एस. गणेश, दिल्ली यांचे अभिप्रायानुसार कार्यवाही करावयाची झाल्यास,

१) संस्थानने मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठात दाखल केलेले सिव्हील ॲप्लीकेशन १०७०६/२०२० मागे घ्यावे लागेल.

२) संस्थानला करनिर्धारण वर्ष २०१८-१९ चा रिफंड रु.३,४१,१४,१३०/- व २०१९-२० चा रिफंड रु.१७,४३,८८,४१०/- असा एकुण रिफंड रु.२०,८५,०२,५४०/- इतर वर्षांच्या देय करापोटी समायोजित न करता संस्थानला परत देण्याबाबत विहीत पद्धतीने कर सल्लागारांमार्फत आयकर विभागास पत्रव्यवहार करणे.

३) आयकर विभाग उपरोक्त अ.नं.२ मध्ये नमूद केलेली मागणी अमान्य करत असल्यास पूर्वीप्रमाणे मा.उच्च न्यायालय/मा.सर्वोच्च न्यायालय येथे रिट अर्ज दाखल करणे.

४) यापुर्वी विधिज्ञ मे.जुन्नरकर ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांचेमार्फत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट अर्ज दाखल करण्यात आले होते व संस्थानची बाजू ज्येष्ठ वकील एस. गणेश, दिल्ली यांनी मांडली होती. ॲड.एस. गणेश व मे.जुन्नरकर ॲण्ड असोसिएटस् हे कोणतीही फी आकारत नाहीत. तथापि, ॲड.एस. गणेश यांचा प्रत्यक्ष विमान प्रवास खर्च, निवास व इतर अनुषंगीक खर्च व मे.जुन्नरकर ॲण्ड असोसिएटस् यांना पीटीशन दाखल करण्याकरिता झेरॉक्स, ड्राफ्टींग, सबमिशन, टायपिंग इत्यादी अनुषंगीक प्रत्यक्ष खर्च परतावा द्यावा लागला होता. मागीलवेळी अशाप्रकारे ॲड. एस. गणेश, दिल्ली यांचा रु.९७,१२६/- व मे.जुन्नरकर ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांचा साधारणतः रु.१५,०००/- इतका प्रत्यक्ष खर्च आदा केला होता.उपरोक्त नमूद प्रमाणे प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणे.

उपरोक्तप्रमाणे मुद्दा क्र.१ ते ४ नुसार मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील मुद्दा क्र.१ ते ४ मध्ये नमुद केल्यानुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२ नियोजित दर्शन रांग इमारत व मंदिर परिसरातील विद्यमान दर्शन रांग हॉल यांना जोडणारा Connecting Corridor हा शांती निवास इमारतीचे पहिल्या मजल्यावरील दर्शन रांगेला दक्षिण बाजुन जोडणेसाठी तेथील Pavilion चे बांधकाम तोडून त्या ठिकाणी Connecting Corridor चे बांधकाम करणे व त्यासाठी येणाऱ्या खर्चास तसेच सदर काम निविदा शर्त क्र.१३५ नुसार ठेकेदार श्रीम भानु कंन्स्ट्रक्शन प्रा.लि.,मुंबई यांचेकडून करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम-२००४ मधील तरतूद:- अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

शासन निर्णय:- १) शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१३१३/प्र.क्र.१३३/का.१६, दि.१६/०२/२०१८ अन्वये, शिर्डी सर्व्हे नं.२/४, ३/१ व ३/७ मधिल संस्थान मालकीच्या क्षेत्रफळावर नविन दर्शनरांग प्रकल्प उभारणीसाठी येणा-या रू.११२,४०,९०,०५९/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

२) शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१३१३/प्र.क्र.१३३/का.१६, दि.१६/०८/२०१९ अन्वये, सर्व व्यवहार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांच्या नावाने करण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली आहे.

*"२. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मे. भानू कन्स्ट्रक्शन मुंबई या भागीदारी पेढीस श्रीम भानु कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई कंपनीने विधिवत Take Over केले आहे करिता श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत बांधकाम प्रकल्पासंबंधी येथून पुढील सर्व व्यवहार तसेच कर कपात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे श्रीम भानु कन्स्ट्रक्शन प्रा.लि. मुंबई यांच्या नावाने करण्यास मान्यता देण्यात येत आहे."*

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयः- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०६ नुसार, श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत बांधकामाकरीता निम्नतम निविदाधारक ठेकेदार भानु कन्स्ट्रक्शन, मुंबई यांना जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्र.३४८ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

"…यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारत व मंदिर परिसरातील विद्यमान दर्शनरांग हॉल यांना जोडणारा Connecting Corridor शांतीनिवास इमारतीचे पहिल्या मजल्यावरील दर्शन रांगेला दक्षिण बाजूने जोडणेसाठी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास व त्याकामी येणाऱ्या

अंदाजे रक्कम रु.२६,०४,७८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.”

प्रस्तावना:- श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचेमार्फत सुरु आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम सध्या निविदेप्रमाणे G+2 असून त्यामध्ये खालीलप्रमाणे सुविधा आहेत.

तळमजला- नियोजित दर्शनांग इमारतीमध्ये ०३ भव्य प्रवेश हॉल आहेत, त्यामध्ये भक्तांना मोबाईल व चप्पल लॉकर्स, बायोमेट्रीक पास काऊंटर - ४८, पेड पास काउंटर -२०, लाडू काउंटर - १०, उदी व कापडकोठी काऊंटर–१०, बुक स्टॉल, डोनेशन ऑफिस,चहा / कॉफी काउंटर, सिक्युरिटी चेक एकाच ठिकाणी व एकाच वेळी – ४० व्यक्तींची, जीने–११, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था इ.

**पहिला व दुसरा मजला-** भक्तांकरीता बसण्याची व्यवस्था असेलेले एकूण १२ मोठे हॉल (एक हॉल साईज - १५.१० मी.x३१.१५ मी.), चहा/कॉफी काउंटर, विदयुतीकरण व्यवस्था जनरेटर बॅकअपसह, वायुविजन व्यवस्था, उदवाहक/लिफ्ट व्यवस्था-१०, जीने-११, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था, आर.ओ. प्रक्रियेव्दारे शुध्द पिण्याचे पाण्याची व्यवस्था, फायर फायटींग व्यवस्था इ.

या व्यतिरिक्त या प्रकल्पात सांडपाणी प्रक्रिया संयंत्र, रॅम्प, प्रथमोपचार केंद्र, संपूर्ण इंटेरीअर वर्क, सायनेजेस, अंतर्गत रस्ते, स्ट्रीट लाईट, इलेक्ट्रीकल सबस्टेशन, जनरेटर व्यवस्था, वायुविजन व्यवस्था, लॅण्डस्केपींग, रेनवॉटर हार्वेस्टिंग, पिंपळवाडी रस्त्यावरुन मंदिर परिसरातील जुन्या दर्शनरांगेला जोडण्यासाठी कनेक्टींग ब्रिज, संरक्षण भिंत इत्यादी सुविधांचा समावेश करणेत आला आहे.

सदरहू प्रकल्पाचा ठळक तपशिल व बांधकामाच्या प्रगतीची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **कामाचे नाव** | श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणे. |
| **आर्किटेक्ट** | माथूर अॅण्ड काप्रे असो. नवी दिल्ली. |
| **ठेकेदार** | श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई. |
| **कार्यादेश** | १) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८.<br>२) जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१९९९/२०१९, दि.२२/०८/२०१९. |
| **मंजूर निविदा रक्कम** | रु.१०९.५० कोटी. |
| **भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचेशी केलेल्या करारनाम्याचा दिनांक** | दि.२२/१०/२०१८. |
| **श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचेशी केलेल्या करारनाम्याचा दिनांक** | दि.२२/०८/२०१९. |
| **कामाचा कालावधी** | १२ महिने (दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/१०/२०१९). |
| **मूदतवाढ** | मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ चे सभेतील नि.क्र.४३० खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.<br>“....यावर सविस्तर चर्चा होऊन, ठेकेदार यांना ESS, UGT व STP चे बांधकामासाठी अद्याप संस्थानकडून जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रकल्पाचे सर्व काम पूर्ण करण्यासाठी या जागा उपलब्ध करणेत आल्यानंतर तेथुन पुढे चार महिन्यांची मूदतवाढ निविदेतील पृष्ठ क्रं.०५ वरील अ.नं.०७ ची Incentive अदा करणेबाबतची शर्त रद्द करण्याचे अटीवर देण्यास मान्यता देण्यात आली”. |
| **एकूण बांधकाम क्षेत्रफळ** | निविदेत नमूद एकूण बांधकाम क्षेत्रफळ – २२२१४.०० चौ. मी. (FSI Area.) |
| **कामाची सद्यस्थिती** | • **मुख्य इमारत -**<br>**तळमजला** - आर.सी.सी काम पूर्ण, बांधकाम पूर्ण, प्लास्टर पूर्ण, ग्रेनाईट फ्लोरींगचे काम प्रगतीत, विंडो सिल व जॅम्बला रेड आग्रा स्टोन बसविणे प्रगतीत. प्लंबींगचे काम प्रगतीत, एच.व्ही.ए.सी चे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम प्रगतीत, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत, टॉयलेट वॉटरप्रुफिंग काम प्रगतीत.<br>**पहिला मजला** - आर.सी.सी काम पूर्ण, बांधकाम पूर्ण, प्लास्टर पूर्ण, एच.व्ही.ए.सी चे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम प्रगतीत, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत. |

| | |
|---|---|
| | **दुसरा मजला** - आर.सी.सी काम पूर्ण, बांधकाम अंतिम टप्प्यात, प्लास्टर अंतिम टप्प्यात, एच.व्ही.ए.सी चे काम प्रगतीत, फायर फायटींगचे काम प्रगतीत, इलेक्ट्रीकल कन्डयूटींग व वायरींगचे काम प्रगतीत.<br>**टेरेस** - प्रस्तावित तिसरा मजल्यामुळे रॅम्पचे उत्तर व दक्षिण बाजूचे स्लॅब कास्टींग बाकी आहे. पॅरापेट बांधकाम, टेरेस वॉटरप्रुफिंग, ओव्हर हेड टॅंक, ममटी रूम, लिफ्ट रूमचे काम प्रलंबित आहे.<br>• **कनेक्टींग कॉरीडॉर** - कनेक्टींग कॉरीडॉरपैकी मंदिर परिसरातील पी.आर.ओ चे समोरील कारंजाचे भागातील आर.सी.सी. काम पूर्ण झाले आहे. बांधकाम प्रगतीत आहे. प्रशासकीय इमारतीस जोडणा-या कॉरीडॉरचे कामाचे आर.सी.सी. काम जवळपास ९०% पूर्ण झालेले आहे.<br>**नियोजीत दर्शनरांग प्रकल्पातील** Connecting Corridor above Pimpalwadi Road (From Proposed Main Building to Mandir Complex) **चे कामात येत असलेले विद्यूत जनित्र स्थलांतरीत केलेनंतर सदर कामास सुरूवात करता येईल.**<br>• **इतर कामे** – स्टॉर्म वॉटर लाईन, सिव्हरेज लाईन, फायर हायड्रंट लाईन, इलेक्ट्रीकल केबलकरीता पाईपलाईन व ट्रेंच, चेंबर बांधकाम, रस्त्याचे संदर्भातील इतर कामे इ., पिण्याचे पाईपलाईन इ. कामे प्रगतीत.<br>• **मुख्य इमारतीचे स्टोन क्लॅडींगचे काम प्रगतीत.**<br>• **ESS, STP & UGT चे काम सुरू करणेबाबत ठेकेदारास कळविले आहे. सदर कामास सुरूवात करणेत येत आहे.** |

या प्रकल्पाचा मंजूर रेखांकन नकाशा व बांधकाम नकाशे तसेच निविदेसोबत अपलोड केलेल्या नकाशांनुसार विषयांकित Connecting Corridor हा शांतीनिवास इमारतीचे पहिल्या मजल्यास गेट नं.०२ समोर टॉयलेट एरीयाच्या ठिकाणी जोडणे प्रस्तावित होते. परंतू सदर Connecting Corridor हा पहिल्या मजल्यास ज्या ठिकाणी जोडला जाणार होता, त्या ठिकाणी टॉयलेट एरीया आहे. सदर ठिकाणी दुस-या व तिस-या मजल्यावरील टॉयलेटचे डाऊनटेक पाईप्स आलेले आहेत. तसेच सदर ठिकाणी ०३ आर.सी.सी. कॉलम येत आहेत. त्यामुळे एक संपूर्ण जेन्टस् टॉयलेट एरीया तोडावा लागेल व त्यामूळे पहिल्या माळ्यावरील भक्तांची गैरसोय होईल. त्यामुळे सदर ठिकाणी Connecting Corridor जोडणे उचित होणार नाही, असा आर्किटेक्ट यांचा अभिप्राय आहे.

सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो., नवि दिल्ली यांनी दि.१२/०६/२०१९ (आवक दि.२२/०६/२०१९) रोजीचे पत्रान्वये याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला होता.

*".... Please find attached two drawings giving the proposal of the connection to Shanti Niwas of the connecting corridor, (Coming from Darshan Q complex), with minimum no of columns in the court in front of Dwar No.2.*

*The connection to Shanti Niwas has also been shown. Earlier the connection had been shown as a direct connection into Shanti Niwas which, in essence means that it will have to go through the pipe shafts for toilets at the connecting level of first floor as well as the above two floors of toilets. Keeping this option will not only render the toilets useless but also the space available for passage for the Queue is restricted.*

*Secondly, the structural connection is posing a problem at foundation level. Thirdly, the segregation of the VIP traffic coming from the Darshan Q complex is a problem.*

*The enclosed proposal takes care of all three problems by making an entry connection over the existing Pavilion connecting to the Shanti Niwas. The regular devotees can continue moving on the First floor level of the Shanti and Bhakta Niwas upto the temple via existing first floor route. While the VIP devotees can be segregated by sending*

*them down to the ground floor of Shanti Niwas and further to the temple via existing ground floor route.*

*This proposal will involve the breaking of the current sloping roof of the pavilion adjacent to the Shanti Niwas and constructing a slab connecting to the Shanti Niwas at first floor level and over this a roof similar to the earlier pavilion roof will be constructed. In all there will be no extra area construction at the Ground Floor level while at the first floor level an extra area of 60 sqm needs to be added.*

*As per Annexure-B with our letter no 4069/2019/UK/51 dated 4th Jun 2019 the rate for construction for extra areas is Rs.43,413/- sqm.*

*Hence the cost of excess areas works out to 60 sqm X Rs.43,413/- = Rs.26,04,780/-.*

*We will go ahead with the detailing upon receiving approval from your end."*

सदर Connecting Corridor साठी पर्यायी जागा शांतीनिवास इमारतीचे प्रशासकीय कार्यालयाचे प्रवेशव्दाराचे पश्चिमेस असलेल्या पोर्चचा Trapezoidal Slab काढून त्याठिकाणी नवीन प्लेन स्लॅब टाकून पहिल्या माळयास जीन्याजवळ सदर Connecting Corridor जोडणे उचित होईल असे कळविले आहे.

तसेच सदर कामामध्ये पहिल्या माळयाचे ६० चौ.मी. इतके बांधकाम क्षेत्रफळात वाढ होत असून त्यामध्ये रु.४३,४१३/- प्रती चौ.मी. या दराने एकूण रक्कम रु.२६,०४,७८०/- मात्र इतक्या रकमेत वाढ होत असल्याचे कळविले होते.

याबाबतचा प्रस्ताव दि.०४/०७/२०१९ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आला होता, त्यावर निर्णय क्र.३४८ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*"....यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारत व मंदिर परिसरातील विद्यमान दर्शनरांग हॉल यांना जोडणारा Connecting Corridor शांतीनिवास इमारतीचे पहिल्या मजल्यावरील दर्शन रांगेला दक्षिण बाजूने जोडणेसाठी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२६,०४,७८०/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."*

सदर श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारत व मंदिर परिसरातील विद्यमान दर्शनरांग हॉल यांना जोडणारा Connecting Corridor शांतीनिवास इमारतीचे पहिल्या मजल्यावरील दर्शनरांगेला दक्षिण बाजूने जोडणेसाठी त्याठिकाणी फ्लॅट स्लॅब करणे व तेथिल कॉरीडॉरचे बांधकामात इतर अनुषंगिक बदल करणेसाठी मंजूर बांधकाम नकाशांमध्ये बदल होत असल्याने याकामी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची त्यांचेकडील बांधकाम परवाना क्र.नप/टे-८/२/१७९/२०२०, दि.३१/०१/२०२० अन्वये Connecting Corridor बांधकामासाठी सुधारीत बांधकाम परवानगी प्राप्त झालेली आहे.

तथापी सदर प्रकल्पाचे स्ट्रक्चरल कन्सल्टंट श्री. जे. एस. सबरवाल यांनी समक्ष पहाणीनंतर प्रशासकीय कार्यालयाचे प्रवेशव्दाराचे पश्चिमेस असलेल्या पोर्चचा (Trapezoidal Area) संपूर्ण भाग काढून सदर ठिकाणी फाउंडेशन पासून नविन स्ट्रक्चर तयार करणेचे कळविले आहे. याबाबत सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथूर अ‍ॅण्ड काप्रे असो., नवि दिल्ली यांनी दि.२९/०५/२०२० रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे सुधारीत अभिप्राय दिलेला आहे.

*"....Please find attached two drawings giving the proposal of the connection to Shanti Niwas of the connecting corridor (coming from Darshan Q complex), with minimum no of columns in the court in front of Dwar No.2.*

*The connection to Shanti Niwas has also been shown. Earlier the connection had been shown as a direct connection into Shanti Niwas which, in essence, means that it will have to go through the pipe shafts for toilets at the connecting level of first floor as well as the above two floors of toilets. Firstly, keeping this option will not only render the toilets useless but also the space available for passage for the Queue is restricted. Secondly, the connection's structure is causing a problem at foundation level of the Shanti Niwas. Thirdly, the segregation of the VIP and non VIP devotees coming from the Darshan Q complex is a problem.*

*The enclosed proposal takes care of all the three problems by making the connection over the existing Pavilion connected to the Shanti Niwas. The regular devotees can continue moving on the First floor level of the Shanti and Bhakta Niwas upto the temple via existing first floor route, while the VIP devotees can be segregated by sending them down to the ground floor of Shanti Niwas and further to the temple via existing ground floor route.*

*In Letter no.4069/2019/UK/51 dated 12th Jun 2019 we had indicated an area of 60 sqm and the cost about Rs.26,04,780/- considering breakage of the pavilion roof at ground floor and constructing new first floor slab and a new pavilion roof above.*

*However this proposal involves the breaking of the current sloping roof of the pavilion adjacent to the Shanti Niwas and constructing a slab connecting to the Shanti Niwas at first floor level and over this a roof similar to the earlier pavilion roof will be constructed.*

*The structural consultant after inspection at site has recommended to break all existing pavilion structure upto the foundation level and construct new columns above existing foundations for providing structural strengthening to the new first floor slab (to carry the heavy live load of devotees) and second floor pavilion roof structure. The copy is attached herewith for your reference. In all there will be extra area construction at the Ground Floor level & 1st Floor Level of 98.195 sqm.*

***As per Tender document clause No 135.***

***VARIATIONS (DEVIATIONS/ EXTRA WORKS)**:*

*No alteration, omission or variation shall vitiate this contract but in case the Architect / Executive Engineer / Employer thinks proper at any time during the progress of the works to make any additions, alterations or omissions from the work or any alteration in the kind or quality of the materials to be incorporated therein, the Architect, with approval of the Employer, shall give the Contractor written notice thereof well in advance of the work being taken up and the Contractor shall alter, add to, or omit from, as the case may require, in accordance with such notice.*

*The value of such extra alteration, additions or omissions shall in all cases be determined by the Employer in accordance with the provision of Conditions 89 and 90 hereof and the same shall be added to or deducted from the contract amount accordingly, subject to the condition that the contract sum will not thereby vary on the whole by more than 20% (twenty percent).*

*Based on the detailed estimation prepared by us the total cost of this same work works out to above Rs.47,73,169/- (Detail estimate is based on current applicable SSR 19-20 & Non SSR item rate as per previous sanction estimate).*

*According to aforesaid clause the above work may be executed by Shrim Bhanu Construction Pvt. Ltd. as per the existing contract condition.*

*As per Annexure-B the rate for construction for extra areas is Rs 42,236/- sqm. Hence the extra cost to the project due to these excess areas works out to 98.195 sqm x Rs.42,236/- = Rs 41,47,364/-.*

*Hope you find the above in order and await your further instructions."*

तसेच या प्रकल्पाचे स्ट्रक्चरल कन्सल्टंट श्री. जे. एस. सबरवाल यांनी दि.२२/०८/२०१९ चे साईट विझिटनुसार कनेक्टींग कॉरीडॉरबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

*"1. Connecting Corridor Block to the Shantiniwas: It has been brought to my notice that existing 9" x 9" columns in the pavilion part connecting to the shantiniwas,*

*will extend upto First Floor roof. For this the current sloping roof of the pavilion is to be dismantled and replaced by horizontal new beam slab floor.*

*We are of the opinion that these columns will not be safe for taking heavy live load of the first floor and one extra roof floor load. Moreover, while dismantling the existing sloping roof, it is most likely that these columns may get damaged structurally by means of hairline fractures etc."*

*Therefore, we recommend, that these columns should also be dismantled and re-casted with redesigned size and reinforcement."*

वर नमूद केलेनुसार प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री. उदय काप्रे यांनी असे कळविले आहे की, मूळ नकाशाप्रमाणे कनेक्टींग कॉरीडॉरचे बांधकाम केल्यास शांतीनिवास इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील पश्चिम बाजुचे जनरल टॉयलेटसपैकी दक्षिण बाजुचे टॉयलेटस् तोडावे लागतील. तसेच ड्रेनेज पाईप शाफ्टही तोडावा लागेल. त्यामुळे पहिला मजला व त्यावरील दोन्ही मजल्यांवरील सदर टॉयलेटस् निकामी होतील. तसेच मूळ नकाशानुसार कॉरीडॉर ज्याठिकाणी शांतीनिवास इमारतीला जोडण्यात येणार होता, त्याठिकाणी ०३ कॉलम असल्याने पॅसेजकरीता कमी रूंदी उपलब्ध होत होती. त्याचप्रमाणे फाउंडेशन लेव्हलला जुनी इमारत व नियोजीत इमारत यांचे स्ट्रक्चरल कनेक्शन करण्यात अडचणी होत्या. प्रस्तावित करणेत आलेल्या सुधारीत नकाशाप्रमाणे बांधकाम केल्यास या अडचणी दूर होतील, तसेच सशुल्क पासधारक व निःशुल्क पासधारक भक्त यांच्या स्वंतत्र रांगा करणे यामुळे सुलभ होईल, असे आर्किटेक्ट यांनी कळविले आहे.

आर्किटेक्ट यांनी प्रस्तावित केलेनुसार सदर बांधकाम क्षेत्रामध्ये तळमजला (३३.१३५ चौ.मी., ५०% एरीया) व पहिला मजला (६५.०६ चौ.मी.) अशी एकूण ९८.१९५ चौ. मी. इतकी वाढ बांधकाम क्षेत्रफळात होत असून त्याकरीता रु.४२,२३६/- प्रती चौ.मी. या दराने निविदा रकमेपेक्षा एकूण रु.४१,४७,३६४/- मात्र इतका अतिरिक्त खर्च अपेक्षित असल्याचे कळविले आहे. तसेच सदर काम हे निविदेतील शर्त क्र.१३५ अन्वये ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., यांचेकडून करून घेता येईल, असा अभिप्राय सादर केला आहे.

यापूर्वी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीचे सभेत याबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यावेळी तळमजल्याचे स्ट्रक्चर आहे तसेच ठेवून sloping slab तोडणे व त्यावर नविन फ्लॅट स्लॅब टाकणे व पहिला मजल्याचे नविन बांधकाम करणे प्रस्तावित होते. त्यावर निर्णय क्र.३४८ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*"....यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारत व मंदिर परिसरातील विद्यमान दर्शनरांग हॉल यांना जोडणारा Connecting Corridor शांतीनिवास इमारतीचे पहिल्या मजल्यावरील दर्शन रांगेला दक्षिण बाजूने जोडणेसाठी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२६,०४,७८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."*

तदनंतर या प्रकल्पाचे स्ट्रक्चरल कन्सल्टंट श्री.जे.एस.सबरवाल यांनी दि.२२/०८/२०१९चे साईट विझिटनुसार कनेक्टींग कॉरीडॉरबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

*"It has been brought to my notice that existing 9" x 9" columns in the pavilion part connecting to the shantiniwas, will extend upto First Floor roof. For this the current sloping roof of the pavilion is to be dismantled and replaced by horizontal new beam slab floor.*

*We are of the opinion that these columns will not be safe for taking heavy live load of the first floor and one extra roof floor load. Moreover, while dismantling the existing sloping roof, it is most likely that these columns may get damaged structurally by means of hairline fractures etc."*

*Therefore, we recommend, that these columns should also be dismantled and re-casted with redesigned size and reinforcement."*

स्ट्रक्चरल कन्सल्टंट यांचे सदर अभिप्रायानुसार सध्याचे स्लोपींग स्लॅबचे (Pavilian) स्ट्रक्चर पूर्णपणे पायापर्यंत तोडून नविन स्ट्रक्चर (G+1) चे बांधकाम करणे प्रस्तावित आहे. स्ट्रक्चरल कन्सल्टंट यांचे सदर अभिप्रायानुसार याकामाचे सुधारीत अंदाजपत्रक आर्किटेक्ट यांनी तयार केलेले असून, त्यानुसार याकामी आता पुर्वीची मंजूर रक्कम रू.२६,०४,७८०/- पेक्षा अतिरीक्त रू.१५,४२,५८४/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

आर्किटेक्ट यांनी प्रस्तावित केलेनुसार सदर काम हे निविदेतील अट क्र.१३५ अन्वये ठेकेदार यांचेकडून करून घेता येईल.

***135. VARIATIONS (DEVIATIONS/ EXTRA WORKS)*:**

*No alteration, omission or variation shall vitiate this contract but in case the Architect / Executive Engineer / Employer thinks proper at any time during the progress of the works to make any additions, alterations or omissions from the work or any alteration in the kind or quality of the materials to be incorporated therein, the Architect, with approval of the Employer, shall give the Contractor written notice thereof well in advance of the work being taken up and the Contractor shall alter, add to, or omit from, as the case may require, in accordance with such notice.*

*The value of such extra alteration, additions or omissions shall in all cases be determined by the Employer in accordance with the provision of Conditions 89 and 90 hereof and the same shall be added to or deducted from the contract amount accordingly, subject to the condition that the contract sum will not thereby vary on the whole by more than 20% (twenty percent).*

सदर खर्च हा शासनाने निर्णय क्र.सासंवि-१०१७/१३१३/प्र.क्र.१३३/का.१६, दि.१६/०२/२०१८ अन्वये, नविन दर्शनरांग प्रकल्प उभारणीसाठी मंजूर केलेल्या रू.११२,४०,९०,०५९/- मात्रचे मर्यादेत आहे.

प्रस्ताव:- तरी नियोजित श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारत व मंदिर परिसरातील विद्यमान दर्शनरांग हॉल यांना जोडणारा Connecting Corridor शांतीनिवास इमारतीचे पहिल्या मजल्यावरील दर्शन रांगेला दक्षिण बाजुने जोडणेसाठी तेथिल Sloping Pavilion चे बांधकाम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांचेकडून तोडून घेणेस तसेच त्या ठिकाणी कनेक्टींग कॉरीडॉरचे बांधकाम करणेस व त्यासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ चे सभेतील मंजूर खर्च (रू.२६,०४,७८०/-) व्यतिरिक्त अपेक्षित असलेल्या रु.१५,४२,५८४/- मात्रचे वाढीव खर्चास मान्यता मिळणेस विनंती. निविदेतील शर्त क्र.१३५ नुसार सदर काम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांचेकडून मंजूर लम्पसम निविदा दर रू.१०९.५० कोटी नुसार येणारे रू.४२,२३६/- प्रती चौ. मी. या दरात करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारत व मंदिर परिसरातील विद्यमान दर्शनरांग हॉल यांना जोडणारा Connecting Corridor शांतीनिवास इमारतीचे पहिल्या मजल्यावरील दर्शन रांगेला दक्षिण बाजुने जोडणेसाठी तेथिल Sloping Pavilion चे बांधकाम ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांचेकडून तोडून घेऊन त्या ठिकाणी कनेक्टींग कॉरीडॉरचे बांधकाम करणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ चे सभेतील मंजूर खर्च रक्कम रू.२६,०४,७८०/- व्यतिरीक्त अपेक्षित असलेल्या रु.१५,४२,५८४/-मात्रचे वाढीव खर्चास संबधीत शासकीय यंत्रणेच्या परवानगीच्या अधिन राहुन ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांचेकडून करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३** **श्री साई सत्तचरित्र पारायण सोहळा-२०२० व श्री गोकुळ अष्टमी उत्सव एकत्रित साजरा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. तदर्थ समितीच्या दि.११.०५.२०२० रोजीचे सभेत श्री साईसच्चरित पारायण सोहळयाबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता त्यावर निर्णय क्र.२७२ नुसार सध्या संपुर्ण भारतात कोव्हीड १९ (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने या पार्श्वभुमीवर श्री साईसच्चरित पारायण सोहळा कार्यक्रमाचे स्वरुप निश्चित करण्यात येऊन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले होते.

त्यानुसार मा. तदर्थ समितीच्या दि.१३.०७.२०२० रोजी होणा-या सभेच्या विषयपत्रिकेत अ.नं. ४९,५० अन्वये यासंबंधीचे वेगवेगळे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत. तथापि सदरच्या टिपणी अन्वये सादर करण्यात आलेल्या विषयात दोन्ही विषयांचा एत्रितपणे व संदर्भासह परामर्ष घेण्यात आलेला असून त्या दोन्ही विषयांवर चर्चा करण्याऐवजी सदर विषयावर चर्चा करणे इष्ट होईल असे नम्र मत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी साजरा करीत असलेल्या उत्सवाबाबत असलेल्या तरतुदींची पूर्वपिठीका पुढीलप्रमाणे आहे.

दि.०९/१०/१९५५,दि.२०/११/१९५५ व दि.१८/१२/१९५५ रोजी झालेल्या भक्तमंडळाच्या सभेत शिर्डी संस्थानचे योजना कानू व नियम तयार करण्यात आले त्यास मा.धर्मादाय आयुक्त यांनी पसंती दर्शविली व मा. जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांनी दि.११/०५/१९५६ रोजी योजना मंजूर केली.

सदरहू योजनेमध्ये संस्थानमार्फत साज-या होणा-या उत्सवांबाबत खालीलप्रमाणे तरतुद आहे.

**ध्येय व उद्देश-**

**कलम ३** ब) आजवर चालत आलेल्या रुढीनुसार शिरडी येथे श्रीरामनवमी, गुरुपौर्णिमा, गोकुळ अष्टमी व पुण्यतिथी यादिवशी नेहेमींप्रमाणे उत्सव साजरे करणें व जत्रा भरविणे.

**कलम ४ उत्सव**

(१) **श्री रामनवमी (२) गुरुपौर्णिमा (३) गोकुळअष्टमी (४) पुण्यतिथी**

अ.नं. ३ चा उत्सव स्थानिकरीत्या साजरा करण्यांत येतो तेव्हां त्याखेरीज बाकीच्या सर्व उत्सवांकरिता भक्तमंडळाच्या सभासदांस आमंत्रणे पाठविली पाहिजेत व त्या आमंत्रण पत्रिकांवर चिटणीसांच्या किंवा विवक्षित उत्सव, सोंपविण्यांत आलेल्या एका किंवा अनेक व्यवस्थापकांच्या सह्या असल्या पाहिजेत. वरील उत्सव कोणत्या रितीनें पाळावे किंवा साजरे करावे याबाबत सुरुवातीपासून चालत आलेल्या व निष्ठापूर्वक आधींच पाळलेल्या रुढीरिवाजांचें बाबतींत, तसेच, रामनवमी उत्सव प्रसंगीं श्रीदासगणूमहाराज (श्री.गणेश दत्तात्रय सहस्त्रबुध्दे ) यांची आपल्या हयातींत कीर्तन करण्याची प्रथा या बाबतींत ढवळाढवळ करु नये.

सदर योजनेमध्ये विभाग २ च्या अंतर्गत श्री साईबाबांच्या शिर्डी **संस्थानचे नियम व कानू** या शिर्षकाखाली संस्थानची व्यवस्था असे नमुद असून, त्यातील नियम २३ **व्यवस्थापक समितीचे विवक्षित अधिकार** या शिर्षकाखाली “ट” मध्ये खालीलप्रमाणे उल्लेख आहे.

(ट) भाग १ मध्ये उल्लेख केलेले उत्सव योग्य रितीनें साजरे केले जात आहेत कीं नाहींत हे पाहणे ; समिति , शक्य तेथवर, उत्सव पाळणें व साजरे करणें याबाबत सुरुवातीपासून आधींच प्रस्थापित झालेल्या व श्रध्दायुक्त भावनेनें आदरणीय झालेल्या रुढींत ढवळाढवळ करणार नाही;

मा. मुंबई सिटी सिव्हील कोर्टात दाखल झालेल्या चॅरिटी सुट नं. ३४५७ /१९६० मध्ये मा.न्यायाधीश श्री एन.आय माखिजानी यांनी दि.१८/१०/१९८२ रोजी रोझनामा (Scheme) मंजूर केला त्यात कलम नं.३ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

CLAUSE NO.(03) AIMS AND OBJECTS AND ACTIVITIES.

(a) To ensure the perpetuation of the of traditional forms of worship of Shri Sai Baba at Samadhi Mandir, Dwarkamai, Guru Padukas, Chavadi and Lendi Baug at Shirdi.

(b) To celebrate the conventional festivals and fairs of Shri Ram Navami, Guru Pournima, Gokul Ashtami and Punyatithi of Sai Baba at Shirdi in accordance with the established practice.

CLAUSE NO.(04) MADE OF WORSHIP

The mode of worship at different places at Shirdi shall be as provided in Schedule A to this Scheme.

CLAUSE 13

**Power and duties of Board of Management.**

The Board of Management shall have power

a) To carry out all duties entrusted to it under this scheme or by or under the provision of the Bombay Public Trusts Act, 1950 and the rules framed thereunder.

**Duties of the Board of Management**

It shall be the duty of the Board of Management

a) to carry out the aims and objects of the trust as far as they could under the provisions of this scheme with the powers vested in them.

c) to carry out all other duties as expected of them under this scheme or other laws, in force

CLAUSE 15

Powers and duties of the Executive Officer.

१) The Executive officer shall be the Secretary of the Board of Management and its principal officer and shall subject to the superintendence, direction and central of the Board of Management have powers to carry out its decisions and orders in accordance with this scheme and in accordance with provisions of the Bombay public Trusts Act, and rules framed there under.

S C H E D U L E -A

THE MODE OF WORSHIP

The mode of worship, offered both during the life time and after the Mahasamadhi of Shri Sai Baba has been as follows and shall be followed hereafter from day to day in keeping with the traditions including the practices of worship at the Samadhi Mandir and in the Masjid.

(6) U T S A V A S

1) SHREE RAMNAVAMI 2) GURU PURNIMA 3) GOKUL ASHTAMI 4) PUNYATITHI

For the aforesaid Utsavas except No.3 is celebrated locally only, the Board of Management shall issue invitations to the member of the Bhakta Mandal over the signatures of the Secretaries or of the entrusted Manager or Managers of any of the particular Utsav.

The Board of Management will not interferes with the conventions already established and devoutly honoured from the very start with regard to the observance and celebrations of the aforesaid Utsavas including the Practice of performance of kirtan by Shri Das Ganu Maharaj (Ganesh Dattatraya Sahashtrabudhe) at Ramnavmi Utasav during the life time only

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४

(मा.राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १७ ऑगस्ट २००४ रोजी प्रथम प्रसिध्द केलेला अधिनियम.)

मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये शिर्डी, जिल्हा अहमदनगर येथील "श्री साईबाबा शिर्डी संस्थान" या नावे नोंदणी झालेली श्री शिर्डी साईबाबा संस्थानाची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करण्याकरिता, आणि विश्वस्तव्यवस्थेला जनतेसाठी अधिक व्यापक कल्याणकार्य हाती घेणे शक्य व्हावे म्हणून तिचे अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापन, प्रशासन, शासन व नियंत्रण करण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

**ज्याअर्थी**, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये शिर्डी, जिल्हा अहमदनगर येथील श्री साईबाबा शिर्डी संस्थान या नावे नोंदणी झालेल्या व श्री शिर्डी साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी म्हणून ओळखल्या जाणा-या श्री शिर्डी साईबाबा संस्थानाच्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे प्रशासन हे, शहर दिवाणी न्यायालय, मुंबई, याने १९६० चा धर्मादाय वाद क्रमांक ३४५७ मध्ये, दिनांक १८ ऑक्टोबर १९८२ रोजी दिलेल्या आणि मुंबई उच्च न्यायालयाने, १९८३ च्या प्रथम अपील क्रमांक ३२० मध्ये, दिनांक २३ जुलै १९८४ रोजी दिलेल्या निर्णयाव्दारे, कायम केलेल्या त्यांच्या आदेशान्वये तयार केलेल्या योजनेनुसार, व्यवस्थापन मंडळाकडे निहित केले आहे,

**आणि ज्याअर्थी**, श्री साईबाबा शिर्डी संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या पूर्वीच्या व्यवसथापन मंडळाची पाच वर्षाची मुदत संपल्यावर, धर्मादाय आयुक्तांनी, दिनांक ३१ ऑगस्ट १९९९ च्या त्यांच्या आदेशान्वये उक्त विश्वस्तव्यवस्थेचे व्यवस्थापन मंडळ पुनर्घटित केलेले आहे.

**आणि ज्याअर्थी ,** विश्वस्तांच्या नियुक्तीच्या संबंधातील धर्मादाय आयुक्तांच्या दिनांक ३१ ऑगस्ट १९९९ च्या उक्त आदेशाने बाधित झाल्यामुळे ,१९९९ चे दोन रिट विनंती अर्ज क्रमांक २८६६ आणि २८६७ मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आले होते, आणि उच्च न्यायालयाने विश्वस्तांपैकी एका विश्वस्ताची नियुक्ती रद्दबातल ठरवून ती रद्य केली आहे.

**आणि ज्याअर्थी,** उक्त विश्वस्तव्यवस्थेकडे अमाप मालमत्ता आहे आणि ती विश्वस्तव्यवस्था खूप लोकप्रिय आहे आणि ती अतिशय आदरणीय मानली आहे आणि आदरणीय तिचे भक्तगण संपूर्ण भारतभर खूप मोठया संख्येने आहेत.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनास या महत्वपूर्ण आणि लोकप्रिय विश्वस्तव्यवस्थेच्या विकासात व व्यवस्थापनात अडचणी येऊ नयेत किंवा टाळता येण्याजोग्या खटल्या कज्जांना कोणत्याही प्रकारे सामोरे जावे लागू नये याकरिता आणि विश्वस्तव्यवस्थेस, आपले धर्मादाय कार्यक्रम अधिक परिणामकारकरितीने आणि कार्यक्षमतेने पार पाडणे आणि त्याच्या भक्तांना अधिक सुविधा देणे  शक्य व्हावे म्हणून आणि सर्वसामान्य जनतेसाठी आपल्या अतिरिक्त निधीतून अधिक व्यापक कल्याणकार्य हाती घेणे शक्य व्हावे म्हणून, आणि सर्व सामान्य जनतेसाठी आपल्या अतिरिक्त निधीतून अधिक व्यापक कल्याणकार्य हाती घेणे शक्य व्हावे म्हणून उक्त विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करण्यासाठी आणि राज्य शासनाच्या थेट देखरेखीखालील व नियंत्रणाखालील समितीमार्फत त्याचे कार्यक्षम व्यवस्थापन करण्याची तरतूद करण्यासाठी स्वतंत्र कायदा असणे, इष्ट वाटते त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचावन्नाव्या वर्षी, याव्दारे अधिनियम करण्यात येत आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१)	अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन  राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२)	अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील

३)	अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

या प्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत साज-या केल्या जाणा-या उत्सवाच्या तरतुदींची पुर्वपिठीका आहे.

**प्रस्ताव**– नाटय रसिक मंच (संच), शिर्डी यांनी दि.१०.०७.२०२० च्या पत्रामध्ये पुढीलप्रमाणे मजकुर नमुद केला आहे.

गेल्या पंचविस वर्षापासून दरवर्षी श्रावण महिन्यात साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था आणि ग्रामस्थांचे सहकार्याने साई चरित्र पारायण सोहळा आयोजीत करण्यात येतो,

यंदाचा पारायण सोहळा वर्षे २६ दरवर्षी प्रथेप्रमाणे श्रावण शुध्द १ सुरु करणेबाबत आमचे मंडळाने दि.०६.०४.२०२० रोजी सविस्तर पत्र देऊन आपणास विनंती केलेली आहे.

तसेच दि.०१.०७.२०२० रोजीही पारायण कार्यक्रम पत्रिकेबाबत आपणास लेखी अवगत केलेले आहे. यंदाही पारायण सोहळा  दरवर्षीचे प्रथा आणि परंपरे प्रमाणेच श्रावण शुध्द -१ (मंगळवार दि.२१.०७.२०२०) रोजी सुरुवात व्हावी असे आमचे मंडळाचे म्हणणे आहे. याबाबत आपण जो निर्णय घ्याल तो आम्हाला मान्य राहील त्याप्रमाणे आम्ही आमची सेवा देऊ तसा आम्हाला आदेश व्हावेत ही विनंती.

शिर्डी ग्रामस्थ यांनी दि.१०.०७.२०२० च्या पत्रामध्ये  पुढीलप्रमाणे मजकुर नमुद केला आहे.

साईबाबांच्या काळात गोकुळाष्टमी उत्सव आठ दिवस चालत होता असे दाखले आहेत. काळाच्या ओघात तो दोन दिवसांवर आलेला आहे. गेल्या पंचवीस वर्षापासून श्री साईबाबा संस्थान व शिर्डी ग्रामस्थांच्या वतीने साईसच्चरित पारायण सोहळ्याचे सामुदायिक वाचन करण्यात येते. दरवर्षी श्रावणाच्या पहिल्या दिवशी सुरु होणारे हे पारायण जवळपास पंधरा दिवस उशीरा सुरु केले तर साईबाबांच्या हयातीत सुरु असलेला आठ दिवसांचा गोकुळाष्टमी उत्सव पुन्हा सुरु होईल हा उत्सव पुर्नस्थापित करावा अशी आम्हा ग्रामस्थांची मागणी

आहे. त्या दृष्टीने आपण नियोजन करुन या ऐतिहासिक उत्सवाचा श्रीगणेशा करावा अशी नम्र विनंती आहे, असे कळविले आहे.

यंदा प्रत्यक्ष पारायण नसल्याने वाचक घरी बसुन पारायण करणार आहेत. मंदीर परिसरातुन वाचल्या जाणा-या पारायणाचे लाईव्ह प्रक्षेपण झाल्यास एकाच वेळी हजारो भाविक घरी बसुन या पारायणात सहभागी होवू शकतील. त्यासाठी मीट ६० डॉट कॉम यांनी होस्ट होवून विनामुल्य या कार्यक्रमाचे प्रक्षेपण करण्याची तयारी दशर्वली आहे. त्यांनाही यासाठी अनुमती दिल्यास कार्यक्रमाची व्यापकता वाढून तो घराघरात पोहोचवण्यास व अधिकाधिक लोकसहभाग वाढवण्यास मदत होईल. तरी या दृष्टीनेही निर्णय घेण्यास नम्र विनंती आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** सध्या संपूर्ण भारतात कोव्हीड १९ (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने श्री साईबाबांचे मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आले आहे. ते दर्शनासाठी परत कधी सुरु होईल याची शाश्वती नाही. कोरोना व्हायरसच्या संसर्गामुळे गर्दी करण्यावर, गर्दीचे कार्यक्रम करण्यावर शासनामार्फत निर्बंध घालण्यात आलेले आहेत. तसेच राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायद्यान्वये अधिसुचना निर्गमीत करण्यात आलेली आहे. सदरच्या अधिसूचनेचा कालावधी महाराष्ट्रात व अहमदनगर जिल्ह्यात ३१ जुलै २०२० पर्यंत आहे **त्यामुळे चालू वर्षी सामुदायिकरित्या पारायण सोहळा आयोजित करता येणार नाही.**

सन १९५६ ची योजना कानु व नियम तसेच त्यानंतर मा. मुंबई सिटी सिव्हील कोर्टात दाखल झालेल्या चॅरिटी सुट नं. ३४५७ /१९६० मध्ये मा.न्यायाधीश श्री एन.आय माखिजानी यांनी दि.१८/१०/१९८२ रोजी मंजूर केलेल्या रोझनाम्यात व आताच्या अधिनियमात तसेच श्री साईसच्चरितामध्येही श्री रामनवमी ,श्री गुरुपौर्णिमा, गोकुळाष्टमी व श्री पुण्यतिथी उत्सव साजरा करणेबाबतचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यातील सन १९५६ च्या योजनेमध्ये व १९८२ चे रोझनाम्यात गोकुळाष्टमी उत्सव स्थानिकरित्या साजरा करावा व तो सोडून अन्य तीन उत्सवांच्या ( श्रीरामनवमी, श्रीगुरुपौर्णिमा, श्रीपुण्यतिथी ) निमंत्रणपत्रिका भक्तमंडळाच्या सभासदांना पाठविणेबाबत नमूद करण्यात आले आहे.

श्री साईसच्चरित पारायण सोहळा हा श्रावणातल्या कोणत्या तिथीपासून सुरु करावा याबाबत कोठेही उल्लेख नाही.

गोकुळाष्टमी उत्सव हा पूर्वी शिर्डी येथे स्थानिक स्वरुपातच परंतु व्यापक प्रमाणात साजरा होत असल्याबाबतचा उल्लेख संस्थान प्रकाशित सन १९२३ सालच्या साईलीला या नियतकालिकात आला आहे. ( या टिप्पणीसोबत गोकुळाष्टमीचा उल्लेख असलेली साईलीला नियतकालीकाची पाने जोडली आहेत.) पूर्वापार होत असलेला गोकुळाष्टमी उत्सव आणि गेल्या पंचवीस वर्षांपासून होत असलेले श्री साईचरित्राचे सामुदायिक पारायण हे योगायोगाने श्रावण या एकाच महिन्यात येतात. त्यामुळे पारायणाच्या आरंभाची तिथी पुढें सरकवल्यास पूर्वी व्यापक स्वरुपात स्थानिक पातळीवर होणारा गोकुळाष्टमी उत्सव आताही व्यापक स्वरुपात साजरा करता येईल. असें वाटते. गोकुळाष्टमी उत्सवाचा उल्लेख संस्थानचे घटनेमध्ये (योजना कानु व नियम तसेच रोझनामा) आलेला आहे. तसेच त्यात पूर्वापार चालत आलेल्या रुढीपरंपरा चालू ठेवण्याबाबत संस्थानच्या अधिनियमातही निर्देशित केलेले आहे. गोकुळाष्टमी उत्सवाची रुढी पुर्वापार आहे व पारायण सोहळाही गेल्या २५ वर्षापासून सुरु आहे. आता केवळ पारायण सोहळयाचा आरंभ दिन पुढे सरकवून तो श्रावण वद्य एक ( म्हणजेच ४ ऑगस्ट २०२०) रोजी सुरु करुन पारायण समाप्ती श्रीकृष्णजन्माच्या दिवशी व काल्याचे कीर्तन गोकुळाष्टमीचे दिवशी येईल अशा दृष्टीने त्याचे आयोजन करावे असे ग्रामस्थांचे निवेदन आहे.

या सर्वच बाबींचा विचार करता यामध्ये संस्थानव्दारा कुठलीही नवी रुढी सुरु होत नाही. जुनी रुढीही मोडली जात नाही. त्यामुळे श्री साईसच्चरित सामुदायिक पारायण सोहळयासह गोकुळाष्टमी असे या उत्सवाचे स्वरुप असावे असे वाटते. त्यामुळे याकामी शासनाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही त्यामुळे या पारायण सोहळयाची गेल्या २५ वर्षांची दीर्घ परंपरा विचारात घेता या परंपरेला छेद जाऊ नये म्हणून सामुदायिक स्वरुपात पारायण आयोजित न करता तो यावर्षीपासून श्रावण वद्य एक या तिथीला सुरु करुन संस्थानला सोयीस्कर असलेल्या ठिकाणी (समाधी मंदिरासमोरील स्टेज, ध्यानमंदिर, पारायण हॉल) संस्थान पुजा-यांची पारायण वाचनाची बैठक व्यवस्था करुन सुरु करणेस तसेच वाचनाचे थेट प्रक्षेपण संस्थानचे फेसबुक लाईव्ह कव्हरेज पेज, युट्यूब याव्दारे करणेस अथवा शिर्डी ग्रामस्थांनी विनंती केलेप्रमाणे मीट ६० डॉट कॉम यांना विनामुल्य प्रक्षेपण करण्यास परवानगी देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

पारायण समाप्तीनंतर काल्याचे कीर्तन ठेवता येईल. तसेच पारायण समाप्तीनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवसथा, शिर्डी, नाटय रसिक मंच व शिर्डी ग्रामस्थ यांचेमार्फत घरोघरी महाप्रसाद (बुंदी) बंद पाकीटात

वाटपाच्या व्यवस्थेबाबत प्रसंगानुरुप निर्णय घेण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असावेत असे नम्र मत आहे.

श्री साईसच्चरित पारायण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन उपरोक्तप्रमाणे केल्यास साधारणतः खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशील | श्री साई सच्चरित पारायण सोहळा -२०१९ | | श्री साई सच्चरित पारायण सोहळा -२०२० |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजे खर्च | **प्रत्यक्ष खर्च** | **अंदाजे खर्च** |
| १ | मंडप, मॅटिन व स्टेज | २३,०३,४९० | **१२,८१,४००** | ० |
| २ | कलाकार/किर्तनकार बिदागी | १४,६०,००० | **५,९४,७७१** | ० |
| ३ | प्रसाद खर्च, (चहा,कॉफी व दुध खर्चासह) | ७,८३,४१६ | **५,६७,६४१** | (बुंदी प्रसादासाठी) २,५०,००० |
| ४ | जादा (कंत्राटी) कामगार | ३,४३,१३८ | **३,०१,५९१** | -- |
| ५ | फुल सजावट खर्च | ६०,००० | **७५,०००** | |
| ६ | इतर खर्च | ५०,२४० | - | ५०,००० |
| | **एकुण** | ५०,००,२८४ | **२८,२०,४०३** | **३,००,०००** |

सन २०१९ मध्ये पारायणासाठी बसलेल्या पारायणार्थी व इतर साईभक्त व ग्रामस्थ यांचेकडून रोख स्वरुपात अन्नदानखाती रक्कम रु.१,७७,४५९/- जमा झाली होती तर रक्कम रु.२,४८,५५०/-चा शिधा प्रसादालयात व रक्कम रु.२,४०,५४७/- चा शिधा (१७ वस्तु ) पारायणार्थी , इतर साईभक्त व ग्रामस्थ यांचेतर्फे संस्थानचे भांडारमध्ये जमा करण्यात आला होता. (एकूण रक्कम रु.६,६६,५५६/-)

प्रस्ताव:- तरी विभागाच्या अभिप्रायात नमूद केलेप्रमाणे पारायण सोहळयाची गेल्या २५ वर्षांची दीर्घ परंपरा विचारात घेता या परंपरेला छेद जाऊ नये म्हणून सामुदायिक स्वरुपात पारायण आयोजित न करता तो श्रावण वद्य एक रोजी ( दि.४ ऑगस्ट २०२०) सुरु करुन संस्थानला सोयीस्कर असलेल्या ठिकाणी ( समाधी मंदिरासमोरील स्टेज, ध्यानमंदिर, पारायण हॉल) संस्थान पुजा-यांची पारायण वाचनाची बैठक व्यवस्था करुन त्याचे प्रक्षेपणाबाबत निर्णय होणेस, काल्याचे कीर्तन ठेवणेस, पारायण समाप्तीनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवसथा, शिर्डी,नाटय रसिक मंच व शिर्डी ग्रामस्थ यांचेमार्फत घरोघरी महाप्रसाद (बुंदी) बंद पाकीटात वाटपाच्या व्यवस्थेबाबत प्रसंगानुरुप निर्णय घेण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देणेस तसेच पारायण सोहळयास येणा-या रक्कम रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख ) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर .

**निर्णय क्र.४१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई सत्तचरित्र पारायण सोहळयाची गेल्या २५ वर्षांची दीर्घ परंपरा विचारात घेता सामुदायिक स्वरुपात पारायण आयोजित न करता श्रावण वद्य एक दि.४ ऑगस्ट २०२० रोजी सुरु करुन संस्थानला सोयीस्कर असलेल्या समाधी मंदिरासमोरील स्टेजवर संस्थान पुजा-यांची पारायण वाचनाची बैठक व्यवस्था करणेस, पारायणाचे प्रक्षेपन फेसबुक लाईव्हव्दारे करणेस व पारायण समाप्तीनंतर काल्याचे कीर्तन गोकुळअष्टमीच्या दिवशी ठेवण्यास मान्यता देण्यात आली. तथापी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव असल्यामुळे महाप्रसाद (बुंदी) वाटप करण्यात येऊ नये, असे ठरले.**

**(कार्यवाही-शताब्दी कक्ष)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **श्री.बाबासाहेब बाळकृष्ण घोरपडे, मुख्य लेखाधिकारी यांचे प्रतिनियुक्तीचे कालावधीस मुदतवाढ देणेकामी मा.विधी व न्याय विभाग,आणि मा.वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांना अभिप्राय कळविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. बाबासाहेब बाळकृष्ण घोरपडे, सहाय्यक संचालक (प्रशिक्षण), सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांची वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील जावक क्रमांक बदली-२०१६/प्र.क्र.१०८/कोषा.प्रशा-२, दिनांक ०२

जुलै, २०१६ रोजीचे आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे " मुख्यलेखाधिकारी " या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेत आलेली आहे. श्री. बा. बा. घोरपडे हे दिनांक ११ जुलै, २०१६ रोजी (म.पू.) पासून " मुख्यलेखाधिकारी " या प्रतिनियुक्तीचे पदावर हजर झालेले आहेत.

आता, श्री. बाबासाहेब बाळकृष्ण घोरपडे, मुख्य लेखाधिकारी (प्रतिनियुक्ती) यांनी दिनांक १०/०७/२०२० रोजीचे अर्जानुसार, त्यांचे प्रतिनियुक्तीस ०१(एक) वर्ष मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

१) श्री. सुर्यभान गमे, प्रशासकीय अधिकारी हे दिनांक ३१ मे, २०२० रोजी सेवानिवृत्त झाल्याने, श्री. गमे यांचेकडील सर्व विभागांचे पर्यवेक्षणाचा अतिरिक्त कार्यभार श्री. घोरपडे यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत कोव्हीड-१९ मुळे श्रींचे मंदिर दर्शनासाठी बंद आहे. मात्र संस्थानने मंदिर सुरु करण्याबाबतची तयारी सुरु केलेली आहे. मंदिर विभागाचे प्रशासकीय कामकाज श्री. घोरपडे यांचेकडे असल्याने मंदिर सुरु करणेबाबतचे उपाययोजनेमध्ये (Standard Operation Procedure) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. घोरपडे हे काम पहात आहे.

२) संस्थानमध्ये ERP कार्यप्रणाली अमंलबजावणी करण्यासाठी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हीसेस यांची नेमणुक करणेत आलेली आहे. ERP या प्रणालीचा सर्वात जास्त संबध लेखा विभागाशी आहेत. या प्रणालीच्या विकसनाचे कामाचे समन्वयक म्हणून श्री. घोरपडे यांची नेमणूक करणेत आलेली आहे.

३) संस्थानची आयकर विभागाकडे साधारणपणे ४०० कोटी रुपयांची आयकर अपील प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यापैकी २ वर्षाची प्रकरणे अंतिम सुनावणीच्या टप्प्यात आहेत.

४) केंद्र सरकारने जाहीर केल्यानुसार प्रत्येक ट्रस्टची नव्याने नोंदणी करणे अनिवार्य करणेत आलेली आहे. सदर नोंदणीसाठी लेखा विभागाशी संबंधित महत्वाची माहीती सादर करावी लागणार आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही देशातील दोन नंबरची विश्वस्थव्यवस्था आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या ट्रस्टची नोंदणी वेळेवर अचुक होण्यासाठी मुख्यलेखाधिकारी यांचा सहभाग महत्वाचा असणार आहे.

५) संस्थान मार्फत चालू असलेले दर्शन लाईन, शैक्षणिक संकुल, निळवंडे धरणातून संस्थान करीता पाणीपुरवठा योजना आदि विविध प्रकल्पांवर कार्यवाही सुरु आहे आणि सदरचे प्रकल्प हे आर्थिकदृष्टया मोठया क्षमतेचे आहेत. तसेच आस्थापना विषयक कामकाजासाठी नियुक्त करणेत आलेल्या सेवानिवृत्त शासकीय अधिका-यांचे कार्यगटाकडून सुधारित आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम आणि बिंदूनामावली आदि कामकाज चालू आहे.

उपरोक्त प्रमाणे सुरु असणारे दैनंदिन कामकाजासह, नियोजित व प्रस्तावित विकास प्रकल्पांचा आर्थिक लेखा-जोखा नियंत्रण करणे, आर्थिक नियोजन करणे तसेच आस्थापनाविषयक कामकाजासाठी मा. शासनाकडील वित्त व लेखा विभागाकडील सक्षम अधिका-याची अत्यंत आवश्यकता व गरज आहे.

याबाबीचा विचार करतां, सध्या " मुख्यलेखाधिकारी " या प्रतिनियुक्तीचे पदावर कार्यरत असणारे श्री. बाबासाहेब बाळकृष्ण घोरपडे ( सहाय्यक संचालक संवर्ग, लेखा व कोषागारे विभाग) यांचे प्रतिनियुक्तीचे कालावधीस पुढील ०१ वर्षाकरीता मुदतवाढ देणेबाबतचा सकारात्मक अभिप्राय मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग तसेच मा. अवर सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन तसेच मा.संचालक, लेखा व कोषागारे संचानलनालय, मुंबई यांना कळविणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकडे सध्या "मुख्यलेखाधिकारी" या प्रतिनियुक्तीचे पदावर कार्यरत असणारे श्री.बाबासाहेब बाळकृष्ण घोरपडे (सहाय्यक संचालक संवर्ग,लेखा व कोषागारे विभाग) यांचे प्रतिनियुक्तीचे कालावधीस पुढील ०१ वर्षाकरीता मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, लेखा व कोषागारे, मंत्रालय, मुंबई यांना पाठविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **श्री रामनवमी उत्सव-२०२० च्या भक्तमंडळ सभासदांना पोष्टाने पाठविणेत येणाऱ्या निमंत्रण पत्रिकांपैकी शिल्लक राहिलेल्या निमंत्रण पत्रिका रद्द करुन त्याची अभिलेख कक्षामार्फत रद्दी म्हणून विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **विषयाची पूर्वपीठीका -**

**(अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनिय–२००४ मधील तरतुदीनुसार आणि मा. शासनाने मंजूर केलेल्या भक्तमंडळाचे विनियमानुसार भक्तमंडळाचे सभासदांना संस्थान व्यवस्थापनामार्फत साजरे करणेत येणा-या श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी (विजयादशमी) उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका व त्यासोबतच उदीप्रसाद पाठविणेत येत असतो. त्यानुसार शताब्दी कक्षामार्फत दिनांक १७ मार्च, २०२० रोजी संबंधित छपाईधारकास निमंत्रण पत्रिका छपाईचा कार्यादेश पारित करणेत आलेला होता.

या कार्यादेशानुसार, सन २०२० मध्ये साजरे करणेत येणा-या " श्री रामनवमी उत्सव -२०२० " या उत्सवाच्या भक्तमंडळाचे अंदाजे १,७८,००० सभासदांना निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद पाठविणेकामी, शताब्दी कक्षामार्फत १,७२,००० निमंत्रण पत्रिका छपाई करुन सामान्य प्रशासन विभागाचे (भक्तमंडळ कक्ष) दिनांक २० मार्च, २०२० रोजी ताब्यात मिळालेल्या होत्या. सदर निमंत्रण पत्रिका भक्तमंडळ सभासदांना पाठविणेकामी दिनांक २० मार्च, २०२० रोजीचे मंजूर टिपणीनुसार मान्यता मिळालेनंतर, त्या फ्रँकिंग करुनउदीप्रसाद भरुन पोष्टाने पाठविणेकामी कार्यवाही सुरु करणेत आली.

दरम्यानचे कालावधीत मा. केंद्र व राज्य शासनाने कोरोना विषाणू (कोव्हीड-१९)चा प्रादुर्भाव रोखणेसाठी संपूर्ण देशात तसेच महाराष्ट्र राज्यात दिनांक २३ मार्च, २०२० पासून संपूर्णतः लॉकडाऊन लागू केला. तसेच याच कालावधीत मा. तदर्थ समितीने चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेनुसार, श्री रामनवमी उत्सव – २०२० पूर्णतः रद्द करणेत येत असलेबाबत आदेशित करणेत आले. त्यामुळे दिनांक २० मार्च, २०२० ते दिनांक २३ मार्च, २०२० पावेतो फ्रँकिग झालेल्या ६९,९८१ निमंत्रण पत्रिका, त्यावर उत्सव रद्द करणेत येत शिक्का मारुन पोष्टाने पाठविणेबाबतची कार्यवाही सुरु करणेत आली.

तथापि, दि. २३ मार्च २०२० रोजी पोष्टाने पाठविणेकामी पूर्णतः तयार असलेल्या साधारणत: २०००० निमंत्रण पत्रिका पोष्टात पाठविणेत आल्या असतां, मा. केंद्र व राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोव्हीड -१९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून दिनांक २३ मार्च,२०२० पासुन देशभरात लॉकडाऊन जाहिर केल्यामुळे, शिर्डी पोष्ट कार्यालयाने या निमंत्रण पत्रिका स्वीकारणेस नकार दिला. त्यामुळे त्याच दिवशी प्रशासकीय स्तरावर सविस्तर कार्यालयीन टिपणी सादर करुन, श्री रामनवमी उत्सव-२०२० च्या निमंत्रणपत्रिका व उदीप्रसाद पाठविणेचे कामकाज स्थगित / बंद व उर्वरीत राहिलेल्या पत्रिकासंबंधीत काम हे शिर्डी पोष्ट कार्यालयाचे कामकाज नियमितपणे सुरु झालेनंतर सुरु करणेस मान्यता मिळाली.

पोष्ट कार्यालयाचे कामकाज दिनांक १८ मे, २०२० पासून नियमितपणे सुरु झालेनंतर, पोष्ट मास्टर, शिर्डी पोष्ट कार्यालय यांचेशी समक्ष चर्चा करुन, वर नमुद केलेप्रमाणेफ्रँकिंग झालेल्या व पाठविणेस पूर्ण तयार असलेल्या ६९,९८१ निमंत्रण पत्रिकेवर उत्सव रद्द झाल्याचा शिक्का उमटवून, पोष्टाव्दारे पाठविणेची कार्यवाही पूर्ण करणेत आलेली आहे. आता, श्री रामनवमी उत्सव-२०२० साजरा होऊन जवळजवळ ०४ महिने होत आल्याने, उर्वरीत भक्तमंडळ सभासदांना या उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठविणे उचित होणार नाही, असे मत आहे.

तसेच मा. तदर्थ समितीचे मान्यतेने, नुकताच साजरा करणेत आलेल्या श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२० चा उदीप्रसाद भक्तमंडळ सभासदांना पाठविणेकामी कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

**प्रस्ताव -**

**(ब)** उपरोक्त नमुद केलेल्या सर्व बाबींचा विचार करतां, मा. केंद्र व राज्य शासनाने कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून दिनांक २३ मार्च, २०२० पासून संपूर्ण देशासह महाराष्ट्रात लॉकडाऊनची अंमलबजावणी सुरु असल्याने तसेच श्री रामनवमी उत्सव-२०२० साजरा होऊन बराचसा कालावधी झालेला असल्याने, शताब्दी विभागामार्फत भक्तमंडळ सभासदांना पाठविणेकामी ज्या एकुण १,७२,००० निमंत्रणपत्रिका छपाई करुन ताब्यात मिळालेल्या होत्या, त्यापैकी अंदाजे ७०, ००० निमंत्रण पत्रिका पोष्टाव्दारे पाठविणेत आल्याने, उर्वरित शिल्लक राहिलेल्या अंदाजे १,०२,००० निमंत्रण पत्रिका रद्द करुन, त्याची अभिलेख कक्षामार्फत सन २०२० करीता मंजूर असलेल्या उच्चतम दराने रद्दी म्हणून विक्री करणेस मान्यता मिळणेसाठी मा. तदर्थ समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव-२०२० च्या भक्तमंडळ सभासदांना पोष्टाने पाठविणेत येणाऱ्या निमंत्रण पत्रिकांपैकी शिल्लक राहिलेल्या अंदाजे १,०२,००० निमंत्रण पत्रिका रद्द करुन, त्यांचे श्रेडींग (Shredding) करुन अभिलेख कक्षामार्फत सन-२०२० करीता मंजूर असलेल्या उच्चतम दराने रद्दी म्हणून विक्री करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **श्री साईनाथ रुग्णालयात तात्पुरत्या स्वरुपात ऑनकॉल बेसिस पध्दतीने भुलतज्ञ म्हणून देत असलेल्या पॅनलची सेवा सुरु ठेवणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद–कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र. –

१. मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४/०७/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५२५.- संस्थान नेमणुक असलेल्या भुलतज्ञांना त्यांचे डयुटी व्यतीरिक्त संध्याकाळी ६ ते १० यावेळेत आवश्यक असलेल्या मेडीयम ऑपरेशनसाठी रु.४५०/- व मेजर तातडीचे ऑपरेशनसाठी रु.८००/- याप्रमाणे दर (प्रत्येक ऑपरेशनसाठी) देणेस मान्यता देणेत आली.

२. मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०७/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६०६.- याकरिता श्री साईनाथ रुग्णांलयातील भुलतज्ञांना संध्याकाळी ६ ते १० या वेळेत होणा-या सर्व केसेस व आवश्यक असलेल्या मेडीयम ऑपरेशनसाठी रु.६५०/- व मेजर / तातडीचे ऑपरेशनसाठी रु.१२००/- याप्रमाणे (प्रत्येक ऑपरेशनसाठी) दर देणेस मान्यता देणेत आलेली आहे.

३. मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१२६- श्री साईनाथ रूग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टरांची संपुर्ण पदे भरेपर्यंत गरजेनुसार आहे त्याच कायम भुलतज्ञ डॉक्टरांना अतिरिक्त (रूटीन / तातडीच्या शस्त्रक्रीया) दर देणेस व व्हिजीटींग पध्दतीने (ऑन कॉल बेसीस) भुलतज्ञ डॉक्टर बोलविणेस, तसेच त्यांचे पॅनेल तयार करणेत येऊन, त्यांना प्रस्तावित केलेप्रमाणे दर देणेस मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना– मा व्यवस्थापन समिती दि. ०२/०२/२०१८ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला होता.

श्री साईनाथ रूग्णालयातील भुलतज्ञ ऑपरेशन थिएटर नं १ मध्ये सर्जरी, ऑर्थो, गायनिक इ. तीन ऑपरेशन थिएटरपैकी दोन ऑपरेशन थिएटरमधील शस्त्रक्रीया पार पाडत आहे. तसेच ऑपरेशन थिएटर नं २ मध्ये ईएनटी ऑप्थल थिएटरमध्ये शस्त्रक्रीया आवश्यकतेनुसार लोकल व पुर्ण भुल देऊन केल्या जातात. करीता बाहेरून एक व्हिजीटींग डॉक्टर प्रती दिवशी बोलविणे आवश्यक आहे.

श्री साईनाथ रूग्णालयातील कायम भुलतज्ञापैकी एखादा भुलतज्ञ रजेवर गेल्यास ऑपरेशन थिएटर नं १ मधील शस्त्रक्रीयेसाठी बाहेरून ऑनकॉल बेसीस वर भुलतज्ञ डॉक्टर्स बोलविणे गरजेचे आहे. अशा प्रकारे एका वेळी एक किंवा दोन भुलतज्ञ डॉक्टर्स ऑनकॉल बेसीस बोलविणे आवश्यक आहे. श्री साईनाथ रूग्णालयातील शस्त्रक्रीयेकामी श्री साईनाथ रूग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टरांची सध्याचे दर व शासनपरिपत्रकाप्रमाणे भुलतज्ञ डॉक्टरांचे दर खालीलप्रमाणे शासनाने प्रसतावीत केलेले आहे.

| भुलतज्ञ डॉक्टर्स | मेजर / तातडीचे | मेडीयम / मायनर |
|---|---|---|
| श्री साईनाथ रूग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टर्स | १२००/- | ६५०/- |
| बाहेरून ऑनकॉल बेसिस वरील भुलतज्ञ डॉक्टर्स | २०००/- | १५००/- |

तसेच महिन्यातील चार किंवा पाच पैकी दोन रविवारी होणा-या तातडीच्या शस्त्रक्रीयेकामी श्री साईनाथ रूग्णालयातील भुलतज्ञ उपलब्ध राहतील व उर्वरित सर्व रविवारी होणा-या तातडीच्या शस्त्रक्रीयेकामी बाहेरून ऑनकॉल बेसीसवर बोलविणेत येणारे भुलतज्ञ डॉक्टर्स उपलब्ध राहतील. जेणेकरून रूग्णालयाचे कामकाज सुरळीत होईल.

तरी, एका वेळी एक किंवा दोन भुलतज्ञ डॉक्टर्स ऑनकॉल बेसिस बोलविणेस तसेच त्यांचे पॅनल बनविणेस व प्रस्तावित दर देणेस मान्यता मिळणेबाबत प्रस्तावीत करणेत आले होते त्यास निर्णय क्र १२६ नुसार मान्यता देण्यात आली. सदर निर्णयानुसार दि. १७/०६/२०१९ रोजीचे मंजुर टिपणीस अनुसरून दि.०१/०७/२०१९ ते दि. ३१/०५/२०२० या कालावधीसाठी खालीलप्रमाणे श्री साईनाथ रूग्णालयात व्हिजीटींग पध्दतीने (ऑन कॉल बेसीस) भुलतज्ञ डॉक्टर बोलविणेत येत असुन त्यांचे पॅनेल तयार करणेत आले असुन त्यांना मा व्यवस्थापन समिती दि. ०२/०२/२०१८ रोजीचे सभेत प्रस्तावित केलेप्रमाणे दर देणेत येत आहे.

| अ नं | वैद्यकीय अधिका-यांचे नाव | पात्रता |
|---|---|---|
| ०१ | डॉ यशोधन अरूण पितांबरे<br>मु पो- शिर्डी-साकुरी शिव, ता. राहाता. | एमबीबीएस-१९९६<br>डीए-२००७. |
| ०२ | डॉ अशोक मेघराज गरूटे<br>मु पो लोणी, ता. राहाता जि. अ.नगर | एमबीबीएस-१९६८<br>डीए-१९९६. |
| ०३ | डॉ विजयकुमार दादाराव कर्डीले<br>मु पो शिर्डी, ता. राहाता | एमबीबीएस-२००७<br>डीए-२०१४. |
| ०४ | डॉ बन्सी शामराव ढाकणे<br>मु पो कोपरगाव, ता कोपरगाव | एमबीबीएस-१९७८<br>डीए-१९८१. |

उपरोक्त पॅनलचा कालावधी ३१/०५/२०२० अखेर संपुष्टात येत असल्याने संबंधीत वैद्यकीय अधिका-यांनी त्यांची सेवा सुरू ठेवणेबाबत विनंती अर्ज केलेले आहे. सदर अर्जावर प्र वैद्यकीय अधिक्षीका, श्री साईनाथ रूग्णालय यांनी, श्री साईनाथ रूग्णालयात भुलतज्ञ अधिका-यांची कमतरता असल्याने त्यांचे अर्जाचा विचार करून व्हिजीटींग पॅनलवर ऑनकॉल पध्दतीने पॅनलची दि.०२/०२/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णय क्र.१२६ प्रमाणे सेवा सुरू ठेवणेत यावी असे अभिप्राय दिलेले आहे.

रूग्णालयाला भुलतज्ञ डॉक्टरांची कमतरता असल्याने त्यांना नेमणुक आदेश देणेत यावा असे अभिप्राय दिलेले आहेत.

श्री साईनाथ रूग्णालयातील भुलतज्ञांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| पदाचे नाव | मंजुर पदसंख्या | भरलेली पदसंख्या | व्हिजीटींग पध्दतीने (ऑन कॉल बेसीस) | रिक्त पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| मेडीकल ऑफीसर (भूलतज्ञ) | ०१ | ०० | ०० | ०१ |
| कनिष्ठ भुलतज्ञ | ०३ | ०२ | ०४ | ०१ |

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- तरी, मा.व्यवस्थापन समिती दि. ०२/०२/२०१८ सभेतील निर्णय क्र १२६ नुसार, साईनाथ रूग्णालयात कनिष्ठ भुलतज्ञ म्हणून तात्पुरत्या स्वरूपात ऑन कॉल बेसीस पध्दतीने डॉ बन्सी शामराव ढाकणे, डॉ विजयकुमार दादाराव कर्डीले, डॉ यशोधन अरूण पितांबरे व डॉ अशोक मेघराज गरूटे या वैद्यकीय अधिका-यांचे बनविलेल्या पॅनलची सेवा सुरू ठेवणेस व प्रस्तावित केलेप्रमाणे दर देणेस तसेच उपरोक्त पॅनलची मुदत ०१ जून २०२० ते ३१ मे २०२१ पर्यंत ठेवणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.४१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनाथ रूग्णालयात कनिष्ठ भुलतज्ञ म्हणून तात्पुरत्या स्वरूपात ऑन कॉल बेसीस पध्दतीने डॉ.बन्सी शामराव ढाकणे, डॉ.विजयकुमार दादाराव कर्डीले, डॉ.यशोधन अरूण पितांबरे व डॉ.अशोक मेघराज गरूटे यांना मेजर/तातडीचे शस्त्रक्रियेकरीता रु.२०००/- व मेडीयम/ मायनर शस्त्रक्रियेकरीता रु.१५००/- या दरानुसार दि.०१ जून २०२० ते दि.३० एप्रिल, २०२१ अखेर सेवा सुरु ठेवणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७**

**निर्णय क्र.४२०** **One of the members of the Ad-hoc Committee has forwarded a letter dt.** 18.06.2020 **to the Chief Executive Officer in respect of various complaints touching to the functioning of the Trust. One of the complaint is in respect of shawls and clothes donated by the devotees to be offered on the shrine and idol of Shri Saibaba. The Chief Executive Officer, Deputy Chief Executive Officer as well as Accounts Officer of the Trust pointed out that the Trust has not assigned any private, individual or Company to accept any amount/donation on behalf of the Trust or individually and to send shawls/clothes indicated above. Pending scrutiny on the complaint of one**

**Rajendra Kote, the Committee has resolved that the devotees at large should be informed that the Trust is not involved or has not nominated anybody for supply of such shawls and clothes. Therefore, Information and Technology Department of the Sansthan shall create separate icon on the Sansthan's website http//www.shrisaibabasansthan.org, www.sai.org.in under head, "Shawls and clothes of Shri Saibaba" and gave declaration therein that, "The Trust has not assigned anybody, much less Sai Logabala (OPC) Pvt. Ltd. Company for the supply of shawls and clothes to offer on the shrine and idol of Shri Saibaba". Further wide publicity be given about this in the temple premises as well as in the local newspapers and various news papers circulated in southern portion of the country i.e. Hyderabad, Bangalore, Chennai etc. The concerned department shall comply these directions within 15 days from today and submit compliance report before the Committee.**

**The Chief Executive Officer to carry out inquiry in the matter (complaint) and also record statement of Shri Ghorpade, Accounts Officer, in this regard and place detailed report before the Committee.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

वरील निर्णय क्र.३५५ ते ४२० सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर दुपारी ०५.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
**(श्रीमती गिता पी.बनकर)**
**सहा.धर्मादाय आयुक्त,**
**अहमदनगर.**

स्वाक्षरीत/-
**(दिलीप स्वामी)**
**अपर महसुल विभागीय आयुक्त,**
**नाशिक**

स्वाक्षरीत/-
**(अरुण डोंगरे,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(श्रीकांत एल.आणेकर)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,**
**अहमदनगर.**